म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. 2021.

केशवसुत-समीक्षा

१९०९-१९५९

संपादक

गजानन कामत, एम्. ए.
मिठाबाई कॉलेज, मुंबई

सीताराम नाडकर्णी, एम्. ए.
धेंपे कॉलेज, पणजी

सुधाकर जोशी, एम्. ए.
श्री शाहू कॉलेज, पुणें

किंमत पंधरा रुपये

श्री लेखन वाचन भांडार
लक्ष्मी रस्ता, पुणें २

REFBK-0015218

मराठी ग्रंथ संग्रहालय, डाण. स्वतंत्र
अनुक्रम ७४६६३ वि: निबंध
दिनांक 2021 नों: वि: १७३।७।

मराठी ग्रंथ संग्रहालय डाण
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

केशवसुत - समीक्षा

केशवसुत-समीक्षा

१९०९-१९५९

संपादक

गजानन कामत, एम्. ए.
मिठीबाई कॉलेज, मुंबई

सीताराम नाडकर्णी, एम्. ए.
धेंपे कॉलेज, पणजी

सुधाकर जोशी, एम्. ए.
श्री शाहू कॉलेज, पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. 9429
ग्रंथ [illegible] स्थळ प्रत

किंमत पंधरा रुपये

श्री लेखन वाचन भांडार
लक्ष्मी रस्ता, पुणे २

REFBK-0015218

केशवसुत-समीक्षा
१९०६-१९५६

© गजानन कामत

प्रथमावृत्ति १९६६

प्रकाशक
ग. ल. ठोकळ
श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन
लक्ष्मी रस्ता, पुणें २

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१/४ सदाशिव, पुणें २

अनुक्रमणिका

	संपादकीय		
	संपादक—मनोरंजन		
१	'केशवसुत' अथवा कृष्णाजी केशव दामले	१९०६	१
	ना. म. भिडे		
२	केशवसुतांची कविता (अपूर्ण)	१९१५	१२
३	केशवसुतांची राष्ट्रीय कविता	१९२५	३७
	पां. रा. गुणे		
४	केशवसुतांची कविता	१९१७	५४
	न. शं. राहळकर		
५	'केशवसुत' आणि त्यांची कविता	१९१८	७४
	श्री. म. वर्दे		
६	'झपूर्झा' आणि 'म्हातारी'	१९२०	९४
	वै. का. राजवाडे		
७	केशवसुतांची कविता	१९२०	९८
	रा. कृ. लागू		
८	केशवसुतांची अभिनव काव्यरचना	१९२१	१४३

ग. त्र्यं. माडखोलकर

९	केशवसुतांची कविता	१९२१	१६७
१०	केशवसुत	१९२३	१९६
११	गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता	१९३५	२०८

बा. अ. भिडे

१२	मराठी काव्याची उत्क्रांति व केशवसुत	१९२५	२२०

रा. प. सबनीस

१३	केशवसुत आणि कवीचा व्यापार	१९२५	२३३

कविवर्य साधुदास

१४	केशवसुत	१९२५	२४१

वा. कृ. ताटके

१५	केशवसुतांची कविता	१९३०	२४५

मा. त्रिं. पटवर्धन

१६	केशवसुतकृत 'झपूर्झा'	१९३०	२५२

प. मा. टोळे

१७	केशवसुत–व्हिटमन्–वर्डस्वर्थ	१९३६	२६५

अ. म. जोशी

१८	केशवसुतांच्या कवितेचा अभ्यास	१९४०	२७४

ह. श्री. शेणोलीकर

१९	कवि केशवसुत–एक बाजू	१९४०	२९६

अ. ह. जोशी

२० नव्या युगाचा प्रणेता–केशवसुत १९४१ ३०६

मं. वि. राजाध्यक्ष

२१ केशवसुत १९४६ ३१३

आचार्य स. ज. भागवत

२२ केशवसुतांची कविता १९४८ ३२०

लालजी पेंडसे

२३ केशवसुत १९४८ ३३८

वा. ल. कुलकर्णी

२४ केशवसुत : कांहीं विचार १९४९ ३४४

वसन्त कानेटकर

२५ पुन्हा केशवसुत १९५० ३५५

नाथमाधव

२६ केशवसुत आणि सामाजिक क्रांति १९५१ ३६७

कुसुमावती देशपांडे

२७ केशवसुतांच्या काव्यदृष्टींतील उत्क्रांति १९५२ ३७५

शरच्चन्द्र मुक्तिबोध

२८ केशवसुतांचें व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निराशा १९५४ ३८८

श्री. के. क्षीरसागर

२८ सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत १९५६ ३९७

रा. श्री. जोग

३० हरपलें श्रेय १९५६ ४०५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ७४६६३ दि: निवड
क्रमांक २०२१ दि: २३।५।७१

प्रस्तावना

१९०६ ते १९५६ या पन्नास वर्षांच्या कालखंडांत निर्माण झालेल्या केशवसुत-समीक्षेंतील तीस निवडक लेखांचा हा संग्रह. चरित्रविषयक वा संप्रदायविषयक लेखांचा या संग्रहांत अंतर्भाव केलेला नाहीं. केशवसुतांच्या चरित्राविषयीं उपलब्ध असलेली माहिती ही अत्यंत मर्यादित व बरीचशी अनधिकृत स्वरूपाची ठरलेली आहे. एका दृष्टीनें हें वरदानच आहे. कारण त्यामुळें केशवसुतांचें काव्यकर्तृत्व स्पष्ट करण्यासाठीं त्यांच्या सर्व अभ्यासकांना संपूर्णतया त्यांच्या कवितांवरच भर द्यावा लागला आहे. तरीहि या पन्नास वर्षांच्या कालखंडांत निर्माण झालेल्या केशवसुत-समीक्षेंत त्यांच्या काव्यकर्तृत्वाचें परिपूर्ण मूल्यमापन झालेलें आहे असें म्हणवत नाहीं.

कोणत्याहि कवीची समग्र कविता हें एक कार्य (Event) असतें. या कार्यामागें उभें असलेलें कारण (Cause) हें कार्याच्या अनेक पटीनें विस्तृत असतें. व अनेकांगी असतें. त्याचा कार्याशीं असलेला संबंध हा ' भेदाभेदसंबंध ' असतो. म्हणजेच, काव्यामागील कार्यकारणभावांत काव्य हें कांहीं बाबतींत त्याच्या कारणासारखें असतें तर इतर कांहीं बाबतींत तें कारणापेक्षां वेगळें असतें. काव्यामागील कारणाच्या विस्तारांत कवीचें जीवन, व कवि ज्या संस्कृतींत जन्मला आणि वाढला त्या संस्कृतीची कविकालीन अवस्था हे दोन घटक प्रधान मानावे लागतात. केशवसुतांच्या जीवनाविषयीं विशेष माहिती उपलब्ध नसल्यानें जरी अनावश्यक अशी चरित्राधिष्ठित टीका (Biographical Criticism) निर्माण होण्याचा प्रश्न त्यांच्या बाबतींत निर्माण झालेला नसला तरी त्याचबरोबर त्यांच्या मानसिक उत्क्रांतीचे वेगवेगळे टप्पे समजून घेण्याचा मार्गहि त्यांच्या जीवनविषयक माहितीच्या अभावामुळे पुष्कळच दुरापास्त बनलेला आहे. त्यामुळें केशवसुतांच्या कवितेच्या रसग्रहणांत केशवसुतांची कविता व त्यांच्या वर्तमानकाळांतील महाराष्ट्रीय संस्कृतीची अवस्था या दोनच साधनांवर

संपूर्णतया अवलंबून राहावें लागलें आहे. पण केवळ संस्कृतीची वरील अवस्था लक्षांत घेतल्यानेंच एखाद्या कवीची समग्र कविता संपूर्णतया आकलन होणें शक्य नसतें. कारण, निर्माण झालेली कविता ही तिच्यामागील कारणांहून ज्या बाबतींत भिन्न असते त्या बाबतींत कवितेचें आकलन होण्यासाठीं सर्वस्वीं कवितेवरच अवलंबून रहावें लागतें.

ज्या वर्तमानकाळांत केशवसुत जगले त्यांत भारतीय संस्कृति ही निर्भेळ राहिली नव्हती. ब्रिटिशांमार्फत आलेल्या पाश्चात्य संस्कृतीचे अनेक बरेवाईट विशेष ती झपाट्यानें शोषून घेत होती. त्यामुळें केशवसुतांच्या समग्र कवितेमागील कारणाच्या सांस्कृतिक अंगांत पाश्चात्य व भारतीय असे दोन प्रवाह लक्षांत घ्यावे लागतात. यांपैकी केशवसुतांच्या कवितेमागील पाश्चात्य प्रेरणा व त्यांचे केशवसुतांच्या काव्यांत उमटलेले प्रतिध्वनि यांचाच वरील पन्नास वर्षांत निर्माण झालेल्या केशवसुत-समीक्षेंत प्रामुख्यानें विचार झालेला आढळतो. या पाश्चात्य प्रेरणेचे दोन प्रकार या कालखंडांतील टीकाकारांनीं लक्षांत घेतलेले आहेत. यांतील पहिला प्रकार हा पाश्चात्य वाङ्मयीन प्रेरणा हा असून, दुसरा प्रकार हा पाश्चात्य तात्त्विक प्रेरणांशीं संबंधित आहे.

केशवसुतांच्या काव्यामागील पाश्चात्य वाङ्मयीन प्रेरणा लक्षांत घेणाऱ्या टीकाकारांत वै. का. राजवाडे, मा. त्रिं. पटवर्धन, व रा. श्री. जोग हे तीन टीकाकार प्रमुख आहेत, तर जॉन् लॉकपासून जॉन् स्टुअर्ट मिलपर्यंतच्या ब्रिटिश तत्त्वज्ञांचे सुधारकांच्या कार्यामार्फत जे विचार महाराष्ट्रांत प्रसृत झाले त्यांचा आगरकरांच्या शिकवणुकीद्वारां केशवसुतांच्या कवितेवर निश्चित असा परिणाम झालेला आहे असें मानणाऱ्या टीकाकारांत ग. त्र्यं. माडखोलकर, ना. म. भिडे, शरच्चन्द्र मुक्तिबोध व रा. श्री. जोग यांचा समावेश होतो. या दोन्ही मार्गांनीं केशवसुतांच्या कवितेचें मूल्यमापन करण्याचे झालेले प्रयत्न नव्या अभ्यासकांच्या दृष्टीनें बरेच साहाय्यभूत ठरण्यासारखे असले, तरी ते संपूर्णतया समाधानकारक आहेत असें म्हणतां येत नाहीं. केशवसुतांच्या कवितेमागील पाश्चात्य वाङ्मयीन प्रेरणा शोधण्याच्या प्रयत्नांत त्यांचें वाङ्मयऋण विस्तृतपणें दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न राजवाडे, पटवर्धन व जोग यांच्या लिखाणांत झालेला आहेच. त्याचप्रमाणें आगरकरी सुधारणावादाच्या ज्या छटा केशवसुतांच्या कवितेंत स्पष्ट दिसतात त्यांचें संकलन करण्याचा प्रयत्न माडखोलकर, भिडे, मुक्तिबोध व जोग यांसारख्या टीकाकारांनीं केलेला आहे. पण पाश्चात्य वाङ्मयीन अथवा पाश्चात्य तात्त्विक प्रेरणा या केशवसुतांच्या कवितेमागील

विस्तृत कारणाच्या दोन अंशांची यथायोग्य दखल घेतल्यानंतर शिल्लक राहाणाऱ्या अंशांची, विशेषतः केशवसुतांच्या भारतीय वारशाची, योग्य ती दखल न घेतल्यामुळें या दोन्ही पंथांच्या टीकाकारांचे केशवसुतांच्या काव्या-संबंधीचे निष्कर्ष अपरिपूर्ण ठरले आहेत. इतकेंच नव्हे तर केशवसुतांतील पाश्चत्य वाङ्मयीन अंश अथवा आगरकरी सुधारणावादाचे अंश यांचा त्या टीकाकारांनीं केशवसुतांच्या कवितेशीं कल्पिलेला संबंध पुष्कळच गैरलागू आणि विपर्यस्त स्वरूपाचा असलेला आढळून येतो. या मुद्याच्या समर्थनार्थ या कालखंडांतील केशवसुत-समीक्षेंत गृहीत धरली गेलेली आगरकर-केशवसुत-संबंधांची कल्पना तपासून पाहाणें उद्‌बोधक ठरेल.

समकालीन सामाजिक चळवळीशीं केशवसुतांचा संबंध जोडून देण्याचा पहिला प्रयत्न ग. त्र्यं. माडखोलेकर यांनीं 'आधुनिक कविपंचक' (१९२१) मधील आपल्या 'केशवसुतांची कविता' या लेखांत केलेला आढळतो. माड-खोलकर म्हणतात—"केशवसुतांचे गुरु समाजसुधारक आगरकर यांच्या तेजस्वी मतांचा विलक्षण परिणाम केशवसुतांच्या कवितेवर झालेला दिसतो." नंतरच्या केशवसुत समीक्षेंतील आगरकर-केशवसुत संबंधाची कल्पना कमीअधिक प्रमाणांत माडखोलकरांच्या याच विधानाला चिकटून राहिलेली आढळते. वि. स. खांडेकर अथवा भ. श्री. पंडित यांसारख्या केशवसुतांच्या अन्य टीकाकारांच्या लिखाणांतहि ती वरील स्वरूपांतच व्यक्त झालेली आढळते. पण आगरकरी विचारांच्या मागें उभी असलेली पाश्चात्य तत्त्वप्रणाली व केशवसुतांच्या काव्यांत साकल्याने व्यक्त झालेलें त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान ताडून पाहण्याचा प्रयत्न कोणत्याही टीकाकारानें केलेला आढळत नाही. अर्थात् या दोहोंचा विस्तारपूर्ण अभ्यास येथे सादर करतां येणें शक्य नाहीं. तरीहि कांहीं मूलभूत भेदांचें दिग्दर्शन करून, आगरकरी विचारप्रणाली ही केशवसुतांच्या कवितेमधील चालकशक्ति ठरणें कसें अशक्य आहे हें स्पष्ट करतां येणें शक्य आहे.

आगरकरांनी 'सुधारक' १८८८ सुरू केलें. १८८८—१८९५ (म्हणजे मृत्यूपर्यंत) या कालखंडांत त्यांच्या लिखाणाद्वारें प्रक्षेपित झालेल्या सुधारकी विचारांशीं थोडेंफार साम्य असलेल्या केशवसुतांच्या फक्त तीनच कविता आहेत. त्या म्हणजे 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' (१८८८), 'मजुरावर उपासमारीची पाळी' (१८८९), व 'तुतारी' (पहिली आवृत्ति – १८९३) या होत. 'सुधारका'च्याच कालखंडांत या

तीनहि कविता निर्माण झाल्या हें लक्षणीय आहे. या व्यतिरिक्त सुधारकी विचारसरणी केशवसुतांच्या काव्यांत अन्यत्र कोठेंहि व्यक्त झालेली आढळत नाहीं. स्त्रीदास्यविमोचनाबद्दल केशवसुतांनीं केलेली हरिभाऊंची प्रशंसा ही आगरकरी विचारप्रणालीच्या स्वीकारांतून स्फुरलेली नसून ती Chivalric Values च्या प्राप्त परिस्थितींतील स्वीकारार्हतेंतून स्फुरलेली आहे. Chivalric Values व 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' असें मानणारी स्त्रीदाक्षिण्याची भारतीय कल्पना या पुष्कळ अंशीं समान असल्यामुळें केशवसुताना Chivalric Values स्वीकारार्ह वाटलीं. या दोन्ही कल्पनांत स्त्री ही पुरुषापेक्षां श्रेष्ठ मानली जात असून, आगरकरांच्या सुधारकी विचारप्रणालींत मात्र तिला पुरुषांच्या बरोबरीचें समजण्याचा अट्टाहास आढळतो. त्याचप्रमाणें 'नवा शिपाई' या कवितेंतील कांहीं शब्दप्रयोगांमुळें ही कविता सामाजिक पर्यायानें आगरकरी पंथाची आहे असें मानलें जातें. पण सर्वंकष जाणिवस्वातंत्र्यांत एक घटक म्हणून सामाजिक स्वातंत्र्य हें नेहमींच अंतर्भूत असतें. त्यामुळें ती कविता केवळ सामाजिक ठरवून तिची व्याप्ति मर्यादित करण्याचें कांहींहि कारण नाहीं. या कवितेंत केशवसुतांनीं केलेला व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष हा फ्रेंच राज्यक्रांतीद्वारे प्रक्षेपित झालेल्या स्वातंत्र्य-समता-बंधुभाव या तत्त्वत्रयीशीं जोडण्याचा प्रयत्न अनेक टीकाकारांनीं केलेला आहे. पण ही राज्यक्रांतिप्रणीत तत्त्वत्रयी स्वतःच्या कार्यांत अगर उक्तींत राबवूं पाहाणारा माणूस स्वतःस इतर व्यक्तींपासून वेगळा अगर मोठा समजण्याचा प्रयत्न करणें अशक्यच आहे. सर्व व्यक्ति जन्मतः सारख्याच स्वतंत्र असतात; म्हणून व्यक्ति हें सामाजिक व्यवहारांचे परिमाण कल्पून सगळ्या व्यक्तींना समान स्वातंत्र्य आणि समान संधि उपलब्ध करून दिल्याशिवाय कोणत्याहि लोकसमूहाची प्रगति होणें शक्य नसतें असाच या तत्त्वत्रयीमागील दृष्टीकोन आहे, व तो दृष्टिकोन आगरकरांनीं सर्वस्वीं स्वीकारलेला आढळतो. पण केशवसुतांना या कवितेंत अभिप्रेत असलेली व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना ही आगरकरांच्या बैचारिक आणि अनुभवनि व्यक्तिवादाच्या कल्पनेपेक्षांहि व्यापक व समावेशक आहे. विश्वाच्या संपूर्ण प्रक्रिया स्वतःच्या देहांत आणि मनांत समाविष्ट करून घेण्याचें हें औपनिषदिक आत्मिक स्वातंत्र्य आहे. 'मी' या प्रथमपुरुषी सर्वनामानें निर्देशित होणारी प्राकृतिक व्यक्तित्वाची अनुभवनिष्ठ अहंकेंद्रित लांबीरुंदी केशवसुतांना येथें अभिप्रेत नसून 'मी, म्हणजे विश्व आणि विश्व म्हणजे मी' असा व्यापक आत्मप्रत्ययच त्यांना या कवितेंत अभिप्रेत आहे. केशवसुतांची व्यक्तिस्वातंत्र्याची ही कल्पना त्यांच्या कवि-

व्यक्तित्वाषयींच्या कल्पनेचीच प्रगत अभिव्यक्ति असून आधुनिक कवीला अभिप्रेत असलेल्या कविजाणिवेच्या निरंकुश स्वातंत्र्याचेंच तें वर्णन आहे.

मे १८९९ मध्यें केशवसुतांची 'कवितेचें प्रयोजन' ही कविता 'सुविचार-समागम' या मासिकांत प्रसिद्ध झाली. प्रचलित सामाजिक चळवळ आणि राजकीय लढे यांच्या संदर्भात आधुनिक कवीचें स्थान कोणतें असतें यासंबंधीचें आपलें अत्यंत परिपक्व असें चिंतन केशवसुतांनीं या कवितेंत केलेलें आहे. ते म्हणतात कीं, आधुनिक समाजांतील कवि हा त्या समाजाच्या राजकीय अथवा सामाजिक कार्यांत एखाद्या राजकीय अथवा सामाजिक कार्यकर्त्याप्रमाणें भाग घेऊं शकत नसतो. आपल्या संस्कृतीची संपूर्ण आत्मिक जागृति हेंच कवीचें खरें कर्तव्य असल्यामुळें तो आपल्या काव्य-धर्मार्शी प्रामाणिक राहिला तर त्याच्या हातून आपोआपच आपल्या समाजाची सेवा घडते. अशा रीतीनें लिहिल्या गेलेल्या काव्याचे समाजाला होणारे अनेक फायदे त्यांनीं या कवितेंत नमूद केले आहेत. पण यांतील कोणताहि विशिष्ट फायदा डोळ्यांसमोर ठेवून काव्य लिहिण्याची तयारी मात्र त्यांनीं अजिबात दाखविलेली नाहीं. आजचें काव्य हें उद्यांच्या सांकृतिक वस्तुस्थितीचें प्रतीक असतें असेंच ते मानतांना दिसतात. आज काव्याला मान राहिलेला नाहीं, समकालीन सुशिक्षित वर्ग तर काव्य संपूर्णतया अनावश्यक ठरवून तें दुर्लक्षूं लागला आहे हेंच केशवसुतांच्या दृष्टीनें एक फार मोठें दुश्चिन्ह होतें. आपल्या या कवितेच्या शेवटीं ते म्हणतात कीं, आज आपल्या संस्कृतींत व्यक्तिजाणिवेंत हळूहळू घडूं लागलेले नवे फेरबदल व्यक्त करण्यासाठीं धडपडणारी कविता लिहिली जात आहे हेंच समाजात्म्याचें चलनवलन पुनश्च सुरू झाल्याचें चिन्ह आहे. काव्य आणि संस्कृति यांच्या परस्परासंबंधाविषयींचे केशवसुतांचे विचार हे असे आहेत.

कवीच्या कार्यासंबंधीचे केशवसुतांचे हे विचार व्यक्त झाल्यानंतर अवघ्या कांहीं महिन्याच्या अवधींतच, म्हणजे जानेवारी १९०१ मध्ये, त्यांनीं आपल्या 'तुतारी' कवितेची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली. या आवृत्तींत त्यांनीं मूळच्या कवितेंतील ९ ते १४ हीं सहा कडवीं गाळून टाकलेलीं असून शिवाय पहिल्या आवृत्तींतील

वंदुनिया ह्या देवालागुनि
धावीं धावीं मानव रडती !
पायपोस त्यां हाणा संप्रति

देव कशाचे ! –अश्रु जे पिती
क्रूरतर न कां ते असुरांहूनि ?

अशा स्वरूपाचे, 'धर्मकल्पना आली कोठून ?' यासारख्या आगरकरांच्या देवताविषयक लेखामुळें स्फुरलेले विचार समूळ गाळून टाकून शेवटच्या कडव्यांत व्यक्त झालेल्या

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबउ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवावर झेंडा मिरवीती !
देवांच्या मदतीस चला तर !

या विचाराशीं संपूर्ण कविता वैचारिक दृष्ट्या सुसंवादी बनविलेली आहे. तसेंच, दुसऱ्या आवृत्तींत गाळलेल्या सहा कडव्यांचा बारकाईनें अभ्यास केल्यास असें दिसून येतें कीं, तीं कडवीं म्हणजे 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' आणि 'मजुरावर उपासमारीची पाळी' या त्यांच्या पूर्वीच्या आगरकरी थाटाच्या दोन कवितांच्या मध्यवर्ति विचारांत, स्त्रियांची दुःस्थिति व विधवा-विवाह-विरोध यासंबंधीच्या विचारांची केवळ भर घालून बनविलेल्या तीस ओळी आहेत. १८९३ मध्यें लिहिलेली ही कविता १९०१ च्या सुरुवातीस अशा स्वरूपांत बदलली जावी याचा अर्थच असा कीं आगरकरांच्या विचारांचा आपल्या मनावर पडलेला प्रभाव हा आपल्या कविधर्माला मारक आहे हें आपल्या काव्यशास्त्रीय चिंतनाच्या साहाय्यानें निश्चितपणें समजून घेऊन केशवसुतांनी १९०० च्या सुमारास आगरकरी तत्त्वज्ञानाचा जाणीवपूर्वक त्याग केलेला आहे.

सारांश, सुधारणावादाचें आगरकरी तत्त्वज्ञान आणि केशवसुतांचें काव्यशास्त्र यांच्यांत मूलभूत तात्त्विक विरोध असून आगरकरी तत्त्वज्ञानाचा निर्णायक स्वीकार केशवसुतांनीं कधींहि केलेला नव्हता. पण कांहीं काळ कां होईना, एखादा माणूस एकदां विकृत तत्त्वज्ञानाच्या आहारी गेल्यानंतर त्याचा परिणाम म्हणून अनुभव-ग्रहणांत आणि कल्पनाशक्तीच्या कार्यांत निर्माण झालेली विकृति त्या तत्त्व-ज्ञानाचा त्याग केल्यानें नष्ट होत नसते. केशवसुतांनाहि शेवटी हें मान्य करावें लागलें. पण तोंपर्यंत ते जबरदस्त किंमत देऊन मोकळे झाले होते. 'दिलें हिर-ण्मय, हातीं मृण्मय' असा हतविनिमय घडून गेला होता. आपल्या मृत्यूच्या अगोदर सहा महिने त्यांनीं लिहिलेल्या 'हरपलें श्रेय' या कवितेंत केशवसुतांनीं आपल्या व पर्यायानें सर्व सुशिक्षित महाराष्ट्रीय सामाजाच्या जाणिवेचें जडवादी

आणि काव्यद्रोही आगरकरी शिक्षण स्वीकारल्यामुळें घडलेलें विघटन व्यक्त केलेलें आहे. ' A Crack in the heart !—But, Alas ! where is the restorative ? ' असेंच ते ' हरपलें श्रेय ' संबंधीं म्हणाले. त्यांना तें विघटन प्रकर्षानें जाणवत होतें, व्यथित करीत होतें. आम्हांला त्याचे परिणाम हळुहळू आतां जाणवायला लागले आहेत.

आगरकरांच्या सुधारणावादामागें उभें असलेलें तत्त्वज्ञान हें तात्त्विकदृष्ट्या जडवादी (Materialistic), मानसशास्त्रीयदृष्ट्या अनुभववादी (Empirical) व धार्मिकदृष्ट्या अज्ञेयवादी (Agnostic) असें ब्रिटिश तत्त्वज्ञान असून तें बेकन, हॉब्ज, लॉक्, हार्टली, ह्यूम, मिल व स्पेन्सर या परंपरेनें आगरकरांकडे आलेलें आहे. या तत्त्वज्ञानाला कोणत्याहि स्वरूपांतील श्रद्धा मंजूर नसून ' प्रत्यक्ष ' हें एकमेव प्रमाण मानणारें तें चार्वाकसदृश तत्त्वज्ञान आहे सर्व विश्व हें जड असल्याचा निर्वाळा देऊन आत्म्यासारख्या जड नसलेल्या अस्तित्वाला अर्थशून्य ठरविण्याचा प्रयत्न करतांना १७ व्या शतकांतील ब्रिटिश जडवादाचा अध्वर्यू थॉमस हॉब्ज आपल्या Leviathan च्या ४६ व्या प्रकरणांत म्हणतो—" The universe, that is, the whole mass of all things that are, is corporeal, that is to say, body, and hath the dimensions of magnitude, namely, length, breadth, and depth; also, every part of the body is likewise body ..... and consequently every part of the universe is body, and that which is not body is no part of the universe; and because the universe is all, that which is no part of it is nothing, and consequently nowhere ... " " मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां " पाश्चात्य शिक्षणांतून येणाऱ्या नवीन कल्पनांचें खतपाणी भारतीय संस्कृतीला घालण्याच्या मिषानें हॉब्जपेक्षाही अधिक स्पष्टपणे आत्म्याचें आस्तित्व नाकारतांना, ' धर्मकल्पना आली कोठून ? ' या आपल्या निबंधांत आगरकर म्हणतात — " आत्मा हा कोणत्याहि इंद्रियास गोचर न होणारा असा अत्यंत सूक्ष्म परमाणु आहे असें या लोकांचें खरें मत असेल व सूक्ष्मत्वासते अशरीरत्व समजत असतील तर त्यांचें बोलणें थोडेंबहुत ऐकून घेतां येणार आहे, पण अशरीरत्व म्हणजे शरीराचा अत्यंतअभाव असें म्हणण्याचा आग्रह असेल तर मात्र ते कांही तरी बडबड करतात असें म्हणावें लागेल. अशरीरी वस्तु म्हणजे काय ? आम्ही शरीरी मर्त्यांनीं तिची कल्पना

कशी करावयाची ? आत्म्याशिवाय एखादी अशरीरी वस्तु आपल्या पाहण्यांत आली आहे काय ?"

हॉब्जकडून स्वीकारलेल्या या जडवादापेक्षाहि भयंकर असें भोगवादी मानसशास्त्र जॉन लॉक या १८ व्या शतकांतील ब्रिटिश अनुभववाद्याकडून आगरकरांनीं स्वीकारलें आहे. 'An Essay Concerning Human Understanding' या आपल्या निबंधांत (II. xx. 2) लॉक म्हणतो—"Things then are good or evil only in reference to pleasure or pain. That we call good which is apt to cause or increase pleasure, or diminish pain in us, or else to procure or preserve us the possession of any other good or absence of any evil. And, on the contrary, we name that evil which is apt to produce or increase any pain, or diminish any pleasure in us, or else to procure us any evil, or deprive us of any good." म्हणजेच ज्या ज्या वेळीं व्यक्ति चांगल्या गोष्टींच्या शोधांत असते त्या त्या वेळीं ती सुखाच्या शोधांत असणें अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणे ज्या ज्या वेळीं व्यक्ति वाईट टाळण्याचा प्रयत्न करीत असते त्या त्या वेळीं ती अपरिहार्यपणें दुःखद गोष्टींपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत असते. ब्रिटिश तत्त्वज्ञानांत घडलेला 'चांगलें' आणि 'वाईट' या संज्ञांच्या वरील संकोचाचा आगरकरांनीहि जसाच्या तसा स्वीकार केलेला असून ब्रिटिशांपेक्षांहि एक पाऊल पुढे जाऊन आगरकर असें मानतात कीं, सुखाची अभिलाषा आणि दुःखाचा तिटकारा ही सर्व मानवी क्रियांमागील मूलप्रेरणा आहे. हें सूत्र आगरकरांच्या सर्व वैचारिक विश्लेषणाचा मर्मबिंदूच आहे असें म्हटल्यास वावगें ठरणार नाहीं. त्यांनीं या सूत्राच्या साहाय्यानें, सर्वांना समान सुख प्राप्त व्हावें या सदिच्छेनें प्रेरित होऊन उपलब्ध संपत्तीची अथवा उत्पादनसाधनांची समान वांटणीहि सुचविली असती तर तें कदाचित् ग्राह्य ठरलें असतें. पण दुर्दैवानें ज्ञान व काव्य यांच्या विश्लेषणांतसुद्धां आगरकर याच दृष्टिकोनाचा आश्रय घेतांना आढळतात. 'ज्ञान' या आपल्या निबंधांत ते म्हणतात —"सुखाची प्राप्ति व दुःखाचा परिहार यांत समग्र जीवकोटी सदैव चूर झालेली दिसते. नश्वर ऐहिक गोष्टीचा कंटाळा करणारा योगीदेखील सुखाच्या पाठीमागें लागलेला असतो.....जरी योगी व प्रापंचिक यांचीं सुखें भिन्न जातीचीं आहेत, तरी तीं संपादण्याचें दोघांचें साधन एकच आहे. तें साधन ज्ञान होय."

सुख हें ज्ञानाची व्यावहारिक निष्पत्ति न मानतां ज्ञान हें सुखाचें साधन मानणें म्हणजे सकाम कर्मयोग पढविणेंच होय. हीच विचारसरणी काव्याच्या व पर्यायानें सौंदर्यशास्त्राच्या पातळीवर लागू केली, तर त्या विचार-सरणींतून निष्पन्न होणारी काव्याची व्याख्या अशी ठरेल : जी शब्दरचना सुखद संवेदना निर्माण करून त्याद्वारें मनोरंजन करूं शकते ती शब्दरचना म्हणजे कविता होय. हाच विचार आपल्या 'कवि, काव्य आणि काव्यरति' या निबंधांत मांडतांना ते म्हणतात—"(संवेदनांशीं).....काव्याचा विशेष संबंध आहे. संवेदना दोन प्रकारची आहे, प्रतिकूल व अनुकूल. प्रतिकूल संवेदनेस आपण दुःख म्हणतों व अनुकूल संवेदनेस सुख म्हणतों. ज्यापासून प्रतिकूल संवेदना उत्पन्न होतात, तें आपणांस आवडत नाहीं; ज्यापासून अनुकूल संवेदना होतात तें आपणांस प्रिय होतें. कारण दुःखाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष या मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक वृत्ति आहेत. इतर सुखद वस्तूंप्रमाणें काव्यापासून आपणास अनुकूल संवेदना होतात म्हणून तें आपणांस आवडतें."

आगरकरांच्या विचारामागील या जडवादी तत्त्वज्ञानाचा व भोगवादी मानस-शास्त्राचा केशवसुतांशीं कोणत्याहि रीतीनें संबंध जोडतां येत नाहीं. केशवसुत कवीला 'मुक्या पृथ्वीचा वाचस्पति' मानतात, प्रकृति आणि पुरुषाच्या क्रीडांचा स्वरसंगम ओळखून त्यांतील सुंदरता ध्यानांत घेऊं शकणारा सांख्यज्ञ मानतात. प्रत्यक्षाबद्दल त्यांना तिटकारा नाहीं. पण, प्रत्यक्षाच्या कुंपणांत अडकून न पडता परोक्षशोधनास प्रवृत्त होणें हें केशवसुत आपलें ब्रीद मानतात. सुख आणि दुःख या दोहोंतील सापेक्षतेच्या मृगजळांत अडकून पडण्याचा प्रयत्न करणें तर त्यांन कधींहि मानवलें नसतें.

हर्ष-शोक हे ज्या सगळे
त्या काय कळे ?
त्या काय वळे ?

हे त्यांचे उद्‌गार ब्रिटिश शिक्षण आणि आगरकरी शिक्षण यांच्या परिणामाद्वारें आपल्या समकालीन सुशिक्षितांत बोकाळूं लागलेल्या भोगवादाला उद्देशून काढलेले असणें सहज शक्य आहे. हा भोगवाद निदान काव्याच्या पातळीवर तरी निश्चितच जाचक ठरणार याची केशवसुतांना लागलेली चाहूल त्यांच्या पहिल्या समर्थ टीकाकारांतच खरी ठरलेली आहे. वै. का. राजवाडे हे केशवसुतांचे समकालीन. केशवसुतांच्या काव्यविषयक कवितांचें परीक्षण करतांना 'आम्ही कोण ?' या कवितेच्या संदर्भांत काव्याची संपूर्ण आगरकरी

कल्पना स्वीकारून राजवाडे म्हणतात—"आपल्या धंद्याची कोण वडेजावी गात नाहीं? कवि नसते तर जगाचें काय झालें असतें? आनंदाचा एक झरा अस्तित्वांत नसता, तर अतिशय मनोहर अशा मनोराज्याला आपण मुकलों असतों. कवीला तत्त्व दिसतें हा केवळ पोकळ अभिमान. तत्त्वज्ञांना तें कळलें आहे असें तरी कुणीं म्हणावें? कवि शब्दांचें चित्र काढून मन रंजवितात व व कधीं कधीं आनंदाची पराकाष्ठा अनुभवावयास देतात एवढें खरें!"

कवीच्या कार्यासंबंधीची हीच आगरकरी कल्पना प्रमाण मानून आपल्या 'सुधारक' काव्याच्या प्रस्तावनेंत मा. त्रिं. पटवर्धन म्हणतात, "कवि हा मूलतः पौराणिक, ऐतिहासिक वा काल्पनिक, प्राचीन वा स्वकालीन कथा सांगणारा आणि स्वतःचीं व इतरांचीं सुखदुःखें सहानुभूतीने वर्णून मनोरंजन करणारा म्हणजे एक प्रतिष्ठित तमाशेकार होय!" प्रस्तुत संग्रहांत अंतर्भूत झालेल्या 'झपूर्झा' कवितेच्या रसग्रहणांत काव्याच्या कर्तव्याची आपली कल्पना पटवर्धन खालील शब्दांत मांडतात. ते म्हणतात: 'कवीच्या संस्कारक्षम मनाला होणारी भावना, संवेदना शब्दांच्या द्वारां इतरांस प्रतीत करून देणें हें काव्याचें आद्य कर्तव्य आहे. एखादें सुंदर दृश्य पाहून कवीला जो आनंद झाला तो त्याने कविता लिहून दुसऱ्यास प्रतीत करून द्यावयाचा असतो.'

'सुंदर' या शब्दाचे अनेक अर्थ असूं शकतात हें मान्य करूनहि वरील विचारांत पटवर्धनांना अपेक्षित असलेला 'सुंदर' या शब्दाचा अर्थ 'सुखदायक' असा आहे, असेंच संदर्भानुसार म्हणावें सागतें. पण केवळ सुखद वा आनंददायक अनुभवांत रमणें यांतच काव्याचें कर्तव्य सामावलेलें नसून हर्षखेद, सुंदरता-कुरूपता, बरें-वाईट हीं दोन्ही सारख्याच अहंनिरपेक्ष भूमिकेवरून पहाण्यांत काव्याचा मोठेपणा सामावलेला असतो हें पटवर्धनांना जाणवूंच शकलेलें नाही. म्हणूनच सुखाची अभिलाषा व दुःखाचा तिटकारा यांतूनच मानवी जीवन घडत असतें असें मानणाऱ्या व स्वतःस "होतों एक जहाल आगरकरी सच्छिष्य अज्ञात मी" म्हणवणाऱ्या या अनुभववाद्यास 'झपूर्झा' कविता अर्थशून्य वाटली. 'झपूर्झा' कवितेचा अर्थ कळत नाही असें राजवाड्यांनींहि म्हणून ठेवलेलें आहे. पण तिच्या वाचनाने मनाला झालेला आनंद खुल्या दिलाने कबूल करण्याइतपत वृत्तीचा ताजेपणा राजवाड्यांच्या पिढीजवळ शिल्लक होता; पटवर्धनांत तोहि आढळत नाहीं. राजवाडे म्हणतात—'तुतारीचा अर्थ मला कळतो. या कवितेचें रहस्य कळत नाहीं. तथापि तुतारीपेक्षांहि

ही कविता आनंद देते. माझ्या मतें तुतारीपेक्षां ही चांगली.' पण राजवाड्यांना 'झपूर्झा' कवितेच्या वाचनानें झालेला आनंद हा ती एक श्रेष्ठ रचना आहे म्हणून झालेला आहे, हें पटवर्धनांना मान्य नाहीं; उदात्त, तात्त्विक शब्दांच्या केवळ बाह्य कारागिरीच्या भपक्यांतून तो निर्माण झालेला आहे असें त्यांना वाटतें. त्यांच्या काव्यविषयक व पर्यायाने जीवनविषयक दृष्टिकोनाला आव्हान देणारी ही कविता त्यामुळें अर्थशून्य आहे असें भासविण्याचा प्रयत्न पटवर्धन सतत करतांना आढळतात, व या प्रयत्नांत ते केशवसुतांवर बुवाबाजीचा आरोप करण्यासहि कचरलेले नाहींत ! ते म्हणतात—" पुरुष प्रकृतीच्या क्रीडा म्हणजे सृष्टींतील घडामोडीच ना ? मग प्राचीन सांख्यवादांतील पारिभाषिक संज्ञांचें अवडंबर कां ? बाकी त्या तत्त्ववादांतील सोवळ्या, प्रतिष्ठित शब्दांचा दुसऱ्यांवर वजन पाडायला चांगलाच उपयोग होतो हें कबूल केलें पाहिजे." केशवसुतांची संपूर्ण जाणीव-पद्धती ही सांख्य आहे हें पटवर्धनांच्या लक्षांत तर आलेलें नाहींच; उलट सांख्य तत्त्वज्ञानासंबंधींचें आपलें अज्ञानच त्यानीं प्रकृति-पुरुष-संबंध म्हणजे सृष्टींतील घडामोडी असें समीकरण मांडून उघड केलेलें आहे. भारतीय तत्त्वज्ञानासंबंधींचें हें अज्ञान अशाच स्वरूपांत राजवाड्यांच्या 'झपूर्झा' वरील लिखाणांतहि आढळतें. पण राजवाडे निदान पटवर्धनांप्रमाणें प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान निरुपयोगी मानतांना दिसत नाहींत.

याहिपुढें जाऊन, 'संस्कृतीच्या प्रगल्भतेबरोबर काव्याचा ऱ्हास होत असतो' हें मेकॉलेप्रणीत समीकरण अभावितपणें मान्य करून पटवर्धन काव्य आणि सत्य यांचा संबंध नाकारतांना आढळतात. 'झपूर्झा'च्या याच परीक्षणांत ते पुढें म्हणतात—' पुरुष-प्रकृतीच्या क्रीडांचा स्वरसंगम म्हणजे जर त्या घडामोडींचें बुडाशीं असलेला निसर्गनियम असा अर्थ असेल तर तें कार्य कवीचें नसून शास्त्रज्ञाचें आहे. या सृष्टींत जेथें जेथें विसंवाद आढळतो, तेथें तेथें ज्ञानाच्या साहाय्यानें मूलभूत मानण्यांत आलेला संवाद पाहून समाधान मिळविणें हा तत्त्वज्ञानाचा हेतू आहे. परंतु तेंहि कवीचें कार्य नव्हे." म्हणजे, आधुनिक समाजांत सत्याचा मक्ता शास्त्र व तत्त्वज्ञान यांचेकडेच असून कवीनें स्वतःचें अस्तित्व टिकविण्यासाठी 'प्रतिष्ठित तमाशेकार' बनून जनतेचें मनोरंजन करावें, असाच पटवर्धनांच्या म्हाणण्याचा मतितार्थ आहे. व त्यालाच अनुसरून ते काव्यांत आशयाचें नावीन्य असूं शकतें हें मान्य करण्यास तयार नाहींत. ते म्हणतात—" काव्य हें कवीला ज्ञात असणाऱ्या गोष्टींचेंच एक नवीन मिश्रण असतें.

घटकांच्या संख्या-क्रम-प्रमाणादि भेदांनी नवींनवीं काव्यें निर्माण होतात." [१] कोणत्याहि कवितेचें नावीन्य हें केवळ रचनापद्धतीचें असतें असें मानणाऱ्या या काव्यशास्त्राचा उगमहि जॉन लॉकच्या तत्त्वज्ञानांतूनच झालेला असून अठराव्या शतकांतील श्रेष्ठ आंगल कवि अलेक्झँडर पोप हाच विचार व्यक्त करतांना आपल्या Essay in Criticism मध्यें म्हणतो—[२]

" True wit is nature to advantage drest
What oft was thought, but never so well exprest—"

सत्याचा व काव्याचा कांहींहि संबंध नसतो ही विचारसरणी अर्थात प्रथम प्लेटोच्या काव्यशास्त्रांत निर्माण झालेली आहे. पण सतराव्या शतकांतील शास्त्रवादी ब्रिटिश विचारवंतांनीं ती संपूर्णतया वेगळ्या तात्त्विक भूमिकेवरून स्वीकारार्ह ठरवून परत प्रचारांत आणली. या विचारवंतांचा काव्यावरील आक्षेप हा काव्यांतर्गत भाषेच्या वापराविषयींचा आक्षेप आहे. शब्दांचा विवेकनिष्ठ व शास्त्रीय वापर हाच ज्ञानाचा व सत्यशोधनाचा खरा मार्ग असून भाषेचा काव्यात्म वापर हा अशास्त्रीय व बालिश श्रद्धाळूपणावर आधारलेला एक मनोरंजक मूर्खपणाच असतो, असा रॉयल सोसायटीचा शब्दविषयक दृष्टिकोन होता व लॉकच्या Essay मधील शब्दमीमांसेंत या दृष्टिकोनाचा पूर्ण विकास झालेला आढळतो. महाराष्ट्रांत या दृष्टिकोनाचा पहिला निःसंदेह उद्‌गार म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा 'विद्वत्त्व व कवित्व' हा निबंध होय. या निबंधांत शास्त्रीबोवा म्हणतात—" या विषयाचा जो अंमळ बारकाईने विचार करील त्यास खचित कळून येईल कीं, कवीचें मन व तत्त्वज्ञाचें मन स्वभावतःच परस्परविरुद्ध होय. कवीच्या मनांत पदार्थमात्राच्या दर्शनानें कल्पनेचे नानाविध तरंग उठत असतात. ते अर्थातच बहुधा भासमय असतात. तत्त्वज्ञाचें मन पदार्थमात्राच्या वास्तविक स्वरूपाच्या शोधाकडे लागलेलें असतें. यास्तव सर्व भासमय कल्पनांचा निरास करून तें निव्वळ सत्याकडे जातें." ते पुढें असेंहि सांगतात कीं, 'बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाच्या पुढची मनाची पायरी होय.' हाच विचार व्यक्त करतांना वर उल्लेखिलेल्या त्यांच्या काव्यावरील निबंधांत आगरकर सांगतात—" ज्या लेखरचनेपासून वाचकांस ज्ञान करून देण्याचा हेतु असतो, तींत काव्य नसतें. जी रचना वाचकांच्या अंतःकरणांत अनुकूल संवेदना उत्पन्न करण्यासाठी केलेली असते, ती काव्य होय." काव्य व संस्कृति यांच्या संबंधाचें केशवसुतांना

१ अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, प्रथमखंड. पृ. ११७.

२ Essay in Criticism, Section II : Lines 297–98

अभिप्रेत असलेलें स्वरूप व काव्य आणि ज्ञान यांची त्यांना जाणवणारी अभेद्यता अशा रीतीने सुधारकी तत्त्वज्ञान व काव्यशास्त्र यांच्या संपूर्ण विरुद्ध आहे. त्यामुळें सुधारकी तत्वज्ञानाबरहुकूम जीवन जगणाऱ्या व त्याचें काव्यशास्त्रहि सहीसही वापरणाऱ्या टीकाकारांच्या लिखाणांत केशवसुतांच्या कवितेपेक्षां या टीकाकारांचें व पर्यायानें या कालखंडांतील मराठी टीकेच्या मर्यादांचें प्रतिबिंबच अधिक स्पष्टपणें उमटलेलें आढळतें. या अशाच स्वरूपाच्या गैरसमजुतींवर या टीकाकारांनीं आपली इंग्रजी रम्यत्ववादी कवि व केशवसुत यांच्या संबंधाची चर्चा आधारलेली असून केशवसुतांच्या नव्या अभ्यासकांनी या जुन्या मर्यादांची योग्य ती दखल घेणें अत्यावश्यक ठरलेलें आहे, व प्रस्तुत लेखसंग्रह हा या दिशेनें टाकलेलें पहिलें पाऊलच आहे.

अर्थात, १९०६ ते १९५६ या कालखंडांतील सर्वच टीकावर पटवर्धनी पंथाचे आहेत असें मुळींच नव्हे. पां. दा. गुणे, रा. कृ. लागू, प. मा. टोळे आदि अनेक टीकाकारांचें रसग्रहणात्मक टीकालेखन अत्यंत मार्मिक स्वरूपाचें असेंच आहे. कुसुमावती देशपांडे यांनीं तर केशवसुतांच्या कवितांद्वारे त्यांचें सेंद्रिय व विकासक्षम कविव्यक्तित्व दिग्दर्शित करण्याचा पहिला प्रयत्न केलेला आहे. पण हे प्रयत्न पुरेसे विस्तृत व सखोल नाहींत, व ते तसे बनविणें ही नव्या अभ्यासकांची जबाबदारी आहे. या जबाबदारीची थोडीफार जाणीव निर्माण झाल्यास प्रस्तुत संग्रहाच्या निर्मितीमागील श्रमाचें सार्थक झालें असें मानतां येईल.

—

या संग्रहांतील लेखांची निवड करतांना संग्रहाची प्राकृतिक आटोपशीरता व लेखांचें वैचारिक वैविध्य या दोन्ही टोकांत शक्य तेवढा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. संशोधन–सामग्री म्हणून या लेखांना फारच महत्त्व असल्याने मूळ लेखांत कोणतेहि बदल न करतां ते छापण्याची सर्व काळजी घेण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे संग्रहाच्या प्राकृतिक मर्यादांमुळें ज्या लेखकांचे विस्तृत लेख संग्रहांत अंतर्भूत करतां आलेले नाहींत, त्या लेखकांचे छोटे परंतु प्रातिनिधिक असे लेख निवडण्यांत आलेले आहेत. ना. म. भिडे यांचा १९१५ मधील 'उषा' मासिकांतील लेख हा अपूर्ण स्वरूपांत उपलब्ध असूनहि, केशवसुतांच्या कवितेची हरिभाऊ आपटे-संपादित पहिली आवृत्ति निघण्यापूर्वीहि केशवसुतांचें मूल्यमापन करण्याचा केलेला एक प्रयत्न म्हणून तो अंतर्भूत करण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणे न. शं. रहाळकरांच्या एकंदर चार

लेखांपैकी फक्त पहिला लेखांक तेवढाच घेतलेला आहे. रहाळकर व केशवसुत यांची ओळख होती हें लक्षांत घेतल्यानंतर त्यांतील माहितीचें महत्त्व वेगळें विशद करण्याची आवश्यकता नाही. 'अर्वाचीन मराठी साहित्य' (१९३५) या संग्रहांतील 'गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता' हा ग. त्र्यं. माडखोलकरांचा लेख संकलित स्वरूपांत छापलेला आहे. वि. स. खांडेकर अथवा भ. श्री. पंडित यांचे केशवसुतांवरील लेख विस्तृत व स्वतंत्रपणे अन्य ठिकाणीं उपलब्ध आहेत. परंतु संग्रहाच्या प्राकृतिक मर्यादांमुळेंच ते लेख या संग्रहात अंतर्भूत केलेले नाहीत. 'केशवसुत आणि सामाजिक क्रांति' हा लेख 'नाथमाधव' या टोपण नांवानें लिहिणाऱ्या लेखकाचें नांव समजू शकलें नसलें तरी तो प्रा. गं. भा. निरंतराच्या संमतीनेंच वाङ्मयशोभेंत छापला होता असे संपादक श्री. केळकर यांनी स्पष्टीकरण केले आहे.

हे लेख उपलब्ध करून देण्याचे कामीं 'श्री सरस्वती मंदिर', (पणजी, गोवा) या सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल श्री. उमेश सुखटणकर, पुणें मराठी ग्रंथालय, नारायण पेठ, पुणें, या ग्रंथालयाचे सेक्रेटरी, फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रथालयाचे ग्रंथपाल, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सेक्रेटरी, या सर्वांनी दिलेल्य बहुमोल सहाय्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

मुद्रणप्रत तयार करून देण्याचे कामीं आमचे विद्यार्थीमित्र अविनाश वैद्य, कु. लता अडवल्पालकर यांनी जी मदत केली त्याबद्दल त्यांचे व ज्यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत या कामीं झाली त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत.

या संग्रहांतील बहुतेक लेख निरनिराळ्या मासिकांतून व कांही लेख निरनिराळ्या पुस्तकांतून पूर्वीच प्रकाशित झालेले आहेत. त्या सर्व मासिकांच्या व पुस्तकांच्या प्रकाशकांचे आम्ही आभारी आहोंत.

ऑक्टोबर १९६६ — संपादक
पुणे.

१

' केशवसुत ' अथवा कृष्णाजी केशव दामले

जन्म	मृत्यु
फाल्गुन वद्य १४, शके १७८७	कार्तिक शुद्ध १४, शके १८२६
ता. १५ मार्च, सन १८६६	ता. ७ नोव्हेंबर, सन १९०५

अर्वाचीन कवींत कोण गगनीं मारी भरारी वरी ?
राष्ट्रा जागृति आणण्यास कविता जागी कुणाची पुरी ?
आहे तो कवि तूंच केशवसुता ! बाकी वदाया कवी !
हा ! हा ! कां कविता परी तव अशी गुल्‌दस्त ती राहवी !

' कोणीतरी.'

महाराष्ट्र वाङमयाशीं परिचय असणाऱ्या रसिक मंडळीस 'केशवसुत' हे एक आधुनिक कवि होते, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. गेल्या अंकांत 'केशवसुतां'च्या आकस्मिक निधनाचें दुःखद वृत्त कळविण्याचा आम्हांवर प्रसंग आला. त्यांच्या निधनवार्तेनें आमचा जो हृदयभेद झाला, तो शब्दांनीं रेखतां येणें कठीण ! मनोरंजनाशीं केशवसुतांचा आज आठदहा वर्षें संबंध होता. ह्या अवधींत मनोरंजनांतून त्यांच्या कविता कांहीं निनांवी, कांहीं 'एक मित्र', 'कुणीतरी' व 'केशवसुत' या नांवांखालीं प्रसिद्ध झाल्या आहेत. केशवसुतांच्या कवितांशीं मनोरंजनाचा वाचकवृंद परिचित असल्यामुळें आज केशवसुत कवीचें अल्पसें चरित्र देण्याचें योजिलें आहे.

जन्म व कुलवृत्त

'केशवसुत' यांचा जन्म शके १७८७ त फाल्गुन वद्य १४ म्हणजे इ. स. १८६६ च्या मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस रत्नागिरीनजीक मालगुंड गांवीं झाला. यांच्या वडिलांचें नांव केशवपंत दामले. हे मराठी शाळेवर शिक्षक होते. त्यांची बहुतेक नोकरी रत्नागिरी जिल्ह्यांत झाली होती. १३ वर्षें पेन्शन भोगून १८९३ सालीं हे कैलासवासी झाले. त्यांचें कुटुंब इ. स. १९०२ मध्यें वारलें. त्यांस एकंदर ६ मुलगे व ६ मुली अशीं अपत्यें झालीं. केशवपंतांचें कुटुंब मोठें होतें. त्यांचा पगार ३ रुपयांपासून ३० रुपयांपर्यंत चढत गेला. अर्थात्, गरिबी होती. तरी पण संसार व्यवस्थितपणें करून कर्जाच्या चक्रांत न सांपडतां त्यांनीं तो संभावितपणानें आणि नेकीनें पार पाडला. केशवपंतांचे वडील चिरंजीव अकरा वर्षांचे असतांच बुडून वारले. दुसरे श्रीधरपंत. हे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते. एल्फिन्स्टन् कॉलेजांतून बी. ए. होतांच लगेच बडोद्यास प्रथमच नवीन कॉलेज निघालें होतें त्यांत त्यांना संस्कृतचे प्रोफेसर नेमिलें होतें. तेथें एकच वर्ष नोकरी करून १८८३ च्या जानेवारींत ते कैलासवासी झाले. तिसरे चिंतोपंत. हे आज वीसबावीस वर्षें दापोली तालुक्यांतील नामदार मंडलिक यांच्या वळणी या खोती गांवावर नोकर आहेत. चौथे कृष्णाजीपंत – 'केशवसुत' या नांवानें प्रसिद्ध असलेले – आजच्या आमच्या चरित्राचे विषय झालेले कवि होत. पांचवे मोरोपंत. हे एम्. ए. असून उज्जनीस कॉलेजमध्यें प्रोफेसर आहेत. सहावे आणि सर्व बंधूंत धाकटे सीतारामपंत. हे बी. ए., एल्एल्. बी. असून सध्यां पुणें येथील फर्ग्यूसन कॉलेजांत प्रोफेसर आहेत.

विद्याभ्यास

कृष्णाजीपंतांचें मराठी सर्व शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यांत खेडी येथें झालें. १८८२ सालीं ते बडोद्यास आपल्या बंधूंकडे गेले. तेथें एक वर्षभर ते इंग्रजी शिकत होते. वडील बंधू श्रीधरपंत वारल्यामुळें त्यांचें १८८३ साल अभ्यास न करितां गेलें. पुढें १८८४ पासून १८८९ पर्यंत 'पुणें न्यू इंग्लिश स्कूल'मध्यें त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला व १८८९ अखेर ते प्रवेश परीक्षेंत पसार झाले. गरिबीमुळें त्यांचें पुढील शिक्षण खुंटलें व त्यांना नोकरी पाहणें भाग पडलें.

व्यवसाय

इ. स. १८९० पासून १८९६ अखेर त्यांच्या मुंबईत निरनिराळ्या ठिकाणीं नोकऱ्या झाल्या. ते कांहीं दिवस 'कमिसेरिएट ऑफिस'मध्यें, कांहीं दिवस 'दादर इंग्लिश स्कूल'मध्यें, कांहीं दिवस 'ज्ञानोदय प्रेस'मध्यें आणि कांहीं दिवस 'सरकारी टेलिग्राफ क्लास'मध्यें होते. १८९७ सालीं मुंबईच्या प्लेगमुळें मुंबई सोडून ते खानदेशांत

आपले श्वशुर श्रीयुत केशव गंगाधर चितळे हे शाळामास्तर होते तिकडे गेले. तिकडे गेल्यावर भडगांव येथील म्युनिसिपालिटीच्या शाळेंत त्यांनीं १५ रुपयांची शिक्षकाची जागा पत्करिली. तेथेंच दोन वर्षांनीं त्यांस २० रुपये झाले. नोकरींत स्थैर्य मिळाल्याशिवाय आपल्या आवडत्या विषयाकडे नीट लक्ष देतां येणार नाहीं, अशा समजुतीनें त्यांनीं 'सेकंडरी टीचर्स'ची परीक्षा दिली. नंतर त्यांस फैजपूर येथील म्युनिसिपल इंग्रजी शाळेच्या हेडमास्तराची ३० रुपयांची जागा मिळाली. तेथें ते दोनअडीच वर्षें होते. तेथें त्यांचे स्वतंत्र विचार आणि निःस्पृही वृत्ति यांमुळें तेथील अधिकाऱ्यांशीं त्यांचें जमावें तसें न जमल्यामुळें, ते धारवाड हायस्कुलांत मराठीचे शिक्षक म्हणून गेले व तेथेंच १९०३ च्या एप्रिलपासून अखेरपर्यंत होते.

देहावसान

कृष्णाजीपंतांचे चुलत चुलते हुबळीस शाळामास्तर आहेत. त्यांची मातोश्री निवर्तल्यामुळें कृष्णाजीपंत सहकुटुंब तेथें गेले होते. तेथेंच त्यांना प्लेग होऊन ता. ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं त्यांचा अंत झाला व त्यांचे दहावे दिवशीं त्याच विकारानें त्यांचें कुटुंबहि निवर्तलें! मृत्युसमयीं कृष्णाजीपंतांचें वय ३९ वर्षांचें होतें. त्यांच्यामागें त्यांच्या तीन मुली अनुक्रमें ११, ८ व ४ वर्षांच्या आहेत. आपल्या तीनहि कन्यांचीं नांवें काव्यरुचीप्रमाणें त्यांनीं मनोरमा, वत्सला आणि सुमति अशीं ठेविलीं आहेत.

स्वभाव, बुद्धि वगैरे

स्वभावानें कृष्णाजीपंत हे फार निःस्पृही, बाणेदार व करारी होते. वरिष्ठांशीं हांजी हांजी करणें त्यांना बिलकूल आवडत नसे. त्यांची वागणूक नेहेमींच सरळ असल्याकारणानें जगांतील डावपेंचांच्या वागणुकीशीं त्यांचें कधींच जुळत नसे. ते अत्यंत सुशील असून निर्व्यसनी होते. जेथें परिचय नाहीं, तेथें त्यांची संकोचवृत्ति निदर्शनास येत असे. त्यांचा प्रेमळपणा 'नैर्ऋत्य दिशेकडील वारा' या त्यांच्या कवितेवरून व्यक्त होतो, व त्याचा अनुभव त्यांच्याशीं गाढ परिचित असणाऱ्या मित्रांसच लाभला असेल. शिक्षक या नात्यानें त्यांचा लौकिक चांगला होता. सरस्वतीचें व लक्ष्मीचें नेहेमीं वांकडें असावयाचें, तदनुसार त्यांचें सर्व आयुष्य दारिद्र्यांतच गेलें. एके वेळीं त्यांचा पगार थोडा असल्यामुळें त्यांना पैशाची नड पडूं नये म्हणून त्यांचे धाकटे बंधू मोरोपंत यांनीं त्यांना मनीऑर्डर करून कांहीं रक्कम पाठविली. परंतु ती मनीऑर्डर कृष्णाजीपंतांनीं परत केली. या एकाच गोष्टीवरून त्यांच्या ठिकाणीं असणारी स्वावलंबनवृत्ति किती जागरूक होती, हें स्पष्ट होतें. त्यांचें विचारस्वातंत्र्य विलक्षण होतें, व तें त्यांच्या वर्तनांत नेहेमीं व्यक्त होत असे. ते बोलण्यांत फार निर्भीड असत. आपणांस जें खरें वाटेल तें उघडउघड बोलण्यांत त्यांनीं कधीं कोणाची पर्वा केली नाहीं. ते फार निश्चयी व कुशाग्रबुद्धीचे होते.

कवितेची अभिरुचि व तिचा विकास

मराठी शिकत असतां पोथ्या वगैरे वाचण्याचा कृष्णाजीपंतांस नाद होता. त्यांचे वडील बंधू कै. श्रीधरपंत हे कॉलेजला सुटी झाली म्हणजे घरीं येत. त्यांना कविता करण्याचा नाद असे. त्यांच्या सहवासानें कविताविरचनाची प्रथम यांस गोडी लागली. पुढें बडोद्यांत ते प्रोफेसर झाल्यावर त्यांच्या सान्निध्यांत हे एक वर्षभर होते, तेव्हां कवितेची अभिरुचि जास्त वाढली. इ. स. १८८३ सालच्या जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांत ते नागपुरास आपल्या मामाकडे गेले होते. तेथें आधुनिक कवींतील अग्रणी रा. रा. नारायण वामन टिळक यांच्याशीं सहवास घडून आला. याच वेळीं कृष्णाजीपंतांच्या ठिकाणीं कवित्वस्फूर्तीची झांक स्पष्टपणें दिसूं लागली. पुढें पुण्यास आल्यावर शाळेंत असतांना त्यांनीं कित्येक कविता रचिल्या. पुण्यांतील 'पर्वती 'वर कांहीं कविता रचल्याचें व त्याचप्रमाणें इतर स्फुट विषयांवरहि कित्येक लिहिल्याचें त्यांच्या समकालीन मित्रमंडळींच्या सांगण्यावरून कळतें. आंग्ल कवींशीं परिचय झाल्यावर तर ह्या स्फूर्तीस विशेष स्वरूप येऊं लागलें व पुढेंपुढें ते काव्यांत पूर्णपणें रंगून गेले. त्यांच्या-इतकी सबाह्यांतर काव्यविषयांत रंगून गेलेली चित्तवृत्ति क्वचितच आढळेल. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं कवितेवांचून अन्य विषय त्यांस माहीत नव्हता, इतकी त्यांची कवितेशीं तल्लीनवृत्ति झाली होती. कवितेची आराधना करण्यांतच त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं असें वाटतें. त्यांच्या आवडीचे आंग्लकवि म्हटले म्हणजे एमर्सन, शेले, कीट्स् व वर्ड्स्वर्थ हे होत. महाराष्ट्र कवींपैकीं तुकाराम त्यांस फार आवडे. तरी पण त्यांचा पुष्कळसा भर इंग्रजी कवींचीं काव्यें वाचण्याकडे असे. शेले कवीप्रमाणें कल्पनासृष्टींत संचार करण्यांत ते दंग होतेसें दिसतें. कवीनें शब्दांबरोबर न वाहवतां कल्पनेशीं झगडलें पाहिजे; नुसत्या शब्दाच्या थाटामाटानें कविता होत नसते; शब्दांत काव्य नाहीं, तें सर्व कल्पनेंत आहे; असें त्यांचें ठाम मत होतें. कवितेचें बाह्यरूप कसेंहि असलें तरी हरकत नाहीं; पण तिचें अंतरंग उदात्त कल्पनांनीं व विचारांनीं – तात्त्विक विचारांनीं – भरलेलें पाहिजे, तरच तिचें खरें उज्ज्वल स्वरूप प्रकट होईल, एरवीं नाहीं; केवळ यमक, प्रास, आणि अलंकार यांनीं नटविलेली कविता खरी कविता नव्हे असें ते म्हणत असत. त्याचप्रमाणें कवितांच्या चालींसंबंधानें त्यांचें असें म्हणणें असे कीं, लोकांना चाल समजेल कीं नाहीं याची कवीला पर्वा करण्याचें कारण नाहीं. काव्याचा विषय आणि स्फूर्ति ज्या चालींत कवीकडून गुणगुण करवील, तीच त्याच्या कवितेची चाल. कवीनें स्वच्छंदानें येईल तशी कविता रचावी. जो सहृदय असेल तोच ती समजून घेईल. कविता मोजक्या शब्दांत असून अर्थप्रचुर असावी, असा त्यांचा कटाक्ष असे, व तदनुसारच त्यांची कविता असल्याचें आढळून येतें. काव्य व चित्रकला यांमधील निकटसंबंध व साधर्म्य त्यांचे ठिकाणीं बीजांकुरानें वसत असल्याचें स्पष्ट दिसतें. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें

असतांना ते आपल्या वहींत – अभ्यासाकडे दुर्लक्ष करूनहि – केव्हां केव्हां आपल्या गुरूंचीं – टिळक व आगरकर यांचीं – चित्रें रेखाटीत व तीं ओळख पटण्याजोगीं निघत. एक वेळ असा योग आला कीं, आगरकरांस आपल्या विद्यार्थ्यानें काढिलेलें आपलेंच चित्र पाहण्यास मिळालें. त्यांना त्या गोष्टीचें मोठें कौतुक वाटलें. परंतु त्या वेळीं हा आपला विद्यार्थी पुढें चांगला कवि निपजणार आहे, याची त्यांना कल्पनाहि नव्हती ! नाहींतर त्यांच्या लेखणींतून 'काव्य व चित्रकला' या विषयावर एखादा मजेदार लेखहि बाहेर पडता ! विद्यार्थिदशेंत असतांना एकदा "असा दुर्मुखल्यासारखा काय बसतोस ? तुझ्या तोंडावरची माशीहि कधीं हलायची नाहीं !" असे उद्‌गार शिक्षकांकडून निघाले होते. याला उत्तरादाखल 'दुर्मुखलेला विद्यार्थी' म्हणून केशवसुतांनीं एक कविता लिहिली. त्यांत त्यांनीं खालील आशयाची दर्पोक्ति प्रकट केली होती :— "याच दुर्मुखलेल्या तोंडांतून अशा प्रतिभायुक्त काव्याचें निस्यंदन होईल कीं, त्या काव्याचे पाठ तुम्हांस, तुमच्या मुलाबाळांस शिकवावे लागतील !" ही जगन्नाथरायी – दर्पोक्ति प्रत्यक्ष अनुभवास येण्याचा काळ अद्याप यावयाचा आहे, व तो एकदोन पिढ्यांत येईलहि.

कवितांचें प्रकाशन

केशवसुतांच्या कविता प्रथम 'करमणुकीं'त प्रसिद्ध होऊं लागल्या. पुढें त्या 'सुधारक', 'मासिक मनोरंजन', 'सुविचार–समागम', व 'काव्यरत्नावलि' यांतून बाहेर पडत. त्यांच्या कविता एकत्र करून स्वतंत्रपणें छापून प्रसिद्ध कराव्या, असा त्यांच्या कांहीं मित्रांचा हेतु होता, व त्याप्रमाणें आमचे मित्र श्रीयुत नारायण वामन टिळक यांनीं प्रयत्नहि चालविला होता. मध्यंतरीं 'आधुनिक कवीं'च्या कविता एकवटून छापण्यासंबंधानें प. वा. श्रीयुत घाटे यांचा बेत होता. परंतु दुर्दैवानें ते अकालीं निवर्तल्यामुळें तें काम अर्धवटच राहिलें. 'आधुनिक कवीं'चा पूर्वार्ध बडोद्याच्या ग्रन्थप्रकाशक मंडळीनें प्रसिद्ध केला आहे, व दुसरा भाग लौकरच प्रसिद्ध होईल असा भरंवसा आहे. यांत 'केशवसुतां'च्या कविता प्रमुखत्वानें येतील, अशी आम्हांला आशा आहे. असें जरी आहे, तरी त्यांच्या बहुतेक निवडक कविता एकवटून स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध करणें आतां जरूर झालें आहे.

कवितांचें त्रोटक निरीक्षण

वंगदेशीय कवि मधुसूदन दत्त यांनीं वंगवाङ्मयांत इंग्रजी सॉनेटच्या धर्तीवर चतुर्दशपदी कविता रचून जशी प्रथम प्रचारांत आणली, तशी केशवसुतांनीं ती महाराष्ट्र-वाङ्मयांत आणिली आहे. त्यांची समग्र कविता एकत्र प्रसिद्ध झाल्याशिवाय तिच्यासंबंधानें विस्तृतपणें कांहीं विचार प्रदर्शित करणें योग्य होणार नाहीं, हें उघड आहे. तरी पण आम्हांला येथें इतकें विधान करितां येईल कीं, वर आम्हीं त्यांचा

जो स्वभाव दिला आहे त्याचें प्रतिबिंब त्यांच्या बहुतेक कवितेंत पूर्णत्वानें पाहावयास मिळेल. केशवसुत हे निसर्गतःच कवि होते, हें त्यांची कोणतीहि एखादी कविता वाचून पाहिली तरीदेखील आढळून येईल. उत्तम कवीस लागणारे बहुतेक गुण – सदयता, सहृदयता, प्रेमळता, शुद्धता, पावित्र्य, तन्मयवृत्ति, उन्नत विचार, उदात्त कल्पना, गंभीर व उत्साही मनोवृत्ति – त्यांच्या ठिकाणीं दिसत होते. त्यांच्या गंभीर आणि विचारी चेहऱ्याचें प्रतिबिंब त्यांच्या कवितेंत दृश्य होत होतें. त्यांचा भव्य ललाट-प्रदेश व क्वचित प्रसंगीं त्यावर दिसणाऱ्या रेषा ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांना त्यांच्या गंभीर मनोवृत्तीची व तात्त्विक विचारांत गढून गेलेल्या मुखश्रीची स्मृति झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांचा फोटो काढलेला नसल्यामुळें तो आजच्या अंकांत देण्याचा आमचा अत्यंत हेतु असूनहि आम्हांस त्यासंबंधानें अगदीं निराश व्हावें लागलें आहे ! केशवसुतांच्या सर्वच कविता स्फुट आहेत. एखादा मोठा विषय घेऊन त्यावर स्वतंत्रपणें विस्तृतशी काव्यरचना त्यांनीं केली नाहीं. तथापि तसें एखादें काव्य लिहावें असें त्यांस फार वाटे. परंतु परिस्थितीमुळें व काव्यविरचनास लागणारें मनाचें स्वास्थ्य न मिळाल्यामुळें त्यांच्याकडून ती गोष्ट झाली नाहीं. त्यांनीं कवितांशिवाय एक नाटक व एक कादंबरी – मग ती पूर्ण असो वा अपूर्ण असो – लिहिल्याचें एकदां आमच्या-जवळ प्रदर्शित केलें होतें. 'आम्ही कोण ?' व 'कवितेचें प्रयोजन', या दोनच कवितां-वरून ते कवि या नात्यानें आपलें कर्तव्य किती पूर्णपणें जाणत होते, हें स्पष्ट दिसतें.

गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल,

* * *

आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं तो आपुल्या गाइल
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल.

* * *

आम्ही कोण म्हणून काय पुसतां ? आम्ही असूं लाडके
देवाचे.

* * *

दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !
सारेहि बडिवार येथिल पहा, आम्हांपुढें ते फिके !
पाणिस्पर्शचि आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौन्दर्यातिशया, अशी असतसे जादू करांमाजि या.
फोलें पाखडितां तुम्हीं, निवडतों तें सत्त्व आम्ही निकें !

* * *

आम्हांला वगळा, गतप्रभ झणीं होतील तारांगणें;
आम्हांला वगळा, विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

वर निर्दिष्ट केलेल्या दोन कवितांतील उतारे त्यांच्या कवित्वाची तर उत्तम साक्ष पटवितातच; परंतु ते त्यांच्या मनोरचनेचें यथार्थ स्वरूप व त्यांची आपल्या कर्तव्याची कल्पना काय होती, याचेंहि चांगलेंच ज्ञान करून देतात.

'रांगोळी घालतांना पाहून' या कवितेंत त्यांच्या मनाच्या पाविल्याचें, 'निशाण', 'गोफण' आणि 'तुतारी' इत्यादिकांत त्यांची कळकळ, उत्साहवृत्ति व देशभक्ति यांचें, 'नैर्ऋत्येकडील वारा' या कवितेंत जन्मभूमि, वडील-मातोश्री व इतर यांचेसंबंधानें असलेल्या उत्कट प्रेमाचें व आदराचें, 'पुष्पाप्रत', 'दंवाचे थेंब', 'वातचक्र', 'भृंग', 'फुलपांखरूं', 'म्हातारी' इत्यादि कवितांतून त्यांच्या अवलोकनशीलतेचें व तात्त्विक विचारांच्या मनोरचनेचें, 'वियोगामुळें', 'प्रीति आणिक तूं', 'स्वप्नांत स्वप्न', 'रुष्ट सुंदरीस', 'माझा अंत', 'पहिलें चुंबन', 'प्रियेचें पुनर्दर्शन' इत्यादि कवितांतून त्यांच्या शुद्ध प्रेमाचें, 'चिन्हीकरण', 'झपूर्झा', 'ओंब्रह्म', 'नवी सृष्टी नवा देह', 'हरपलें श्रेय', इत्यादि कवितांतून त्यांच्या गहन व गूढ विचारांचें, – कोठें स्पष्ट, कोठें अस्पष्ट अशा रीतीनें – दर्शन होतें. त्यांची काव्य-विषयक सबाह्य-अंतरवृत्ति असल्याचें तर प्रत्येक कवितेंत आढळून येईल. त्यांच्या भाषेंत मार्दवपणा अथवा कोमलत्व हीं क्वचितच आढळतील. त्यांच्या जोरदार व स्फूर्तीच्या विचारानुरूप त्यांच्या भाषेंतहि हुबेहूब तसेंच प्रतिबिंब पडलें आहे. कवितेवरील त्यांची 'फिर्याद' वाचनीय आहे. त्यांतील पुढील उतारा पाहा :

आप्तवर्ग म्हणती "यातें – कुठली ही जडली ब्याद ?"
जिनें मला वेडा केलें, तिच्यावर ही फिर्याद !
हीन दीन झालों छंदी, फंदी मी तुझिया नादीं
त्यासुळें परी न मनाला घालितों कधींहि विषादीं.

एवढाच उतारा, कवितेंत ते किती रंगले होते याची साक्ष देईल. शब्दांना ताजे करण्याकरितां कवि 'वातचक्रां'वर बसून एकदां दिव्य लोकांत, तर उडणाऱ्या म्हातारीबरोबर आपल्या लाडक्या कन्येसह एकदां विमल अंतरिक्षांतून – प्रत्यक्षांतून परोक्षामध्यें भरारी मारून जात असलेला पाहून आश्चर्यानें कोण थक्क होऊन जाणार नाहीं ! त्यांच्या उत्साहपूर्ण मनोवृत्तीचीं त्यांच्या कवितेंत इतस्ततः उमटलेलीं चिन्हें, त्यांच्या कल्पनेच्या उंच उंच भराऱ्या, व एकाएकीं तात्त्विक व गहन विषयांत त्यांचें प्रयाण या सर्व गोष्टी कोणास थक्क करून सोडणार नाहींत ! त्यांचें गाणें स्फूर्तीचें असे, हें त्यांच्या खालील उद्‌गारावरून दिसून येईल–

जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे,
गाणें मनांत मग होय स्वयेंचि जागें.

याचें प्रत्यंतर दुसऱ्या एका घडलेल्या प्रसंगावरून जास्त अनुभवास येतें. एकदां 'केशवसुत' व 'माधवानुज' हे बोरीबंदरकडे चालले होते. मैदानांत प्रो. छत्रे यांची सर्कस उतरली होती. 'माधवानुजां'नीं त्या सर्कशींतील एका शृंगारलेल्या हत्तीकडे बोट दाखवून तो केशवसुतांस पाहण्यास सांगितलें. त्याप्रसंगीं त्यांनीं एका प्रकारच्या तिरस्कारयुक्त वाणीनें 'माधवानुजां'स कवितेंतच खालील उत्तर दिलें :

लवाजम्याचे झुलती हत्ती। लक्ष त्याकडे देतो कोण !
खिशामधें हें घडचाळ बोले। आला क्षण, गेला क्षण।

वरील उत्तरावरून ऐहिक वैभवाला ते किती कवडीमोल लेखीत हें स्पष्ट दिसतें. उघडच आहे, 'गाणें जें परिसावया कविपुढें राजेशहि वांकले' असे जे उद्‌गार काढणार त्यांना अशा नश्वर वैभवाची किंमत काय ! स्फूर्तीनें त्यांची कविता बाहेर पडे हें सांगण्याचें प्रयोजन आलें म्हणूनच प्रस्तुत गोष्टीचा उल्लेख करावा लागला. काव्या-संबंधानें 'केशवसुत' यांचें त्यांच्या विशेष परिचयाचे मित्रांशीं भिन्न भिन्न प्रसंगीं बोलणें व पत्रव्यवहार होई. पुढील एकदोन उताऱ्यांवरून त्यांचे याबाबतींत काय विचार होते, त्याची कल्पना होईल. 'पण लक्षांत कोण घेतो'च्या कर्त्यास अनु-लक्षून लिहिलेली त्यांची कविता तर प्रसिद्धच आहे.

" As to the idea of an annual gathering of poets :— Practical men meet periodically for practical purposes. Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the muse favours them. Some two or three congenial spirits may at times come together to sip the rainbow drops of the nectar; but more would certainly spoil its flavour. — That is my idea. "

* * *

" You complained " काय करूं आणि काय नाहीं असें होतें ! " I give below an extract from Emerson's essay on ' The Transcendentalist that struck me as an apt illustration of your mood :

" Now we confess, and by no means happy, is our condition; if you want the aid of our labour, we ourselves stand in greater want

of the labour. We are miserable with inaction. We perish of rust and rest, but we do not like your work."

'Then says the world 'Show me your own' — 'We have none' — 'What will you do, then?' cries the world. 'We will wait' — 'How long?' — 'Until, the universe beckons and calls us to work.' — 'But whilst you wait, you grow old and useless.' — 'Be it so : I can sit in a corner and perish (as you call it) but I will not move until I have the highest command."

माधवानुज's eldest brother once said to me, that our highest poetry was in sitting still and shedding tears! — How parallel with the above from Emerson!"

* * *

केशवसुतांचे मनांतून एकादी Long Poem लिहिण्याचें फार होतें. एका पत्रांत त्यांनी लिहिलें होतें :-

"Please tell x x x that I request him to undertake a Long Poem and not to waste time in writing short poems only. A century has passed without producing a long Marathi poem worth the name; and it is for the geniuses like .... and Mr..... to wipe out the disgrace. I am sorry I am a dwarf and don't show any signs as yet of outgrowing. I therefore hate myself and don't like others who attempt only small things."

'हरपलें श्रेय' या आपल्या कवितेविषयीं त्यांनीं लिहिलें होतें :-

"You can guess my state of mind from my piece in the last issue of Manoranjan'. A crack in the heart! — But, Alas! where is the restorative?'

त्यांच्या ईश्वरविषयक कल्पना

ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा फारसा भरंवसा असल्याचें दिसत नसे. याविषयीं एक चमत्कारिक प्रसंगहि घडून आला होता; परंतु त्याचा येथें उल्लेख करणें प्रशस्त नव्हे. त्यांच्याशीं ईश्वरसंबंधानें बोलूं लागलें म्हणजे "देव कोठें आहे तो मला दाखवा" असे ते उद्‌गार काढीत. आयुष्यक्रमांतील खडतर प्रसंगांमुळें

असो, अथवा त्यांच्या तात्त्विक विचारसरणीच्या मनोरचनेमुळें असो, त्यांचें अशा प्रकारचें मत झालें होतें. हें मत अलीकडे अलीकडे एकदोन वर्षांत किंचित् बदललें असावें असें दिसतें. कारण ते अलीकडे आपल्या पत्राचे आरंभीं 'श्रीराम' नाम लिहीत असत. ज्या मंजुळ नादश्रवणानुभवाचा उल्लेख वऱ्याच भगवद्भक्तांकडून जागजागीं झाल्याचा आढळतो व शेक्सपीअरनेंहि ज्याचा आपल्या पेरिक्लीज नाटकांत एकीकडे उल्लेख केला आहे, त्याच दिव्य आणि मधुर नादाचा अनुभव केशवसुतांस होत असल्याचें त्यांचेच तोंडानें एकदां बाहेर पडलें व त्यावर त्यांच्या एका कविमित्रानें त्यांस सांगितलें कीं, "ज्या अर्थीं हा नाद तुम्हांस ऐकूं येऊं लागला आहे त्या अर्थी हाच नाद तुम्हांस तुकारामादि साधुसंतांप्रमाणें एक दिवस साधू बनवून परमेश्वराचा नाद लावील." त्यावर त्यांचें उत्तर एवढेंच कीं, "मग माझी जशी कवितेवर आसक्ति झाली आहे तशीच त्याच्या ठिकाणींहि जडेल."

*　　*　　*

मनोरंजनाच्या कविमित्रांनीं पाठविलेल्या पत्रांत केशवसुतांविषयीं पुढील उद्गार आहेत.

"....रा. कृष्णाजी केशव दामले यांच्या निधनाचें वर्तमान आपल्या पत्रावरून समजलें. फार वाईट वाटतें. माझ्यामतें आपल्यांतला वर्ड्स्वर्थ गेला! २९–११–०५" 'टिळक'.

".....मला, आपल्याला व इतर लेखकवर्गाला विशेषतः काव्यभक्तांना केशवसुतांचे आकस्मिक निधनामुळें किती दुःख होईल, याची कल्पना होणार नाहीं!" २।१२।०५ 'किरात'

"....मनोरंजनाचा डिसेंबरचा अंक आला व त्याचें पहिलें पान उघडून पाहतांच काळ्या रेघांची चौकट दिसली. काय आहे म्हणून पाहिलें तों केशवसुतांचा मृत्यु! शिव! शिव! अर्वाचीन कवींपैकीं एक चांगला कवि काळानें गिळंकृत केला! फार वाईट झालें!" ३।१२।०५ 'चंद्रशेखर'

".....मनोरंजनाचा अंक आजच पोंचला. त्यांतील केशवसुत कवीची निधनवार्ता वाचून मनास फारच वाईट वाटलें. मराठी भाषेंत असा कवि होणें दुरापास्त दिसतें." काव्यरत्नावली-कर्ते.

"केशवसुतांच्या निधनाची अत्यंत भयंकर वार्ता ऐकून महाराष्ट्रांतील प्रत्येक रसिक हळहळेल, यांत शंका नाहीं. मराठी अर्वाचीन कवींत त्यांची जागा भरून येण्यास कितीतरी वर्षें लागतील. त्यांच्यासारखी उंच भरारी मारणारा कवि क्वचितच सांपडेल. आज आमच्या महाराष्ट्राचा Keats गेला!"

३।१२।०५ नरहर शंकर रहाळकर

"....केशवसुताची राहणी साधी, वर्तन पवित्र, विचार काव्यमय व भाषाशैली मनोवेधक होती...तो बोलतांना नेहेमीं खालीं पाहून बोले; तथापि केव्हां केव्हां तो वर मान करून पाही, तेव्हां त्याचे पाणीदार–हें पाणी खरोखर–अलौकिक होतें – डोळे श्रोत्यांच्या हृदयाचा वेध घेऊन टाकीत." ४।१२।०५ 'विनायक'

कृष्णाजीपंतांचे धाकटे बंधू प्रो. मोरोपंत व सीतारामपंत हे महाराष्ट्र वाङ्मयाचे भक्त आहेत. एकंदर सर्व बंधू एकसारखे बुद्धिमान असल्याचें दिसतें. अशी स्थिति असण्यास ईश्वरी कृपाच लागते. असा आपला बंधू आकस्मिक व अकालींच निवर्तल्याबद्दल त्यांना परमदुःख झालें असेल, त्यांचें सांत्वन करणें मनोरंजनाच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. एवढें सांगून आमच्या परमप्रिय कविमित्राची मूर्ति प्रेमभरानें अंतर्यामी पुनः एकवार आठवून त्यांचें हें अल्पसें जीवनचरित्र येथें पुरें करितों. त्यांच्या अविनाशी आत्म्यास परमेश्वर आपल्या सन्निध अखंड स्वानंदसुखांत ठेवो, इतकीच त्याजवळ प्रार्थना आहे.

ॐ शांतिः शांतिः शांतिः।।

(मनोरंजन जाने. १९०६. पु. ११ वें अंक ७. पृष्ठें २४८ ते २५८. संपादक, मनोरंजन)

२

केशवसुतांची कविता

लेखक : नारायण महादेव भिडे, बी. ए.

केशवसुत म्हणजे कृष्णाजी केशव दामले. हे फाल्गुन वद्य १४ शके १७८७ अर्थात् १८६६ च्या मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस रत्नागिरीनजीक मालगुंड गांवीं जन्मले. त्यांचे वडील रा. केशवराव हे रत्नागिरीतील एका मराठी शाळेवर शिक्षक होते. ते १८९३ सालांत कैलासवासी झाले. त्यांचे मागून त्यांचें कुटुंबहि १९०२ मध्यें वारले. त्यांस सहा मुलगे, व सहा मुली अशीं अपत्यें होतीं. त्यांची फार गरिबी होती, तरी पण संसार व्यवस्थितपणें करून कर्जाच्या चक्रांत न सांपडतां त्यांनीं आपला संसार संभावितपणानें व नेकीनें पार पाडला. केशवसुतांचे बंधु मोठे हुशार होते व आहेत. रा. श्रीधरपंत हे बडोद्यास प्रोफेसर होते. रा. मोरोपंत हे प्रोफेसर व ग्रंथकारहि होते. शेवटचे रा. सीतारामपंत यांची महाराष्ट्र वाचकांस ओळख करून द्यावयास नकोच. सीतारामपंत हेहि कवि आहेत. त्यांच्या कांहीं कविता विविधज्ञान-विस्तार व काव्यरत्नावली यांमधून 'मार्गण' या सहीनें प्रसिद्ध झालेल्या आहेत. केशवसुतांचा अभ्यास फार झाला होता असें नाहीं. आपले वयाचे पंधरावे सोळावे वर्षी त्यांनीं इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. पुढें पांच वर्षें ते पुण्यांतील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकत होते. १८८९ सालीं त्यांची प्रवेशपरीक्षा उतरली. गरिबीमुळें त्यांना पुढें विद्यालयांचा अभ्यास करितां येईना. तेव्हां नोकरी पाहणें भाग पडलें. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, केशवसुतांना कवितेचा पहिला ओनामा

न्यू इंग्लिश स्कूलमध्यें असतांनाच मिळाला होता. 'पर्वतीवर' व 'रांगोळी घालतांना पाहून' या कविता त्यांनीं विद्यार्थिदशेंतच रचिल्या होत्या. तथापि त्या इतक्या चांगल्या वठल्या आहेत कीं त्यांतील तत्त्वज्ञानपूर्ण काव्यप्रतिभा तितक्या वयाच्या कवीच्या कृतींत क्वचितच दृष्टीस पडते. विद्यार्थी असतांना एकदां 'असा दुर्मुखलेला काय दिसतोस ? तुझ्या तोंडावरची माशीहि कधीं हलावयाची नाहीं !' असे उद्‌गार केशवसुतांविषयीं एका शिक्षकानें काढिले होते. त्याला उत्तरादाखल म्हणून 'दुर्मुखलेला विद्यार्थी' अशी एक कविता त्यांनीं लिहिली; त्यांत खालील आशयाची दर्पोक्ति प्रकट केली आहे –'याच दुर्मुखलेल्या तोंडांतून अशा प्रतिभायुक्त काव्याचें निस्यंदन होईल कीं, त्या काव्याचे पाठ तुम्हांस, तुमच्या मुलावाळांस, शिकवावे लागतील.' बिचाऱ्या पंतोजीला काय माहीत कीं ही जगन्नाथी दर्पोक्ति पुढें खरीच ठरणार आहे ! विष्णुशास्त्री चिपळूणकरांनींसुद्धां वंधूंजवळ अशाच प्रकारची दर्पोक्ति केली होती. परंतु पुढील कार्य पाहतां त्यांची दर्पोक्ति निव्वळ तोंडाची वाफ नव्हती असें जसें आढळून आलें तसेंच केशवसुतांसंबंधानेंहि झालें. त्यांनीं दर्पानें म्हटल्याप्रमाणें खरोखरीच त्यांच्या कवितेचे पाठ आम्हांस करावे लागतील असा काळ येत चालला आहे व जरी अद्यापि फारसा आला नाहीं तरी तो पुढें खात्रीनें येईल. १८९० पासून ते १८९९ अखेर त्यांच्या मुंबईत निरनिराळ्या ठिकाणीं नोकऱ्या झाल्या. १८९७ सालीं प्लेगमुळें मुंबई सोडून ते खानदेशांत गेले. इतर व्यवस्था संभाळून आपल्या आवडीच्या विषयाकडे नीट लक्ष देतां येईना, म्हणून त्यांनीं शाळामास्तराची नोकरी पतकरली. फैजपूर येथील हेडमास्तरच्या जागेवर ते दोन-अडीच वर्षें होते. त्यांचे स्वतंत्र विचार व निःस्पृहीपणा यांमुळें येथील अधिकाऱ्याशीं त्यांचें जमेना म्हणून धारवाड हायस्कूलांत मराठीचे शिक्षक म्हणून गेले व तेथेंच १९०३ च्या एप्रिलपासून ते अखेरपर्यंत होते. केशवसुत हे हुबळीस आपल्या चुलत्यास भेटण्यास गेले होते. तेथें त्यांना प्लेगचा आजार होऊन त्यांना ता. ७ नवंबर १९०५ रोजीं देवाज्ञा झाली. त्यांची पत्नी त्यांचे दहावे दिवशीं त्याच आजारानें निवर्तली. मृत्युसमयीं केशवसुतांचें वय अवघें ३९ वर्षांचें होतें. त्यांच्या मागें त्यांच्या तीन मुली आहेत. आपल्या तिन्हीहि कन्यांचीं नांवें काव्यरुचीप्रमाणें त्यांनीं मनोरमा, वत्सला व सुमति अशीं ठेविलीं आहेत.

केशवसुत स्वभावानें निःस्पृह, बाणेदार व करारी होते हें त्यांच्या 'कवितेचें प्रयोजन,' 'दुर्मुखलेला विद्यार्थी,' 'आम्ही कोण' व 'दोन बाजी' या कवितांमधून दिसून येते. हांजी हांजी करणें तर त्यांस मुळींच खपत नसे. सांप्रत गाण्यास किंवा काव्यास कांहीं मान राहिला नाहीं असें एकाकडून ऐकतांच त्यांनीं त्यास तत्काळ

'त्याला मान नसे ? नसो.
पण अतां त्याची अपेक्षा नसे'

असें निर्भीडपणें उत्तर दिलें. जेथें त्याचा परिचय नसे, तेथें त्यांची संकोचवृत्ति दिसत असे. एका मुलीस 'रांगोळी घालतांना पाहून' तिनें त्यांत घडवून आणलेल्या स्वर्भूसंगानें थक्क होऊन तिला

'नातें, स्नेह, निदान ओळख जरी येथें मला आणिती।
होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या क्षणी।

अशी उत्कट इच्छा कवि प्रदर्शित करितो; परंतु तिथें वरीलपैकीं कोणतीहि गोष्ट नसल्यामुळें

'जा मार्गें आपल्या न दृष्टि
कर जा द्वाराकडे वाकडी'

अशा प्रकारचा रांगोळींतील सुदर्शनाचा भाव समजून कवि निमूटपणें आपल्या घराची वाट धरितो. त्यांचें स्वत्वावरील प्रेम हें 'नैर्ऋत्य दिशेकडील वारा' या कवितेंत व्यक्त होतें. त्यांची शुद्ध व सात्त्विक प्रीतिविषयींची उदात्त कल्पना ही 'प्रीति' व 'कविता व प्रीति' या काव्यांमध्यें, आपल्या पत्नीशीं पवित्र कर्तव्य हें 'प्रियेला सादर केलेली पुष्पमाला' ह्यांत, आपल्या अंगावर पडलेल्या उच्च कर्तव्याची जाणीव 'आम्ही कोण' या कवितेंत, रूढि व जुलूम यांच्या राक्षसी सैतानानें होरपळलेल्या समाजास आपलें नुकसान किती झालें व होत आहे याची ओळख, तसेंच जुन्यास चिकटून नवीनांचा धिक्कार करणाऱ्यांना 'जुनें जाउंद्या मरणालागुनी' अशी खडखडीत वाणी आपणांस 'तुतारी' या कवितेमध्यें आढळेल. 'निशाण' या कवितेंत त्यांची कळकळ, 'हरपलें श्रेय,' यांत मनास लागून राहिलेली तळमळ, 'भृंग' कवितेंत गुंगीविषयीं उत्कंठा, 'झपूर्झा' यांत कवीची अविकृत स्थिति, 'ओंब्रह्म' या कवितेंत अभ्यासानें होशील 'ॐब्रह्म तूं' अशी मनास दिलेली ग्वाही, व शेवटीं 'नवी सृष्टी नवा देह' यांत प्रवेश झाल्यानंतरची कवीची स्थिति, यांचा वाचकांस तेव्हांच प्रत्यय येतो. अगदीं परिचयांतील साध्या व सरळ गोष्टी व त्यांवरून सुचणारे ईश्वरी शक्तीचे व मानवी कर्तव्याचे विचार काव्यद्वारानें प्रकट करणें केशवसुतांचें काम हातखंडा असे. केशवसुत हे मोठे कुशाग्र बुद्धीचे, जातिवंत कवि होते, याची साक्ष एकटचा 'म्हातारी' या कवितेवरून होण्यासारखी आहे.

केशवसुतांची सर्व कविता स्फुट आहे. प्रथम ती करमणुकींत प्रसिद्ध होऊं लागली. पुढें सुधारक, मासिक मनोरंजन, सुविचारसमागम व काव्यरत्नावलि यांतून येऊं लागली. त्यांची सर्वच कविता 'केशवसुत' या नांवानें प्रसिद्ध होत नसे. कधीं विषयांस अनुरूप अशा 'एक मित्र,' 'कुणीतरी' वगैरे नांवाखालीं येत असे. एखादें मोठें काव्य लिहावें असें त्यांना फार वाटत असे व तशी त्यांच्या मित्रांनीं सुद्धां त्यांचेजवळ आपली उत्कट इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु कांहीं अंशीं परिस्थिति अनुकूल नसल्या-

मुळें व कांहीं मोठीं काव्यें लिहिण्यास जी मनःस्वास्थ्याची जरुरी आहे तें न मिळाल्यामुळें त्यांच्याकडून ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. ते पुढें जगले असते तर एखादें मोठें काव्य त्यांचे हातून निर्माण झाल्यावांचून राहतेना. कवितांशिवाय एक कादंबरी व एक नाटक, मग तीं पूर्ण असोत वा अपूर्ण असोत, लिहिल्याचें त्यांनीं आपल्या मित्राजवळ एकदां कबूल केलें होतें. कांहीं असलें तरी त्यांची उच्च कवींत गणना करण्यास हरकत नाहीं. जरी त्यांना पूर्ण प्रौढत्व आलें नव्हतें, तरी त्यांनीं कविविषयीं

'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें ० ०'

असें जें लिहिलें आहे, त्याची सफलता आपल्या काव्यांत पूर्णपणें करितां आली नाहीं; तथापि त्यांची जी कांहीं कविता आहे तींत वरील गुण बरेच दृष्टीस पडतात. ते अल्पवयांत गेले असल्यामुळें †

(चाल – वसंतीं बघुनि मेनकेला)

'रसिक हो ! लाजत स्मेराला
करी भरी दशदिशा सुगंधें,
पुरा न जो हंसला.'

असें टिळक कवींनीं 'दत्त' कवींविषयीं जें म्हटलें आहें ते केशवसुतांसहि लागूं पडतें.

मागें सांगितलेंच आहे कीं केशवसुत यांना काव्य करण्याचा छंद विद्यार्थिदशेंतच जडला होता. मराठी शिकत असतांना पोथ्या वगैरे वाचण्याचा त्यांना फार नाद असे, त्यांचे वडील बंधु रा. श्रीधरपंत यांच्याच सहवासानें व काव्याभिरुचीनें केशवसुतांस कवितेची गोडी लागली व ते थोडी थोडी रचूंहि लागले. १८८३ च्या जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांत ते नागपुरास आपले मामाकडे असतांना त्यांचा टिळक कवींशीं सहवास घडून आला. पुढें पुण्यास आल्यावर त्यांनीं 'पर्वतीवर', 'रांगोळी घालतांना पाहून' वगैरे कांहीं स्फुट काव्यें रचलीं. पुढें तर आंग्लकवींशीं जसा जसा परिचय होत गेला तशी तशी त्यांची कवितेवरील भक्ति इतकी वाढली कीं, त्यांस 'आसनीं भोजनीं शयनीं' तिच्यावांचून दुसरें कांहींहि सुचेना.

'संसारीं परि करमेना
जम कोठें नीट जमेना'

---

† त्यांनीं आपल्या मित्रास पाठविलेल्या एका उत्तरांत लिहिलें आहे 'I am sorry. I am a dwarf and don't show any sign as yet of out-growing. I, there-fore hate myself and don't like others who attempt small things.' मी, अजून लहान आहें. याकरितां मला कवितावृक्षाचीं फलें तोडतां येणार नाहींत असें त्यांनीं जरी गौरवानें म्हटलें आहे; तथापि याच एका कारणाकरितां त्यांनीं महाकाव्य लिहिण्याचें नाकारलें नसतें.

अशी वेडावल्यासारखी त्यांची स्थिति झाल्यामुळें आप्तमित्रांनीं त्यांस दोष दिला व त्यांना कवितेवर 'फिर्याद' करावयास लाविलें. सृष्टीमध्यें जें जें सुंदर दृष्टीस पडे तें तें केशवसुतांस वेड लावीत असे.

त्यांचे इंग्रजींतील आवडीचे कवि म्हटले म्हणजे इमर्सन, शेले, बर्न्स, कीटस्, वर्ड्स्वर्थ हे होत. महाराष्ट्र कवींपैकीं तुकारामाकडे त्यांच्या मनाचा कल जास्त असे. शेलेप्रमाणें कल्पनामय सृष्टींत इतस्ततः संचार करण्यांत, तर वर्डस्वर्थ-प्रमाणें धरेवरील नंदनवनांत सृष्टीच्या मांडीवर लोळत असतांना तिच्या ओच्यांतील काव्यपुष्पें बाहेर फेकण्यांत ते दंग असत. 'कवीनें शब्दाबरोबर न वाहवतां कल्पनेशीं झगडलें पाहिजे. नुसत्या शाब्दिक थाटमाटानें कविता होत नाहीं अशी त्यांची दृढ समजूत असे व ती त्यांच्या 'बाळचक्रांत' स्पष्ट झालेली आहे. कवितेचा तिच्या बाह्य स्वरूपाशीं फारसा संबंध नाहीं. तिचें अंतरंग उच्च कल्पनांनीं, तात्त्विक विचारांनीं व उदार मनोवृतींनीं भरलेलें पाहिजे. तिचें उज्ज्वल स्वरूप प्रगट होण्यास वरील गुणांचीच आवश्यकता आहे. स्त्रियांची किंमत त्यांच्या अंगावर घातलेल्या डागडागिन्यांवरून होत नसून त्यांच्या अंगीं जे गुण असतात त्यावरून होते. त्याचप्रमाणें कवितेचें बाह्यांगापेक्षां अंतरंगच विशेष प्रधान होय. तें कवितेचा आत्मा होय. तो जितक्या मानानें स्पष्ट व उज्ज्वल असतो तितक्या मानानें कवितेची किंमत चढते. नुसत्या यमक, प्रास, अलंकार यांनीं नटलेल्या कवितेस कविता म्हणतां यावयाची नाहीं. तिला वाटेल तर नियमित गद्यरचना असें नांव द्या. अशा प्रकारचीं मतें केशवसुतांचीं असत. या कवितेच्या चालीसंबंधानेंहि त्यांचें असें म्हणणें कीं, "लोकांना चाल समजेल कीं नाहीं याची परवा करण्याचें कवीस प्रयोजन नाहीं. काव्याचा विषय आणि स्फूर्ति ज्या चालींत कवीस गुणगुण करावयास लावितात तीच त्या कवितेची चाल होय." चालीच्या अनुरोधानें स्फूर्तीस न वळवितां स्फूर्तीच्या अनुरोधानें चालीनें वागलें पाहिजे. कवीस अमुक तऱ्हेनेंच कविता रचा अशी अटक कोणासहि घालतां यावयाची नाहीं. त्यानें स्वच्छंदानें येईल तशी कविता करावी. जो सहृदय असेल तोच ती समजून घेईल. मूर्ति कशा प्रकारची असली तरी चालेल परंतु त्यांतील भावप्रतिभा उच्चतऱ्हेची पाहिजे कारण –

'ती अत्युद्भुत गूढ शक्ति सहसा संचारितां अंतरीं' 'मुक्तात्मा गगनीं उडे' व ही 'देवाची जननी' एकदां कां आपल्यावर प्रेम करूं लागली कीं, काव्यांतील बाकीचे 'बडिवार' आपणांस तुच्छच वाटणार. शब्द-चित्रांतील काय किंवा रंगचित्रांतील काय, त्यांतील भाव एकवार मनावर ठसला कीं मूर्तिकडे दुर्लक्ष झाल्यास नवल नाहीं. ज्याप्रमाणें चित्रांत निरनिराळ्या प्रकारचे रंग, त्याची सफाईदार भूमि वगैरे बाह्यांगें जरी कितीहि मोहक असलीं तरी जोंपर्यंत त्या चित्रांतील आकृतींत भाव-अंतरंग साधलें नाहीं – तोंपर्यंत बाहेरील खटाटोप व्यर्थ होणार, त्याप्रमाणें काव्यांत

यमकें, अलंकार, वगैरे बहिरंगें कितीही अनुरूप योजिलीं तरी जोंपर्यंत अंतःस्थित प्रतिभेस वाव मिळणार नाहीं तोंपर्यंत ती कविता नीरसच राहणार ! या साधर्म्यामुळें कवि व चित्रकार यांची तुलना केली जाते. त्या दोहोंमध्यें फरक इतकाच कीं, एक जण शब्दांत व दुसरा रंगांत चित्र रेखितो. " केशवसुतांत काव्याप्रमाणेंहि चित्राची कला बीजरूपानें वास करीत होती. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें असतांना ते आपल्या वहींत अभ्यासाकडे दुर्लक्ष करूनहि केव्हां केव्हां आपल्या गुरूंचीं – आगरकर, टिळक यांचीं चित्रें रेखाटीत. तीं मूळप्रकृतीविषयीं बरींच जमत असत. "

केशवसुतांनीं आपणा स्वतःस ' मी गणमात्रा जुळणारा ' आहें, खरा कवि नव्हे; असें जरी म्हटलें आहे, तथापि त्यांचें गाणें स्फूर्तीचें असे असें त्यांच्याच अंतःस्थित पुराव्यावरून सिद्ध करितां येईल.

सृष्टिमाजी जें रम्य असें कांहीं
तीच कारण या शक्ति असे पाहीं !

जगांत जें जें कांहीं रम्य आहे तेंच कवीच्या काव्यस्फूर्तीस कारण होतें. तसेंच

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें.

ही स्थिति खऱ्या कवीची झालीच पाहिजे. नाहींतर सृष्टीचीं रम्य गीतें गाणारा बुलबुल अगर कोकिळ पक्षी आपले कोमलस्वर खिडकीच्याद्वारें कवीच्या कर्णांत ओतीत आहे, व कवि कवितेकरितां विषय सुचावेत म्हणून डोकें खाजवीत आहे. अशी खरोखरीची स्थिति असल्यास ' गणमात्रा जुळणारा ' याची यथार्थता लवकरच व्हावयाची! केशवसुतांचें गाणें स्फूर्तिजन्य असे या गोष्टीचें प्रत्यंतर आणखी एका घडलेल्या प्रसंगावरून जास्त अनुभवास येतें. " एकदां केशवसुत व माधवानुज हे बोरीबंदराकडे चालले होते. मैदानांत प्रो. छत्रे यांची सर्कस उतरली होती. माधवानुजांनीं त्या सर्कशींतील एका शृंगारलेल्या हत्तीकडे बोट दाखवून तो केशवसुतांस पाहण्यास सांगितलें. त्या प्रसंगीं त्यांनीं एक प्रकारच्या तिरस्कारयुक्त वाणीनें माधवानुजांस कवितेंतच उत्तर दिलें कीं " लवाजम्याचे झुलती हत्ती, लक्ष त्याकडे देतो कोण ? खिशामधें हें घडचाळ बोले आला क्षण, गेला क्षण. " त्यांच्या गहन विषयावरील तात्त्विक कविता बहुतेक स्फूर्तिजन्य आहेत.

इहलोकींचे बडिवार केशवसुतांना तुच्छ वाटत असत. भर्तृहरीप्रमाणें ते श्रीमंताशीं निःस्पृह असत. ऐहिक ऐश्वर्य हें त्यांचे मतें अंतिम ध्येय नव्हे. ' आला क्षण, गेला क्षण ' याचा जाब देण्याकरितां प्रत्येकानें जपलें पाहिजे, अशी त्यांची

दृढ समजूत असे. दिवाळीच्या दिवसांत हजारों लोक ऐहिक सुखांत दंग होऊन जातात. परंतु 'कोणीकडून-कोणीकडे' यासारख्या गहन विषयांत ज्याचें मन गुंतलें आहे, अशास दिवाळींतील डागडागिन्यांचें व मेजवान्यांचें क्षणिक सुख काय कामाचें? लोक त्या सुखांतच खुशाल मजा मारोत, परंतु तत्त्वज्ञानी कवींना

'मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी।
कालक्षेप करीन उन्मन अशा वेडयापरी गाउनी॥'

हेंच करणें योग्य. 'विवेचनेंतचि जिणें कंठणें' व 'अकालींच जो आम्हां न्याया मृत्युमुखीं पाही' असा जो 'उद्यांचा विचार' त्याच्याबद्दलची चिंता वाळगणें याची केशवसुतांना फार खंती आली होती. भृंगाप्रमाणें, सारखे

'वेलीमधूनि कलिकांवरुनी झुकावें'

व त्यांची 'रसिकता' मिळवावी. सामान्य जनास जें आपल्या आकलनशक्तीच्या बाहेर म्हणून त्याज्य असें जें कांहीं अज्ञेय असतें त्यांतूनच 'चिजा' शोधून त्या लोकांस ज्ञेय कराव्यात अशी त्यांची नेहमींची हाव असे. व त्याच दिशेनें त्यांचा प्रयत्न सुरू असे. मग

'विसर तर झणीं व्यवहाराला, विसर शहाणपणाला'

'आणिक वेडी होउनि' वसण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं परंतु 'मुके त्वदीय बोल बोलवीन सर्वदा जनीं.' कारण

'अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया
जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया'

हा काव्यदेवीचा निरोप आम्हांस मानला पाहिजे. दिक्कालावर अवलंबून राहणें हें सामान्यजनांचें काम होय.

'विसरुनियां अवघीं काजें'

व असें करण्यानें

'हयगय त्याची मज जाची
परी न मजला पर्वा त्याची'

असें झालें तरी हरकत नाहीं. कारण,

'अणूसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें.'

अशी ज्यांची स्थिति झाली आहे, त्यांना

'ती धरुनि कसें तें मिळतें
न असे मर्यादा ज्यातें?'

अशा प्रकारचें बंधन निरुपयोगी ठरणार. दिक्कालादि उपाधींची मर्यादा सामान्य जनापर्यंतच टिकते.

'दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके'

असें म्हणणाऱ्या कवीला तिचा अटकाव नाहीं.

'पाणिस्पर्शचि आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौंदर्यातिशया—'

अशाप्रकारची अद्‌भुत जादू हातीं असल्यावर त्यानें

'आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें
आम्हांला वगळा विकेल कवडीमोलावरी हें जिणें'

असें म्हटलें तरी तें दर्पोक्तीच्या पायरीस पोंचणार नाहीं.

ईश्वराच्या अस्तित्वावर केशवसुतांचा फारसा भरंवसा होता असें दिसत नाहीं. त्यांच्याशीं ईश्वरविषयक कोणी बोलूं लागलें म्हणजे त्यास

'आहे देव कसा? कुठें?'

म्हणन प्रश्न विचारीत. बरोबरच आहे, जोंपर्यंत मनुष्य जड वस्तूंत गुरफटून गेला आहे, जोंपर्यंत दृश्याच्या पलीकडे त्याची दृष्टि गेली नाहीं, तोंपर्यंत या जगांत जडातीत, अगम्य असें जें कांहीं गूढतत्त्व असतें त्याविषयीं तो साशंकच राहणार; अगर त्याच्यावर त्याच्या आयुष्यक्रमांत जे जे कांहीं खडतर प्रसंग गुदरतात त्यांमध्यें त्याचे मनाची समता नाहींशी होऊन ती मनोनौका संदेहांत हेलकावे खाऊं लागते व शेवटीं अनीश्वरत्वाच्या खडकावर जाऊन आपटते. वरील कोणतेंहि कारण असो,

एवढें मात्र खरें कीं, केशवसुत कांहीं काळ अनीश्वरवादी होते. हें त्यांचें मत वयाचे मानानें म्हणा, गूढशक्तीची ओळख पटत चालली म्हणून म्हणा, अगर खडतर प्रसंगांचे सहवासानें त्यांतील कडकपणा नाहींसा होऊन त्यास तोंड देण्यापुरती पुढें मनाची समता झाली म्हणून म्हणा, त्यांचे पूर्वीचे मतांत बदल होत गेला. या जड जगांत स्पर्शातीत, अज्ञेय असें कांहीं तत्त्व सृष्टीच्या मूळ स्वरूपाशींच भरलेलें आहे याची खात्री वयाबरोबर होत गेली. पर्वत, नद्या, झाडें, फुलें वगैरे सृष्टपदार्थांविषयींच्या बाह्यज्ञानाचा बोध होणें ही जीविताची इतिकर्तव्यता नव्हे, तर त्याच्यांत सांठवून ठेविलेलीं परंतु सामान्य जनांस न उमगणारीं अशी अलौकिक रहस्यें व तत्संबंधीं यथार्थ कल्पना यांचें ज्ञान होणें, "शास्त्रज्ञास व तत्त्वज्ञास जेथें फिरकतांहि येत नाहीं तेथील निसर्गविलास, चैतन्यविकास यांचा थांग आपल्या प्रतिभेच्या प्रसादानें प्राप्त होणाऱ्या दिव्य दृष्टीनें लावणें, बाह्य विषयांनीं पाठविलेल्या निरोपांचें सहज ग्रहण करणें, तीं हवीं तेव्हां स्पष्टपणें मूर्तिमंत उभीं करणें, आन्तरविश्वांतील या अनुभवांचीं चित्रें वठविणें" हेंच खऱ्या कवीचें काम आहे, हेंच त्याच्या जीविताचें अंतिम कर्तव्य आहे. याच पवित्र कर्तव्यास सदैव ध्यानीं धरून तदनुरोधानें वागल्यास कोणासहि आपला मार्ग चुकण्याची भीति नाहीं. इतकेंच नाहीं, तर आपल्या तत्त्वास पूर्णपणें चिकटून राहिल्यानें आपणांस ईश्वरी नाद मार्गदर्शक होतो. अशा प्रकारचा नाद अगर शब्द हा बैबलांत लिहिल्याप्रमाणें 'देव असतो, त्यांत जीवन असतें व तें जीवन मनुष्याचा प्रकाश होतें. आणि तो प्रकाश अंधारांत प्रकाशतो, अंधारास त्यास केव्हांहि ग्रहण करितां येत नाहीं.' याच नादानें – मुरलीच्या नादानें कृष्णानें आपल्या प्रिय गोपांस नादविलें व

'माझी अहंमति अवघी विरली,
मी तूंपण ही भ्रांति नुरली
प्रीति अनन्या विश्वीं भरली'

अशी त्यांची स्थिति केली. "याच मंजुळ नादश्रवणाचा उल्लेख बऱ्याच भगवद्भक्तांकडून जागजागीं झालेला आढळतो. शेक्सपीयरनेंहि आपल्या 'पेरिक्लिज' नाटकांत या नादाचा उल्लेख केला आहे." अशा या दिव्य, मधुर, नादाचा-गुप्तध्वनीचा अनुभव केशवसुतांसहि आल्याचा त्यांच्याच काव्यांत स्पष्ट उल्लेख आहे.

'गुप्तध्वनि हा परिसुनि हसलों
हसुनी रडलों, रडुनी हसलों
नूतन सृष्टीमाजीं शिरलों
घेउनि देह नवा!'

या नादाबद्दल केशवसुत एकदां आपले कविमित्राबरोबर बोलले असतांना त्यानें त्यांना सांगितलें कीं, ज्या अर्थीं हा नाद तुम्हांस ऐकूं येऊं लागला आहे त्या अर्थीं हाच नाद तुम्हांस तुकारामादि साधुसंतांप्रमाणें एक दिवस साधू बनवून परमेश्वराचा नाद लावील. यावर त्यांचें उत्तर एवढेंच होतें कीं, 'मग माझी जशी कवितेवर आसक्ति जडली आहे तशीच त्याच्या ठिकाणींहि जडेल.'

येथपर्यंत केशवसुतांचा जीवनवृत्तांत देऊन त्यांच्या स्वभावांतील गुणधर्महि दाखविले. आतां त्यांच्या काव्याकडे वळण्यास हरकत नाहीं. काव्याचा विचार करतांना आपलेपुढें त्यांतील दोन अंगें उभीं राहतात. एक बाह्यांग व एक अंतरंग. केशवसुतांची कविता पूर्वीच्या कवितेहून वरील दोन्हीहि अंगांनीं भिन्न आहे. त्यांत नवीनता दिसून येते. या दोन्ही अंगांपैकीं कवितेच्या बाह्यांगाचा आपण प्रथमतः विचार करूं.

केशवसुतांचे अगोदर इंग्रजींतील चतुर्दशपदी इकडे प्रचलित नव्हती. बंगाली काव्यवाङ्मयांत कवि मधुसूदन दत्त यांनीं जशी ही चतुर्दशपदी प्रथम प्रचारांत आणिली. तशी ती पद्धति महाराष्ट्रवाङ्मयांत प्रथम केशवसुतांनींच सुरू केली. आमचे संग्रहीं त्यांची जी कविता आहे त्यांतील बराचसा भाग याच पद्धतीनें व्यापिला आहे. ही पद्धति इकडे कांहीं काळ फारशी आवडली नव्हती. परंतु अलीकडे बहुतेक कवि तिचा अंगीकार करीत आहेत. ही पद्धति कांहीं अंशीं बरीच सोयीस्कर आहे. एकेक विचार एकेका चतुर्दशपदींत घातल्यानें एक चतुर्दशपदी संपून दुसरी सुरू होतांना आपलें एका विचारांतून दुसऱ्या विचारांत संक्रमण होतेंसें भासतें. चतुर्दशपदीमुळें एकेक कल्पना पोसली जाऊन पूर्ण होण्यास बराच वाव मिळतो. तुकारामाची सर्व कविता या चतुर्दशपदीच्याच मासल्याची होय. या काव्यांतील दुसरा विशेष म्हटला म्हणजे कवीनें सुरू केलेली निर्यमक कविता होय. मोरोपंतांच्या लांब लांब यमकांनीं ज्यांचे कान भारून गेले आहेत अशांस असली पद्धति कदाचित बेडौल वाटेल. परंतु सॅम्युअल बटलरनें आपल्या डडिभास नामक विनोदी काव्यांत म्हटल्याप्रमाणें सयमक कवितेचा एक चरण त्यांतील अर्थप्रेरक व रसपोषक व दुसरा यमक साधणारा अशी जेव्हां स्थिति होते, तेव्हां दुसरा चरण निवळ यमकाचे वांट्यास देऊन त्यायोगें अर्थाची व रसाची हानि होऊं देण्यापेक्षां निर्यमक कविता काय वाईट होणार आहे? आतां निर्यमक कवितेंत वरच्या पंक्तींतील ध्वनि खालच्या पंक्तींत उतरणार नाहीं हें खरें; परंतु या अल्पशा फायद्याकरितां काव्याचे उत्तम गुण म्हणजे अर्थ व रस यांची हानि होऊं देणें हा 'हल विनिमय' होणार! चौथा व शेवटचा विशेष म्हटला म्हणजे केशवसुतांची सर्वच कविता श्लोकबद्ध म्हणजे संस्कृत काव्यांत रचण्याच्या जितक्या पद्धति आहेत तेवढ्यांतच रचिली आहे असें नाहीं. पुष्कळशी कविता संस्कृतांत अपरिचित अशा वृत्तांत – पदांत गुंफिली आहे. अशा पद्धतीनें कवीस वेळोवेळीं स्वर बदलतां यतात व त्यायोगानें काव्यामध्यें विविध वैचित्र्य उत्पन्न करितां येतें. तसेंच स्वराच

व अर्थाचा बोध करून देण्यासारखी रचना करणें हाहि 'भृंग', 'झपूर्झा' यांसारख्य कवितेंत एक गुण सांपडतो.

'तर गरगर गर त्यास चढूं दे ताजे व्हाया स्वर्गांत' हा चरण गुणगुणतांना आपणांस सहजगत्या अर्थ सुचतो. ही प्रतिध्वनीची पद्धति इंग्रजी काव्यांत बरीच पूर्णतेस पोंचली आहे. मिल्टन कवीच्या 'स्वर्गहानि' काव्यांत तर ती वरचेवर आढळून येते. अन्य काव्यांत सांपडणारे काव्यास अनुकूल असे दुसरेहि कित्येक गुण या काव्यांत वरचेवर आढळून येतात, परंतु ते नवीन नसल्यामुळें केवळ भिन्न गुणांचाच निर्देश केला आहे.

आतां या कवितेच्या अंतर्गत स्वरूपाकडे वळण्यापूर्वी इतकी इशारत देणें जरूर आहे कीं, केशवसुतांची सर्व कविता आमचे संग्रहीं नाहीं; तेव्हां जी कविता सध्यां आमचे हातीं आहे, तेवढ्याचबद्दल आम्हांस आपले विचार प्रदर्शित करणें भाग पडत आहे तथापि एवढ्यावरूनसुद्धां केशवसुतांच्या काव्याची बरीच ओळख होईल असें वाटतें.

आम्ही सोयीकरितां या कवितेचे चार भाग करितों. पहिल्या भागांत फक्त वर्णनात्मक कवितेचा अंतर्भाव होतो. यांत अर्थाकरितां कवितेंत खोल शिरण्याची जरूर राहात नाहीं. यांतील अर्थाचा बोध वरच्यावर होतो. दुसऱ्या भागांतील कविता वर्णनात्मक तर खरीच, परंतु त्यांतूनच एखादें सामान्य नीतितत्त्व निघतें. याच भागांत नाटकें, कादंबऱ्या (यांना गद्यकाव्य म्हणून जर म्हटलें तर) मोठमोठीं काव्यें यांचा अंतर्भाव होतो. येथपर्यंतच काव्यांत मानवी मर्यादेचें सभोंवतीं वेष्टन असतें. तिसऱ्या भागांत येणाऱ्या कवितेंत मात्र कवि दिक्कालाच्या मर्यादा ओलांडून थोडासा भीतभीत त्याच्या पलीकडे जातो. आणि चौथ्या व शेवटच्या भागांत कवीचे संचारास कोणताहि व कोठेंहि प्रतिबंध राहात नाहीं. परोक्षांतून अपरोक्षांत, दृश्यांतून गूढांत कधीं 'बसुन कल्पनाविहंगपृष्ठावरि' तर कधीं 'पवनाच्या चक्रीं' आरूढ होऊन, कधीं तुतारीच्या उदात्ततेच्या पोषक सुस्वराबरोबर, तर कधीं हवेंत उडणाऱ्या म्हातारीसारख्या – वाटेल तर तिला क्षुद्र म्हणा अगर अज्ञेय म्हणा – वस्तूबरोबर अंतरिक्षांतून भटक्या मारीत शेवटीं योग्याप्रमाणें निर्विकार स्थितीस पोंचून 'लीन सच्चिदानंदांत' कवि होतांना दिसतो. महाकाव्याचा अंतर्भाव आम्ही दुसऱ्या भागांत करण्याचें कारण हें कीं त्यांत बहुतेक दिक्कालांनीं मर्यादित अशाशींच संबंध असतो. मानवीप्रपंचाचें अगर इतिहासांतील युद्धाचें वर्णन करीत असतांना कवीस कालाची मर्यादा सांभाळावी लागते. त्यांचा कधीं तिसऱ्या भागांत तर कधीं चौथ्या भागांत अंतर्भाव होतो, परंतु दुसऱ्या भागांतच त्यांचा जास्त प्रमाणानें अंतर्भाव होत असल्यामुळें आम्हीं त्यास त्यांतच समावेशिलें आहे.

केशवसुतांच्या कवितेपैकीं ज्यांचा पहिल्या भागांत समावेश होतो त्या म्हटल्या म्हणजे 'दोन बाजी', 'स्मरण आणि उत्कंठा', 'दिवाळी', 'थकलेल्या भटकणाराचें

गीत', 'मनोहारिणी' वगैरे कविता होत. 'दोन बाजीं'त थोरला बाजीराव व शेवटला राव बाजी यांच्यामधील विरोध दाखविला आहे. थोरला बाजीराव

'निज नामाचा 'गाजी' ऐसा अर्थ उरवुनी तो गेला;'

व धाकटा बाजी

'तूं गेलासी करून 'पाजी' अहह! पितामहनामाला'

अशा प्रकारें एकाविषयीं आदर व दुसऱ्याविषयीं त्वेष व्यक्त केला आहे. 'स्मरण आणि उत्कंठा' या काव्यांत कवि व त्याची प्रिया यांनीं एकमेकांस 'हे माझे शुकराज' 'माझे जातिल ते', 'क्रीडासिंधुमधील हे मम तरी' व 'माझे नाविक हो प्रवीण' अशा रीतीनें दिलेल्या संबोधनाचें स्मरण होऊन कवीस रात्रभर तळमळ लागल्यामुळें निद्रासुख मिळत नाहीं, व 'तेणें दुर्लभ गे! तुझें अहह! तें स्वप्नांतही दर्शन' होत आहे. अशा रीतीनें स्मरणानें उत्कंठा कशी दुणावते याचें चित्र रेखाटलें आहे. 'दिवाळीं'त दागदागिन्यांचें वर्णन, मेजवान्यांचा थाट वगैरे विषय आहेत. 'थकलेल्या भटकणाराचें गीत' व 'मनोहारिणी' यांत कवीनें आपल्या प्रियेची – आपल्या कवितेची जगामध्यें निरंतर भटकणाऱ्या कवीवर आपला अनुग्रह करावा अशी आराधना केली आहे. यावरून या भागांत सामान्य मानवांचे पातळीपेक्षां कवि फारसा वर चढलेला दिसत नाहीं.

दुसऱ्या भागांत मुख्यत्वेंकरून 'मयूरासन आणि ताजमहाल', 'प्रियेस सादर केलेली पुष्पमाला', 'प्रियेचें पुनर्दर्शन', 'माझा अंत', 'टिमकीवाला', 'वियोगामुळें', 'प्रीति आणिक तूं', 'कवितेचें प्रयोजन', 'आम्ही कोण', 'पहिलें चुंबन', 'कल्पकता', 'कविता आणि प्रीति', 'कचाप्रत देवयानी', 'फार दिवसांनीं भेट', 'काव्य कोणाचें' वगैरेचा अंतर्भाव होतो. यांतील 'मयूरासन आणि ताजमहाल' यांत जगाचे आदरास पात्र होणारीं तसलीं अद्‌भुत कामें पाहून कवि आश्चर्यानें थक्क होतो. त्यांतील मयूरासन 'धूर्ती' अहमदशहानें पळवून नेलें, व त्यामुळें तें केवळ स्मर्तव्य झालें आहे. याच रीतीनें जगांत कितीहि थोर व अद्‌भुत गोष्टी असल्या तरी त्या अशाच लयास जावयाच्या; तेव्हां हे भ्रांत नरा! आपल्या स्वार्थाच्या प्रकृतीपुढें तूं कितीहि धूप जाळलास तरी तो कधींना कधींतरी लोपून जाणार हें खास! परंतु प्रीतीची एक काडी पेटीव म्हणजे सर्व जगांत तिच्या वासाचा घमघमाट पसरेल! याच विषयावर प्रो. पटवर्धन यांची एक सुंदर § कविता आहे. तिच्याशीं प्रस्तुत कवितेची तुलना करतां कमी दर्जाची ठरेल. याच कवीच्या इतर कवितेच्या मानानें ही कविता कवीनें बरीच अगोदर लिहिली असावी असें वाटतें; कारण तात्त्विक विचारास प्रेरक

§ प्रो. वासुदेव पटवर्धन यांची कविता

असा विषय असूनसुद्धां कवि त्यांत शिरला नाहीं. प्रियेस सादर केलेल्या पुष्पमालेंत कवीनें आपल्या पत्नीस कर्तव्याची आणि प्रीतीची ओळख करून दिली आहे. सुवर्णाचे दागिने हे कविपत्नीचे खरे अलंकार नव्हत. तिला

मानवधर्मा विसरविती,
दिव्यगुणानें चमकविती;
शिल्पकलेच्या या रीती
सौंदर्याच्या या स्फूर्ती !

मनांत असती
जनांत दिसती
स्वर्गीं वसती

स्वर्ग आणिती भूवरती
दिव्य पदा भू चढविती !

* * *

सौंदर्याच्या या मूर्तीं
प्रसन्न काव्यें जीं रचिती
चित्रें रंगीं रंगविती
सत्याचीं रूपें दिसती

मूळ स्फूर्ती,
एक प्रकृती,
निर्गुण वृत्ती

सदानंदलहरी चित्तीं
उठती त्यांची ही व्यक्ती !

* * *

अमूर्तरूपा हें आलें
नव्हतें तें असतें झालें;
मनांत संकल्पीं उठलें,
जनांत कृतिरूपें वठलें;

हें प्रेमाचें
हें प्रीतीचें
परस्परांचें

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. ९
क्रमांक ७४६६३ दि: नोव्हेंबर
क्रमांक 2029 वॉर्ड दि. 173167

देणें येथें हो दिधलें !
कुणी म्हणावें तें फिटलें !

(मनोरंजनाचा दिवाळीचा अंक १९१०)

'फुलांच्या मी भाषेमधिं रुचिर जें काव्य रचिलें
मिषानें माल्याच्या, ग्रहण कर तूं, तें तर भलें'

हेंच योग्य होय. कारण

'सुवर्णाच्या भूषा जरि तव शिरीं या विलसती ।
तरी त्या माल्याचें अणुभर न त्या काम करिती.'

सुवर्णाच्या अलंकारानें प्रीतीच्या अलंकाराचें काम भागत नाहीं. पतीनें आपल्या पत्नीस सुवर्णालंकारांनीं जरी मढवून काढिलें तरी केवळ ह्याच कारणाकरितां पत्नी पतीवर प्रेम करणार नाहीं. फार कशाला, जेथें प्रीतीचा अभाव तेथेंच दागिन्यांनीं तिची भरपाई केली जाते. खरोखरच

'जरी तूझी माझी प्रबल नसती प्रीति, तरि ते ।
जनासाठीं केले तुजवरि अलंकार असते ।।
परी तूतें येथें स्मरुनि सखये ! प्रेमळपणें ।
करें माझ्या आलें खचित नसतें माळ करणें ।।'

अशा रीतीनें पत्नीनें पतीकडून म्हणवून घेणें हें गृहिणींना भूषणावह होय. मग अशा प्रकारचीं देवमाणसें ज्या गृहामध्यें वास करितात तें गृह भूलोकींचें नसून नंदन-वनांतीलच होय. 'हरपल्या श्रेया'करितां जगांत कोठेंहि धुंडाळावें लागत नाहीं, तर 'अशा ठायीं माझें मज हरपलें श्रेय गवसे', याचा अनुभव येतो. या काव्यांतील

'अन्यानें न अपेक्षिलें प्रियतमे जें आपणापासुनी ।
तें सद्वर्तन दावितां सहज जो जातो मनीं मोहुनी ।।
त्याच्या गे ! हृदयांत नंतर उठे उल्लास तो प्रीतिचा ।
ऐसा आपण पाहतों नियम हा कांते ! सदा सृष्टिचा ।।'

हा अमूल्य उपदेश प्रत्येकानें, विशेषतः कुलस्त्रियेनें हृदयांत सांठवून ठेवण्यालायकच आहे. 'माझा अंत', 'पहिलें चुंबन', 'फार दिवसांनीं भेट', 'प्रियेचें पुनर्दर्शन' 'वियोगामुळें', आणि 'प्रीति आणिक तूं' या कवितेंतून कवीच्या उत्कट प्रेमांचें चित्र निघालें आहे. निवळ सात्त्विक प्रेमाकरितां कवीनें 'मी भूत हें मम असे', 'वेडा पीरच

जाहलों', 'एकव्रतता भंग – पाप नच यांत' असें म्हटलें आहे. 'टिमकीवाला' यांत कलीचें भूलोकीं अवतरण व त्यापासून कोणकोणते अनर्थ गुदरले आहेत हें सांगितलें आहे. 'कवितेचें प्रयोजन' व 'आम्ही कोण' या कविता तर केशवसुत कवि या नात्यानें आपलें कर्तव्य किती पूर्णपणें जाणत होते याची साक्ष देत आहेत. "जरेनें वाकलेले, रोगांनीं ग्रस्त झालेले, मनस्तापांनीं त्रासलेले, दारिद्र्यानें जेरीस आलेले" सारांश 'जे कां रंजले गांजले' असे बंधुजन पाहून

'या वेळेस कसे कवे !
तुज सुचे गाणें न.'

असें कवीस कोणी विचारतांच त्यानें 'तुम्ही जर प्राप्त झालेल्या दुःखस्थितींतून उत्तीर्ण होण्याकरितां झटत असाल तर खात्रीनें

'गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल ।
स्फूर्तीच्या तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवि होइल ।।'

तसेंच

'आशा, प्रेम तसेंच वीर्य कवनीं तो आपुल्या गाइल ।
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल ।।'

असें सांगून शेवटीं

'आतां जात असे दुरीं शिथिलता अस्मत्समाजांतुनी,'

व याची खूण पाहिजे असेल तर

'—गान जें निघतसे
तें साच जाणा मनीं,'

असें बजावीत आहे,

'आम्ही कोण' म्हणून काय पुसतां ? आम्ही असूं लाडके ।
देवाचे – दिधलें असें जग तयें आम्हांस खेळावया ।।
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया ।

* * *

सारेही बडिवार येथील पहा आम्हांपुढें ते फिके.
स्वर्गाची समता धरेस झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच !

ते आम्हीच शरण्य, मंगल तुह्मां ज्यांपासुनी लाभतें.'

या वरील उताऱ्यावरून कवीपुढें किती उज्ज्वल ध्येय होतें याची कल्पना येईल. 'कल्पकता' या काव्यांत सर्व जग आहारनिद्रादि ठरीव व्यवहारांत निमग्न असतां ही कल्पकता देवी एकांतांत बसून तोंडानें गाणें गात गात एक वस्त्र विणीत आहे व त्यामध्यें

'सूर्याचीं शशिचीं सुरम्य किरणें घेऊन देवी सुधी
होतीं गोवित इंद्रचापहि तसे'

* * *

'त्या वृद्ध वसुंधरेवर पहा
तारुण्य ओथंबलें.'

मग भूदेवी आनंदित होऊन

'आतां स्वर्ग मला स्वयेंचि वरण्या येईल—'

असें बोलली असा विषय आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, सर्व जग तोच तोच कित्ता गिरवण्यांत गुंतलें असतां ही कल्पना विश्वाचे अनंत उदरांतून नवीन चिजा बाहेर काढिते. 'कचाप्रत देवयानी' हें सर्वांच्या परिचयांतलें पौराणिक काव्य आहे. यांतील कथाभाग प्रत्येकास अवगत आहेच! कचासाठीं देवयानीनें केलेला शोक या काव्यांतील वर्णितविषय आहे. अन्योन्यास दिलेल्या शापाचें देवयानीस वाईट वाटत आहे. व आपल्या प्रियकरास जीं परुषोत्तरें दिलीं तीं तिच्या हृदयास बोंचत आहेत. मंदाकिनींत केलेल्या जलक्रीडेचें नंदनवनांतील 'कल्पव्रततीकुंजा' खालीं बसून प्रियकरावरोबर केलेल्या रसभरित गोष्टींचें, तसेंच कचानें द्वारीं लावलेल्या अशोकवृक्षाचें, देवयानीची परडी भरण्याकरितां कचानें झाडावरील काढून दिलेल्या पुष्पांचें, भिंतीवर काढलेल्या चित्रांचें तिला स्मरण होऊन ती शोकानें विव्हल होते. काव्य जरी परिचयाचें आहे तरी तें शैलेनें म्हटल्याप्रमाणें 'नव्या दमानें' गाइलेलें आहे. 'काव्य कोणाचें' यांत ज्या आपण कविता करितों त्या आपल्या नसून

'शारदेनें जो मंत्र दिला कानीं, तसें लिहिलें मीं—'

असें सांगून परंपरेनें आपल्या प्रेरणेविषयीं, आपणास होत असलेल्या साक्षात्कारा-विषयीं कवि सुचवितो.

या दुसऱ्या भागावरून कवीच्या सामर्थ्याची, स्फूर्तीची, मनोवृत्तीची कल्पना करतां येईल. नुसत्या या भागावरून केशवसुतांस 'कवि' ही संज्ञा मिळण्यास हरकत नाहीं.

मानवी मर्यादेचें उल्लंघन झालेलें या भागांत फारसें आढळून येत नाहीं. अजूनपर्यंत कवीचे प्रत्यक्षांतच विहार चाललेले दिसतात. तथापि भूवरील ईश्वरांश अशा सात्त्विक, शुद्ध प्रेमाकरितां कवि वेडा झालेला दिसून येतो.

तिसऱ्या भागांत 'नवा शिपाई', 'प्रीति', 'रांगोळी घालतांना पाहून', 'दिवस आणि रात्र', 'पुष्पाप्रत', 'दंवाचे थेंब', 'भृंग', 'गोफण केली छान', 'प्रतिभा' 'घुबड', 'फुलपांखरूं', 'तुतारी', 'फिर्याद', 'सृष्टि आणि कवि' वगैरे कवितांच समावेश होतो. यांतील 'नवा शिपाई' या काव्यांत जगामध्यें चोहोंकडे प्रगति चालली आहे अशा वेळीं कोणीहि पाठीमागें राहतां उपयोगीं नाहीं. 'नव्या मनूंत' जुन्या शिपायांचें काम नाहीं. त्यांत 'नव्या शिपायांचा'च उपयोग होणार. आजपर्यंत समाजांत माजून राहिलेले जातीजातींतील भेद विसरून जाऊन प्रत्येकानें 'कूपमंडुका'ची वृत्ति सोडून

'ती माझी, मी त्यांचा;
एकच ओघ आम्हांतुनि वाहे.'

असें म्हटलें पाहिजे.

'शांतीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे।
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे।।

अशा प्रकारच्या उच्चतम कर्तव्याची जाणीव या काव्यांत कबि करून देत आहे. 'प्रीति' ही बाजारांत विकत मिळणारी, शेजाऱ्यापाजाऱ्याचे घरांत सांपडणारी, तसेंच शेतांतून, बागांतून शोधून काढतां येणारी वस्तु नव्हे. तर

'हृदयीं बीजें पडलीं– प्रीति त्यांतुनी अवतरली।'

अशाच रीतीनें प्रीतीचा नेहमीं 'सौदा' होत असतो. प्रीतीचा विनिमय प्रीतीनेंच होतो. दुसऱ्या कशानें होत नाहीं. तुम्हांस प्रीतीची अपेक्षा असेल, तर

'प्रीतिनें प्रीति ग संप दा'

एवढाच मार्ग मोकळा आहे. 'रांगोळी घालतांना पाहून' हें काव्य कवीचे विद्यार्थिदशेंतील असून बरेंच सरस आहे. पुष्कळांनीं चैत्राचे महिन्यांत स्त्रियांना रांगोळी घालतांना पाहिलें असेल, परंतु एकासहि त्यांत 'रांगोळी' यापलीकडे कांहीं दिसलें नाहीं. केशवसुतांस मात्र त्यांतील साधेपण जाऊन त्यांत इतकीं गूढ रहस्यें दिसूं लागलीं कीं, तसलीं

'स्पष्टत्वें इतुक्या अशक्य मिळणें
काव्यांत, चित्रांत—'

'रांगोळींतील चंद्रसूर्याच्या आकृति उज्ज्वल दिव्यत्वास, स्वस्तिक 'धर्मार्थ-कामांतील' सफलतेस, पुष्पें प्रीतीस सुचवूं लागलीं व त्यायोगानें

'स्वर्भूसंग असा तयांत इतुक्या अल्पावकाशीं नसे।
कोणीं दाखविला अजून—'

असें कवीस म्हणावें लागलें. 'दिवस आणि रात्र' यांतसुद्धां आपणास अपरिचित असा विषय आढळून येतो. आजपर्यंत दिवसाची सुंदरता व रात्रीची भयाणता—कारण रात्र ही काळोख प्रसवणारी अतएव दुष्कृत्यांस व त्यांच्या जनित्यांस साह्यभूत होणारी आहे म्हणून भयंकर आहे—असलीं मतें आपले कानीं पडलीं आहेत; परंतु प्रीतीकरतां वेडे झालेल्या कवींना दिवसापेक्षां रात्रीचीच अधिक थोरवी वाटणार! दिवस हा महत्त्वाकांक्षा उत्पन्न करितो, प्रत्येकास ऐहिक सुखाकरितां धडपड करावयास लावितो; प्रेमीजनांना वियुक्त करणारा दिवस. परंतु रात्रीची गोष्ट याहून फार भिन्न आहे. रात्र ही विचारास पोषक आहे. प्रेमाच्या माणसांस एकत्र करून प्रेम द्विगुणित करणारी रात्र होय. दिवसा ईश्वरांश असा एकच 'तारा' तर रात्रीं तसले असंख्य 'भास्कर' दृष्टीस पडतात. दिवस हा एकटचा ऊर्वीचें दर्शन देतो, तर रजनी अनंत आकाशाचें कपाट उघडिते.

'दिवस वदतसे "पहा प्रकाश
आंत शिरतसे परि अंधार."'

परंतु

'रात्र बोलते "पहा तमास
परि आंत पडे प्रकाश फार."'

फार कशाला 'ही भूमी हा नरक' असें नेहमीं कानाशीं ओरडणारा दिवस, तर 'ही भूमी हा स्वर्ग असे' असें आपल्याशीं कानगोष्ट करणारी रात्र! दिवसापेक्षां रात्रीचा इतका जास्त चांगुलपणा असतांना तो आजपावेतों आपणांस बहुतेक अज्ञात होता. 'पुष्पाप्रत' या काव्याचा विषय म्हटला म्हणजे कवीनें लहानपणीं ज्या फुलमित्राबरोबर

'तुज पाहनि मी नाचावें।
दुड दुड धांवत तुजशीं यावें।
प्रेमें तुजला स्वकरीं घेउनि।
सखया चुंबावें.'

असा सुखाचा काळ घालविला, त्याच्या व कवीच्या पुढील स्थितीमध्यें पडलेला फरक हा आहे. इकडे कवीचें

'काळोखाच्या जगामध्यें या
मृत आशांच्या चितावरुनियां
पिशाच—'

सारखें भटकत आहे, परंतु त्यास शांतीचा लवहि मिळत नाहीं, तर तिकडे

'काळहि तुझिया दिव्यत्वाला
वाटे नमन करी'

अशा 'चिरतरुण' व 'चिररुचिर' फुलावर स्वर्ग गाणें गात आहे. अशा प्रकारची दोघांच्या सौख्यामध्यें सांप्रत पडलेली रुंद 'दरी' पाहून 'तुझें दिव्य गाणें गावयास-सुद्धां मी पात्र नाहीं, माझ्या अंगीं तुझ्यासारखी दिव्य शक्ति नाहीं, तथापि तूं तरी आपल्या कर्तव्यास जागून

'जगांत दुष्ट सर्प जे भरून फार राहिले तयांस–'

ठार मारून सर्व लोकांस

'प्रीतिचें (तयांस) सांग तत्त्व फार रम्य तें'

असें कवि आपल्या बालमित्रास सांगतो.

'होते हिर्मबिंदु सकाळीं
कोठें ते सायंकालीं ?'

अशा हिर्मबिंदूंच्याच काय पण सर्व जगताच्या अस्थिर स्थितीबद्दल कवीस 'दंवाच्या थेंबा'कडे पाहून सखेद आश्चर्य वाटतें.

'कोठून हे आले येथें ?'

अशा प्रकारचा प्रश्न 'दंवाचे थेंब' पाहून करणाऱ्या एकुलत्या एक बालकास मातेनें

'चंद्र आणि नक्षत्रें तीं
शोभलीं येथ वा रातीं
तेथुनि हे आले येथें'

असें दिलेले उत्तर, व त्यावर

'राहतील येथें कां ते ?'

असा बालकाकडून पुनरपि प्रश्न निघतांच मातेस आपल्या गतबालकांचें स्मरण होऊन तिनें

'देवारे ! . . . . . .
एवढा तरी लाभूं दे'

असें मोठचा कळकळीचें देवापाशीं मागणें फारच हृदयंगम प्रसंग आहेत. कवीनें रेखाटलेलें प्रेमळ मातेचें चित्र खरोखर मनास चटका लावणारें आहे. 'भृंगा'चें 'परमानंदें परिपूर्ण' असें गाणें ऐकून 'गुंगी' देण्याबद्दल त्यापाशीं कवि याचना करितो, तर वनश्रींतून इकडून तिकडे स्वच्छंदानें विहरणाऱ्या 'फुलपांखरा'स पाहून

'तिमिरीं आह्मी नित्य रखडणें
विवंचनांतचि जिणें कंठणें'

या उद्विग्नताजनक विचारांनीं खिन्न होत्साता कवि त्याचें गाणें गातो.

'गोफण केली छान' यांत

'--पूर्वीच्या आर्यांचा बडिवार गाउनि
जे निज षंढत्वा मात्र दाविती फार !'

किंवा 'जे गरिबी शिकवितात बालास' अशांनाच एकमेकांतील वैर योग्य ! तें कर्त्या पुरुषांना शोभणार नाहीं. असा उत्साह कवि देत आहे. 'घुबडा'वरील कवितेची कल्पना एडगर पो यांच्या 'रेव्हन' नामक इंग्रजी काव्यावरून घेतली आहे. कवीची 'गुणरूपवती' भार्या दिवंगत झाली म्हणून कवि शून्य लोचनांनीं आपल्या खिडकींतून जगांतील निस्तब्धता अनुभवीत होता; परंतु त्यास या वेळीं त्या शून्य स्थितीचा सुद्धां कंटाळा आला होता. इतक्यांत खिडकीच्या समोर एका झाडावर बसलेल्या घुबडानें 'मी तुज सोबत' अशा अर्थाचा घूत्कार केला. कवीलाहि या वेळीं मनुष्यांच्या सहवासाचा तिटकाराच आला होता, तेव्हां त्या घूत्कारानें कवीस समाधान वाटलें. परंतु 'माझ्या अशा विरहव्यथित मनाला तुझी खाशी सोबत होईल व माझे मनास जरा धीर तरी मिळेल' असा विचार कवीच्या मनांत येतांच घुबडानें 'ऊं हूं' असें कवीस नकारार्थी उत्तर दिलें. 'मलाहि मरण प्राप्त होऊन मी माझ्या दिव्याकार प्रियेस पाहिन काय ?' असा विचार येतांच घुबडाकडून 'ऊं हूं' असाच जबाब मिळाला.

'वरें, स्वर्गांत नाहीं तर नाहीं. मी नरकांतल्या घोर यातना सोसण्यास सुद्धां राजी होईन, परंतु मला माझ्या प्रियेची स्मृति होऊन तिचें डोळ्यांस नाहीं तर निदान मनास तरी दर्शन होईल काय ?' या वेळीं सुद्धां घुबडाचा पूर्ववत् जबाब निघाला. या निष्ठुर उत्तरानें कवीस त्वेष चढून त्यानें

'डाग न देई मम दुःखावर
काळें कर तूं येथुनि सत्वर'

असें जोरानें म्हटलें. परंतु त्या अधम, चांडाळ घुबडास त्याचें कांहींच न वाटून त्यानें पुनः 'ऊं हूं' असेंच उत्तर दिलें; असाच या काव्याचा विषय आहे. अशा प्रकारचें काव्य महाराष्ट्र वाङ्मयांत नवीनच होय. 'तुतारी' या काव्यांत कवीच्या निस्सीम देश-भक्तीची ओळख पटते. 'प्रेतेंही उठवील जी निजरवें' अशा प्रकारची तुतारी कवि मागत आहे. ज्या वेळीं 'रूढी' व 'जुलूम' समाजाचे लचके तोडूं लागतात, ज्या वेळीं आकाशांत सर्वत्र ढग पसरून सूर्यास प्रकाशण्यास देखील वाव देत नाहींत; त्या वेळीं 'जलसे' करून 'गाफीलपणा' दाखविण्याचा समय नव्हे. जुन्यास चिकटून नवें टाकूं नका. कारण नवीनताहि जुन्यांतूनच निर्माण झाली आहे. तुम्ही आपल्या उन्नतीस अटक काय म्हणून घातली आहे ? सांप्रत धर्मांचें अवडंबर इतकें माजलें आहे कीं, त्या योगानें नीतीला सुद्धां अडथळे येऊं लागले आहेत. परंतु या खुळचांना हें समजत नाहीं, कीं,

'नीतीचें पद जेथें न ढळे,
धर्म होतसे तेथेंच स्थिर'

तर अशा वेळीं या 'दंभावर' या 'बंडावर' हल्ला करण्याकरितां कवि शूरांस पाचारण करीत आहे, व

'समतेचा ध्वज उंच धरा रे !
नीतीची द्वाही पसरा रे !
तुतारिच्या ह्या सुराबरोबर'

असें कवि कळकळीनें सांगत आहे. कारण

'नियमन मनुजासाठीं, मानव
नसे नियमासाठीं जाणा'

हें जर स्पष्ट दिसत आहे, तर

'प्रगतिस जर ते हाणी टोणा
झुगारूनि ते देऊनि, बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव'

हेंच करणें योग्य होणार! जिनें कवीला वेड लाविलें, व जिच्या योगानें 'यातें कुठली ही जडली व्याद' असें आप्तेष्टांना म्हणावयास लागलें, अशा कविता युवतीवर कवीनें 'फिर्याद' लाविली आहे. तिचे पायीं

'धन न करीं, वणवण करितों,
मज कोठें नीट जमेना'

इतकी जरी कवीची निकृष्ट स्थिति झाली आहे, तरी

'त्यामुळें परी ना मनाला घालितों
कधींहि विषादीं'

असें म्हणून

'चिरस्मरण तुझें मी स्मरलें
हो प्रसन्न नुरवी खेद!'

ही मागणी कवि तिचेजवळ मागत आहे. जें प्रत्यक्ष 'उषे'चें आवडतें आहे, व बालक ज्याचेशिवाय

'––प्रगट होय न जें जराही
सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं'

अशी ज्याची थोरवी आहे, अशा पुरुषाच्या शोधार्थ फिरत असतांना

'उद्योगमग्न जन हा मज
हे म्हणो न'

असें सृष्टीस कवि सांगत आहे. कारण ज्याच्याप्रमाणें इतर जनांस धान्यादिकांचा पुरवठा सृष्टि करिते, त्याप्रमाणें कवीसहि काव्याचें पीक सृष्टीपासूनच मिळतें. अशा प्रकारचा सृष्टीचा व कवीचा मातापुत्रसंबंध कवीनें 'सृष्टि व कवि' या काव्यांत दाखविला आहे.

या तिसऱ्या भागांतील कांहीं कवितांचे परीक्षणानें, वस्तूंतील अज्ञात गुणधर्म शोधून काढणारी कवीची सूक्ष्म दृष्टि, सांप्रतच्या निकृष्ट स्थितींतून आपल्या देश-

बांधवांस बाहेर काढण्याविषयीं दाखविलेला प्रेमाचा उमाळा, ऐहिक व्यवहार विसरवून टाकण्याच्या गुंगीविषयीं उत्कंठा हीं प्रकर्षत्वानें आपलेपुढें उभीं राहतात.

चौथ्या व शेवटच्या भागांत येणारीं काव्यें म्हटलीं म्हणजे 'हरपलें श्रेय', 'वातचक्र', 'झपूर्झा', 'ॐ ब्रह्म', 'नवी सृष्टि नवा देह', 'कोणीकडून— कोणीकडे—', 'सतारीचे बोल' हीं होत. 'हरपलें श्रेय' या काव्यांत कवीनें म्हटल्याप्रमाणें 'अलौकिक पुरुषांनाया स्वार्थपर आकुंचित संसारांत मन रंगेल असें कांहीं सांपडत नाहीं. अर्थात् ते दुसऱ्या एखाद्या असामान्य श्रेयाच्या प्राप्तीची आकांक्षा धरितात. परंतु तें श्रेय त्यांच्या हक्काचें असून देखील त्यांना त्याकरितां झुरणीस लागण्याची पाळी येते ! याच अलौकिक 'हरपल्या श्रेया 'करितां कवीच्या मनाची तळमळ चाललेली आढळून येते. लहानपणीं अजाणस्थितींत जीं सुखेंहि – मग तीं कितीहि अल्प अगर लुटुपुटीचीं असोत – आपण भोगतों, तींसुद्धां मोठेपणीं दुष्कर होतात. याचा अनुभव स्त्रियांनीं बाल्यावस्थेंत असतांना भोगलेलें लुटुपुटीच्या खेळांतील सुख व पुढें मोठेपणीं भोगलेलें संसारांतील सुख याचें निरीक्षण केलें असतां त्यांतील भेद कळून येणारा आहे.

'माझें मज लाभेल कसें ?'

असा ध्यास घेऊन त्याकरितां जेव्हां

'वेडी होऊन
बसल्यें अनुदिन
एकच घेऊन'

अशी अलौकिक बुद्धीस पाळी येते, तेव्हां या अलौकिक संसारांत तिचें मन मुळींच रमत नाहीं. तिजला निर्जन वनांतील दाट झाडीमध्यें जाऊन तिथें एकांतवास सेवावा असें वाटणार

'कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते

* * *

स्वच्छंदें त्या आळविते'

परंतु इतकें करूनहि तें श्रेय

'स्वभास दाउनि
परि तें झटदिनि
जाई लोपुनि'

असें होतें, तेव्हां त्यास हाका मारण्यावांचून दुसरा उपाय राहात नाहीं, व शेवटीं

'मज पासोनि
हाय ! हिरोनी
नेलें कोणी !
म्हणूनि जीव पाखडीतसें.
न परि हरपलें तें गवसे !'

असेंच म्हणण्याची पाळी येते. हें काव्य प्रसिद्ध झालेनंतर कवीनें आपल्या मित्रास "You can guess my state of mind from my piece in the last issue of the मनोरंजन. A crack in heart ! But alas ! Where is the restoration ?' असें जें पत्र लिहिलें आहे त्यावरून त्याच्या मनाची आपणांस बरीच ओळख पटते. आपलें पूर्वीचें वैभव नष्ट झालें याचें कारण शब्दांतील गूढ शक्तीचा क्षय हें होय. शस्त्रांना पाजळून बरेच दिवस लोटल्यानंतर तीं बोथट होतात. पुन्हा उपयोगांत आणण्याकरितां त्यांस जसें पाजळावें लागतें, त्याचप्रमाणें शब्दांत ऋषिकाळीं जें तेज चमकत होतें, तें सांप्रत मळलें आहे, तेव्हां त्यांत तें तेज पुन्हा येण्याकरितां कवि शब्दांना समोर दिसणाऱ्या 'वातचक्रां'त फेंकून देत आहे. शब्द ताजे होण्याकरितां जर 'निज-धामांत' जात आहेत, तर त्यांच्याशींच व्यवहार करणाऱ्या कवीला – विशेषतः जो 'जगद्रुमाचें पिकलें पर्ण मलिन असें' अशी ज्याची स्थिति झाली आहे, त्यास

'मीहि कशाला येथ रहावें
काय असे ज्या मीं चिकटावें ?'

असें वाटून 'या पवनाच्या चक्रीं होउनि लीन सच्चिदानंदांत' गिरक्या घेत फिरण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न होते. 'झपूर्झा' हा कवीचा सांकेतिक शब्द आहे; ज्याप्रमाणें खेळतांना मुली 'झिम् पोरी झिम्'चें गाणें म्हणतात त्याप्रमाणें 'झपूर्झा गडे झपूर्झा !' हें ध्रुपदयुक्त गाणें कवि गातात. हें गाणें सुरामध्यें म्हणत असतांना म्हणणारास आपण नाचतच आहों असा भास होतो. यांत ज्या पुरुषास

'व्यर्थी अधिकचि अर्थ'

उत्पन्न करावयाचा आहे, त्याची पूर्ण अविकृत स्थिति झाली पाहिजे. हर्षापासून सुख व शोकापासून दुःख हे विकार त्यास झाले न पाहिजेत ! कारण

'हर्ष शोक हे ज्या सगळे,
त्या काय कळे ?
त्या काय वळे ?'

ज्ञात, परिचित अशा वस्तू सोडून कल्पनेची 'चपला' जेव्हां अज्ञात प्रदेशांत चमकते, तेव्हां तिचे दृष्टीस निगूढ आकृति पडतात; त्या आकृति जें गाणें गातात तेंच 'झपूर्झा' हें होय. अशा अज्ञात प्रदेशांत राहण्याची 'सनद' हजारांतून एखाद्यासच मिळते. तथापि तेथें जाण्यास आपणाला जर अटक नको असेल, पुरुष व प्रकृति हे क्रीडा करीत असतांना त्यांतील स्वरसंगम जाणण्याची शक्ति ही ज्ञानाच्या हातांत असली, तरी त्याची सुंदरता जर ज्ञात करून घ्यावयाची असेल, तसेंच सूर्य, चंद्र व तारे हे आकाशांतील पुष्पें तोडीत असतांना जेथें प्रेमभरानें नाचत आहेत त्या ठिकाणीं आपणांस जर जावयाचें असेल, तर

'धरा जरा निस्संगपणा.
मारा फिरके.
मारा गिरके.
नाचत गुंगत म्हणा म्हणा
'झपूर्झा गडे झपूर्झा!'

असा 'झपूर्झा'चा दैवी प्रभाव वर्णिला आहे. याच झपूर्झाच्या नादांत महात्म्यास अज्ञानाच्या पोतडींतून जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढतां येतात. कवीची तंद्री व योग्याची समाधि याच झपूर्झामुळें होते. याच झपूर्झाच्या गाण्यानें टिळक कवीनें म्हटल्याप्रमाणें 'रडणें, हसणें भेसळून आम्ही आम्हांला सुटतों, व कृष्णाच्या सांगाते आम्हीहि गाणें गाऊं लागतों. गाणें गाण्याकरितां आम्हांस दिक्कालाचें बंधन मानलें पाहिजे असें नाहीं.'

[अपूर्ण]

(उषा–जुलई, सप्टेंबर व ऑक्टोबर १९१५)

३

केशवसुताची राष्ट्रीय कविता

लेखक : ना. म. भिडे, बी. ए.

'स्फूर्ती आणिल गाउनि गीतें शाहिर राष्ट्राला
काल कवींचा राजा केशवसुत गाउनि गेला'

—शाहीर

प्रो. वा. ब. पटवर्धन यांनीं आपल्या 'काव्य आणि काव्योदय' या निबंधांत शेवटीं महाराष्ट्रीय भविष्यकाळच्या कवींना उद्देशून खालील उद्‌गार काढले आहेत. 'उद्याचे कवि हो! महाराष्ट्राचें हृदय तुमच्या हातीं आहे. आपल्या प्रतिभासंपन्न वाणीनें तें नाचूं लावा, त्याची उडी वाढवा आणि स्वतःच्या जोराची व कर्तृत्वाची त्याला साक्ष पटवा. त्याचें सामर्थ्य आणि भाग्य ऊर्जितदशेस आणा आणि महाराष्ट्राचा संसार खरोखर संसार होईल अशीं गीतें गा.' निबंधकारांचे हे शब्द केव्हां सार्थ व्हावयाचे असतील ते होवोत. पण त्या मार्गाला सध्यांचे महाराष्ट्रीय कवि लागले आहेत हें निर्विवाद होय. अरुणोदय झाल्याबरोबर चंडोलाचें गाणें आपोआप सुरू होतें, तद्वत् केशवसुतांनीं म्हटल्याप्रमाणें

'आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी
याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं.'

ही खूणगांठ बांधावयास हरकत नाहीं. या ठिकाणीं 'गान' हा शब्द 'राष्ट्रीय स्वत्त्व-

प्रधान काव्य' या अर्थानें अभिप्रेत आहे हें सांगणें नकोच. राष्ट्राच्या परिस्थितीचें योग्य परिज्ञान करून घेऊन त्याच्या जागृतीचा मार्ग शोधून काढणें व त्या मार्गानें राष्ट्राला चालविणें हें काम राष्ट्रीय कवींचें आहे. हें अत्युच्च प्रतीचें बिकट ध्येय ज्यांना साधतां येईल असे अव्वल दर्जाचे राष्ट्रकवि फारच विरळा जन्मास येतात. त्यांनाच राष्ट्राचे प्रणेते म्हणून गौरवतां येईल. तथापि हा उच्च वर्ग सोडून दिला तर राष्ट्राचें ध्येय प्रतिपादणारा कवीहि राष्ट्रीय होतो. हा कवि राष्ट्राचा गायक, उत्साहवर्धक गायक असतो. म्हणजे तो एखादी नवीन परिस्थिति उत्पन्न करीत नाहीं, तर स्फूर्तिमय अंतःकरणानें राष्ट्रीय गाणीं गाऊन आपल्या देशामध्यें व समाजामध्यें खऱ्या स्वत्त्वाची व राष्ट्रीयत्वाची तीव्र जाणीव उत्पन्न करतो. जाणीव उत्पन्न करणें एवढेंच त्याचें काम होय, व अलीकडे काव्यसंग्रहांत राष्ट्रीय, ऐतिहासिक व सामाजिक काव्यांची जी नित्य भर पडत आहे ती पाहिली म्हणजे महाराष्ट्रकवि आपलें कर्तव्य करीत आहेत हें सिद्ध होतें. समाज व राष्ट्रीय कविता यांचा इतका दृढ संबंध आहे कीं, 'बालकवी'नें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें राष्ट्राच्या परिस्थितीप्रमाणें अनेक रूपें धारण करून समाजाला खडबडून जागें करण्याचें श्रेय बहुतेक अंशीं कवितेकडेच आहे. मराठी कवितेनें महाराष्ट्राच्या जागृतीला सहाय्य केलें असलें तरी ती त्या जागृतीला कारण झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. उलट राष्ट्रीय जागृतीचाच ती एक आवश्यक परिणाम आहे. ही गोष्ट, ज्या काळांत ती कविता जन्मास आली त्या काळाचें समालोचन केलें तर, सहज निदर्शनास येईल. मराठी काव्यवाङ्मयांत गेल्या शतकाचे अखेरीस राष्ट्रीय कवितेची जी पुर्ननिष्पत्ति होऊं लागली तिची मुहूर्तमेढ केशवसुतांचे हातूनच रोवली गेली आहे. त्यांची कविता व तत्कालीन परिस्थिति यांच्यामध्यें कार्यकारण संबंध असल्यानें राष्ट्रीयदृष्ट्या त्यांच्याच कवितेला आद्यस्थान दिलें पाहिजे. केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेमध्यें व्यक्ति व स्थिति यांची एकमेकांशीं सांगड असण्यानें तिचें रहस्य पूर्णपणें लक्षांत येण्यास त्या कवीची स्वाभाविक प्रवृत्ति, त्याच्या काळची परिस्थिति व त्या परिस्थितीचा कवीच्या ध्येयावर कसकसा परिणाम होत गेला, हें पाहणें अत्यावश्यक होय.

मनुष्यप्राणी अनुकूल काळ घडवून आणतो (Man makes the age) अशी कार्लाइलची एक उक्ति आहे. तथापि काळसुद्धां आपला पगडा मनुष्यावर बसविल्याशिवाय रहात नाहीं असा नित्य अनुभव येतो. ज्या काळांत कवि जन्मतो त्या काळाचठसा त्याच्या ग्रंथावर उमटलेला असतो. तथापि त्यामध्यें केवळ वैयक्तिक विचार व भावना उद्गारित झाल्या असतात असें नाहीं, तर तत्कालीन समाजाच्या भावनांचेंहि चित्र त्यांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें. इंग्लंडच्या इतिहासांत १९ वें शतक शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणारें युग म्हणून गणलें जातें. त्या युगांत ज्या भावना व जीं मतें प्रचलित होतीं, तसेंच त्या वेळीं ज्या कृति घडून आल्या त्यांचें हुबेहुब वर्णन टेनिसनच्या

काव्यामध्यें पहावयास मिळतें. तत्कालीन परिस्थितीचा परिणाम त्या आंग्ल कवीच्या कृतींवर घडून आला म्हणून त्याला स्वकालीन जनताभावनांचा उद्‌गाता असें संबोधण्यांत येतें व त्याचमुळें त्याचें युग त्याच्या नांवावर मोडतें. हीच गोष्ट १९ व्या शतकाचे अखेरीस आमच्या इकडे केशवसुतांसंबंधीं घडून आली. केशवसुत हे अर्वाचीन नव्या काव्ययुगाचे 'उद्‌गाते' असल्यानें त्यांचा काळ त्यांच्या नांवानें उल्लेखला जाणें उचित होय. त्या युगाचा वास्तविकपणें १८९० पासून प्रारंभकाळ सुरू होतो. तथापि परिणामाच्या दृष्टीनें बोलावयाचें तर केशवसुत आपल्या काळाच्या जरा आधीं जन्मास आले. केशवसुतयुगाची खरी सुरुवात २० व्या शतकापासून झाली आहे. तेव्हां ते आपल्या काळांत जन्मास न येतां आपल्या काळांत मृत्यु पावले असें म्हणतां येईल. औचित्याच्या दृष्टीनेंहि नव्या युगाला नव्या शतकाचा प्रारंभकाळ जास्त सोयिस्कर ठरतो. हें नवें युग 'नवा शिपाई' या कवितेंत म्हटल्याप्रमाणें नवीन दमाचें, नवीन उमेदीचें व नवीन स्फूर्तीचें आहे. जगामध्यें चोहींकडे प्रगतीचें पाऊल झपाझप पुढें पडत असतांना मराठी समाज तेवढा मागें कसा राहील ? कूपमंडुकवृत्ति सोडून जातीजातींचा वंधारा फोडून सर्वांमधून राष्ट्रीयत्वाचा सूर एकदिलानें निघाला पाहिजे. अशा प्रकारच्या उच्च कर्तव्याची जाणीव कवि करून देत आहे. न्याय, समता भूतदया आणि प्रेम हीं समाजांत नांदतील व त्यायोगें त्याचें ऐक्यसंवर्धन होईल असा कवीचा काव्यद्वारा प्रयत्न चालला होता. केशवसुतांनीं 'नवा शिपाई' ही कविता १८९८ मध्यें, म्हणजे दोन्ही शतकांच्या सीमेवर लिहिली आहे. हा आकस्मिक योगायोग नसून कवीनें केलेलें पुढील शतकाच्या उज्ज्वल ध्येयाविषयींचें अचूक अनुमान त्यावरून सिद्ध होतें. देशांतील सामाजिक भेद राहोत, पण दुर्दैवानें काव्यासारख्या पवित्र व उदात्त क्षेत्रामध्यें वांटणी झालेली पाहिली म्हणजे भेदपरंपरेनें समाजावर केवढा अनर्थ गुदरतो याची कल्पना येते. जनतेचे ठायीं गुप्त-सुप्त असलेले सगळे हृदयावेग व हृदयोल्लेख कवीच्या मनांत उदित होतात व त्यांनाच सगुण–साकार अवस्था प्राप्त होऊन तेच जर काव्यरूपानें वाहेर पडतात, तर अमूक एका वर्गानें अमूक पद्धतीचीं काव्यें गावींत असा निर्वंध घालणें व तो घातला तरी टिकणें शक्य नाहीं. लोकांच्या भिन्न भिन्न रुचीला अनुसरून तसा फरक कदाचित् पडत जाईल. परंतु जाणूनबुजून तसा प्रयत्न करतां येणार नाहीं. तथापि आश्चर्याची गोष्ट ही कीं, ती अशक्यप्राय गोष्टसुद्धां मराठी काव्यांत घडून आली. पंडित कवि व शाहीर कवि या दोघांत झालेली कवितेची विभागणी पाहिली म्हणजे तिच्या बुडाशीं जातिभेदावांचून दुसरें कांहीं नाहीं, याची खात्री होईल. कवितेंत मधूनमधून आलेल्या त्रोटक उल्लेखांशिवाय पंडित किंवा संत कवींना निसर्गप्रेमाचा व स्वदेशभक्तीचा मुळींच उमाळा नव्हता. देशांत राजकीय वावटळी व समाजक्षोभाचे अनेक प्रसंग उद्‌भवले असतील, पण त्या योगानें आमच्या मराठी कवींची निवृत्तिपरता त्यांच्या अंगीं जास्तच बाणली गेली. शाहीर

कवि यांनीं आत्मस्फूर्तीनें म्हणा अगर कोणाच्या विनंतीवरून म्हणा साधारणतः तत्कालीन, व विशेषतः प्राचीन, असे ऐतिहासिक प्रसंग निवडून त्यांवर पोवाडे रचावेत असा त्यांचा संप्रदाय असे. एका वर्गांत पंडित कवींना मान तर दुसऱ्या वर्गांत शाहिरांची चहा. दोघे कवीच; पण त्यांचीं कार्यक्षेत्रें अगदीं भिन्न. अशा रीतीनें मराठी कविता विभागली गेली. त्याचा असा परिणाम झाला कीं, काव्यवृक्षाच्या दोन्ही शाखांचा प्रत्यक्ष असलेला संबंध तुटला व त्या दोन्ही दोन दिशांनीं यदृच्छेनें वाढूं लागल्या. एका शाखेला परंपरागत वाहात आलेलें पाणी मिळत गेल्यानें तिची जरी वाढ खुंटली नव्हती तरी ती एकाच धर्तीची म्हणून जनतेनें उपेक्षा करण्यालायक ठरली. दुसऱ्या शाखेमध्यें राष्ट्रीय गुण उतरण्याची जरी पात्रता होती तरी तिला राष्ट्रीय कवितेचा मान कधींच मिळाला नाहीं. यास्तव तिचाहि पहिला जोम पुढें पुढें अगदीं मावळला. सारांश, वांटणीच्या असल्या कुतरओढीनेंच मराठी कवितेला हीन दर्जा प्राप्त झाला; व तिच्यांतील इतर भाषांच्या काव्यांत सांपडणारें ऐतिहासिक वृत्तित्व लोपून गेलें. एकजीव न झाल्यानें सुरुवातीला दोन्ही बाजूंनीं फोफावून दिसणारी मराठी कविता अवनतीच्या मार्गास लागली. वांटणीच्या मुरुमाड जमिनींत मूळच्या कणखर अशा काव्यबीजाला जी एकवार कीड लागली तिनें तें पार खुरटून गेलें. ज्या वाङ्मयांत असला विचित्र प्रकार घडून येत नाहीं, तेथील प्रतिभेला कोणत्याहि परिस्थितींत बदल होण्याबरोबर कवीच्या प्रतिभेलाहि नवें वळण मिळत जातें. स्वभावतःच फुलें, मुलें व फुलपांखरें-यांसारख्या कोमल व सात्त्विक विषयांची किंवा अमरत्वाविषयींच्या तात्त्विक विचारांची गोडी असणारा आंग्ल कवि वर्ड्स्वर्थ परिस्थितींत बदल झाल्याबरोबर भिन्न सुरांचीं गाणीं गावयास उद्युक्त झाला. राज्यकर्त्यांच्या मूर्खपणानें जेव्हां फ्रान्स देशांत राज्य क्रांतीचा वणवा पेटला त्यावेळीं पुष्कळशा इंग्रज मुत्सद्द्यांप्रमाणें फ्रेंच लोकांनीं दाखविलेल्या स्वदेशभक्तीचीं रसभरित स्तुतिस्तोत्रें गाणें आपलें कर्तव्य होय, अशी कवीला जाणीव उत्पन्न झाली. परंतु लवकरच त्या राज्यक्रांतीचा शेवट नरमेधापर्यंत गेलेला पाहून कवीला वाटत असलेला मूळ आशेचा तंतु तुटला; पुढें नेपोलियननें सगळी सत्ता बळकावून जेव्हां इंग्लंड देशाच्याहि बरोबर दोन हात करण्याची ईर्षा धरली, तेव्हां भीतियुक्त अंतःकरणानें व स्वदेशाच्या कर्तृत्वशक्तीवरील पूर्ण विश्वासानें नेपोलियनच्या प्रत्येक हालचालीवर कवीनें एकेक सुनीत रचलें आहे. 'व्हेनिसच्या लोकसत्तात्मक राज्यावर पडलेली गदा', 'केंट परगण्यामधील युद्धार्थ तयार झालेले शूर स्वयंसैनिक', 'स्वित्झर्लंड पादाक्रांत झाल्यावेळचे ब्रिटनचे उद्गार', '१८०९ मधील वग्रामच्या लढाईत ऑस्ट्रियाचा झालेला पराजय', 'स्वातंत्र्य आणि आशा', ट्राफल्गारच्या लढाईत मृत्यू पावलेल्या वीर नेल्सनला उद्देशून लिहिलेली 'सुखी योद्धा' ही कविता, वगैरे अनेक राष्ट्रीय विषयांवर वर्ड्स्वर्थनें काव्यें गाइलीं. सारांश, निसर्ग-विलासांत दंग असणारा आनंदी कवि देशांत धडामोडी सुरू झाल्याबरोबर खडबडून

उठला व राष्ट्रीय कवनें गाऊं लागला. अवघ्या दीड वर्षांच्या अवधींत त्यानें १९ राष्ट्रीय कविता लिहिल्या आहेत. १८०२ पासून १८११ सालापर्यंत राष्ट्रीय विषयांवांचून वर्ड्स्वर्थला दुसरें कांहींच सुचेना. इतकी तीव्र संवेदना त्याच्या अंतःकरणांत उदित झाली होती. त्यानें काव्यद्वारा इंग्लंडमध्यें संपत्ति आणि वैभव यांची किती बेसुमार हांव बळावत चालली आहे याची इषारत देऊन एक तर स्वतंत्र राहूं नाहीं तर बेधडक मरून जाऊं, अशी स्फूर्तिप्रद भावना स्वदेशबांधवांच्या हृदयांत जागृत करण्याकरितां श्रेष्ठ पुरुषांना पाचारण केलें आहे. असल्या प्रकारची संवेदना महाराष्ट्रकवींच्या ठायीं, अनेक वेळां संधि आली असतांहि, उत्पन्न झाली नाहीं. १९ व्या शतकाचे अखेरपर्यंत बहुधा हीच उदासीन स्थिति कायम होती. 'बहुधा' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, त्या वेळीं नवीन युगांतील राष्ट्रीय कविता जरी जन्मास आली नव्हती तरी तो तिच्या पूर्वतयारीचा काळ होता. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनानें सृष्टि व स्वदेश यांचीं दिव्य स्वरूपें दृग्गोचर होऊं लागलीं. त्यामुळें अतर्क्य संवेदनांचा संचार मनामध्यें प्रादुर्भूत झाला. नवीं ऐतिहासिक गीतें पटापट बाहेर पडूं लागलीं. शाहिरांच्या मुखांतच विलीन होणाऱ्या व कसरीनें हस्तगत केलेल्या राष्ट्रीय गीतांना संशोधनाचा व मुद्रणाचा मान मिळाला. अशा रीतीनें राष्ट्रीय भावनांचा प्रसार हळुहळू लोकांमध्यें होऊं लागला. १८७० ते १९०० पर्यंतचा ३० वर्षांचा काळ नव्या युगाची भूमिका तयार करीत होता व केशवसुतांचें युग हें त्याच तयारीचें फल होय.

केशवसुतांच्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध मिळून सुमारें १३५ कविता आहेत. त्यांपैकीं ज्यांना राष्ट्रीय म्हणून म्हणतां येईल अशा सरासरी पंधराच सांपडतात. त्यांचें प्रो. राजवाडे यांनीं वर्गीकरण केल्याप्रमाणें आठ समाजसुधारणाविषयक असून बाकीच्या सात स्वदेशासंबंधीं लिहिल्या आहेत. समाज झाला तरी तो राष्ट्राचाच अंश होय. या बुद्धीनें स्वदेशविषयक कवितांबरोबर सामाजिक कवितांचाहि 'राष्ट्रीय' या सदरांत समावेश करण्यास हरकत नाहीं. केशवसुतांपुरतेंच बोलावयाचें तर त्यांच्या सामाजिक कवितांत खरें क्षात्रतेज आणि बाणेदारपणा हे गुण चमकत आहेत. त्यांचें केवळ बीजारोपण स्वदेशविषयक कवितांमध्यें झालेलें आहे. सळसळणाऱ्या तारुण्याच्या बहरांत स्वदेशभक्तीचीं जीं बीजें रुजलीं गेलीं त्यांची परिणति पुढें विचारानें समाजसुधारणेच्या प्रयत्नांत सुव्यक्त झाली. अल्प कां होईना, पण हा बदल होण्याला तत्कालीन परिस्थिति जबाबदार आहे. सांगितलेल्या स्वदेशविषयक सात कवितांपैकीं सहा प्रसिद्ध असून आयरिश लोकांना उद्देशून लिहिलेली कविता अद्याप अप्रसिद्ध स्थितींतच आहे. कवीचीं विद्यार्थिदशेंतील १८८५ ते १८९० हीं वर्षें पुण्यास गेलीं. हा काळ पुण्याच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा व संजीवनाचा होता. शास्त्रीबोवांच्या निर्भीड निबंधमालेमुळें महाराष्ट्रामध्यें स्वदेशभक्तीची जी लाट उसळली तिला टिळकांच्या केसरीनें व आगरकरांच्या सुधारकानें त्यावेळीं बरेंच तेज चढलें होतें. अव्वल इंग्रज-

शाहीमध्यें दिपून गेल्यामुळें आपली सुधारणा होईल ती राजकर्त्यांच्या सहवासानें आपोआपच होत जाईल ही जी आशा वाटत होती ती मावळावयास लागून, आपण आपली सुधारणा केली पाहिजे, अशी जाणीव सर्वत्र दिसूं लागली. पहिल्या आशेची निराशा होऊन निराशेला आशेचा अंकुर फुटूं लागला तो याच संधीला होय. प्रत्येक लेखकाच्या लेखांतून व वक्त्याच्या भाषणांतून त्या परिणामाचें चित्र दृग्गोचर होत होतें. उत्साह,कर्तृत्वशक्ति व स्वाभिमान या बाबतींत तर बालगोपालांची जोडी महाराष्ट्राच्या रंगभूमीवर असामान्य व अद्वितीय रीतीनें प्रकाशत होती. दोघांचें ध्येय एकच म्हणजे राष्ट्रोन्नति हें होतें. पण तिकडे जाण्याचे मार्ग मात्र दोघांचे दोन झाले.देशाला लागलेल्या रोगाचें निदान ठरवून एकास राजकीय सुधारणेचें व दुसऱ्यास सामाजिक सुधारणेचें औषध दिल्यानें तें ध्येय साध्य होईल अशी खात्री पटली. अखेर दोघांनींहि आपापले मार्ग भिन्न भिन्न आंखले. या दोन्ही मतांपैकीं बिनचूक चिकित्सा कोणाची हा प्रश्न प्रकृत स्थळीं अप्रस्तुत होय. तथापि येथें विचार करण्यासारखा प्रश्न म्हटला म्हणजे त्या मतांपैकीं केशवसुतांवर कोणाच्या मताचा जास्त पगडा बसला होता हा आहे ह्याचा विचार करणें जरुरीचें आहे. कारण त्यांतच कवीच्या विचारांचें धोरण गोविलेलें आहे.

केशवसुतांची १८८३ सालापूर्वी लिहिलेली कविता अद्याप उपलब्ध नाहीं; व ती उपलब्ध होण्याची आतां आशाहि दिसत नाहीं. १८८६ पर्यंत त्यांनीं सध्यां उपलब्ध असलेल्या ज्या दोनचार कविता लिहिल्या आहेत त्या भाषांतरवजा असून एक स्वतंत्र प्रेमविषयक आहे. यावरून सभोंवतालच्या राष्ट्रीय जागृतीचें वारें कवीला लागत नव्हतें असें मात्र समजणें चुकीचें होईल. १८८६ च्या आरंभापर्यंत त्यांचे हातून स्वदेश-विषयक कविता लिहिली गेली नाहीं याचें कारण त्यांच्या हृदयांत तें चैतन्य उत्पन्न झालें नाहीं हें नसून तोंपावेतों तसली कविता लिहिण्यास योग्य संधि आली नव्हती हें होय. तो योग जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर यांच्या निधनानें आला. त्या दोघां मराठा राजपुरुषांची निधनवार्ता ऐकतांच कवीच्या मनांत स्वदेशाभि-मानाची ज्योत पेटून ज्या वीरपुरुषांचें नांव ऐकून प्रत्येक मराठ्याच्या अंगांत स्फुरण चढेल असे जे 'महाराष्ट्रपदशाहीचे आधारस्तंभ' राणोजी व मल्हारी यांचें कवीला स्मरण झालें व त्या थोर पुरुषांचे वंशज म्हणून वरील महाराजद्वयाच्या मृत्यूबद्दल कवीला दुःख झालें. मराठ्यांच्या पूर्ववैभवाकडे लक्ष गेल्यानें 'पूर्वी कसें व आतां कसें' हा विचार कवीच्या डोक्यांत सारखा घोळूं लागला. हा विचार विषण्णतामिश्रित तर खराच, पण स्वदेशासाठीं आपण कांहीं ना कांहीं तरी केलें पाहिजे, याची भक्कम जाणीव कवीला या वेळेपासून होऊं लागली. या कामीं त्याला त्याच्या एका मित्राचाहि चांगला पाठिंबा मिळाला होता. 'गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' या कवितेंत या मित्राची हकीकत आहे. तो कोण होता याविषयीं कवीचे चरित्रकार

कांहीं उल्लेख करीत नाहींत. घरादाराची सर्वस्वीं आस सोडून स्वदेशसेवेसाठीं त्यानें कांस कसली होती. विद्याभ्यासाबरोबर फावल्या वेळीं त्या दोघां मित्रांच्या गोष्टी चालत त्या स्वदेशाविषयींच्या. त्या विषयावर एकदां ते बोलूं लागले म्हणजे त्यांच्या रात्रीच्या रात्री भवभूतीनें वर्णन केल्याप्रमाणें

'रात्र सरली बोलतां बोलतां तें
नाहिं झालें ठावकें आपणांतें'

उलटून जात होत्या. बोलतां बोलतां पहांट होई; पक्ष्यांच्या भूपाळ्याहि सुरू होत; हळूहळू अंधार वितळूं लागून सृष्टीची पहांट फाकूं लागे. पण ही सृष्टीची पहांट होत होती. स्वदेशाच्या ऱ्हासाची रजनी केव्हां विरून जाणार? सृष्टीप्रमाणें आमच्या देशाच्या स्वातंत्र्याची पहांट उगवून उत्कर्षाचा दिवस केव्हां उगवेल? या व यासारख्या दुसऱ्या कित्येक विषयांवर दोघां मित्रांचें नेहमीं बोलणें चाले. केशवसुतांनीं या मित्राबद्दल फारच आदर व्यक्त केला आहे. कारण कवि ज्या घटकेला गत गोष्टींचें स्मरण करीत होता त्याच वेळीं तो मित्र नुसता स्वस्थ बसला नसून

'देशासाठीं शरीर झिजवायाला
स्फूर्ति आणित असशिल का कोणाला?'

अशा रीतीनें तो आपला वेळ सत्कारणीं लावीत असल्याबद्दल केशवसुतांनीं आशा प्रदर्शित केली आहे. या एकाच कवितेवरून स्वदेशविषयक कल्पनांनीं कवीचा किती पाठपुरावा केला होता हें समजून येईल. 'गोष्टी घराकडील' हीहि प्रो. राजवाडे यांनीं म्हटल्याप्रमाणें 'आत्मवृत्तात्मक' कविता आहे. परंतु तिच्यांतसुद्धां 'बापू' नांवाच्या 'अज्ञान तो चपलधी परि बाल' अशा आपल्या बंधूविषयीं उल्लेख करतांना कवीनें बराच आशावाद दाखवला आहे.

'बापू गड्या, ध्वज उभा करशील काय?
तूं देशकारण करूं झटशील काय?
बापू! जगांत दिवटी धरशील काय?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय?'

अशी कवीनें त्या बापूविषयीं आशा धरली आहे. कवींचा बापू म्हणजे त्यांचे धाकटे बंधु रा. सीतारामपंत दामले होत. स्वातंत्र्य हाच देव कल्पून त्याची पूजा करावयास जो कवि दुसऱ्यास प्रवृत्त करीत आहे त्याचे मनांत, हृदयांत, प्रत्येक अंगांगांत स्वदेशभक्तीचें वारें भरून गेलें असल्यास नवल नाहीं. केशवसुतांनीं 'भारतीयाचे उद्‌गार' ही कविता याच संधीला लिहिली. तिच्यांत कवीच्या शोकाकुल मनःस्थितीचें चित्र चांगलें उमटलें आहे. कवि संध्याकाळीं बाहेर फिरावयास गेला व त्यानें दिवस अस्तास

जातांना पाहिला कीं नित्य त्याच्या मुखांतून 'हा हा, श्रीचा दिवस आपल्या मावळोनी प्रतीचे, गेला, गेला!' असे निराशामय उद्‌गार बाहेर पडत. कवीला पारतंत्र्याचा इतका तिटकारा वाटत होता कीं, त्या स्थितींत सौख्य मिळण्याचें तर नांव नाहींच पण

'वल्लींनो, हीं सुबक सुमनें काय आम्हांस होत ?
युष्मद्‌गानें मधुर खग हो, या जना काय होत ?
आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो !
ऐकायाला श्रुतिहि नसति पारतंत्र्यामुळें हो !

अशी दुःखावस्था प्राप्त होते. अप्पाजी बळवंत दाते यांस उद्देशून केशवसुतांनीं १८८९ सालीं जी कविता लिहिली ती लिहिण्यास दाते आडनांवाच्या फर्ग्युसन कॉलेजमधील एका तरुण विद्यार्थ्यानें तेथील एका साप्ताहिक सभेंत केलेलें भाषण कारण झालें. त्यावेळीं केशवसुत तेथें हजर होते व त्यांच्या मनामध्यें त्या तरुण वीराची

'हे आम्ही उठलों ! चला तर पुढे देशार्थ कार्यीं मरूं'

अशी देशभक्ति पाहून फारच उमाळा आला, व

'देशालागुनि आपल्या सुदिन ते येतील केव्हां तरी
आशांचे असल्या सदंकुर पहा येती मदात्म्यावरी !'

ही कवीला उत्कंठा लागली. आयरिश लोकांस उद्देशून लिहिलेली कविता याच काळांतील असावी असें वाटतें. कारण याच संधीला इंग्रजी साम्राज्याच्या कक्षेंतून स्वदेशाची सोडवणूक करण्यासाठीं आयरिश लोकांनीं जो झगडा आरंभिला होता व ज्याचें अत्युग्र स्वरूप थोड्या दिवसांपूर्वी दिसत होतें, त्या झगड्याचा गौरव करण्यासाठींच ती कविता रचलेली दिसते. 'निशाणाची प्रशंसा' व 'दोन बाजी' याहि कवितांचा अंतर्भाव स्वदेशभक्तीच्या सदरांत करतां येईल. त्यांचा रचनाकाल अनुक्रमें १८९९ व १९०१ हा आहे. या वेळीं कवीच्या भावनेंत जो फरक पडत चाललेला होता त्याची छाया वरील दोन्हीहि कवितांवर स्पष्ट दिसत आहे. एवढीच केशवसुतांचीं स्वदेशविषयक गीतें होत.

कवीचा जन्म १८६६ सालीं झाला व वर उल्लेखिलेलीं गीतें विशेषतः १८८६–१८८९ या तीनचार वर्षांतच रचलेलीं आहेत. म्हणजे त्या वेळीं कवीचें वय अगदीं तारुण्याच्या भरांत– कीं ज्यांत प्रत्येक तरुणाची स्वदेशभक्तीची भावना अत्यंत तीव्रतेची असते–असें होतें. कवीचे ठिकाणीं त्या भावनांचा उदय केवळ अनुकरणानें झाला होता किंवा स्वभावजन्य होता हा प्रश्न महत्त्वाचा आहे, व त्यावरच कवीच्या अंतरंगाची पारख होणारी आहे. स्वभावगुण बनण्याला परिस्थितीची पुष्कळ मदत

होत असते. अनुकूल परिस्थिति असल्यावर, जेम्स माँटगॉमेरी या इंग्रज कवीनें म्हटल्याप्रमाणें,

'देशाचें हित करण्यासाठीं अपूं विशंक जीवाला'

अशी प्रबल महत्त्वाकांक्षा प्रत्येक तरुणाच्या मनांत उत्पन्न होणें जर स्वाभाविक आहे, तर केशवसुतांसारख्या भावनात्मक वृत्तीच्या तरुणांत ती प्रखरतेनें उद्भूत झाली असेल हें निर्विवाद होय. स्वदेशाची भावना परकीय आहे, ती प्रथम पाश्चात्त्य वाङ्मयांतून इकडे प्रसृत झाली आहे व केशवसुतांच्या अगोदरच्या पिढीला त्या भावनेची जाणीव इंग्रजी वाङ्मयानें करून दिली या गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी पण केशवसुतांसंबंधीं विचार करतांना ती भावना कितपत परकीय होती याबद्दल शंका आहे. कवीचे वडीलबंधू श्रीधरपंत हे १८८३ सालीं वारले व तत्पूर्वीच केशवसुत सरस कविता लिहीत होते अशी त्यांची साक्ष आहे. 'माझा कुशा कितीतरी उत्तम कविता लिहितो' हे बंधूंचे उद्गार कवीचे चरित्रकार देतात. केशवसुतांना त्यांच्या विद्वान् वडीलबंधूंच्या सहवासाचा काव्य लिहितांना लहानपणीं पुष्कळ उपयोग झाला असेल, इतकेंच काय, पण त्या वेळीं इंग्रजी वाङ्मयास अपरिचित किंवा अल्पपरिचित असलेल्या कवीला त्यांतील उत्तमोत्तम कल्पना सुचविण्याचे कामीं त्या वेळीं श्रीधरपंतांकडून अमौलिक मदत झाली असेल, या गोष्टी जरी संभवनीय असल्या, तरी स्वदेशभक्तीपर कवितांत कवीच्या ज्या उत्कट भावनांचा अनुभव येत आहे त्या परकीय अतएव उसनवारी नसून खऱ्या संस्कारक्षम अंतःकरणांतून उन्मळून बाहेर निघाल्या आहेत. 'जाळावांचून कड नाहीं' या म्हणीप्रमाणें हृदयाला पीळ पडल्याशिवाय उत्कट भावनांचा तेथें संभव नसतो. केशवसुत १८८९ मध्यें प्रवेशपरीक्षेंत पास झाले. त्याच्यापूर्वी दोनतीन वर्षें तरी कवीच्या मनांत स्वदेशविषयक विचार घोळत होते. ही वस्तुस्थिति पाहिली म्हणजे इंग्रजी वाङ्मयाशीं कवीचा किती अल्प संबंध पोंचतो याची खात्री होईल. कवीचें ज्या काळांत पुण्यास वास्तव्य होतें तो काळ जनतेला आत्मविश्वासाचें शिक्षण देत होता. इमर्सन म्हणतो, 'आत्मविश्वास हेंच शौर्याचें सार आहे.' या दृष्टीनें देशांत स्वदेशभक्त निर्माण करण्यास तो काळ अनुकूल होता. एका बाजूनें परिस्थितीची अनुकूलता व दुसऱ्या बाजूनें कवि ज्या संस्थेमध्यें शिकत होता तिचें उदात्त ध्येय व ज्या गुरूचे हाताखालीं कवीचा अभ्यासक्रम चालला होता त्याच्या अपूर्व व अलौकिक स्वार्थत्यागाचा मूर्तिमंत कित्ता, अशा प्रसंगीं केशवसुतांसारख्या भावनाप्रधान विद्यार्थ्यांत स्वदेशभक्तीला अवसर सांपडला नाहीं तरच सखेदाश्चर्य म्हणावयाचें. एकंदरीनें कवीचीं शिक्षणक्रमामधील वर्षें स्वदेशाविषयीं विचार करण्यांत गेलीं. या विचारांचा ओघ पुढें बदलला, व त्या विषयावर जरी नंतर निराळी कविता लिहिली नाहीं, तरी स्वदेशाच्या दुर्धर स्थितीनें कवीच्या मनांत वरचेवर खेदोर्मी हेलावत होत्या. घरची आठवण होत असतांना त्याला वाटेंतील किल्ल्याचेंहि चित्र दिसे व त्यासरशीं

'कोठें पूर्वज वीर धीर तव, तूं कोणीकडे पामरा।
ये येथें इतिहास-पत्र पडलें वाचूनि पाहीं जरा.'।।

असें किल्ल्यांतील देवता आपणांस बजावीत आहे असा कवीला भास होतो. 'कवितेचें प्रयोजन' सांगतांनाहि कवि म्हणतो,

'आशा, प्रेम तसेंच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल;
गेलें वभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल.'

अशा रीतीनें 'स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो' ही लेलेशास्त्री यांनीं लोकमान्यांविषयीं काढलेली उक्ति बऱ्याच अगोदर केशवसुतांनाहि यथार्थतेनें लागू पडली असती.

केशवसुतांचीं हीं वर्षें अशा रीतीनें देशाच्या दुःस्थितीची जाणीव होण्यांत गेलीं. पण केवळ वाईट वाटून त्याकरितां हळहळत रहाणें व लोकांना हळहळावयास लावणें इतकेंच त्याचें ध्येय नव्हतें. कवि या नात्यानें निद्रित जनतेला जागी करून तिच्या अंगीं जे दोष असतील ते काढून टाकणें, व तिला योग्य मार्गास लावणें हें त्यांचें कर्तव्य होतें. तेव्हां जाणीव झाल्यानंतर पुढील काम म्हणजे त्या कार्याची सिद्धता कोणत्या मार्गानें होणारी आहे हें ठरविणें होय. हें काम अत्यंत बिकट असून कित्येक वेळां तर कवीच्या मनावर निराशेचें पटल पसरलेंहि होतें. मागें उल्लेख केलेल्या 'गांवीं गेलेल्या मित्राची खोली' या कवितेंत कवि

'या डोळ्यांनीं पहांट ती बघण्याचें
असेल का हो नशिबीं दुर्दैव्याचे?'

असें मोठ्या काकुळतीनें विचारीत आहे. तसेंच 'ती पहांट घडवून आणण्याचें आमच्या हातून काम होईल का?' अशी शंका मनांत उद्भवून कवि कष्टी मात्र होत असे. अशा वेळीं 'इच्छा धरतां मार्ग मिळे आपणांला' एवढीच अनिश्चित आशा त्याच्या मनांत वागत होती. बराच काळपर्यंत त्याचा कसलाच निश्चय झाला नाहीं हें खरें. तरी पण कांहीं तरी कार्य करण्यासाठींच आपण जन्मास आलों आहोंत याची पुरती जाणीव त्याला होती. 'जगामधीं या तुला कशाला' या कवितेमध्यें 'तुला परमेश्वरानें कोणत्या हेतूनें जन्मास घातलें' या कवीनें स्वतःस केलेल्या प्रश्नास 'कराया श्रम तुजला योजिलें' असें उत्तर मिळालें व

'धैर्य आणि ती कार्यनिरतता
दावुनि तूं आपुली,
बांधवीं स्फूर्ति पसर चांगली

हा कर्तव्याचा मार्ग दाखविण्यांत आला. अशा रीतीनें कवीच्या विचारांना कृतीचें स्वरूप येत होतें. वयाच्या, शिक्षणाच्या व अनुभवाच्या वाढीबरोबर कवीला जसजसें वस्तुस्थितीचें आकलन होऊं लागलें तसतशी देशावर सर्व दिशांनीं आपत्ति ओढवण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या याची कवीच्या मनांत विचारणा सुरू झाली.

'माता ही सुबला स्वभूमि सुफला, तीच्या परी लेंकरां
खायाला पुरतें पहा नच मिळे कीं हाल आहे पुरा;
झाकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेसें मिळे;

अशा प्रकार हिंदभूमीच्या प्रिय लेकरांवर बेकार होऊन मजूर बनण्याची व त्याहि स्थितींत उपासमारीच्या आगीनें जळून जाण्याची पाळी यावी यापरतें दुर्दैव तें कोणतें ? तथापि या दुर्दशेला कारण कोण ? तिला कारण जगाच्या प्रगतीबरोबर घडून आलेली व कोणासहि टाळतां न येणारी आर्थिक विषमता होय. हिंदुस्थानहि या विषमतेला बळी पडला असून इतर देशांत गरीबांच्या जिवावर श्रीमंतांची जी बेताल चैन चालली आहे, तिची चट इकडेहि लागली व तिच्याच पायीं मनुष्य कोणत्याहि स्थितींत असला तरी आजपर्यंत त्याच्यावर जी अन्नान्नगत होण्याची पाळी आली नाहीं ती प्राप्त झाली. अशा रीतीनें सगळ्या जगांत बदललेल्या परिस्थितीचा दोष कोणास देतां येईल ? या विचारानें कवि मजुराच्या मुखानें

'सर्वांस देवा ! बघतोस सारखा
होतोस कां रे गरिबांस पारखा ?'

असा हताश अंतःकरणानें देवास बोल लावीत आहे. ज्या परिस्थितीवर मानवी ताबा चालत नाहीं, तिचा हा दोष आहे. म्हणून तो प्रश्न जरी निर्विण्ण मनानें सोडून दिला तरी सामाजिक व धार्मिक विषमतेनें जी बिकट परिस्थिति उत्पन्न केली आहे तिला जबाबदार आपण मनुष्येंच नाहींत काय ? मनुष्यकृत परिस्थितीचा दोष त्यांच्यावांचून दुसऱ्या कोणास लावतां येईल ? पारतंत्र्याच्या प्रभाव वर्णन करतांना कै. आगरकर म्हणतात, 'आम्ही देशाभिमानधर्माभिमानशून्य, नष्टवित्ताचार, नष्टशौर्य, द्रव्याभिलाषि, निरुद्योगी, लोभी, मत्सरी, डौली, हेकड, टवाळ, लांचलुचपतखोर, हांजीहांजीखोर, चहाडखोर, खाल्ल्या घरचे वांसे मोजणारे व हरामखोर झालोंत ते पारतंत्र्यामुळें' इतकें त्या योगानें मनुष्याचें नष्टचर्य ओढवतें. तथापि पारतंत्र्याच्या दुर्विलसिताबरोबर वर निर्दिष्ट केलेल्या दुर्गुणांचा बराचसा संबंध राजकीय पारतंत्र्यापेक्षां आत्मिक पारतंत्र्याशीं जास्त पोंचतो हें लक्षांत घेतलें म्हणजे कवीचा कल इत उत्तर आत्मिक पारतंत्र्याच्याच विधनाकडे कसा झाला याचा उलगडा होतो. कवीच्या काळांत हिंदी

समाजाची जी घडी बिघडून गेली होती तिला कारण राजकीय पारतंत्र्य होय, हें उत्तर सकृद्दर्शनीं जरी खरें दिसलें, तरी तिच्या बुडाशीं आत्मिक पारतंत्र्य आहे. कारण राजकीय परिस्थिति ही केवळ बाह्योपाधि असून आत्मिक हीनताच सामाजिक विषमतेची जननी होय, अशी पुढें पुढें कवीची बालंबाल खात्री होत चालली. आत्मिक स्वातंत्र्यांत सत्याचें बीज व जयाची आशा असते. राष्ट्र आणि आत्मिक स्वातंत्र्य यांचा इतका निकट संबंध आहे कीं, राष्ट्राला त्या गुणांची जर योग्य जाणीव असेल तर त्याला कसल्याहि बिकट राजकीय स्थितींत धोका येण्याची भीति नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, कोणत्याहि बाह्य सत्तेमुळें राष्ट्राला स्वातंत्र्याचा लाभ होत नसून केवळ आत्मिक स्वातंत्र्यानें तें राष्ट्र स्वतंत्र होतें. राष्ट्रामध्यें मनुष्याच्या भोंवतीं जितकें म्हणून बंधन कमी तितका त्या राष्ट्राचा समष्टिरूप आत्मा उच्च दर्जाचा असतो. हा समष्टिरूप आत्मा जर स्वतंत्र राहील व त्याचें ध्येय जर न्यायाचें आणि समतेचें असेल, तर स्वदेशभक्ति हेंच त्याचें कर्तव्यक्षेत्र होऊन बसतें. राष्ट्रोन्नतीसाठीं कवीला ज्या गुणाची इतकी महती वाटत होती तो गुण म्हणजे आत्मिक स्वतंत्रताच होय. या स्वातंत्र्याची जोंपर्यंत समाजाला जाणीव असते, तोंपर्यंतच राष्ट्रांत जिवंतपणा टिकतो. याच हेतूनें कवीनें हातांत निशाण घेऊन 'या हो या झगडावयास सरसे व्हा, मेळवा वाहावा' अशी प्रेतांनाहि जागी करणारी तुतारी फुंकून आपल्या समाजांतून शिथिलतेची हकालपट्टी करण्याचा चंग बांधला. व्यक्तिनिष्ठ स्वत्व नसेल तर ती स्थिति समाजोन्नतीला बाधक होते. एकानें अंध परंपरेच्या जोरावर दुसऱ्या कनिष्ठ व्यक्तीचे नैसर्गिक हक्क हिरावून घ्यावेत व त्या व्यक्तीनें लाचार होऊन ती गोष्ट निमूटपणें सोसावी, ही स्थिति कवीच्या दृष्टीनें गरीब स्वभावाचें लक्षण नसून तिच्या आत्मिक हीनतेचें अत्यंत हिडिस चित्र होय. अंत्यजाच्या मुलासंबंधीं केशवसुतांनीं जी कविता लिहिली आहे, तिच्यांत हाच प्रश्न प्रामुख्यानें गोंवला आहे. आपल्याला निरर्थक तुच्छतेनें वागविल्याबद्दल जेव्हां त्या अंत्यजाच्या मुलानें आपल्या आईकडे तक्रार नेली तेव्हां

> **'आम्ही नीच ना, आणि ते लोक थोर,**
> **तयां पहातां होइजे नित्य दूर.'**

असा तिनें मुलास व्यवहारास धरून उपदेश केला. हा उपदेश असहायतेमुळें केला असल्यानें त्याचा रोष जरी त्या मातेला देता आला नाहीं, तरी त्या योगानें आत्मिक हीनतेचें स्वरूप कमी उग्र होतें असें नाहीं.

> **'जरी त्यावरी सांवली माझि गेली**
> **तरी काय बाधा असे ठेवियेली ?'**

हे बाणेदार मुलाचें स्वत्वसंपन्न सहजोद्गार कोणीकडे व समाजबंधनाच्या जाणीवेनें

स्वत्वालाहि विसरून जाणाऱ्या मातेचे दीनोद्‌गार कोणीकडे ? प्रस्तुत कविता लिहिण्याला जरी एखाद्या व्यक्तीचें उदाहरण कारणीभूत झालें असलें, तरी हरएक सामाजिक विषमतेनें मनुष्याच्या अंगचे सोन्यासारखे स्वाभाविक गुण कसे हिणकस होतात याचें चित्र त्या उदाहरणाच्या मागें कवीनें ठेवलें आहे. त्यांतील.

'(सुधें बोलली !)–हें परी काय तीतें
कळे कीं जगीं नाडुनीयां परांतें,
म्हणूनी करूनी अधीं घोर पाप,
जगीं गाजवी यांतची स्वप्रताप !'

हा शेवटचा श्लोक कवीनें वरील उद्देशानेंच योजला आहे व त्यांतच त्याचें खरें स्वारस्य दिसून येतें. प्रो. राजवाडे यांचा हा शेवटचा श्लोक निरर्थक वाटून ते तो गाळून टाकावयास सांगत आहेत. परंतु त्याकडे जरा निराळ्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे त्याची सार्थकता तेव्हांच लक्षांत येईल. कवीला जर अंत्यजाचेंच चित्र जगापुढें मांडावयाचें असतें तर 'जगामध्यें असे कित्येक लोक आहेत कीं ते दुसऱ्याला विनाकारण नाडवून व अशा रीतीनें अघोर पापाचरण करून सर्वत्र उजळ माथ्यानें मिरवीत असतात' या उपसंहाराची कांहीं जरूर नव्हती. परंतु सामाजिक विषमता ही मनुष्यकृत आहे. तिचें संगोपन करणें हें आत्मघातकीपणाचें लक्षण असून ही रूढी राक्षसी मनुष्याचें मन तिकडे नित्यशः प्रवृत्त करते. या पापाचें,–मागील काळापासून होत असलेल्या पापाचें–क्षालन करण्यास तुमच्या रुधिराचे सडे पडले पाहिजेत इतकें तें भयंकर आहे. हा धडा कवीला समाजास शिकवावयाचा होता व त्या दिशेनें त्यानें पुढील आपले प्रयत्न चालविले. या दृष्टीनें विचार करतां, कवीनें शेवटचा उपसंहार त्या कवितेला कां जोडला याचा चांगला उलगडा होतो.

एकवार कार्याची दिशा पक्की ठरल्यावर कवीचें मन समाजोन्नतीकडेच सारखें वेधून गेलें. समाज सुधारण्याचे कामीं मोठी अडचण म्हणजे रूढीची. समाजांत ज्या कल्पना कल्पिताकल्पित रीतीनें प्ररूढ झाल्या आहेत, त्यांचा या काळांत उपयोग तर नाहींच; पण उलट त्या प्रगतीच्या मार्गांत उगाच अडथळा मात्र करतात. रूढीचे अमलाखालीं जनता इतकी नाडून गेली आहे कीं, ती प्रत्यक्ष सृष्टीच्याहि नियमांना अनुसरण्यास कचरत आहे. केशवसुत 'रूढि, सृष्टि, कलि' या कवितेंत म्हणतात,

'सृष्टीचे अमृतध्वनी दुरुनि जे कानांवरी त्यांचिया
येती, ते परिसूनि मूर्ख सगळे घेतात चित्तीं भया'

काय हा रूढीचा अंमल ! कलीची कल्पना अन्यथा कितीहि वाईट असली तरी रूढीचा पाडाव करून सामाजिक विषमतेचीं बीजें नाहींशीं करण्यांत त्याचा हातखंडा असल्यानें

'साधो ! नांव तुझें खचीत बदलूं, बोलूं न तूतें 'कली''

अशा गौरवानें त्याचें अभिनंदन करण्यास कवि प्रवृत्त झाला. याच कारणास्तव 'पण लक्ष्यांत कोण घेतो' या कादंबरीच्या कर्त्याचे त्यानें गोडवे गाइले. समाज-शुद्धीकरणाचें कार्य कवीनें इतउत्तर मोठ्या नेटानें चालविलें व त्यांत त्याला बरंच यशहि मिळालें. तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई व गोफण हीं एकामागून एक वरचढ अशीं गीतें कवीनें गाइलीं. त्यांमधून साधारणतः एकाच धर्तीचा सूर निघत असला तरी तीं इतकीं जोरदार व तेजस्वी आहेत कीं, त्यांतून जणूं काय त्वेष, आवेश, निर्भर्त्सना यांचा झोत बाहेर फुटून येत आहे असा भास होतो. हातीं घेतलेल्या कार्याचें महत्त्व व गांभीर्य, कवीच्या चित्तास लागून राहिलेल्या तळमळीची तीव्रता या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे वरील चारी कवितांतून एकच सूर कां निघाला हें कळून येतें. तुतारी ही कविता प्रथम १८९३ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस लिहिली होती. तिच्यांत समाजसुधारणेच्या मार्गांत श्रीमंतांची अलोट चैन, गरीबांची कुत्राहि हाल खाणार नाहीं अशी दीनवाणी स्थिति वगैरे आर्थिक विषमतेच्या बाबी; व स्त्रियांची परवशता, त्यांचें गाढ अज्ञान, पतिनिधनानंतर संन्यासदीक्षा देण्याचा त्यांच्यावर होत असलेला जुलूम, आपलेपणाला विसरवून टाकणारी अस्पृश्यता इत्यादि सामाजिक वैषम्यें; या गोष्टी आड येतात. त्यांतील बहुतेक, विशेषतः शेवटच्या बाबी तर, रूढीच्याच नांवाखाली बिनदिक्कत केल्या जात आहेत. त्या कवितेंत विषयावरून निदान त्या वेळेपर्यंत तरी समाजसुधारणा म्हणजे त्यांतील विशिष्ट चालीरीतींचें उच्चाटन करणें एवढीच कवीची समजूत होतीशी दिसते. तथापि नवीन युगाचें व स्थित्यंतराचें जसजसें उत्साही वारें कवीच्या अंगांत भिनूं लागलें, तसतशी त्याची वरील कल्पना मावळत जाऊन हिंदी समाजाची अगतिप्रियताच त्याच्या एकंदर हीनतेला पोषक आहे, अशी कवीची अनुभवपूर्वक खात्री झाली व त्याच धोरणावर त्याचें शरसंधान सुरू झालें. पूर्वी कवीचा मारा जो एका विशिष्ट वर्गपुरता होता तो आतां सबंध समाजावर चालू झाला. रोग्याच्या एका भागावर औषधोपचार सुरू असतांना त्याच्या अंगांतील रक्तदोष दिसून येतांच ज्याप्रमाणें कुशल वैद्याला सगळ्याच शरीरांतील रोगांवर उपचार करावा लागतो, तीच स्थिति केशवसुतांची झाली. त्यांनीं सगळ्या समाजाला आपला उपचार चालू केला. 'तें पुराण तेथूनि, सुंदर सोज्वळ, गोडें मोठें' असें समजणाऱ्या मूर्खांचा धिःकार करून कवि 'जुनें जाऊं द्या मरणालागुनि' असा समाजाला खडखडीत उपदेश करीत आहे. धर्माचें वृथा अवडंबर माजवून आपण नीतीला पायदळीं तुडवीत आहों; परंतु धर्म व नीति यांपैकीं खरोखर नीतीच श्रेष्ठ आहे. आपली अवनति करण्याला आपणच कारणीभूत झालों आहोंत. यासाठीं कूपमंडूकवृत्ति सोडून द्या. जाति, वर्ण, धर्म इत्यादि भेदांच्या कुंपणामुळें जे लोक आपल्या प्रगतीचा प्रदेश आकुंचित करतात तेच खरे पतित.

'तीं माझीं, मी त्यांचा,–एकच ओघ आम्हांतुनि वाहे !' ही नव्या शिपायाची वृत्ति

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर
अनुक्रम ७४६६३ वि: निबंध
दिनांक 2021 नोंद दि. 17317

आम्हांत बाणली पाहिजे. मनुष्यांसाठींच केलेल्या नियमांचें त्यांनींच थोतांड माजविलें आहे. 'अलीकडचें तें सगळें खोटें' असा डांगोराहि पिटणारे हेच. परंतु पूर्वजांचा नुसता बडिवार गाऊन आपलें स्वत:चें पंगुत्व प्रगट करण्याखेरीज त्यांचे हातून दुसरें कांहींएक होत नाहीं. स्वत्वाला विसरून जे दुधखुळेपणा स्वीकारतात व आपल्या मुलांबाळांना तोच धडा शिकवून त्यांना 'जे गरीबी शिकवितात अशाच लोकांचा' कवि म्हणतो, 'मी द्वेष करतों', 'मूर्तिभंजन' या कवितेंतूनहि समाजसुधारणेचा ध्वनि निघत आहे. 'जुन्या चाली टाकून द्या' याचा अर्थ सगळ्याच समाजरूपी इमारतीचा विध्वंस करा असा नाहीं. तसा ज्यांचा उद्देश आहे, किंवा तसें जे कोणी म्हणत असतील तेच हरामखोर, तेच खरे चोर.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. १५२९८
संदर्भ ग्रंथ स्थळ प्रत

'मूर्ति फोडूनियां, देऊ जोडूनीयां
परी विकूनीयां, टाकूं न त्या.
विकूनि टाकीती तेचि हरामखोर
तेचि खरे चोर–आम्ही नव्हों ?

या अभंगांत सांगितल्याप्रमाणें समाजविध्वंसन करणें हा आम्हां समाजसुधारकांचा उद्देश नाहीं, असें कवीनें निक्षून पण कोड्याच्या स्वरूपांत बजाविलें आहे. अशा रीतीनें वर उल्लेखिलेल्या कवितांतून कधी त्वेषाचे, तर कधीं तुच्छतेचे, कधीं आवेशाचे तर कधीं सहानुभूतीचे सूर निघत असतांना वाचक त्या त्या वृत्तीला बळी पडल्यावांचून रहात नाहीं. इतक्या त्या परिणामकारक आहेत. त्या कविता साधारणत: नव्या शतकाचे प्रारंभीं रचल्या गेल्या; 'तुतारी' जरी सर्वांत अगोदरची असली तरी तिला जें पुढें नवें रूप मिळालें तें याच संधीला होय, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. 'निशाणाची प्रशंसा' व 'दोन बाजी' या कवितांचा रोख समाजसुधारणा हा नसला तरी मनुष्याचे अंगी भक्ति व उत्साह वाढविण्यात व अंगीकृत कार्य तत्परतेनें करावयास लावण्यांत निशाणाचा किती महत्त्वाचा उपयोग होतो याचें स्पष्टीकरण पहिलींत केलें आहे. दुसऱ्या कवितेमध्यें शेवटच्या बाजीबद्दल जो एवढा संताप व तिरस्कार प्रगट केला आहे त्याचें कारण त्यानें राज्याचें उदक सोडलें हें नसून त्यानें नानात:हेचे ढंगरंग करून राष्ट्राचीच काय पण सगळ्या समाजाची व त्याच्या नीतिमत्तेची जी राखरांगोळी केली त्यासाठीं होता. अशा प्रकारें या दोन्हीही कवितांवर, सुधारणा झाली पाहिजे, या मताचीच छाप पडली आहे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेचा ओघ प्रथम स्वदेशभक्तीच्या विरल धुक्यांत उगम पावून पुढें त्याचें समाजसुधारणेच्या अफाट व्यक्त स्वरूपांत कसें पर्यवसान झालें हें ध्यानांत येईल. त्यांच्या मनांत झालेली ही प्रगति त्या काळाला अनुसरून होती. तिच्यांत राष्ट्राचा इतिहास दृग्गोचर होत आहे.

हा इतिहास केशवसुतांच्या राष्ट्रीय गीतांतून जितका संगतवार व यथार्थ स्वरूपांत समाविष्ट झाला आहे तितका दुसऱ्या कोणाही कवीच्या कृतींत दिसून येत नाहीं. व्यक्तीच्या भावनांत राष्ट्राच्या भावनांचा इतिहास प्रतिबिंबित होणें हिलाच आम्ही खरी राष्ट्रीय भावना समजतों. या दृष्टीनें पाहूं जातां कवीच्या अंतःकरणांतील स्वदेश-भक्तीचें बीज स्वभावतःच किती सकस होतें, परस्थितीमुळें त्याचा कसा अंकुर बनला व पुढें त्याची वाढ होत जाऊन तो समाजसुधारणेच्या दिशेनें कसा फोफावत गेला हें समजणें महत्त्वाचें आहे. याच गोष्टीचा इतिहास केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेंत आढळून येतो. त्या गीतांचा प्रारंभ १८८६ पासून म्हणजे कवीच्या विद्यार्थिदशेंत झाला व त्यांचा प्रवाह कवीच्या अखेरीपर्यंत संथपणें वहात होता. 'गोफण' ही कविता १९०४ सालीं, म्हणजे कवीनें मृत्यूपूर्वी एक वर्ष अगोदर लिहिली. यावरून कवीचें मन पुढें पुढें जरी गूढार्थसंशोधनाकडे वेधलें होतें, तरी त्याच्या मनांतील राष्ट्रीय ज्योत कधींच विझली नाहीं. एका वेळीं आपल्या खोलीमध्यें बसून राष्ट्राच्या अधोगतीबद्दल नुसते अश्रू गाळणारा कवि पंधरा वर्षांनंतर समाजाच्या अंगीं कर्तव्यप्रेरित उत्साहाचें वारें भरण्याचा आटोकाट प्रयत्न करूं लागला. हीं कवीचीं दोन चित्रें दिसूं लागलीं म्हणजे कवीच्या राष्ट्रीय कामगिरीचें स्वरूप चांगलें स्पष्ट होतें. स्फूर्ति आणि सहानुभूति हे केशवसुतांच्या कवितेंतील प्रमुख गुण होत. त्या गुणांची ओळख त्यांच्या इतर कवितांतून कितीहि होत असली तरी ते दोन्ही गुण, विशेषतः सहानुभूति, येथें जितक्या जिव्हाळ्याची दिसते तितकी दुसरीकडे क्वचितच असेल. सामाजिक दुर्गुणांबद्दल कवीनें त्वेष व निर्भर्त्सना हीं प्रगट केलीं असलीं, तरी पण त्या विकारांच्या आंतील बाजूला सहानुभूतीचाच पडदा दृष्टीस पडतो हें सूक्ष्मतेनें पहाणारास दिसून येईल.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें कवीच्या विचारांत जें संक्रमण होत होतें त्याला १८८६ सालापासून एक चांगलाच पाठिंबा मिळाला. टिळक व आगरकर यांच्या मतांमध्यें अंतर पडत जाऊन शेवटीं त्या मतांतराची दरी दिवसेंदिवस जास्त रुंदावत चालल्यानें दोघेहि देशसेवक विभक्त झाले. तद्नंतर लवकरच, 'सुधारक' आपलीं मतें जोमानें प्रतिपादूं लागला. समानशीलत्वामुळें जात्याच केशवसुतांचा ओढा आगरकरांकडे होता. तेव्हां त्यांच्या मतांचा कवीला दुजोरा मिळाल्यास नवल नाहीं. आत्मसंयम हीच खरी स्वतंत्रता व हेंच खरें बल. त्याच्या जोरावर समाजोन्नति व राष्ट्रोन्नति यांसारखीं धडाडीचीं कामें करतां येतात. 'समाजाच्या उत्कर्षास लागणाऱ्या गुणांचा–परोपकार, उद्यमरति, भूतदया, सहिष्णुता, धैर्य व गांभीर्य यांचा– विकास होऊन त्यांचें पाणी त्यामध्यें खूप मुरलें पाहिजे, आणि त्याप्रमाणें कृति करून दाखविण्याची धाडसी शक्ति उत्पन्न झाली पाहिजे.' (भारतसेवक, पु. २ पान २५७) या आगरकरी मतांचा आमच्या कवीवर इष्ट परिणाम घडून तो वरील गुण समाजाच्या अंगीं उतरविण्यास तयार झाला, व गगनें भेदून टाकणारी तुतारी फुंकून उन्नतीचा ध्वज उंच धरण्यासाठीं वीरांना पुढें सरसावण्यास पाचारण करूं लागला. 'नवा शिपाई' या कवितेंतील मध्यवर्ति

कल्पनांशीं आगरकरांचें मत किती तंतोतंत जुळतें हें त्यांच्या खालच्या उताऱ्यावरून स्पष्ट होईल. 'कोणाचे धर्मविचार कसेहि असोत, त्यांनीं ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये कीं, ते स्वतः व ज्यांचे धर्मविचार त्यांना पसंत नाहींत असे लोक हे उभयतांहि एकाच विश्वाचे अंश आहेत, व हें विश्व जर एकाच विश्वकर्त्यानें निर्माण केलें असेल तर त्या उभयतांमध्यें बंधुत्वाचें नातें उत्तन्न होतें; येवढ्या कारणासाठींच त्यांनीं परस्परांचा द्वेष करणें योग्य नाहीं.' या उताऱ्यांतील विश्वबंधुत्वाची कल्पना व त्याची आवश्यकता या गोष्टींचा केशवसुतांच्या कवितेंत आठव होत आहे. व तोहि त्यापेक्षां जास्त जोरदारपणें होत आहे. तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई, दोन बाजी व गोफण या कवितांमध्यें दिसणारा निर्भीड भाषेचा जोर अवर्णनीय व अप्रतिहत असून कवीनें त्या गुणांची पैदासहि कदाचित आपल्या गुरूपासून केली असावी. अशा तऱ्हेच्या समान भावनेमुळें एकाच दिशेनें व एकाच उत्साहानें काम करणारी, परंतु परस्परांस अज्ञात राहिलेली, गुरुशिष्यांची जोडी पाहून आश्चर्य आणि कौतुक या भावनांनीं हृदय भरून येतें.

सरतेशेवटीं, केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेसंबंधानें थोडक्यांत सांगावयाचें तर राष्ट्रप्रेम हाच विकार त्यांच्या मनांत सारखा वागत होता. आपला देश जगामध्ये प्रस्थापित झालेल्या राष्ट्रीय ध्येयाच्या मागें राहूं नये ही कवीची तळमळ चांगली व्यक्त होते. या कवितांविषयीं प्रो. राजवाडे यांच्याच शब्दांत सांगतां येईल कीं, 'मराठी भाषा अस्तित्वांत राहील तोंपर्यंत स्फूर्ति–स्फुरण आणील, हृदयांच्या तांतींची बनविलेली गोफण भेकड आत्मश्लाघा, पूर्वजश्लाघा, हांजी हांजी करणाऱ्या लोकांवर शब्ददृपदांचा असाच भडिमार करील, तुतारीची किंकाळी सर्वत्र ऐकूं येऊन तात्कालिक तरी सुधारणेचा आवेश आणील, नवा शिपायी विश्वकुटुंबाचा संसार करील!' केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेनें यापेक्षां आणखी जास्त काय करावयास पाहिजे?

(मनोरंजन–नोव्हेंबर १९२५
वर्ष ३१; अंक ३६५; पृ. सं. २८८–२९८)

४

केशवसुतांची कविता

लेखक : पां. दा. गुणे, एम्. ए., पी. एच्. डी.

१. प. वा. केशवसुत यांचें नांव ज्याला माहित नाहीं असा सहृदय वाचक महाराष्ट्रांत कोणी असेल असें वाटत नाहीं. आज त्यांना दिवंगत होऊन दहाच्या वर वर्षें होऊन गेलीं ; पण इतक्या अवधींत त्यांचें चरित्र कोणी लिहिलेलें अगर त्यांची कविता संग्रहित केलेली ऐकिवांत नाहीं. मात्र एकीकडे प्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे, व दुसरीकडे प्रसिद्ध महाराष्ट्र-कवि नारायण वामन टिळक, हे आपापल्या परीने केशवसुतांच्या काव्याची सामग्री एकत्र करीत आहेत, असें निदान चार वर्षें प्रस्तुत लेखक ऐकत आला आहे. तेव्हां इतके मंदावलेलें हें काम एकदांचें संपले, व 'केशवसुत' ह्यांची कविता महाराष्ट्र वाचक वर्गाला सामग्र्यानें उपलब्ध झाली, हे ऐकतांच त्याला आनंद वाटणें स्वाभाविक होतें ; परंतु पुस्तक हातीं येतांच या आनंदांत थोडेंसें विरजण पडलें, असें नाईलाजास्तव म्हणावें लागतें.

२. 'केशवसुता' सारखा आधुनिक महाराष्ट्र कवि, व श्रीयुत हरिभाऊ आपटे यांच्यासारखा कसलेला मराठी लेखक त्यांचें काव्य संग्रहित करणार, तेव्हां हा योगायोग अपूर्व लाभ, असें पुष्कळांना वाटलें असल्यास नवल नाहीं. 'केशवसुतां'चें थोडक्यांत चरित्र देऊन त्यांच्या काव्याचें मार्मिक पर्यालोचन हरिभाऊ करतील, असें स्वाभाविकपणेंच सर्वांना वाटत होतें; आणि तसें झालें असतें, तर 'केशवसुतां'चें यथायोग्य गुणग्रहण होऊन आधुनिक मराठी वाङ्मयांत त्यांचें स्थान कोणतें, हें

अधिकारयुक्त वाणीनें सांगितलें गेलें असतें, पण पुस्तक उघडून पाहतांच फार फार निराशा झाली. पुस्तकांत 'केशवसुतां'चें चरित्र नाहीं, त्यांच्या काव्याचें गुण-दोषविवेचन नाहीं, कांहीं नाहीं ! असें कां झालें, याबद्दल खुलाशाचा एक शब्द देखील संग्राहकानें पुस्तकांत लिहिला नाहीं. श्रीयुत हरिभाऊ आपटे यांची लेखणी जितकी रसाळ आहे तितकीच ती चपळ आहे, हें त्यांच्या कृतींशीं ज्यांचा यत्किंचित्‌ही परिचय आहे तो सहज सांगू शकेल. याचें एक ताजें उदाहरणहि आहे. श्रीयुत रवींद्रनाथ ठाकूर यांच्या 'गीतान्जली'चें मराठी भाषांतर मॅक्‌मिलन् आणि कंपनी या इंग्रज प्रकाशकांसाठीं नुकतेंच त्यांनीं केलें असून त्याला रविबाबूंचें त्रोटक चरित्र व 'गीतान्जली'चें गुणपरीक्षण जोडलें आहे. तेव्हां 'केशवसुतां'च्या कवितेला असली प्रस्तावना नसण्याचें कांहींतरी सबळ कारण असलें पाहिजे खास ; पण तें आपणाला कळणें शक्य नाहीं. एवढें मात्र खरें, कीं यामुळे महाराष्ट्र वाचकवर्ग अधिकारयुक्त वाणीनें केलेल्या काव्यपरीक्षणाला आंचवला आणि चांगल्या कवीचें काव्य प्रसिद्ध करतांना त्याचें व त्याच्या काव्याचें चौकसपणाचें परीक्षण प्रस्तावने-द्वारें सांगावयाचा जो वाहचांतर्गत शिष्टसंप्रदाय तो मोडला गेला.

३. केशवसुत म्हणजे प. वा. श्रीयुत कृष्णाजी केशव दामले. यांचें अल्प-चरित्र १९०६ सालच्या 'मनोरंजना'च्या जानेवारीच्या अंकांत आलेलें आहे. श्रीयुत दामले हे गरीब पण सभ्य कुळांत जन्मले. त्यांचा अभ्यास--निदान मॅट्रिक-पर्यंतचा इंग्रजी अभ्यास तरी--पुणें येथें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कुलांत झाला ; पण त्यांचें शिक्षण गरिबीमुळें म्हणा अगर अन्य कारणांनीं म्हणा तितकेंच राहून लवकरच त्यांना प्रपंचाची विवंचना करावी लागली. कांहीं दिवस पुणें जिल्हचांतच खेडसारख्या ठिकाणीं, तर कांही दिवस मुंबईस मिशनच्या शाळेंत, तर अखेर धारवाड येथें शाळामास्तरचें काम करीत त्यांना रखडत पडावें लागलें. मुंबईस असतांना ते अमेरिकन मराठी मिशनच्या 'ज्ञानोदय' पत्राचें काम पहात. पण पहिल्यापासून त्यांना कविता करण्याचा नाद असे. ('दुर्मुखलेले' ही कविता पहा.) त्या ते कधीं 'ज्ञानोदयां'त तर कधीं 'मनोरंजनां'त (जुन्या व नव्या), कधीं 'करमणुकीं'त तर कधीं 'काव्यरत्नावलीं'त व कधीं खानदेशांत त्यावेळीं चालत असलेल्या पत्रांत लिहीत असत. त्यांचे त्यावेळचे मित्र त्यांच्या स्वतंत्र व बाणेदार स्वभावाची साक्ष देतात. स्वतःची इतकी हलाखी असूनही श्रीयुत दामले आपल्या बंधूच्या एका पैलाही लिप्ताळे होत नसत, असें त्यांचे मित्र सांगतात. कांहींतरी जगाविरहीत करावें, जगाची आपणांला काय पर्वा ? असें त्यांना वाटे. त्यांचे सर्वच विचित्र होतें. त्यांच्या एका मित्राला नागपूरहून एका होतकरु कवीची पत्रें कवितावद्ध येत असत, तीं त्यांनीं हमेशा वाचावीं. एकदां त्यांनाही स्फूर्ति होऊन त्यांनी आपल्या मित्राच्या प्रत्युतरांत 'कोणी तरी' या सहीनिशीं कविता पाठविल्या.

पुढे प्रसंगानें ते नागपुरास गेले असतां तेथील कॉलेजांत त्या तरुण कवीला हुडकून काढून "मी तो कोणी तरी" असें म्हणून केशवसुत दामले त्याच्या समोर उभे राहिले! असो! मुंबईचा त्यांचा नित्यक्रम त्यांच्या स्वभावाला साजेल असाच असे. दिवसा त्यांनीं ताणून निजावें, संध्याकाळीं जेवून येतांना एक नवी लाकडी पेन्सिल व कागद खरेदी करून यावें, व रात्रीं लोक निजल्यावर लिहीत बसावें. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असतांना प. वा. प्रि. आगरकर यांचें सुधारणेचें वारें श्रीयुत दामले यांच्या अंगांत भरपूर शिरलें, तें त्यांच्या काव्यांत पदोपदीं आढळून येतें. आचारविचारांत, व्यवहारांत स्वातंत्र्य असावें, स्वैरपणें वावरतां यावें, असें त्यांना वाटे. कोणत्याही तऱ्हेच्या बंधनांशीं झगडून तीं तोडून टाकावीं, असें त्यांना वाटे. त्यांचें समग्र चरित्र लिहिण्याचा आमचा हेतु नाहीं. तें काम कोणीतरी अधिक वेळ असलेल्या तज्ज्ञ माणसानें हातीं घेण्याची वेळ आली आहे. येथें फक्त त्यांच्या स्वभावांतील एका विशेषाचें निदर्शन करावयाचें होतें, व तेंहि त्यांचें काव्य त्यायोगें समजण्यास सुलभ होईल म्हणून.

४. आधुनिक मराठी कवितेचा उगम इंग्रजी सत्ता येथें नीटपणें स्थापली गेल्यावर झाला, असें ठोकळ मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं विशेष भर संस्कृत व इंग्रजी काव्यांच्या भाषांतरांवर होता. म्हणजे स्वतंत्र रचना बिलकूल होत नव्हती, असें नाहीं; पण श्रीयुत चिपळूणकर, गोडबोले वगैरे आधुनिक मराठी कवींच्या पहिल्या पिढींतील लोकांचे ग्रंथ पाहिले असतां त्यांचा कल बहुतांशीं भाषांतरांकडे होता, असें दिसून येईल. पुढे इंग्रजींतून भाषांतरें जास्त होऊं लागलीं, व पुष्कळ वेळां, तीं भाषांतरें होतीं ही गोष्ट लपविण्यांत येत असे. या रीतीनें गतानुगतिकत्वाचीच परंपरा चालू राहिली–तरी सुद्धां मराठी कवितेच्या दृष्टीनें एक मोठा फायदा झाला; तो हा, कीं पश्चिमेकडील काव्यांत अगदीं रुढ, पण आम्हांला केवळ नवीन, अशा कल्पना आमच्या काव्यांत झळकूं लागल्या. प्रथम केवळ अनुकरणच खरें, पण त्यामुळें 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं,' अर्थात जें संस्कृतांत नाहीं तें कोठेंही नाहीं, इत्यादि आकुंचित कूपमंडूक वृत्तीच्या कल्पना नाहींशा होऊन नव्या कल्पनांचें व त्याबरोबर नव्या वृत्त-रीतींचें वळण पडूं लागलें. जुन्या कल्पनांचा व जुन्या रीतींचा वेगवेगळचा तऱ्हांनीं प्रपंच करून कवींची तहान भागेनाशी झाली. अनुकरणानेंच अनुकरणाचा कंटाळा आला. जुने विचार व त्या विचारांचे जुने पोषाक अंगाला जाचूं लागले; व त्यांच्या बंधनांतून सुटण्याची नूतनतर कवि खटपट करूं लागले. या परिस्थितींतून ज्यांचीं काव्यें निर्माण झालीं, अशा नूतनतर कवींत 'केशवसुत' यांना अग्रस्थान––निदान कांहीं थोडक्यांच्याच बरोबरीनें सन्मानाची जागा खास दिली पाहिजे.

५. बहुतेक आधुनिक तरुण कवींप्रमाणें श्रीयुत 'केशवसुत' यांनीं संस्कृत-

इंग्लिश काव्यांचीं भाषांतरें-रूपांतरें करून काव्याचा ओनामा गिरविला. हें 'खिडकी-कडे मौज पहावयास' नं. १, 'मरणकाल' नं. ३, 'किरातार्जुनीय' नं. १५, 'मदन आणि मदनिका' नं. १९ वगैरेवरून दिसतें. शिवाय 'उगवत असलेल्या सूर्यास नं. २ यांतील कल्पना संस्कृतांतील आहेत. 'एक खेडें' पैकीं कविता १०-११ या एका इंग्रजी कवीच्या आहेत. भाषाही प्रथमप्रथम जुन्या पिढीच्या वळणावर गेली आहे--ती बरीच संस्कृत-प्रचुर आहे. उदाहरणार्थ, नं. १, 'सौधावरी कांचनयुक्त जाला,' 'रोधी करें केशपाश,' 'अंगुष्टमूळीं गुणमात्र राहिला ;' नं. २ 'विलसित रुचिभासें, 'विकसित तरुमाला केशपंक्तींत' इ. इ. प्रथम प्रथम त्यांच्या स्वतंत्र काव्यांतही हा दोष डोकावत होता. उदाहरणार्थः-- नं. ४ 'मदाभासा स्वांगीं विरविकलीं,' 'मधुर अभिधानांस, अधुना' नं. १४ 'विरहाग्नीनें भाजे चेतःकंद' नं. १६ 'चेतोनि-वद्धजनचित्त,' इ. इ. परंतु भाषेच्या व कल्पनांच्या बाबतींतील हा पराधीनपणा तरुण केशवसुतांना--'नव्या मनूंतील नवा शिपाई' स्वतःला प्रौढीनें म्हणविणारांना कसा खपावा ? त्यांनी थोडयाच अवधींत भाषांतर करणें सोडून दिलें. स्वतःच्या खास हृदयाचे बोल स्वतःच्या खाशा मराठी भाषेंत सजविण्याचा त्यांनीं निश्चय केला. स्वतंत्रेचा असा एकदां विडा उचलल्यावर अशा बाबतींत रूढींचीं बंधनें कोण मानतो ? वाङमयान्तर्गत शिष्टाचाराची कोण किंमत ठेवतो ? 'कविता आणि कवि' (नं. ७) यांचें नातें दुसऱ्याला कोण ठरवूं देणार ?

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ?--पुसतों तुम्हांला. ।। १ ।। (नं. ७)

हें पद्य केशवसुतांच्या कवितेच्या साध्याभोळ्या अथवा शुद्ध मराठीचें आदर्श-भूत आहे. जुन्या--म्हणजे आधुनिक मराठी कवींपैकीं जुन्या--कवींनीं संस्कृतप्राय रचनेचें स्तोम माजविलें होतें. 'केशवसुत' यांना एकनाथांप्रमाणें शुद्ध मराठीचा अमर्याद अभिमान होता. यामुळें त्यांची पद्यरचना अगदींच साध्या--जुन्या कथाप्राय भाषेंत रहिवासलेल्यांना कदाचित् अगदीं ग्राम्य वाटणाऱ्या--मराठींत सहजच झाली. कवितेचा असा कांहीं निराळाच गद्याहून भिन्न असा--वेष असतो, हा सिद्धांत आंग्लकवि वर्डस्वर्थप्रमाणें 'केशवसुतां'ना खोडून काढावयाचा होता. कोणाही पंथ अगर मत कोणी नव्यानें प्रचारांत आणूं लागला, म्हणजे त्याच्या हातून उत्साहाच्या भरांत अतिक्रम हा व्हावयाचाच. त्याचेंच फळ 'केशवसुतां'च्या साध्या कवितेंत येणारे पुढील शब्द होत :--गिर्द्यांवरी, किर्र, तिरमा, चुथडवूं, पहालीं, रहातिस इ. इ.

पण असे कानाला कडू लागणारे शब्द व शब्दसमुदाय फारच थोडे आढळतात. उलट, अतिशय उदात्त कल्पनाही आमच्या मायभाषेमध्यें उत्तम तऱ्हेनें गोंवितां येतात, हें पाहून पराकाष्ठेचा आनंद होतो, व मराठी भाषेच्या काल्पनिक दुबळेपणामुळें तिजविषयीं उदासीन असणारांची कींव येते. या दृष्टीनें 'एक खेडें' नं. १३, यांतील कांहीं पद्यें वाचनीय आहेत :–

उंच नाहिंत देवळें मुळीं तेथें
परी डोंगर आहेत मोठमोठे ;
देवळीं त्या देवास बळें आणा,
परी राही तो सृष्टीमधें राणा.

उंच डोंगर ते, उंच कडे भारी,
पडे धो धो ! ज्यांचियावरुनी वारी ;
भोंवतालें रान तें दाट आहे,
अशा ठायीं तो देव स्वयें राहे.

स्त्रोत्र ओढे थांबल्यावीण गाती ;
सूर वारे आपला नित्य देती,
वृक्षगण तो नाचुनी डुल्लताहे,
अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे.

किंवा 'फुलपांखरूं'—

जेथें हिरवळ फार विलसते
लता द्रुमांची शोभा दिसते,
तेथें फुलपांखरूं पहा हें–
सुंदर बागडतें ! १

कलिकांवरुनी, पुष्पांवरुनी,
गंधयुक्त अवकाशामधुनी,
पुष्पपरागा सेवित हिंडे–
मोदभरें करुनी ! २

तरल कल्पना जशी कवीची,
सुंदर विषयांवरुनी साची,
भ्रमण करी, गति तशीच वाटे–
फूलपांखराची. ३

येथें फुलपांखरांची आणि कविकल्पनेची तुलना अति हृदयंगम झाली आहे नाना रंग, स्वैरगति, चंचलता, सृष्टिसौंदर्याचें सेवन इत्यादि गोष्टी दोन्हींनां उत्तम तऱ्हेनें साजणाऱ्या अशा किती खुबीनें पण साध्याच शब्दांनीं दर्शविलेल्या आहेत. यामुळें 'केशवसुतां'ची कल्पनाशक्ति किती अपूर्व आणि किती स्वैर होती, हें उत्कृष्ट दिसतें. शिवाय, क्रियावंत, जिवंत मूर्तवस्तूला उपमेय करून तिची अमूर्त कल्पनेशीं तुलना केली आहे. ही गोष्ट महाराष्ट्रांत स्फूर्तीची तुतारी फुंकणारे 'केशवसुत' आणि इंग्लंडांत झंझावातापुढें पळणाऱ्या वाळलेल्या पानांना मांत्रिकापुढें पळणाऱ्या भुताखेतांची उपमा देणारा शेली कवि अशांनाच साधते.

फुलपांखरूं पाहून त्याच्या जीवनक्रमावरून कवीनें काढलेलें सत्य जितकें अनपेक्षित व म्हणूनच आश्चर्यकारक आहे, तितकेंच तें हृदयंगमही आहे :–

'सर्व विनाशी असती प्राणी'
ही मज खोटी वाटे वाणी,
फुलपांखरुं–मरण पाहिलें–
आहे का कोणीं ? ९

शेवटीं कवीनें आपलें हृद्‌गत सांगूत टाकलें आहे––

जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे,
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें ;
गातों म्हणून कवनीं फुलपांखरांतें,
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें. १०

'आंतून स्फूर्ति होते; म्हणून मीं काव्य करतों; आतां कसून काव्य लिहायचें अशा हट्टास पेटून नव्हे,' असें सुचवून, बळेंच 'मला कवि म्हणा,' 'मला कवि म्हणा' म्हणून कविता निर्माण करणाऱ्या हटवादी कवि–मन्यांना 'केशवसुतां'नीं हळूंच एक चिमटा काढला आहे

६. निसर्गांतील रमणीयता बघून आपणाला स्फूर्ति होते, असें कवीनें अनेक वेळां म्हटलें आहे, आणि दर्शविलें आहे––

काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं,
तसें लिहिलें मीं ; काव्य तिचें मानीं ६

दिव्य शक्तीनें स्फुरे गन्ध पुष्पीं
रंग खुलतीही तिनें इन्द्रचापी,

सृष्टिमाजीं जें रम्य असे कांहीं
तीच कारण त्या शक्ति असे पाहीं. ७ (नं. ८३.)

आणि

आहे तुला सर्वहि सृष्टी मोकळी
व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी ;
संचार कीजे तरि तूं स्वमानसें
कोठें जराही प्रतिबंध तो नसे. ४ (नं. ३२.)

सृष्टींतील रमणीयतेचें आपणाला वेड लागल्याचें कवीनें आधींच सांगून टाकलें आहे. (यापुर्वीचें अवतरण पहा.)

सृष्टि वर्णनामध्यें 'केशवसुतां'चा हातखंडा आहे. कारण, त्यांनीं सृष्टि प्रत्यक्ष पाहिली आहे; एवढेंच नव्हे, तर अनुभवून हृदयांत सांठवून ठेविली आहे. उदाहरणार्थ, 'फुलपांखरूं', 'भृंग', 'एक खेडें', 'विकसन', 'पुष्पाप्रत', 'संध्याकाळ', 'वातचक्र' इत्यादि, या संबंधांत एकच उदाहरण मासल्यादाखल देऊं.

पर्जन्याचे दिवस उलगले
थंडीचेहि बरेच गेले ;
पिकें निघालीं ; कारण नुरलें
सोसाटचानें वहावयाचें ;
म्हणुनि मरुन्दण खेळांत
मग्न होउनी, चक्रावरतीं
आरोहुनि, सांप्रत हे जाती
गर गर गर गर भर भर
एका निमिषामध्यें गगनांत. १

धूलीचे कण असंख्य उठती,
पक्षांचे पर तयांत मिळती,
गवताच्या त्या काड्याहि किती,
थंडीनें गळलेलीं पर्णें जीर्णें उडतिहि त्यांत;
सृष्टीचा हा असा भोंवरा
फिरतो आहे पहा भरारा,
गर गर गर गर धरणीपासुनि
चढत असे तो गगनांत २

योग्य शब्दांची योग्य ठिकाणीं योजना हा गुण जसा असल्या सृष्टिवर्णनांतून तसा त्यांच्या इतर कवितांतूनही सर्वत्र आढळतो.

सृष्टिवर्णन हुबेहूब असेल, योग्य शब्दांत गुंफिलें असेल तर तें हृदयंगम होतें, हें निर्विवाद आहे ; पण नुसतेंच एकजिनसी सृष्टिवर्णन कंटाळवाणें होण्याचा संभव असतो. शिवाय रंगरूपादि गोष्टींत सृष्टीमध्यें जें वैचित्र्य आहे, तें शब्दांनीं यथा-योग्य उमटवितां आलें तर बरें, नाहींतर नीरसता पदरीं बांधून घ्यावी लागते. यामुळें नुसतेंच सृष्टिवर्णन कोणी करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. पडले तर तें थोडक्यांत आवरतात आणि त्याचाहि मानवी प्राण्याच्या आयुष्यांतील एखाद्या प्रसंगाला भूमिकेप्रमाणें उपयोग करतात. सहृदय कवि आहेत, त्यांना सृष्टींत जीवन दिसत असल्यामुळें मानवी हृदय व सृष्टीचें जीवन यांचा परस्परसंबंध व परस्परांवर परिणाम यांचें चित्र ते रेखाटतात. याला एक साधी सहज समजण्यासारखी उपमा आहे. एखादा अत्युत्कृष्ट सृष्टीचा देखावा चित्रपटावर नानारंगांनीं हुबेहूब रंगवावा ; गिरिशिखरावरून धो धो आवाज करीत उडत वागडत जाऊन पायथ्यांतील झाडींत अगर गवतांत नाहींसा होणारा निर्झर काढावा; अगर धुक्यानें व्यापलेली, व झऱ्याच्या आवाजांनीं दुमदुमून गेलेली दरी कागदावर उठवावी ; अगर हिमालयाच्या हिमाच्छादित शिखरांचा संध्काळच्या कोंवळ्या उन्हांत चमकणारा गुलाबी रंग कुंचलीनें हुबेहूब साधावा ; त्याचा मनावर उत्कृष्ट परिणाम होईल. पण झऱ्याच्या कांठीं गुडघे टेंकून पाणी पिणारा एकच मानव, दरीच्या वर तळपत दिसणारा एकच पक्षी, हिमाच्छादित शिखरावर उडया घेत फिरणारें एकच हिम-हरिण अशा चित्रांत दाखवतांच जी जिवंतपणाची लकेर येते, व जी प्रमाणांची कल्पना येते, तिचा परिणाम पहिल्यापेक्षां शतपटीनें अधिक होतो, यांत शंका नाहीं. जसें सृष्टीच्या चित्राचें, तसेंच तिच्या वर्णनाचें. जडसृष्टींत प्राणिसृष्टीचा संचार, एकमेकींची परिपूरकता, या गोष्टींचा मानवी हृदयावर परिणाम व त्यामुळें उद्भूत झालेल्या भावना हा विषय केवळ सृष्टिवणनापेक्षां केव्हांहि सरस ठरेल. तशीच स्थिति 'केशवसुतां'च्या सृष्टिवर्णनाची आहे. त्यांना सृष्टि जड अचेतन वाटत नाहीं. तिच्यांत जीवनाचा संचार झालेला आहे, ती मानवी हृदयाला आनंद आणि समाधान व कवीला स्फूर्ति देते.

उदाहरणार्थ :–

रवि येत असे उदयातें
अरुण तेज विलसत दिसतें,
तरी तिमिर हें विरल असे
धुकें भरुनि न स्पष्ट दिसे. २.

कवीच्या हृदयीं उज्ज्वलता
आणिक मिळती अंधुकता
तीच स्थिति ही भासतसे
सृष्टि कवयित्रीच दिसे ! ३.

तिच्या कल्पना या गमती
कलिका येथें ज्या फुलती ;
सुगंध यांतुनि जो झुकतो
रस त्यांतिल तो पाझरतो. ४.

भृंगा ! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन !
गा तूं गा ! नादी भ्रमरा !
मी गणमात्रा जुळणारा ! ५.

शेवटीं भृंगाच्या लीला पाहून कवीला झालेली इच्छा हृदयंगम आहे :–

होईल का रसिकता तव लब्ध मातें ?
गुंगी मिळेल मजला तव केधवां तें ?
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनि झुकावें !

७. 'केशवसुत' हे सृष्टीचे असे भोक्ते असल्यामुळें सृष्टींत असा एकहि पदार्थ नाहीं, कीं जो त्यांच्या कवितेचा विषय होऊं शकत नाहीं. सामान्य जनांच्या दृष्टीनें अभद्र व ओंगळवाणें घुबडसुद्धां त्यांना स्फूर्ति देतें. 'रांगोळी घालतांना पाहून' कवीला भरतें येतें; सतारीच्या छेडलेल्या तारांचा आवाज त्यांच्या हृदयाच्या गाण्यांत जाऊन मिळतो ! ते फुलपांखराबरोबर एका रमणीय वस्तूवरून दुसरीवर बागडत जातात; 'वातचक्रां'बरोबर त्यांचें कल्पनाचक्र भोंवरे खात फिरतें; दंवाच्या थेंबाबरोबर त्यांचें मन द्रवतें; स्वप्नाच्या पुसट पडद्यावर त्यांच्या कल्पनेचीं पुसट अक्षरें उमटतात ; फडकणारी पताका रूढीच्या पराजयाची व स्वातंत्र्याच्या विजयाची साक्ष पटवते ; कायदा व सत्ता यांचा लक्षणभूत शिपाई कवीच्या अंगांत सर्वांगीं स्वातंत्र्याचें वारें उत्पन्न करतो ; 'धूमकेतू' मध्ये कवीला आपलें प्रतिबिंब दिसतें. या अनेक वर्णनांपैकीं कोणतें अधिक व कोणतें कमी दर्जाचें, हें सांगणें कठीण आहे. अशासारख्याच सुंदर गोष्टींतून वेंचे काढणें त्यातूनहि कठीण आहे. सारीं मोत्यें च तीं; फक्त पाणी व आकार प्रसंगानुरूप निरनिराळे आहेत. तरीसुद्धां दोन अवतरणें देण्याचा मोह आवरत नाही.

श्यामा राणी गंभीर रजनी
अलंकृता जी नक्षत्रगणीं
वेत्र आपुलें उंच धरोनी
बसुनी राज्यसनीं दरारा
दावित आहे जों फार,

समोरच्या चिंचेवरुनी तो
घुबड तियेचा बंदीजन तो
घू घू - महिमा तीचा वर्णी
करुनी घूत्कार !

कवी आपुल्या खिडकीमधुनी
बाहेर बघे शून्य लोचनीं–
स्तब्धत्व जनीं, स्तब्धत्व वनीं,
मनींही दयितानिधनें वागे स्तब्ध
निराशा अनिवार !

अवघड झालें एकलेपणें ;
परि त्या तरुवरुनी घुबडानें,
'ऊं हूं–मी तुज सोबत ! ' म्हटलें
'घू घू' करुनी घूत्कार ! (नं. १००)

रात्रीचा काळाकुट्ट अंधार व भयाणपणा, एका घुबडाच्या आवाजानें मात्र दुभंग होणारा व म्हणूनच जास्त भयानक वाटणारा चराचर सृष्टींतील शुष्कपणा यांचें हुबेहूब चित्र आणखी कसें असतें ? कवीच्या विरहविदीर्ण म्हणूनच उदास व एकाकी झालेल्या हृदयाला आणखी उत्कृष्ट भूमिका कोणची सांपडणार ?

काळोखाची रजनी होती
हृदयीं भरल्या होत्या खंती;
अंधारांतचि गढलें सारें
लक्ष्य न लक्षी वरचे तारे ;
विमनस्कपणें स्वपदें उचलित
रस्त्यांतुन मी होतों हिंडत ;
एका खिडकीतुन सूर सदा
पडले–दिड दा, दिड दा, दिड दा. (नं. ९५)

मानवी हृदयाच्या त्या त्या वेगळ्या भावनेला साजेलशी जडसृष्टीची भूमिका रंगविण्याची कवीची हातोटी अशी पदोपदीं आढळून येते. मनाच्या विषण्ण स्थितींत सतारीचे आनंदी बोल कानावर पडतांच पहिला विकार त्वेषाचा व्हांवा हेंच योग्य व तेंच कवि वदून दाखवितो :–

ऐकुनि ते मज तो त्वेष चढे
त्यासरशीं त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मी हात हिसकला ;
पुटपुटलोंही अपशब्दांला ;
म्हटलें, "आटप आटप मूर्खा !
सतार फोडुनि टाकिसी न कां ?
पिरपिर कसली खुशालचंदा !
करशी––दिड दा, दिड दा, दिड दा ? "

पण इतक्या रागानेंहि तेथून हलावेंसें वाटेना ; कवि जवळच ओटचावर बसला :–

तेथ कोंपरें अंकीं टेंकुनि
करांजलीला मस्तक देऊनि
बसलों ; इतुक्यामाजीं करुणा–
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकृष्ट करी ; हृदय निवालें,
तन्मय झालें, द्रवलें ; आलें–
लोचनांतुनी तोय कितिकदां
ऐकत असतां दिड दा दिड दा !

नंतर 'आशाप्रेरक' ध्वनि निघूं लागले, व "तम अल्प द्युति बहु" असे बोल सतारीनें काढले. नंतर उदात्ततेचे बोल चढत्या सुरांत वाजून त्यांचा प्रेमांत कळस झाला, व शेवटची गति शांत वाजून कवीचें हृदयहि शांत झालें :–

शांत वाजली गती शेवटीं ;
शांत धरित्री, शांत निशा ती,
शांतच वारे, शांतच तारे,
शांतच हृदयीं झालें सारें !
असा सुखें मी सदना आलों ;
शांतींत अहा ! झोंपीं गेलों ;

बोल बोललों परी कितिकदां
स्वप्नीं – दिड दा, दिड दा, दिड दा !

८. वरील अवतरणांवरून कवीच्या हृदयाची आपणांला ओळख होण्यासारखी आहे. कवि शारीरिक व मानसिक आधीव्याधींनीं पीडलेला, परंतु धीर, स्वतंत्र व बाणेदार हृदयाचा आहे. त्याच्या हृदयावर निराशेचें पटल किती वेळ टिकणार ?

मींहि कशाला येथ रहावें ?
काय असे ज्या मीं चिकटावें ?
वाटे गिरक्या घेत मिळावें–
या पवनाच्या चक्रीं होऊन
लीन सच्चिदानंदांत

गजद्रुमाचें पिकलें पर्ण
गलित असे मी अगदीं जीर्ण
तर भर भर भर उडूं द्या मला
शब्दासंगें स्वर्गात. (नं. ९४)

जगांत आपलें असें म्हणून चिकटण्यास कांहीं उरलें नाहीं, तरी कवि दडपून जात नाहीं; उलट ब्रह्मानंदांत मिळून जाण्याची – स्वर्गाकडे उड्डाण करण्याची – हांव धरतो, याला पराकाष्ठेचा आशावाद म्हणं नये, तर काय म्हणावें ?

नैराश्यें मज पुरें घेरिलें,
खिडकीपुढुनी घुबड न हाले,
घू घू घू घू चाले त्याचा
घू घू भीषण घूत्कार. (नं. १००)

त्या भीषण रात्रीं जरी कवीला नैराश्यानें घेरलें होतें, तरी आपला कवि पूर्ण आशावादी आहे. हें 'भ्रमर,' 'सतार', 'कोणीकडून–कोणीकडे',–या व इतर कवितांवरून दिसते. मात्र आशेच्या ताऱ्याकडील त्याचा मार्ग निराशेच्या अंधकारांतून होता. उदाहरणार्थ :–

कोणीकडे ग कोणीकडून ?
तिमिरामध्येंच तिमिरामधून ;

घडीभर पडे मध्येंच ऊन
अभ्रीं तेंही जातें उडून
हृदय हें उलें त्यामुळें निराशा जडून !
जिवलगे ! (नं. ९६)

पण लगेच त्याला आशेचे किरण दिसूं लागतात :–

शून्य म्हणूं जें मागें पुढें,
त्यांतूनि दीप्ति दृष्टि पडे,
मधला उजेड तिमिरीं दडे,
निजधामाहुनि आलों गडे,
तर, ऋणें फेड चल सुखें स्वधामाकडे !
जिवलगे !

'दूर कोठें एकला जाउनीयां' (नं. १०९) या कवितेंतहि शेवटीं आशा – उजेड यांचाच जय झालेला आहे. 'माझिया तर जीवितीं तिमिर सारें,' असें कवीला भासत असतां एका चांदणीनें बंधुत्वाचें नातें जोडून कवीला आत्मविश्वास उत्पन्न करून दिला :–

'नको ऐसें रे वदूं बन्धुराया'
म्हणुनि लागे ती मला आश्वसाया–
'तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी !
कासया ही खिन्नता – दूर सारीं ! '
अशा भगिनीचा लाभ मला झाला,
खद गेला आनंद मनीं आला ;
तिचा आभारी दुवा देत तीतें
समाधानें मी पावलों घरातें.

याप्रमाणें जरी प्रसंगानुसार व परिस्थित्यनुसार कवीवर कधीं कधीं निराशेचें पटल पसरे, तरी तें दूर होऊन कवीला आत्मप्रत्यय होई ; त्याचा आत्मविश्वास दृढ होई. आपणांमध्यें कांहीं शक्ति असून त्या उद्भूत होण्यासाठीं योग्य परिस्थितीची वाट पहात आहेत, हा प्रत्यय कवीला प्रथमपासूनच होता. उदाहरणार्थ :–

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढें

आहे सुंदर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोहींकडे !

तुम्हीं नाहि तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी !

कोणीही पुसणार नाहि, 'कवि तो' होता कसा आननीं ? (नं.११)

सगळें जग कवीचें आहे, सगळी सृष्टि त्याला मोकळी आहे, तींत त्यानें स्वैर-संचार करणें हें त्याचें कर्तव्य आहे :–

आहे तुला सर्वहि सृष्टि मोकळी,
व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी ;
संचार कीजे तरी तूं स्वमानसें
कोठें जराही प्रतिबंध तो नसे. (नं. ३२)

एवढेंच नव्हे, पण कवीला आपण देवाचे लाडके आहों असें वाटतें, आणि आपणांला वगळलें तर जगांत अनर्थ ओढवतील, व जीवित कष्टमय होईल, अशी त्याची असलेली खात्री तो लोकांमध्यें निर्भीडपणें बोलून दाखवितो.

आम्हांला वगळा,
गतप्रभ झणीं होतील तारांगणें,
आम्हांला वगळा,
विकेल कवडीमोलावरी तें जिणें !

तरी पण आपण जें काव्य केलें तें सरस्वतीच्या प्रसादानें केलें, असें कवि विनयानें म्हणतो :–

काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं
तसें लिहिलें मीं,–काव्य तिचें मानीं !

जुन्या कल्पनांनीं, जुन्या वृत्तांनीं वगैरे कवि आपणाला जखडण्यास केव्हांहि तयार नव्हता ; इतकेंच नव्हे, तर काव्य करूं लागून थोडे दिवस झाले नाहींत, तोंच त्यानें जुन्या कल्पनांचें पुराणें खोगीर व जुन्या वृत्तांचा कांटेरी लगाम झुगारून दिला, हें आपण वर पाहिलेंच आहे. आमच्या कवीला कोणत्याही तऱ्हेचें बंधन नको आहे;

सदसद्विवेकबुद्धि हें एकच बंधन तो मान्य करतो. कवि धूमकेतूसारखा आहे. तो केन्द्र व कक्षा सोडून फिरतो.

निश्चित तुम्ही स्वयंप्रकाशीं अप्रतिहत फिरतां,
केन्द्र सोडुनी स्वैरपणें हो दूरवरी भ्रमतां. (नं. ७८)

परिसुनि त्यांचे शब्द रुढिचे दास झणीं ते खवळूं द्या (नं. ११२)

१०. वरील निरनिराळ्या अवतरणांवरून 'केशवसुतां'ची अगदीं साधी रोजच्या व्यवहारांतली म्हणूनच सुगम होऊन गोड लागणारी भाषा, पावलोपावलीं प्रतीत होणारा प्रसादगुण, सृष्टिवर्णनाची शैली, सृष्टीशीं एकतानता, त्यांच्या प्रत्येक कवितेंतून निघणारा आशावादाचा प्रतिध्वनि इत्यादि गोष्टी उघड दिसून आल्याच आहेत. शिवाय त्यांना रुढीचीं बंधनें नको होतीं, हेंहि स्पष्ट झालेंच आहे.

या शेवटल्या मुद्यासंबंधानें कांहीं विशिष्ट कवितांचें विस्तृत परीक्षण होणें जरूर आहे. 'केशवसुतां'ना सामाजिक सुधारणेचें–रुढीला लाथ मारून स्वतंत्र होण्याचें–बाळकडू शाळेंतच प्रि. आगरकर यांच्या स्फूर्तिजनक व्याख्यानांतून मिळालें होतें. तें बीं अगदीं योग्य जमिनींत पडलें व फळाला आलें. 'केशवसुतां'ना जर परमेश्वरकृपेनें जास्त आयुष्य लाभलें असतें, तर त्याला याहुनहि गोड फळें आलीं असतीं, यांत शंका नाहीं. आपल्या देशाच्या सामाजिक अधोगतीची जाणीव झाल्यावर कवीचे डोळे उघडले आणि सभोंवार नजर टाकून पहातो तों त्याला सर्व बाबतींत अधोगति–अवनति दिसून आली. या अवनतीला प्रतिकार करावा, जो प्रकाश आपणाला प्राप्त झाला तो आपल्या देशबांधवांनाहि मिळावा, अशी कवीला तळमळ लागून राहिली होती. हीच तळमळ व तीमुळें उत्पन्न झालेली स्फूर्ति 'केशवसुतां'कडून 'मजुरावर उपासमारीची पाळी' (नं. २५), 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' (नं. ३४), 'तुतारी' (नं. ७३), 'स्फूर्ति' (नं. ७९), 'नवा शिपाई' (नं. ८७), इत्यादि कवनें वदवतीं झालीं.

अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न व त्याच्या गरीब आईनें दिलेलें उत्तर ऐकून कवीनें काढलेले अखेरचे उद्‌गार वाचले म्हणजे त्याच्या मनाची तळमळ स्पष्ट दिसून येते.

सुधें बोलली हें परी काय तीतें
कळे कीं जगीं नाडुनीयां परातें ;
म्हणूनी करूनी अधीं घोर पाप
जगीं गाजवी मानवी स्वप्रताप.

हे सगळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक अन्याय दूर करण्यास कवि आवेशानें आपल्या देशबांधवांना आव्हान करतांना ऐकून, कोणाला त्याच्या निशाणाखालीं उभें रहावेंसे वाटणार नाहीं ?

'हातीं घेऊनियां निशाण कवि तो
पाचारितो बांधवां–
या हो या झगडावयास सरसे
व्हा ; मेळवा वाहवा !
प्रेतेंही उठवील जी निजरत्वें,
ती तो तुतारी करी
आतां नादवती, निरर्थ तरती
त्याची कशी चाकरी ? (नं. ३७)

पण आपले देशबांधव किती गाढ निद्रेंत आहेत, याची कवीला पुरी जाणीव असल्यामुळें, त्याला आतां सगळें त्रिभुवन हलवून सोडणारी तुतारी पाहिजे आहेः–

भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें
अशी तुतारी द्या मजलागुनि. ३

रुढीचीं, अन्यायाचीं गिधाडें भोंवतीं घिरट्या घालीत असतांहि आपले बांधव मजा मारीत आहेत, हें पाहून कवीच्या तळमळणाऱ्या अंतःकरणाला पीळ कां पडं नये ?

रुढी जुलूम यांचीं भेसुर
सन्तानें राक्षसी तुम्हांला
फाडुनि खाती, ही हतवेला–
जलशाची कां ? पुसा मनाला
तुतारिनें या सावध व्हा तर ! ४

तुमची पुराणप्रियता, जुन्यालाच चिकटून बसण्याची खोड घातक आहे, ती तुमचा नाश करील; ती टाकून द्या :–

चमत्कार 'तें पुराण तेथुनि
सुन्दर सोज्ज्वळ गोडें मोठें'
"अलिकडलें तें सगळें खोटें ! "

म्हणती, धरुनी ढेरीं पोटीं;
धिक्कार अशा मूर्खांलागुनि !

तरी पण परंपरा सोडावी असें कवि केव्हांहि सांगत नाहीं :–

जुन्यांतून जी निष्पत्ति नवी
काय नव्हे ती श्रेयस्कारक ?　　८

पूर्वज वदले त्यां गमलें तें
ऐका खुशाल सादर चित्तें ;
परंतु सरका विशंक पुढते–
निरोप त्यांचा ध्यानीं घेऊनि.

आपल्या नेभळेपणानें, गतानुगतिकत्वानें व स्थिरपणानें आपण आपलें नांव गमावून बसलों, याबद्दल त्वेष आला, तरी कवि आशा न सोडतां प्रोत्साहनच देत आहे :–

जाऊं बघतें नांव लयाप्रत,
तशांत बनलां मऊ मेंढरें
अहह, घेरिलें आहे तिमिरें
परन्तु होऊं नका बावरे–
धीराला दे प्रसंग हिंमत !　　१५

असा धीर देऊन रुढी, दंभ, विषमता, जुलूम यांच्या बंडावर कवि हल्ला करण्यास आव्हान करतो, तेव्हां हृदय उचंबळून येतें.

हल्ला करण्या तर दंभावर–तर बंडावर,
शूरानों ! या त्वरा करा रे !
समतेचा ध्वज उंच करा रे !
नीतीची द्वाही पसरा रे !
तुतारिच्या या स्वराबरोबर !　　१७

नियम हे मनुष्याच्या सुखासाठीं आहेत, मनुष्य नियमांकरितां नाहीं, म्हणून जे नियम –मग ते सामाजिक असोत, व्यावहारिक असोत, धार्मिक असोत, अगर राजकीय असोत,–मनुष्याच्या सुखासाठीं न होतां दुःखदायक, जाचक होतात, ते तोडले पाहिजेत. हें स्वातंत्र्यतत्त्व 'केशवसुतां'च्या सर्व कल्पनांच्या मुळाशीं आहे व म्हणूनच त्यांचें काव्य जिवंत, जिव्हाळ्याचें व हलवून सोडणारें असें आहे.

'स्वतंत्रतेचे शाहीर', या नात्यानें ते आंग्लकवि शेली व जर्मन कवि शिलर यांच्या तोडीचे आहेत, यांत बिलकूल संदेह नाहीं. त्या दोघांप्रमाणेंच आपणाला सृष्टीचा-देवाचा कांहीं संदेश मानवजातीला सांगावयाचा आहे, आपलें अवतारकृत्य उदात्त व दिव्य आहे, असें 'केशवसुतां'ना अखेरपर्यंत वाटत होतें, व याच भावनेचें फळ त्यांचे प्रस्तुत परीक्षणांत आलेलें काव्य हें होय. यामुळें आपलें काव्य केवळ कांहीं व्यक्ति अगर देश यांकरतां नसून तें सर्व मानवजातीकरितां आहे, अशी आमच्या कवीची कल्पना असल्यास नवल नाहीं.

नियमन मनुजासाठीं मानव–
नसे नियमनासाठीं जाणा
प्रगतिस जर तें हाणी टोणा–
झुगारून तें देउनि बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव १८

अशा विचाराचा, स्वतंत्र बाण्याचा कवि असल्यावर मानवी कर्तबगारीवर त्यांचा अलोट विश्वास असावा, हें योग्यच आहे, व अशाच्याच तोंडीं खालील बाणेदार उद्‌गार साजतात.

अडवतील जर देव तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं,
हार न खाऊं रतीभरी !
देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या !

कांठोकांठ भरूं द्या पेला
फेंस भराभर उसळूं द्या ! (नं. ७९)

व असा कवि आपणांस 'ब्राह्मण', 'हिन्दु' असें म्हणण्यांत प्रौढी न मानतां स्वतःला 'नव्या मनूंतील नव्या दमाचा शूर शिपाई' असें अभिमानानें संबोधितो, यांत नवल कसचें ? जिकडे तिकडे त्याला आपलींच भावंडें दिसतात, तो विश्व-कुटुंबी बनतो.

लहान-मोठें मज नकळे,
साधु-अधम हें द्वयहि गळे
दूर-जवळ हा भाव पळे ;
सर्वच मोठे साधु जवळ,
त्या सकलीं मी भरुनी राहें
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ! (नं. ८७)

'केशवसुत' नुसतीच प्रीतीची रडकथा गाणारे कवि नव्हते, अगर नुसत्याच कोरड्या सृष्टिवर्णनांनीं कालक्षेप करणारे कवि नव्हते; भोंवतीचा खराखुरा प्रपंच विसरून लटक्या परमार्थाचा दंभ दाखविणारेहि कवि नव्हते. परिस्थिति वरोवर ओळखणारे व शक्य तर परिस्थितीला वळण लावणारे ते प्रपंच - कवि आहेत; रवींद्र-बाबूंप्रमाणें संत कवि नाहींत. 'केशवसुत' जाज्वल्य आहेत, रवींद्रबाबूंप्रमाणें सौम्य नाहींत. ते गूढाचे–व्यंगाचे चहाते नाहींत; रविबाबू प्रगूढ व्यंगाचे भोक्ते आहेत. कांहींतरी गूढ, न उकलण्याजोगें हृदयानें केवळ अनुभवावयाचें, असें 'केशवसुतां'नां कांहींच दिसत नाहीं. परमार्थ, देव यांविषयीं विचार करण्यास 'केशवसुतां'ना मुळीं वेळच नव्हता. अगदीं लहानपणांतच प्रपंचांतील, व्यवहारांतील अज्ञान, विषमता इत्यादींची कष्टप्रद जाणीव त्यांना पटली होती; व त्या गोष्टींच्या निरा-करणार्थच त्यांची कविता जन्माला आली, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

तेव्हां आम्हीं म्हटलें ही ऱ्हासाची
रजनी केव्हां विरुनि जाईल साची !
स्वतंत्रतेची पहांट ती येईल
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील. ८

या डोळ्यांनीं पहांट ती बघण्याचें
असेल कांहीं नशिबीं दुर्दैव्यांचें ?
किंवा तीतें आणायातें कांहीं
यत्न आमुच्या होतील काय करांहीं ? ९ **(नं. १४)**

'केशवसुत' प्रयत्नवादी असत. मानवी कर्तबगारीवर त्यांचा भरवंसा फार. तरीपण सर्वांचें नियमन करणारी परमेश्वररूप शक्ति या जगांत भरून उरली आहे हें त्यांना मान्य होतें, व त्या शक्तीला भक्तीनें आळवणें हें आपलें कर्तव्य आहे, असें ते समजत. पण ती शक्ति त्यांना जड सृष्टींत ओतप्रोत भरलेली दिसे.

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी ;
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनीं मी जात्यें
स्वच्छन्दें त्या आळवित्यें. ३३. **(नं. १२५)**

भिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं
म्हणुनि तुझे पायीं, भिक्षांदेही. २. **(नं. १२६.)**

१३. येणेंप्रमाणें 'केशवसुतां'च्या कवितेचें अंतरंगपरीक्षण झालें. वाहचांग म्हणजे वृत्तें वगैरे यांविषयीं लिहितांना मुख्य गोष्ट अशी लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, मोरोपंतांपर्यंतचे जुने मराठी कवि, आणि 'केशवसुतां'पर्यंतचे आधुनिक कवि यांनीं काव्याच्या वाहचांगासाठीं संस्कृत छंदःशास्त्राचा अवलंब केला. त्यामुळें मराठी काव्यामध्यें एक प्रकारचा ताठपणा आला होता. कल्पनेप्रमाणें–विषयानुरूप वृत्तें आणि रचना व्हावयाची, तें उलट होत असे. त्यामुळें 'चवैतुहि'चे प्रकार, पादपूरणाच्या इतर रीति, शब्दांचे हाल , प्राकृतमिश्रित कथा इत्यादि अनिष्ट प्रकार आधुनिक मराठी कवितेंत शिरले. त्यांना 'केशवसुतां'नीं वैचित्र्याची भक्कम कास धरून उत्तम आळा घातला. त्यांत त्यांनीं नवीं वृत्तें केलीं, अशांतलाच केवळ भाग नाहीं, तर अजाण बायकांच्या व अशिक्षित लोकांच्या गाण्याच्या साध्या व हृदयंगम चाली त्यांनीं रूढ केल्या, व अभिजात ठरवून टाकल्या. अशा रीतीनें त्यांनीं आधुनिक मराठी कवितेची फारच मोठी सेवा केली, हें निर्विवाद आहे. निरनिराळे भाव, निरनिराळे प्रसंग त्यांना उचित अशा वेषांत सजवतां येतात ; त्यासाठीं संस्कृत छंदःशास्त्राची जरूर नाहीं, हें त्यांनीं सोपपत्तिक दाखविलें. त्यांच्यानंतरचे कवि या बाबतींत त्यांचे पूर्ण चेले बनले आहेत ; पण योग्य व जरूर तेवढचाच शब्दांत आपली कसलीहि विशाल कल्पना गोंवून दाखवण्याची ताकद फार थोडचांत आली आहे. अभिजात मराठी वृत्तांत भर घालणें, व त्यांना लवचिकपणा आणणें ही दुहेरी कामगिरी 'केशवसुतां'नीं बजावली आहे. कवितासुंदरीला वाटेल तसें नाचावयाला लावणें हें सामान्य काम नाहीं.

१४. 'केशवसुतां'ना आणखी आयुष्य लाभलें असतें, तर त्यांनीं एखादें महाकाव्य निर्माण करून 'महाकवि' ही पदवी मिळविली असती कीं नाहीं हें सांगतां येणें कठिण आहे. तरीपण अचाट कल्पनाशक्ति, प्रचंड निरिक्षण, पराकाष्टेची सहृदयता, प्रासादिक वाणी, भाषेवरील प्रभुत्व–तिला वाटेल तशी लववावयाचें सामर्थ्य व आपणाला आपल्या देशबांधवांना सृष्टीचा, परमेश्वराचा उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना, ही सामग्री ज्याच्या ठिकाणीं आहे, त्याच्या अंतर्यामीं महाकवि होण्याचें बीज खास आहे, असें समजलें पाहिजे, व तें तसें 'केशवसुत' यांच्यामध्यें होतें. परिस्थिति, अल्प आयुष्य व आणखी कांहीं अडचणी त्यांच्या पूर्ण विकासाला प्रतिबंधक झाल्या असतील; पण स्वतःला महाकवि होतां आलें नाहीं, तरी––थिऑसफीच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास––त्यांनीं भावी महाराष्ट्र महाकवीचा मार्ग मोकळा करून ठेवला आहे, यांत शंका नाहीं !

(मनोरंजन–ऑक्टोबर १९१७
पु. २३; भा. ४; पृ. सं. २८६–२९५)

५

' केशवसुत ' आणि त्यांची कविता

लेखक : श्री. नरहर शंकर रहाळकर, बी. ए.

' केशवसुतास '

अर्वाचीन कवींत कोण गगनीं मारी भरारी बरी ?
शौर्यें कोण रणांगणीं झगडला अंगें " निशाणां "सवें ?
राष्ट्रा जागृति आणण्यास कविता जागी कुणाची पुरी ?
निद्राग्रस्त मनें दणाणुनि दिलीं कोणीं " तुतारी "–रवें ?
" आम्ही कोण ? " म्हणूनि कोण कवि तो गर्जूनी आला पुढें ?
" वेडा पीर " खराच कोण कवितेमागें पुरा जाहला ?
कोणाचा वच पौरुषोक्त पडतां कर्णांत वारें चढे
शौर्याचें सगळ्या तनूंत ? कवि हा तो कोण ? सांगा मला
आहे तो कवि तूंच ' केशवसुता ! ' तूंही कवींचा कवी,
हा ! हा ! कां कविता परी तव अशी गुलदस्त ती राहवी ?
रत्नें सोज्ज्वल मोलवान पडलीं येथेंतिथें हीं अशीं,
त्यांचा हार न गुंफण्या रसिकता आम्हांत येई कशी ?
कोणीं संग्रह कां तिचा न करणें एके ठिकाणीं कसा ?
चित्तीं हा शिरतां विचार सलतो मन्मानसा शल्यसा !

' कोणीतरी '

(मनोरंजन, पुस्तक ८, अंक ५)

प्रास्ताविक : शिरोलेखांत उद्धृत केलेली कविता मासिक मनोरंजनाच्या १९०२ च्या नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झालेली आहे. आज त्याला जवळजवळ सोळा वर्षें झालीं. ही कविता प्रस्तुत निबंधाच्या लेखकानेंच "कोणीतरी' ह्या टोपणनांवानें पाठविली होती. तेव्हां केशवसुत हयात होते. यानंतर ते तीन वर्षांनीं परलोकवासी झाले. केशवसुतांचीं मोलवान् सोज्ज्वळ कवितारत्नें इतस्ततः पडलेलीं असून, त्यांचा सुंदर हार गुंफण्यास लागणारी रसिकता आम्हांत कधीं येणार व त्यांच्या कवितांचा संग्रह एकत्र कधीं होणार, हें शल्य त्या वेळेपासून आमच्या मनास टोंचून राहिलें होतें. त्याचप्रमाणें तें प्रत्येक रसिक कविताभक्ताच्याहि अंतःकरणाला आज कित्येक वर्षें सलूनच राहिलें होतें, यांत शंका नाहीं. अखेरीस तें तिथून उपटून काढण्याचें श्रेय एवढ्या दीर्घ कालावधीनें का होईना, श्रीयुत हरि नारायण आपटे यांनीं १९१७ सालीं घेऊन, 'केशवसुत यांची कविता' हें पुस्तक प्रसिद्ध करून, महाराष्ट्राला अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे. तथापि त्यांनीं केशवसुतांच्या नुसत्या चुटक्यांचाच संग्रह करून त्यांच्या गुणावगुणांसंबंधीं किंवा खुद्द कवीसंबंधीं त्यांचे स्वतःचे जे कांहीं विचार अथवा कल्पना झाल्या असतील त्या वाचकांना कांहींच कळविल्या नाहींत ; यामुळें रसिकांचा फार हिरमोड आणि मनोभंग झाला असेल, यांत बिलकुल शंका नाहीं. ही राहिलेली उणीव केशवसुतांच्या स्नेह्यांनीं भरून काढली पाहिजे. प्रस्तुत लेखहि ही उणीव अंशतः तरी भरून काढावी ऐवढ्याचकरितां केलेला, एक अल्पसा प्रयत्न आहे. प्रस्तुत लेखक या कार्याला वाहून घेण्याच्या स्वतःच्या पात्रतेसंबंधीं बराच साशंक आहे. तथापि यथामति यत्न करून शिरावर पडलेल्या ऋणभारांतून अंशतः तरी मोकळें व्हावें याच इच्छेनें प्रेरित होऊन तो हें कार्य अंगिकारीत आहे.

कुलवृत्त : 'केशवसुत' यांचें संपूर्ण नांव कृष्णाजी केशव दामले. यांचा जन्म ता. १५ मार्च १८६६ रोजीं रत्नागिरीनजीक मालगुंड या गांवीं झाला. यांच्या वडिलांना 'केसोपंत' म्हणत असत. ते रत्नागिरी जिल्ह्यांत मराठी शाळेवर हेडमास्तर होते. त्यांचा पगार ३ रुपयांपासून ३० रुपयांपर्यंत चढत गेला. गरिबींतहि व्यवस्थितपणें संसार करून राहिल्यामुळें ते कर्जाच्या चक्रांत कधींच सांपडले नाहींत. केसोपंतांचा दरारा व शिस्त मोठी कडक असे. त्यांची राहणी संभावितपणाची आणि नेकीची होती. केसोपंतांची बहुतेक नोकरी रत्नागिरी जिल्ह्यांतच झाली. उत्तम रीतीनें नोकरी करून त्यांनीं पेन्शन घेतलें, व तें तेरा वर्षें भोगलें. १८९३ सालीं ते परलोकवासी झाले. त्यांची सुशील पत्नी त्यांच्यामागें नऊ वर्षें होती.

केसोपंतांना एकंदर बारा अपत्यें झालीं. त्यांत सात मुलगे व पांच मुली. सर्वांत वडील मुलगा अकरा वर्षांचा असतांना बुडून वारला. दुसरा मुलगा अल्पवयांतच गेला. तिसरे श्रीधरपंत हे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते. एल्फिन्स्टन कॉलेजांतून बी. ए. होऊन बडोद्याच्या कॉलेजांत त्यांना संस्कृतचे प्रोफेसर नेमलें होतें. परंतु तेथें

फक्त एकच वर्ष नोकरी केली नाहीं तोंच १८८३ च्या जानेवारींत त्यांच्यावर मृत्यूचा घाला पडला. चौथे चिंतोपंत हे मराठी सहावी इयत्ता पास होऊन संसारांत पडले. केसोपंतांचें पांचवें अपत्य हेच आपले 'केशवसुत' होत. त्यांच्या पाठचे प. वा. श्रीयुत मोरो केशव दामले, एम्. ए., हे उज्जनीला माधव कॉलेजांत 'मॉरल ॲण्ड मेन्टल फिलॉसफी'चे कांहीं वर्षें प्रोफेसर होते व पुढें अखेरपर्यंत नागपूर येथें नील सिटी हायस्कूलचे प्रिन्सिपॉल होते. यांची वृत्ती फारच प्रेमळ असे. न्यायशास्त्रावरील यांचे ग्रंथ फारच प्रसिद्ध आहेत. यांनीं मराठी भाषेचें व्याकरण लिहून मातृभाषेची योग्य सेवा केली आहे. यांचा अंत रेल्वेच्या एका भयंकर अपघातांत झाला, हें बहुतेक सर्वांना ठाऊकच आहे. सातवे चिरंजीव श्रीयुत सीतारामपंत हेहि महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयांतील आहेत. हे एक अष्टपैलू लेखक आहेत. 'सयाजी विजय', 'इंदुप्रकाश' 'मराठा' या पत्रांत पूर्वी ते लेख लिहीत असत. माजी राष्ट्रमताचे ते संपादक होते, व हल्लीं 'राजकारण' नांवाचें नवीन साप्ताहिक पत्र त्यांनीं काढलें आहे. कादंबऱ्या लिहिण्यांतहि त्यांनीं आपली लेखणी बरीच झिजविलेली आहे. ते कविहि आहेत. त्यांच्या कांहीं कविता 'विविधज्ञानविस्तार', 'मनोरंजन', 'काव्यरत्नावलि' वगैरे मासिकांतून 'मार्गण' या सहीनें प्रसिद्ध झाल्या आहेत.

शिक्षण : केशवसुतांचें मराठी सर्व शिक्षण १८८२ सालापर्यंत रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड नामक गांवीं झालें. १८८२ सालीं ते बडोद्यास आपल्या बंधूंकडे गेले. एक वर्ष ते इंग्रजी शिकत होते. याच्या अगोदरच त्यांची कवित्वशक्ति जागृत झाली असून ते कांहीं कविताहि लिहूं लागले होते. कविता करण्याची स्फूर्ति त्यांना कोणत्या कारणामुळें झाली हें आम्हांला ठाऊक नाहीं. मात्र मराठी शिकत असतां पोथ्या वगैरे वाचण्याचा त्यांना विशेष नाद असे. यांचे वडील बंधु श्रीधरपंत यांना कवितेची फार आवड असे, व क्वचित् प्रसंगीं ते कविताहि लिहीत असत. ते कॉलेजांत असतांना सुटी असली म्हणजे घरीं येत. त्यांच्या सहवासानेंच केशवसुतांनाहि कवितेची गोडी लागली असावी. बडोद्यांत असतांना एखादी गचाळ कविता श्रीधरपंतांच्या वाचनांत आली किंवा कोणी आणून दाखवली तर ते म्हणत कीं, "यापेक्षां आमचा कुशा कितीतरी उत्तम कविता लिहितो." यावेळेस केशवसुतांचें वय सोळा वर्षांचें होतें. यावरून 'केशवसुत' बऱ्याच अल्प वयांत कविता लिहूं लागले असावेत, हें स्पष्ट होतें. असो. वडीलबंधु वारल्यामुळें केशवसुतांना बडोदें सोडावें लागलें.

श्रीधरपंत निवर्तल्यावर कृष्णाजीपंत व मोरोपंत हे दोघेहि त्यांचे मातुल कै. रामभाऊ करंदीकर यांच्याकडे वर्धा येथें गेले. हे गृहस्थ वर्ध्याचे एक नामांकित वकील होते. पण इ. स. १८८३ त वर्ध्यास इंग्रजी शाळा नसल्यानें या दोघां मुलांस त्यांच्या मामानें नागपुरास पाठविलें. ज्या नागपूरच्या सिटीस्कूलचे मोरोपंत पुढें सुपरिन्टेन्डेंट झाले त्याच शाळेंत हे दोघेहि या वेळीं विद्यार्थि म्हणून दाखल झाले.

परंतु केशवसुतांच्या प्रकृतीला तेथील हवा न मानवल्यामुळें त्यांना नागपूर सोडून पुण्यास जावें लागलें. सन १८८४ पासून १८८९ पर्यंत पुणें येथील "न्यू इंग्लिश स्कूल" मध्यें राहून त्यांनीं अभ्यास केला. न्यू. इं. स्कूलमध्यें असतांना त्यांना चित्रें काढण्याचाहि फार नाद होता. वाटेल त्याचा Likeness (ओळख पटेसा चित्रपट) ते अर्ध्या तासाच्या आंत काढीत. वर्गांत अभ्यासाकडे दुर्लक्ष करूनहि टिळक, आगरकर वगैरे शिक्षकांचीं चित्रें ते आपल्या वहींत काढीत, हें त्यांच्या अनेक सहाध्यायांनीं पाहिलेलें आहे. याप्रमाणें काव्यकला आणि चित्रकला यांमधील निकट संबंध व सामर्थ्य त्यांच्या ठायीं दिसत होतें. त्यांच्या कवितांतूनहि कांहीं प्रसंग इतके बहारीचे आहेत, कीं त्यांचीं कुशल चित्रकारानें चित्रें काढल्यास तीं फारच मनोरंजक उतरतील. १८८९ सालीं 'केशवसुत' प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले, पण गरिबीमुळें त्यांचा पुढील शिक्षणक्रम बंद पडून त्यांना नोकरी पहाणेंच भाग पडलें.

नोकरी : वडिलांचा करारीपणा व स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची अर्थात् स्वावलंबनाची धमक हे गुण केशवसुतांच्या अंगीं पूर्णपणें बाणले होते. मुंबईला जाऊन नोकरी शोधावयाची, असा विचार ठरवून ते घरून निघाले. निघतेवेळीं वडिलांनीं आपल्या एका मुंबईच्या थोर मित्राला आपल्या मुलासंबंधीं पत्र लिहून तें केशवसुतांजवळ दिलें. परंतु केशवसुतांना शिफारसीनें नोकरी मागणें कसेंसेंच वाटलें ! मुंबईला आल्यावर तें पत्र त्यांनीं आपल्या खिशांतच ठेवून देऊन त्यांनीं आपल्याच हिंमतीवर नोकरीची खटपट करून ती मिळविली. १८९० पासून १८९६ पर्यंत मुंबईत निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं नोकरी केली. कांहीं दिवस 'कमसरिएट' कचेरींत, कांहीं दिवस 'दादर इंग्लिश' शाळेंत, कांहीं दिवस 'ज्ञानोदय' कचेरींत आणि कांहीं दिवस सरकारी टेलिग्राफ ऑफिसांत त्यांनीं घालविले. पुढें १८८७ सालीं मुंबईत प्लेग झाल्यामुळें त्यांनीं मुंबईचा संबंध सोडून दुसरीकडे जाण्याचें ठरविलें.

केशवसुतांचें लग्न १८८१ त झालें होतें. त्यांचे श्वशुर श्रीयुत केशव गगाधर चितळे हे खानदेशांत चाळीसगांव येथील मराठी शाळवर हेडमास्तर होते. मुंबई सोडण्याचा केशवसुतांचा विचार ठरला, त्याच सुमारास भडगांव येथील ए. व्ही. स्कूलमध्यें असिस्टंट टीचरची जागा रिकामी असल्याचें केशवसुतांना कळल्यावरून त्यांनीं तिकडे अर्ज केला व त्यांत त्यांना यशहि आलें. भडगांव येथील म्युनिसिपल स्कुलांत प्रथम नोकरी मिळाली. तेथेंच पुढें दोन वर्षांनीं त्यांना २० रुपये झाले.

भडगांव हा गांव खानदेशांतील पाचोरें या तालुक्यांत असून फारच रम्य आहे. हा गांव म्हणजे खानदेशांतील कोंकणस्थ ब्राह्मणांची एक वसाहतच आहे, असें म्हटलें तरी चालेल. हा गांव गिरणा नदीच्या तीरावर वसला असून, पावसाळ्यांत तर तो एक बेटच बनतो. एका बाजूनें सतत बाराहि महिने वहात असलेला गिरणेचा प्रवाह, व दुसऱ्या बाजूनें पुरामुळें पाट फुटून (अेरवीं उन्हाळ्यांत या भागाला कोरडी नदी

म्हणतात ; कारण त्या वेळेस तो भाग शुष्क असतो.) जोरानें वहात असलेला प्रवाह, गांवाला वेष्टन घालून पुनः मूळच्या नदींत मिळाल्यामुळें हा गांव एक सुंदरसें द्वीपच दिसूं लागतें.

सृष्टिदेवीचें दर्शन व तल्लीनवृत्ती : भडगांव येथें असतांना रोज सायंकाळीं नदीतीरावर सहल करणें हा केशवसुतांच्या नित्यक्रमांतील एक प्रमुख क्रम असे. गिरणा नदीच्या प्रवाहाचें नितान्त श्रवणमनोहर गायन ऐकून, दोन्ही तटांवर उभ्या असलेल्या वृक्षराजींना अवलोकन करून, नदीतीरीं असलेल्या खडक, वाळू व बारीक रेती या प्रस्तरांच्या तीनहि अवस्था पाहून, पलीकडून रानांतून परत येत असलेल्या गाईगुरांच्या पुच्छ उभारलेल्या थव्यांकडे नजर लावून, दूरवर दिसणाऱ्या डोंगरांच्या रांगाचें मनोहर स्वरूप निरखून, उंच आकाशांत अनंत तेजोमय तारापुंजाच्या लुक-लुकण्याकडे दृष्टि फिरवून केशवसुतांची वृत्ति तन्मय होत असे. खडकावर बसून पाण्यांत पाय सोडून तासचेतास ते सृष्टिदेवीच्या समागमांत तल्लीन होत असत. त्या वेळेस त्यांच्या वृत्तीशीं साधर्म्य असलेला मनुष्य जर त्यांच्या सन्निध असला तर मग त्यांच्या आनंदाला पारावरच रहात नसे. त्या वेळेस त्यांच्या स्फूर्तीचा स्फोट होऊन ते काव्यमयच बोलत असत. या जगीं त्यांचा प्रत्येक शब्द त्यांच्या अंतःकरणांतील आनंदाचा द्योतक असून त्यांच्या मुखांतून जिवंत वाणी बाहेर पडत असे. त्यांचें सृष्टीशीं तादात्म्य होऊन जाई, व घरीं परत फिरण्याचें त्यांना भानहि रहात नसे. केशवसुतांच्या या सहवासाचें ज्यांना सुख मिळालें असेल ते खरोखरच कितीतरी धन्य ! असेंच राहून राहून वाटतें.

प्रस्तुत लेखकाचा व केशवसुतांचा परिचय : केशवसुतांची बरीचशी उत्तम कविता या गांवींच लिहिली गेली. या गांवींच प्रस्तुत लेखकाचा केशवसुतांशीं परिचय झाला. १८९८ सालीं उन्हाळ्याच्या सुटींत आम्हीं आमच्या आजोळीं भडगांव मुक्कामीं गेलों होतों. प्रस्तुत लेखकाला कवितेची आवड असून, त्याला कविता लिहिण्याचा त्या वेळींहि बराच नाद होता. आमचें इंग्रजी शिक्षण चौथ्या इयत्तेपर्यंत भडगांव येथील शाळेंत झालें असल्यामुळें तेथील हेडमास्तर श्रीयुत भास्कर भिकाजी गोडबोले यांना प्रस्तुत लेखकाबद्दल बरेंच प्रेम वाटे, व ते त्याचा मोठा गौरव करीत. यावेळेपर्यंत आमची बरीचशी कविता (?) 'न्यायसुधा', 'न्यायसिंधु', 'हिंदु पंच', 'इंदु-प्रकाश' वगैरे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती. तेव्हां अशा शिष्याचा केशव-सुतांसारख्या सत्कवीशीं परिचय करून द्यावा असें श्रीयुत गोडबोले यांना वाटून त्याप्रमाणें तो त्यांनीं करूनही दिला. या त्यांच्या उपकाराबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा सदैव ऋणीच राहील.

केशवसुतांच्या सहवासानें प्रस्तुत लेखकाची दृष्टि बदलली. त्याला कवितेचें

निराळेंच स्वरूप दिसूं लागलें. त्याची आकुंचित दृष्टि विस्तृत झाली, व कविता-वाचनांत त्याला अननुभूत असा निराळाच विलक्षण आनंद वाटूं लागला. केशवसुतांचा शिष्य बनून तो त्यांच्या भजनीं लागला. केशवसुतांबरोबर कविता वाचतांना आपण निराळ्याच सृष्टींत आहोंत, असा त्याला भास होई. आपल्या अल्पस्वल्प प्रयत्नांचें केशवसुत कौतुक करितात हें पाहून त्याला त्यांच्या थोर अंतःकरणाची प्रचीति पटूं लागली. आपल्या गोड, रसाळ व उद्दीपक वाणीनें केशवसुत त्याला उत्तेजन देत. आमचे दोषहि ते मोठ्या सहानुभूतिपूर्वक, प्रेमळ वाणीनें सांगत. त्यांची टीका नेहमीं पोषक, उत्तेजक आणि दिव्यदृष्टि देणारी असे. साधारण मनुष्यालाहि कवि बनविण्याची त्यांच्या ठिकाणीं शक्ति असे. कवित्वाचा थोडासा अंकुर दिसल्यावर तो विकास पावेल अशीच ते योजना करीत. केशवसुतांचा प्रेमळपणा फारच अवर्णनीय असे. आमचा केशवसुतांशीं झालेला हा परिचय दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन तो अखेरपर्यंत तसाच टिकला. असो.

परलोकवास : भडगांव येथील केशवसुतांचा काल सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें जरी नसला, तरी मानसिक स्थितीच्या दृष्टीनें बराच चांगला गेला असें म्हणण्याला हरकत नाहीं. तरी पण बढतीचा योग दिसेना, योगक्षेमाला पुरेसा पगार मिळेना, व इतकेंहि करून पेन्शनलाहि हक्क नाहीं ; तेव्हां तो पोंचावा म्हणून ते 'सेकन्डरी टीचर्स' च्या परीक्षेला बसले व तींत उत्तीर्णहि झाले. पुढें त्यांना फैजपूर (खानदेश) येथील ए. व्ही. स्कूलच्या हेडमास्तरची ३० रुपये पगाराची जागा मिळाली. तेथें ते दोन अडीच वर्षें होते. त्या ठिकाणीं, त्यांचे स्वतंत्र विचार व निःस्पृहवृत्ति यामुळें तेथील अधिकाऱ्यांशीं त्यांचें जमावें तसें न जमल्यामुळें त्यांनीं आपण होऊन हायस्कूलांत बदली मागितली व ती मिळून धारवाड हायस्कूलांत त्यांना १९०३ सालीं मराठी शिक्षकाची जागा मिळाली. तेथेंच ते १९०३ च्या एप्रिलपासून अखेरपर्यंत होते. १९०५ मध्यें ते हुबळीला त्यांचे चुलते श्रीयुत हरि सदाशिव दामले यांजकडे गेले होते. तेथेंच त्यांना प्लेग होऊन तारीख २ नोव्हेंबर १९०५ रोजीं त्यांचा अंत झाला. त्यांचें कुटुंबहि त्यांच्या दहावे दिवशींच त्याच आजारानें निवर्तलें. मृत्युसमयीं केशवसुतांचें वय अवघें ३९ वर्षांचें होतें.

कवितांचें प्रकाशन : केशवसुतांच्या कविता प्रथम 'करमणूक' पत्रांत प्रसिद्ध होऊं लागल्या. पुढें त्या 'सुधारक', 'ज्ञानोदय', 'बालसुधा', 'बालमेवा', 'मनोरंजन, आणि 'निबंधचंद्रिका', 'विद्यार्थिमित्र', 'मासिक मनोरंजन', 'सुविचारसमागम'' 'काव्यरत्नावलि' इत्यादि पत्रांतून व मासिकांतून येऊं लागल्या.

'केशवसुत' हें नांव कोणीं दिलें ? : केशवसुत १८९८ त खानदेशांत भडगांव मुक्कामीं आले तेव्हां 'काव्यरत्नावली'चे संपादक श्रीयुत नारायण नरसिंह फडनीस

यांची व त्यांची भेट झाली. या वेळेस श्रीयुत फडनीसांनीं 'काव्यरत्नावलि' ला केशवसुतांचें साहच्य याचिलें व तें केशवसुतांनीं मोठ्या प्रेमानें दिलें. यापूर्वीच्या केशवसुतांच्या कविता 'कुणीतरी', 'एक मित्र', 'जगन्मित्र' अशा कांहीं तरी टोपणनांवानें प्रसिद्ध होत असत; पण 'रत्नावलि'कारांचें म्हणणें असें पडलें, कीं, कृष्णाजीपंत दामले यांच्या कविता रत्नावलींत तरी उघड नांवानें प्रसिद्ध व्हाव्यात ; पण हें म्हणणें केशवसुतांना पटलें नाहीं. प्रत्यक्ष नांवांत कांहीं विशेष आहे, असें त्यांना मुळींच वाटेना. तेव्हां केशवसुतांनीं 'रत्नावलि' कारांना "आपणांस बरें वाटेल तसें करा" असें सांगितलें, व त्या वेळेपासूनच त्यांच्या कवितेखालीं 'केशवसुत' ही सही 'रत्नावलि' कारानींच घालण्यास प्रथम सुरुवात केली. तेव्हां हा सत्याश्रय करून केलेला नामकरणविधि प्रथम 'काव्यरत्नावलि'कारांच्या हस्तेंच झाला व तोच पुढें केशवसुतहि प्रचारांत आणूं लागले. इतकेंच नव्हे तर हेंच नांव कांहीं कवितांच्या शेवटीं केशवसुतांनीं आपल्या कांहींकांहीं पद्यांतहि गोविलें आहे. उदाहरणार्थ :

"मग गणमात्रातें
जोडणें केशवपुत्रातें."– 'म्हातारी.'
'केशवसुत म्हणें देवा दीनानाथा ।
तुझे पायीं माथा वाहियेला."

केशवसुतांच्या आरंभीं आरंभीं प्रसिद्ध झालेल्या कविता अमुकच कवीच्या आहेत हें त्यांच्या स्नेहच्याखेरीज इतरांना कळत नसे, व एकाच सहीखाली त्या प्रसिद्ध न झाल्यामुळें अमुक अमुक कविता एकाच व्यक्तीच्या लेखणींतून उतरली आहे, हेंहि नीट समजत नसे. पण 'रत्नावलि'कारांनीं त्यांना नांव दिल्यामुळें त्या एकाच कवीच्या कृति आहेत असें पुढें पुढें कळूं लागून एका विशिष्ट व्यक्तीबद्दल रसिकांच्या मनांत प्रेम आणि आदर उत्पन्न झाला, व 'केशवसुत' हा केवळ सामान्य कवि नसून तो 'कांहीं अद्भुत शक्तीचा कवि आहे' अशी लोकांची व्यक्तिविषयक भावना दृढ होऊं लागली. या गोष्टीचें श्रेय सर्वस्वीं 'काव्यरत्नावलि' कारांनाच दिलें पाहिजे. या कवीचें हें नांव जर प्रचारांत आलें नसतें तर त्यांच्या अनेक सरस कृति अनेक नांवांखालीं प्रसिद्ध होऊन त्यांना एकपणा आला नसता, व केशवसुतांची कविता समग्र संग्रहित होऊन प्रसिद्ध व्हावी अशी आतुरताहि लोकांना इतकी वाटली नसती. केशवसुतांच्या कवितेसंबंधानें रसिकांची आतुरता आज जितकी तीव्र आहे, तितकीच ती त्यांच्या निधनममयीं असूनहि त्यांची समग्र कविता प्रसिद्ध होण्याला त्यांच्या निधनानंतर बारा वर्षें म्हणजे जवळ जवळ एक तप जावें लागलें, तर या मानानें अनेक नांवांखालीं प्रसिद्ध झालेली त्यांची कविता समग्र प्रसिद्ध होण्याचा योग किती कालानें येता हें एक ईश्वरालाच ठाऊक !

कविमित्र : वडीलबंधु श्रीधरपंत वारल्यानंतर केशवसुत १८८३ सालच्या जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांत नागपुरास आपल्या मामाकडे गेले होते. तेथेंच आधुनिक कवींतील शिरोमणि श्रीयुत नारायण वामन टिळक यांचा आणि त्यांचा स्नेह जमला. श्रीयुत टिळकासंबंधीं बोलतांना त्यांच्या कृतीबद्दल केशवसुत फार आदर दाखवीत. कवितेविषयीं या उभयतांचे फारच प्रेमळपणें संवाद होत असत. श्रीयुत टिळकांच्या सहवासांत घालविलेल्या दिवसांचें स्मरण होतांच केशवसुतांच्या मुद्रेवर एक विशिष्ट प्रकारच्या आनंदाची झांक दिसत असे. केशवसुतांचा व टिळकांचा स्नेह अखेरपर्यंत टिकला होता. अर्वाचीन कविकृतीच्या संग्रहाची कल्पना मूळ याच कविद्वयांच्या डोक्यांतून निघाली. श्रीयुत टिळकांकडून ती कल्पना 'दत्त' कवींना (प. वा. श्रीयुत दत्तात्रय कोंडो घाटे, बी. ए.) कळली व त्यांच्याकडून ती श्रीयुत दामोदर सावळाराम यंदे यांच्यापर्यंत पोंचून अखेर श्रीयुत यंद्याकडूनच ती थोड्या अंशानेंच कां होईना, पण "अर्वाचीन कवि - पूर्वार्ध" या मूर्त स्वरूपांत वाहेर पडली.

केशवसुतांचे दुसरे कविमित्र म्हणजे प. वा. श्रीयुत विनायक जनार्दन करंदीकर, हे होत. हे धुळ्याचे रहाणारे. यांच्या कवितेशीं रसिकांचा पूर्ण परिचय आहेच. या कवीची कविताहि 'करमणूक' व इतर पत्रांत व 'मासिक मनोरंजनां'त वरीच प्रसिद्ध झाली आहे. भडगांवास आल्यानंतर विनायक कवि केशवसुतांना वारंवार भेटत असत. या कवीला He is a Byron of Maharastra असें केशवसुत म्हणत असत. विनायक कवीच्या प्रासादिक, सरळ व सुलभ रचनेबद्दल त्यांना फार कौतुक वाटत असे. पण या कवीच्या काव्याबद्दल त्यांना जितकें प्रेम वाटत असे तितकें त्यांच्या वर्तनाबद्दल वाटत नसे, अेवढें सांगून ठेवणें अवश्य आहे. 'कवि काव्यांत दिसतो तसाच कृतींत असेल तर किती गोड होईल'! असे कधींकधीं विनायकांबद्दल केशवसुत खेदोद्गार काढीत, तर कधीकधीं 'कवीपेक्षां त्याच्या कवितेचेंच आयुष्य जास्त असतें,' असें म्हणून समाधान करून घेत. तरीपण विनायकांच्या कवितेबद्दल त्यांना अत्यंत प्रेम होतें हें विसरतां कामा नये.

केशवसुतांचे तिसरे कविमित्र 'किरात' (श्रीयुत कृष्णाजी लक्ष्मण सोमण). या कवीबद्दल केशवसुतांच्या अंतःकरणांत विशेषच प्रेम होतें. 'किरात' हे एक प्रसिद्ध नाटककार असून त्यांचा लेखन व्यवसाय दांडगा आहे. त्यांनीं अनेक गद्य व पद्य नाटकें लिहिलीं असून त्यांपैकीं कांहीं रंगभूमीवरहि आलेलीं आहेत. हे गृहस्थ उत्तम टीकाकारांपैकीं एक असून यांचे टीकात्मक लेख फार वाचनीय आहेत. किरातांची कविता नीटस असून रेखलेली असते, असें केशवसुतांचें म्हणणें असे. प्रस्तुत लेखकाशीं बोलतांना केशवसुत किरातांच्या नाटकांबद्दल विशेष प्रशंसोद्गार काढीत. कोंकणांत जातांना व तेथून परत येतांना ते कांहीं काल तरी किरातांच्या सहवासांत घालविल्यावांचून रहात नसत.

प. वा. माधवानुज (डॉ. काशीनाथ हरि मोडक) हे कविहि केशवसुतांच्या विशेष परिचयाचे होते. माधवानुजांच्या कविता त्यांना आवडत असत. कल्पनेच्या भरारीपेक्षां माधवानुजांचें रचनाचातुर्य विशेष मोहक असतें, असें त्यांचें म्हणणें असे.

प्रस्तुत लेखकाची व माधवानुजांची १९०६ सालीं मराठी ग्रंथकारांच्या पहिल्या संमेलनाच्या वेळीं गांठ पडली, व उभयतांचा कांहीं काल एकमेकांच्या कविता वाचण्यांत गेला. यापूर्वीच चारपांच वर्षें केशवसुतांनीं प्रस्तुत लेखकाच्या कवितांचा माधवानुजांजवळ उल्लेख केला होता, व मासिकांतूनहि त्यांना त्यांचा परिचय झाला होता. प्रस्तुत लेखकाला केशवसुतांच्या सहवासामुळें कसकसा आणि काय फायदा झाला, व प्रस्तुत लेखक केशवसुतांना गुरुस्थानीं कां समजतो याचा त्यानें माधवानुजांशीं बोलत असतां ओघानुसार सहज उल्लेख केला. तो ऐकून माधवानुजहि म्हणाले, " मलाहि पण केशवसुत गुरूच्याच स्थानीं आहेत. मुंबईत असतांना नव्या कवितेचें वळण त्यांनींच मला लाविलें. " प्रस्तुत लेखकांजवळून केशवसुतांनीं ही गोष्ट मात्र लपवून ठेवली होती. तसेंच प्रस्तुत लेखकाला केशवसुतांनीं जें वळण लाविलें होतें त्याचाहि पण त्यांनीं माधवानुजांजवळ उल्लेख केला होता. केवढें थोर अंतःकरण हें ! अशा रीतीनें आपल्या शिष्यालाहि ते स्नेहचाचा मान देत ! तेव्हां अशा पुरुषाबद्दल " धन्य त्यांचा थोरपणा ! " असे उद्‌गार आपोआप निघाल्यास त्यांत नवल काय ? याशिवाय केशवसुतांचे अन्य कविमित्र असतील, पण त्यांच्याबद्दल प्रस्तुत लेखकाकडे त्यांनीं कधीं उल्लेख केला नाहीं.

स्वभाव : केशवसुतांचा स्वभाव फार करारी, बाणेदार व निःस्पृह असे. वरिष्ठांशीं ' हांजी हांजी ' करणें त्यांना बिलकुल आवडत नसे. त्यांची वागणूक नेहमींच साधी आणि सरळपणाची असल्यामुळें जगांतील डावपेचांच्या वागणुकीशीं त्यांचें कधींच जुळत नसे. ते पूर्ण सुशील असून, निर्व्यसनी होते. जेथें परिचय नाहीं तेथें त्यांची संकोचवृत्ति निदर्शनाला येत असे. व्यसनी माणसांची त्यांना मनापासून चीड असे. त्यांच्यांत स्वातंत्र्य, स्वावलंबन, निःस्पृहता, प्रेमळपणा व कुशाग्रबुद्धित्व हे गुण स्पष्ट दिसत असत. हा त्यांचा स्वभाव त्यांच्या कवितांमधूनहि जागजागीं मूर्त उतरला आहे. त्यांच्या कवितांबद्दल पुढें जे विचार प्रदर्शित केले आहेत त्याठिकाणीं याचा उल्लेख येईल. त्यांच्या स्वावलंबनाची एक गोष्ट वर (नोकरीबद्दल वडिलांनीं दिलेलें पत्र आपल्याच जवळ ठेवून घेणें ही) दिलीच आहे. दुसरीहि अशीच एक गोष्ट प्रस्तुत लेखकाला माहीत आहे. केशवसुतांचें मासिक वेतन जेमतेमच असल्यामुळें तेवढ्यांत प्रपंच करण्याला त्यांना बरीच यातायात पडत असे, असें असतांहि त्यांनीं आपल्या बंधूंजवळ यासंबंधानें कधींहि गोष्ट काढली नाहीं. पण त्यांचे बंधु प. वा. श्रीयुत प्रो. मोरोपंत यांनीं ही परिस्थिति जाणून एकदां त्यांच्या प्रपंचाला

मदत व्हावी म्हणून मनिऑर्डरनें त्यांच्याकडे कांहीं रक्कम पाठविली. पण केशवसुतांनीं ती न स्वीकारतां परत केली !

केशवसुत अत्यंत मितभाषणी असत; तरी पण एकदां परिचय झाला व एकमेकांचीं मनें व आवडी मिळाल्या म्हणजे ते फारच मोकळया मनानें बोलत. कित्येकांना त्यांची वृत्ति व्यावहारिक दृष्टिनें चमत्कारिक भासत असे; पण वस्तुस्थिति तशी नव्हती. केशवसुतांचें विचारस्वातंत्र्य विलक्षण होतें व तें त्यांच्या लेखनांत व वर्तनांत नेहमीं व्यक्त होत असे. ते बोलण्यांत फारच निर्भीड असत. आपणांला जें खरें वाटेल तें उघडउघड बोलण्यांत त्यांनीं कधींच कोणाचीहि पर्वा केली नाहीं. तसेच ते फार निश्चयीहि होते.

केशवसुत धुळ्यास 'टीचर्स'च्या परीक्षेला गेले त्या वेळीं एक दिवस ते आग्रा-रोडवरून ते चालले असतांना समोरूनच विनायक कवींची स्वारी आपल्या दोनचार रंगेल स्नेह्यांसह येतांना त्यांच्या दृष्टीला पडली उभय कवींची दृष्टादृष्ट झाली; पण विनायक कवीने (कदाचित् त्यांच्याबरोबर त्यांचे रंगेल स्नेही असल्यामुळें) आपली दृष्टि चोरली व आपण केशवसुतांना पाहिलेंच नाहीं असें दाखवून, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें पाय काढला ! विनायककवींचें हें वर्तन पाहून केशवसुतांना कसेंसेंच वाटलें. तरी पण अखेरीस केशवसुतच स्वतः मागें वळले व त्यांनीं विनायकांना गांठलें. नमस्कारादि प्रकार झाला तोंच विनायक "मी आपणास येऊन भेटेन," इतकेंच घाईघाईत म्हणून पुनः पाय काढूं लागले. तेव्हां केशवसुतांनीं त्यांना प्रश्न केला, "मी कुठें उतरलों आहें त्या ठिकाणाची विचारपूस न करतां आपण मला भेटणार ?" हें ऐकून विनायक कवि स्तब्ध झाले व मनांत विरमून गेले ! त्यांची चर्या पाहून केशवसुत म्हणाले, "ज्या अर्थीं आपणांस मला भेटण्याची विशेष उत्सुकता दिसत नाहीं त्या अर्थीं मीहि पण कुठें उतरलों आहें हें आपणांस कळवीत नाहीं !" इतकें म्हणून केशवसुतांनीं आपला मार्ग सुधारला, व विनायक कविहि आपल्या रंगेल मंडळींत मिसळून निघून गेले. यापुढें धुळ्यास असूनहि या दोन कवींची भेट पुनः झाली नाहीं ! नंतर कांहीं महिन्यांनीं विनायक कवि भडगांवास जाऊन केशवसुतांना भेटले व धुळें येथील आपल्या वर्तनाबद्दल त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली. या दोघांहि कवींच्या वरील वर्तनावरून त्या दोघांच्या स्वभावाबद्दल वाचकांनींच आपल्या मनाशींच काय ती अटकळ बांधावी.

फैजपुरास असतांना तेथील सद्गृहस्थ श्रीयुत "ढ" यांचें व केशवसुतांचें कांहीं कारणामुळें पटेनासें झालें. आम्ही भुसावळीस असतांना केशवसुत आमच्याकडे सुटींत वगैरे नेहमीं येत असत. एकदां असेच ते भुसावळीस आले असतां त्या वेळचे तेथील ए. व्ही. स्कूलचे हेडमास्तर श्रीयुत 'क्ष' हे त्यांना भेटावयास आले ; पण त्यांची भेट घ्यावयाला केशवसुत तयार होईनात. याचें कारण विचारतां, "ढ"

यांनींच माझा 'क्ष' यांच्याशीं परिचय करून दिला ; पण 'ढ' बद्दल माझें मत बरें नाहीं; म्हणून मी 'क्ष' ना भेटूं इच्छीत नाहीं ! असें केशवसुत म्हणाले. अखेरीस आम्हांला 'क्ष' हे 'ढ' चे स्नेही या नात्यानें त्यांच्याशीं आपण बोलूं नका ; पण ते एक शिक्षक आहेत व आपणहि एक शिक्षक आहांत, तेव्हां या नात्यानें तरी त्यांच्याशीं आपण दोन शब्द बोला," अशी केशवसुतांची समजूत घालावी लागून त्यांची भेट करवावी लागली. पण या भेटींत 'केशवसुत' कुशल प्रश्नांपलीकडे विशेष कांहींच बोलले नाहींत !

रहाणी : केशवसुतांची रहाणी अत्यंत साधी असे. त्यांचा पोषाक म्हटला म्हणजे डोकीला एक साधा रुमाल, अंगांत शुभ्र कोट, धोतराचा कांचा कसलेला, आणि पायांत पायतण अथवा दक्षिणी जोडा, असा असावयाचा. छानछोकीकडे त्यांचें मुळींच लक्ष नसे.

गृहचित्र : केशवसुतांचें गृहचित्र पहाण्याचे प्रस्तुत लेखकाला बरेच प्रसंग आले. भडगांवांस असतांना केशवसुतांकडे गेल्यावर स्वारी एक सतरंजी टाकून तिच्यावर बसलेली दिसावयाची. समोर पुस्तक असून त्यांचें वाचन चाललेलें असायचें- अथवा एकादी कविता लिहीत असलेले दिसावयाचे. त्यांच्या मुलीहि तेथेंच आपल्या वडिलांजवळ असावयाच्या. त्या कोणी पाठीवर, तर कोणी मांडीवर तर कोणी डोक्यापाशीं, खेळत असावयाच्या. मधूनमधून हे त्यांच्याशीं बोलत, त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत, आणि त्यांचे लाडिवाळहि करीत, पण दुसरीकडे हातांत असलेलें कामहि करीत असत. केशवसुतांचें अपत्यप्रेम विलक्षण होतें. आपल्या कामांत या मुली व्यत्यय आणतात, असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. त्यांच्यावर त्यांनीं कधींहि राग किंवा धुसफुस केली नाहीं. त्यांचें त्यांच्या आप्तवर्गावरहि अशाप्रकारचें अकृत्रिम व अलोट प्रेम होतें. आणि ही गोष्ट त्यांच्या अनेक कवितांतूनहि दृगोचर होते.

काव्यवृत्ति : केशवसुतांइतकी सबाहयांतर काव्यविषयांत रंगून गेलेली चित्त वृत्ति क्वचित्च आढळेल. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं कवितेवांचून अन्य विषय त्यांना माहीत नव्हता, इतकी त्यांची कवितेशीं तल्लीनवृत्ति झाली होती. कवितेचें आराधान करण्यांतच त्यांनीं आपलें सर्व आयुष्य घालविलें, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं .कित्येक आंग्लकवींसंबंधानें असें म्हटलें जातें, कीं, He wrote poetry and lived poetry. ("त्यानें काव्य लिहिलें व काव्यच जन्मभर आचरिलें") ही गोष्ट केशवसुतांच्या संबंधांनेंहि अगदीं निर्धास्तपणें म्हणतां येईल. असो. प्रसंगानुसार कित्येक वेळीं त्यांच्या तोंडून असे उद्गार येत कीं, "बहुजन-समाजाचा कवि होण्यांत कांहीं विशेष नाहीं; आपण कवींचा कवि झालें पाहिजे !"

आणि या उद्‌गारांप्रमाणें आज ते कवींचे कवि झाल्याचें प्रत्यक्ष घडूनहि आलेलें आहे, यांत अणुमात्र शंका नाहीं.

कवितेविषयीं त्यांची कल्पना : केशवसुत नहमीं काव्यमय सृष्टींत दंग असत. कवीनें शब्दांवर वहावत न जातां कल्पनेशीं झगडलें पाहिजे, नुसत्या शब्दांच्या थाटमाटानें कविता होत नसते, शब्दांत काव्य नाहीं, तें सर्व कल्पनेंत आहे ; शब्दांत जादू असेल, पण ती कल्पनेंतील जादूपेक्षां कमी दर्जाची, असें त्यांचें ठाम मत असे. कवितेचें वाह्य स्वरूप कसेंहि असलें तरी हरकत नाहीं, पण तिचें अंतरंग उदात्त कल्पनांनीं आणि गंभीर व तात्त्विक विचारांनीं भरलेलें असलें पाहिजे, तरच तिचें उज्ज्वल स्वरूप प्रकट होईल ; एरवीं नाहीं. तसेंच केवळ यमक, प्रास आणि अलंकार यांनीं नटलेली कविता खरी कविता नव्हे, असें ते म्हणत असत. कवितेच्या चालीसंबंधानें ते अगदी बेपर्वा असत. काव्याचा विषय आणि स्फूर्ति ही त्यांना ज्या चालींत गुणगुणावयाला लावतील तीच त्यांची चाल. कवीनें स्वच्छंदानें कविता रचावी ; जो सहृदय असेल तोच ती समजून घेईल. कविता मोजक्या शब्दांत असून, अर्थप्रचुर असावी, असा त्यांचा कटाक्ष असे, व तदनुसारच त्यांची कविता असल्याचें आढळून येतें.

त्यांचे आवडते कवि : महाराष्ट्र कवींपकीं तुकाराम हा त्यांचा फारच आवडीचा कवि होता. त्यांनीं आंग्ल कवींच्या काव्यांचें परिशीलन केलें होतें. त्यांच्या आवडीचे कवि म्हटले म्हणजे इमर्सन, स्पेन्सर, टॉमस हूड , शेक्सपीअर, ड्रमंड, कीटस्, शेले, वर्डस्वर्थ व ब्राउनिंग हे होत. पालग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी' च्या चारहि भागांचें त्यांचें सतत पारायणच चालत असे, असें म्हटलें तरी चालेल. इंग्रजी कवींच्या वाचनाची त्यांच्या कल्पनेवर इतकी कांहीं विलक्षण छाप बसली होती, कीं कांहीं विचारूंच नये ! कांहीं इंग्रजी कवितांचीं तर त्यांनीं रूपांतरें कलीं आहेत, आणि तीं मुळापेक्षांहि कित्येक प्रसंगीं सरस उतरलीं आहेत. त्यांच्या रूपांतरांतहि त्यांचा स्वतःचा शिक्कामोर्तब स्पष्टपणें दृग्गोचर होतो.

त्यांच्यांतील कवित्वगुण : केशवसुत हे निसर्गतःच कवि होते, हें त्यांची कोणतीहि एखादी कविता वाचली तरी देखील आढळून येईल. उत्तम कवीला लागणारे बहुतेक सर्व गुण—सदयता, सहृदयता, प्रेमळता, शुद्धता, पाविव्य, तन्मयवृत्ति, उदात्त कल्पना, उन्नत विचार, गंभीर व उत्साही मनोवृत्ति इत्यादि सर्व त्यांच्या अंगीं वसत होते. त्यांच्या गंभीर आणि विचारी चेहऱ्याचें प्रतिबिंब त्यांच्या कवितेंत स्पष्ट दिसतें. त्यांचा भव्य ललाटप्रदेश व क्वचित् प्रसंगीं त्यावर दिसणाऱ्या रेषा ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांना त्यांच्या गंभीर मनोवृत्तीची व सात्त्विक विचारांत गढून गेलेल्या

मुखश्रीची स्मृति झाल्याशिवाय रहाणार नाहीं. विनायक कवींनीं केशवसुतांसंबंधानें एकदां पुढील आशयाचे उद्‌गार काढले होते :

" केशवसुतांची रहाणी साधी, वर्तन पवित्र, विचार काव्यमय, व भाषणशैली मनोवेधक असे. केशवसुत बोलतांना खालीं पाहून बोलत, तथापि ते केव्हां केव्हां वर मान करून पहात तेव्हां त्यांचे पाणीदार –हें पाणी खरोखरच अलौकिक होतें– डोळे श्रोत्यांच्या हृदयाचा वेध करून टाकीत ! "

चेहरेपट्टी : केशवसुतांचा फोटो उपलब्ध नाहीं, तरी पण त्यांच्या तोंडवळ्याची कांहीं कल्पना त्यांच्या कनिष्ठ बंधूंना–श्रीयुत सीतारामपंतांना–पाहून होण्यासारखी आहे. केशवसुतांच्या चेहऱ्यावरील तें दिव्य तेज, त्यांच्या नेत्रांतील ती हृदयभेदक दृष्टीची धार, व त्यांच्या चेहऱ्यांतील हृदय आकर्षण करून घेण्याची शक्ति या गोष्टींची जर आपण आपल्या कल्पनाशक्तीनें श्रीयुत सीतारामपंतांच्या चेहऱ्यांत भर टाकली, तर आपणांला केशवसुतांच्या चेहऱ्याची बरीच कल्पना येईल.

चतुर्दशपदी कविता : वंगदेशीय कवि मधुसूदन दत्त यांनीं बंगालच्या वाङ्मयांत इंग्रजी सॉनेटच्या धर्तीवर चतुर्दशपदी कविता रचून जशी ती प्रथमच प्रचारांत आणली, तशीच महाराष्ट्र वाङ्मयांत प्रथमतः ती केशवसुतांनींच आणिली. या या पद्धतीला त्यांनीं शार्दूलविक्रीडित ह्याच जुन्या वृत्ताची योजना केली. यांत एकच मध्यवर्ति कल्पना असून तिचा आरोह पहिल्या आठ ओळींत व अवरोह पुढच्या सहा ओळींत अथवा पहिल्या आठ ओळीत अवरोह व पुढील सहा ओळींत आरोह होतो. कांहींत पहिल्या बारा ओळींत व शेवटच्या दोन ओळींत वरप्रमाणें आरोह अथवा अवरोह होतो. या पद्धतीच्या चुटक्यांत पहिल्या अर्धकांत पहिली व चवथी, दुसरी व तिसरी, पांचवी व आठवी, सहावी व सातवी, व दुसऱ्या अर्धकांत नववी, अकरावी आणि तेरावी, व दहावी, बारावी व चौदावी या ओळींचीं यमकें साधलेलीं असतात. या पद्धतीचे केशवसुतांनीं ८।९ चुटके लिहिले आहेत. मराठी कवितेंत चतुर्दशपदीचा हा नवीनच प्रचार असल्यामुळें तो रूढ व्हावा असें केशवसुतांना वाटे, व ते आपल्या प्रत्येक कविमित्राजवळ त्याबद्दल एखाधा मिशनरीप्रमाणें त्याचें प्रतिपादन करून चतुर्दशपद्या रचण्याविषयीं शिफारस करीत. माधवानुज यांनींहि दोन तीन चुटके या पद्धतीनें लिहिलेले आमच्या वाचण्यांत आहेत. प्रस्तुत लेखकानेंहि या चतुर्दशपदी कवितेचे चारपांच चुटके लिहून केशवसुतांच्या या नव्या उपक्रमाला थोडाफार हातभार लावला आहे. सन १९०२।१९०३ च्या सुमारास केशवसुत उज्जैनीस जात असतां इंदूरला आले होते. त्यावेळीं मध्यप्रांतांतील आधुनिक कविशिरोमणि श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे यांची त्यांनीं गांठ घेतली. हा नवीन चतुर्दशपदी कवितेचा प्रचार यापूर्वीच श्रीयुत तांबे यांनाहि पसंत झाला असून त्यांनींहि

त्या नमुन्यावर कांहीं चुटके लिहिले होते. या ठिकाणीं ही गोष्टहि पण नमूद करणें आवश्यक आहे कीं, श्रीयुत तांबे यांची "प्रीतीविषयक वस्तु लोपल्यावर" ही चतुर्दशपदी वाचून केशवसुत फार प्रसन्न झाले व "तांबे हे एक जिवंत वाणीचे निसर्ग= कवि आहेत!" असे त्यांनीं प्रस्तुत लेखकाजवळ उद्‌गार काढले. केशवसुतांच्या उत्कट मनोवृत्तींनीं त्यांना येथेंच थांबूं दिलें नाहीं, तर खुद्द श्रीयुत तांबे यांनाहि एक पत्र पाठवून त्यांत त्यांनीं त्यांचा गौरव केला होता, असें श्री. तांबे यांच्याकडूनच प्रस्तुत लेखकाला पुढें एका प्रसंगीं सहज ओघानें कळून आलें. या उभय कवींची भेट एकदांच झाली, व तास दोन तास एकमेकांच्या कविता वाचण्यांत, म्हणण्यांत व ऐकण्यांत आल्यामुळें, त्यांचा परस्परांबद्दल आदर विशेष वाढला.

केशवसुतांनीं हा काव्यप्रकार नवीनच प्रचारांत आणला, व त्यांना कांहीं अनुयायीहि मिळाले. नंतर कांहीं काळानें असा वाद उपस्थित झाला, कीं चतुर्दशपदी कवितेला शार्दूलविक्रीडित वृत्तच काय करावयाचें? सात साक्या किंवा आर्या रचल्या म्हणजे झालें; कारण शार्दूलविक्रीडित वृत्ताचें अवलंबन केल्यामुळें तिसरा श्लोक जो अर्धाच रहातो तो तरी या नव्या योजनांनीं रहाणार नाहीं. तसेंच 'या निरनिराळ्या ओळींचीं यमकें साधण्यांत काय विशेष आहे? उलट यामुळें यमकांच्या स्वारस्याची हानि मात्र होते,' असाहि एक मुद्दा पुढें मांडला गेला. पण यांसंबंधीं केशवसुतांचें असें म्हणणें असे, कीं शार्दूलविक्रीडित हें वृत्त कवितेच्या या प्रकाराला विशष पोषक असून त्या वृत्तांत जो जोम व शक्ति आहे ती साकींत किंवा आर्येंत नाहीं. शिवाय चतुर्दशपदी कविता हा एक विशिष्ट रचनेचा प्रकार आहे हें ध्यानांत यावें व त्याच प्रमाणें या समग्र चौदा ओळी मिळून हा एक रचनचा निराळाच प्रकार आहे हेंहि चट्‌दिशीं निदर्शनास यावें, म्हणूनच यमकांची साधणी निराळ्याच तऱ्हेची कल्पिलेली आहे. केशवसुतांच्या मतें चतुर्दशपद कविता ही गावयाची नसून खडच्या आवाजांत गद्याप्रमाणेंच म्हणावयाची अथवा वाचावयाची आहे. असो. यानंतर बऱ्याच कवींनीं या नव्या प्रकाराचें अवलंबन केलें आहे. कित्येकांनीं यमकाला संपूर्ण छाटच दिला आहे; परंतु एकंदरींत हा प्रकार बराच रूढ होत चालला आहे.

इतर लेख : केशवसुतांच्या कवितेचे आपणांपुढें आज १२६ च चुटके आहेत; पण यापेक्षां त्यांनीं बरीच जास्त कविता लिहिली होती. त्यांच्या अल्पवयांतील बऱ्याच कविता त्यांनीं स्वतःच जाळून टाकल्याबद्दल त्यांनीं प्रस्तुत लेखकाला सांगितलें होतें; पण त्या जाळण्यापूर्वी त्यांतील चांगल्या विचारांचें त्यांनीं टांचण करून ठेवलें होतें, व त्या विचारांचा योग्य प्रसंगीं, योग्य कालीं व योग्य स्थळीं ते उपयोग करून घेत. ज्या कवितेंत जीव आहे असें आपणांला वाटत नाहीं ती ठेवणें ही चूक आहे, असें त्यांना वाटे. आणि म्हणूनच त्यांना पसंत नसलेल्या कविता आपण होऊन आपल्या हातांनीं अग्निमुखीं ठेवल्या, असें ते मोठ्या गंभीरपणें सांगत. कोणास ठाऊक?

कदाचित् त्या कविता पुढेंमागें पुन्हां नव्या तेजानें वाहेर पडाव्या, याकरितांच त्यांनीं त्या दिव्य भट्टींत टाकल्या असतील ! असो. याशिवाय त्यांनीं लिहिलेलें 'वलिभद्र' नांवाचें एक गद्य नाटक प्रस्तुत लेखकानें वाचलें होतें. हें नाटक ज्या वेळेस राजाराम कॉलेजाकडून गद्य नाटकावद्दल वक्षीस लागलें होतें तेव्हां लिहिलें गेलें. पण तें वक्षिसाकरितां पाठविलें गेलें नाहीं, किंवा प्रसिद्धहि झालें नाहीं. त्या वेळीं लावलेलें वक्षीस 'गुणोत्कर्ष' नाटकाला मिळालें. प्रस्तुत लेखकानें केशवसुतांचें हें नाटक वाचल्यास आज जवळ जवळ १७।१८ वर्षें होऊन गेलीं. तेव्हां त्यासंबंधानें त्याला विशेष कांहीं सांगतां येत नाहीं. तरी पण तें नाटक वाचून त्याच्या मनावर जो कांहीं परिणाम पुसट अद्याप राहिलेला आहे तो असा कीं, तें नाटक म्हणजे एक गद्य काव्यच होतें– नाटक नव्हे ! केशवसुतांनीं एक कादंबरीहि लिहिली होती म्हणून म्हणतात; पण यासंबंधीं प्रस्तुत लेखकाजवळ केशवसुतांनीं कधीं चुकूनसुद्धां एकहि शब्द काढल्याचें त्याला स्मरत नाहीं. तसेंच त्यांनीं इतर कांहीं गद्य लेख लिहिल्यावद्दलहि प्रस्तुत लेखकाला कांहीं माहिती नाहीं.

काव्याविषयीं विचार वगैरे : केशवसुतांचें त्यांच्या विशेष परिचयाच्या मित्रांशीं काव्यासंबंधीं भिन्न-भिन्न प्रसंगीं बोलणें व पत्रव्यवहार होई. ते परस्परांना आपल्या नूतन कविताकृति पाठवून त्यांवर एकमेकांचे विचार व मतें मागवीत व कळवीत. प्रस्तुत लेखकाला केशवसुतांकडून आलेल्या कांहीं पत्रांतील पुढें दिलेल्या उताऱ्यांवरून त्यांच्या या बाबतींतील विचारांची वाचकांना कांहीं अटकळ येईल.

कविसंमेलनाची कल्पना : श्रीयुत भास्कर रामचंद्र तांबे आणि प्रस्तुत लेखक यांचें कित्येक प्रसंगीं कवितेसंबंधीं बोलणें चाललें असतांना आम्हांला परस्परांना जो अपार आनंद होई तो आनंद जर सर्व कविताभक्त एके ठिकाणीं जमले आणि आपापले विचार एकमेकांना कळवूं लागले तर कांहीं विशिष्ट प्रकारचा होईल, असें आमच्या कल्पनेनें घेतलें, व तो आनंद अनुभविण्याकरितां, एकादें वार्षिक कविसंमेलन भरवन, त्या कल्पनेला मूर्त स्वरूप कां देऊं नये, असा प्रश्न आमच्या आमच्यांतच निघाला. आमचा हा विचार पत्राद्वारें केशवसुतांना कळविला, तेव्हां त्यांनीं उत्तर धाडिलें: –

"As to the idea of an annual gathering of poets :—Practical men meet periodically for practical purposes. Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the muse favours them. Some two or three congenieal spirits may at times

come together to sip the rainbow drops of the nectar; but more would certainly spoil its flavour—That is my idea.

वरील विचार वाचून ' कविसंमेलनांची कल्पना ' आम्हीं टाकून दिली. यानंतर (केशवसुतांच्या निधनानंतर) श्री. ना. न. फडनीस—' काव्यरत्नावलि ' चे संपादक यांनीं जळगांवास एक कविसंमेलन भरविलें ; पण तें एकदांच भरून पुन: त्यानें आपलें डोकें वर काढलें नाहीं. यावरून कविसंमेलनाच्या फोलपणासंबंधाची केशवसुतांचीच कल्पना वरोवर ठरली असें कोण म्हणणार नाहीं ?

तसेंच एके प्रसंगीं प्रस्तुत लेखकानें कवितेच्या स्फूर्तीमुळें आपल्या अंत:करणांत होणाऱ्या खळबळीची गोंधळ उडविणारी स्थिति त्यांना पत्राद्वारें लिहून कळविली असतां केशवसुतांनीं उत्तरीं लिहिलें :—

" You complained " काय करूं आणि काय नाही असे होते! " ' I give below an extract from Emerson's Essay on the " The Transcendentalist " that struck me as an apt illustration of your mood :—

" Now we confess, and by no means happy is our condition if you want the aid of our labour, we ourselves stand in greater want of the labour. We are miserable with inaction. We perish of rust and rest but we do not like your work. "

" Then says the world ' show me your own—' ' We have none '. ' What you will do then ? ' cries the world. ' We will wait ' ' How long ? '—' until the universe beckons and calls us to work '—' But whilst you wait, you grow old and useless. '—' Be it so; I can sit in a corner and perish (as you call it) but I will not move until I have the highest command. "

" माधवानुज 's eldest brother once said to me that ' Our highest poetry was in sitting still and shedding tears. ' How parallel with the above from Emerson. "

तसेंच दुसऱ्या एका प्रसंगीं अलीकडील सर्वच कवि लहानलहान चुटकेच लिहितात, एकादें मोठें काव्य त्यांनीं कां हातीं घेऊं नये ? चुटक्यांतून काव्यस्फूर्तीची नुसती चमक काय ती दिसते; पण तिचें पूर्ण जाज्वल्य स्वरूप मोठ्या काव्यांतच प्रकट होईल. ती दिव्य स्फूर्ति आपणांत (केशवसुतांत) आहे, आपण असा प्रयत्न अवश्य करावा असें त्यांस लिहिलें असतां त्यांनीं लिहिलें :—

" Please tell (Mr. XX) that I request him to undertake a long poem and not to waste time in writing short poems only. A century has passed without producing a long Marathi poem worth the name and it is for the geniuses like (x) and Mr. (xx) to wipe out the disgrace. I am sorry I am a dwarft and don't show any signs as yet of outgrowing. I therefore hate myself and don't like others who attempt only small things. "

" You can guess my state of mind from my piece in the last issue of Manoranjan (हरपले श्रेय). A crack in the heart ! But, alas Where is the restorative ? "

ईश्वरविषयीं विचार : केशवसुतांचा ईश्वराच्या आस्तित्वावर विशेषसा भरंवसा नव्हता असें कांहीचें म्हणणें आहे. या म्हणण्यांत सत्यहि आहे आणि असत्यहि आहे. त्यांच्या कवितेचें सूक्ष्म अवलोकन केल्यास त्यांचा ईश्वरावर भरंवसा नव्हता असें केव्हांच म्हणतां येणार नाहीं. उदाहरणार्थ :–

(१) **जन बाळें तिजला स्मरलीं**
डोळ्यांत आंसवें आलीं
'देवा रे' मग ती स्फुंदे
एवढा तरी लाभूं दे"

(२) **" जगांमधीं या तुला कशाला**
परमेशें धाडिलें ?"

–'दंवाचे थव

या कवितेंत तर परमेश्वराला उद्देशून बरींच वाक्यें आहेत. सर्वांचें नियमन करणारी परमेश्वरशक्ति या जगांत भरून उरली आहे हें त्यांना मान्य होतें व त्या शक्तीला भक्तीनें आळवणें हें आपलें कर्तव्य आहे, असेंहि ते समजत. श्रीयुत आपटे यांच्या पुस्तकांतील पृ. १३ वरील 'एक खेडें' ही त्यांची कविता पहा. या कवितेंत ते म्हणतात :–

" देवळीं त्या देवास बळें आणा,
परी राही तो सृष्टिमध्यें राणा,
उंच डोंगर ते उंच कडे भारी,

पडे धो ! धो ! ज्यांचियावरुनि वारी.
भोवतालीं रान तें दाट आहे;
अशा ठायीं देव तो स्वयें राहे ।
स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती,
सूर वारे आपुला नित्य देती,
वृक्षगण तो नाचूनि डुल्लताहे;
अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे ।"

(पृ. १४ केशवसुतांची कविता)

अशा प्रकारचे देवाविषयीं जर त्यांचे उद्‌गार आहेत तर मग त्यांचा ईश्वरावर भरंवसा नव्हता, असें म्हणण्यांत काय अर्थ ? याचें उत्तर एवढेंच कीं, ते मूर्तिपूजक अथवा सगुणोपासक नसून, निर्गुणोपासक होते. एके प्रसंगीं शंकराच्या पिंडीवर नाचल्याचें केशवसुतांनीं आपले मित्र 'किरात' यांना सांगितलें, त्या वेळेस 'किरातां'नीं इतकेंच उत्तर दिलें कीं, "या पिंडींतलेंहि ब्रह्म जेव्हां आपणांस दिसेल, तेव्हां तीच पिंड आपण शिरावर घेऊन नाचाल." आणि तें पुढें केशवसुतांनीं आकळिलें होतेंसें दिसतें. उदाहरणार्थ :–

"तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळां,
तुझे पायीं माथा वाहियेला."

ज्या मंजुळ श्रुतिमनोहर अशा चिन्मय नादश्रवणानुभवाचा उल्लेख बऱ्याच भगवद्‌भक्तांकडून जागजागीं झाल्याचा आढळतो व शेक्सपीअरनेंहि ज्याचा आपल्या 'पेरिक्लिज' नाटकांत एके ठिकाणीं उल्लेख केला आहे, त्याच दिव्य आणि मधुर नादाचा अनुभव केशवसुतांना होत असल्याचें त्यांच्याच तोंडानें किरातांशीं बोलतांना बाहेर पडलें, व त्यावर किरातांनीं त्यांना सांगितलें, कीं, "ज्याअर्थीं हा नाद तुम्हांला ऐकूं येऊं लागला आहे, त्याअर्थीं हाच नाद तुम्हांला तुकारामादि साधुसंतांप्रमाणें एक दिवस साधू बनवून परमेश्वराचा नाद लावील." यावर केशवसुतांनीं एवढेंच उत्तर दिलें, कीं, "सध्यां माझी जशी कवितेवर आसक्ती जडली आहे तशीच मग ती परमेश्वराच्या ठिकाणींहि जडेल."

निर्यमक कविता : केशवसुतांच्या कवितांचा बराच संग्रह आज आपणांपुढें असल्यामुळें केशवसुत निर्यमक कवितेचे खरोखरच चाहते होते किंवा कसें, या प्रश्नाचा सहजच उलगडा झाला आहे. यांची कविता निर्यमक नाहीं, फक्त त्यांच्या चतुर्दशपदी कविताच काय त्या आपल्या यमकाच्या रूढीपासून भिन्न आहेत; पण त्यांतहि

विशिष्ट ओळींचीं यमकें साधावीं लागतात, व हीं यमकें केशवसुतांनीं आपल्या चतुर्दशपदी कवितेंत साधलींच आहेत, आणि हीं त्यांनीं कां साधिली याचें विवेचन वर केलेंच आहे.

कविता लिहिण्याची पद्धत : केशवसुतांना विचार सुचल्यावरोबर लागलीच ती कविता नेहमींच लिहून काढीत, असें नाहीं. कधीं कधीं त्या विषयावर त्यांचें कित्येक दिवस सतत चिंतन व मनन चालत असे. या मननाच्या क्रियेंत त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त होऊन काव्यविषयाचें स्वरूप विशेष रमणीय दिसूं लागून त्याच्यांतलें गूढ त्यांना अधिकाधिक उकलत जात असे. तें गूढ त्यांना पूर्णपणें व्यक्त झाल्यावर मगंच ते कविता लिहिण्यास बसत असत. ते शब्दांची छाननी पूर्ण कसोशीनें करीत. मनांतला मूर्त भाव शढचित्रांत जोंपर्यंत उतरत नसे तोंपर्यंत त्या चित्रावर ते आपली कुंचली सारखी फिरवीत असत. मग ज्या शब्दांनें त्यांचा भाव पूर्णपणें व्यक्त होई तोच शब्द ते उपयोगांत आणीत. मग तो शब्द रूढ असो वा नसो, संस्कृत असो वा प्राकृत असो, हिंदी असो वा गांवढळ असो, ग्राम्य असो वा प्रौढ असो. यामुळें त्यांच्या कांहीं चुटक्यांतून अशा शब्दांची सरमिसळ झालेली आहे. आणि ह्याचमुळें ज्या वाचकांना सरळ, गोड, मिळमिळीत व नटल्या ओळी वाचण्याची संवय झालेली आहे त्यांना केशवसुतांची कविता वाचतांना कसेंसेंच वाटतें ! पण याची केशवसुतांनीं मुळींच कधींहि पर्वा केली नाहीं. असो. " हवेंत उडणाऱ्या म्हातारीवर मी एक चुटका लिहिणार आहे, " हें प्रस्तुत लेखकाला सांगितल्यावर जवळजवळ एक दीड वर्षानें केशवसुतांची ' म्हातारी ' बाहेर पडली. तोच प्रकार " आम्ही कोण ? " या चुटक्याहि झालाच ' लढाईवर जाणाऱ्या वीरांच्या पत्नींचे अश्रु ' या विषयावरहि ते चुटका लिहिणार असल्याचें त्यांनीं म्हटलें होतें ; पण हा अखेर मुळींच लिहिला गेला नाहीं. याप्रमाणेंच आणखी कितीतरी विषय त्यांच्याबरोबरच गेले असतील ! महाराष्ट्र कवितादेवीचें दुर्दैव, दुसरें काय ?

श्रीयुत वि. को. ओकांची भेट : केशवसुत मुंबईस असतांना बालबोध मासिकाचे कर्ते व सुप्रसिद्ध ग्रंथकार प. वा. विनायक कोंडदेव ओक यांना भेटले होते. आपल्या कविता त्यांना दाखवून त्यांच्या कविता पहाण्याची त्यांनीं उत्सुकता दाखविली. श्रीयुत ओकांनीं बाळबोधांतील आपल्या छापलेल्या कविता त्यांजपुढें टाकल्या; पण केशवसुतांनीं प्रसिद्ध न झालेली अशी आपली कांहीं कविता दाखवावी, म्हणून विनंती केली ; पण श्रीयुत ओकांनीं ती विनंती अमान्य केली. याचें कारण विचारतां, " हस्तलिखित कविता पाहून वाचकांच्या मनावर योग्य तो परिणाम होत नाहीं म्हणून मी ती कोणास दाखवीत नसतों. " असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. तेव्हां केशवसुतांना नाइलाज होऊन गप्प राहावें लागलें. पण सुबक छापील कवितेनेंच मनावर

विशेष काय परिणाम होत असेल हें त्यांना समजेना. ही गोष्ट झाल्यानंतर कित्येक वर्षांनीं प्रस्तुत लेखकांनीं आपली एक चतुर्दशपदी केशवसुतांच्याकडे पहाण्याकरितां पाठवली. ते ती वाचून कांहीं उत्तर लिहिणार होते इतक्यांत मासिक मनोरंजनाचा नवा अंक त्यांच्या हातांत पडला. त्यांतच प्रस्तुत लेखकानें त्यांच्याकडे पाठवलेली कविता गोंडस रीतीनें छापलेली त्यांच्या दृष्टीला पडली. तेव्हां ती त्यांनीं पुनः वाचली. प्रथम हस्तलिखित प्रत वाचल्यावर त्यांच्या मनावर जो कांहीं परिणाम झाला होता त्यापेक्षां अधिक अनुकूल असा ग्रह ती मुद्रित कविता वाचून झाला व श्रीयुत ओकांच्या म्हणण्यांत बराच अर्थ होता, असें त्यांना वाटून समाधान वाटलें. वरील हकीकत संमक्ष भेटीअंतीं प्रस्तुत लेखकाला केशवसुतांनींच सांगितली होती.

मनोरंजन जुलै १९१८—लेखांक १ ला)

६

'झपूर्झा' आणि 'म्हातारी'

लेखक : श्री. म. वर्दे

केवळ संगीताची गोडी त्याच्या नादांतच काय ती असते. कानांना गोड लागणारें संगीत कोणत्याहि भाषेंतलें असलें तरी चालतें. त्याचा आवाज कानाला गोड वाटला म्हणजे तेवढ्यानेंच श्रोत्यांचें रंजन होतें; मग त्याचा अर्थ त्याला मुळींच कळला नाहीं तरी चालेल. परंतु काव्याचें तसें नाहीं. रस हा काव्याचा आत्मा होय. अर्थात् या रसात्मक काव्याच्या माधुर्याचा आस्वाद घ्यावयाचा असेल तर अगोदर काव्याचा अर्थ समजला पाहिजे. मग तो वाच्यार्थ असो किंवा व्यंग्यार्थ असो ! आणि अर्थ हा शब्दांत असतो, त्याअर्थीं कोणत्याहि काव्याचें स्वारस्य समजून घ्यावयाचें असल्यास त्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ चांगल्या प्रकारें समजलेला असणें अत्यावश्यक आहे त्यांतून कित्येक काव्यें अशीं असतात, कीं, त्यांतील कित्येक शब्दांना विशेष महत्त्व असतें. त्या शब्दांचा अर्थ कळल्यावांचून त्या काव्याचेंहि स्वारस्य कळत नाहीं, इतकेंच नव्हे तर त्या शब्दांचे अर्थ न कळल्यामुळें सर्वच काव्य दुर्बोध व नीरस किंबहुना अर्थहीन व रसहीन अशी केवळ बडबड आहे असें वाटण्याचा दाट संभव असतो. शब्दार्थ समजण्यापूर्वी जें काव्य नारिकेलपाकासारखें वाटत होतें तेंच तें समजून सुगम व सुलभ असल्याचें दिसून येतें. कित्येक वेळां हे शब्द दुसऱ्या अनेक कल्पनांशीं निगडित झालेलें असतात. त्या शब्दांचा अर्थ कळतांच त्या कल्पनाहि सहृदय वाचकांच्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. याचें अगदीं साधें उदाहरण म्हणजे मोरोपंतांनीं चक्रव्यूहांत

शिरणाऱ्या अभिमन्यूला दिलेली 'हरिपोत दंतियूथीं' ही उपमा पहावी. हरिपोत म्हणजे सिंहाचा छावा अणि दंतियूथ म्हणजे हत्तींचा कळप हें समजतांच अभिमन्यूचें कोंवळें वय, त्याचा पराक्रम, त्याचें उपजत धैर्य, त्याचा साहसोत्सुक स्वभाव इ. सर्व गोष्टी तत्काळ लक्षांत येतात. कित्येक काव्यांचें मर्म त्यांतील विशिष्ट शब्दांतच कसें असतें हें यावरून लक्षांत येईल.

'केशवसुत' कवींच्या उपरिनिर्दिष्ट दोन कवितांचें स्वारस्य त्यांच्या मथळ्याच्या वरील दोन शब्दांत आहे. ' झपूर्झा ' या काव्याचा ऊहापोह आजवर बराचसा झालेला आहे. कोणी म्हणतात, कीं तो एक अर्थशून्य शब्द असून त्या काव्यासारखाच निर्बोध आहे. अर्वाचीन कवींची हेटाळणी करणाऱ्या निंदादीक्षितांनींच बहुधा हें मत दिलेलें आढळतें; उलटपक्षीं केशवसुतांचें कोणी चहाते अगर अंधभक्त सांगतात, कीं, ' झपूर्झा ' हा केशवसुतांनीं बनविलेला महामंत्र असून, तें सर्व काव्य अज्ञेय वादांतील (Mysticism) गूढ प्रमेयांनीं भरलेलें आहे. परंतु हे दोन्ही समज चुकीचे आहेत. ' झपूर्झा ' या शब्दाच्या अर्थाशीं त्या काव्यांतील भावना इतक्या तादात्म्य पावलेल्या आहेत, कीं, त्या शब्दाचा अर्थ आणि त्या शब्दाशीं संलग्न असलेल्या कल्पनासमुच्चय या सर्वांचें यथार्थ ज्ञान झाल्याविना तें काव्य समजणें शक्य नाहीं. या कारणानेंच वरील दोन्ही प्रकारच्या समजुतींतील चुकीच्या मुळाशीं ' झपूर्झा ' या शब्दाच्या अर्थाचें अज्ञान आहे.

' म्हातारी ' या कवितेची स्थिति देखील अशीच आहे. कवि मुलीला घेऊन दाराशीं उभा असतां ही म्हातारी तरंगत आली. मुलीच्या डोक्यावरून गिरक्या घेऊं लागली. या म्हातारीला काय म्हातारचळ लागला होता ? आणि तिच्या या म्हातारचेष्टांनीं मुलगी घाबरून जाऊन तिनें किंकाळी फोडावी, ती उलट त्या म्हातारीला धरण्यासाठीं हात वर करून झटूं लागली, आणि त्या हाताच्या नुसत्या चलनानें म्हातारी वरती उडाली. आणि मुलगीहि तिच्यावरोबर उडावयाला पाहूं लागली. हें सर्व गौडबंगाल आहे तरी काय ? आणि या म्हातारीला ' गंधर्वाचें विमान ' आणि ' आकाशाचें फूल ' या उपमा कवि तरी कशा देतो ? म्हातारी या शब्दाचा अर्थ कळतांच या सर्व गोष्टींचा क्षणांत उलगडा होतो. किंबहुना ' म्हातारी ' आणि ' झपूर्झा ' या शब्दांतच त्या त्या काव्यांचें रहस्य व त्यांतील स्वारस्याची गुरुकिल्ली आहे.

' झपूर्झा ' हा शब्द अर्थहीन आहे म्हणणारांना केशवसुतांच्या कोणत्याहि काव्याची गोडी न कळली तर त्यांत नवल नाहीं. केशवसुतांच्या काव्यांत अर्थहीन असा एकहि शब्द आढळणार तर नाहींच; पण कित्येक शब्द इतके सूचक रीतीनें वापरलेले आढळतील, कीं, त्यांतील गर्भितार्थावर एक एक व्याख्यान होऊं शकेल. शब्दांचें महत्त्व प्रस्तुत कवीला किती वाटत होतें तें त्याच्या ' वातचक्र ' आणि ' शब्दांनो मागुते या ' या कवितांवरून स्पष्ट दिसून येतें.

"शब्दांसंगें तदा मीं निजहृदयवनामाजि संचार केला,
तेथें मी कल्पपुष्पें खुडुनि नमुनि तीं वाहिली शारदेला,"

असें अभिमानानें सांगणारा; शाप आणि आशीर्वाद या दोहोंचीहि किंमत आतां राहिली नाहीं कारण,

'नरें मळविलें, अहह! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत!'

आणि

"वाग्देवी शारदे गे! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथें!
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसें सांग साधेल मातें?"

असें देवी शारदेला आळवून सांगणारा कवि आपल्या एका उत्तम काव्यांत प्रधान-स्थानीं अर्थहीन असा शब्द मुद्दाम योजील हें मुळींच संभवत नाहीं.

त्याचप्रमाणें केशवसुतांनीं अगदीं सर्वस्वीं नवीन शब्द बनवून वापरलेले आढळत नाहींत. त्यांच्या काव्यांत कित्येक ठिकाणीं रूढ शब्द धात्वर्थानें योजिलेले आढळतात; तर कोठें वाचकांना फारसे परिचित नसलेले शब्द अथवा परिचित शब्दांचीं विकृत रूपेंहि कोठें वापरलेलीं आढळतात. उदा. 'लाडीगुडी', 'युव्यानें', 'इथतिथें', 'गवतारू (झोंपडी)', 'न यो (न येवो)', 'हातसुख', 'हम्बारव (हम्बरडा)', 'झालाहे (झाला आहे)', 'तेजाळ' इ.

'झपूर्झा' हा शब्द अपरिचित अथवा वरील 'नयो' सारखा विकृत स्वरूपाचा असला पाहिजे, व तो तसाच आहे.

सहज दृष्टीस पडलेल्या गोष्टींच्या दर्शनानें केशवसुतांना अनेकदां काव्य-स्फूर्ति होत असे, असें त्यांच्या कवितेवरून दिसतें.

'नयनांला न दिसते! नभीं वा
पाताळीं लपलि धृतधारा न कळते!"

अशी त्यांची 'खानावळींतील धृतधारा' बहुधा संस्कृत काव्योदधींतून वहात आलेली असून तिचा उगम

'क्व गता न जाने। दिवं गता वाथ भुवं गता वा॥'

या परंपरेंत असावा. 'परंतु गांवीं गेलेल्या मित्राची खोली पाहून', 'निजलेल्या मुलीस पाहून', 'वातचक्र' आणि 'म्हातारी' या कविता प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टींवरूनच सुचलेल्या असाव्यांत; आणि 'झपूर्झा' काव्याचा उगमहि अशाच एका प्रसंगांत आहे.

"धरा जरा निःसंगपणा,
मारा फिरके
मारा गिरके
नाचत, गुंगत म्हणा म्हणा
झपूर्झा! गडे झपूर्झा!"

या कवितेंत वर्णिलेली स्थिति अनुभवण्यास ऐहिक उपाधींचा विसर पडला पाहिजे, निःसंग बनून आपल्याच तालांत गुंगून गिरके घेत, फिरके मारीत नाचत राहण्याइतकी मनाची अवस्था पोहोंचली पाहिजे. 'झपूर्झा! गडे झपूर्झा!!' असें म्हणून नाचणाऱ्या व्यक्ति पाहून केशवसुतांना ही कविता गाण्याची स्फूर्ति झाली त्याहि अशाच देहभान विसरून नाचत असतात! त्या व्यक्ति म्हणजे फुगड्या घालीत असलेल्या लहान मुली!

'झपूर्झा' हा झिम्माचाच एक प्रकार आहे. हातांचे तळवे एकमेकांसमोर करून, उभे राहून, क्षणांत जवळ येऊन, क्षणांत एकमेकींना हातांच्या तळव्यांनीं दूर लोटीत गिरक्या घेऊन, पुनः सामोरें होत नाचणाऱ्या मुलींच्या चित्तवृत्ति त्या फुगडींतच पूर्णपणें तल्लीन झालेल्या असतात. फुगडींतल्या नृत्याला ताल म्हणून त्या तोंडानें नुसत्या 'पकवा' घालतात किंवा 'जा! पोरी जा! जा गडे जा!' असें शब्द एकमेकींना तळहातांनीं लोटतांना झपाट्यानें उच्चारतात. 'जा! पोरी जा!' असे फार जलद उच्चारतांना पहिल्या 'जा' या अक्षराचा व 'री' अक्षरांचा अत्यंत ह्रस्व उच्चार झाल्यामुळें त्या शब्दांचा उच्चार 'ज-पू-र्जा' असा होत असून जोरानें बागडतांना किंचित् श्वास लागल्यामुळें 'झपूर्झा'! असा उच्चार होतो. हीच काय ती 'झपूर्झा' या महामंत्राची व्युत्पत्ति!

(मनोरंजन—जानेवारी १९२०)
७–८

७

केशवसुतांची कविता

लेखक : वैजनाथ काशीनाथ राजवाडे, एम्. ए.

लेखांक पहिला

या संग्रहांत १२६ कविता असून त्यांचे (१) भाषांतरें, (२) आत्मवृत्त, (३) सृष्टिवर्णन, (४) कवि व काव्य, (५) शृंगार, (६) सुधारणा, (७) तत्त्वज्ञान, (८) नित्युपदेश व (९) स्फुट असे नऊ ढोबळ वर्ग पडतात. ढोबळ म्हणण्याचें कारण या वर्गांतील विषय परस्परांहून अगदीं विलग नसून त्यांची भेसळ झाली आहे; शृंगार इतर बऱ्याचशा वर्गांत आढळतो व सृष्टिवर्णनहि आत्मवृत्त वगैरे इतर वर्गांत आलें आहे. सोयीसाठी हे वर्ग केले असून प्रत्येक वर्गांतील कविता अजमावून पहाण्याचा या लेखाचा उद्देश आहे.

(१) **भाषांतरें**– कालिदास, भारवि, शेक्सपिअर, ड्रमंड, हंट्, हुड आणि पो यांच्या कवितांचीं, त्यांचीं नांवें नमूद करून, केशवसुतांनी भाषांतरें किंवा रूपांतरें केलीं आहेत. याखेरीजहि कांही कविता भाषांतर किंवा रूपांतरवजा असून फक्त तसें म्हटलेलें नाहीं. संस्कृत कवींचीं भाषांतरें फारच साधारण झालीं आहेत, व एकदोन ठिकाणीं चुका झाल्याशा वाटतात. 'प्रस्थानभिन्नां न बबंध नीवीं' (श्लोक ९) 'नीवीं त्वरेने फिटलीं तिचें कीं' एवढ्याने भाषांतर पुरें होत नाहीं. शिवाय कालिदासाच्या प्रत्येक शब्दांत अर्थ असतो, तो पद्य-भाषांतरांत आणणें अशक्य आहे;

पुरा अर्थ आणण्याला गद्यच पाहिजे. 'निसर्गदुर्बोध क्व भूपतिनां चरितं (किराता. सर्ग १ श्लोक ६) 'तीं दुर्बोध निसर्गसिद्ध, चरितें कोठें नृपांचीं बरें ?' येथें निसर्गसिद्ध याचा चरितें ह्या शब्दाशीं अन्वय होतो, दुर्बोध याशीं होऊं शकत नाहीं; पण तसा पाहिजे आहे; शिवाय 'निसर्गसिद्ध दुर्बोध' हें 'निसर्गदुर्बोध' यांचें वाईट भाषांतर आहे. मुळांत नसलेले असे शब्द किंवा अर्थ भारवीच्या भाषांतरांत सांपडतात. शब्दशः भाषांतर पद्यांत करणें फार कठीण, किंबहुना अशक्य आहे. हुडच्या

'As in her breast the wave of life
Kept heaving to and fro'

या ओळींचें 'तीचे वक्षी आयुष्याची लाट हेलकावते खालवर' असें भाषांतर बरोबर नाहीं; कारण श्वासोच्छ्वास फारच मंद, कमजोर होता; लाट जर खालवर हेलकावते तर श्वासोच्छ्वास जोराचा पाहिजे. भाषांतर मुळाहून फार कमी दर्जाचें आहे. हंटच्या Genny Kissed Me यांचें भाषांतर चांगलें आहे. शेक्सपिअरच्या चतुर्दशिन्यांचीं (Sonnets) भाषांतरें यांहून सरस झालीं आहेत.

'Unless this miracle have might
That in black ink my love may still shine bright.'

ह्यांतील मजेदार विरोधाभास–

'परंतु एक सुचते आहे मला योजना
काळ्या शाईमध्यें प्रियेस अपुल्या मी कागदीं ठेवितों;
तेथें अक्षयरूपिणी सतत ती राहो असें इच्छितों.'

या भाषांतरांत मुळींच आलेला नाहीं; 'कागदीं' या शब्दानें तर घाण झाली आहे. या दोन ओळींचें भाषांतर फार नेभळें झालें आहे.

'माझ्या अस्थि जरी' हें 'If thou survive'चें भाषांतर बहुतेक मुळासारखेंच हृदयंगम झालें आहे. तीच प्रीतीची भाषा, तीच विनवणी. '**प्रीति आणिक तूं**' (७७) ही शेक्सपिअरच्या चतुर्दशिन्यांच्या धर्तीवर आहे. ही वरच्याप्रमाणेंच हृदयंगम आहे. केशवसुतांनीं भाषांतर केलेल्या चतुर्दशिन्यांच्यामध्यें हिला अग्रस्थान दिलें पाहिजे.

'**कामांधत्व**' (२२). शेक्सपिअरकालीन व तदनंतरच्या कवितेंत कोटच्या केलेल्या आढळतात; त्यांचा हा एक मासला आहे. मुळांतील एकदोन शब्दकोटच्या भाषांतरांत उतरल्या नाहींत.

'**माझें ठेउनि चित्त घे**' (६०). हें भाषांतर नसलें तरी टीपेंत दिलेली कविता शेक्सपिअरच्या कृतीसारखी दिसते व त्याला (६०) हें उत्तर आहे व तेंहि एखाद्या आंग्ल कवितेचें भाषांतर असावेंसें वाटतें. टीपेंतली कविता उत्तरापेक्षां कांहींशी सरस आहे. दोन्हीमध्ये अर्थाच्या कोटच्या आहेत; यांत प्रेमापेक्षा बुद्धिमत्तेची चमत्कृति दिसते. या कविता शेक्सपिअरच्या नसल्या तरी शेक्सपिअरच्या तऱ्हेवर आहेत. शेक्सपिअरच्या या भाषांतरांना चतुर्दशिनी वृत्ताची जोड दिली नाहीं हें यांत गौण आहे. इतर आंग्ल वृत्तांप्रमाणें कवीला चतुर्दशिनी वृत्त चांगलें साधतें याची साक्ष २४, ६६, ६७, ७७, ९९, १०२, १०३, १०४ या कवितांत उत्तम मिळते. मुळाप्रमाणें भावनेचा तोच ओघ, तोच चढउतार व विषयविभाग दिसून येतो. शेक्सपिअरच्या सर्व चतुर्दशिन्या केशवसुतांनीं त्याच वृत्तांत भाषांतरल्या असत्या, तर महाराष्ट्र वाङ्मयांत एक मोठी कामगिरी बजावल्यासारखी झाली असती.

२३ व २४ या ड्रमंडच्या चतुर्दशिन्या होत. ' Doth then the world go thus ' याचें 'जायाचें जग कां असेंच' हें भाषांतर चुकीचें आहे; कारण त्याने जगाचें नश्वरत्व सूचित होतें; 'जगाची हीच का रहाटी' असा मुळांतला अर्थ आहे. एकंदर भाषांतर साधारण आहे.

'**हें हो पुस्तक रम्य**' (२४). हें फार चांगलें भाषांतर झालें आहे.

'चिरवियुक्ताचे उद्‌गार' याच्या दोन मांडण्या (१०२ व १०३) केल्या आहेत; दुसरी फार फार सरस उतरली आहे. या दोन व १०४ या कोणच्या तरी आंग्ल कवितांचीं रूपांतरें असावींत असा भास होतो. तिन्ही कविता उत्तमामध्यें–मोडतील.

यांखेरीजहि आणखी कांहीं कविता आंग्ल कवितांचीं भाषांतरें असावींत; जसें '**जास्वंद व पारिजात**' (२०), '**दिवा व तारा**' (६४), '**समुद्राकडे पहात असलेल्या एका तरुणीस**' (१८)– कांहीं आंग्ल कवितांच्या अनुकृति आहेत.

'**मदन आणि मदनिका**' (१९) ही J. Lylye च्या 'Cupid and Campaspye'चें भाषांतर आहे. मुळांतील सर्वच कल्पना भाषांतरांत आल्या नाहींत व मदनासंबंधी युरोपीय कथा संस्कृत कथांहून भिन्न असल्यामुळें सर्व कल्पना आणणें अशक्य आहे. उदाहरणार्थ 'His mother's doves and teams of sparrows' याचें भाषांतर 'दोनहि चक्रवाक आपुले' यानें करावें लागलें; कारण संस्कृतांत मदन हा मनसिज आहे, त्याला आई नाहीं, बाप नाहीं. हनवटीची खळी वगैरे कल्पना परकीय आहेत, तरी परकीय वाटत नाहींत. भाषांतर सरस झालें आहे.

(२) **आत्मवृत्त**–'**एक खेडें**' (१३). यांत कोंकणांतील सृष्टीचें वर्णन हुबेहूब केलें आहे. खेड्यांतील राहणारांची केलेली स्तुति वस्तुस्थितीला धरून नाहीं. खेड्यांत रोगराई नाहीं, तेथील लोक प्रामाणिक, त्यांना उद्यांची काळजी नाहीं, ते

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वकाम
अनुक्रम ७१६६३ वि: निबंध
क्रमांक २०२१ वर्ग वि: १७३।५७

मनोविकारांना बळी पडत नाहींत, त्यांना जगांत काय चाललें आहे याची वार्ताहि नसते, व जाणण्याची इच्छाहि नसते हें म्हणणें कितपत खरें आहे ? हीं वर्णनें आंग्ल तऱ्हेवर आहेत.

'**गोष्टी घराकडील मी वदतां गड्या रे**' (१६). ही वर्डस्वर्थच्या 'The Reverie of Poor Susan' यासारखी आहे. हींहि कवीचा घराकडील ओढा, आणि तेथील प्रत्येक वस्तूबद्दल व माणसाबद्दल प्रेम उत्तम तऱ्हेनें दिसून येतें; कवीचें अंतःकरण फार प्रेमळ व कनवाळू होतें यांत संशय नाहीं.

'**नेऋत्येकडील वारा**' (९३). या वाऱ्यानें परिचित असा कोंकणांतील सर्व देखावा कवीपुढें उभा रहातो. उंच डोंगर, खोल नद्या, रानें, जुने किल्ले, पाटस्थळें, व त्यांजवळील नारळीसारखीं झाडें, खैरांसारखीं रानझाडें, कवीचें जन्मस्थान, समुद्र यांचीं वर्णनें काव्यायोग्य आहेत. त्या वाऱ्याने आईबाप वगैरेंचे आशीर्वाद, कांतेने वारंवार केलेल्या आठवणी, तिचीं गोड भाषणें हीं कवीच्या मनांत येतात. यांतहि कवीच्या प्रेमळ व कनवाळू अंतःकरणाची तीच साक्ष पटते. तूं मोठा कवि होणार असें जन्मकाळीं वनदेवता म्हणतात, यावरून आपण वाग्देवीसुत आहोंत अशी कवीची खात्री होती; या खात्रीला कविकृतींत भरभक्कम पुरावा आहे. प्रेमांत सुखहि आहे, दुःखहि आहे. जीवित हें शोक-संकुल नाटक आहे असें कवीचें या वेळीं ठाम मत झालें होतें.

'**आईकरितां शोक**' (१०५). आईसंबंधीं आपलें कर्तव्य आपण बजावलें नाहीं याबद्दल कवीचें मन हळहळतें. शोकोद्‌गार असूनहि ही कविता सामान्य आहे. कवीच्या कोमल अंतःकरणाखेरीज हींत दुसरें कांही नाहीं. '**आई आई**' (३६) ही कविता जरी आत्मवृत्तांत येत नाही तरी आईचा मुलाकडे व मुलाचा आईकडे ओढा कसा असतो यांचें हींत हुबेहूब चित्र आहे.

'**दुर्मुखलेला**' (११). हींत शिक्षकानें दुर्मुखलेला वगैरे शब्दांनीं कवीबद्दल भर वर्गांत तिटकारा दर्शवून त्याला खजील करण्याचा प्रयत्न केला, त्याबद्दल कवीने त्याची खरड काढली आहे व 'या माझ्या दुर्मुखांतून सरस्वती वहाणार आहे' असा त्यास टोमणा दिला आहे. अशा आचरट तोंडाळ शिक्षकांना कवितेंत गोंवणें म्हणजे त्यांचा एक प्रकारचा गौरव करणें होय. मूर्खांची वाचालता अशा शिक्षेने थोडीच कमी होणार आहे ! त्यांचें वाक्पटुत्व व हातचलाखी अशीच चालणार ! '**पंतोजी**' (२८). हींतहि मारक्या शिक्षकावर असाच ताशेरा झोडला आहे. अशा शिक्षकांना शाळांतून काढून खडी फोडायला लावलें पाहिजे ! पशु बेटे ! दोन्ही कवितांत संताप व निर्भर्त्सना भरली आहे. पण जाड कातडीच्या शिक्षकांना त्यांचें काय ! (३६) प्रमाणें हीहि आत्मवृत्त–प्रकरणांत येत नाहीं.

या प्रकरणांत कवीचें कोमल अंतःकरण, स्वजन व स्वकाम यांविषयीं सतत

जागरूक असें प्रेम, परिचित कोंकण-सृष्टि-सौंदर्याची आवड व स्वबुद्धिमत्तेची जाणीव, या गोष्टी स्पष्टपणें उमटल्या आहेत. सगळ्यांत '**नैर्ऋत्येकडील वारा**' (९३) ही कविता फारच वरच्या दर्जाची आहे; तिच्या खालोखाल '**गोष्टी घरा-कडिल मी वदतां गडचा रे**' (१६).

(३) **सृष्टिवर्णन**–'**सूर्योदय**' (२). सूर्यप्रकाश म्हणजे सूर्याच्या घोड्यांनीं पायांनीं उदयगिरीवरची उडवलेली धूळ, लता-फुलांनीं सूर्याची पूजा करतात, सूर्य पृथ्वीला करजालानें कवटाळून आपलें तेज हाच गुलाल, फुललेले वृक्ष हे तिचा केशपाश, त्यांत फेंकतो, या सगळ्या जुन्या संस्कृत कवींच्या कल्पना; त्यांत नवीन कांहीं नाहीं. सूर्यतेज, लतांनीं केलेली पूजा व सूर्यानें फेंकलेला गुलाल पाहून मी सूर्याला वंदन करतों. येथें पहाण्याचा व वंदनाचा काय संबंध ? कविता सामान्य आहे.

'**सृष्टि आणि कवि**' (६). सृष्टीचें गाणें, मेघाचे शब्द व पक्षांचें कूजित– त्याच्यापुढें कवीच्या गाण्याची काय मातवरी ! तिच्या वृष्टिरूप अश्रुंपुढे व रात्रीं वहाणारें मंद वारें हाच तिचा श्वास त्याच्यापुढें कवीनें ढाळलेल्या अश्रूंचा व टाकलेल्या सुस्कार्‍यांचा काय पाड ! सृष्टि ही मूळची कल्पना; तिचें गाणें, रडणें, सुस्कारा टाकणें याहि कल्पना; त्यावर उभारलेली इमारत ! हा केवळ कविसंप्रदाय होय, त्यांत तथ्य किती असणार ! मेघनाद, पक्षीकूजित, वृष्टि, मंद वारें यांपासून आनंद होतो; कवितांपासूनहि आनंद होतो, एवढेंच काय तें साम्य; त्यांत अमकें कमी व अमकें जास्त हें कशावरून ठरवावयाचें ? कवीनें आपल्याकडे कमीपणा कां घ्यावयाचा ?

'**अढळ सौंदर्य**' (९). रोज रोज उगवणारा सूर्य तोच; पण त्याचे कर– (किरण) तेच कशावरून ? झाडें तींच, लता त्याच, तेच गाणारे पक्षी असें वर्षानुवर्ष म्हणतां येणार नाहीं. सृष्टिसौंदर्यानें झालेल्या कालच्या आनंदांत व आजच्या आनंदांत फरक असूं शकेल. अनुसंधान करणारा आत्मा मात्र एकच. सृष्टि जशी सुंदर तशी कुरूप, भयंकरहि म्हणतां येईल. कविता सामान्य आहे.

'**सृष्टि आणि कवि**' (१५३). कवि रानावनांत फुकट हिंडतो, असें म्हणणें बरोबर नाहीं. ओढे, ढग, फुलें, पक्ष्यांचे ध्वनि यांत जें गूढ आहे तें सृष्टि कवीला दाखविते व तें तो काव्यांत गोंवतो. शेतांतून बैल एक प्रकारचें पीक आणतात; त्याच शेतांत कवीला निराळें पीक मिळतें. यांत अरसिकाला चांगला टोमणा मारला आहे. पण अरसिकालाहि विचारतां येईल, कीं जगाचें पोषण कशानें होत आहे ? फोल कल्पनांनी जीवितयात्रा चालेल काय ? 'आधी पोटोबा, मग विठोबा.' ही कविता फार चांगली आहे.

'**विकसन**' (२७) हींतलें व्यंग फार मनोरम आहे. कुमारिकेनें भित्रेपणा सोडून सौंदर्यानें जग जिंकून टाकावें हें तिचें कर्तव्य, हा तिचा स्वभावसिद्ध हक्क. मोहनी लपवून ठेवण्यांत काय अर्थ ? ही कविता फार चांगली आहे.

'**पुष्पाप्रत**' (४०). फूल आपला सुवास पसरून घाण मारुन टाकतें, प्रीतीचें मूळ चारुता हें जगास शिकवितें, मधमाशीला मध देऊन किंवा लोकांचें मन रमवून परहित साधावें असें जगाला सांगतें, कोमेजून नाहींसें झाल्यावरहि रसिकांच्या चित्तांत व कवीच्या काव्यांत राहून अमर होतें. शेवटली कल्पना वर्डस्वर्थच्या कवितेंत फार वेळां आली आहे. ही कविता साधारण आहे.

'**पुष्पाप्रत**' (६१). मुलें फुलांसारखीं सुंदर, सुकुमार, मधुर व हंसणारीं, फुलांचा हा स्वभाव कायम; पण मुलें मोठीं झालीं म्हणजे तीं काळजीनें व्यग्र होतात; आंसवें ढाळतात, त्यांना संसाराचा विटाळ होतो, त्यामुळें फुलांना शिवणेंसुद्धा जड वाटतें. फूल पहांटेस उमलून त्यावर कोंवळें उन पडतें, वारा त्याला झोके देतो, पांखरें गाणीं म्हणतात, त्याचा परिमल जिकडे तिकडे फांकतो. कालाचेंहि त्याच्यापुढे कांहीं चालत नाहीं; कारण फूल नेहमीं तरुण, नेहमीं रुचिर. त्याचें सौभाग्य गावयाला मनुष्य अपात्र, तें भुंग्यांनींच गावें. एकच पुष्प जर नहमीं सुंदर, मधुर वगैरे असतें तर हें म्हणणें खरें होतें; फुलें कोमेजतात, नाहींशीं होतात, काळाला तींहि वळी पडतात. उगाच कल्पना लढवून रडण्यांत काय अर्थ ! ही सर्व आंग्ल तऱ्हा, बुलबुल युगेंच्या युगे जगतो, चंडोल हा इहपर दोन्ही स्मरतो वगैरे कीटस्, शेली यांनीं लढविलेल्या कल्पना; यांतून तत्त्व काय निघणार ? ही कविता चांगली आहे.

'**भृंग**' (४१). सकाळीं सृष्टींत अरुणतेज, धुकें व अंधार; कवीच्याहि चित्तांत कांहीं प्रकाश, कांहीं अंधार, म्हणून सृष्टि ही कवियित्री; कळ्या या तिच्या कल्पना; त्यांतील सुगंध तो काव्यरस. भुंग्याचें गाणें तें सृष्टीचें कवन, भुंगा हाच खरा गाणारा; मी केवळ गणमात्रा जुळविणारा; आमचें गाणें खऱ्या गाण्याला चिंध्यादानासारखें. भुंग्याचें गाणें परमानंदानें परिपूर्ण, सृष्टीशीं तन्मय. जग दुःखमय. सौंदर्यांतहि आम्हांला दोष दिसतात. भुंग्याला त्याचें भान नसतें, त्याला दुःख, अश्रु माहीत नाहींत. फुलांतला रस चाखणें हा त्याचा व्यवसाय. त्याला सगळीकडे प्रेम, सौंदर्य, आनंद आढळतो. या कवितेवरहि वरील कवितेवर केलेल्या टीकेप्रमाणेंच टीका करतां येईल. भुंगे कीटक शोधतात, त्यांना भीति, दुःखें आहेत, ते आपलपोटे असतात, हें कवि विसरतात. ही कविता चांगली आहे.

'**फुलांची पांखरण**' (५६). या कवितेची किंमत गाण्यावर आहे. त्यांतील काव्य फार अल्प आहे. कविता साधारण आहे. '**फुलपांखरूं**' (६२). मला पांखरूं धरून दे म्हणून लहान बाळचा म्हणतो, बहीण नाहीं म्हणून म्हणते. याचीहि किंमत गाण्यावर आहे. कविता साधारण आहे.

'**फुलपांखरूं**' (१०१). कवीचें चित्त जसें या विषयावरून त्या विषयावर जातें, किंवा मुग्धेचें चित्त जसें पतिसहवासस्वप्नांवरतीं वावरतें, तसें फुलपांखरूं या फुलावरून त्या फुलावर जातें. त्याचें भ्रमण निर्वेध, त्यामुळें आम्हांला त्याचा हेवा.

त्याला उद्यांची काळजी नाहीं; नेहमीं फुलांत वसती; त्याला कडक उन्हाचा अनुभव-सुद्धा नाहीं. सगळें मरणाधीन हें म्हणणें खोटें; कारण हें पांखरुं मेलेलें कोणीं पाहिलें आहे? याला उत्तर पुष्कळांनीं पाहिलेलें आहे. फुलपांखराला भय नाहीं, मरण नाहीं हें म्हणणें खोटें आहे. ही कविता चांगली आहे.

'**फुलांतले गुण**' (७४). फुलांचें सौंदर्य पाहून मनुष्य संसारताप विसरतो. फुलांचें जीवित दुसऱ्याकरितां. फूल कोमल, हंसणारें, तेजस्वी; त्याचा वास सगळ्यांना वेहोष करतो. फुलांत गाणें आहे म्हणून मी फुलांत शिरतें असें मधमाशी म्हणते. हे गुण उचलणें हें कवीचें काम. ही कविता चांगली आहे.

'**पर्जन्याप्रत**' (५८). पृथ्वी करपून गेली, चारा नाहीं, पाणी नाहीं; वेडूक तुला हांका मारताहेत; तर हे पर्जन्या, लंकेवरून ये. पांखरांनी तूं येणार म्हणून आधींच तयारी केली आहे. काजवे चकाकत आहेत; मुंग्या उडूं लागल्या आहेत. शेतकरी वाट पहात आहेत. म्हणून वादळावर बसून, लाटा झोडीत हे मेघराजा ये. वर्णन चांगलें. कविता आंग्लपद्धतीवर आहे. ही कविता फार चांगली आहे.

'**संध्याकाळ**' (६९). सूर्य समुद्रांत गुडुप होत आहे. त्याच्या छटा ढगांवर पसरल्यामुळें ते फार खुलत आहेत. पांखरें घरट्याकडे परतत आहेत; गाई वांसरांकडे धांव घेत आहेत, समुद्र किनाऱ्यावर हिंडणाऱ्या तरुणांचें लक्ष घरीं वसलेल्या आपल्या स्त्रियांकडे लागून ते आनंदित दिसतात; स्त्रियाहि पति लवकर घरीं येणार व कोमेजलेलें प्रीतिकुसुम विकास पावणार म्हणून आनंदित होतात. पण घरापासून दूर असल्यामुळें मी मात्र उदास; पण मी तुमचा हेवा करीत नाहीं. संध्याकाळचें वर्णन आंग्ल, चांगलें. फक्त विरहभाषा अस्वाभाविक, हंसूं आणण्याजोगी. अल्पविरहसुद्धां सोसवत नाहीं तो मनुष्य कसला? ही कविता चांगली आहे.

'**वातचक्र**' (९४). पावसाळा संपून थंडी पडली, पिकें निघालीं, वादळाचें कारण उरलें नाहीं. आतां वारे मजेनें खेळत आहेत, चाकावर बसून वरवर गिरक्या घेत आहेत. धुळीचे कण, पिसें, गवताच्या काड्या, वाळलीं पानें त्यांच्यावरोबर उडताहेत. असा सृष्टीचा भोंवरा चालला आहे. मनुष्यानें शब्दांची घाण केली आहे, त्यांत राम नाहीं. शाप मारीत नाहीं, आशीर्वाद तारीत नाहीं. म्हणून शब्दांनींहि या वाऱ्याबरोबर वरवर जाऊन ताजें व्हावें; व मीहि पवनचक्रावर चढून गिरक्या घेत वर जावें; कारण मीहि एक जगद्द्रुमाचें वाळलें पर्ण आहें. कविता अत्युत्तम. सृष्टि-वर्णन व वैराग्य याचा चांगला मिलाफ झाला आहे.

कल्पना जरी वस्तुस्थितीला बिलकुल धरून नाहींत, जरी त्यांत असत्याचा बराच अंश आहे, तथापि या प्रकरणांतील बऱ्याच कविता उत्तम साधल्या आहेत. '**वातचक्र**' (९४), '**पर्जन्याप्रत**' (५८), '**सृष्टि आणि कवी**' (१२३), '**विकसन**' (२७) या पहिल्या प्रतीच्या कविता. त्यांच्या खालोखाल '**पुष्पाप्रत**'

(६१), '**भृंग**' (४१), '**फुलपाखरं**' (१०१), '**फुलांतले गुण**' (७४), '**संध्याकाळ**' (६९); '**म्हातारी**' (९८) या कवितेला कित्येक अग्रस्थान देतील; पण आमच्या मतें ही कविता दुसऱ्या वर्गांतच येईल.

(४) **कवि व कविता** : '**कविता आणि कवि**' (७). कवीच्या कृतींतले दोष काढणें हें महत्पाप असें कवि समजतो. आम्ही लोकांमध्यें वहावा व्हावी म्हणून कविता रचीत नाहीं; आनंद आमच्या पोटांत मावत नाहीं म्हणून आम्हीं गातों; उत्तम कविता पाहिजे असेल तर कविता अशी असावी, तशी असावी म्हणून आम्हांस सांगूं नका; आम्हांला मन मानेल तसें गाऊं द्या.

या अभिमानाला एकच प्रश्न. कविता प्रसिद्ध कशाकरितां करतां? उत्तम कवि व काव्य ही तरी निवड कोणीं करावी? मी उत्तम कवि, माझी कविता निर्दोष असें शेक्सपिअर, कालिदास, होमर यांच्यासारखे अग्रगण्य तरी म्हणूं शकतील काय? ही कविता सामान्य आहे.

'**पटवर्धन कवि**' (३२). यांत पटवर्धन बालकवीची फार प्रशंसा केली आहे. सामान्य लोकांना जें दिसत नाहीं किंवा ऐकूं येत नाहीं तें कवीला दिसतें व ऐकूं येतें. त्याला सर्व खुलें. तो लोकांना श्रेष्ठ ज्ञान देतो, अशी कवींची वाखाणणी केली आहे. यांतील बालकवीची लाजणाऱ्या नववधूशीं केलेली तुलना मनोरम आहे. ही कविता फार चांगली आहे.

'**सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि**' (४५). वरीलप्रमाणें हींतहि तोच आशय आहे. साधारण धोंड्यांतसुद्धा दिव्य भरलें आहे, तें बाहेर काढण्याला दिव्य दृष्टि लागते. ही कविता अत्युत्तम आहे.

'**क्षणांत नाहींसे होणारे दिव्यभास**' (७०). हें दिव्य कवींना नेहमींच दिसतें असें नाहीं; नेहमीं दिसेल तर पृथ्वीचा सुरलोक केव्हांच बनवितां येईल! ही मोहिनी पुढें उभी राहिली कीं दुसरें कांहींच सुचत नाहीं; पण संसारतापामुळें हा सहवास कधी काळीं घडतो. ही कविता अत्युत्तम आहे.

'**दिव्य ठिणगी**' (४९). ही दिव्यदृष्टि मिळवायला सुखाला अंतरावें लागतें, अनंत दुःखें सोसावीं लागतात; तीं कां तर जगावर प्रेम म्हणून; स्वर्ग पृथ्वीवर आणणें हा हेतु; पण जनतेला त्याची काय जाणीव? कविकृतीला सामान्यजन लाथाडणारच! ही कविता उत्तम आहे.

'**स्फूर्ति**' (७९). ही दिव्यदृष्टि म्हणजे एक प्रकारची दारू. ही प्याल्यानें स्फुरण पावून कवीला जिकडे-तिकडे स्वर्गच दिसतो; रुढिबंधनांचा त्याला कंटाळा येतो; लोक काय म्हणतील याची त्याला पर्वा रहात नाहीं; स्फूर्तीच्या जोरावर उड्डाण करून तो स्वर्गांतून पृथ्वीवर रत्नें फेंकून देतो; कोण त्याला अडविणार! देव-

दानवांचा त्याच्यापुढें काय पाड? मनुष्यनिर्मित ते मनुष्याला किती अडविणार! व पृथ्वीचें रूप पार बदलून टाकणार? खरी जोरदार कविता. अत्युत्तम, अत्युत्कृष्ट.

'**प्रतिभा**' (११६). हें स्फुरण चढलें म्हणजे दैत्याचें बल व देवांचें सत्त्व अंगात शिरतें; आत्मा मुक्त होऊन त्याला कशाची गुमान रहात नाहीं; तो ब्रह्ममय होतो; शब्दब्रह्मामधून भविष्यवाद निघतात, स्वतः ब्रह्मदेव व इतर देव सृष्टीची नवीन रचना करण्याला कवीचें सहाय्य घेतात. केवढी ही कवीची बढाई! ही कविता अत्युत्तम आहे.

'**कल्पकता**' (५३). भूदेवीला मोहक रूप कोणीं दिलें? या स्फूर्तीनें, प्रतिभेनें, कल्पकतेनें. आरंभीं हें जग, ही पृथ्वी अगदीं कुरूप, अगदीं बेढब, खाण्यापिण्यांत गुंतलेली. पण स्फूर्तिदेवीनें एक अपूर्व वस्त्र विणलें, त्यांत सूर्य, चंद्र, तारा, विजा, ढग, पाऊस, इंद्रधनुष्य, लाटा, धबधबे असे नाना प्रकारचे सृष्टिचमत्कार भरले व तें वस्त्र भूला नेसावयास दिलें, त्याबरोबर काय चमत्कार! भू तरुण दिसावयास लागली व आतां स्वर्ग मला वरण्याला स्वतः येईल, अशी तिची खात्री झाली. उत्तम.

'**भाव आणि मूर्ति यांचें लग्न**' (१०८). जेथें अगदीं सामसूम तेथें ध्यान नांवाचा कुंज आहे. त्याच्या तोंडाशीं मूर्ति नांवाची उपवर मुलगी उभी आहे व तिचे शेजारीं भावशर्मा उभा आहे. स्फूर्तीच्या कुंडांत जीविताचा होम करून कवीचा आत्मा त्यांचें लग्न लावतो. मग तीं दोघें ध्यानकुंजांत शिरून नानाविध क्रीडा करतात, व त्यांना पुष्कळ सुरेख मुलें होतात. तीं मुलें म्हणजे कवीच्या कल्पना. ही कविता '**सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि**' (४५), '**दिव्य ठिणगी**', (४९), व '**कवि**' (५५), यांच्यासारखी आहे. टांकीचे घाव घालावेत तेव्हां मूर्ति बनते (४५), स्फूर्तिज्वालेला वळी द्यावा लागतो (४९), जीवित्वसंहारक वायु आंत घेऊन मग पोषक वायु कवि जगाला देतो (५५), कवि जगाला मज्जेचीं फुलें देतो (५५), तसेंच स्फूर्तीच्या कुंडांत जीवित्वाचा होम करावा लागतो (१०७). उत्तम कल्पना उगाच सुचत नाहींत. बहुत काल सुखाला आंचवून ध्यानस्थ बसावें लागतें, तेव्हां काव्यस्फूर्ति कदाचित् होते. स्फूर्तीमुळें नानाविध कल्पना सुचतात. प्रत्येक वस्तूंत दिव्य भरलें आहे, ही श्रद्धा किंवा भाव. हें जें दिव्य जगाला सगुण रूपानें मूर्तिमंत दाखवलें पाहिजे तें दाखवायला स्फूर्तीचें प्रतिभेचें साहाय्य लागतें. तेव्हांच कविकल्पना जगाला पटतात व रुचतात. प्रतिभा अगर स्फूर्ति, भाव किंवा श्रद्धा, आणि ध्यान, या त्रिकुटीनें कवि-कल्पना अस्तित्वांत येतात. सर्व धर्मांत ज्या देवदेवता आहेत त्या कविकल्पना होत. राम-सीता, राधा-कृष्ण, जीजस-मेरी यांच्याविषयीं ज्या नानाविध कल्पना आहेत, त्यांच्यावर आलेले प्रसंग, त्यांच्या लीला, त्यांनीं केलेले चमत्कार कवींच्या डोक्यांतून– मग ते कवी लहान असोत मोठे असोत, लोकांना माहीत असोत– नसोत– निघाले आहेत. इलिअड, महाभारत हीं काव्यें असंख्य कवींच्या डोक्यांतून निघालीं आहेत.

कवींच्या डोक्यांतून उत्पन्न होणाऱ्या कल्पना चिन्हांनीं, रूपकांनीं या कवितेंत दाखविल्या आहेत. तुतारी, गोंफण, स्फूर्ति वगैरे त्या त्या कल्पनांचीं चिन्हें किंवा मूर्ति होत. या कवितेचा अर्थ कांहींसा गूढ आहे. ही रचण्यास स्फूर्तीपेक्षा बुद्धीला बराच प्रयास करावा लागला असेल. कविता उत्तम आहे.

'**दूर कोठें एकला**' (१०९). कवि खिन्न होऊन रानांत एकांतीं एकतारी छेडीत होता व वेडेंवांकडें गात होता; तथापि मन तल्लीन झालें व कवि तानसेनसारखा गाऊं लागला; रात्र झाल्याचें भानहि राहिलें नाहीं. इतक्यांत एक तारका 'धन्य बंधो, मी तुझ्या गाण्यानें खूष झालें आहें; आजपासून तुझें माझें भावा-बहीणीचें नातें' असें स्मित करून म्हणाली. 'मी तर काजवा, तुझ्याशीं माझें कसलें साम्य ? मजमध्यें किती तरी अंधार सांचला आहे' असें कवि उत्तर देतो. 'तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी' असें म्हणून ती त्याचें समाधान करते. तानसेनाशीं व कलहंसाशीं केलेल्या उपमा चांगल्या आहेत. कविता चांगली आहे.

'**काव्य कोणाचें ?**' (८३). कवितेंतली कल्पना, हृदयंगम पंक्ति, वर्णन वगैरे वाचून कोणी एक कवीला 'धन्य तूं' म्हणून म्हणाला; त्यावर कवीने उत्तर दिलें, 'मी लिहिलें खरें, पण माझें नव्हे; शारदेनें जसें सांगितलें तसें मी लिहिलें. जिच्यायोगें फुलांत सुवास, इंद्रचापांत रंग, त्याच्या शक्तीनें हें काव्य रचलें ! कवि स्वतःला जेव्हां विसरतो तेव्हां उत्तम कविता निपजते. रचीन म्हणून कविता रचली जात नाहीं. स्फूर्तीचे क्षण थोडे. कविता चांगली आहे.

'**शब्दांनो ! मागुते या**' (६३). 'तद्दोषौ शब्दार्थौ सगुणौ काव्य' असें मम्मटानें काव्याचें लक्षण केलें आहे. 'रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यं' या लक्षणानें जगन्नाथानें शब्दाला प्राधान्य दिलें आहे. अर्थ काव्ययोग्य असेल, पण त्याला योग्य शब्दांची जोड मिळाली नाहीं तर तें काव्य नव्हे. हाच अर्थ या कवितेंत आहे. शारदेचा देव्हारा तेजस्वी शब्द गगनांतून नेतात, व कवि आढळला, कीं त्याच्या हृदयांत तो देव्हारा ठेवतात. तेव्हां कवि आपल्या हृदयांतील नानाविध कल्पपुष्पें खुडून शारदेला वहातो. काव्यांत कवि इतका गुंगून जातो, की त्याला गद्याचा तिटकारा येतो व तो व्यवहार विसरतो; त्यामुळें जग त्याच्यावर रुसतें व कोणी त्याच्याकडे लक्ष देत नाहीं; त्यामुळें स्फूर्ति मंदावते व काव्यभाषा आठवत नाही; भाषा नाहीं तर शारदेची पूजाहि नाहीं. हे शारदे, योग्य शब्द पाचार; तेणेंकरून 'बहर मम मनीं नूतन येईल फार'. कल्पना फारच उत्तम. कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट.

'**कवि**' (५५). कवि मज्जेचीं फुलें पृथ्वीवर पसरतो, त्यानें पृथ्वी कनकित होते. त्याचा आवाज ऐकून तिला वाटतें, कीं लक्षसंख्य कान असतील तर बरें. त्यानें नजर वर फिरविली तर गगन खालीं लवतें व तारा गावयास लागतात. आम्हांला सजव असें सर्व वस्तु त्याला म्हणतात. आपला प्राण खर्ची घालून तो जगास पोषक

वायु देतो. जोंपर्यंत त्याचें पृथ्वीवर वास्तव्य तोंपर्यंत देव तेथें हिंडावयास येतात व तो जर मेला तर ते त्याला धुंडाळावयास लागतात. मज्जेला त्रास देऊन जगाचें कल्याण करणारे कवीशिवाय इतरहि होऊन गेले व त्यांनीं जगाचें खरें हित साधलें; व्यर्थ वडबड केली नाहीं. कवीचें हें महात्म्य फार थोडयांना पटेल. कविता फार चांगली.

'**धुमकेतू आणि महाकवि**' (७८). वाट चुकून तुम्ही दोघे इकडे कां येतां? तुम्ही खास जड नाहीं, कारण ब्रह्मांडांत तुम्ही हवातसा संचार करतां; केंद्र सोडून निश्चित फिरतां; स्वयंप्रकाश असें भविष्य सांगण्याकरितां तमांत शिरतां; जगांत कधींकाळीं येतां; तुम्हीं श्रेयोरूप आहांत यांत शंका नाहीं.

शेंडेनक्षत्र पाहून सामान्य लोकांना भय वाटतें, इतकेंच नव्हे तर मोठमोठे ज्योतिषीसुद्धां बुचकळ्यांत पडतात, व तें आपल्या पृथ्वीवर आदळून तिचा नाश होतो कीं, काय अशी त्यांना भीति वाटते. शेंडेनक्षत्र श्रेयोरूप, तें तमाचा नाश करावयाला येतें असें कोणी म्हटलें नाहीं व म्हणणार नाहीं. शेंडेनक्षत्र, सूर्य, चंद्र, वगैरे जड नाहींत असें शास्त्रज्ञ म्हणत नाहींत. शेंडे नक्षत्रांची उत्पत्ति कोणी सांगूं शकत नाहीं. त्यांचें केंद्र कोणतें? हीं नक्षत्रें कधीं काळीं येतात, एवढें मात्र खरें; तरी अमका धूमकेतु अमुक वर्षांनीं येणार असें ज्योतिषांना गणिताच्या सहाय्याने सांगतां येतें, तसें महाकवींविषयीं सांगतां येत नाहीं. वाल्मीकि, कालिदास, होमर, शेक्सपिअर, डान्टे वगैरे कवि कां निर्माण होतात व त्यांच्यासारखे पुष्कळसे महाकवि कां निर्माण होत नाहीं हें गूढ अजून कोणाला उकललें नाहीं. देशकालाचा त्यांच्यावरहि परिणाम होतो. कितीहि मोठा कवि असला तरी त्याला आपला देशकाल विसरून स्वतंत्रपणें लिहितां येत नाहीं. तथापि त्यांनाच उत्तम ग्रंथ कां रचतां यावेत, आणि त्यांच्या भावाबंधांत प्रतिभेचा लेश नसावा याचें विवरण कोणाला करतां येत नाहीं. इतर महापुरुषांविषयीं असेंच म्हणतां येईल. नेपोलियन, अकबर, शिवाजी, बुद्ध, महंमद वगैरे संबंधानें तरी कुठें उलगडा आहे? हें कोणच्या तरी आंग्ल कवितेचें भाषांतर असावेंसें वाटतें. कविता उत्तम आहे.

'**आम्हीं कोण?**' (९९). आम्हीं देवाचे लाडके व त्याने आम्हांस सर्व जग खेळावयास दिले आहे. प्रतिभाशक्तीनें आमचा सर्वत्र अप्रतिबंध संचार; दिक्कालांतून आमची दृष्टि आरपार जाते. पृथ्वीवरील सर्व बडिवार आमच्यापुढें फिके; आम्हीं त्यांना खरें सौंदर्य देतों. तुम्हीं फोल पाखडितां; आम्हीं सत्त्व निवडतों. देव आम्हीं निर्माण करून अवकाशांत बसविले, पृथ्वीला स्वर्गसाम्य आम्हीं दिलें; आमच्या कवितांमधून अमृत सदा पाझरतें. आम्ही शरण्य, आम्हांला सर्वांनीं शरण यावें. आम्हांला वगळा– तारा निष्प्रभ होतील, जिणें कवडीमोल होईल.

आपल्या धंद्याची कोण बडेजावी गात नाहीं? कवि नसते तर जगाचें काय झालें असतें? आनंदाचा एक झरा अस्तित्वांत नसता, तर अतिशय मनोहर अशा मनोराज्याला आपण मुकलों असतों. कवीला तत्त्व दिसतें हा केवळ पोकळ अभिमान.

तत्त्वज्ञांना तें कळलें आहे असें तरी कोणीं म्हणावें ? कवि शब्दांचें चित्र काढून मन रंजवितात व कधीं कधीं आनंदाची पराकाष्ठा अनुभविण्यास देतात एवढें खरें ! पण हें काम गाणारे, वजावणारे, चितारी, मूर्तिकार हेहि करतात. कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट आहे.

'**कवितेचें प्रयोजन**' (३७). सर्वांना खावयाची मारामार, पण तुम्हांला गाणें कसें सुचतें असें लोक कवीला विचारतात. कवींची अशी निर्भर्त्सना व्हावी हें पाहून कवीला खेद होतो. काव्याला पूर्वी काय महती ! आतां त्याची बूज कोण करतो ? राजे लोकांनीं जें ऐकून माना डोलावल्या, लहानथोर गुंगून वेडावून गेले, त्याला हल्लीं मान नसेल तर नसो; पण त्याची आम्हांला जरूर नाहीं म्हणतां ? अरे, आमच्या गाण्यानें तुम्हांला स्फुरण येईल; उद्योगाविषयीं तुम्हीं जास्त उत्सुक व्हाल; व हल्लींच्या दुरवस्थितींतून पार पडण्यास मदत होईल. हातीं निशाण घेऊन आम्हीं आघाडीं जातों; तुतारीनादानें आम्हीं प्रेतें उठवूं. गतवैभवाची तुम्हांला आठवण देऊं. समाजांतून आळस जात आहे याची खूण आमचें गाणें. आम्हीं आपल्याला शीण देऊन तुम्हांस ताजेतवानें करतों. समाजांत स्फूर्ति उत्पन्न झाली आहे तिचें कारण काव्य नसून लोकाग्रणींची खटपट होय. कविता उत्तम आहे.

या प्रकरणांतील बऱ्याच कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट झाल्या आहेत. वर टीका केल्याप्रमाणें यांत सत्य जरी थोडें आहे तरी कारागिरी उत्तम आहे यांत संशय नाहीं. असत्यापासून सत्य निर्माण होतें असें आचार्यांचें म्हणणें, त्याची सत्यता या कवितांत पटते.

केशवसुत उत्तम कवि आहेत याची साक्ष या प्रकरणांत हवी तितकी आहे.

'**कविता आणि प्रीति**' (४३). फिरावयाला गेलों असतांना एका रम्य ठिकाणीं हारीनें लावलेलीं झाडें, सदा वहाणारें पाण्याचे पाट, मध्यें हिरवेचार माळ व बाजूनें लता, फुलांवर भुंग्यांचे थवे, गात असलेले पक्षी, स्वैर हिंडणारीं हरणें, पिसारा उभारून डौलानें चालणारे मोर, मध्यें नृत्य करणाऱ्या युवती व फुलें, तारका, दंव यासारखीं मनोहर अशीं नाचणारीं बागडणारीं मुलें पाहून मन रमून गेलें व पुढें पाऊल पडेना; तेव्हां बरोबर असणारा मित्र म्हणाला, कशांत गढून गेला आहेस ? मीं त्याला उत्तर दिलें, आपल्या मनालाच तें विचार. त्यावर तो म्हणाला, कवितेनें तुला अडविलें वाटतें ? नाहीं, मीं म्हटलें, प्रेमानें मला भुलविलें, तें मला हलूं देत नाहीं.

एकरूप सौंदर्य, प्रीति व कविता यांचा क्रम मोठ्या मनोरम रीतीनें येथें दाखविला आहे. जेथें विविध सौंदर्य एकवटलें आहे, तेथें सहृदयाचें मन गुंतलेंच पाहिजे व मनांत प्रेम जागृत झालें पाहिजे. प्रेमापासून कविता, तें नसेल तर कविता कोठून ? कविता फार चांगली आहे.

'**प्रीति**' (१२४). प्रीति विकत किंवा उसनी मिळत नाहीं. ती बागेंत किंवा

शेतांत उगवत नाहीं. नंदनवनांत कल्पलतेला बहर आला, तेव्हां तिचीं बीजें हृदयांत पडलीं; त्या बीजांतून प्रीतीचा जन्म. प्रीतीनें प्रीति संपादली जाते. आलिंगन, चुंबन वगैरे प्रीतीचीं बाह्यचिन्हें. तिचा खरा निवास हृदयांत. कविता अत्युत्तम आहे.

लेखांक दुसरा

(५) **शृंगार (संभोग)** : '**नाहीं ज्यापरि**', (१२). साखरेकडे डोंगळा, साईकडे मांजर, दह्याकडे कृष्ण जसा धांव घेतो, तसा तुझ्याकडे मी धांव घेईन; भिक्षुक जसा दक्षिणा, तापकरी गंगाजळी, हंस भिसे तांतडीनें घेतो, तसा मी तुला निजकरीं घेईन. मलयानिल जसा वनिकेला, किंवा धाराधर पर्वतीला, किंवा आकाश मेघपंक्तीला कवटाळून धरतो, तसा मी तुला कवटाळीन. मद्यपी जसा कुपी झोंकतो, भुंगा कमलिनीला चोखतो, राहू सुधा पितो, त्याप्रमाणें मी तुझी ओष्ठवटिका चुंबीन.

जिच्यावर इतकें प्रेम ती लहान मुलगी असावी असें वाटतें. तरुणीच्या बाबतींत 'तैशी घेइन मी तुला निजकरीं तारे त्वरेनें बरें' ही भाषा शोभणार नाहीं. ह्यांत विनोद भरला आहे; तेव्हां शृंगारांत ही कविता येऊं शकत नाहीं. प्रेम किंवा वात्सल्य या सदरांत तिचा समावेश केला पाहिजे. कविता फार चांगली आहे.

'**समुद्राकडे टक लावून पहाणाऱ्या एका तरुणीस**' (१८). 'हे सृष्टीच्या वरतनु सुते! हे निसर्गोद्यानींचे अमृतलतिके!' या लहरी मनोराज्याच्या कल्पनांप्रमाणें किंवा शरीरांतल्या नाड्यांप्रमाणें दिसतात. सूर्य अस्ताला जात आहे, धरणिवनितेला सोडून जातांना तो आपला राग (लाली) तिला दाखवीत आहे. सूर्यप्रकाशानें रंगलेले हे ढग देवांगनांच्या क्रीडाशैलांप्रमाणें किंवा देव आणि त्यांच्या स्त्रिया यांचीं केलिद्वीपें दिसतात. संसार दुःखमय, पदोपदीं अन्याय, मनुष्यांनीं मनुष्यांची केलेली पायमल्ली हें सर्व पाहून पृथ्वीचा वीट येतो व देह समुद्रांत टाकून त्या द्वीपावर जावें असें वाटतें. मग आपल्या देहांना अश्रूंचा विटाळ होणार नाहीं; त्यावर समुद्रांतील फणिपतिसुता आंसवें ढाळतील; प्रवाळाच्या शय्येवर मोत्यांची चादर पसरून त्यावर आपलीं शरीरें ठेवतील; माझा बाहु तुझ्या डोक्याखाली व तुझा हात माझ्या गळ्यांत ठेवून आपले पाय गुंतवतील व तोंड तोंडाला चिकटवितील. पृथ्वीवरील लोक जरी या प्रकारचें आपलें शयन पाहून नाकें मुरडतील व नांवें ठेवतील तरी समुद्रस्थ लोकांना तें स्वाभाविक वाटेल. मूर्ख मनुष्य मात्र हे स्वाभाविक नियम सुधारूं पाहतो. तुझा तो कबरीपाश व नेसण्याचा थाट पाहून त्यांचें अनुकरण करावेंसें तेथील स्त्रियांना वाटेल, कदाचित् त्या आपल्या देहांना सजीव करतील; तसें झालें म्हणजे आपण दोघें समुद्रांत

इकडे तिकडे संचार करूं. तेथल्या जमिनींत प्रवाल व मोत्यें पिकतात. सोन्याच्या झाडांवर रत्नांचीं फळें लटकतात. समुद्रपृष्ठावर वसून कोंवळें ऊन खाऊं; शिडांप्रमाणें वस्त्रें धरून हवें तसें हिंडूं. तूं देवमाशावर वसलीस म्हणजे तो पाण्याचे फवारे उडवील व इंद्र तुझ्यावर आपलें धनुष्य पसरील. जर लढाऊ जहाजें परस्परांचा नाश करण्याला तयार होतील, तर वरुणाला सांगून तीं जहाजें आपण बुडवून टाकूं. गुलाम विकत घ्यावयाला जाणाऱ्या गलबतांना खडकांवर आदळून फोडून टाकूं व मालकांना समुद्राचा तळ दाखवूं. नंदनवनांत कधीं संचार, तर कधीं सुरनदींत मज्जन याप्रमाणें आकाशांतील द्वीपांवरहि नानाप्रकारचे भोग भोगूं.

ही कविता एकाद्या आंग्ल कवितेचें भाषांतर असावेंसें वाटतें, असें भाषांतर प्रकरणांत म्हटलेंच आहे. गुलामांचा व्यापार, लढाऊ जहाजें, वगैरे या कवितेंतील कल्पना आंग्ल आहेत. या कवितेंत बरेच दोष आहेत. पाय गुंतवून सुख भोगण्याची कल्पना वाईट आहे. पृथ्वीवर जर प्रवाल, मोत्यें तेवढीं पिकलीं तर मनुष्य खाईल काय ? आकाशांतील मेघरूपी द्वीपें, समुद्रांतील नागिणी सर्वच काल्पनिक. देह जर समुद्रांत तर नुसती प्रेतें समुद्रांत भोग कसें भोगणार ? आकाशगंगेंत मज्जन करणारे कोणचे देह ? कोणीतरी हताश झालेल्या आंग्लकवीनें ही वेडगळ कविता लिहिली असावी. मुळांतच दोष, तेव्हां भाषांतर करणाऱ्यास दोष देणें बरोबर नाहीं.

'**समृद्धि आणि प्रीति**' (३०). लक्ष्मीचे माहेरघरीं जेथें कांचनमंदिरें संपत्तीनें कोंदलेलीं आहेत, बागा नंदनवनांहून सरस, सगळ्या भोग्यवस्तु तयार, तेथें आपण जाऊन राहूं चल; फक्त तिथें स्त्रियांना सीताशापानें मज्जाव, असें एक दुसऱ्याला म्हणतो. तेव्हां दुसरा उत्तर देतो, समजा स्त्रियांना मज्जाव नसता तरी मी तेथें गेलों नसतों. मज्जाव आहे तर मुळींच जाणार नाहीं. श्रमानें मिळविलेलीं फळें कांतेला दिल्याशिवाय जर मला रुचत नाहींत, तर श्रम केल्याशिवाय मिळणारीं फळें—— आणि जवळ कांता नाहीं—कशीं रुचतील ? भयाण रान, कडे वांकणें, कांटे, हिंस्त्र पशु यांनीं भरलेलें, मला पसंत; कारण मी कांटे झाडीन, पशु मारीन, किल्ले बांधीन, तिच्याकरितां वेळेला प्राणहि खर्चीन; लतांची जाळीं आम्हीं परिधान करूं व अशा नरकांतून स्वर्ग-सुद्धां काढूं. कल्पना फार उत्तम. हें आंग्लकवितेचें भाषांतर असण्याचा संभव आहे. कविता अत्युतम आहे.

'**प्रियेला सादर केलेली पुष्पमाला**' (५०). कवि रमणीय वनांत हिंडत असतांना प्रीतीची दर्शक अशी फुलांची माळ गुंफून प्रियेस अर्पण करावी असें त्याला वाटतें. फुलांची भाषा ही प्रीतीची भाषा. सुवर्णाचे अलंकार हे लौकिकाकरितां, केवळ कर्तव्य म्हणून केलेले. प्रीतीला जोर अलौकिक कृतीनें येतो. या कवितेंतील कांहीं उपमा विनोदपर आहेत. कविता फार उत्तम आहे.

'**कवीच्या हृदयीं**' (५). कवीच्या मनांत जशीं मधुर वचनें, किंवा गाणाऱ्याच्या

मनांत ताना, तसे तुझ्या सौंदर्याचे विकास माझ्या मनांत घोळतात. भुंगा जसा गुंजारवानें मधावरील किंवा कोकिळ गाण्यानें वसंत शोभेवरील आपली आसक्ति दाखवितो, तसा माझा चित्तव्यापार तुझ्यावरील माझी आसक्ति दर्शवितो. ह्या उपमा नेहमींच्या उपमांपेक्षां कांहींशा नवीन आहेत. कविता फार चांगली.

'**फार दिवसांनीं भेट**' (८६). अलिंगनानें उमाळा आला, त्यामुळें प्रियेच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिली; पतीच्या हृदयावर डोकें ठेवून ती रडूं लागली; तोहि उसासे टाकीत व चुंबन घेत टिपें गाळूं लागला. विरहदशेंतील परस्परांची दीनदशा आठवून प्रेमग्रंथी दृढ झाली. त्यांच्यानें बोलवेना; पण जे थोडे शब्द बाहेर पडले त्याचा सारांश पुनरपि वियोग होऊं नये. झालाच तर त्याच वेळीं मरण आलेलें बरें. कविता फार चांगली.

'**प्रणयकथन**' (९१). कृतीनें जरी प्रेम व्यक्त होतें, चंदनाची उटी, हारतुरे जरी ती स्पष्टपणें दाखवितात, तरी त्यांच्यांत प्रिया, जिवलगा ह्या शब्दांइतकी स्पष्टता नाहीं. अशा वेळीं लोक काय म्हणतील ही भीति सोडलीच पाहिजे. झरी सरोवराला किंवा नदी समुद्राला भेटावयाला जातांना आवाज करीत जाते; समुद्राची लाट किनाऱ्यावर येतांना, हवा गिरीवर वहातांना घोष करिते, तेव्हां तूं मौन कां धरावें ? हात जड; त्यांच्या भेटींत प्रेम कसें व्यक्त व्हावें; शिंपींत समुद्र मावेल काय ? याच्या उलटहि म्हणतां येईल. शब्दांनीं प्रेम कधीं व्यक्त होत नाहीं; त्याला कृतीच पाहिजे. (पहा कविता ११९). यांतील व १२ व ८५ यांमधील उपमा केवळ स्त्रीलिंगी व पुल्लिंगी नामांवर अवलंबून. वसंतशोभा, झरी, वनिका, पर्वती यांच्याबद्दल वसंत, झरा, वन, पर्वत हे शब्द घातले, कीं संपल्या उपमा. कविता फार चांगली आहे.

'**प्रीतीची भाषा**' (११९). कोणाची सखी तूं, कोणाचा सखि मी, असे निरनिराळे प्रश्न कवि प्रियेस प्रेमानें विचारतो, त्यांना उत्तर ती आपलें शीर्ष त्याच्या हृदया वर ठेवून, त्याचें चुंबन घेऊन व अशा अन्य क्रियांनीं देते. 'मला उत्तर दिलें नाहींस तर मी नाहीं जा तुझा' हे शब्द ऐकतांच तिला रडें येतें व त्याचें मन पस्तावतें.

येथें शब्दाच्या ऐवजीं कृतींनीं प्रेम दाखविलें आहे. (पहा कविता ९१). कविता उत्तम आहे.

'**मनोहारिणी**' (१२१). ती कोण ? सृष्टिलतेची अनुपम माधुर्यानें भरलेली कळी, तिला पाहिल्यानें वृत्ति तटस्थ होतात; तिचा गोरेपणा शशिकांतीला लाजवतो. विजेसारखी तिची लावण्यप्रभा. तिचें कपाळ पाहून केसांच्या छायेखालीं कोणी तारका विश्रांति घेत आहे आणि त्यामुळेंच त्या कपाळावर व डोळ्यांत विशेष तेज विलसत आहे. गालीं गुलाब पण त्याचे कांटे बघणाऱ्याच्या हृदयाला टोंचतात. तिचें मृदु हास्य व मधुर बोल पहावयाला व ऐकायला देवांचे डोळे व कान लुब्ध असतात. वक्षःस्थल व नितंब पीन, त्यानें तिचें सिंहकटीत्व फारच मोहक. यौवनाला बहर आल्यामुळें

बालपणाचा चपलपणा नाहींसा झाला आहे, व तिला गजगति प्राप्त झाली आहे. सौंदर्य व शालीनता यांनीं ती रामायणमूर्तिच भासते; उदात्त मुद्रा व गंभीर चर्या यांनीं भारतदेवता अशी ती वाटते. तिला पाहिल्यानें मन उल्हासित होतें; पण ती दृष्टिआड झाली कीं सर्व शून्य वाटतें. म्हणून ती मूर्ति आपल्या हृदयीं पहातो.

स्त्री-सौंदर्याचा हा एक नमुना होईल; सौंदर्याचे दुसरेहि नमुने असूं शकतील. काळा वर्ण, किंवा नाकाच्या टोंकाशीं किंचित् वक्रता, डोळ्यांचा निळेपणा, अशा गोष्टी असूनहि स्त्री सुंदर व मोहक असूं शकते. कवीलाहि नाना तऱ्हेच्या सुंदर स्त्रिया आढळल्या असतील. या कवितेंतील सौंदर्य संस्कृत तऱ्हेवर आहे; त्याचें वर्णन मात्र कांहींसें नवीन. फार चांगली.

या प्रकरणांतील अत्युत्तम कविता. '**प्रीति**' (१२४). उत्तम कविता, – '**समृद्धि आणि प्रीति**' (३०), '**प्रियेला सादर केलेली पुष्पमाला**' (५०), '**फार दिवसांनीं भेट**' (८६) '**प्रीतीची भाषा**' (११९) या होत. त्यांच्या खालोखाल '**प्रणयकथन**' (९१) व '**मनोहारिणी**' (१२१) या आहेत. '**नाहीं ज्यापरि**' (१२) हीहि उत्तमांपैकींच होय.

(६) **सौंदर्य**–'**बारतेरा वर्षांच्या एका निजलेल्या मुलीस पाहून**' (३९). तुझें मुख किती रम्य! त्यांत साधेपण, नम्रता, माधुर्य व शांति हे गुण स्पष्ट दिसतात. अजून तूं कुमारीच आहेस. म्हणूनच ही स्वर्गीय मुग्धता. एथें कोणीं नसते किंवा ही तुझा लय मोडण्याची भीति नसती तर मी तुझें खास चुंबन घेतलें असतें. मी तुला बहिणीसारखी मानतों. तुला पाहून माझें मन द्रवून गेलें आहे. त्याचें कारण तुला मी सांगतों. या जगांत तुझी दशा काय होईल या विचारांत मी गढून गेलों आहें. लवकरच ही कुमारीदशा जाऊन तिच्या जागीं लज्जालु असें तारुण्य येईल. स्वतःच्या सौंदर्यानें तुझे डोळे दिपून जातील. संसार गोड पाहून जन्मतःच मी संसारीं कां नाहीं पडलें असें वाटूं लागेल; पण जग सोडतांना तुला निराळाच अनुभव येईल. हल्लीचें अजाणपण जाऊन त्या जागीं कडु जाणतेपण येईल; हल्लींच्या समतोल मनोहर चेतोवृत्ति नाहींशा होऊन मन विकारवश होईल. पण तें राहो. माझी बहीण मी म्हणून तुला आशीर्वाद देतों, कीं, तुला सदैव सुख लाभो.

मुलें विकारवश नसतात हें म्हणणें खरें नाहीं; त्यांच्या वृत्ति चंचल असतात त्यामुळें त्यांचे मनोविकार फार वेळ टिकत नाहींत. निजलेलीं मुलें देवाच्या घरीं असतात ही लौकिक समजूत. मुलें देवासारखीं हीहि समजूत तशीच. ही कविता फार चांगली आहे. ही कविता शृंगारामध्यें न येतां प्रेयोरसांत येईल.

"**सुंदरीदर्शन**" (८४). हे सुंदरी! चित्र काढावयाला मला उत्तम मासला मिळाला म्हणून मला आनंद वाटतो. तुझी तनुलता शृंगाररसानें अगदीं भरून गेली

आहे. कवन करायला हा उत्तम मासला म्हणून तुझें नांव वगैरे समजावून घ्यावयाची मला उत्कंठा लागली आहे. ही कविता वरच्याप्रमाणें प्रेयोरसांत येईल.

'**रांगोळी**' (११५). रांगोळी घालतांना एका सुंदर मुलीला पाहून कवि तिचें स्तुतिपर वर्णन करतो. अंगण गोमयानें शिपडलें आहे, वर कोंवळें उन पडलें आहे. त्या बालार्कप्रमाणें सुंदर अशी एक मुलगी सूर्यचंद्र वगैरेंच्या आकृति काढीत आहे व गाणें गात आहे. त्या आकृति पाहून कवि म्हणतो, मीं नाना प्रकारचीं चित्रें पाहिलेलीं आहेत, उत्तम काव्यें वाचलीं आहेत, पण आतांच्यासारखा मला केव्हांहि आनंद झाला नाहीं. या तुझ्या रांगोळींतून दिव्यत्व, धर्मार्थकामप्राप्ति, पवित्रता, शोभा, प्रीति अशीं विविध तत्त्वें प्रगट होतात. तूं या देवांपैकींच एक आहेस असें वाटून तुझी सतत सेवा करावी असें वाटतें. या आकृति दुर्जनांना तुम्हीं येथून चालते व्हा, असें म्हणतात. पण सुजनांना 'आम्हांस पाहून आणखी शुद्ध व्हा', असा बोध देतात. अशी स्तुति कवींनींच करावी, कारण साध्या वस्तूंत अलौकिक असें त्यांनाच दिसतें. अतिशयोक्ति-शिवाय काव्य नाहीं असें मम्मट म्हणतो, त्याला आधार अशा कविता. ही कविता फार चांगली आहे. ही कविता प्रेयोरसांत येईल.

'**माझा अंत**' (४२). झाडावर वीज पडून जशी त्याची अवस्था होते तशी एका सुंदरीला पाहून माझी अवस्था झाली. सौंदर्य फुलासारखें म्हणतात, पण मला तें काटचांसारखें वाटलें. लोक सौंदर्याला अमृत समजोत; मला तें विषासारखें झालें; डोळे तारवटलें, ज्वर भरला, मी भ्रमिष्ट बनलों, शुद्ध गेली, मेलों. लोक विचारतात तूं कसा इथें? मी नव्हे. तें माझें भूत. स्त्री-सौंदर्याच्या अकस्मात् दर्शनानें मनावर होणारा परिणाम मार्मिक रीतीनें वर्णन केला आहे. ही कविता उत्तम आहे.

स्त्री-सौंदर्य व शृंगार यांचा निकट संबंध असल्यामुळें या सर्व कविता शृंगार-प्रकरणांत येतात.

(७) **शृंगार (विप्रलंभ)**–'**मुळामुठेच्या तीरावर**' (१७). मुळामुठेच्या कांठीं उभी राहून एक तरुणी रडत, स्फुंदत पाण्याकडे पहात आहे. ती केव्हां बसते, केव्हां पडते, केव्हां उठून गांवाकडे नजर फेंकते. वस्त्र फाडते, केंस उपटते. रानांत जाऊन फुलें तोडून आपल्या केसांत घालते व कांहीं पाण्यांत सोडते. असा वेडेचार पाहून तुजवर कोणाचा घाला पडला म्हणून कोणी तीस विचारतो. 'माझी तूं राणी हो, मी तुला सोन्यानें मढवून टाकतों. लष्करी अंमलदार असून मी जातिवंत श्रीमान् आहें.' असें तो म्हणतो तेव्हां आपल्या प्रियकराला उद्देशून ती म्हणते 'हे प्रियकरा, मला रानफुलें आवडतात म्हणून तुम्हांला कसें कळलें? उद्यां आपलें लग्न व्हावयाचें म्हणून रानांत फुलें आणण्याला इकडे आलांत पण त्या दरडीवर कां चढलांत? तेथें तुमचा पाय सरून तुम्हीं पाण्यांत पडलांत व बुडालांत. आतां मीहि तुमच्याबरोबर येतें' असें म्हणून ती दरडीवर चढते, फुलें खुडते, प्रियकराच्या नांवानें ती पाण्यांत सोडते व

आतां ही वांकली आहे तेव्हां खास पाण्यांत पडणार म्हणून तिला धरावयाला जों तो जातो तों ती आंत पडते व बुडते.

'मुळामुठेवर रान व दगड, येथें उद्यां लग्न होणार म्हणून एक तरुण फुलें तोडावयाला जातो वगैरे वस्तुस्थितीस धरून नाहीं. कोणत्या तरी आंग्ल कवितेचें हें रूपांतर केलें आहे. पण तें चांगलें साधलें नाहीं. ही कविता सामान्य आहे.

'**रुष्ट सुंदरीस**' (२८). मला नादीं लावून आतां मजवर कां रोष ? तूं माझें दैवत, मी तुझा भक्त; तुला प्रसन्न करण्याकरितां मी रात्रंदिवस झटलों आहें; व तूं मला उत्तेजनहि दिलें आहेस. पुष्कळ मेहनतीनें पुष्पमाला केल्या, अलंकार दिले, तरी तूं रुष्ट ती रुष्ट. तुझ्यावांचून हें जिणें व्यर्थ. प्रीतीला विषय नसेल तर जगण्यांत काय अर्थ ? मनुष्य मग विषसुद्धां खाईल. मीहि तसें करूं ना ? इतकीं जीं मीं तुजवर गाणीं केलीं ती भक्तीशिवाय केलीं ? माझी निष्ठा कसाला लावतेस काय ? किंवा तुझ्या कृपेला मी मुळींच पात्र नाहीं ? ही कविता फार चांगली आहे.

'**त्वत्प्रीतीस अपात्र**' (५१). रागावून मला जा निघून म्हणून सांगितलेंस तरी तें मी खोटें समजेन; कारण, खोटा राग आणण्याची तुला संवयच आहे. खरोखर मीं जावें अशी तुझी इच्छा असेल तर गळ्यांत हात घालून व हळूच चुंबन करून जा निघून म्हणून सांग; तें मला खरें वाटेल, व मी खास जाईन. ही कविता या प्रकरणांत घालावी कीं नाहीं हा प्रश्न आहे; कारण विप्रलंभाची नुसती भीति आहे. ही कविता फार चांगली आहे.

'**प्रियेचें ध्यान**' (४). कवि अभ्यासाकरितां पुण्याला जावयास निघाला तेव्हां होणाऱ्या वियोगानें दोन्हीहि नवरा-बायको गहिंवरतात, व कवि पुण्याला गेल्यावर तर दोघांना कांहींच सुचत नाहीं; एकमेक कशी रात्र घालवीत असतील, काळ कसा कसा कंठीत असतील ह्या विवंचनेंत दोघें जणें असतात, व दोघें सारखीं टिपें ढाळतात. दोघांना रतिकालचें स्मरण होतेंच; पण विशेष स्मरण होतें तें शेवटच्या रात्रीचें; दूर असतांनाहि त्या वेळचें कवीला स्मरण होतें व आपण घरींच आहों असें वाटून कवि तिचीं आंसवें पुसूं लागतो; फसगत झाली असें पाहून त्याला रुमालानें आपलेच डोळे टिपणें भाग पडतें.

विद्यार्थिदशा, रतिसुख व विरह– काय ही हिंदु विद्यार्थ्यांची दुःस्थिति ! अभ्यास कीं रतिसुख हा प्रश्न; हिंदु विद्यार्थ्याला रतिसुख किंवा प्रियासाहचर्य जास्त ? कर्तव्याची, जबाबदारीची जाणीव पार पळाली. विद्यार्थिदशेंत लग्न करणें हा पहिला गाढवपणा; दुसरा रतिसुखाचा व प्रियासाहचार्याचा अभिलाष. पुरुषपणा कोठें गेला ? 'स्वाभिमानावर, पुरुषपणावर माझी जास्त आसक्ति, नंतर तुझ्यावर.'

I could not love thee, dear, so much
Loved I not honour more

ही Lovelace ची उक्ति सर्वांनीं ध्यानांत ठेवली पाहिजे. विरहाकरितां रडत बसलां तर संसारयात्रा कशी चालणार ? देशकार्य कोणीं करावयाचें ? सुदैवानें असे विरहाग्नीनें जळणारे लोक थोडे. हिंदु, प्रेमळ, गृहाभिलाषी खरा, पण तोहि मेसापोटेमिया, आफ्रिका, युरोप, वगैरे ठिकाणीं बायकोमुलें मागे ठेऊन जात आहे. अभ्यासाकरितां सहा महिने घर सोडून पुण्यास रहातो, केवढा हा विरह ! बाजारांत गेला, ऑफिसांतून यायला लागला वेळ, झाली विरहव्यथेला सुरवात ! सृष्टि-प्रकरणांत 'संध्याकाळ' ही कविता आहे; तींत नवरे किनाऱ्यावर हिंडताहेत हें बायका पहात आहेत किंवा त्यांना ठाऊक आहे; तथापि दिवसा कोमेजलेल्या प्रेमपुष्पाला घरीं येण्यानें केव्हां टवटवी येईल अशी त्या सारखी अपेक्षा करीत असतात. काय या बायका, काय ते नवरे ! विषय जरी हास्योत्पादक तरी कविता चांगली आहे.

'**अपर कविता दैवत**' (१०). सरस्वती ही एक कविता दैवत, स्वतःची स्त्री दुसरी. तुझ्या ध्यानानें माझें मन बावचळतें व कविता रचण्याकडे धांव घेतें. कवितेंत आपल्या प्रेमाच्या गूढ गोष्टी प्रगट करून लोकांपुढें ठेवाव्या हें तुला बरें वाटतें काय ? बरें वाटत नसेल तर मला सुखविण्यास ये इकडे; मग तव स्तनीं स्वनखांनीं मी काव्यरचना करीन. माझ्या हृदयांत जो रसनिधि आहे व ज्याच्या काव्यें हीं लहरी होत तो तुला द्यावयाला मी उत्सुक आहें; घे तो आपल्या हातांनीं ओढून. हा मी तयार आहें, तूं कां घेत नाहींस ? मला कां दिसत नाहींस ? पण तूं दिसणार कशी ? मी तर अभ्यास करण्यासाठीं राहिलों आहें पुण्यास. तुला काय बोल ! कविता रचूनच मला मन रमविलें पाहिजे. भृंगा विदेशीं असतांना प्रियकळीला स्मरून गुंजारव करीत असतो; मीहि वियोगाचीं कवनें करून गात असतों.

टीका वरच्यासारखीच. स्तनांवर नखक्षतें करणें ही संस्कृत काव्यांतील कल्पना. भृंग्याच्या उपमेंत कांहीं तात्पर्य नाहीं. ही कविता फार चांगली आहे.

'**जरी तूं ह्या**' (८). आपण जर एके ठिकाणीं असतों तर किती बरें झालें असतें ! एकमेकांला दूर कधींहि जाऊं दिलें नसतें; पुनः त्या क्रीडा केल्या असत्या. प्रिये, कांते, असें कित्येकदां म्हटलें असतें किंवा तीं नांवें दांतानें तुझ्या अधरोष्ठांवर वठविलीं असतीं व तुला तीं वाचतां यावीं म्हणून तुझ्यापुढें आरसा धरला असता. पण आतां तीं नांवें लांकडी पेन्सिलीनें कागदावर लिहावीं लागताहेत. तींहि त्यामुळें पुरीं लिहवत नाहींत; लिहितांना हात थरथर कांपतो त्यामुळें तीं पुरीं लिहवत नाहींत. पुसावीं तर हात धजत नाहींत. तेव्हां आंसवांनीं भिजवून टाकतों झालें. दंतक्षतें हीं संस्कृत काव्यांतील कल्पना. टीका वरच्यासारखीच. कविता चांगली आहे.

'**प्रणयगीत**' (२६). तुझ्याशिवाय मला कांहीं प्रिय नाहीं. तूं माझें जीवित, तूं माझा आत्मा, तूं माझी शक्ति, दैवगतीनें दूर जावें तरी तुजकडे परत येणारच. विजेला सोडून मेघ पृथ्वीवर येतो, पण सूर्यकिरणांच्या रथावर बसून तो पुन्हां तिच्या-

कडे जातो. रवि पूर्वेकडे, गिरींवर जाऊन कालांतरानें पृथ्वीकडे येतो तसा मीहि तुजकडे येईन; कारण प्रीतीचा मार्ग वर्तुळ आहे. हें आंग्ल कवितेचें भाषांतर असावें. उपमा केवळ पुल्लिंगी, स्त्रीलिंगी शब्दांमुळें केवळ काल्पनिक. ही कविता फार चांगली आहे.

'**–व्रत**' (३३). निरोप घेतांना खुशालीचें पत्र लिहीन म्हणून म्हटलें. पत्र लिहावयाला लागलों. पण खुशाली कोठें आहे ? तूं माझ्या डोळ्यांचा प्रकाश, माझ्या आत्म्याचा विकास, माझी नाडी तुझ्या नाडींत, हृदय तुझ्या हृदयांत. आपली नाडी चांचपून पहा, छाती तपासून पहा, म्हणजे माझी प्रकृति कशी आहे तें तुला कळेल. ही कविता उत्तम आहे.

'**स्वप्न**' (४४). विरह नको, विरह असह्य, अशीं माझीं गान्हाणीं ऐकून प्रीतीनें मला हंसाचे पंख दिले व ते मी खांद्याला लावून अंतराळीं उड्डाण केलें व एक तेजस्वी तारा पाहून त्याच्यावर उतरलों. प्रियेला कसा आळवूं असा विचार करीत असतांना प्रिया एकदम तेथें आली. चार ओष्ठ व दोन वक्षस्थळें एकत्र झाल्यावर काय विचारावें सौख्याला ? पण दुर्दैवानें तारा पायांखालून निसटून गेला व मी घसरून पुनः पृथ्वीवर आलों. त्या धक्क्यासरशीं गुंगी पळाली व जे हंसाचे पंख म्हणून मी उडवीत होतों ते माझे हात माझ्या उरावर येऊन आढळले. कविता अत्युत्तम आहे.

'**चिरवियुक्ताचा उद्‌गार**' (६६). वृष्टीमागून जसा शरच्चंद्र, शिशिरामागून वसंत, सूतिक्लेशानंतर अर्भक, ओहटीमागून भरती, खग्रासानंतर तेजाचा प्रवाह, कृष्णपक्षानंतर शुक्ल, रजनीमागून प्रातःकाळ, कल्पांतानंतर सृष्टि, तसा विरहानंतर समागम. पण तो दैववान् मनुष्याला; माझ्यासारख्या दुर्भाग्याला तो काय होय ! ह्या उपमा मनांत आल्यानें माझी निराशा होते व विरह मला जास्त जाळतो. चतुर्दशिनीचें हें उत्तम उदाहरण होय. यमकांची आंग्ल तऱ्हेवर मांडणी; विचारओघहि तसाच. कविता अत्युत्तम आहे.

'**वियुक्ताचा उद्‌गार**' (१०२ व १०३). ह्यांपैकीं १०३ सरस आहे असें भाषांतर प्रकरणांत म्हटलें आहे.

वसुंधरेला गिरि चिकटून रहातो. वेळेला समुद्र, क्षितिजरेषेला आकाश, उत्तरेला ध्रुव, छायेला प्रकाश (चित्रकलेंत), आकाशगंगेला स्वर्ग, द्युतीला सूर्य, प्रकृतीला पुरुष हीं सुखी जोडपीं पाहून मनांत मत्सर उत्पन्न होतो. मी किती दुष्ट, कीं तुला सोडून मला दूर रहाणें शक्य होतें. १०३ त ह्याच उपमा निराळ्या तऱ्हेनें मांडल्या आहेत.

गिरि वसुंधरेला नेहमीं धरून रहातो; माझ्यासारखा दयितावियोग त्याला जाचीत नाहीं. समुद्र लहरीकरांनीं वेळेला आलिंगन देतो पण मला कांतेपासून दूर भटकावें लागतें. प्रकाश छायेशीं चित्रोल्लास करतो; तें त्यांचें संगमसौख्य पाहून मन वेडावतें. आकाश सुरधुनीला पोटाशीं धरतो; तें पाहून मत्सर मला दंश करतो मला इतका त्रास होतो, कीं डोळे झांकावे लागतात; तोंच माया-ईश्वर, प्रकृति-पुरुष

वाक्-अर्थ अशीं सुखीं जोडपीं मनापुढें उभीं रहातात. त्या त्रासानें पुन्हा डोळे उघडतों तों द्युतीसहवर्तमान सूर्य दृष्टीस पडतो; तेव्हां विरहाग्नी भडकतो व जिणें नकोसें होतें. प्रिये, तुजवांचून मला क्षणभरसुद्धां रहावत नाहीं.

पहिल्या मांडणींत उपमा एकामागून एक आल्या आहेत; दुसरींत प्रत्येकीचा कवीशीं संबंध दाखविला आहे. बाह्योपमा प्रथम दाखवून नंतर मानसगम्य उपमा दिल्या आहेत, व शेवटीं दृष्टिगोचर उपमेनें त्रेधा उडविल्यामुळें फारच बहार झाली आहे. ही मांडणी सरस, अत्युत्तम असें कबूल केलेंच पाहिजे. कवि स्फूर्तीनें केवल लिहितो, बुद्धिपुरस्सर तो कांहींच लिहीत नाहीं हें म्हणणें एकाच कवितेच्या कवि निरनिराळ्या मांडण्या करितात व पाठांतरें देतात ह्यावरून खरें ठरत नाहीं. बुद्धीला स्फूर्तीचें सहाय्य मिळतें एवढेंच. १०३ अत्युत्तम, अत्युत्कृष्ट. १०२ फार चांगली.

'**थकलेल्या भटकणाराचें गाणें**' (७६). तुझ्याशिवाय आतां किती दिवस मी राहूं? वय वांया गेलें. कांहीं सुचत नाहीं. कांहीं रुचत नाहीं. धैर्य खचलें. वणवण करीत जगांत हिंडवत नाहीं. तुझ्याकडे यावयाचे सगळे प्रयत्न व्यर्थ झाले. जगणें दुर्धर झालें आहे. फुलांनो, सरा एकीकडे, कांटयांनो, पसरा रस्त्यावर. उजेड नको, अंधार हवा. चांगल्याची हांव तुजकरितां. तूं लभ्य नाहींस तेव्हां चांगलेंहि नको. कपाळीं शूळ, हृदयांत कंडन, शरीरीं कंप, डोळ्यांत आंसवें, मनीं निराशा. ती मला भेटेल का व अपराधांबद्दल क्षमा करील का? ही कविता फार चांगली आहे.

'**घुबड**' (१००). 'पो'च्या (Poe) Raven या कवितेचा आधार घेऊन रचलेली ही कविता आहे.

अंधेरी रात्र नक्षत्रें लेऊन व हातीं नेत्र धरून आपला अम्मल चालवीत आहे व तिचा भाट चिंचेवर बसून आपल्या घुत्कारानें तिचा महिमा वर्णीत आहे. कवि खिडकींतून बाहेर डोकावून पहातो तों सर्वत्र शून्य; वनितानिधनानें अंतरात्म्यांतहि सर्व शून्य– एकटेपणाचा कंटाळा आला; पण घुबड म्हणतो 'ऊंहू– मी तुला सोबत' वा! छान सोबत! मला आला आहे माणसांचा कंटाळा. अंधारांत शोक करीत वसणें आवडतें– धीर द्यावयाला मला मित्र मिळाला! 'ऊंहूं' असें घुबड पुन्हां उत्तर देतो. 'नाहीं म्हणतोस? माझ्या दुःखानें तुझें हृदय द्रवत नाहीं काय?' पुन्हां घुबडाचें 'ऊंहूं'. हे प्रिये! आतां स्वर्गांत सुरांगना तुझी पूजा करीत असतांना मी तुला पाहीन काय?' 'ऊंहूं!' 'नाहीं? बरें तर मी नरकांत जाईन व यातना सोशीन. तुझा दिव्याकार मनापुढें सदा असेलच 'ऊंहूं' 'जा निघून येथून. माझी पक्की निराशा करूं नको. काळे कर.' 'ऊंहूं.'? मध्यरात्रीं भुतेंखेतें बाहेर निघालीं आहेत, वेताळ टेंभे पाजळून नाचत आहे. निराशेनें मी घेरलों आहें. या घुबडानें तर आपला घुत्कार सारखाच चालविला आहे.

घुबडाच्या घूंघूंला मनांतली विचारसरणी चांगली जुळविली आहे. 'पो'ची

कविता अगदीं साधारण; कित्येक तिला नुसता शब्दावडंबर म्हणतात; ती कविताच नाहीं असेंच त्यांचें म्हणणें आहे. 'अप्रतिम' हें विशेषण तिला कोणीहि लावणार नाहीं पण केशवसुतांची ही कविता मुळाहून कितीतरी उत्तम झाली आहे; कवीची काव्यकला उत्तम तऱ्हेनें येथें दृष्टीस पडते. येथें स्फूर्तीपेक्षां बुद्धीचीच कामगिरी जास्त आहे. 'अप्रतिम' हें विशेषण कवीनें दिलें असल्यास त्याच्या हातून हा प्रमाद झाला असावा. ही कविता अत्युत्तम आहे.

'**स्मरण आणि उत्कंठा**' (१०४). कवि व त्याची स्त्री एकमेकाला 'जातिलते" 'शुकराज' वगैरे शब्दांनीं संबोधीत असतांना तो तिला 'क्रीडासिंधूमधील तरी, असें म्हणतो. व ती त्याला प्रवीण 'नाविक' असें संबोधिते. त्यासरशीं प्रीति उचंबळते व दोघेंहि तींत मग्न होतात. तो प्रसंग आठवून उत्कंठा प्रदीप्त होते, झोंप येत नाहीं. त्यामुळें स्वप्नहि नाहीं व स्वप्नांत होणारें तिचें दर्शनहि नाहीं. ही चतुर्दशिनी फार चांगली.

'**फिर्याद**' (११०). वसंतांत एका लताकुंजांत बसलों असतांना एक सुंदर तरुणी तेथें आली, आणि माझें चुंबन घेऊन कानांत गाणें गुणगुणली. मी तल्लीन झालों, निर्वाणीं बुडालों, जगाची याद उरली नाहीं. शुद्धीवर येऊन पहातों तों ती तेथें नाही. तेव्हां विरहानलानें मी भाजून गेलों. तिच्या ध्यासानें रानोमाळ हिंडत आहें; वेळ घालविण्याला तिच्यावर गाणींहि करतों. अनुग्रह पुरा केल्याशिवाय कशी चालती झालीस? धांव, दया कर. स्वर्गांत भेटून कधीं कधीं ती मला स्वर्गाला नेते व नंतर खालीं ढकलून देते. संसारीं करमत नाहीं, धंदा सोडून वणवण फिरतों. सारखा तिचा ध्यास. निद्रा नाहीं. आप्त म्हणतात, कुठे ही ह्याला लागली व्याद, कोणाला ठाऊक! तुझ्या नादानें मी हीनदीन झालों आहें; तथापि त्याचा मला विषाद नाहीं. या दासाची तूं अजून बूज केली नाहीस, म्हणून खेद वाटतो. माझें चित्त हरून मला दूर कां ठेवतेस? तुझ्या चरणांचें मी नित्य स्मरण करतों. हो प्रसन्न. तूं मला वेडें केलेंस; तुझ्यावर माझी फिर्याद. ही कविता उत्तम आहे.

'**वियोगामुळें**' (१११). जर माझ्याकडे कोणी पाहील तर मी ध्यानस्थ असें कोणाच्याहि मनांत येईल. माझ्या मनोरूपी देव्हाऱ्यांत तूं बसली आहेस. तुझें ध्यान हें मन करीत आहे; त्यामुळें सर्व जग त्याला शून्यवत् भासतें. नक्षत्रें, फुलें, सोनें, मोत्यें, रवि-शशी वगैरेशीं मी तुझी तुलना करतों, पण सर्व मला फिकीं भासतात. सुधासुद्धां आवडत नाहीं. तोंडांत जसा इक्षुखंड तसे स्मरणांत तुझे गुण. इक्षुखंड एखादे वेळेस नीरस वाटेल, पण तुझे गुण सदा गोड. तुझ्याविषयींच्या माझ्या कल्पना, लहान मुलें जशी आपला आंगठा चघळीत असतात, तसा मी चघळीत असतों. इच्छा ही, कीं, तुझी मूर्ति एकदां दृष्टीस पडावी. हे जिवलगे! वियोगामुळें मी अगदीं वेडापीर झालों आहें.

मन हा देव्हारा, तेंच मन देव्हाऱ्यांतील मूर्तीचें ध्यान करतें ही कल्पना वरोवर नाहीं. चतुर्दशिनी उत्तम आहे.

'**अहा पक्षी**' (२१). पक्षी समुद्र ओलांडून जातात. त्यांचे पंख जर मला मिळाले तर कमल वगैरेकडे न जातां रूपचंद्रिका अशी जी माझी चंद्रिका तिच्या ओठांचें चुंबन घेऊन मग मी सुखानें मरेन. ही कविता उत्तम आहे.

'**कचाप्रत देवयानी**' (११२). कच व देवयानी यांनीं एकमेकांला शापिल्यानंतर देवयानी ययातीशीं लग्न लावते अशी पौराणिक कथा आहे. या कवितेंत आजन्म मी तुझा ध्यास करीत व दुःख करीत राहीन असें ती म्हणते असें दाखविलें आहे. माझें प्रेम इतकें तुजवर असून शेवटीं मला सोडून दिलें ना ? शापानंतर रागानें तूं तडक निघालास, तेव्हां मी तुजकडे पाहिलें; परंतु डोळे पाण्यानें भरल्यामुळें तुझा आकार मला दिसेना. तुला टोंचून जें मी बोललें तें मला आतां टोंचत आहे. मदनासारखा तुझा आकार आतां मला कोठें दिसणार ? आशेनें मनांत पुष्कळ भावी सुखें आणिलीं. तीच आशा निराशेचें अंडें घालून पंख झाडून निघून गेली. तुझी आठवण देणाऱ्या अशा कित्येक वस्तु येथें आहेत; पण आतां रडून मी आकांत करतें तरी तुला दया येत नाहीं मला कांटा बोंचला तरी तुला कळवळा येत असे.

शोका ! आतां तुला मी वरतें. कचा ! तुला मी कां दोष द्यावा ? माझ्या बापाच्या पोटांत तूं होतास म्हणून तूं माझा भाऊ, तरीहि माझें मन तुझ्यावर आसक्त होतें तें होतेंच. तुझी अक्षमाला व मृगाजिन घेऊन तप साधावें असें मला वाटतें ! आतां मला लग्न करणें नको. रत्नाला मुकल्यावर कांचेला कोण भुलेल ? हे करुणासिंधो बंधो ! वाईट बोललें, शाप दिला. तें सर्व विसरून जा. पण तुला बंधो म्हणतांना मनाला कितीतरी खेद होतो.

आर्यावृत्ताची रचना बहुतेक मोरोपंतांसारखी आहे. प्रयत्न फार चांगला साधला आहे. ही कविता उत्तम आहे.

'**राजा शंतनु**' (११३). शंतनु मृगयामिषानें गंगेची भेट घ्यावयाला जातो व म्हणतो, " हे गंगे ! सगळ्यांचा ताप तूं हरण करतेस, माझा मात्र ताप तूं वाढवतेस. 'तुमच्या मुलाची मी बायको होईन' असें माझ्या बापाच्या मांडीवर बसून तूंच ना त्याला सांगितलेंस ? मी देव नाहीं म्हणून का तूं माझा अव्हेर करतेस ? माझ्या वंशांत इंद्रतुल्य राजे होऊन गेले आहेत. मला धीर धरवत नाहीं. प्रगट हो. तुझी मूर्ति मला दिसूं दे."

ही कविता अपुरी राहिली आहे. पंताच्या चालीवर आहे. आर्यावृत्त चांगलें साधलें आहे. कविता चांगली आहे.

ह्या प्रकरणांत '**स्वप्न**' (४४). '**चिरवियुक्ताचा उद्‌गार**' (६६ व १०३), '**घुबड**' (१००) ह्या अत्युत्तम कविता होत; त्यांत १०३ हीस अग्रस्थान दिलें

पाहिजे. त्यांच्या खालोखाल '–प्रत' (३३), 'फिर्याद' (११०), 'वियोगामुळें' (१११) ह्या होत. चतुर्दशिन्यांचीं उत्तम उदाहरणें ६६, १०४ व १११ ह्या कविता आहेत.

अमकी एक स्त्री मिळत नाहीं किंवा ती आपल्याकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहीं किंवा तिनें आपला कायमचा त्याग केला ह्यामुळें कांहीं सुचत नाहीं, जग सोडावेंसें वाटतें, जगणें नकोसें होतें वगैरे विचार पुरुषपणाला किती शोभतात हा अलग प्रश्न आहे. पत्नी मेल्यावर दुःख होणें स्वाभाविक आहे; कदाचित् ती जिवंत असतांना तिचा कायमचा किंवा दीर्घकालीन वियोगहि असह्य होईल. पण तिच्याकरितां जग सोडणें हा केवळ आप्पलपोटेपणा किंवा स्त्रीलंपटपणा.

कवितेंत स्त्रियांना देवतेचें स्थान देतात, त्या स्वर्गीं जाणार व पुरुष नरकांत पडणार असे उद्‌गार कवि काढतात; अशा प्रशंसेला एखादी स्त्री तरी पात्र असेल कीं नाहीं हा प्रश्न आहे. कवि, प्रेमवश नर व वेडा ह्यांना एका माळेंत शेक्सपिअरनें गोंवलें आहे. प्रेमपाशांत सांपडलेल्या माणसाला हवशीणसुद्धां अप्सरा वाटते; तिची तो स्तुति गाईल यांत नवल काय ? पण असे सुद्धां अंध पुरुष फार विरळा. 'रंडागीतानि काव्यानि' ही उक्ति अगदींच खोटी ठरत नाहीं. काव्यांत स्त्रियांची प्रशंसा करणें हा एक कविसंप्रदाय होय.

लेखांक तिसरा

(६) **सुधारणा – 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न'** (३४). अंत्यज मुलें रस्त्यावर खेळत असतांना एक ब्राह्मण डौलानें चालत तेथें आला व 'ए म्हारड्याच्या पोरांनो ! व्हा दूर ! कसले खेळ खेळतां ? डोंबलाचे ?' म्हणून म्हणाला तेव्हां सगळीं मुलें पळालीं. पण एक तसाच उभा राहिला. तेव्हां ब्राह्मण काठी उगारून म्हणाला 'गाढवा ! सावली पडेल ना ! हो दूर; नाहींतर खाऊ मिळेल बघ !' 'सावली पडली तरी तिनें बाधा कोणची ?' असें पुटपुटत मुलगा घरीं आला व तोच प्रश्न त्यानें आईला केला. आई म्हणाली 'बाळा ते थोर, आपण नीच ! त्यांना वाट दिलीच पाहिजे.'

त्याच्या पुढचा श्लोक गाळला पाहिजे; कारण तो स्पष्ट नाहीं व त्यानें अर्थाला वळकटीहि येत नाहीं. संभाषणांतून बोध घेणें हें वाचकाचें काम. ही कविता चांगली आहे.

'**रुढि--सृष्टि-कलि**' (५४). सृष्टीचे नियम सोडल्यामुळें रूढि कुरूप झाली व अज्ञानाचाच तिला अभिमान वाटूं लागला; ती खोटयावर आरूढ झाली आहे तरी तिला देवी मानून सर्व लोक तिच्या चरणीं लोळतात– तिचे शाप लोकांना आशीर्वाद वाटतात. सृष्टीची अमृततुल्य वाणी कानीं पडली तरी ते भितात. सृष्टीनें आपला एक नोकर रूढीकडे पाठविला; त्यानें नुसता कागद तिच्याकडे फेंकला तों तिचें सिंहासन डळमळूं लागलें. त्या नोकराचें नांव लोकांनीं कलि असें ठेवलें. हे कले! तुझ्या त्या कागदी अस्त्रास विजय येवो. आम्हीं मग रूढीला विस्मृतीच्या खाडयांत गाडून टाकूं. कलि हें तुझें नांव बदलून तुला 'साधो' असें संबोधूं, व सृष्टीलाच मान देऊं.

सृष्टि (**Nature**) ही कल्पना अगदीं परकीय आहे. मराठींत त्या शब्दाचा अर्थ जग असा होतो. या भिन्नार्थामुळें कविता चांगली वठली नाहीं. जेथें तेथें इंग्रजी अर्थ व **Nature** बद्दलच्या कल्पना मनांत आणाव्या लागतात. कागदी अस्त्रें यानें कवितेचा गंभीरपणा कमी होतो. ही कविता चांगली आहे.

'"**पण लक्षांत कोण घेतो**?"**च्या कर्त्यास**' (६५). दुष्टांना शासन करून दुर्बलांना मुक्त करणें हें ज्यांचें ब्रीद असे सज्जन युरोपच्या इतिहासांत कितीतरी होऊन गेले आहेत. त्यांचीं स्तुतिपर वर्णनें उमद्या ग्रंथकारांनीं कथा, कादंबऱ्या, कविता यांत केलेलीं आहेत. स्त्रीवर्गाला मुक्त करण्याचें व्रत त्या वीरांनीं प्रथम पत्करलें व स्त्री हें जगाचें आद्यदैवत असें आपलें मत जाहीर केलें. हें सगळें काल्पनिक असें कोणी म्हणेल तर त्याला उत्तर तुमच्या कादंबऱ्या. त्यांनीं स्त्रीदास्यविमोचनाचें काम कितीतरी केलें आहे. आमच्याकडेहि उमदे ग्रंथकार आहेत. आपल्या टांकानें दुराग्रहांना मर्मीं विद्ध कर व रूढिराक्षसीला चीत कर. स्त्रियांना अशाच वर काढ व कीर्ति मिळव.

स्त्रियांबद्दल कळवळा व स्त्रियांना मान या दोन गोष्टी आपटे यांच्या गोष्टींत चांगल्या दिसून येतात. पण या गोष्टींनीं स्त्रीदास्यविमोचनाचें काम किती पार पाडलें आहे हा संशय आहे. ही कविता चांगली आहे.

'**तुतारी**' (७३). मला एक अशी तुतारी पाहिजे, कीं तिच्या किंकाळीनें मी गगनें भेदून टाकीन, व आकाशांत फार दिवस लपून राहिलेले प्रतिध्वनि जागे करीन. सतार, सारंगी वगैरे जलशांच्या वाद्यांनीं हें काम कसें होणार? रूढि व जुलूम हीं तुम्हांला खाऊन टाकीत आहेत. आकाशांत ढग पसरून सूर्यकिरणांचा नाश झाला आहे. मोहोर गळून पिकांवर कीड पडली आहे. जग गाफील झालें आहे. थेरडे म्हणतात, जुनें तेवढें चांगलें! आकाश जुनें पण त्यांत ताजे तारे, भुई जुनी पण ती वरील टवटवी नवी; जुना समुद्र पण त्यांतून रत्नें निघतात. म्हणून जुनें तेवढें चांगलें. अलीकडचें सगळें वाईट. मरूंद्या तुमचें जुनें. एका ठिकाणीं कुजत नका पडूं. सावध रहा. पुढल्या हांका ऐका! खांद्यास खांदा भिडवून चला! आलेला काळ हा विशाल पर्वत समजून त्यांत

सुंदर लेणीं खोदा, त्यावर आपलीं नांवें कोरा. पूर्वजांना योग्य वाटलें तें त्यांनीं केलें; तुम्हांला वाटेल तें तुम्ही करा. निसर्ग आणि काल हे सगळ्यांना चुरडून टाकतात. त्यांच्याशीं झगडून उंच मनोरे उठवा. जुन्या पडक्या घरांत बसून पोरांसारखे कां रडत बसतां? संघशक्तीचे तुकडे तुकडे झाले आहेत. वेळ पडल्यास प्राण देऊन संघशक्ति एकवटली पाहिजे. गेलेल्या शतकांतील घोर पापांचें क्षालन आपल्या रक्तानें केलें पाहिजे. नामशेष होण्याची वेळ आली आहे. मेंढरासारखे बावरूं नका. धर्माचें थोतांड माजवून नीतीला तुडवूं नका. समतेची ध्वजा उभारून दंभावर, या जुन्या बंडांवर हल्ला करा. नियम मनुष्यासाठीं, मनुष्य नियमासाठीं नाहीं. जे नियम प्रगतीच्या आड येतात, त्यांना झुगारूनच घातक चाली बंद करा. हरहर गर्जत पुढें सरा. देवदानवांचें पूर्वीपासूनचें वैर; दानव हल्लीं प्रबळ झाले आहेत. चला तर देवांच्या मदतीस! टीपेंत दिलेल्या श्लोकांपैकीं तीनचार (११, १२, १४, १५) फार चांगले आहेत. विस्तारभयास्तव ते गाळले असावेत. 'नरेंच केला हीन किती नर' ही ओळ फारच नामी आहे.

इतकी जोरदार कविता मराठींत दुसरी नसेल. काय तो आवेश! या एका कवितेवरून मराठी भाषेंत काय जोर आहे तो लक्षांत येतो व केशवसुत हा सामान्य कवि नव्हे असें तत्काळ म्हणावें लागतें. कविता व कवि दोन्ही पहिल्या प्रतीचीं. कदाचित् दोघांनाहि पहिला नंबर द्यावा लागेल. केशवसुतांबद्दल प्रत्येक महाराष्ट्रीयाला अभिमान असलाच पाहिजे. '**स्फूर्ति**' (७९). हींतहि तोच विषय; असाच आवेश, देश सुधारण्याबद्दलची अशीच कळकळ भरली आहे. तथापि तुतारीचा आवेश जास्त.

'**नवा शिपाई**' (८७). नव्या मनूंतील नव्या दमाचा मी शूर शिपाई आहें. मी कोणाला हार जाणार नाहीं. जे साकल्याचा प्रवेश आंखडतात तेंच पतित. सर्व पृथ्वी माझी, सर्व लोक माझे. चतकोरानें माझी भूक भागत नाहीं. मी कूपमंडूक नाहीं. माझ्या मळ्याला कुंपण घालणें मला आवडत नाहीं. जिकडे तिकडे माझें घर, माझीं भावंडें. जावें तिथें हिरवी भुई, निळें आकाश. मुलें व फुलें पाहून मनाला हर्ष होतो. सगळे आम्ही एका प्रेमाच्या ओघांत आहों. मी स्वतःला पूजितों, कारण मी आपल्यामध्ये विश्व पहातों. मी हा शब्द मला मुळींच आवडत नाहीं. लहान-मोठा, चांगला-वाईट, दूर-जवळ हें सर्व द्वैत नाहींसें झालें आहे, कारण मला सगळेंच मोठें, साधु, जवळ; सगळ्यांत मी आहें. तिळावर जसे कण तसे अहंच्या भोंवतीं जड. आंत सगळें सारखें; बाह्यामुळें वेगळेपणा व त्यामुळेंच द्विधाभाव. वैर वगैरे हा द्विधाभाव केव्हां जाईल ही चिंता. ही कविता 'तत्त्वज्ञानां'त घालणें बरोबर होईल. शांतीचें साम्राज्य होणार, त्याचा मी आघाडीचा शिपाई. ही कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट आहे.

तुतारी क्रमांक १, नवा शिपाई २, स्फूर्ति ३; तिघांतहि आवेश, प्रगतिप्रेम. विषयमांडणी मात्र निराळी.

'**गोफण केली छान**' (१२०). आपल्या हातांनीं हृदय फाडून त्याच्या चिवट दोऱ्यांची मी गोफण वळली आहे. कारण मला सत्त्व चोरावयाचें आहे. दोऱ्यांना त्वेषाचा घट्ट पीळ देऊन पीळ जाऊं नये म्हणून वैराची गांठ दिली आहे. आळशी होऊन, स्वस्थ बसणारे, पोकळ बडबड करणारे, वैऱ्याच्या पायधुळींत लोळणारे, व हांजी हांजी करून मिळविलेल्या तूपपोळींत मजा करणारे, पूर्वीच्या आर्यांचा गौरव गाऊन स्वतःचें षंढत्व दाखवणारे, लाथाबुक्या सोसणारे, मुलांना गरिबी शिकविणारे, यांशीं माझें वैर. त्यांना हाणावयाला कठिण शब्द हे माझें धोंडे. ज्यांशी वैर त्यांचा क्रम वरोवर नाहीं. ३, ५, ६, ४ असा क्रम पाहिजे. कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट; पण तुतारीच्या खालीं.

'तुतारी', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई' आणि 'गोफण' यांपैकीं उत्तम कविता कोणती व ह्यांचा क्रम कसा लावावयाचा या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. तुतारीचा विस्तार मोठा, गोफण छोटेखानी. कित्येकांना तुतारीचा विस्तार पसंत पडेल, कित्येकांना गोफणीचा छोटेपणा आवडेल. मला स्वतःला तुतारीचा आवेश, त्वेष, निर्भर्त्सना, प्रोत्साहन जास्त जोराचीं वाटतात. गोफण ही तुतारीचा एक भाग म्हटलें असतां चालेल, कारण तींत प्रोत्साहन मुळींच नाहीं; त्वेष व आवेश हेहि अल्प प्रमाणांत आहेत; निर्भर्त्सनेच्या बाबतींत कदाचित् बरोबरी होईल.

'स्फूर्ति' हिचा विस्तार तुतारीच्यापेक्षां कमी व इतर गुणहि कमी जोराचे, पण गोफणीच्यापेक्षां जास्त. हींत जुन्याची निर्भर्त्सना, जुन्याविरुद्ध बंड हा गुण प्रमुख आहे.

'नवा शिपाई' याचें प्रेम सगळ्या जगावर; हा विश्व आकळूं पहातो. यांत निर्भर्त्सना, प्रोत्साहन आणि त्वेष यांना जागा नाहीं. विश्व-कुटुंबत्वाचा आवेश मात्र खूप जोराचा. पहिल्या तीन कवितांत व हींत साम्य फार थोडें. क्रम लावणें फार कठीण; पण माझ्या मतें 'तुतारी', 'नवा शिपाई', 'स्फूर्ति' व 'गोफण', अशी मालिका लागेल. चारहि कविता अत्युत्तम आहेत. त्यांनीं मराठी भाषेचा दर्जा फार फार वाढविला आहे.

'**मूर्तिभंजन**' (८१). सोमनाथासारख्या सुवर्णमूर्ति फोडून सोनें लुटून न्या. या जड मूर्तींची पूजा करण्यांत काय अर्थ? आम्ही डोंगरी लोक, आम्हांला संपत्तीची चाड, असें यक्षीण (Spinx) कोडें घालते. उकललें तर वांचतों, नाहींतर ती खाणार. आम्ही मूर्ति फोडूं पण पुनः नव्या बनवूं. विकून टाकणार नाहीं. विकून टाकतात तेच चोर, आम्ही नाहीं.

ही कविता एक कोडेंच आहे. समाज सुधारा, पण त्याचा अजिबात नाश करूं नका. कांहीं चालीरीति निरर्थक किंवा घातकहि बनल्या असतील, त्या टाकून द्या; पण सगळ्यांचें निर्मूलन करूं नका. जो समाजाला हळूहळू नवें वळण देतो तो खरा

समाजसुधारक असा कदाचित् अर्थ असेल. कविता दुर्बोध. कोणत्या प्रकरणांत घालावी तें सांगतां येत नाहीं.

(७) **तत्त्वज्ञान** : '**नामावेगळा**' (३१). नांव भिन्नपणाचें कारण, केवळ बाहेरचें पांघरूण. भाव निर्गुण; इंद्रियें त्याला कसें जाणणार ? हाच भाव सगुण होऊन इंद्रियगोचर होतो.

ते भाव कोणचे ? अनेकवचनानें भिन्नपणा येतो. नुसता 'भाव' म्हटलें पाहिजे; ते किंवा ती सर्वनाम लावलें, की झाला बिघाड.

ज्ञानेश्वरीचें अनुकरण करण्याची खटपट, पण साधली नाहीं. वाईट छपाईनें घाण झाली आहे. कविता चांगली आहे.

'**कोठें जातोस** ?' (३५). कोणी पुत्र झाला म्हणून वांटण्याकरितां साखर आणावयास जातो. कोणी लग्नाकरितां मुंडावळी वगैरे आणण्यास; कोणी नवा संसार म्हणून बाजार करावयाला; कोणी वैद्याला बोलवावयाला, तर कोणी प्रेतवस्त्रें आणण्याला. पण प्रेताला कोठें जातोस असें विचारलें असतांना हवेंतून उत्तर 'माहीत नाहीं.' कविता चांगली आहे.

'**मयूरासन व ताजमहाल**' (६६). मयूरासन व ताजमहाल अशीं दोन अप्रतिम कामें शहाजहान बादशहानें करविलीं; त्यांपैकीं मयूरासन चोरांनीं पळवून त्याची विल्हेवाट लावली; ताजमहाल मात्र कायम आहे. मनुष्यकृती अशाच नाश पावणार, कारण त्यांत आपलेपणा माजला असतो. प्रीति, मनुष्यजातीवर किंवा प्राणिमात्रावर प्रेम हें काय तें टिकाऊ. कविता वाचतांना अप्रतिम कामांची स्तुति व त्यांचा नाश करणारांची निंदा हा कवितेचा विषय असा भास होतो; पण सगळें नश्वर या वचनानें विषयांतर होतें. ताजमहाल नाहींसा झाला नाहीं. तेव्हां सगळें नश्वर हें अनुमान कसें निघतें ? रोमन बादशाहींतील कामें अजून उरलीं आहेत. शिवाय पुढें नाश पावणार म्हणून प्रेमाशिवाय कांहींच करूं नये कीं काय ? मानवी प्रेमानें केलेल्या वस्तूंचाहि नाश होतो. बौद्ध लोकांनीं उभारलेलीं भव्य रुग्णालयें कोठें आहेत ? अशा वेदांतांत कांहीं अर्थ नाहीं. ही कविता एखाद्या आंग्ल कवितेचें भाषांतर असावें. ही चतुर्दशिनी चांगली आहे.

'**स्वप्नांतलें स्वप्न**' (६८). सर्व आयुष्य फोल, स्वप्नवत् हें तर खरेंच; पण आशा गेली तर सर्वच गेलें. आपण जें कांहीं बघतों किंवा करतों तें सगळें स्वप्नांतलें स्वप्न. कालसमुद्राच्या तीरावर मी उभा असून हातांत थोडे स्वर्णवालूचे कण– ते राजी नसतांनाहि – घट्ट पकडून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहें; पण ते भराभर गळून पडताहेत; व डोळ्यांतून अश्रु चालले आहेत. इतका असमर्थ मी असावें ना ? पकडून ठेवण्याच्या आशेमुळेंच मनुष्य खटपट करतो; पण सर्व खटपट फोल.

हा स्वप्नवाद मनाला पटत नाहीं. कारण आयुष्यांत सुख नाहीं हें म्हणणें खोटें.

दुःखाचा बराच भाग व्यक्तिमात्राच्या व समाजाच्या अज्ञानाचें फल होय. कर्तव्य म्हणून मनुष्य पुष्कळ गोष्टी करतो, त्या फोल कशा ? कांहीं हतभागी असतील, कीं ज्यांना सुखाचा फारच अल्प अंश मिळाला असेल. सुखाच्यापेक्षां दुःखाची महती वाटणें हा मनुष्यस्वभाव आहे. या महतीचें कारण दुःख कधीं काळीं येऊन सुखाच्या आड येतें हें. बहुतेक मनुष्य सुखी असतात. या स्वप्नवादाला उत्तर पुढील कविता. ही कविता फार चांगली आहे.

'**आहे जीवित काय ?**' (७१). जीवित निःसार किंवा स्वप्न किंवा काल-प्रवाहावरील बुडबुडा नव्हे. त्यांत अनंत दुःखें भरलीं आहेत. जीवाला कष्ट पडतात, सुखाचा लेशसुद्धां मिळत नाहीं हें म्हणणें खोटें. जीवित सत्य वस्तु आहे. जो परमेश्वराला निर्मळ मनानें भजतो तो सुखसमुद्रांत पोहतो.

कांहीं आपत्ति आल्या तरी ईश्वरभक्तीपासून ढळावयाचें नाहीं हा एक सुखाचा मार्ग. मनुष्य हा सुखाभिलाषी आहे; प्रत्येक स्थितींत त्याला सुख मिळतें, त्याचें कारण समाधान. संवयीनें नरकवाससुद्धां सुखावह होईल. तुरुंगांतील कैदी काय कमी हंसतात व खेळतात ?

लाँगफेलोच्या कवितेचा आधार घेतला असावा. ही कविता चांगली आहे.

'**झपूर्झा**' (७५). जींत सुखदुःख नाहीं, हंसणें नाहीं, रडणें नाहीं, कांटे बोंचत नाहींत, मखमलीचा मऊपणा सुद्धां भासत नाहीं. अंधार नाहीं, उजेड नाहीं, दृष्टीला कांहींच दिसत नाहीं, अशा स्थितीचें काय नांव ? संसारी माणसांना हा प्रश्न कळणार नाहीं. विचारणाऱ्याला ते वेडापिसा म्हणतील. जें तुम्हांला व्यर्थ त्यांतच अर्थ भरला आहे. ज्ञात अल्पप्रमाण; धैर्य धरून तें ओलांडून बुद्धि एकदम पलीकडे जाते, तिला अंधुक आकृति दिसतात; त्या गूढ गाणीं गातात; त्या गाण्याचा ध्वनि झपूर्झा. नांगरावयाची जरूर नाहीं अशीं शेतें कितीतरी आहेत. तेथील सनदी शेतकरी कोण म्हणाल ? सगळे; सगळ्यांना तेथें जावयाला मुभा; पण जाणारा हजारांत एखादा. तेथील वनमाला पाहिजे असल्यास जा, आणा; अटक कोणी करणार नाहीं; झपूर्झा हा मंत्र म्हणत जा म्हणजे झालें. प्रकृति पुरुषाशीं क्रीडा करीत असते, त्या क्रीडांचा अर्थ कळणें हा ज्ञानाचा हेतू. तो अर्थ कितीतरी सुंदर आहे. तो कळण्याला झपूर्झा हेंच गाणें म्हटलें पाहिजे. जेथें चंद्र, सूर्य, तारे, खपुष्पें खुडीत असतात तेथें जाण्याची इच्छा असल्यास सर्वसंगपरित्याग करा. खेळा फुगडी आणि म्हणा झपूर्झा.

हींत वेदांत भरला आहे; तो वेदांत आमच्यासारख्यांना अज्ञेय आहे. निर्विकल्प ज्ञान हा वेदांत. या कवितेंतील वेदांतांत 'नेति नेति' ही भाषा आली नाहीं. प्रकृति म्हणजे आरंभक अणु, ते पुरुषाशीं क्रीडा करतात; म्हणजे पुरुषाच्या अदृष्टानें अणूंत क्रिया सुरू होते; हें वैशेषिक शास्त्रांचें मत. कवितेंत वैशेषिक व वेदांत यांची भेसळ झाली आहे. खऱ्या वेदांतांत त्या मताला जागा नाहीं. वेदांताची भर मायेवर, अणुसत्यते-

वर नाहीं. पांचवें कडवें गाळलें असतां विसंगतपणा नाहींसा होईल. विसंगतपणा न समजूनहि कविता अत्युत्तम करतां येते, याचें झपूर्झा हें उत्तम उदाहरण होय. कवीला वेदांताची थोडीशी माहिती होती. तिच्या जोरावर हें अत्युत्तम गाणें रचलें आहे. पोरी वेडगळ निरर्थक गाणीं म्हणत फुगड्या खेळतात, त्यांना त्या वेळीं काळजी नसते. कशाचें भान नसतें. कशाचें भान नसणें हाच वेदांत. झपूर्झा हा आनंदप्रदर्शक शब्द; निर्विशेष निरहंकार जी स्थिति तिचा दर्शक.

तीन ओळींची जी प्रस्तावना ती अप्रस्तुत, निरर्थक किंवा चुकीची आहे असें मला वाटतें.

तुतारीचा अर्थ मला कळतो, या कवितेचें रहस्य कळत नाहीं. तथापि तुतारी-पेक्षांही ही कविता आनंद देते. माझ्यामतें तुतारीपेक्षां ही चांगली. अस्सल कवीला पाहिजे तो विषय चालतो. ही कविता अत्युत्तम, अत्युत्कृष्ट आहे.

'पद्यपंक्ती' (८८). आपणांला जें दुःख भोगावें लागतें त्याचें कारण आपण नसून आपले पूर्वज होत; उगाच पश्चात्ताप करण्यांत काय अर्थ ? मेल्यावर हें सगळें संपणार; उगाच कां रडावें ? दुःख भोगणें, दुःखाचा पेला पिणें हें जीवित. पितांना जो अनुभव येईल तो जगाला सांगा; कोणाला तरी त्यापासून फायदा होईल. शाळेंत जें शिकलों त्याला टीप :– प्रथमपुरुष टाकून द्वितीयपुरुषीं या अनुभवाचा उपयोग कर.

कवीच्या अंतःकरणांत अनेक वृत्ति उत्पन्न होतात, त्यांपैकीं ही एक होय. मनांत जें येईल तें कवितेंत प्रगट करणें हें कवीचें काम. ही कविता उत्तम आहे.

'तहान आणि भूक' (९९). जेव्हां प्राणी एकच्छिद्र होता (one cell) तेव्हां त्याला अवयव, भूक तहान, कामवासना वगैरे कांहीं नव्हतें. स्वर्ग व पृथ्वी एके ठिकाणीं होतीं; त्यामुळें दुःखाला कारण नव्हतें. अन्न व तोंड एके ठिकाणी; एकाच छिद्रांत नरनारीपणा. हातपाय असा अवयवभेद नव्हता. थोडक्यांत, श्रम करण्याची जरुरी नव्हती. श्रम हें दुःखाचें कारण. श्रमाभाव सुख. 'अन्नमुखें' या समासानें घोंटाळा होतो; अन्नाचीं मुखें असा विग्रह पहिल्या प्रथम ध्यानांत येतो; पण त्याचा अर्थ लागत नसल्या-मुळें अन्न व मुख असा विग्रह मागाहून सुचतो. घोटाळा टाळण्याचे दोन उपाय :– अन्न, मुख, किंवा मुख, अन्न असे शब्द तोडून किंवा पालटून लिहिणें चांगलें. एकछिद्र ही स्थिति उत्तम काय ? ज्ञान जर श्रेष्ठ तर अवयवरूपी परिणाम इष्ट. एकछिद्र स्थिति सुखमय, तींत दुःखाचा लेश नव्हता कशावरून ?

'सतारीचे बोल' (९५). उदास दुःखी असा काळोख्या रात्रीं हिंडतांना सता-रीचे बोल माझ्या कानीं पडतात. हृदय जड, जग जड असा प्रत्यय येत असल्यामुळें व कांहीं सुचत नसल्यामुळें ते बोल मला रुचत ना. वादळ, भुतेंखेतें, त्या वेळी मला फार फार आवडतीं, कारण त्यांकडे लक्ष जाऊन माझी खिन्न वृत्ति नाहींशी झाली असती. सतारीचा आवाज ऐकून संतप्त झालों, व फोडून टाक तुझी सतार, अशा आवेशानें

खिडकीकडे मूठ वळली. पुढें चार पावलें गेलों नाहीं तोंच, काय कारण असेल तें असो. माघारीं वळलों व सतारीच्या बोलांत गुंग होऊन गेलों, व राग वगैरे सर्व विसरून एका ओटचावर ऐकत बसलों. करुण ध्वनि कानीं पडतांच मन द्रवून तन्मय झालें व डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. मला वाटलें, कीं माझ्या खांद्यावर हात ठेवून 'धीर धर, त्रासूं नको,' असें कोणी मला आश्वासित आहे. नंतर सतारींतून आशेला उत्तेजन देणारे बोल निघाले. वर पाहूं लागलों तों ज्यांची मला आतांपर्यंत दाद नव्हती, असे. अगणित तारे. सतारीच्या बोलांतून 'तम अल्प–द्युति बहू' असा रव निघत होता, मन उदात्त करणारे असे मग बोल निघाले, तेव्हां मला वाटलें, कीं माझा आत्मा विश्व-भर पसरला आहे; दिक्कालाच्या पलीकडे गेल्यानें मला जन्ममरणाची बाधाच उरली नाहीं; सगळा भेदभाव नाहींसा झाला. प्रेमरसाचे बोल ऐकल्यावर सगळें विश्व सुंदर दिसं लागलें. अप्सरा पृथ्वीवर नाचताहेत असें वाटलें. शेवटची शांतरसपोषक गत पृथ्वी, रात्र, वारें, तारें, स्वतःचे हृदय सर्व शांत. अशा स्थितींत घरीं आलों.

ही कविता वाचल्यानें ड्रायडनकृत Alexander's Feast ची आठवण होते. वाद्यानें निरनिराळ्या वृत्ति कशा उत्पन्न होतात हें दोहोंतहि उत्तम दाखविलें आहे. केशवसुतांनीं कवितेंत सात्त्विक वृत्तींची वेदांत व विशेषतः विश्वकुटुंबत्वाची भर घातल्यानें त्यांची कृति फारच सरस झाली आहे. कविता अत्युत्तम; पण तुतारीच्या खालीं.

'**कोणीकडून– कोणीकडे ?**' (९६). आलों कुठून, जातों कुठें या प्रश्नाचीं निरनिराळीं उत्तरें निरनिराळे धर्म देतात, पण त्यांनीं समाधान होत नाहीं. हें आयुष्य म्हणजे दोन अंधकारांमध्यें पडलेलें घडीभर उन्ह, व तेंहि कधींकधीं ढगांआड होतें. त्यामुळें हृदयांत निराशा भरून जाते. भोग भोगण्यानें मन वेडावतें; जिकडे तिकडे अंधार. हरे राम म्हणून गप्प बसावें लागतें. येथें आलों कसा, सुटका कशी होईल असा विचार करतां करतां भ्रम नाहींसा होतो. सगळें निराळें दिसूं लागतें. मागें-पुढें जो अंधार त्यांतच प्रकाश पडलेला दिसतो व मधला उजेड अंधारांतच गुडुप होतो. निजधामाहून आलों, तिकडेच ऋण फेडून चाललों, असें उत्तर मिळून समाधान होतें.

दुःखाचें कारण (Origin of Evil) ह्याचीं निरनिराळे धर्म निरनिराळीं उत्तरें देतात, त्यांनीं समाधान होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर निजधामाहून आलों व ऋणें फेडल्यावर निजधामाकडे जावयाचें यानेंहि समाधान होत नाहीं. दुःखाचा बराचसा भाग मानवकृत आहे व जोंपर्यंत माणूस अज्ञानी व विकारवश असेल तोंपर्यंत दुःख भोगावें लागणारच. बुद्धानें या प्रश्नाचें शास्त्रीयरीत्या उत्तर देण्याचा प्रयत्न केला पण तो प्रयत्न अर्धवट राहिला. मनुष्य जर आपली जबाबदारी ओळखील तर बरींचशीं दुःखें नाहींशीं होतील. कर्म, संचित, धर्म, अधर्म ह्यांचे खरे अर्थ लोकांच्या मनांत बिंबले पाहिजेत. समाजरचनाच खोटचा पायावर झाली आहे. खरा मानवधर्म (Religion

of Humanity) जगांत पसरला पाहिजे. From one eternity to another किंवा between two eternities ही कल्पना परकीय आहे. आयुष्य म्हणजे दोन समुद्र जोडणारी जमीन, हीहि कल्पना परकीय. परकीय व आर्य अशा दोन मतांचें येथें मिश्रण आहे. ही कविता अत्युत्तम आहे.

'**म्हातारी**' (९८). मुलगी उडणाऱ्या म्हातारीला पकडावयास हात वरती करते, तों ती निसटून जाते. म्हातारे दूर जाऊं नको, माझ्या मुलीला तुजबरोबर खिदळूं दे. मलाहि संसार विसरून तुजबरोबर खेळूं दे. तुला म्हातारी म्हणणें बरोबर नाहीं, कारण तूं तरुण कधीं होतीस ? तुला जन्म नाहीं, मरण नाहीं; तूं कोठून येतेस, कोठें जातेस हें कोणाला माहित नाहीं. तूं मूर्तिमंत यद्दच्छा दिसतेस. तूं काय यक्षिणी समाजांतून आलीस? किंवा तूं गंधर्वाचें विमान आहेस व गंधर्व त्यांत बसून गात हिंडताहेत ? मी संसारी, पापी, मला तें गाणें कसें ऐकूं येणार ? पण या माझ्या मुलीला तें ऐकूं येतें, म्हणूनच ती तुला धरावयाला लागते, हांसते, बागडते. अज्ञेयामधला तूं ध्वनि असशील; मला जर त्याचा अर्थ कळेल, तर जगांतला सर्व अंधार मी नाहींसा करीन. कदाचित् तूं खपुष्प असशील; म्हणूनच तुझे रंग-वास मर्त्यांना कळत नाहींत; जर कळतील तर इथेंच स्वर्ग होईल. तुझें खरें स्वरूप कोणाला कळत नाहीं, तथापि तुझ्यांत कांहीं अद्भुत आहे; तुला पाहून प्रत्यक्षांतून मी परोक्षांत जातों. मोद उत्पन्न होतो; व मग मी गणमात्रा जुळवूं लागतों.

ह्यांतहि म्हातारीसंबंधांने कल्पना खोटचा; म्हातारी हा पदार्थ काय हें पुष्कळांना माहित आहे. तेव्हां त्याला जन्ममरण नाहीं, तो गंधर्वाचें विमान, गंधर्व त्यांत बसून मनुष्यांना ऐकूं येत नाहींत अशीं दिव्य गाणीं गातात, वगैरे म्हणण्यांत काय अर्थ ? मुलें देवासारखीं, देवाशेजारीं असतात, त्यांना दिव्य दृष्टि असते ह्या साऱ्या कल्पना. संसाराला विटून मनुष्य कसें तरी समाधान करून घेतो; पुष्कळ लोक दैवाला दोष देतात किंवा पूर्वसंचितावर हवाला देतात. धर्मभोळेपणाहि या समाधान–प्रयत्नांत येतो; कवि आपल्या परीनें समाधान करून घेतात. ही कविता चांगली आहे.

'**दिवस आणि रात्र**' (१०७). दिवसाच्या संदेशाच्या उलट रात्रीचा संदेश. दिवस दुःखदायक, रात्र शांति देणारी. दिवस 'उठा लवकर, काम करा, मरा मग, बाहेर पडा', असें म्हणतो तर याच्या उलट 'विसांवा घ्या, शांतपणें विचार करा, मजमुळें तरून जा, घरीं परत या.' असें रात्र म्हणते. दिवसा जरी उजेड तरी अंतःकरणांत अंधेर. रात्रीं अंधेर पण अंतःकरणांत उजेड; दिवसा स्पर्धा, रात्रीं मानवी प्रेम. दिवसा पृथ्वीवरील नक्षत्रें तेवढीं प्रकाशित होतात; रात्रीं आकाशांतील. दिवसा एक सूर्य, रात्रीं असंख्य. दिवसा पृथ्वी काय ती दिसते; रात्रीं अनंत आकाश. दिवसा

गद्य व्यावहारिक भाषा; रात्रीं कविता. भूमि नरक असें दिवस म्हणतो, तर भूमि स्वर्ग असें रात्र म्हणते.

ह्या कवितेंत खऱ्या खोट्याची भेसळ आहे. दिवसाची स्तुति, रात्रीची निंदा अशीहि कविता बनवितां येईल. चोऱ्यामाऱ्या, दरवडे, खून, आत्मघात, वनेचरांचा संचार, यांचा रात्रीशीं फारसा संबंध. ब्रह्मांडाचे चमत्कार रात्रीं दिसतात हें खरें. पण दिवसा केलेल्या व्यवसायामुळें जीवितयात्रा चालते. व्यवसायामुळेंच ज्ञान वाढतें; वेदांतविचार जगांतील खटपटी पाहिल्याशिवाय, संसार अनुभविल्याशिवाय सुचले नाहींत. विचाराला अनुभवसामग्री लागते. जगांत जीं जीं साधनें उपलब्ध आहेत किंवा होत आहेत त्याला खटपट हें मुख्य कारण होय; ही कविता फार चांगली आहे. संथ विचार करणारे नेहमीं थोडेच. ते दिवसासुद्धां किंवा दिवसाच विचार करतात. रात्रीं ढोरासारखा घोरत बसणारा सगळा जनसमूह.

'**दंवबिंदु**' (११८). हे सुंदर उन्हांत चमकणारे, मोत्यासारखे दंवाचे बिंदु काल संध्याकाळीं नव्हते, आज कोठून आले, असें मुलगा आईस विचारतो. चंद्र आणि नक्षत्रें जियें, जेथून उजेड व पाऊस येतो तेथून हे आले, असें उत्तर आई देते. येथें ते राहतील का व मला खेळायला मिळतील का? मला ते दे पाहूं, असें मुलगा म्हणतो. बाळा, ते हातांत धरतां येत नाहींत; नुसते ते दुरून पहा; सूर्य त्यांना लवकर वर घेऊन जाईल, हे शब्द तोंडून निघतांच तिचे डोळे पाण्यानें भरले; कारण तिला मृत बालकाची आठवण झाली. एवढा तरी राहो, असें म्हणून तिनें त्याला घट्ट पोटाशीं धरलें. हें पाहून कवि गहिंवरला व सकाळचे दंवबिंदू सायंकाळीं कोठें गेले हें त्यालाहि सांगतां येईना.

दंवाचें काय होतें हें पुष्कळजण सांगूं शकतील; मृत बालकें किंवा एकंदर मृत कोठें जातात, त्याला त्या त्या धर्माप्रमाणें उत्तरें निराळीं. देह मातीला मिळतो. पण आत्मा?

ही कविता करुणरसयुक्त आहे. कदाचित् आंग्ल कवितेचें भाषांतर असावें. ही फार चांगली आहे.

'**कांद्यावांचुनि गुलाब नाहीं**' (१२२). हें सत्य मनांत बिंबलें म्हणजे निराश होण्याचें कारण नाहीं. सुखदुःखें हीं मिश्रित आहेत. सुखाकरितां झटतांना दुःख हें व्हावयाचेंच. छाया नसेल तर चित्र कोठून? प्रेम हें एक स्पृहणीय; बाकी सर्व विकृत. ही कविता फार चांगली आहे.

'**हरपलें श्रेय**' (१२५). लहानपणीं लटका संसार केला. तेव्हांचें सुख आतां खऱ्या संसारांत नाहीं. कांहीं तरी हरवलें; पण त्रिखंड धुंडाळलें तरी तें सांपडत नाहीं. मागितलेंस तें मिळालें, सौदा होऊन गेला, आतां दुःख कां? सोनें देऊन माती घेतलीस. गवाक्षांतून किरण येतात, त्यावरील अणूंबरोबर उडून मन परोक्षाकडे जातें, संसाराची

अनास्था होते, तरी त्याची मला पर्वा नाहीं. रानावनांत त्या हरवलेल्या सुखाची साक्ष मिळते; पण तें पटकन् नाहींसें होतें. लोक मला वेडी म्हणतात, म्हणोत. जनमर्यादा सोडून मी अमर्यादेच्या पाठीला लागलें आहें. सती जशी चितेवर, पतंग जसा दिव्यावर, तशी मी सुखाकरितां प्राण देईन; जीव पाखडतें, पण तें मिळत नाहीं.

वर्डस्वर्थ वगैरे कवि प्लेटोला थोडेसें अनुसरून म्हणतात, कीं इहलोकीं येण्याचे अगोदर आपण देवापाशीं असतों व तेव्हां सुखाला अंत नसतो. येथें आल्यावर कांहीं काल तें सुख, तो दिव्य प्रकाश आपल्याला जिकडे तिकडे दिसतो. पण लहानपणीं संसाराचें खोटें ओझें ओढून घेतल्यामुळें तो प्रकाश, तें सुख हळूहळू मावळतें व खऱ्या संसारांत तें अजिबात नाहींसें होतें. तथापि एखादे वेळेस—सृष्टिसौंदर्य पाहिल्यामुळें त्याचा भास होतो.

हाच भावार्थ या कवितेत आहे. वर्डस्वर्थची Ode on the Intimations of Immortality on the Recollection of Early Childhood 'बाल्यावस्थेंतील आठवणीवरून अमरावस्थेची जाणीव' ही कविता उत्तमांपैकीं समजतात; त्यापेक्षांहि ही कविता सरस आहे. करुणरसानें हृदय कळवळतें, डोळ्यांत आंसवें येतात. भाषा हृदयद्रावक! करुणरसाची कमाल झाली!

गद्य भाषेंत बोलावयाचें म्हणजे लहानपणीं कळत नसतें; काळजी मनाला शिवत नाहीं. अज्ञान एकपरी चांगलें, कारण त्यामुळें काळजीचें क्षेत्र आकुंचित रहातें. वायकामुलें व खालच्या जाती म्हणजे अडाणी लोक हे ओक्साबोक्सीं रडून एकदांचें दुःखपरिमार्जन करतात. 'जितकें ज्ञान जास्त, तितका मनाचा कोमलपणा जास्त' या जॉर्ज इलिअटच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे.

'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा' असें जरी साधु तुकारामबोवा म्हणतात, तरी लहानपण ही स्थिति नेहमीं रहाणार कशी? मनुष्य वाढलाच पाहिजे. शरीराच्या वाढीबरोबर मन वाढणार, मनोविकार वाढणार. कोणच्या ना कोणच्या रीतीनें संसार मागें लागणारच. संसार हा एक धंदा आहे. जसें प्रत्येक धंद्याला शिक्षण लागतें, तसें संसारधंद्याला शिक्षण पाहिजे. तें कोणी संपादित नाहीं; कारण तें स्वाभाविक येतें अशी सार्वत्रिक समजूत. संसाराची जबाबदारी, त्याच्या सर्व अडचणी मनापुढें ठेवून मग संसारांत शिरावें. विशिष्ट शिक्षण नसलें तर धंदा बुडतो; तसे पुष्कळ संसार बुडतात म्हणजे दुःखमय होतात, कारण विशिष्ट शिक्षण नाहीं.

'**अजाणपणाची प्रशंसा**' (३९) व्या कवितेनें केली आहे. अजाणपणा कदाचित् चांगला असेल, पण तो कायम कसा राहील? तो थोडया अंशानें तरी कमी होणारच.

'**म्हातारी**' (९८). या कवितेंत लहान मुलीला गंधर्वगान ऐकूं येतें, म्हणून ती म्हातारीच्या पाठीमागें लागते असें म्हटलें आहे. जिज्ञासा, चंचलपणा, खेळाडूपणा

हें म्हातारीच्या मागें धांवण्याचें खरें कारण. तिला म्हातारींत कांहीं दिव्य दिसतें ही केवळ कल्पना. ही कविता तुतारीसारखी अत्युत्तम, अत्युत्कृष्ट आहे.

विषय घ्यावा त्याचें सोनें ही हातोटी या कवीला उत्तम साधली आहे.

'**स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य**' (४६). मनुष्य उत्पन्न व्हावयाच्या अगोदर स्वर्ग पृथ्वीपासून दूर नव्हता; तो तिला सारखें सुख देई म्हणून तिचें मन त्याच्यावर जडलें. पुढें आपल्या शरीराच्या मळीपासून तिनें मनुष्य उत्पन्न केला; इच्छा ही, कीं, स्वर्गाला आळवून त्यानें तिचा व स्वर्गाचा कायमचा सहवास संपादावा. परंतु नीचानें पृथ्वीला लाथाडून आपण एकटें स्वर्गाकडे जाण्याचा प्रयत्न केला; तेव्हां स्वर्ग संतापून पृथ्वीपासून वर दूर निघून गेला. तेव्हांपासून पृथ्वी झुरत आहे. माते, चुकी झाली; स्वर्गा, क्षमा कर. खालती ये; तिला अंतर देऊं नकोस. कारण तिचें तुझ्यावर खरें प्रेम आहे.

मनुष्य जन्मावयाच्या अगोदर मॅस्टोडन वगैरे क्रूर प्राणी होते, तेव्हां काय सुख होतें ? हें सुख मनुष्यानें घालविलें म्हणजे काय ? स्वर्ग म्हणजे क्रौर्य वगैरेंचा अभाव, मन विकारवश नसणें. ही स्थिति केव्हांची ? या कवितेचा निराळाच अर्थ आहे काय ? ही कविता फार चांगली आहे.

'**तुझें नाम मुखीं**' (१२६). प्रभूच्या नामोच्चारानें व ध्यानानें सगळ्या चंचल वृत्ति स्थिरावल्या. त्याला जवळ केल्यानें सर्व आधिव्याधी नाहींशा झाल्या. हें जग भिकार म्हणून त्याच्या पायांपाशीं भिक्षांदेहि, त्याच्यापायीं माथा वाहियेला.

अभंग तुकारामाच्या चालीवर आहे. चांगला आहे.

या प्रकरणांत '**हरपलें श्रेय**' (१२५), '**झपूर्झा**' (७५), '**सतारीचें बोल**' (९५), **कोणीकडून कोणीकडे**' (९६) ह्या अत्युत्तम कविता; त्यांच्या खालोखाल '**पंद्यपंक्ति**' (८८) ही होय.

लेखांक चवथा

(८) **स्वदेशप्रेम**–'**जयाजीराव शिंदे व मल्हारराव होळकर**' (५). राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर ह्यांचीं नांवें ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयाला स्फुरण आलेंच पाहिजे. त्यांचे वंशज आज आम्हांला सोडून जात आहेत, तेव्हां कोणाला दुःख होणार नाहीं ? ही कविता फार चांगली आहे.

'**गांवीं गेलेल्या मित्राची खोली पाहून**' (१४). संसारपाश सोडून स्वदेश-पाशांत आपल्याला माझ्या मित्रानें अडकवून घेतलें आहे. पाशांशिवाय कोण आहे ?

पाश तोडले तर अधोगतीच. पाश सोडतात म्हणून तुटके तारे खालीं कोसळतात व निस्तेज होतात. चंद्र पृथ्वीला चिकटून आहे म्हणूनच त्याला सूर्याची सेवा घडते. देशसेवेच्या गोष्टी बोलत आम्हीं कित्येक रात्री घालविल्या. रात्र संपून पहांट झाली तरी आमचें बोलणें चालूच. 'न्हासाची रात्र संपून स्वतंत्रेची पहांट केव्हां येईल व उत्कर्षाचा दिवस सुचवील ? ती पहांट पहाण्याचें आमच्या नशीबीं आहे काय ? निदान तशी पहांट आणण्याला आमच्या हातून यत्न होतील काय ?' असे उद्‌गार आमच्या तोंडून कित्येकदां निघाले आहेत.

ही कविता फार चांगली आहे.

'**निशाण**' (९२). काठीला लावलेलें नुसतें फटकूर ! पण काय त्याचें सामर्थ्य ! तें घेऊन वीर मरण्याला किंवा मारण्याला रणांत शिरतात व तुमुल युद्धांत त्याच्याकडे नजर जाऊन त्यांना स्फुरण चढतें. अग्निनौकेच्या शिडावर, राजवाडे, देवालयें, किल्ले यांच्यावर तें फडफडत असतें. भक्ति, उत्साह तें पाहून वाढतात. वीर्याचे, ऐश्वर्याचे मनुष्याचे विचार उंचावर जाण्याचा प्रयत्न करितात त्याचें निशाण हें चिन्ह; म्हणूनच खरे कवि त्याची प्रशंसा करितात. संसार हाहि एक संग्रामच; त्यांत लढणारांना निशाण दाखवून मी बजावतों, 'हे योद्धचांनो ! झटा, वेळ आली तर प्राण द्या.'

शेवटला विचार अप्रस्तुत, अप्रासंगिक वाटतो. विचारांचा क्रमहि बरोबर नाहीं. आवेशाची चढती पायरी पाहिजे, ती येथें नाहीं. कविता चांगली आहे.

'**दोन बाजी**' (१०६). एक आपली समशेर जिकडेतिकडे गाजवितो व कीर्तीचा झेंडा सर्वत्र नाचवितो, तर दुसरा पाठ दाखवून पळत सुटतो. एक गुणीजनांची पारख व कदर करणारा, त्यांच्यांतले शौर्यादि गुण वाढवून त्यांना आपले खरे मित्र असें समजणारा, तर दुसरा नागव्या पाजी लोकांबरोबर नागवा होऊन नाचणारा. सिंहानें खऱ्या भटांस पाचारून रणभागीं नेलें व शत्रूंची धाबरगुंडी वळविली. दुसऱ्यानेंहि भटांना पाचारिलें, पण कशाला ? लाडू झोडण्याला. एक हुरडा चोळून शत्रूला शासन करण्यास धांवतो, दुसरा बिछान्यावर लोळतो. वीर आणि मुत्सद्दी यांच्या सहाय्यानें एक मराठ्यांची सत्ता वाढवितो, तर दुसरा नाचेपोरे घेऊन दौलतजादा करतो. भटवंश म्हणजे प्रतापी पुरुषांनी भरलेला; त्यांत तुळशींत भांगेप्रमाणें हा अभद्र कोठून निघाला ? एकाला लोक गाजी म्हणत व तो मेल्यानंतर सर्व आर्यभूमि हळहळली. दुसरा खरा पाजी; कुळाला कलंक लावून मरणाआधींच मेला.

यांतील १, ३, ५ हे श्लोक चांगले साधले आहेत. दुसऱ्याच्या व चौथ्याच्या शेवटीं नाचेपोरे आणले आहेत. ते कोठेतरी एकदांच यावयाला पाहिजे होते. श्लोक दुसरा गाळावा. दोन बाजींमधला फरक चांगला दाखविला आहे. कविता उत्तम आहे.

(९) **नीति**–'**जगण्याचा हेतु**' (२९). या जगांत आपण आलों तें श्रम करण्याला, जगाची सुखवृद्धि करण्याला. घाम येईल, पण अस्तसमय जवळच आहे. धीर धर. हें उत्तम शरीर तुला दिलें आहे तें विछान्यावर पडण्यासाठीं नव्हे, तर झगडण्यासाठीं. श्रम करतांना डोळ्यांतून जीं आंसवें पडलीं तीं अलंकारच तं समज. दुसरे लोक तुझें उदाहरण गिरवतील.

ह्या कवितेंतील बरेच शब्द गद्यग्रंथांत शोभण्यासारखे आहेत. कवितेंत विशेष कांहीं नाहीं. कविता चांगली आहे.

'**विद्याप्रशस्ति.**' (९०). विद्या नसली म्हणजे मौन धरावें लागतें. शारदेच्यापुढें संपत्ति, शक्ति यांचा पाड नाहीं. तिच्यामुळें दुःखें नाहींशीं होतात, स्वर्ग पृथ्वीला भेटतो. विशेष कांहीं नाहीं. कविता चांगली आहे.

'**सिंहावलोकन**' (४७). गत आयुष्याचा विचार करतांना कोणाचें मन हळहळत नाहीं ? गेलेले सुखाचे दिवस आठवून दुःख वाटतें खरें; पण चुक्या आठवल्या म्हणजे नको तें जिणें होतें. पुनः असें करणार नाहीं असें म्हणूनहि तेच प्रमाद आपल्या हातून घडतात, त्यामुळें अनिवार दुःख होतें. ही कविता उत्तम आहे.

'**फुकट दवडलेला तास**' (४८). घड्याळाचा ठोका पडतांच कोणी माझ्या जवळून उठून गेलें असें मला वाटलें; कोण जात आहे हें पहाण्याकरितां उभा राहतों इतक्यांत रागानें कोणी पाय आपटीत दारांतून जात आहे असा आवाज कानांवर पडला. न्याहाळून पहातां जाणाराची पाठ व तीवर ज्वालेनीं लिहिलेली 'फुकट घालविलेला तास' हीं अक्षरें दिसलीं. तेव्हां पश्चात्तापानें अधोमुख होऊन मी आंसवें ढाळूं लागलों. त्या क्षणीं कोणी गोड स्वरानें मला म्हटलें 'हा मी नवा तास.' त्याच्यापाशीं त्याच्या दोन बहिणी आशा आणि कविता ह्या होत्या. आशा म्हणाली, 'अरे, व्यर्थ कां रडतोस ?' 'नवीन कांहीतरी गा' अशी कवितेनें आज्ञा केली.

येथें निर्जीव अर्थावर सजीवत्वाचा चांगला अध्यारोप केला आहे. आंग्ल कवितेचें भाषांतर असावें. कविता उत्तम आहे.

(१०) **सामान्य वर्ग**–'**दिवाळी**' (९७). वर्षाऋतुनंतर शरदऋतु प्राप्त झाला आहे. दिवाळी ही त्याची राणी. तिच्या सन्मानार्थ लोकांनीं आपलीं घरें सुशोभित केलीं आहेत. बाजारविक्री जोरांत चालली आहे. माहेरवाशिणी घरीं आल्या आहेत. जांवईबोवाहि सासुरवाडीस दिवाळसणाकरितां आले आहेत. लहानथोर सोंगटचा वगैरे खेळताहेत. फराळाच्या खमंग वासानें तोंडाला पाणी सुटलें आहे. अभ्यंगस्नानें, फटाकडे ह्यांची गर्दी. भाऊ बहिणींना ओवाळणी घालताहेत.

दिवाळीचें वर्णन नर्मयुक्त बहारीचें झालें आहे. कविता उत्तम आहे.

'**जास्वंद आणि पारिजात.**' (२०). ही विस्तृत अन्योक्ति आहे. आंग्ल कवितेचें भाषांतर असावें. कविता साधारण आहे.

'**दिवा व तारा**' (६४). वरच्याप्रमाणें. कविता फार चांगली आहे.

'**स्फुट**' (५७). यांत चंपकपुष्प, भुंगा, हंस व भुंगा, गुलाब, ह्यांच्यावर अन्योक्ति असून शृंगाराचे चुटकेहि आहेत. बहुतेक संस्कृताचीं भाषांतरें. कविता फार चांगली आहे.

'**कांहीं स्वकृत वचनें**' (११४). उद्योग, निर्धार, यत्न, दैव, कर्तव्य, स्वकीयांना सहाय्य, खरा अर्थ, लोभ, फोल बोल; ह्यावर दोन दोन ओळींचे चुटके. मनांत बिंबणारे, पण फारशी कविता नाहीं.

'**स्फुट विचार**' (११७). प्रत्येकाची विश्वाची कल्पना, सृष्टिकेंद्र कोठें, दानकला, निराशा, जगांतील शहाणपण. हेहि चुटकेच. टीका तीच.

'**मजुरावर उपासमारीची पाळी**' (२५). धारेवर देव पोचला, काम करावयाला तयार पण एक पैसाहि मिळत नाहीं. बायकापोरें वाट पहात आहेत. त्यांना तोंड कसें दाखवूं व खाण्यास काय देऊं ? ही कविता करुणरसपूर्ण आहे. साधी पण फार चांगली.

'**गद्धा**' (५२). ही कविता स्फुटांमध्येंच येईल. मूर्खांचा इतका सुळसुळाट कीं कवि स्वतःलासुद्धां मूर्खांमध्ये गणतो. काय हा तिरस्कार व थट्टा ! कविता चांगली आहे.

'**खाणावळींतलें तूप**' (७२), '**गद्धा**' (५२), '**दिवाळी**' (९७), '**नाहीं ज्यापरि**' (१२), व '**पुष्पमाला**' (५०) यांतील कांहीं उपमांमधील थट्टा चांगली आहे. हास्यरसाला कवि पारखा नव्हता; पण शृंगारादि अन्य रसांनी त्याचें मन वेधून गेलें होतें.

आतांपर्यंत प्रत्येक कवितेचा सारांश देऊन तिचा दर्जा ठरविण्याचा प्रयत्न केला. यापुढें केशवसुताच्या कृतीसंबंधानें सामान्य विचार मांडावयाचे आहेत.

कांहीं अपवाद खेरीजकरून केशवसुतांची कविता रसप्रधान किंवा भावनाप्रधान काव्यांत येते. आंग्लवाङ्मयांत कथानकें (Narrative), नाटकें (Plays) व रसकविता (Lyrics) असे काव्याचे तीन वर्ग करितात. पहिल्या वर्गांत संविधानक किंवा कृति (action) मुख्य असतें; रस किंवा भाव हा गौण असतो. तिसऱ्या वर्गांत रसाशिवाय कांहीं नसतें. ज्या ज्या वृत्ति अंतःकरणांत उचंबळतील, जे जे विचार येतील, ते त्यांच्यामध्ये कितीहि विरोध असला तरी भावकवि प्रकट करतो. मागचापुढचा त्याला विचार नसतो. शृंगारप्रकरणांत सुमारें ३९ कविता येतात; त्यांत संभोग व विप्रलंभ यांचे सर्व प्रकार आहेत; ते बहुतेक सर्व परकीय पद्धतीवर आहेत; हें नवयुगाचें एक चिन्ह आहे. संस्कृत शृंगारांत अश्लीलपणा, अनीति बरीच असते ती परकीय पद्धतींत दिसत नाहीं. अतिशयोक्ति आहे, पण तिचा संस्कृताप्रमाणें अतिरेक झाला नाहीं. विरहावस्थेचे निरनिराळे प्रकार भिन्न-भिन्न रीतीनें मांडले आहेत. ते सर्व मनोहर झाले आहेत. व्यवहारांत विरह इतक्या उत्कट दशेस

गेला तर हास्यास्पद होईल. रमणीय अर्थ प्रतिपादणें हें कवीचें काम; तें कवीनें उत्तम प्रकारें बजावलें आहे. संभोगासंबंधानेंहि हेंच म्हणतां येईल. रसप्रधान कवितेला शृंगाराइतका उत्तम रस कोणचा मिळेल? शेक्सपिअरनें चतुर्दशिन्या (Sonnets) व गीतें (Songs) यांच्याद्वारें विप्रलंभ शें-सव्वाशें प्रकारांनीं वर्णिला आहे. हा स्वानुभव नसून इतर कवींवर सरशी करण्याचा प्रयत्न होता व तो इतका उत्तम बेमालूम साधला कीं लोकांनीं फसून जाऊन शेक्सपिअरच्या प्रेमाविषयीं विविध गोष्टी रचल्या आहेत. कवि जर शृंगाराला टाळील तर तो खरा रसिक नव्हे.

'**कवि व कविता**' या प्रकरणांत १७ कविता येतात. टेनिसन् वगैरेनीं आपल्या धंद्याची फार प्रशंसा केली आहे. कवीला दिव्यदृष्टि, आंतरज्ञान असतें, ही एक कवींची समजूत होऊन गेली आहे. केशवसुतांनी आपल्या धंद्याला लागणाऱ्या श्रमाचें व त्या धंद्याच्या महतीचें वर्णन फारच उत्तम केलें आहे. ही महति संस्कृत कवींनीं इतक्या निरनिराळ्या प्रकारांनीं गाइली नाहीं. हें प्रकरण प्रेयोरसांत येईल.

'**तत्त्वज्ञानांत**' १९ कविता येतात. यांत शांतरसानें भिन्न भिन्न रूपें घेतलीं आहेत; पाश्चात्य व पौरस्त्य रहस्यज्ञान व कोठें कोठें त्यांचें मिश्रण उत्तम रीतीनें मांडलें आहे. मम्मटादि आलंकारिक शांतरस मानीत नाहींत. पण अशा कविता आंग्ल वाङ्मयांत रसकाव्यांत (Lyrics) घालतात.

'**सृष्टिवर्णन**' यांत १६ कविता येतात. सृष्टि ही एक व्यक्ति मानून तिच्यांत बुद्धि (Intelligence), प्रेम (Love) वगैरे आहेत, ही परकीय कल्पना; तिचा केशवसुतांनी अवलंब केला आहे. हें प्रकरणहि प्रेयोरसांत येईल. या कविता वाचतांना वर्डस्वर्थ, शेली वगैरे आंग्ल कवींची आठवण होते व केशवसुतांनीं त्यांची बरोबरी केली आहे, असे आनंदाचे उद्‌गार तोंडातून निघतात.

'**जन्मभूमि**' यांत ५ कविता येतात. यांतील 'एक खेडें' व 'नैर्ऋत्येकडील वारा' यांत केलेलें सृष्टिवर्णन योग्य आहे. जन्मभूमि, मातापितरें व इतर संबंधी यांच्याविषयींचा आदर या कवितेंत चांगला दिसून येतो. यांचीहि प्रेयोरसांत गणना होईल.

'**स्वदेशप्रेम**' यांत ४ कविता येतात. भेकड देशसेवा, व निशाण यांचीं वर्णनें चांगलीं झालीं असून, प्रशंसा, निर्भर्त्सना, उपहास, कळकळ हे गुण उत्तम वठले आहेत. कोठें वीररस व करुणरस यांचें मिश्रण; कोठें या दोहोंना उपहास, निर्भर्त्सना यांची म्हणजे हास्यरसाची जोड; सर्वत्र देशोन्नतीविषयीं कळकळ– ही प्रेयोरसांत येईल. या सर्व कवितांत वीररसाला इतर रस पोषक झाले आहेत.

'**सुधारणा**' या प्रकरणांत ८ कविता येतात. या सर्वांत देशाविषयींची कळकळ स्पष्ट दिसून येते. कळकळीमुळेंच जातिनिर्बंध, घातक चाली, लांगूलचालन, आपलपोटेपणा, जुन्याचा खोटा अभिमान वगैरेंवर जोरानें हल्ला केला आहे. 'नवा शिपाई'

या कवितेंत याच्याहि पुढें मजल गेली आहे. मनुष्यावर प्रेम, निर्विशेष बंधुभाव हा या कवितेचा विषय आहे.

'**गद्धा**', '**खाणावळींतलें तूप**', व '**कांहीं स्फुटें**' हीं हास्यरसांत मोडतात. भाषांतरांतल्या कांही कविता शृंगारांत, एक करुणरसांत व कांहीं प्रेयोरसांत येतात.

'**उपाशी मजुर**' यांत करुणरस आहे. बाकीच्यांत रस प्रधान किंवा स्पष्ट नाहीं.

वर केलेल्या रसविभागावरून कवि नवयुगांतला, अर्वाचीन, अगदीं अलीकडचा आहे, पाश्चात्य विद्येचा त्याच्यावर दृढ संस्कार झाला आहे, पूर्वकालीन विद्वत्तेपेक्षा त्याचा ओढा आधुनिक विद्वत्तेकडे आहे, सर्वांगीण सुधारणा त्याला अवश्य व प्रिय वाटते, हें स्पष्ट आहे. पालग्रेव्हचा सुवर्णनिधि (Golden Treasury) याचा कवीनें उत्तम अभ्यास केला असावा, कारण त्यांतल्या बऱ्याच कवितांचें प्रस्तुत संग्रहांत भाषांतर आढळतें. वर्डस्वर्थ, शेली, कीटस् वगैरेंचे विचार बऱ्याच ठिकाणीं आढळतात, ते त्या सुवर्णनिधीमधूनच घेतले असावेत. परकीय वृत्तेंहि कवीला त्याच संग्रहावरून सुचलीं असावींत. चतुर्दशिनी (Sonnet) वगैरे वृत्तें मराठींत आणण्याचे प्रयत्न केशवसुतांच्या हातूनच प्रथम यशस्वी झाले असें मला वाटतें. शेक्सपिअरच्या चतुर्दशिन्यांचीं भाषांतरें त्याच वृत्तांत करण्याला केशवसुतच लायक होते. युरोपांत त्या वृत्तांत ज्या उत्तम कविता आहेत त्यांचीं त्याच वृत्तांत भाषांतरें या कवीनें केलीं नाहींत हें आमचें दुर्दैव ! Ode चीं उत्तम उदाहरणें म्हणजे 'तुतारी' (७३), 'फुलांतले गुण (७४), 'झपूर्झा' (७५), 'प्रीति' (१२४), 'माझा अंत' (४२), 'वातचक्र' (९४), 'कोणीकडून कोणीकडे' (९६), 'घुबड' (१००). या संग्रहांतील बरींच पदें Ode या वृत्तांत मोडतील, जसें २९, ५६, ६२, १०५, ७६, ७९, ८६, ८७, ९१, ९५, ११८. 'माझा अंत' (४२) यांतील व 'घुबड' (१००), 'वातचक्र' (९४) यातील वृत्तवैचित्र्य Ode च्या धर्तीवर आहे.

विषय, विषयप्रतिपादन, विचारसरणी व वृत्तें यावरून कवीच्या मनावर नवयुगाचा अम्मल जारीनें बसला होता ही आनंदाचीच गोष्ट होय. कारण त्यामुळें मराठी वाङ्मयाला अत्युत्कृष्ट कवितांचा लाभ मिळाला आहे. **संभोग-शृंगारांतील** 'प्रीति' (१२४), 'समृद्धि, आणि प्रीति' (३०), 'प्रीतीची भाषा' (११९), 'फारा दिवसांनी भेट' (८६), 'प्रियेला सादर केलेली पुष्पमाला' (५०), 'माझा अंत' (४२); **विप्रलंभांतील** 'स्वप्न' (४४), 'चिरवियुक्ताचा उद्‌गार' (६६ व १०३), 'घुबड' (१००), '–प्रत' (३३), 'फिर्याद' (११०), 'वियोगामुळें' (१११), 'स्मरण व उत्कंठा' (१०४), 'अहा पक्षी' (२१); **कवी-प्रकरणांतील** बहुतेक सर्व कविता– त्यांतल्या त्यांत 'दिव्यदृष्टि' (४५), 'दिव्य भास' (७०), 'स्फूर्ति' (७९), 'प्रतिभा' (११६), 'शब्दांनो (६३), 'कवि' (५५), 'धूमकेतू आणि महाकवि' (७८), 'आम्ही कोण' (९९),

'चिन्हीकरण' (१०८); **तत्त्वज्ञानांतील** 'झपूर्झा' (७५), 'पद्यपंक्ति' (८८), 'सतारीचे बोल' (९५), 'कोणीकडून कोणीकडे' (९६), 'हरपलें श्रेय' (१२५); **सृष्टिप्रकरणांतील** 'वातचक्र' (९४), 'पर्जन्याप्रत' (६८), 'सृष्टि आणि कवि' (१२३), 'विकसन' (२७); **आत्मवृत्तांतील** 'नैर्ऋत्येकडील वारा' (९३), 'गोष्टी घराकडिल मी' (१६); **देशभक्तींतील** 'दोन बाजी' (१०६), 'जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर' (५), 'स्वदेशाला वाहून घेणारा मित्र' (१४); **सुधारणा प्रकरणांत** 'तुतारी' (७३), 'नवा शिपाई' (८५), 'गोफण' (१२०); ह्या सुमारें चाळीस बेचाळीस कविता जगांतील कोणच्याहि रसकाव्याची बरोबरी करतील. चाळीस कविता म्हणजे किरकोळ बाब नाहीं. प्रस्तुत संग्रह हा एक सुवर्ण-निधीच (Golden Treasury) होय. ह्यानें महाराष्ट्र वाङ्मय मातबर झालें आहे. अशा कवितांची पैशानें किंमत होत नसते. त्यांची खरी किंमत म्हणजे मराठीच्या अभिमान्यांनीं त्यांचें परिशीलन करणें. कॉलेजांतून ह्या संग्रहाचा आंग्ल संग्रहाबरोबर अभ्यास करविल्यास विद्यार्थ्यांची काव्याभिरुचि खात्रीनें वाढेल व आंग्ल कवितांचें खरें मर्म कळेल. मराठींत बहुमोल वाङ्मय काय आहे असें कोणीं प्रतिपक्षानें विचारल्यास ह्या संग्रहाकडे अभिमानानें बोट दाखवितां येईल. हा बहुमोल संग्रह एका माणसाची कृति आहे, हें पाहून विस्मय व आदर वाटलाच पाहिजे. यांतील विषय विविध आहेत व प्रत्येक विषयांतील कांहीं निवडक कविता वाचून 'वहावा वहावा' असे उद्‌गार निघतात व विस्मय व आदर वृद्धिंगत होतात. पुराणाभिमान्यांनीं हा संग्रह अवश्य वाचावा व अर्वाचीन काव्यवाङ्मय जुन्या वाङ्मयाहून कोणच्या बाबतींत कमी आहे तें सांगावें. नवा कमी नसून जुन्यावर त्यानें ताण केली आहे असें माझें स्वतःचें मत आहे.

हा संग्रह निर्दोष आहे असें आमचें म्हणणें नाहीं. दोष दाखविणें हें टीकाकाराचें कर्तव्य आहे. काव्य असें असावें, तसें नसावें, असें म्हणणारांची केशवसुतांनी निर्भर्त्सना केली आहे. आपण उत्तम कवि आहोंत, आपल्या मुखांतून सरस्वति वाहत आहे. अशी केशवसुतांना जाणीव होती व तदनुरूप त्यांची कृति आहे हें कबूल केलेंच पाहिजे. पण तेवढ्यावरुन आपली कृति निर्दोष आहे, असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. शेक्सपिअरसंबंधानें बेन जॉन्सनला कोणी म्हणाला, कीं शेक्सपिअरनें एक ओळसुद्धां खोड केली नाहीं. तेव्हां त्यानें उत्तर दिलें, त्यानें हजारों ओळी खोडावयाला पाहिजे होत्या. केशवसुतांनींहि खालील दोष अवश्य काढावयास पाहिजे होते :

(१) कवितेंतला प्रत्येक शब्द सार्थ, सहेतुक असला पाहिजे हा नियम केशवसुतांनी शेकडों वेळां मोडला आहे. तो, ती, तें, हा, ही, हें, त्या वगैरे सर्वनामें अक्षरपूर्तीकरितांच सव्वाशेंहून अधिक वेळां घातलीं आहेत; तसेंच आहा, गे, रे, चांगला, साचा, बरवा, सहसा, बरें, फार, भला हे शब्द. 'बरें' हा शब्द बोलण्यांत वापरतात : जसें, कळलें बरें, जा बरें; व तो वापरण्याला प्रेम

किंवा मैत्री किंवा बरोबरीचें नातें लागतें. राजा व हेर यांच्यामध्यें असला कोणत्याहि प्रकारचा संबंध नसतो. 'यासाठींच तुला अपाय करण्या आहे, टपूनी बरें' (कविता १५ श्लो. २५, १ ओ.) असें धर्मराजाला गुप्त हेर सांगतो. 'बरें' हा शब्द येथें अवश्य गाळला पाहिजे. 'छबी तुझे काळचा-कुरळ अलकी येईल बरी' (५०-१०-२). येथें 'छबी' या शब्दानेंच उत्तम अर्थ येतो; त्याला 'बरी' हें विशेषण घातक. 'फार' या शब्दानें एकीकडे फार घाण केली आहे. 'वैर तयांला, पूर्वीच्या आर्यांचा बडिवार गाऊनी जें निज षंढत्वा मात्र दाविती फार' (१२०–५) येथें आपला दुर्बलपणा मात्र दाखवितात, एवढा अर्थ पुरा आहे. आपलें फार षंढत्व मात्र दाखवितात, किंवा, आपलें षंढत्व मात्र फार दाखवितात, यावरून थोडकें दाखविल्यास हरकत नाहीं असा ध्वनि निघतो. 'भला' शब्द निरनिराळ्या रूपांनीं बारा तेरा वेळां आला आहे; पण एकदांच काय तो योग्य स्थळीं वापरला गेला आहे (१००–३–५). तो, ती वगैरे सर्वनामांनीं प्रसिद्ध किंवा विवक्षित पदार्थ दाखवावयाचा असतो; पण पुष्कळ ठिकाणीं शब्दांपुढें जोडलेले 'ही' व 'च', व मागें जोडलेला 'सु' यांचें बऱ्याच ठिकाणीं कांहींच प्रयोजन नाहीं. 'मुळीं' हा शब्द १८–२–३; ५९–२–२; ६३–२–४; ७६–१–४; या ठिकाणीं फुकट घातला आहे. 'सुखें', 'किती पहा', हेहि असेच शब्द. व्यर्थ शब्दांचीं पाऊणशांहून अधिक स्थलें आणखी दाखवितां येतील. कधीं कधीं एखादी ओळ फुकट घातलीशी वाटते. 'तरी खासें झालें कितिक मजला सांग असते' (८–१–३) ही बोलण्यांतल्या भाषेला शोभणारी ओळ केवळ श्लोक भरपाई करण्याकरितां घातली आहे.

जसें श्लोक पूरणाकरितां तसें यमकांकरितांहि हा– पहा (१८–१२–१ व ३) अहा रे (२०–१–४), गे (५०–१–२), पहा (५३–३–३) हे शब्द घातले आहेत. पण त्यानें अर्थाला कोणच्याहि प्रकारची पुष्टि आली नाहीं. हा दोष कवीला सहज काढतां आला असता.

(२) कांहीं शब्द गद्य ग्रंथांत व बोलण्यांतच शोभतात. साधारण लोकांच्या जीवितयात्रेंतहि काव्ययोग्य विषय आढळतात; ते विषय त्यांच्या शब्दांनींच वर्णिले पाहिजेत, असा वर्डस्वर्थचा आरंभीं आरंभीं आग्रह होता व त्या उद्देशानें त्यानें आपल्या पहिल्या कविता रचल्या; पण कोलरिजनें दाखविल्याप्रमाणें त्यांतील भाषा साधारण लोकांच्या भाषेसारखी नसून वर्डस्वर्थला निवडक शब्द वापरावे लागले. कवितेला नेहमींची भाषा चालत नाहीं; मन व्यग्र करण्याला व्यावहारिक शब्दांहून निराळे शब्द वापरले पाहिजेत. या दोषाची बरींच उदाहरणें पहिल्या दोषांत आलीं आहेत. 'खासें झालें असतें' (८–१–४), 'बहुधा' (९७–४–४), 'जरा' (७०–१–१), 'तेथूनि', 'एथून तेथून' (७३–६–१), 'तर तें बरेंच होईल' (११२–१३–२), 'किंबहुना' (३–४–२), 'काय समजूनी समजलें तुम्हांला कां' (९–५–२), 'होतों विद्याभ्यासहि करीत होतों' (१४–५–२), 'सदा आपलें सख्य करतों'

(१४–५–२), 'तुझें बघुनि' (२९–३–३), 'आधीं हें चुकलों परंतु तुजला सांगावया सांगणें' (३०–३–२), 'धक्का-बुक्की' (३८–२–३), कविता ६२ मधील बऱ्याचशा ओळी, 'शहाणपण गुंडाळून ठेवणें' (९१–१–३) ही व्यावहारिक भाषा काव्यांत शोभत नाहीं.

(३) व्यावहारिक भाषेहून काव्यभाषा निराळी पाहिजे असें जरी आहे, तरी भाषेंत रुढ नाहींत असे शब्द वापरूं नयेत. परिसंतोषक = परितोषक (१५–१४–३), कृतकज्ञता = कृतज्ञता (१५–१४–४), फलक = फलदायक (१६–३–३), हस्तक = हस्त (५१–१–३), नाचनीं = नाचण्यांत (१६–६–३), लागली = लागलीच (२९–३–३), उद्धर = उंच नेणारा (४९–१–३), रुढिका = रुढि (६५–४–२), यांपैकी बहुतेक शब्द दुसऱ्या कोठेंहि वापरले नसतील. हस्तक = हस्त हा शब्द एखाद्या कवीनें वापरला असेल. पण तेवढ्यावरून तो चांगला ठरत नाहीं. कृतक = बनावट; कृतकज्ञता हा शब्द अगदीं त्याज्य होय.

वात = वार्ता (१५–६–४), खंदक = खड्डा (७३–१३–१), सुषुप्ति (९३–१९–४), विश्राम = विश्रांति (९७–७–२), क्लृप्ति = कल्पना (३९–६–३), कितिक = किती (८–१–३), नियुक्त = युक्त (३९–६–१), नादी = नाद करणारा (?) (४१–५–३) हे शब्द अपरिचितार्थीं घातले आहेत.

उद्यमबंधु (२९–२–५) हा वर्तमानपत्री शब्द होय. कौरुप्य (५७–१–५) हा शब्द कानाला फार वाईट लागतो. संस्कृतांतून शब्द घेणें अवश्य असतें; पण पाहिजे तो शब्द घेणें बरोबर नाहीं. कित्येक वेळां अशा शब्दांचा अर्थ कळत नाहीं. विधीरथगण = हंस (५७–१०–२), मधुहरणव्रत = मधुर वस्तु नाहींशा करणें हें ज्याचें व्रत (८–३–१), अले = भृंगा (४०–१०–१), शब्दावशेष = केवळ बोलण्यांत रहाणें, मनांत नसणें (३०–४–४), आस्वर्गांत = स्वर्गावर (९३–३–३), सव्याज = लबाडीचे (५१–३–४), या शब्दांनी कोणती अर्थपुष्टि झाली आहे तें समजत नाहीं. असाधारण (८२–२–३) व गंधवती = पृथ्वी (४६–१–४), यावरून कवीनें कॉलेजांत नुकताच तर्कसंग्रह वाचला होता असें दिसतें. 'गुंजाराव' (८५–२–१) हा कोणचा तरी गुंजारराव, हंबीरराव वगैरे रावांचा बंधु दिसतो. 'तो आकाश' (१०२–३), 'हा आकाश' (१०३–७) हा पुल्लिगी प्रयोग मराठीला अपरिचित आहे.

सख्यत्व = सख्य (२३–२–२), सायुज्यत्व = सायुज्य (११६–४) हीं चुकींचीं भाववाचक नामें होत.

लोटिलें तुच्छतेला = तुच्छ केलें (६३–२–४), क्षीणत्वाला जाणें होतें सगळ्यांचे = सर्व क्षीण होतात (८६–२–६), शोकपात्रते पोचणें = शोकपात्र होणें (४०–४–४), गुप्तसा पावतों = गुप्त होतो (४८–२–४), नेत्र धरोनीया

उचलूनी = नेत्र वर करून (४८–३–३), स्वर्गसमक्षता प्रगटतें = स्वर्ग समक्ष दिसतो (११५–१०–४), असे प्रयोग गद्यांत किंवा पद्यांत कोठेहि शोभणार नाहींत.

(४) संस्कृताध्ययनाप्रमाणें आंग्लाध्ययनापासून जरी महाराष्ट्र वाङ्मयाला अतिशय फायदा झाला आहे, तरी आंग्लभाषेचा मराठींत शिरकाव होऊं देतां कामा नये. 'सृष्टि' (Nature) हा शब्द कदाचित् अपरिहार्य असेल; पण 'मच्चिताचे क्षितीज' = The horizon of my mind (६१–१२–१), 'आहे रुंद दरी = There is a great gulf (६१–१०–३) 'उदास नैसर्गिक भव्यता' = The melancholy grandeur of Nature (१३–७–१), 'फार विरळे' = Oh rare one (१८–२–१), 'रणीं जीवित्वनांवाचिया' = In the struggle for existence (३७–१–२), 'प्रीतिचा उद्वेग = Ecstacy of love (५०–१२–३) असे प्रयोग टाळतां येण्याजोगे आहेत.

(५) व्याकरणशुद्ध भाषा वापरणें हें कवीनेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे. जरी = जर, तरी = तर, (१८–९–१ व २, ३९–२–१) हा अशुद्ध प्रयोग होय. दुरान्वय, आवश्यक शब्दांचा अभाव, यांचीहि उदाहरणें या संग्रहांत कोठेंकोठें सांपडतात.

(६) प्राकृत, संस्कृत व परकीय वृत्तें रचण्यांत कवीचा हातखंडा आहे. परकीय वृत्तें मराठींत आणतांना त्यांतील न्यूनाक्षरपादाचें अनुकरण केल्यास ओळी कानाला कटु न लागतां यमक साधण्याकरितां दोन-दोन, तीन–तीन ओळींच्या शेवटीं रे किंवा तूं (१६–२–३ व ४, ७३–१७–४३–७–१ व २) घालण्याची जरुरी पडणार नाहीं.

'निघणें गडे' (४–१–१ व २), 'विनंति-सुवृत्ति' (७–२–३ व ४), 'शिग-फुंक' (१३–१२–१ व २) 'माचा-माझा' (१६–६–१ व २), 'आंसवें-आंधळें' (२२–४–३ व ४), 'का-गा' (३६–२–१ व २), 'सख्या-म्हणुनीया' (५७–९–३ व ४), 'गे-रे' (९३–१२–१ व २), 'वागुनीयां-व्या' (९८–४–२) हे यमक जाणूनबुजून घातले आहेत किंवा चुकीनें आले आहेत हें सांगतां येत नाहींत. कानाला वाईट लागतात एवढे मात्र खरें.

(७) 'वंदितो' (२–२–२), 'किंबहुना' (३–४–२), 'स्कंधीं' (४–६–४), 'सुंदर' (७–४–४), 'निंदा' (७–५–४), 'संप्रति' (१०–५–४), 'मंदिरें' (१३–२–१), 'संपत्ति' (१३–१८–१), 'संपूर्ण' (१५–१२–१), 'गुंफिन' (१७–१४–२), असा अनुस्वाराचा परसवर्ण आंग्ल शाळा व कॉलेजें ह्यांतून पार पडलेल्या संस्कृत शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या लिहिण्यांत फार आढळतो. पहिल्यांदा आडनांव घालून मग स्वतःचें व बापाचें नांव लिहिणें ही जशी

शाळा-कॉलेजांत पैदा केलेली संवय, तशीच ही परसवर्णाची आहे. दोन्ही त्याज्य. मराठींत परसवर्ण नको आहे असें माझें ठाम मत आहे.

(८) विरामचिन्हें कोठें कोठें भलतीं पडलीं आहेत, कोठें नाहींत. कोठें शब्द जोडले पाहिजेत : जसें 'यक्षिणी कुंज' (९८–४–१), कोठें तोडले पाहिजेत : जसें 'नामकरण' (३१–१–४), भाव शब्द०, (३१–३–१), 'पहा ते' (६८–१–५) हा दोष कवीचा कीं संपादकांचा हें सांगतां येत नाहीं.

(९) छपाईच्या चुका फार झाल्या आहेत; त्या परिशिष्टांत दुरुस्त करावयास पाहिजे होत्या. हा संपादकाचा दोष होय.

दोष दाखविणें हें टीकाकाराचें काम आहे. शिवाय टीकाकारांची कवीनें जी निभत्सना केली आहे तिलाहि समर्पक उत्तर आहे. कवि समर्थ होता; वाक् त्याला वश होती; थोड्याशा श्रमानें हे प्रमाद नाहींसे करतां आले असते. इतके दोष असूनहि केशवसुत हा पहिल्या प्रतीचा कवि आहे असें मी आनंदानें म्हणतों. कविप्रतिभेची महति केशवसुतानेंच गावी; योग्य शब्दांना त्यानेंच पाचारण करावें; विरहदशा त्यानेच वर्णावी. मराठी भाषा अस्तित्वांत राहील तोंपर्यंत स्फूर्ति स्फुरण आणील, हृदयांच्या तातांची बनविलेली गोफण भेकड, आत्मश्लाघा, पूर्वजश्लाघा, हांजी हांजी करणाऱ्या लोकांवर शब्दद्वषदांचा असाच भडिमार करील, तुतारीची किंकाळी सर्वत्र ऐकूं येऊन तात्कालिक तरी सुधारणेचा आवेश येईल, नवा शिपाई विश्वकुटुंबत्वाचा संचार करील, पण हरपलें श्रेय नेहमीं तिळतिळ अंतःकरण तोडील. या हरपलें श्रेयाच्या आठवणीनें आमच्या डोळ्यांत आंसवें उभीं रहातात; हा नरकवास केव्हां संपेल असें होतें. मानवी सुख-दुःखें केशवसुतांनीं प्रतिभेच्या जोरावर, शारदेच्या सहाय्यानें मार्मिक रीतीनें गाइलीं आहेत. त्यांच्या कृतीनें जसें आमचें समाधान होतें तसें इतरांचेहि होत असेल.

(मनोरंजन–१९२०
वर्ष २६; भाग १ ते ४; लेखांक १ ते ४.
पृ. सं. : ४४–५२, १४१–१४९, २००–२०८, २३३–२४०)

८

केशवसुतांची अभिनव काव्यरचना

लेखक : रामचंद्र कृष्ण लागू, एम्. ए.

केशवसुतांचें काव्य कोणाला आवडेल किंवा न आवडेल. कोणी त्यांत निर्मल नीतितत्त्वें गोंविलेलीं नाहींत म्हणून त्याला कमी प्रतीचें ठरवील. कोणी त्यांचें काव्य वाचून मनाला शांति-समाधान होत नाहीं, असें प्रतिपादील. तिसरा कोणी असा आक्षेप आणील कीं, हें काव्य किरकोळ, क्षुद्र, तुटक, संक्षिप्त आहे; काव्यपदवीस पोंचावयालाच असमर्थ आहे. कोणी वादविवादकोविद या काव्यासंबंधीं असा पूर्वपक्ष करील कीं, यांत तत्त्वज्ञान नाहीं, यांत ओज नाहीं. अतएव हें काव्य नादान, कुचकामाचें, सर्वथैव सहृदय जनांच्या अनादरासच पात्र होय. तरी पण हे सर्व आक्षेपक बहुधा एक गोष्ट विशेष अनमान न करितां कबूल करतील, आणि ती ही कीं, हें काव्य नवीन आहे. तें तुच्छ असेल, अधम असेल, निंद्य असेल, पण तें चिराभ्यस्त खास नव्हे. अपरिचित, अभिनव आहे याविषयीं वाद नाहीं; हें त्याचें नावीन्य कशांत आहे आणि तें चेतोहर आहे का उपहसनीय आहे हेंच प्रस्तुत निबंधांतील प्रतिपाद्य आहे.

केशवसुतांच्या जवळजवळ चाळीस वर्षांच्या आयुष्यक्रमांत त्यांनीं लहान लहान १३२ काव्यें रचिलीं. अशा प्रकारचीं लहान काव्यें आपल्या वाङ्मयांत सांपडत नाहींत असें नाहीं. संस्कृत साहित्याच्या परिभाषेंत बोलायचें म्हणजे या काव्यभेदाला खंडकाव्य असें म्हणतां येईल. "खंडकाव्यं भवेत्काव्यस्यैकदेशानुसारि च" अशी साहित्यदर्पणकार खंडकाव्याची व्याख्या करतात. 'मेघदूत' त्यांच्या मतें खंडकाव्याचें उदाहरण आहे;

कारण, यांत एकच विषय अनेक पद्यांत ग्रथन केलेला आहे. काव्याचीं सगळीं लक्षणें–भाषानियमादि–ज्यांत अंतर्भूत होत नाहींत तें खंडकाव्य. ऋग्वेदाच्या उषःकालवर्णनपर ऋचा हीं खंडकाव्येंच होत. वेदकालापासून आतांपर्यंत अशीं काव्यें रचण्याचा प्रयत्न कवी थोडाफार करीत आहेत. वेदकालानंतरच्या संस्कृत साहित्य–भांडारांत कालिदासाचें 'मेघदूत', 'ऋतुसंहार', जगन्नाथाचा 'करुणाविलास', 'अमृतलहरी', 'सुधालहरी' इत्यादि अनेक खंडकाव्याचे मधुर मासले आहेत. महाराष्ट्र-काव्यवाङ्मयांतहि मोरोपंतांचीं व तदितर कवींचीं ' संशयरत्नमाला ' व ' केकावली 'सारखीं सुंदर खंडकाव्याचीं उदाहरणें अनेक सांपडतील. तरी पण केशवसुतांची आधुनिक काव्यरचना आणि पूर्वोक्त खंडकाव्यें ह्यांत महदंतर आहे.

केशवसुतांचें खंडकाव्य म्हणजे कलमी आंब्यासारखें आहे. रायवळ आंबे आपल्याकडे पहिल्यापासून आहेतच. परंतु इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाल्यापासून मूळच्या आंब्याच्या झाडावर हें इंग्रजी कलम बांधलें आहे. केशवसुतांची कृति म्हणजे मराठी आणि इंग्रजी काव्यकल्पनांच्या साहचर्याचें, सम्मीलनाचें अभिनव रसभरित फळ होय. नुसतेंच इंग्रजी काव्य आपण वाचतों. त्याचें केवळ रूपांतर केलेलें आपण पहातों. ह्या दोन्ही तऱ्हांनीं आपलें थोडेंफार चित्तरंजन होतें. पण ज्यांत मराठी आणि इंग्रजी अशा उभयपद्धतींचा अभेद्य, आत्यंतिक संगम झालेला अशी ही केशवसुतांची कृति समधिक हृदयवेधक होय ह्यांत शंका नाहीं. मूळच्या मराठीचें सामर्थ्य, तिची चारुता, तिचा आपलेपणा, तिचें वैशिष्ट्य ह्या सर्व गोष्टी उपरिनिर्दिष्ट काव्यांत प्रतीत होतात. आणि त्याशिवाय इंग्रजी कवितेची ताकद, ओज, तिचें तेज, तिची मनोहारिता हींसुद्धां त्या अभिनव संयुक्त काव्यरचनेंत आपणांस अनुभवावयास सांपडतात. मात्र एक गोष्ट आपण विसरतां कामां नये. आणि ती ही कीं, ह्या नूतन काव्यकरणाचें–लक्षणांचें–स्वरूपाचें ऐतिहासिक दृष्ट्या संशोधन करीत असतां केशवसुतांची कृति म्हणजे इंग्रजी-मराठी काव्यरचनापद्धतींचा संगम होय असें म्हणणें तात्पुरतें उचित होईल. पण संगम हा शब्द ह्या स्थळीं कांटेतोल, सर्वस्वीं समर्पक, तंतोतंत अर्थाभिव्यंजक नव्हे. कारण संगम म्हटला म्हणजे तेथें दोन वस्तू दिसावयाच्या. पण केशवसुतांच्या काव्यांत इंग्रजी व मराठी काव्यगुणांचा इतका परिपूर्ण मेळ झाला आहे कीं, हा गुण मराठी, हा इंग्रजी, असें त्या गुणांचें पृथक् पृथक् स्वरूप त्या काव्यांत दृष्टिगोचर होणार नाहीं. तत्त्वतः हा संगम नव्हे, परिपाक आहे. दोन पदार्थांच्या संमिश्रणानें झालेला, तद्विलक्षण आपल्या स्वतःच्या स्वतंत्र वैयक्तिक गुणांनीं मंडित हा तिसरा पदार्थ आहे. हा सुतारानें सांधलेल्या दोन फळ्यांचा संगम नव्हे, किंवा तांबटाच्या हातोडीच्या सहाय्यानें जुळविलेले हे पत्रे नव्हेत. ही विश्वकर्म्याची निर्मिति आहे. मृत्तिका, उदक, बीज, रविप्रकाश इत्यादि करणोपकरण संपत्तीनें वृक्षवेलींचा उद्गम विकास–पुष्पफलसमृद्धि हीं संभवतात,

पण त्यांच्या अंतिम स्वरूपांत हा मृत्तिकेचा परिणाम, ही सूर्यकिरणाची प्रक्रिया, हा उदकाचा प्रवाह, असें मोठ्या चतुर निरीक्षकासहि विनिश्चितपणें सांगतां येणार नाहीं. तद्वतच येथली स्थिति. मनुष्यदेह पंचमहाभूतांच्या संमिश्रणाचें फल. तरी पण तो तयार झाल्यानंतर— हें येथें आकाशस्वरूप, ही तेजाची विकृति, असें मनुजतनूच्या निरनिराळ्या अवयवांसंबंधीं कोण सांगूं शकेल ? असो. थोडक्यांत बोलायचें म्हणजे हा जड वस्तूंचा इंद्रियग्राह्य ओबडधोबड स्थूलसंगम नव्हे. त्यांत संमिश्रित वस्तूंचा एकजीव होतो. तथापि मूलभूत वस्तूंच्या वैयक्तिक मनोजतेचा मात्र नाश होत नाहीं. उलटपक्षीं ती द्विगुणित होते. रायवळ आंबा मधुर खरा; पण त्याच्यावर कलम लावून मानवी प्रक्रियेनें निर्माण केलेला कलमी आंबा मधुरतर– जिभेला चट लावणारा हेंहि खास. वनपुष्प बहारीचें खरें, पण तें उपवनांत लावून मालाकारानें त्याची जोपासना केली म्हणजे त्याचा परिमल, त्याची विचित्रवर्णशोभा, त्याची कांति हीं सर्व समधिक चित्तंगम होतात. विमल रविकिरण अस्तसमयीं इतस्ततः पसरलेल्या अंबुदश्रेणींना प्रदीप्त तेजोवलयांनीं विभूषित करून रसिकजनचित्त विमोहून टाकतात. त्यांतच जर थोडी पर्जन्यवृष्टि झाली, तर पर्जन्यधारारूपी तिरस्करणींतून मार्गक्रमण करीत असतां रविकिरणांचें वक्रीभवन होतें, आणि नभोमंडलांत अर्धवर्तुलाकृति, विविधवर्णमंडित सुरचाप झळकूं लागतें. रविकिरणांच्या आणि पर्जन्यधारांच्या संगमाचें हें दृश्य फल होय. आणि केवळ रविकिरणांच्या आणि पर्जन्यधारांच्या वैयक्तिक शोभेपेक्षां त्यांच्या दिव्य संगमाचें सुरचाप हें फल आत्यंतिक विमोहक नाहीं असें कोण म्हणेल !

केशवसुतांच्या कृतींत पण अशाच प्रकारचा हृदयहारी, दिव्य, अमितसौभाग्यान्वित संगम आपणांस पहावयास सांपडतो. त्यांच्या महाराष्ट्रीय प्रतिभेला इंग्रजी काव्य परिशीलनाची जोड मिळाल्याकारणानें त्यांची काव्यरचना इंग्रजी खंडकाव्याच्या धर्तीवर झाली. इंग्रजी भाषेंतील खंडकाव्याच्या अंतरंग–बहिरंगांचे सर्व विशेष केशवसुतांच्या काव्यांत आढळून येतात. किंबहुना केशवसुतांचें काव्य म्हणजे इंग्रजी खंडकाव्याचा महाराष्ट्रीय अवतार होय, असें म्हणण्याससुद्धां कांहीं प्रत्यवाय नाहीं. तरी पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं, केशवसुतांची प्रतिभा पंगु होती, किंवा तिच्यांत कांहीं निसर्गसिद्ध उणीव होती. उलटपक्षीं प्रस्तुत लेखकाच्या मतें केशवसुतांच्या तोडीचे स्वतंत्र, स्वयंप्रकाश, जिवंत वाणीचे कवी महाराष्ट्रवाङ्मयाच्या इतिहासांत थोडेच सांपडतील. एका भाषेवर दुसऱ्या भाषेचा संस्कार झाला म्हणजे पहिली हीन दीन आणि दुसरी संपन्न समृद्ध असें कोणी ज्ञाता तरी म्हणणार नाहीं. निरनिराळ्या राष्ट्रांचा–भाषांचा परस्पर–संयोग झाला म्हणजे उभयभाषागुणान्वित अशी काव्यनिष्पत्ति होते. त्यामुळें एका भाषेचा कंगालपणा किंवा दुसऱ्या भाषेची श्रीमंती प्रस्थापित होत नाहीं. आणि असें जरी असलें तरी त्यांत किमपि वैगुण्य आहे असें

मला वाटत नाहीं. हा कालमहिमा आहे. आज एकादी भाषा समर्थ आणि बहुगुण-संपन्न जरी असली तरी तिनें हें आपलें वित्तवैपुल्य हळुंहळूं कालगतीनेंच संपादन केलेलें असतें. ग्रीक-लॅटिन-जर्मन-फ्रेंच-इटालियन इत्यादि युरोपीय भाषांचे परस्परांवर झालेले अंतर्भेदी परिणाम ज्यास विदित आहेत, तो तरी केवळ केशवसुतांचीं काव्यें इंग्रजी खंडकाव्यांच्या धर्तीवर लिहिलीं आहेत म्हणून तीं परपुष्ट आहेत किंवा तीं रचणाराची प्रतिभा दुर्बल आहे असें विधान करण्याचें धाडस करणार नाहीं. जेव्हां जेव्हां मानवेतिहासांत राष्ट्राराष्ट्रांचा संयोग झाला आहे– मग तो पराभूत–विजयी राष्ट्रांचा असो, किंवा दृढव्यापारविनियमामुळें जडलेला असो, किंवा लोकसंख्येच्या अतिरेकामुळें पृथ्वीवरील निर्जन प्रदेशांत वसाहती केल्यामुळें जडलेला असो– तेव्हां तेव्हां एका राष्ट्राचे गुण, त्याच्या भाषेचे विशेष दुसऱ्या राष्ट्रांत आणि त्याच्या विशिष्ट भाषेंत प्रतिबिंबित होतात. पण हा परस्परोपकार आहे. देवघेवीचा व्यवहार आहे. आज जें राष्ट्र ऋणी आहे तें उद्यां सावकार होतें. आजचा ऋणको उद्यां धनको बनतो. ह्यांत उच्चनीच कांहीं नाहीं. आणि वर म्हटल्याप्रमाणें तात्पुरता उच्चनीच भाव जरी असला तरी त्यांत खंती करण्यासारखें कांहीं नाहीं. आज जे शिष्य गुरूजवळ शिकतात ते उद्यां गुरुपदारूढ होतात. एतावता, राष्ट्रांचा–भाषांचा अशा प्रकारचा संयोग, विचार-विनिमय त्यांचें परस्परसंघर्षण वाङ्मयाच्या प्रगतीला आवश्यक आहे. परस्परविभिन्न भाषांच्या आघात-प्रत्याघातांनींच त्यांच्या सामर्थ्यांची, गुणांची, तेजस्वितेचीं वृद्धि होते. आकाशांत निबिड जलदसमुदाय जर एकमेकांवर आदळणार नाहींत तर विद्युल्लतेचा चक्षुश्चमत्कृतिजनक देखावा कसा दृग्गोचर होईल ? " There is nothing like healthy friction between mind and mind " ह्या वचनांतील रहस्य हेंच आहे. दीपज्योतीला हवेची आवश्यकता आहे, नाहींतर ती तडफडून मावळून जाईल. एकलकोंडेपणा– तुसडेपणा– म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. एकलकोंडेपणानें– तुसडेपणानें– गुणांचा अपकर्ष होतो. निरंतर एकाच कूपांत राहून, त्यांतच सर्व सुखैकसमृद्धि आहे असें मानणाऱ्या कूपमंडूकानें आपल्या सौभाग्याचा टेंभा मिरवावा. त्याच्या सौभाग्य-लक्ष्मीचा कोणी हेवा करणार नाहीं. आणि तसल्या प्रकारचें एकलकोंडेपणाचें स्वातंत्र्य-वैभव आपणांस प्राप्त व्हावें म्हणून कोणी सायास करणार नाहीं.

तात्पर्य काय कीं, केशवसुतांचें काव्य म्हणजे इंग्रजी खंडकाव्याचा महाराष्ट्रीय अवतार असें म्हटलें म्हणजे त्या काव्याच्या अंगभूत तेजस्वितेची, सामर्थ्याची, चारुतेची किमपि हानि होत नाहीं. इतकेंच नव्हे, पण दुसऱ्या भाषेंतील एक हृद्य रचनेचा प्रकार महाराष्ट्रभाषेंत त्यांनीं रूढ केला आणि ह्या अभिनव काव्यरचनेला अनुरूप अशा गुणसंपत्तीचा त्यांत परिपोष केला, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. प्रख्यात इंग्रजी कवि मिल्टन् ह्यांच्या (Paradise Lost) पॅरॅडाइझ् लॉस्ट नामक काव्याची रचना इलिअड् (Iliad), एनीड (Æneid) इत्यादि युरोपीय महाकाव्यांच्या

धर्तीवर केली आहे. ह्यामुळें पॅरॅडाइझ् लॉस्टची योग्यता कोणी कमी ठरवीत नाहीं. तसेंच ह्या अतुल बुद्धिमत्तेच्या कवीनें आपल्या सॅमसन ॲगोनिस्टस (Samson Agonistes) नामक नाटकांत ग्रीक नाटचरचना पद्धतीचा अवलंब केला आहे. तरी त्याच्या ह्या उसनवारीमुळें त्याच्या धवलयशाला काळिमा लागलेला नाहीं. मळचें गुलाबाचें फूल– जी असे सुमांची राज्ञी– आमचें नव्हे. पण तें आमच्या हिंदुस्थानांत ज्यानें आणून लाविलें, आणि एथल्या जमिनीला आणि हवेला योग्य अशी परिस्थिति निर्माण करून, त्याच्या वृद्धीला उपकारक अशीं सर्व द्रव्यें एकत्र करून, त्याला परिमलवैभव आणि वर्णलक्ष्मी प्राप्त करून दिली, त्याच्या कुशलतेची, कर्तबगारीची, सूज्ञपणाची, अक्कलहुषारीची– त्यानें काय केलें तर दुसऱ्याच्या घरांतून आणिलें व आपल्या दारीं लाविलें– अशीच संभावना करावयाची कीं काय ?

असो. जो हृद्य काव्यरचनाप्रभेद केशवसुतांनीं महाराष्ट्रांत रूढ केला, त्याला इंग्रजींत लिरिक पोएट्री (Lyric Poetry)–खंडकाव्य असें म्हणतात. ह्यापेक्षां त्याचें जास्त व्यापक असें नांव म्हणजे Subjective Poetry – अंतःसृष्टिपरकाव्य. ह्या काव्यप्रभेदाचाच आतांपर्यंत आपण खंडकाव्य असा नामनिर्देश केला. मराठींत त्याला कोणी 'वीणाकाव्य' म्हणून संबोधितात. कांहीं त्याचें 'भावगीत' असें नामकरण करितात. Lyric हें नांव तरी त्याच्या मूळच्या ग्रीक स्वरूपावरूनच इंग्रजींत रूढ झालें. जें काव्य सारंगीच्या सहाय्यानें म्हणण्याकरितां रचलें तें Lyric काव्य. ह्या काव्यभेदाचें अगदीं तंतोतंत, सर्वलक्षणव्यंजक अभिधान कोणतें हें ठरवायला त्याच्या गुणधर्माचें विवेचन केलें पाहिजे. तदनंतरच त्याच्या नामकरणाचा विचार करणें युक्त होईल. तोंपर्यंत आपण त्याला खंडकाव्यच म्हणूं.

खंडकाव्यांत कवि हा स्वतःच वर्ण्यविषय असतो. कवीच्या हृदयांत उचंबळणाऱ्या भावना ह्या खंडकाव्यांतील वर्ण्यवस्तू होत. खंडकाव्य अंतःसृष्टिविषयक असतें. हेंच त्याचें प्रधान लक्षण. जेव्हां कवीच्या हृदयगत, प्रबल, हर्षशोकादि मनोविकारांचें छंदोबद्ध शब्दरचनेंत रुपांतर होतें, तेव्हां खंडकाव्याची निष्पत्ति होते. खंडकाव्यांत कवीची दृष्टि अंतर्मुख असल्याकारणानें त्यांत बाह्यसृष्टींतील इतिहास, वृत्तांत, कथा, उपकथा फारशा ग्रथित केलेल्याआढळणार नाहींत. उलटपक्षीं त्यांत कवीच्या स्वप्नसृष्टींतील उद्दीपित वृत्तीचें, विचारांचें, अर्थाचें यथातथ्य प्रतिबिंब उमटलेलें सांपडेल. एका प्रसिद्ध ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें, खंडकाव्य म्हणजे कविगत मनोविकारांचा इतिहास होय. कवीच्या हृदयांत उसळत असलेल्या वृत्तीचें, त्याचीं गीतें हें शब्दमय दृश्य स्वरूप. जेव्हां कवीला त्याचा हर्ष-शोक अनावर होतो, तेव्हां तो 'पुरोत्पीडे तडागस्य परिवाहः प्रतिक्रिया' ह्या न्यायानें शब्दरूपी प्रणालिकेनें बाहेर पडतो. आपल्या अत्यानंदाचें किंवा अतिशयित शोकाचें जेव्हां कवि छंदोबद्ध वर्णन करितो तेव्हां त्याला आपल्या हृदयावरचें दडपण उचलल्यासारखें होतें. पायांत कांटा रुतल्या-

बरोबर जशी आपण किंकाळी फोडतों, किंवा हर्ष झाला म्हणजे आरोळी ठोकतों, तद्वतच ही खंडकाव्यविरचनाची गोष्ट. खंडकाव्याचें साहजिक रमणीयत्व ह्यांतच सांठवलेलें आहे. वासंतिक समयीं जिकडे तिकडे दृष्टीस पडणारी लतापल्लवांची समृद्धि, सुविमल नील नभोवितान, मंद मंद वाहणारा शीतल समीरण, सर्वतोविसारी पुष्पपरिमल इत्यादि गोष्टींनीं हृष्ट झालेला विहंगम सहजस्फूर्तीनें प्रमुक्तकंठ गातो; किंवा उदयाचलरूढ, तेजोमूर्ति, कल्याणनिधान सवित्याला पहातांच गिरिशिखरावरून उडया मारीतच, नाचत, निर्झर आपल्या मंजुगीतांनीं दशदिशा व्यापून टाकतो; ह्या विहंग–निर्झरगीतांप्रमाणेंच सहजस्फूर्तीनें झालेलीं खंडकाव्यें निसर्गरमणीय असतात. खंडकाव्यें रचणारा कवि मानाची अपेक्षा करीत नाहीं, धनाची अपेक्षा करीत नाही, त्याचें गाणें ऐकावयाला श्रोतृसमूह लागत नाहीं, त्याला कोणीं वाना यला नको, त्याची कोणीं निंदा केल्याचें त्याला भानच नसतें.

अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें खंडकाव्य म्हणजे तें वर वर्णन केल्याप्रमाणें निर्हेतुक, निरुपाधिक, केवलानंदमय अथवा केवलशोकमय असतें. खंडकाव्यकर्त्याची दृष्टि त्याच्या-हृदयसृष्टीकडे लागलेली असते. म्हणून ती कांहीं अंशीं परिमित किंवा आकुंचित असते. "My mind to me a kingdom is"– 'मन माझें मज राज्यसम असे। निखिल विश्व मज त्यांत दिसे' ह्या ओळींत खंडकाव्यकर्त्याची स्थिति चांगली वर्णन केली आहे. पण ह्या परिमित दृष्टीमुळेंच त्याच्या काव्याचा अकृत्रिमपणा सिद्ध होतो. त्याचें अव्याजमनोहरत्व आपणांस त्वरित प्रतीत होतें. एका सुप्रसिद्ध रसिकानें म्हटल्याप्रमाणें खंडकाव्यकर्ते हे कित्येक पंजरबद्ध विहंगाप्रमाणें अंध असतात आणि ते अंध असतात म्हणूनच त्यांचें गाणें सुतराम् चेतोहर असतें.

असो. येथवर आपण खंडकाव्याच्या एक दोन लक्षणांचा विचार केला. खंडकाव्यांत कवि आणि त्याच्या हृदयांत उचंबळणाऱ्या भावना हाच वर्ण्यविषय होय. खंडकाव्य करणारा कोणताहि स्तुतिकीर्तिधनादि हेतू मनांत धरून काव्य रचीत नाहीं. तो आपला आनंद-दुःख-संतापाचा तीव्रसंवेग हलका करण्याकरितां छंदोबद्ध रचना करतो. स्तुतिनिंदेकडे किंवा वाचकवर्गापुढें यत्किंचित लक्ष न देतां केलेली ही काव्यरचना सहजरमणीय, अव्याजमनोहर असते. ह्यांत जाणूनबुजून केलेलें कसब नाहीं. हें कलाकुसरीचें काम नव्हे. ह्यांत कसरत नाहीं. हा डोंबाऱ्याच्या दोरीवरचा नाच नव्हे. अमक्या गवयानें अशी तान मारली, मीहि तशीच घेऊन दाखवीन– असा स्पर्धेचा प्रकार ह्यांत नाहीं. हा पक्षांचा कलरव, हें निर्झराचें गीत, हें लहरीचें हंसणें आणि खिदळणें !

खंडकाव्याचें आणखी एक लक्षण म्हटलें म्हणजे त्यांत दिसून येणारें स्वातंत्र्य. खंडकाव्य रचणारा कवि स्वच्छंदी, लहरी असतो. त्याच्या आनंदाच्या भरतीला ओहोटी लागेपर्यंत तो गातो. त्याचा शोकावेग शांत होईपर्यंत तो विलाप करतो. शोकाच्या

भरांत तो ओरडतो, ओरडतो, वक्षस्ताडन करतो. आनंदाच्या आवेशांत तो नाचतो, टाळ्या वाजवितो. तो आपलें अंतरंग जगाला उघडें करून दाखवितो. त्याच्या आशा-निराशा, त्याचा त्वेष-द्वेष, त्याचे सुख-दुःख, त्याच्या सर्व प्रकारच्या मनःस्थितीचीं चित्रें त्याच्या काव्यांत सांपडतात. त्याचें काव्य म्हणजे त्यानें स्वतः लिहिलेलें त्याचें पद्यात्मक चरित्रच होय. धीमेपणा, मनाचा समतोलपणा, दृढसंयम ह्या गुणांचा सामान्यतः खंडकाव्यांत अभावच असतो. तें भावनाप्रचुर असल्याकारणानें बहुधा त्यांत मनाची उसळी सांपडते– संवेदनाची तीव्रता प्रत्ययास येते.

प्रेमक्रोधादि वृत्तींचा बेसुमार, अनिवार संक्षोभ हाच खंडकाव्याचा आत्मा. एका लहान काव्यांत कोणत्या तरी एका भावनेचा उदय, विकास व लय हीं वर्णिलेलीं असतात. खंडकाव्याच्या विशुद्ध स्वरूपांत अनेक वृत्तींची, मनोभावनांची भेसळ, व्यामिश्रिता दिसून येणार नाहीं. कवीच्या हृदयांतील कोणत्यातरी विशिष्टसमयीं जागृत झालेली भावना हाच खंडकाव्याचा प्रधान विषय. आणि त्याच्याच सभोंवार त्यांत ग्रथित केलेल्या इतर सहकारी विकारांची, विचारांची मांडणी केलेली असते अथवा ते सर्व त्याच्याभोंवतीं जुळून येतात हें म्हणणें जास्त प्रशस्त होईल. जसा एखादा राजा मध्यवर्ती सिंहासनावरूढ असतो, आणि त्याचे प्रधान, सचिव, सेनानी, अमीर-उमराव त्याच्या सभोंवार वर्तुलाकृति बसलेले असतात, तद्वतच खंडकाव्यांतील प्रमुख भावनेच्या आजूबाजूला इतर गुणीभूत– कमीअधिक प्रमाणानें– आवश्यक विषयांची रचना केलेली असते. त्यामुळें खंडकाव्याला एकरूपता प्राप्त होते. त्याची घटना, सुसंबद्ध, शिस्तवार बनते. आणि ही साधी, सुसंगत भावनेच्या उद्गमविकास-लयानुरूप आदिमध्यावसानात्मक, क्रमसूचक व्यवस्थिति– हें खंडकाव्याचें आणखी एक मुख्य लक्षण आहे.

खंडकाव्याचें तिसरें महत्त्वाचें लक्षण म्हटलें म्हणजे त्याचा आटपशीरपणा, त्याचें मर्यादित, छोटेखानी, संक्षिप्त स्वरूप. एका अमेरिकन कवीच्या मतें खरें काव्य म्हणजे खंडकाव्यच. त्यानें आपल्या विधानाची सत्यता सिद्ध करण्याकरितां एक सुंदर प्रमाण पुढें आणलें आहे. तो म्हणतो कीं, कवीची स्फूर्ति जोंपर्यंत टिकेल तोंपर्यंतच सरस काव्यनिष्पत्ति संभवेल. कवीची स्फूर्ति कांहीं तासचे तास– अगदीं अव्याहत आठवडाभर– सबंध महिना किंवा वर्षभर सारखी टिकत नाहीं. स्फूर्तीची जागृत–कार्यक्षम अवस्था कांहीं एक क्षण, मिनिटें, तास दोन तास टिकेल. आणि ह्या परिमित अवधींत होणारी काव्यरचना मर्यादित, संक्षिप्तच असणार. हें मत खरें मानलें– आणि तें पुष्कळ अंशीं खरें आहे यांत शंकाच नाहीं– म्हणजे सगळीं महाकाव्यें थोडींफार कृत्रिम ठरणार ह्यांत शंकाच नाहीं. महाकाव्यविरचनेला जसा प्रतिभेचा अखंड प्रवाह पाहिजे, तसा तो आपल्या सध्यांच्या मानवी मनोरचनेंत तरी शक्य नाहीं. मग महाकाव्यनिर्मिति होते तरी कशी ? अर्नाल्ड म्हणतो त्याप्रमाणें प्रतिभेच्या अभावीं

कधीं कधीं महाकवीची विद्वत्ता त्याला साहाय्य करीत असेल. तें कसेंहि असो. आपल्याला त्याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. एवढें मात्र खरें कीं, खंडकाव्याचें परिच्छिन्न स्वरूप हा त्याचा उणेपणा नव्हे. इतकेंच नव्हे तर त्याचा चिमुकला आकार त्याच्या जिवंत स्फूर्तीची साक्ष पटविणारें संशयच्छेदी प्रमाण होय. एखादा प्रबल मनोविकार, एखादा विचार, एखादी विशेष परिस्थिति हे खंडकाव्याचे विषय. आणि ह्या विषयानुरूपच त्याचा विस्तार अल्प असतो.

सरतेशेवटीं, खंडकाव्यांत माधुर्यप्रसादादि गुणाविशिष्ट समर्पक शब्दांची योजना केलेली असते– अथवा ती साहजिकपणें जमून येते. कांहीं शब्द रसप्रधान असतात, कांहीं व्यंग्यार्थमधुर असतात, कांहीं चित्ररूप असतात, तर कांहीं संगीतगुणयुक्त असतात. भिन्न भिन्न अवस्था, स्थितिविचार, कल्पना याचें वर्णन करीत असतां कवीला अर्थानुरूप शब्द आपोआपच सुचतात. "वाचमर्थोनुधावति" हाच नित्याचा क्रम. क्वचित्प्रसंगीं कवीला योग्य शब्द धुंडाळावे लागत असतील, आणि ते त्यानें धुंडाळले, तर त्यांत काय वावगें आहे? यानंतरची गोष्ट म्हटली म्हणजे हे रसभरित, विविधगुणविशिष्ट शब्द निरनिराळ्या भावनांना समुचित अशा तालबद्धरचनेंत इतक्या साहजिकपणें समाविष्ट केलेले असतात कीं, कविहृदय उचंबळूं लागलें म्हणजे या शब्दांना पण भरती येते, कविहृदय नाचूं लागलें म्हणजे तेहि नाचूं लागतात, कविहृदयांत त्वेष असेल तर त्यांना पण आवेश चढतो, कविहृदय तरल असेल तर ते सुद्धां तरल होतात. कविहृदय दुःखी, निराश, खिन्न असेल तर तेंदेखील दुःखी, निराश, खिन्न होतात. खंडकाव्यांतील वृत्तवैचित्र्य पण अशाच प्रकारचें भावगत वृद्धि-विपरिणाम-क्षय सूचक असतें. काव्यांतर्भूत मनोभावना जर त्वरितगति असेल तर काव्याचें वृत्त सुद्धां झपाझप् पावलें उचलू लागतें, आणि तीच मनोभावना जर मंथरगति असेल तर वृत्ताचें पाऊल देखील तत्क्षणींच मंदावतें. खंडकाव्यांत ठरीव, परिचित, नेहमींच्या परिपाठांतील वृत्तें पुष्कळ वेळां कविहृदयगत अर्थव्यक्ति करू शकत नाहीत. अशा वेळीं त्याची प्रज्वलित स्फूर्ति तत्तत्प्रसंगानुरूप नवीं नवीं वृत्तें निर्माण करते. शैल-शृंगावरून खालीं ताड्ताड् उडया मारीत जाणारी तटिनी ज्याप्रमाणें आपल्या दुर्वार्य जलौघानें आपलें पात्र खणून काढते, तशीच ही कवीची पराक्रमी प्रतिभा स्वतःच्या तेजानें भावनांना अनुरूप अशी वृत्तरचना करते. खंडकाव्याच्या स्वतंत्रतेचें, आत्मविश्वासाचें हें एक प्रत्यंतर आहे. प्राचीन, परंपराप्राप्त सांप्रदायिक वृत्तें म्हणजे वेदाच्या आज्ञा नव्हेत. कांहीं विशेष प्रसंगीं तीं भावनाभिव्यक्तीला उपकारक असतात, म्हणूनच प्रचारांत आहेत, रुढ आहेत. पण जर दुसरे असे कांहीं प्रसंग आले कीं, त्यांत परिचित वृत्तांची योजना केल्यानें अर्थव्यक्तीला अपाय होतो, तर परिचित वृत्तांचा त्याग करणेंच योग्य होय. अशा वेळीं परिचित वृत्तांचा अवलंब केल्यानें सौंदर्याची हानि होते आणि काव्यरचना करणाऱ्याचें दौर्बल्य, गुलामगिरी, आत्मविश्वासाची

उगीच हीं दृष्टोत्पत्तीस येतात. खंडकाव्यांत काव्यात्मा जो रस-भाव आणि काव्यदेह रसानुगुण शब्द– तालबद्धरचना–वृत्त हीं अनन्यरूप असतात. तीं सर्व एका क्षणींच कविमानसांत उदय पावतात. कवीला स्वतःलासुद्धां तीं कशीं जन्मास आलीं हें सांगतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें पुष्प आणि त्याचा परिमल, दीप आणि त्याची प्रभा, साखर आणि तिची गोडी, हे निरंतर संलग्न–एकजीव–एकरूप असतात तसेंच काव्य आणि त्याचें वृत्त हीं समरस, अभिन्न असतात. आदिकवि वाल्मीकीनीं क्रौंचमिथुनापैकीं एकाला व्याधानें तीर मारलेला पहातांच कारुण्यानें त्यांचें हृदय कळवळलें, आणि त्यांनीं व्याधाला शाप दिला. हा शाप म्हणजेच अनुष्टुभ् छंदाचा अवतार. त्यांचा तीव्र शोक शब्दरूपानें बाहेर पडला, तो त्यांना नकळत, साहजिकपणेंच अनुष्टुभ् वृत्तांतच रचला होता. ध्वन्यालोककारांनीं म्हटल्याप्रमाणें–

काव्यस्यात्मा स एवार्थस्तथा चादिकवेः पुरा ।
क्रौञ्चद्वंद्ववियोगात्थः शोकः श्लोकत्वमागतः ।।

कालिदासाच्या रघुवंशांत चौदाव्या सर्गांत या पद्याचाच अनुवाद केलेला आहे. "निषदविद्धाण्डजदर्शनोत्थः श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः।" भवभूतीनें पण हाच वृत्तांत उत्तरामचरिताच्या दुसऱ्या अंकांत सकुतक निवेदन केला आहे. "चित्रमाम्नायादन्योनूतनश्छंदसामवतारः।" हे भवभूतीचें कुतूहलपूर्ण उद्गार वनदेवता वासंतीच्या तोंडीं घातलेले आहेत. कवीच्या भावना जेव्हां शब्दरूप होतात तेव्हां त्या स्वतःस उचित असें वृत्त घेऊनच बाहेर पडतात. काव्यदेह आणि काव्यात्मा अभिन्न असतात, हें सांगितलें. त्याशिवाय या खंडकाव्याच्या देहाला यमकादि शब्दालंकाराची आणि रूपकोपमादि अर्थालंकाराची जोड मिळालेली असते.

आतांपर्यंत ज्याचें विवेचन केलें तीं सर्वांत श्रेष्ठ प्रतीचीं खंडकाव्यें. तदितर या काव्याचे पुष्कळ प्रकार आहेत. कांहीं खंडकाव्यांत मनोविकार प्रबल असले तरी ते विचाराच्या स्वाधीन असतात. वृत्तिरूपी बेफाम धांवत सुटलेल्या अश्वाला विचाराचा लगाम असतो. त्यामुळें अशा प्रकारच्या काव्यांत स्वैरविहार करणारी, नाचणारी, बागडणारी कविप्रतिभा आढळून येणार नाहीं. तिच्यावर विचारांच्या, विवेकाच्या नियमनाची छाया पडलेली असते. तसेंच कांहीं काव्यांत कथा-उपकथांच्या बरोबर कवीचे गंभीर विचार, त्याचें तत्त्वज्ञान, मनुष्यजातीच्या सुख-दुःख, जनन-मरणविषयक त्याच्या कल्पना संग्रहित केलेल्या असतात. कांहीं खंडकाव्यें सृष्टि-वर्णनपर असतात, तर कांहीं नीत्युपदेश करतात. ह्या शेवटच्या प्रभेदांत जर नीत्युपदेशाच्या जड भाराखालीं काव्याची दुर्दशा झाली असेल तर त्याला खंडकाव्य म्हणावें किंवा नाहीं ह्याचीच शंका. ईश्वरवर्णनपर स्तोत्रेंसुद्धां खंडकाव्येंच होत. ह्या सर्व प्रकारांत विशेष महत्त्वाचा एक प्रभेद सांगावयाचा राहिला. ह्या प्रभेदांत कवि आत्मव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचें सुखदुःख आपलेंसें करून त्याचें वर्णन करतो.

दुसऱ्याच्या चित्तवृत्तींशीं तादात्म्य पावण्याची कला कविजनांना सहजसाध्य असल्यामुळें अशीं प्रातिनिधिक काव्यें बरींच सरस निपजतात.

खंडकाव्याचें वर्गीकरण तदंतर्गत मनोभावना-विचारादिकांच्या साहाय्यानें करतां येईल किंवा वृत्तविरचनादि बाह्याकृतीवरून त्याचे वर्ग ठरवितां येतील. उज्वल प्रीति, देशाभिमान, तीव्र शोक, उत्कट आनंद इत्यादि विभिन्न भावनापर गीतें किंवा भावनाविचार, किंवा भावनाविचारान्वित सृष्टिवर्णन– विहंगपुष्पादि– विषयक गीतें असे ह्याचे निरनिराळे वर्ग करतां येतील. इंग्रजीमध्यें वृत्तविरचनादि बाह्याकृतिवरून खंडकाव्याचे भाग करितात. (Sonnet) सॉनेट, (Elegy) एलिजी, (Song) साँग, (Ode) ओड वगैरे विभिन्न भेद त्यांच्यांत रूढ आहेत. मराठींत चतुर्दशपदी खेरीजकरून दुसरा कांहीं वृत्तरचनाविशिष्ट प्रभेद रूढ आहे कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. बहुधा नसावेसें वाटतें.

असो. ह्या खंडकाव्याला म्हणावें काय? 'खंडकाव्य' हें नांव रुक्ष, कर्णकटु आहे. 'वीणाकाव्य' या अभिधानांत कृत्रिमपणा आहे. 'भावगीत' हें नांव चांगलें आहे. मला स्वतःला तें आवडतें. तें असावें तितकें व्यापक नाहीं. खंडकाव्य अंतसृष्टिपर असतें. त्यांत कवि आणि त्याच्या स्वतःच्या भावना हा वर्ण्यविषय असतो. तें आटोपशीर, सुसंबद्ध असतें. खंडकाव्यांतील शब्द–वृत्त–अलंकार हीं सर्वस्वी भावनारूप असतात. भावगीतापेक्षां 'कविगीत' ह्या नांवानें ह्या सर्व लक्षणांचा बोध होतो कीं काय हें सांगतां येत नाहीं. सगळींच काव्यें भावगीतें. येथें आत्मविषयक कवि-गीतें हा अभिप्रेत अभिप्राय आहे. तो अर्थ कविगीत ह्या शब्दानें प्रतीत होतो, पण त्याच्याच बरोबर रूढ अर्थहि ध्यानांत येतो. खंडकाव्याला कविगीत म्हणावें कीं भावगीत म्हणावें ह्या प्रश्नाचा विचार येथेंच तहकूब ठेवणें बरें. दुसरे कोणी विद्वान् रसिक कविगीत नांवापेक्षां चांगलें नांव सुचवतील तर त्याचा आपण आनंदानें स्वीकार करूं.

आतां एकच गोष्ट सांगावयाची राहिली. कविगीत आणि काव्य-महाकाव्य–नाटक ह्यांत मुख्य भेद असा आहे कीं, काव्य–महाकाव्य–नाटक यांचा विषय बाह्य सृष्टींतील असतो. रामायण-महाभारतांतील नायक ऐतिहासिक वीर सत्पुरुष असतो. निदान जनमनाला तरी तशी खात्री वाटत होती. कविगीतांतील नायक कवि स्वतःच असतो. रस हें सर्व काव्यप्रभेदांचें सामान्य लक्षण आहे. कविगीत आत्मविषयक असतें, त्यांत कवीच्या स्वतःच्या भावनांचें वर्णन केलेलें असतें, म्हणून त्यांत केवळ रसनिष्पत्ति होते असें म्हणणें यथार्थ होणार नाहीं. कारण कवीला काव्य–महाकाव्य नाटक ह्यांत वर्णिलेल्या नायक-नायिका आणि इतर पात्रें ह्यांच्याशी तद्रूप बनतां येतें. तो 'परकाया'– प्रवेश करूं शकतो, इतकेंच नव्हे तर परचित्तप्रवेशहि त्याला सुकर असतो. भिन्न–भिन्न विषयांशीं, व्यक्तींशीं त्याचें तादात्म्य होऊं शकतें. निरनिराळ्या व्यक्तींच्या भावना, विचार, कल्पना तो आपल्याशा करून घेतो आणि एखाद्या मनो-

भावनेंत विकारांत–अवस्थेंत–विचारांत त्याचें चित्त रंगलें म्हणजे रसनिष्पत्ति होते. कवीचें भावविषयक तादात्म्य, त्याची तल्लीनता, त्याचें रंगणें, दंग होणें– हेंच रसाचें स्वरूप आणि ज्या ज्या ठिकाणीं नाटकांत, काव्यांत आपल्याला ही रसनिष्पत्ति झालेली आढळते तेथें महाकाव्याचें स्वरूप बदलून जाऊन त्याला कविगीताचेंच स्वरूप प्राप्त होतें. म्हणून कविगीत हेंच काव्यसर्वस्व असें म्हणणारे कांहीं इंग्रजी ग्रंथकार आहेत. इतर व्यक्तींशीं तादात्म्य झालें म्हणजे कवि मधुर काव्य रचील. परंतु स्वतःचे मनोभाव वर्णित असतां त्याचें काव्य जास्त रसभरित होईल असें मला वाटतें.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, कविगीत जरी आत्मविषयक असलें तरी ज्या कवीच्या भावना त्याच सर्व मनुष्यजातीच्या भावना, म्हणून कविविषयक भावनांचें वर्णन सर्व जनतेला तत्काळ पटतें आणि आवडतें. म्हणूनच कविगीतांतील भावना सर्व जनांच्या चित्ताला चटका लावून सोडतात. कवि तरी इतर जनांप्रमाणेंच सुखदुःखविवश असतो. वसंतऋतूंतील शीतल मंद वाऱ्यानें त्याला आल्हाद होतो. शिशिरशीत त्याला पीडाकार वाटते. पुत्रमित्रबंधुप्रेमानें त्याचें हृदय उचंबळून येतें, आणि पुत्रमित्रबंधुवियोगानें त्याचें हृदय दुभंग होतें. इतर जनांत आणि कवींत फरक इतकाच कीं कवीचें संवेदन तीव्रतर असतें आणि इतर जनांना जे अनुभव बोलून दाखवितां येत नाहींत ते तो स्पष्ट वाणीनें आणि मनोहर पद्यरचनेनें अभिव्यक्त करतो. कै. प्रो. पटवर्धनांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कवि हे जनतेचे वाचस्पति होत.

केशवसुतांनीं लिहिलेलीं १३२ प्रकरणें कविगीताचींच उदाहरणें आहेत. तीं कविगीत या सदराखालींच येतील. वर जीं कविगीतांचीं लक्षणें सांगितलीं तीं इंग्रजी कविगीतांसंबंधीं सर्वांशीं खरी आहेत. आणि केशवसुतांच्या कृतींत पण तींच लक्षणें आपणांस सर्वत्र आढळून येतात. ह्या विरचनसाम्यावरूनच केशवसुतांची कविता म्हणजे इंग्रजी खंडकाव्याचा महाराष्ट्रीय अवतार होय असें वरतीं म्हटलें, आणि केशवसुतांच्या काव्याचें परीक्षण सुलभ व्हावें आणि त्यांच्या काव्यरचनेंतील व इंग्रजी पद्धतींतील साम्य झटकन् लक्षांत यावें ह्या उद्देशानेच इंग्रजी कविगीतांच्या लक्षणांचें सविस्तर वर्णन केलें. केशवसुतांना महाराष्ट्रवाङ्मयांतील कविगीतांचे जनक म्हणतात. हें जरी अक्षरशः खरें नसलें तरी केशवसुतांनीं कविगीताचा संप्रदाय महाराष्ट्रांत रूढ केला, ह्यासंबंधीं तरी मतभेद होऊं नये असें वाटतें. ख्रिस्तवासी ना. वा. टिळक व कै. रा. ग. गडकरी, कवि विनायक व तांबे ह्यांनींहि कविगीतांच्या धर्तीवर पुष्कळ काव्यें रचिलीं आहेत. दिवसानुदिवस ह्या संप्रदायाचे अनुयायी वाढत्या प्रमाणांत आहेत. विनायकाचा साधेपणा जसा चित्तवेधक आहे, तसें टिळकांचें रचनाचातुर्य प्रशंसनीय आहे. गोविंदाग्रजांच्या धाडसाचें व कलावती वाणीचें कौतुक करावेंसें वाटतें. केशवसुतांच्या काव्यगुणांचें परीक्षण हा तर प्रस्तुत निबंधाचा मुख्य विषय आहे. केशवसुतांचें काव्य अभिनव आहे, कारण तें प्रवृत्तिपर आहे. परमेश्वराची

स्तुति, आत्मानात्माविचार, अवतारी पुरुषांच्या लीलांचें किंवा पराक्रमांचें वर्णन हीं त्यांत सांपडत नाहींत. प्राचीन कवींच्या काव्यांत उपर्युक्त विषयांवरच भर दिलेला असे आणि प्राचीन काव्यरसज्ञ महाराष्ट्रकाव्यवाङ्मयाचें परमार्थपर दृष्टीनेंच परीक्षण करीत असल्याकारणानें त्यांना हीं आधुनिक काव्यांतील कवींच्या मनोविकारांचीं व निरनिराळ्या अवस्थांचीं, कल्पनांचीं वर्णनें कशींशींच वाटतात. हेंहि एकवेळ खपेल. पण कोणीं असें म्हटलें कीं, "जुनें जाऊं द्या मरणालागुनि। जाळुनि किंवा पुरुनी टाका" तर तें प्राचीन मतांचा अभिमान असणाऱ्या रसिकांना शल्यासारखें बोंचेल. ह्याहीपेक्षां वरची पातळी म्हणजे जर एखादा कवि परमेश्वरासंबंधीं 'शून्या-माजि वसाहती बसविल्या कोणीं सुरांच्या वरें' किंवा 'देवदानवा नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या', असे अवहेलनापर उद्‌गार काढील तर प्राचीन काव्यरसज्ञ त्या कवीच्या कृतीकडे पाठ फिरवतील ह्यांत किमपि शंका नाहीं.

केशवसुतांचें काव्य प्रवृत्तिपर आहे हा कालमाहात्म्याचा–तें ज्या परिस्थितींत जन्मास आलें त्या परिस्थितीचा–परिणाम. १८५७ च्या बंडानंतर इंग्रजी राज्यसत्तेचा पाया हिंदुस्थानांत दृढ, अविचल झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या आधींच १८३४ सालीं हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षणाचा आरंभ करण्याचें ठरलें होतें. १८५४ नंतर ह्या इंग्रजी शिक्षण पद्धतीला बरेंच विस्तृत, व्यवस्थित स्वरूप आलें. १८५७ सालीं मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील आधुनिक विश्वविद्यालयांची स्थापना झाली. इंग्रजी भाषेच्या किंवा इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनामुळें पेशव्यांच्या वेळचें जग बदलून नवीन युगास आरंभ झाला. केशवसुत ह्या नव्या युगांत जन्मास आले. नवयुगाच्या ऐन भरांत त्यांचें शिक्षण झालें. केशवसुतांच्या हयातींत त्यांच्या आजुबाजूला सर्वत्र नवीन विचारांचें, नवीन कल्पनांचें काहूर माजून राहिलें होतें. एकीकडे दुष्ट रूढीचा प्रतिकार करा– पोकळ आचाराविचारांचें मायापटल दूर सारा – असह्य सामाजिक जुलुमांचें जूं झुगारून द्या असा प्रिन्सिपल आगरकर आणि त्यांचे अनुयायी ह्यांचा दुंदुभि गर्जत होता. दुसरीकडे उत्कट देशाभिमानप्रेरित आत्मविश्वासपूर्ण विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि तत्पक्षीय केसरीकार इत्यादिकांची नौबत झडत होती. कोणी स्पेन्सरच्या अज्ञेयवादाचा कर्णा फुंकत होता, तर कोणी मिल–मॉर्ले इत्यादिकांच्या बुद्धिवादाची तुतारी वाजवीत होता. मधूनमधून अज्ञजनांस 'पवित्रशास्त्रा'ची माहिती करून देणाऱ्या ख्रिस्ती उपदेशकांच्या टिमकीचा आवाज कानीं पडत होता. ह्या सर्व नादनिनादांचे स्पष्टास्पष्ट प्रतिध्वनि केशवसुतांच्या आणि त्या काळच्या इतर कवींच्या कृतींत ऐकूं येतात. कवि हा इतर जनांच्याप्रमाणेंच कालवश असल्याकारणानेंच प्रचलित कल्पनांचा, विचारांचा त्याच्या मनावर पगडा बसतो. तरी पण केशवसुतांसारख्या अंतर्मुख कवीच्या मनावर परिस्थितीचा परिणाम फारसा होत नाहीं. निरनिराळ्या चळवळी, प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टी, धार्मिक, राजकीय, सामाजिक कल्पनांचा आवि-

भाव आणि त्यासंबंधीं चाललेले कडाक्याचे वादविवाद, याचेंच नांव परिस्थिति. केशवसुतांचें लक्ष ह्या बाह्य परिस्थितीपेक्षां स्वतःच्या अनुभवाकडे– विचारांकडे जास्त वेधलें होतें. तरी पण त्यांच्या इंग्रजी कवितेच्या परिचयाचें प्रत्यंतर त्यांच्या काव्यांत पदोपदीं आढळून येतें. प्रो. राजवाडे ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें पॉलग्रेव्हच्या कविगीत संग्रहाचें (Golden Treasury चें) त्यांनीं पुनः पुन्हां पर्यालोचन केलें असलें पाहिजे. वर्डस्वर्थच्या काव्याचेंहि दृढ परिशीलन त्यांनीं केलें होतें, ह्याविषयीं दुमत होणें शक्य नाहीं. कांहीं वेळां वर्डस्वर्थच्या दोषांचेंहि त्यांनीं अनुकरण केलेलें आढळतें. शेलीच्या काव्याचा त्यांचा निकट परिचय असावा अशी मला खात्री वाटते. एमर्सनच्या 'अपॉलजी' नामक एका छोट्या कवितेचें त्यांनीं फारच नामी रूपांतर केलें आहे. आणखी कांहीं शेक्सपिअर, हुड वगैरे कवींच्या कृतींचीं रूपांतरें त्यांच्या काव्यांत सांपडतात. पॉलग्रेव्हच्या कविगीतसंग्रहाच्या परिशीलनामुळें वर्डस्वर्थ, शेली वगैरे प्रतिभासंपन्न कवींचा निकट परिचय असल्यामुळें त्यांच्या निसर्गदत्त ओजस्वी स्फूर्तीला चलन मिळालें. त्यांच्या कविगीतांना विशिष्ट वळण लागलें. एकादी सर्वोत्कृष्ट वस्तु पाहिली म्हणजे आपल्याला तिचें अनुकरण करावेंसें वाटतें, परंतु आपल्या अनुकरणाचें यशापयश आपल्या बुद्धिसामर्थ्यावर अवलंबून असतें. 'वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे '– पण गुरु कितीहि तेजस्वी असला तरी तो मातीच्या ढेंकळाचा हिरा बनवूं शकत नाहीं. बेडकानें कितीहि अुंच उडी मारली तरी तो चंडोलाप्रमाणें नभोमंडलांत स्वैरसंचार करूं शकेल काय ? वर्डस्वर्थ, शेली ह्यांचें उदाहरण पुढें ठेवून केशवसुतांनीं जीं काव्यें निर्माण केलीं, तीं त्यांच्या स्वावलंबी, सतेज, निर्भ्रांत प्रतिभेचीच साक्ष पटवितात.

कविगीत कवीच्या हृदयगत वृत्तीचें शब्दमय दृश्यस्वरूप असतें हें केशवसुतांच्या १३०।१३२ कवितांपैकीं बऱ्याच कवितांसंबंधीं खास म्हणतां येईल. अंतःकरणाचा उमाळा, मनाचा संक्षोभ, हृदयाची खळबळ ह्यांतच त्यांच्या काव्याचा उगम आहे. निरनिराळ्या प्रसंगीं, निरनिराळ्या कारणांनीं त्यांचें अंतःकरण, प्रदीप्त होतें. कधीं अनावर क्रोधानें तें भडकलेलें असतें, तर कधीं प्रेमातिशयानें अगदीं हळुवार झालेलें दिसतें. कधीं वैरानें, त्वेषानें दगडासारखें कठीण झालेलें आढळतें तर, कधीं वात्सल्यानें, कारुण्यानें नवनीतासारखें तत्काळ द्रवतें. कधीं तें निराशेच्या तावडींत सांपडून हतबल होतें तर कधीं आशेच्या उमद्या घोड्यावर बसून भरधांव पळत सुटतें. कधीं अप्राप्य वस्तूंच्या मागें लागल्याकारणानें त्याची एकसारखी तळमळ, धडपड चाललेली असते; कधीं सहजप्राप्त, लौकिकदृष्ट्या अगदीं क्षुद्र अशा गोष्टींतच तें दंग होऊन जातें. 'तुतारी'तील क्रोधावेशाचा विचार केला म्हणजे रसरशीत निखाऱ्यांची आठवण होते. 'गोफण' काव्यांत केशवसुतांचें हृदय वैरानें पाषाणासारखें कठोर झालें आहे. 'दंवाच्या थेंबां'तील भावनेची मृदुलता, त्यांतील कारुण्य, निवांतस्थ दीपज्योतीप्रमाणें प्रशांत

आहे. ज्या त्यांच्या हृदयाला 'पुष्पाप्रत'– पुष्पा सुंदर किती तूं दिसशी–ह्या काव्यांत निबिड नैराश्यतिमिरानें घेरिलें आहे, जेथें त्यांचें पिशाच्च मृत आशांच्या चितांवरून भटकत आहे असें त्यांनीं म्हटलें आहे, त्याच त्यांच्या हृदयाचा 'नवा शिपाई' ह्या काव्यांतला प्रचंड उत्साह व आत्मविश्वास पाहिला म्हणजे मध्यान्हाच्या प्रखर तेजानें तळपत असलेल्या सूर्याकडे निःशंकपणें सरळ दृष्टीनें बघणाऱ्या, आपल्या सामर्थ्याची जाणीव असल्याकारणानें दूरवर नभोमंडळांत निरंतर घिरट्या घालणाऱ्या गरुड पक्ष्याचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें. सकलसौंदर्यनिधान, गुणवती, रसभावपूर्ण अशी काव्यदेवी त्यांनीं कितीक काव्यांत आळविली आहे. त्यांच्या आत्म्याला तिची निरंतर संगति हवी; आणि ह्या 'भिकार जगांत' अशी संगति दुष्प्राप्य म्हणून त्यांचा आत्मा व्याकुळ होतो. ही त्यांच्या आत्म्याची व्याकुळता–धडपड– तळमळ त्यांनीं 'थकलेल्या भटकणाऱ्याच्या गाण्यां'त, 'फिर्यादींत', 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' ह्या कवितांत व्यक्त केली आहे. 'हरपलें श्रेय' ह्यांतील मूलभूत कल्पनाहि हीच होय. जशी दूरधिगम वस्तूंच्या नादीं लागल्यामुळें होणारी आपल्या जीवाची तळमळ ते वर्णन करतात तसेंच आपल्या सहजप्राप्य आनंदाचें पण त्यांनीं वर्णन केलें आहे. एकाद्या भृंगाला गातांना ऐकलें, एकादें फुलपांखरूं स्वच्छंदानें इकडून तिकडून उडतांना त्यांच्या दृष्टीस पडलें म्हणजे त्यांचें मन तल्लीन होतें. कोण्या मुलीला रांगोळी घालतांना पाहून, तर एकाद्या निद्रामग्न मुलीस पाहून त्या सात्त्विक निष्पाप देखाव्यांनीं त्याचें मन विमोहून जातें, त्यांच्या काव्यशक्तीला स्फुरण चढतें. केशवसुतांनीं आपल्या कवितेंत प्रसिद्ध पौराणिक-रामचंद्रादि किंवा ऐतिहासिक अकबर, शिवाजी वगैरे सत्पुरुषांचीं चरित्रें वर्णन केलीं नाहीत. एकादा बाजीप्रभू देशपांड्याच्या लोकोत्तर मर्दुमकीसारखा प्रसंग त्यांनीं आपल्या काव्यांत ग्रथन केला नाहीं. 'जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर', 'दोन बाजी' ह्या काव्यांत त्यांची उज्वल देशप्रीति व्यक्त होते आणि त्यांतलें दुसरें जरी वर्णनात्मक असलें तरी तो त्यांच्या निरंतरच्या काव्याला अपवादच होय. वर सांगितल्याप्रमाणें बहुतेक सर्व त्यांची कविता आत्मविषयक, अंतः-सृष्टिपर आहे. ते स्वतःच त्यांच्या काव्यांतील नायक आहेत. त्यांच्या विविध आशा, निराशा, सुखदुःख, आनंद-चिंता-क्रोध, द्वेष इत्यादि मनोभावना हाच त्यांच्या काव्याचा प्रधान विषय. त्यांच्या हृदयांत त्यांच्या काव्याचा झरा आहे. मनुजहृदय हीच कवि-गीतांची जननी आहे. तत्त्वज्ञान, नीत्युपदेश, शास्त्ररहस्यें इत्यादि बुद्धिगम्य विषय काव्याची प्रधान अंगें होऊं शकत नाहींत. केशवसुतांच्या शब्दांतच सांगायचें म्हणजे "हृदयांतून न जे बोल । निघती ते सगळे फोल ।।"

कविहृदयांत खळबळ सुरू झाली– त्याच्या चित्तवृत्तींत चलबिचल झाली म्हणजे ती काव्यरूपानें बाहेर पडते. कवीला आनंद झाला म्हणजे तो आपल्या आनंदाचें गाणें करतो. त्याला शोक झाला म्हणजे तो गाऊन तो आपल्या शोकाचा उपशम करतो.

त्याचीं गीतें म्हणजे त्याच्या आनंदशोकादि तीव्र भावनांचे सहजोद्‌गार ! जशीं लहान मुलें हंसतात आणि फुलें उमलतात तशींच कविगीतें जन्माला येतात. मागें सांगितल्याप्रमाणें कविगीतकर्त्याला लौकिकाची, मानाची, धनाची, स्तुतीची कोणत्याहि बाह्य हेतूंची अपेक्षा नसते. केशवसुतांचीं सर्व गीतें अशींच निर्हेतुक, निरुपाधिक आहेत. 'जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे । गाणें मनांत मग होय सवेंचि जागे ।।' ही त्यांनीं स्वतःच सांगितलेली गाण्याची उपपत्ति– म्हणजेच त्यांच्या काव्याची उपपत्ति– अक्षरशः खरी आहे. दुसऱ्या एका आपल्या कवितेंत ते सांगतात, "हृदय आत्म्याला जधी खेळवीतें । हृदय आत्म्याला जधीं आळवीतें । तधीं तुमचें तें नको कलाज्ञान । तसें हृदयासम नसे तानसेन ।।" कीर्तीविषयीं ते किती बेफिकीर होते तें त्यांच्या खालील उद्‌गारांवरून स्पष्ट होतें. "कीर्ति म्हणजे काय रे एक पीस ? शिरीं लोकांच्या त्यास चढायास । छरे पडती पक्ष्यास खावयास । मागुनी तें गळणार हेंहि खास ।।" स्तुति-कीर्तिधनादिकांच्या अपेक्षेनें केलेली कविता कृत्रिम असते. दुसऱ्याच्या आवडीनिवडीच्या विचारानें कवीच्या स्वतंत्र रचनेला ठिकठिकाणीं जांच होतो. आणि जर कवीनें आपल्या कर्तबगारीनें हा उणेपणा झांकून टाकला असला तरी अशा कवितेच्या चतुर रचनेचें कौतुक करावेंसें वाटतें, तें ऐकून रसिकजनांचें मन विमोहून जात नाहीं. स्वच्छंदानें, स्वेच्छेनें रचिलेल्या काव्यांतच 'स्वभावभूयिष्ठ माधुरी' आढळते. शेली म्हणतो त्याप्रमाणें कवि हा बुलबुल पक्ष्यासारखा आहे. तिमिरसंकुल अशा स्थळीं तो वसतो. आणि आपल्या मधुर गायनानें आपलें मन तो रिझवितो. केशवसुतसुद्धां 'दूर कोठें एकला जाउनीया । एकतारी आपली घेउनीया । स्वेच्छ संतत छेडीत ती मनाला । दुःखिताला आराम व्हावयाला ।।" श्रोते मंडळी आपल्यापुढें जमली आहेत, त्यांची दृष्टि आपल्या काव्यरचनेकडे लागली आहे, अशा भावनेनें रचिलेल्या कवितेची केशवसुतांनीं फार नामी थट्टा उडविली आहे. 'नटीपरी त्या कविता तयाची। जनस्तुति जो हृदयांत याची ।। पढीक तीचे परिसूनि बोला। तुम्हीं कितीसे भुलुनी डुलाल ।।' ह्याच्यावरचें पद्यसुद्धां प्रस्तुत मुद्दयाला परिपोषकच आहे. 'करुनियां काव्य जनांत आणणें । न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें । करूनि तें दंग मनांत गुंगणें । तदीय न सुंदर हेतु मी म्हणे ।' केशवसुतांना कीर्ति मिळाली नाहीं, त्यांच्या हयातींत त्यांचे कोणीं देव्हारे माजविले नाहींत, त्यांना कवितेपासून धनलाभ झाला नाहीं, म्हणून त्यांनीं कधीं खंत केली नसेल. अन् आपणहि करण्यांत हंशील नाहीं. केशवसुतांच्या काव्यरत्नांचें मोल कोण करणार ? ग्रीष्मऋतूंत प्रखर रवितापानें अंगाचा संताप झाला असतां पश्चिमेकडून थंडगार वाऱ्याची झुळूक एकदम येते आणि आपल्याला किती विलक्षण सौख्य होतें. ह्या वाऱ्याच्या झुळुकेला आपण काय बक्षीस देणार ? तिनें दिलेल्या सौख्याची काय किंमत करणार ? तद्वतच केशवसुतांचीं काव्यें अमोलिक आहेत.

कविगीतकर्ता आपलें अंतःकरण जगाला उघडें करून दाखवितो, अथवा तो जेव्हां आपलीं काव्यें रचितो तेव्हां आपल्याकडे कोणाची नजर आहे ही त्याची

भावना नसल्याकारणानें आपले सर्व विचार, आपल्या मनावर विविध व्यक्तींच्या साहचर्यानें झालेले परिणाम, आपल्या मनाचीं निरनिराळ्या प्रसंगीं झालेलीं स्थित्यंतरें, आपला स्वतः संबंधींचा इत्थंभूत इतिहास–लहानमोठ्या सर्व गोष्टी काव्यांत गोंवून ठेवतो.वर सांगितल्याप्रमाणें त्याची कविता म्हणजे त्यानें लिहिलेली स्वत:चें पद्यात्मक चरित्रच होय; ती एकाद्या कांचेच्या पेटीसारखी असते; खालून, वरून, आजुबाजला, कोणीकडून पाहिलें तरी कवीच्या अंतःकरणाच्या सर्व क्रिया त्यांत स्पष्ट दिसतात. ह्या नियमास अनुसरून केशवसुतांच्या चरित्राचें आणि स्वभावाचें प्रतिबिंब त्यांच्या काव्यांत पडलेलें आहे. केशवसुत शरीरानें सडपातळ होते का धडधाकट होते, उंच होते का ठेंगणे होते, देखणे होते का कुरूप होते, त्यांचे नयन विशाल होते का बारीक होते, त्यांचें हंसणें, बोलणें, चालणें ह्यांत कांहीं जनमनविमोहिनी जादू भरली होती कीं ती सामान्यजनांप्रमाणेंच चमत्कृतिशून्य होती हें कळण्यास त्यांच्या काव्यांत कांहींच मार्ग नाहीं. अशा प्रकारची खाजगी माहिती, त्यांच्या मित्रमंडळींना किंवा बंधूंना असेल. 'दुर्मुखलेला' ह्या कवितेंत ह्यांच्या 'शुष्क कुरूप' तोंडाचा उल्लेख केला आहे. आणि ते एकांतवासप्रिय असत, त्यांची नेहमींची वृत्ति उदास, विमनस्क, विषण्ण असे ह्याविषयीं त्यांच्या काव्यांत बराच पुरावा आहे. 'मी एकला फिरतसें बहुवार रानीं, कशाला एकाकी फिरत असतों नित्य विपिनीं । इत्यादि पद्यपंक्ति त्यांच्या एकांतवासप्रियतेची साक्ष देतात. दिवाळीचें साद्यंत वर्णन केल्यानंतर– "मी कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउन" असा ह्या मनोरम कवितेचा केशवसुतांनीं उपसंहार केला आहे. १८९२ सालींच– म्हणजे त्यांचें सव्वीस वर्षांचें वय असतांनाच– त्यांचा आशातंतु तुटला. त्यांच्या मृत आशांना त्यांनीं दहनभूमीवर पोंचविलें. ते आपल्याला 'दुर्भग' म्हणतात (आईकरितां शोक). आपण जन्मास येऊन मातापितरांना उगाच शिणवलें असे कष्टोद्गार काढतात (नैर्ऋत्येकडील वारा). त्यांच्या मतें ह्या काळोखाच्या जगांत तिमिरांत रखडणेंच त्यांच्या कपाळीं होतें (फुलपांखरुं). जीवित्व हें शोकसंकुल नाटक आहे (नै. वा.). अस्मदीय हृदयीं ठसलें– कीं जग हें दुःखें भरलें' (भृंग). आणि त्यामुळें जगांतलें सौंदर्यसुद्धां निर्दोष नाहीं, 'म्हणूनी सुंदरतेलाहि कुसें आम्हां दिसतीं पाही.' प्रीति ही ह्या जगांत एकच स्पृहणीय वस्तु तरी ती कंटकयुता वल्ली आहे. संसारांत कांहीं जम बसत नाहीं. धनप्राप्तीचा कांहींच उद्योग करीत नाहीं, हीन दीन छंदी फंदी असा मी भणभण वणवण करीत फिरतों (फिर्याद). हें त्यांच्याच शब्दांत केलेलें त्यांच्या आयुष्यक्रमाचें वर्णन. ह्यांत अतिशयोक्ति असेल, पण तें सामान्यतः खरें असलें पाहिजे, अशी त्यांची कविता वर वर वाचणाऱ्यास सुद्धां वाटेल. आणि त्यांच्या बंधूंनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या कवितासंग्रहाला जोडलेलें त्यांचें चरित्र वाचलें म्हणजे त्याच्या खरेपणाविषयीं शंकाच उरत नाहीं.

केशवसुतांची संसारयात्रा कष्टप्रद झाली, त्यांना हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, नांवलौकिक मिळाला नाहीं, धनप्राप्ति झाली नाहीं, ते नेहमीं उदास, विमनस्क,– विषण्ण असत. असें जरी असलें, तरी त्यांच्या हृदयांत निरतिशय काव्यप्रेमाचा दीप निरंतर तेवत होता. त्यांचा काव्याचा अभ्यास करणारास असें आढळून येईल कीं क्वचित्काळीं जेव्हां त्यांना काव्यदेवी भेटते तेव्हां ते निर्वाण पावतात. तिला रंभा-उर्वशी म्हणून संबोधितात (क्ष. ना. दि. भा). तिच्या कल्पनातीत गुणसौंदर्यावर लुब्ध होऊन ती अंतर्हित झाली म्हणजे ते इकडे तिकडे भणभण वणवण करीत तिच्या शोधार्थ हिंडतात (थ. भ. गा. व फि.). तिनें त्यांना वेड लाविलें म्हणून केशवसुतांनीं ह्या काव्यदेवीवर फिर्याद केली आहे. तिच्या संगतींत असतांना त्यांना दिव्य दृष्टि प्राप्त होते. जगाचे रंग क्षणोक्षणीं बदलतात (स्फूर्ति), साऱ्या सुंदर वस्तु येऊन त्यांना भेटतात, त्यांच्या पायाखालचे धुळीचे रजःकण बनतात (कवि). ते निर्जीव वस्तूंशीं बोलतात. तारकांचें, फुलपांखरांचें, पुष्पाचें अंतरंग त्यांना ओळखतां येतें, त्यांच्याशीं त्यांची मैत्री जमते. सृष्टीचीं गूढ रहस्यें त्यांना समजतात. आणि दिक्कालाच्या पलीकडलें अनंतत्व आकलन करण्याचें सामर्थ्य त्यांना येतें (आम्हीं कोण ?, झपूर्झा). शारदा त्याच्या कानांत गुणगुणली म्हणजे त्यांना अद्‌भुत आवेश चढतो. त्यांच्या अंगांत विलक्षण वारें संचारतें, आणि ते स्वहृदय फाडून गोफण करितात, स्वप्राणानें तुतारी फुंकतात आणि नव्या मनूंतील नव्या शिपायाची अभिनव वीर घोषणा जाहीर करतात.

असो. अशी केशवसुतांनीं आपली नैराश्य– दुःख–दुर्दैवाची कहाणी आपल्या काव्यांत सांगितली आहे. तसेंच त्यांनीं आपल्या मंगल आशांच्या कथा व आपल्या दिव्यानंदाचे अनुभव पण सांगितले आहेत. कांहीं प्रसंगाच्या आपल्या अमर्याद उत्साहाचें आणि निरुपम आत्मविश्वासाचें वर्णन केलें आहे. जेव्हां ते ' पद्यपंक्तीची तरफ आमुच्या करी विधीनें दिली असे । टेंकूनि ती जनताशीर्षावरि जग उलथून या देऊं कसें ।।' असें कविवाणीच्या अतुल सामर्थ्याचें रणशिंग फुंकून बंडाचा झेंडा उभारतात आणि 'उठा उठा बांधा कमरा । मारा किंवा लढत मरा' या आवेशयुक्त शब्दांनीं हांक मारून ' हरहर महादेव ' अशी गर्जना करितात तेव्हां खरोखरीच मुक्या पृथ्वीला ' माते श्रुति लक्षसंख्य फुटल्या ' असें वाटलें तर त्यांत नवल नाहीं. ह्या स्फूर्तिदायक काव्यसरस्वतीचा जिवंत झरा ज्याच्या हृदयांत वहात होता, त्यांची आपल्याला कींव करायचें कांहीं कारण नाहीं. स्वप्नांत भेटणारी काव्यदेवी केशवसुतांना पुष्कळ वेळां स्वर्गदारीं नेई, आणि पुन्हां अंधकारांत लोटून देई. पण ती त्यांना स्वर्गदारीं नेत होती हें कवीचें अनुपम सौभाग्य नव्हे काय ? नेहमींच जर ते स्वर्गांत वास करते तर ते मग मनुजसृष्टीचे कवि झाले नसते.

केशवसुतांच्या काव्यांत त्यांचा मातापितरांसंबंधींचा आदर, पूज्यभाव आणि बंधूभगिनीविषयक प्रेम पुन्हां पुन्हां व्यक्त झालें आहे. " पण लक्षांत कोण घेतो ? च्या

कर्त्यास' लिहिलेल्या कवितेंत त्यांची स्त्रियांच्या उन्नतीबद्दलची कळकळ दिसून येते. फुलें, मुलें, विहगगण, सृष्टींतील हरएक रमणीय वस्तूनें त्यांचें मन वेधून जात असे. आपल्या पत्नीविषयक प्रेमाचें पुष्कळ प्रसंग त्यांनीं वर्णिले आहेत. 'प्रेमाची भाषा' हा त्यांचा सात्त्विक प्रेमाचा उत्तम नमुना आहे. इतर बऱ्याच कवितांसंबंधीं त्या छापल्या नसत्या तर वरें झालें नसतें असें म्हणावें लागतें. ग्राम्य शृंगाराचें वर्णन कवीच्या यशाची हानि करते, आणि सहृदयवाचकांस पीडाकर होतें. पण अशा प्रकारच्या आत्मसंयमनाची जाणीव कविगीतकर्त्यांत बहुधा सांपडत नाहीं. 'देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या' ही पद्यपंक्ति त्यांनीं लिहिली नसती तर त्यांच्या धार्मिक मतांविषयींचा बराच गैरसमज दूर झाला असता. कारण इतर निरनिराळ्या काव्यांत त्यांची परमेश्वरासंबंधीं शुद्ध प्रेमाची भावना आहे. ह्या भिकार जगांत कांहीं मिळत नाहीं म्हणून त्यांनीं ईश्वराकडेच धांव घेतली आहे. "जुनें जाऊं द्या मरणालागूनि । जाळुनि किंवा पुरुनी टाका ।।' अशा प्रकारच्या जोमदार पण बेसावध वाक्यांनीं कितीकांचीं मनें उगाच दुखविली असतील. असो. कविगीतकर्त्याला "हें कर, तें कर, सावधपणें पाऊल टाक, बेफाम भडकूं नकोस" असा उपदेश करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याइतकेंच हास्यास्पद आहे. कांहीं त्यानें थोडें फार वेडेवांकडें केलें नाहीं तर मग त्याला आपण स्वच्छंदी कवि कसें म्हणूं? 'वाद्य वेडेवांकुडें वाजवूनि' तो स्वच्छंद गायनानें दंग होतो.

सुसंबद्धरचना आणि आटपशीरपणा ही कविगीतांची लक्षणें केशवसुतांच्या काव्यांत सर्वत्र आढळून येतात. त्यांच्या कविगीतांतील भावनांचा उद्गम, उत्कर्ष, उपशम हीं वृक्षवल्लीच्या पर्णपुष्पफलांप्रमाणेंच क्रमशुद्ध असतात. प्रस्तावना, उपसंहार, इत्यादि गौण अंगांना निरर्थक महत्त्व देऊन काव्यांतील प्रमुख विषयांचा ते कधीं कोंडमारा होऊं देत नाहींत. प्रत्येक काव्यांगाचा योग्य तितकाच गौरव करितात. ही सुसंगत रचना भावनाप्रधान काव्यांत बऱ्याच वेळां साहजिकच जमून येते. 'गोंफण' काव्य अशा सुसंगत रचनेचें चांगलें उदाहरण आहे. तसेंच 'नवा शिपाई' ह्या कवितेंतील विचारांची, भावनांची, कल्पनांची मांडणी पण सुरेख आहे. 'दिवाळी' भावनाप्रधान काव्य नाहीं. त्यांत वर्णनावर भर आहे. सिनेमांतील चित्रपटाप्रमाणें दिवाळींतील विविध देखावे एका पाठीमागून एक वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे केले आहेत. केशवसुतांचें काव्य रेंगाळत नाहीं. ह्याचें हें एक उत्तम निदर्शन आहे. वाट चालत असतां ते कधीं दमत नाहीं. सरळ मार्गानें तडक झपाझप पावलें उचलीत आपल्या ठरवलेला पल्ला गांठतात. त्यांच्यांत उरक आहे. पण धांदलींत ते आपल्या काव्याची केव्हांहि खिचडी करीत नाहींत. दिवाळींतील विषयाची व्यवस्था कनकसूत्रांत ओंवलेल्या एकदाणीच्या सुवर्णमण्यांप्रमाणेंच आहे. 'दोन बाजी' ह्या कवितेंत विरुद्ध प्रकृतींच्या आणि विरुद्ध पराक्रमांच्या पुरुषांचें वर्णन आहे. अशा काव्यांत त्याचप्रमाणें 'पुष्पाप्रत', 'दिवसरात्र' वगैरे संभाषणविषयक काव्यांत व्यवस्थेची अडचण नसते, दोन समांतर

रेषांप्रमाणें परस्पराभिमुख विषयांचा साहजिकच विकास होत असतो. कवीला रचनेचे श्रम पडत नाहींत. परंतु 'नैर्ऋत्येकडील वारा' ह्या काव्यांत सृष्टिवर्णन, विचार, भावना असे तीन विषय आहेत. आणि कवीनें ह्या तीन विषयांची उत्तम सांगड घातलेली आहे. 'हरपलें श्रेय' ही कविता कवीच्या रचनाचातुर्याचें शिखर होय. तत्तद्विषयानुरूप काव्यांतील रचनेची विविधता प्रकट होते. 'गोफण' ही एका खांबावरची इमारत असें जर म्हटलें तर 'दिवाळी', 'रांगोळी' ह्या काव्यांना मुक्तमालेची उपमा शोभेल. 'नैर्ऋत्येकडील वारा' आणि 'एक खेडें' ही त्रिवेणीसंगमाची उदाहरणें. 'हरपलें श्रेय' एकाद्या मनोहर देवालयाप्रमाणें बांधलें आहे. त्याला उंच उंच खांब आहेत, कमानी आहेत, कळस आहेत, त्याच्या भिंतींवर आजूबाजूला सुंदर चित्रें काढलीं आहेत. हीं रचनेचीं विशिष्ट उदाहरणें दिलीं. पण सामान्यतः सरळपणा, साधेपणा, आदिमध्यावसनात्मक विषयव्यवस्थिति, सुसंगत रचना हे गुण केशवसुतांच्या बहुतेक सर्व कविगीतांत सांपडतील.

आटपशीरपणा हाहि त्यांच्या काव्याचा विशेष आहे म्हणून वर सांगितलें. त्यांच्या काव्यांत कोठें चर्वितचर्वण सांपडावयाचें नाहीं. वायफळ शब्दांचा ते उपयोग करीत नाहींत. पाल्हाळिकपणें तेंच तेंच कुटीत बसत नाहींत. एकादी रमणीय कल्पना सुचली कीं लांबवली ती दहा ओळींपर्यंत. एकादें रूपक सुचलें कीं बसले त्याचा कीस काढीत. केशवसुतांच्या कवितेंत अशा प्रकारच्या काव्यरीतीला थारा नाहीं. त्यांचा आशय ते थोडक्यांत पण अनुरूप, अर्थपूर्ण, जोमदार शब्दांनीं व्यक्त करितात. 'तुतारी'तील प्रत्येक ओळ गगन भेदून जाणारी किंकाळी आहे. 'गोफण' ह्या काव्यांतला वैरावेशानें सळसळणारा प्रत्येक शब्द एकाद्या जड धोंड्याप्रमाणें आहे. हास्याचें कारण संपलें म्हणजे हंसणें जसें अर्थहीन, आणि प्रेक्षकांस जसें दुःखकर होतें, त्याचप्रमाणें भावनेचा आवेश संपल्यानंतर रचलेलीं काव्यें शुष्क आणि नीरस निपजतात. कविमनांत प्रतिभेचा संचार असेतोंपर्यंत होणारी काव्यनिष्पत्ति सौभाग्यसमन्वित असते. प्रतिभेच्या अभावीं, व्युत्पत्तीच्या साहाय्यानें, विद्वत्तेच्या जोरावर, विटांवर विटा देऊन चुना, चिखल इत्यादि उपकरणसामग्रीनें मोठीच मोठी भिंत रचतां येईल. केशवसुतांनीं अशी भिंत कधीं बांधली नाहीं. म्हणूनच, त्यांचीं काव्यें 'उडुरत्नां'सारखीं आहेत, त्यांत झळकणारी दिव्य प्रभा त्यांनीं शारदेच्या सदनांतून आणलेली आहे. हीं रत्नें आकृतीनें जरी सान आहेत तरी त्यांच्या मोबदला आपल्याला कोणीं मृत्तिकेचे डोंगर दिले तरी नकोत.

शेवटीं समर्पक शब्दांची, तालवृत्तांची आणि अलंकारांची योजना. केशवसुतांच्या काव्यांत संस्कृत शब्द, निवळ मराठी शब्द, व्यस्त आणि समस्त शब्द, साधे आणि सालंकृत शब्द, सर्वमान्य शब्द, तसेच केवल संभाषणरूढ शब्द, ध्वन्यनुकारी शब्द, सर्व प्रकारचे लहान मोठे, गंभीर आणि विनोदी, कठोर कर्णमधुर, चित्रमय आणि गीत-

गुणयुक्त शब्द सांपडतात. विविध प्रसंगीं, विविध विषयांसंबंधीं त्यांनी वापरलेले शब्द समुचित आणि रसभरित असतात. "परि तव गानांतून, अले । थबथबला हा भाव गळे" हें भृंगाच्या गुंजरवाचें त्यांनीं केलेलें वर्णन त्यांच्या स्वतःच्या शब्दांसंबंधीं तंतोतंत खरें आहे. कांहीं शब्द संतत परिचयानें आपल्याला तुच्छ, क्षुद्र वाटतात. पण तेच शब्द केशवसुतांसारख्यांच्या भावनांनीं प्रदीप्त झाले म्हणजे त्यांना असाधारण वैभव प्राप्त होते. इतकेंच काय पण जे शब्द आपल्या मतें दुष्ट, पापी, हीन, मलिन असतात तेच कवीच्या उत्कट तेजोमय भावनाचक्रांत सांपडले आणि त्यांनीं योग्य स्थळीं वापरले म्हणजे त्यांचें रूप बदलतें. ते काव्यशोभेचे भागीदार होतात. आणि रसिकजन मनांचें आवर्जन करूं शकतात. 'नव्या मनूंतील नव्या दमाचा शूर **शिपाई** आहें । कोण मला **वठणीला** आणूं शकतो तें मी पाहे ।।" "मी कालक्रमूनि असा जड जगा **काडीवजा** लेखितों ।।" "कवि आम्हां लागूनी म्हणणें । कवि शब्दार्था **लोळविणें** ।। "आप्तवर्ग म्हणतीं यातें । कुठली ही जडली **व्याद** ।।" वरील ओळींत ठळक दाखविलेले शब्द नित्य परिचित म्हणून तुच्छ, परंतु, कवीच्या भावनांनीं तात्पुरते तरी महनीय, वैभवशाली झाले आहेत. तसेंच 'तण तूं रे तूं **नगरभवान्या नाचेपोट्ये** घेऊनी **दौलतजादा** केला" "ही हतवेला । जल्शाची का पुसा मनाला ।।" "रडतील रडोत **रांडा पोरें**"।। "अलीकडलें तें सगळें खोटें । म्हणती धरुनी **ढेरीं पोटें**।।" ह्या ओळींत ठळक दाखविलेले शब्द एरवीं दुष्ट, पापी, मलिनच खरे, पण आपापल्या संदर्भांत भावनेचा परिपोष करतात. त्यामुळें त्यांना तात्पुरतें वैभव येतें. ते तेजानें झळकूं लागतात.– "अस्मदीय', 'विपत्समाकुल', 'द्युव्याविष्कृति', 'स्वर्गसमक्षता', असे जड संस्कृत शब्द तसेंच कुसें, बूज, लाड यांसारखे साधे मराठी शब्द केशवसुतांना त्यांच्या स्फूर्तीच्या धडाडींत सहज सुचतात. आणि ज्याप्रमाणें अग्निकुंडामध्ये जळत असलेल्या जड लांकडाच्या ओंडयांनीं आणि हलक्या ढलप्यांनीं ज्वालांची सर्वतोदिशं समृद्धीच होते त्याप्रमाणेंच येथेंहि जड आणि हलक्या शब्दांचा भेदभाव गळून जाऊन काव्यरसाचा आणि सौंदर्याचा सारखाच परिपोष होतो. 'वैरतयाला पोकळ जे **बडबडती तोऱ्यांत**' **लोळूनी** कृतार्थ होती जे प्राप्त तूपपोळींत–' हीं संभाषण रूढ शब्दांचा अनुरूप उपयोग केल्याचीं उदाहरणें–'प्रगतिस जर ते **हाणी टोणा**.', '**थप्पड** बसतां चोळित जें गालांस', '**अवडंबरलीं ढंगे** कितीतरी, 'ही ध्वन्यनुकारी शब्दांचीं उदाहरणें–'**निसर्ग निर्घृण** त्याला मुरवत । नाहीं अगदी पहा कशाची।' **संघशक्तीच्या** भुईत **खंदक रुंद** पडून त्याचे **शें तुकडे** झाले', ही कठोर शब्दांचीं, 'त्रिखंड हिंडुन घुंडितसे', '**हीन दीन** झालों **छंदी फदी** मी तुझिया **नादीं**'–हीं श्रुतिमनोहर शब्दांचीं, 'भगवा झेंडा **नाचविला,** 'तें घ्यावा तरि त्या मुखा **फुलविती**' ही चित्रमय शब्दांची उदाहरणें. असो, वर केलेल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ कांही मासले दिले व आणखी कितीतरी देतां येतील! केशवसुतांच्या सहज स्फूर्तीचे, कौशल्याचे सारसर्वस्व त्यांच्या समुचित, समर्पक, रसभरित शब्दयोजनेनेंच सिद्ध करतां येईल.

शब्दयोजनेनंतरची गोष्ट म्हणजे तालबद्ध रचना. सगळींच वृत्तें तालबद्ध असतात. तरीपण जेथें कवीच्या मनोवृत्तींचा आणि शब्दांचा, अनिर्वर्णनीय, अभेद्य संगम होतो, तेथें कवीच्या चैतन्याचा, स्फूर्तीचा, धडाडीचा, तडफेचा, त्याच्या क्रोधाचा, आवेशाचा, त्यानें उपयोजिलेल्या शब्दांच्या शरीरांत संचार होतो आणि त्यामुळें शब्द जिवंत माणसांसारखे हलूं लागतात, बोलूं लागतात, गातात, आरडतात, ओरडतात. नुसत्या छंदोबद्ध रचनेंत– केवळ वृत्तांचे नियम पाळल्यानें– कवितेंत चैतन्य निर्माण करितां येत नाहीं. तें कवीच्या हृदयांत असतें. तेथेंच जर अंतर्यामीचा उमाळा नसेल तर शब्दांत तरी तो कोठून येणार? केशवसुतांच्या अगदीं साध्या काव्यरचनेंतसुद्धां त्यांच्या प्रज्वलित अंतःकरणाची साक्ष पटते. केवळ काव्य करायचे म्हणून मध्यान्‌रात्रीं तेल जाळीत व कोणत्याहि प्रकारची अंतःस्फूर्ति नसतां, नांव मिळवण्याकरितां, धन मिळवण्याकरितां, त्यांनीं काव्यरचना केली नाहीं. ह्यामुळेंच त्यांच्या काव्यांत सर्व ठिकाणीं जिवंतपणा आहे. 'नाही रे! ते स्वकरांत! येणार गडचा नाहींत' या ओळींतील शब्द तरंगताहेत, पोहोताहेत, कारण ते जिनें उच्चारलेले आहेत त्या मातेचें म्हणजे कवीचें हृदय वात्सल्यानें कौतुकानें तरंगत आहे–पोहत आहे. 'प्रीति चारुता स्वच्छंद। ह्यांचे गा मधुरच्छंद'– हे शब्द गात आहेतसे दिसतात– दिसतात नव्हे– गातातच आहेत. कारण ते उच्चारणाऱ्या कवीचें हृदय स्वच्छंद गायनानें दंग झालें आहे. 'संतानें राक्षसी तुम्हांला। फाडूनि खाती ही हतवेला। जल्शाची का? पुसा मनाला।' ह्यांतले शब्द दांत-ओठ खात आहेत. त्यांचा राग त्यांना अनावर झाला आहे. कारण कविहृदयांतच बेसुमार क्रोध आहे. 'पूजितसे मी कवणाला तर मी पूजीं अपुल्याला। अपुल्यामध्यें विश्व पाहुनि पुजीं मी विश्वाला'– ह्या शब्दांची मजल किती दूरवर पोंचते! तें डोकें वर करून व छाती फुगवून चालताहेत. आत्मविश्वासानें ताठरलेले व आढ्य दिसतात. ही कविगत लोकोत्तर आत्मविश्वासाची, त्याच्या विश्वबंधुत्वाची प्रतिच्छाया आहे. 'मजपासोनि हाय हिरोनी। नेलें कोणी?। म्हणुनि जीव पाखडितसें' हे शब्द उदकांतून काढून बाहेर टाकलेल्या माशाप्रमाणें तडफडत आहेत. जिवाच्या अंतर्यामींची तळमळ स्पष्ट करणारा 'पाखडितसे' ह्या शब्दासारखा दुसरा शब्द सांपडेल कां नाहीं ह्याची शंकाच आहे, तो ध्वन्यनुकारी आहे.

साकी पुष्कळ लोक करतात. पण कितीजणांच्या साक्यामध्यें खालीं दिलेल्या साकींतलें शब्दार्थाचें मधुरमीलन सांपडतें? "कवीच्या हृदयीं जसें गुंगति कवितेचे मधु बोल। किंवा गायकमतींत झुकती ताना त्या सुविलोल' शार्दूलविक्रीडितांत पुष्कळ लोक कविता करतात. पण खालील शार्दूलविक्रिडिताचें वैभव किती कवींच्या कृतीत सांपडेल?

"आम्हीं कोण म्हणून काय पुसशी आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया

विश्वीं ह्या प्रतिभाबळें विचरतां चोहींकडे लीलया
दिक्कालांतूनी आरपार आमची दृष्टी पहाया शके"

ही खरोखरच शार्दूलाची उडी आहे. ह्यांतील एक एक ओळ केवढा टप्पा गांठते. ह्यांतल्या शब्दांना भीति नाहीं. संकोच नाहीं. त्यांच्या रोमरोमांत शार्दूलाचें अप्रतिहत वीर्य सांठवलें आहे. केशवसुतांनीं रचिलेल्या दिंडया आणि शिखरिणी अशाच मनोहर आहेत.

कविगीतकर्ता आपल्या भावनेला अनुरूप अशीं वृत्तें शोधून काढतो– शोधून काढतो म्हणण्यापेक्षां तीं त्याला सुचतात. कवीच्या हृदयांत भावना प्रदीप्त झाली म्हणजे ती एक विशिष्ट, आपल्याला सर्वस्वी योग्य अशी वृत्ताकृति घेऊनच शब्दरूपानें बाहेर पडते. काव्यभावनेचा जीव ह्या शब्दरूपी देहाकृतींत सांठविलेला असतो. कवीच्या मनांत पेटविलेल्या भट्टींत रसरसणाऱ्या भावनांच्या ज्वालांतच ही वृत्ताकृति घडलेली असते. आणि भावनेच्या वृद्धिक्षयाला अनुसरूनच ती वृत्ताकृति समविषम प्रमाणांत असते. प्राचीन वृत्तेंसुद्धा अशींच जन्मास आलीं. आणि जोंपर्यंत कविभावनेच्या अभिव्यक्तीस तीं उपकारक आहेत तोंपर्यंत त्यांचा त्याग करणें केव्हांहि उचित होणार नाहीं. परंतु जेव्हां भावनेचा आणि ह्या ठरीव वृत्तांचा मेळ बसत नाहीं, तेव्हां भावनानुरूप स्वतंत्र, योग्य वृत्तांचाच अवलंब करणें श्रेयस्कर. केशवसुतांच्या कृतींत पण अशीं नवीं वृत्तें पुष्कळ आहेत. 'कोठुनि हे आले येथें' हें एक अशा वृत्ताचें उत्तम उदाहरण आहे. आणि तें ह्या छोटयाशा कवितेंतील रम्य प्रसंगाला– आईच्या आणि तिच्या लहान मुलाच्या संवादाला–साजेसेंच आहे. भृंगाचें वृत्त अलौकिक मनोहर आहे. ह्या लहानशा काव्यांतील शब्दशरीर भृंगाच्या मंजुगुंजारवाने भरलेलें आहे. तें वाचीत असतां चहुंबाजूनें गुं गुं गुं करीत चक्राकार घिरटया घालणाऱ्या भृंगततीचा आभास होतो. 'फुलें फुलती, परिमल सुटती, रस गळती, हा सौख्य किती!'– येथें शब्द अडखळत नाहीत, रखडत नाहींत. गोल मोत्यांच्या दाण्यांप्रमाणें त्यांचें मंडलाकृति सौभाग्य आहे. 'हरपलें श्रेय' च्या वृत्तांची नवलाई अपूर्व आहे. ह्या काव्यांत कवीचा तीव्र दुःखावेग एकाक्षणीं समुद्राच्या लाटेप्रमाणें उंच उसळी मारतो आणि लगेच दुसऱ्याक्षणीं त्या लाटेसारखाच धाडकन् खालीं कोसळतो. वृत्तांतील चढउतारांत हाच क्रम दिसून येतो. कांहीं वेळ कवीच्या हृदयांतील शोकाला भरती येते आणि मग ह्या भरतीला ओहोटी लागते. वृत्तांतील लहान-मोठया ओळी कवीच्या अंतरंगांतील भरती–ओहटीचें बाह्य रूप होय. आवर्त दशांशांतील अंकाप्रमाणें पुन्हा पुन्हा येणारा एकच चरण ह्या वृत्तांतील स्थायिभावाचा प्रतिनिधि आहे. तो स्थायिभावाची आठवण बुजूं देत नाहीं. 'गोफण' आणि 'तुतारी' ह्या काव्यांतील वृत्तें पण अशींच नवीन आणि समर्पक आहेत पण त्यांचा विस्तृत विचार करावयास आपल्याला वेळ नाहीं.

आणखी एकच गोष्ट सांगून हें वृत्तवैचित्र्याचें प्रकरण संपवितों. केशवसुतांनीं इंग्रजी काव्यांत प्रचलित असलेली वृत्तें मराठींत आणण्याचा प्रयत्न केला आहे. चतुर्दशपदीं (Sonnet) रचणें हा एक अशापैकीच प्रयत्न. दुसरा एक ह्याच दिशेनें केलेला प्रयत्न म्हणजे एकामागून एक येणाऱ्या ओळींचें यमक न साधतां तें आळीपाळीनें साधणें किंवा प्रथम–चतुर्थ चरणांचे आणि द्वितीय-तृतीय चरणांचे यमक साधणें हे प्रयोग आहेत. भाषेंत तें चांगलें रूढ झाल्याशिवाय यशस्वी आहेत कां नाहींत हें आपल्याला सांगतां येणार नाहीं.

वृत्तवैचित्र्यानंतर अर्थालंकार आणि शब्दालंकार. केशवसुतांना शब्दचमत्कृतीचें विशेष महत्त्व वाटत नाहीं. काव्याचें रमणीयत्व म्हणजे शारदेचा प्रसाद. 'दिव्य शक्तीनें स्फुरे गंध पुष्पीं। रंग खुलतीही तिनें इंद्रचापी' असे त्यांचे मत असल्याकारणानें ते शब्द चमत्कृतीच्या सहाय्यानें ओढून ताणून अळेबळें काव्यसौंदर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत नाहींत. अनुप्रास, यमकचमत्कार वगैरे त्यांच्या स्फूर्तीच्या भरांत साधतील तेवढेच. 'बंडाचा तो झेंडा उभवूनि धामधूम जिकडे तिकडे। उडवूनि देऊनि जलुमाचे ह्या करूं पहा तुकडे तुकडे ।। हीन दीन झालों छंदी फंदी मी तुझिया नादीं'– ह्या दोन्ही उदाहरणांत कलाकुसरीचा भाग नाहीं. क्वचितप्रसंगी ते शब्दांनां इकडे तिकडे नाचवून जरा गंमत करतात. 'दिवाळी'त ह्यांचें एक चांगले उदाहरण आहे.

"आता भार नसे कुणास पण तो शिक्क्यास भारी असे
हातां काम नसे परंतु पडतें तोंडास तें फारसें;
कोणा मार नसे तरी पण शिरीं तो सोंगाटचाचा बसे
कोणा त्रास नसे परंतु नयनां तो जागरे होतसे."

उपमा, अतिशयोक्ति वगैरे अलंकार त्यांच्या काव्यांत पुष्कळ सांपडतात. 'स्वपतिचितेवरी उडी सती। संसृतिविमुखी घेई ती' ही एक मनोहर उपमा; 'नटीपरी त्या कविता तयाची, जनस्तुति ती हृदयांत याची' ही दुसरी; 'प्राप्तकाल हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा।' हें आवेशयुक्त रूपक तुतारींतलें आहे. गोफण केली छान' ही सबंध कविता म्हणजे एक रूपकच आहे. 'फिर्याद' हें अतिशयोक्तीचे निदर्शन. ज्याला इंग्रजीमध्यें परसॉनिफिकेशन (personification) म्हणतात, ज्याला आरोपगर्भितोत्प्रेक्षा असें मराठींत म्हणतां येईल त्याचें 'दिवाळीं'त एक नामी उदाहरण आहे. शरदऋतूवर पुरुषधर्माचा आरोप केला आहे.

"जो गोपाल गमे प्रभात समयीं गाईवनीं चारितां
वाटे रव्युदयीं नदीवर मुनीं अर्घ्यास जो अर्पिता
जो भासे दिवसां कृषीवल शिरीं खोंवूनियां लोंबरें
तो आतां ऋतु शारदीय बहुधा शेतांतूनी संचरे"

कीट्स्च्या (Keats) शरदृतुवरील कविगीतांत अशाच प्रकारची कल्पना आलेली आहे. आणि त्यावरूनच केशवसुतांना ही कल्पना सुचलेली असावी. पण ती सुचली इतकेंच. कीट्स्च्या कल्पनेचें हें भारतीय अगदीं शुद्ध स्वदेशी स्वरूप आहे. ओवडधोबड मांजरपाट नव्हे. अगदीं उत्कृष्ट प्रतीची डाक्याची मलमल आहे.

असो. आतांपर्यंत ज्या ज्या मुद्द्यांचा आपण ह्या निबंधात विचार केला त्याचा फक्त समारोप करायचें काम राहिले. निबंधाच्या पहिल्या भागांत विषयप्रवेश करतेवेळीं केशवसुतांचें काव्य अभिनव आहे, पूर्वीच्या महाराष्ट्रभाषेंतील खंडकाव्यांत आणि केशवसुतांच्या काव्यांत महदंतर आहे, इंग्रजी काव्यपरिशीलनामुळें केशवसुतांच्या कवितेला एक निराळचा प्रकारचें वळण लागलें इत्यादि गोष्टी सांगितल्या. निबंधाच्या दुसऱ्या भागांत इंग्रजी कविगीतांच्या लक्षणांचें वर्णन केलें आणि तिसऱ्या भागांत इंग्रजी कविगीतांचीं लक्षणें केशवसुतांच्या काव्यांत सर्वत्र कशीं आढळून येतात ह्या मुद्द्याचें स्पष्टीकरण केले. इंग्रजी कविगीतांचें मुख्य लक्षण म्हटलें म्हणजे – तें अंतःसृष्टिपर असते. कवीच्या अंतःकरणांतील भावना हाच त्याचा वर्ण्य विषय; कवि स्वतःच आपल्या काव्याचा नायक असतो. इंग्रजी कविगीतांचें हें प्रधान लक्षण केशवसुतांच्या काव्यांत सर्वत्र आढळून येते. तसेंच केशवसुतांचे काव्य सहज रमणीय आहे. स्तुतिमानधनादिकांच्या अपेक्षेनें तें केलेलें नाहीं. केशवसुतांच्या चरित्राचें त्यांत प्रतिबिंब पडलेलें आहे. ह्या बाबतींत पण केशवसुतांच्या काव्याचें इंग्रजी कविगीतांशीं साम्य आहे. तिसरा एक इंग्रजी कविगीतांचा विशेष म्हणजे त्याची सुसंघटित रचना आणि आटपशीरपणा. हाही विशेष केशवसुतांच्या काव्यांत सर्वत्र दृष्टीस पडतो. इंग्रजी कविगीतांप्रमाणेंच केशवसुतांच्या काव्यांत समुचित– समर्पक शब्दयोजना– तालबद्ध रचना– वृत्तवैचित्र्य इत्यादि गुणांची वाण नाहीं. शब्दालंकाराची, विशेषतः अर्थालंकाराची पण त्यांच्या काव्यांत उणीव नाहीं. केशवसुतांचें काव्य कलमी आंब्यासारखें आहे. महाराष्ट्र भाषेच्या तेजस्वितेची, स्वातंत्र्याची हानि होऊं न देतां त्यांनीं आपल्या जोमदार प्रतिभेच्या साहाय्यानें इंग्रजी कविगीतांतील सर्व गुण आत्मसात् करून घेतले आणि एक अभिनव काव्यरचनेचा प्रकार महाराष्ट्र भाषेंत दृढ करून तिच्यावर अमित उपकार करून ठेवले.

–•–

(नवयुग– ऑक्टोबर-नोव्हेंबर १९२१
अंक १०–११ पृ. सं. ६०९ ते ६२४)

१

केशवसुतांची कविता

लेखक : ग. त्र्यं. माडखोलकर

अपकर्षामागून उत्कर्ष, दुःखामागून सुख, निराशेमागून आशा–असल्या परिस्थितीच्या या चक्रनेमिक्रमानें हें विराट्स्वरूप विश्वचक्र निरंतर फिरत असतें. विरोधी भावांनीं विनटलेल्या विश्वसंसाराला वैचित्र्य आणणारा हा चक्रनेमिक्रम शब्दसंसारांतहि सदैव आढळून येतो. शब्दांच्या संसाराला—मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भूत होणाऱ्या विविध विचारतरंगांच्या विलासितांनीं घडलेल्या या शब्दविश्वालाहि—विरोधी भावांच्या या चक्रनेमिक्रमानें एक प्रकारचें विलक्षण सौंदर्य आणिलें आहे. हें सौंदर्य सहज आहे; विरोधी भावांचा विलास म्हणजेच मानवी जीवित! कारण सुखदुःखांचे, आशानिराशांचे चार डाव खेळत असतां प्रपंचरंगांत रंगलेल्या जीवाला जी हारजीत, प्रसंगोपात्त जे अनेकविध अनुभव येत असतात त्या अनुभवांवरच शब्दसृष्टीची उभारणी झालेली आहे. आणि म्हणूनच मानवी अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या क्षणिक विचारतरंगांवरच ज्याची सर्गस्थिति विशेषतः अवलंबून असते त्या काव्यवाङ्मयांत हा चक्रनेमिक्रम अधिक आढळून येतो. विश्वसंसाराचा किंवा किंचित् मर्यादित असलेल्या राष्ट्रसंसाराचा आणि शब्दसंसाराचा असा अगदीं निकट संबंध असल्यामुळें त्या त्या काळच्या राष्ट्रीय परिस्थितीचें प्रतिबिंब तत्कालीन वाङ्मयांत, विशेषतः काव्यवाङ्मयांत स्पष्ट पडलेलें दिसून येतें. स्वातंत्र्याकरिता सर्वस्वाचें समर्पण करून स्वराज्यस्थापना करणाऱ्या शिवप्रभूच्या कर्तव्यप्रेरक कारकीर्दीत जर प्रपंचपराङ्मुख संतकवींच्या प्रतिभेनें

निर्माण केलेला निराशवाद नष्ट करून राष्ट्रभावनांचें उद्दीपन करणारीं ओजस्वी कवनें निर्माण झालीं, तर रंग उडवन राज्य राखणाऱ्या रावबाजीच्या अपेशी अमदानींत विषयलोलुपांच्या वैषयिक वृत्तींचें वर्णन करणाऱ्या अत्यंत अधम शृंगारगीतांचाच विशेष प्रादुर्भाव झाला. अध्यात्माच्या अढळ आधारावर उभारण्यांत आलेल्या महाराष्ट्र–भाषेच्या या भव्य मंदिरावर कामुक मनाच्या कोत्या कल्पनांचे, शबल भावनांचे क्षुद्र मनोरे या स्वराज्यविनाशाच्या विपरीत कालांतच लावणी-कवींनीं चढविले; आणि

नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं
परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर

–नामदेव.

या पुण्यचरित संतकवींच्या परमोदात्त ध्येयापासून च्युत झालेली महाराष्ट्र-शारदा वीणागुण चाळून नामसंकीर्तन करण्याऐवजीं डफाच्या तालावर लावण्या आळवूं लागली! आधुनिक म्हणजे नवीन धर्तीच्या मराठी कवितेचा उगम येथेंच सांपडतो. जीवन्मुक्त संतकवींच्या प्रशांत प्रतिभेच्या प्रकर्षानें प्रारंभींच्या मराठी कवितेचें स्वरूप केवळ आध्यात्मिकच ठेविलें. शिवशाहींत आणि विशेषतः पेशवाईंत बदलत्या परिस्थितीप्रमाणें हें प्रारंभींचें स्वरूप पालटून महाराष्ट्र-शारदा नुसतें नामसंकीर्तनच न करितां पुराणकथांचे विविधालापहि गाऊं लागली. आधुनिक कवितेचा अगदीं सूक्ष्म उगम प्रथम येथेंच सांपडतो. पारमार्थिक किंवा पौराणिक विषय जाऊन त्यांची जागा ऐहिक किंवा ऐतिहासिक विषय याच संधिकालांत प्रथम व्यापूं लागले. निरंजनमाधवाचें प्रवासवर्णन, जगन्नाथाचें शशिसेना काव्य, जीवनाची अनुभवलहरी, महिपतीची संतचरित्रें व अनंतफंदीचा माधवग्रंथ,—हे सर्व काव्य-प्रबंध या बदलत्या परिस्थितीचे व अभिरुचीचे द्योतक आहेत. लोकाभिरुचीचा रागरंग पाहून स्वतःच्या प्रतिभेला नाचविणारे कवि याच काळांत निर्माण झाले; आणि त्यांच्या नादमधुर कवितेला लौकिक पठणाचें अमर अधिष्ठान मिळालेलें पाहून ऐहिक विषयांवर विशेष भर देणारे लावणी–कवि पुढें सरसावले. अध्यात्मापासून ऐहिकाकडे व परमार्थापासून प्रपंचाकडे झालेलें हें परिवर्तन महाराष्ट्रशारदेला असह्य झालें; आणि म्हणूनच बहुधा स्वराज्याच्या विनाशकाळांत शृंगाराचे विपरीत खेळ महाराष्ट्र–कवींना आठवले! मराठी कवितेचे प्राचीन आणि अर्वाचीन किंवा आधुनिक असे भेद पाडून इंग्रजी अमदानीपासून आधुनिक कवितेचा आयुर्दाय मोजण्याच्या अलीकडील रूढीला इतिहासाची साक्ष ही अशी प्रतिकूल पडते. प्रत्येक पिढीला अधिकाधिक निस्तेज होत चाललेल्या छत्रपतींना व पेशव्यांना घरीं बसवून लोकसत्तेच्या मार्गावर हळुहळु राज्यशकट नेणारी व्यवहारचतुर बारभाईंची खेती यशस्वी होती आणि

महाराष्ट्रांत जरी आज सुधारलेलें स्वराज्य नांदतें तरी सुद्धां आजचें युगतेज ओळखून कवींना, राज्यकर्त्याप्रमाणेंच जुन्या वळणाचा हळुहळू कां होईना पण त्याग करून, कवित्वाचें आधुनिक वळण स्वीकारावें लागलें असतें; आणि स्वभाषेचा अभिमान वाहून तिच्या उत्कर्षाची चिंता करणारें तसलें स्वदेशी सरकार जर आज विद्यमान असतें, तर युगतेज ओळखून नवीन धर्तीवर प्रबंध रचणाऱ्या कवींनाच राजाश्रय मिळाला असता असें खचित वाटतें.

परंतु निःपक्षपाती रसिकांच्या तर्काला आणि युक्तीला पटणाऱ्या या कल्पना-जालांत, ज्यांचें समाधान कधींच होणें शक्य नाहीं अशा निंदकांच्या समाधानाकरितां अधिक न गुंतता प्रस्तुताकडे वळणेंच विशेष श्रेयस्कर आहे. अव्वल इंग्रजी अमदानींत कवित्वगुणाची बूज न होऊन सामान्यजनतेचें लक्ष गद्याकडेच विशेष वेधलें. संपन्न संस्कृत सारस्वताच्या साहाय्यानें मराठी काव्यवाङ्मयाला सुधारण्याचे प्रयत्न, या दुःस्थितींत प्रथम शास्त्रीमंडळानें केलें. चिपळूणकर, राजवाडे, लेले, पारखी या विख्यात संस्कृत पंडितांनीं मराठी काव्यवाङ्मयांत चांगलीच भर घातली. मेघ-दूताचें चिपळुणकरकृत सहजसुंदर भाषांतर सोडलें तरी गडबोले यांचें मृच्छकटिक व उत्तररामचरित्र, राजवाडे यांचें मालतीमाधव आणि लेले यांचा रघुवंश हीं भाषांतरें सरस आहेत. लेले यांचें शिवचरित्रावरील स्वतंत्र काव्य अगदीं नीरस आहे. इंग्रजी पंडितांच्या कृतींत रा. ब. महाजनी यांची 'कुसुमांजलि' मधुर आहे. प्रधानांचें 'दैवसेनी' हें लघुकाव्यहि सुरस आहे. परंतु हे सर्व प्रयत्न अस्वतंत्र होते. स्वतंत्र काव्यांत गणण्याजोगे पाळंदे यांची 'रत्नमाला' व चिंतामणि पेठकरांची 'गंगावर्णना' हे दोनच काव्यग्रंथ आहेत. पाळंदे यांच्या रत्नमालेचें जुनें वळण कांहीं सुशिक्षितांना जरी मान्य व प्रिय झालें असलें, तरी एकंदरींत जुन्याला विटलेल्या सुशिक्षित समाजाला तें प्रिय होणें शक्य नव्हतें. पाळंदे यांचीं एकदोन उत्कृष्ट पदें मात्र महाराष्ट्रांत अगदीं सर्वतोमुखी झालीं आहेत. 'गंगावर्णना' हें काव्य जुनें वळण न सोडतां जरी लिहिलें असलें तरी त्यांत नावीन्यहि कांहीं ठिकाणीं आढळतें. या काव्याची रचनाहि फार सफाईदार आहे. परंतु इंग्रजी कवितेच्या मोहनीनें ज्यांची दृष्टि धुंद झाली होती त्यांना स्तिमित करण्यासारखा कोणताहि उत्कट गुण ह्या स्वतंत्र काव्यांत नव्हता; आणि त्यामुळें या काव्याचें तेज इंग्रजी कवितेपुढें पडलें नाहीं. निव्वळ इंग्रजी किंवा संस्कृत धर्तीवर स्वतंत्र काव्यरचना करण्याचे प्रशंसनीय प्रयत्न कुंटे, खरे आणि मोगरे यांनींच विशेष केले. कवित्वगुण कमी असल्यामुळें कुंटयांची कविता कायमची मागें पडल्या-सारखी दिसते. खरे यांच्या कवितेचें वळण जुनें असल्यामुळें तीहि सुशिक्षितांना मान्य झाली नाहीं. 'जन्मभूमि' या कवितेसारखे त्यांचे कित्येक चुटके चांगले उतरले आहेत. सुबोध व सुश्लिष्ट रचना, प्रासादिक व प्रेमळ कवित्व या गुणांमुळें मोगरे यांची कविता अधिक लोकप्रिय आहे. परंतु कल्पनेचे स्वैर संचार किंवा हृदयंगम संवेदना मोगरे

यांच्या कवितेंत सहसा आढळत नाहींत. निव्वळ नादलुब्ध मनाला आनंद देणारें श्रुतिसुभग शब्दसौंदर्य मात्र त्यांच्या कवितेंत भरपूर आहे; परंतु जातिवंत रसिकाच्या मनाला भुलविणारा काव्याचा आत्मा जो ध्वनि तो मात्र अगदीं नाहीं. आधुनिक काव्यवाङ्मयाला परिस्थितीप्रमाणें नवीन वळण लावण्याचें सामर्थ्य मोगरे यांच्या वाणींत अर्थातच नव्हतें; भाषांतराचा किंवा अनुकरणाचा नित्यक्षुण्ण प्रदेश सोडून प्रतिभेच्या प्रभावानें नवीन सृष्टि निर्माण करणारा वागीश्वरच आधुनिक कवितेला वळण लावावयाला पाहिजे होता. जुन्या कल्पना, जुने सांप्रदाय, जुने वृत्तबंध यांच्या पार्थिव पाशांत गुरफटलेल्ला प्रतिभेला बंधमुक्त करून

मी न तुझी—त्याची
मी न माझी—कुणाची
ब्रह्मांडाच्या घडामोडी करी—ग !

—Bee

असल्या अचल आत्मप्रत्ययानें अज्ञाताच्या अफाट अंतराळांत अप्रतिबंध नाचविणारा स्वातंत्र्याचा शाहीरच तें कार्य करावयाला हवा होता ! आणि असाच एक दैवी स्फूर्तीचा शाहीर या महाराष्ट्र भूमींत १८६६ त जन्मास आला. त्या मंगलकालीं, त्या अर्भकाच्या अस्फुट रुदनानें जागृत झालेल्या माल्यकूटांतल्या वनदेवतांनीं

गाऊं या ! हृदयांत या अमुचिया प्रीती असें दाटली !
गाऊं या ! हृदयांत या अमुचिया कां स्फूर्ति ही वाडलीं ?

असे आश्चर्योद्गार काढून त्या नवजात कविश्रेष्ठाच्या स्वागतार्थ नितांतमधुर निःशब्द गीतें बहुधा गाइलीं असतील !

भाषांतराच्या पांगुळगाड्याचा आधार घेऊन केशवसुतांच्या प्रतिभेनें वाङ्मयप्रदेशांत पहिलें पाऊल टाकिलें. केशवसुतांची भाषा प्रारंभीं संस्कृतप्रचुर असे, याची साक्ष, रघुवंशाच्या सातव्या सर्गांतील सात श्लोकांचें पहिलें भाषांतर, 'सूर्यास', 'सृष्टि आणि कवि' व 'प्रियेचें ध्यान' या गोड कविता देतात. 'कविता आणि कवि' ही अगदीं सामान्य कविता त्यांचें हें संस्कृत वळण सुटून शुद्ध मराठी वळण लागल्याचें स्पष्ट दर्शविते. या कवितेंतील चवथ्या श्लोकांत कवित्वाचा हेतु आणि शेवटल्या दोन श्लोकांत कवीचें निरंकुशत्व या दोन महत्वाच्या विषयांवरील कवीचीं बाणेदार मतें आलीं आहेत. 'अढळ सौंदर्य' या सुंदर कवितेनें कवीनें नवीन स्वीकारलेलें वळण चांगलें आहे अशी खात्री होते. जगांतील सर्व वस्तूंचें सौंदर्य आरंभीच आनंददायक असतें; अतिपरिचयानें नवलाई कमी होत जाऊन त्यांतील आनंद उडून जातो असा

अनुभव आहे. नवेपणांत नवलाई नांदते; व असें अक्षय्य नवेपण निसर्गांतच आहे,– निसर्गदृश्यांतच शाश्वत सौंदर्य सामावलेलें आहे– या तत्त्वाचा परिचय या कवितेंत होतो. 'अपर कवितादैवत' या कवितेंत प्रेमगीतें कां व कशीं उत्पन्न होतात याचें मार्मिक उत्तर दिलेलें आहे. केशवसुतांच्या प्रेम-कविता वाचतांना हे केवळ कल्पनातरंग नसून विरहव्याकुळ अंतःकरणाचे तळमळीचे उद्‌गार आहेत असें वाटल्यावांचून राहात नाहीं. 'एक खेडें' ही केशवसुतांची एक उत्कृष्ट कविता आहे. खेडेगांवाच्या राहणीचें इतकें रम्य व पवित्र वर्णन दुसरें क्वचितच असेल.

देवळीं त्या देवास बळें आणा
परी राहे तो सृष्टिमधें राणा.

ही विश्वसौंदर्यांत विश्वेश्वर पहाण्याची भावना अत्यंत उदात्त आहे. शहरांतील घालमेलीचें वर्णन नागर मनापेक्षां खेडवळ मनाला अधिक आनंद देतें; कारण शहरांतल्या आनंदापेक्षां नागरिकांना दुःखच जास्त जाणवतें. खेडवळाच्या भावडया मनाचा भोळा आनंद या कवितेंत फार चांगल्या रीतीनें दाखविला आहे. केशवसुतांनीं नव्यानें पत्करलेलें मराठी वळण या कवितेंत दृढ झालेलें दिसतें. 'आगबोटीच्या कांठाशीं उभ्या असलेल्या तरुणीस' हें केशवसुतांचें अपुरें राहिलेलें खंडकाव्य असावेंसें वाटतें. या रमणीय काव्यांत केशवसुतांच्या कल्पनेचे चंचल विलास दृष्टीस पडतात. सृष्टीच्या त्या सुतेला पाहून अंतःकरणांत उचंबळून आलेल्या तरल भावना, निसर्ग-नियमांना तुडविणाऱ्या मानवजातीविषयीं मनांत असलेला तिटकारा, परराष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या जुलमी राष्ट्रांविषयीं मनांत असलेला द्वेष–हे सर्व भाव कवीनें या काव्यांत प्रकट केले असून कल्पनानिर्मित वरुणरुष्टीचें वर्णनहि फार बहरीचें केलें आहे. सामाजिक सुधारणेविषयीं केशवसुतांना अतोनात आदर वाटत असे; देशाची सर्व बाजूंनीं झालेली दुर्दशा पाहून तळमळणाऱ्या त्यांच्या अंतःकरणाची उत्कटता

तेव्हां आम्हीं म्हटलें—"ही ऱ्हासाची
रजनी केव्हां विरून जाइल साची ?
स्वतंत्रतेची पहाट ती येईल
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील ?
या डोळ्यांनी पहाट ती बघण्याचें
असेल कां हो नशिबीं दुर्दैव्यांचे ?
किंवा तीतें आणायचे कांहीं
यत्न आमच्या होतिल काय करांहीं ?"

या उत्कृष्ट कवितांत व्यक्त झाली आहे. केशवसुतांचे गुरु समाजसुधारक आगरकर यांच्या तेजस्वी मतांचा विलक्षण परिणाम केशवसुतांच्या कवितेवर झालेला दिसतो. प. वा. आगरकर यांचीं सामाजिक बाबतींत जशीं अत्यंत बाणेदार मतें होतीं, तशींच तीं राजकीय बाबतींतहि होतीं. समाजकारणांत घायकूतपणानें सुधारणा घडवून आणूं पहाणारे आज जसा राजकारणांत धिम्मेपणाचा उपदेश करूं पहातात तसला एकदेशीय उपदेश करण्याचें कसब आगरकरांना कधींच साधलें नाहीं. आगरकरांचें तर्कशास्त्र सडेतोड होतें; सामाजिक अन्याय आणि राजकीय अन्याय त्यांच्या सरळ व प्रामाणिक बुद्धीला सारखेच जाचक वाटले; सामाजिक अन्यायांवर कडक टीका करणारी त्यांची निःस्पृह राष्ट्रभक्ति राजकीय अन्यायांवर टीका करतांना कधींच वचकली नाहीं. मनाला जें सत्य वाटेल तें बोलणार असा अभिमान त्यांनीं आमरण वाहिला. हाच शुद्ध सत्याभिमान केशवसुतांच्या ठिकाणीं अगदीं ओतप्रेत संचरला होता. 'तुतारी' फुंकून जितक्या आवेशानें त्यांनीं–

जुनें जाउं द्या मरणालागुनि !

असे अंतःकरणाच्या तळमळीचे तीव्र उद्‌गार काढिले, तितक्याच आवेशानें त्यांनीं गोफण झुगारून कठिण शब्दरूपी धोंड्यांनीं हाणाहाण केली. 'मजुरावर उपासमारीची पाळी' व 'अंत्यजांचीं मुलें' या हृदयंगम कवितांत त्यांचीं हीं मतें उत्तम रीतीनें स्पष्ट झालीं आहेत. 'आई ! आई !' या कवितेंत विद्यार्जनाकरितां आईपासून दूर गेलेल्या–पहिल्यानेंच दूर गेलेल्या–मुलाच्या हृदयद्रावक मनोवृत्तींचें वर्णन केलेलें आहे. स्वजनांविषयीं केशवसुतांच्या अंतःकरणांत अपार प्रेम असे. स्वजनांची ताटातूट झाल्यानें मनाची होणारी तडफड त्यांनीं अनुभविली होती. गांवाला गेलेल्या मित्राची बंद झालेली खोली पाहून त्यांना एकदां त्रिभुवन आठवलें होतें आणि त्याच्या सहवासांत लाधलेल्या सुखक्षणांचे स्मरण करून त्यांनीं अश्रु ढाळिले होते. अशाच एका वेळीं स्वजनांपासून दूर असतां 'घराकडील गोष्टी' बोलत बोलत ते कल्पनावारूवर बसून घरीं जाऊन आले होते ! 'घराकडील गोष्टी' ही एक त्यांची अप्रतिम कविता आहे. प्रेमळ मित्राशीं घरगुती गोष्टी बोलत असतां त्यांचें देहभान अगदीं उडून गेलें आणि त्यांच्या दृष्टीपुढें अत्यंत सुखमय असे तें गृहचित्र उभें राहिलें. रम्य वस्तु किंवा रम्य स्मृति यांच्याशीं केशवसुत तेव्हांच तन्मय होत असत.

जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें !

हे त्यांचे उद्‌गार अगदीं यथार्थ आहेत. या फुलावरून त्या फुलावर बागडणाऱ्या भृंगाला पहात असतां, त्या वेळच्या तल्लीनावस्थेंत त्यांना स्फुरलेलें गाणें अतीव मधुर

आहे. पहांटेस फांकणारें अरुणाचें सौम्य तेज आणि कमीकमी होत जाणारा अंधार पाहून त्यांना काव्यस्फूर्तीच्या वेळीं कविहृदयांत हळुहळू उदित होणाऱ्या प्रतिभातेजाचें व त्या तेजाच्या उदयामुळें उणावत जाणाऱ्या ऐहिक उपाधींच्या अंधाराचें स्मरण झालें आणि सृष्टि कवयित्रीच दिसली ! वृक्षवेलींवर अर्धवट उमटलेल्या कळचा याच त्या कवयित्रीच्या कल्पना; आणि या कवयित्रीचें काव्य कोणतें ?–

भृंगा ! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन !

मनुष्याची कल्पना व दृष्टि परिस्थितीनें कोती केल्यामुळें त्याला निर्दोषांतहि दोष, सुंदरतेलाहि कुसें दिसूं लागलीं आहेत. मनुष्याच्या मनाला जडलेली ही कृत्रिमता निसर्गाशीं तद्रूप झाल्याशिवाय जाणार नाहीं; व म्हणून कवि भृंगाच्या रसिकतेची अपेक्षा करीत आहे. अशा तऱ्हेची स्वर्गीय रसिकता न लाधल्यामुळेंच, भृंग जसा पुष्पाशीं प्रेमानें गुजगोष्टी करीत, त्याचे मुके बोल गुणगुणत वातावरणांत विहरतो तसें कवीला विहरतां येत नाहीं. 'पुष्पाप्रत' या गोड कवनांत कवीनें ही आपली निराशा तीव्र शब्दांत सांगितली आहे. बाल्याच्या सीमेवर डुलत असतांना फुलांत व मुलांत कांहींच अंतर नसतें; वाऱ्याच्या झोंक्याबरोबर हेलकावणाऱ्या फुलवेलीच्या अस्थिर स्थितीची जशी फुलाला जाणीव नसते तशीच आईच्या मांडीवर अंगाई करणाऱ्या मुलाला मातेच्या सांसारिक चिंतांची कल्पना नसते ! परंतु बाळपणची ही निश्चिंत व निरागस स्थिति मनुष्याला कायमची कधींच लाभत नाहीं; उलट, कवि फुलाला म्हणतो

सौकुमार्य तव अजुनी आहे !
हंसतचि आहे हास्य तुझें हें;
परि मम भाळीं ढग अश्रूंचा;––हाय, डवरलाहे !

सांसारिक उपाधींचा विसर न पडल्यामुळेंच कवीला 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' शब्दांनीं रेखाटतां येणें अशक्य होतें. आणि जगाच्या जाचानें रागावून परत गेलेल्या शब्दांनीं मागें फिरावें म्हणून 'शब्दांने मागुते या !' अशी कळवळून हांक फोडावी लागते. व्यदि 'ठिणगी,' 'कल्पकता', 'कवि' व 'चिन्हीकरण' हे चिमुकले चुटके चांगले आहेत. कवितेच्या उद्भवाला कवि हा केवळ निमित्तमात्र असतो. सृष्टीमध्यें जें कांहीं रम्य असतें तें कवीच्या अंतःकरणांत घोळूं लागलें कीं काव्य आपोआप निर्माण होतें. भृंग, पुष्प, किंवा फूलपांखरू यांना पाहिल्याबरोबर सृष्टीशीं समरस होणाऱ्याकवीला भान राहात नाहीं. त्या मनोरम हृदयांतलें रम्यपण त्याच्या अंतःकरणाला भुरळ पाडितें. जगाचा जाच क्षणभर त्याला पारखा होतो आणि

'सर्व विनाशी असती प्राणी'
ही मज खोटी वाटे वाणी;
फूलपांखरूं-मरण पाहिलें––
आहे कां कोणीं ?

असा भ्रम–गोड भ्रम–फूलपांखराला हवेंत भिरभिरतांना पाहून त्याच्या मनाला पडतो. प्रत्येक फुलावर क्षणभर रमणाऱ्या फूलपांखराला पाहतांच

तरल कल्पना जशी कवीची
सुंदर विषयांवरुनी साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे––
––––फूलपांखरांची !

अशी गोड उपमा कवीला सहज सुचते ! सृष्टिसौंदर्यांत जर कवीच्या मनाला तल्लीन करण्याचें सामर्थ्य नसतें तर जगांतल्या काळज्यांनीं कवीचें कोमल मन तेव्हांच करपून गेलें असतें. आणि म्हणूनच 'काव्य कोणाचें ?' असें विचारलें असतां कवि 'तें आपलें नव्हे; सृष्टीचें–सृष्टिसौंदर्याचें आदिकरण जी दिव्यशक्ति तिचें आहे' असें सांगतो. जगांतल्या दुःखांच्या आघातांनीं कवीचें अंतःकरण इतकें हळू झालेलें असतें कीं नुसत्या करुणकल्पनेच्या स्पर्शानें सुद्धां तें कळवळतें. पहाटेच्या प्रहरीं पडलेले 'दंवाचे थेंब' पाहून बाळानें विचारलेल्या प्रश्नांनीं आईला मृत अपत्यांचें स्मरण होऊन शोकाचा उमाळा आला; आईच्या अंतःकरणांत उठलेल्या त्या करूणा-कल्लोलांत विरून जाऊन

होते हिर्मांबदु सकाळीं
कोठें ते सायंकाळीं ?

असा प्रश्न कविहि आपल्या मनाला खेदानें विचारूं लागला ! प्रापंचिक आपत्तींनीं गांजल्यामुळें केशवसुतांच्या मनाची अशी अगदीं नाजुक स्थिति झाली होती. कविता हाच त्यांच्या दुःखी मनाला विरंगुळा होता. कवीला जें इतकें कवितेचें महत्त्व वाटतें त्याचें कारण त्याच्या विव्हव मनाचें हें वेड होय ! स्वजनांचा वियोग झाल्यामुळें किंवा देशाच्या विपन्न स्थितीच्या चिंतनानें त्याचें मन खिन्न झालें असतां कविताच त्याला या दुःखांचा क्षणभर विसर पाडते. 'कवितेचें प्रयोजन' कवीला जितकें जाणवतें, तितकें इतरांना जाणवणें शक्य नाहीं. त्यांतून राष्ट्राच्या दुःस्थितीचें रडगाणें कानीं-कपाळीं कायमचें लागलें असतांना कवीचें गाणें कोण ऐकत बसणार ? अशा वेळीं फक्त एकाच कारणानें कवितेचें महत्त्व लोकांना जाणवणें शक्य असतें. पारतंत्र्यांत

खितपणाऱ्या जनतेला पूर्वकालीन स्वातंत्र्याचें स्मरण जितकें प्रिय असतें तितकें दुसरें कांहींच नसतें, असें म्हटलें तरी चालेल. पूर्व वैभवाच्या स्मरणानें प्राप्तकाळाची दुर्दशा क्षणभर ती डोळ्यांपुढून दूर होतें; पूर्वजांच्या पराक्रमांचे पोवाडे ऐकून क्षणभर तरी अंगावर रोमांच थरारतात आणि प्राप्त काळाला झुगारून देण्याची बुद्धि होते! अंतःकरणांत अशा वेळीं उठणाऱ्या क्षणिक स्फूर्तीच्या लहरी सदोदित थरारत्या राखणें 'कवितेचें प्रयोजन' असतें. हें कार्य कविता जर करील तर तिचें महत्त्व जनतेला पटल्याशिवाय रहाणार नाहीं. केशवसुतांनीं हें जाणूनच 'दोन बाजी', 'गोफण' असलीं ओजस्वी कवनें गाइलीं. हॅम्लेटनें ज्याप्रमाणें 'दोन बापांची' तुलना करून आपल्या बहकलेल्या आईचें बेशरम मन ताळ्यावर आणिलें त्याचप्रमाणें दोन बऱ्या-वाईट ऐतिहासिक पुरुषांची अगर प्रसंगांची तुलना करून राष्ट्राची विवेकबुद्धि जागृत करणें हें नुसता आंधळा देशाभिमान चेतविण्यापेक्षां अधिक हितकर असतें. या दृष्टीनें केशवसुतांचा 'दोन बाजी' हा पोवाडा अप्रतिम आहे. परंतु जनतेकरितां कविता असते असें म्हणण्यापेक्षां ती कवीकरितां असते असें म्हणणें अधिक उचित आहे. जनतेला वेड लावण्याच्या आधीं ती कवीला वेड लावीत असते; आणि तिच्या नादानें कवि जेव्हां पुरा वेडा होईल तेव्हांच तो जनतेला वेड लावूं शकतो! हा अनुभव आल्यामुळेंच केशवसुतांनीं कवितेला 'विजेचें वेड' म्हटलें आहे. त्यांना स्वतःला कवितेनें किती विलक्षण वेड लाविलें होतें याची साक्ष त्यांची 'फिर्याद' ही कविता देते. अकस्मात दर्शन देऊन अंतर्धान पावलेल्या त्या 'रुष्ट सुंदरीस' प्रसन्न करण्या-करितां विजनवास पतकरला; जननिंदा सहन केली; तरीहि ती प्रसन्न होईना, म्हणून अखेर वैतागलेल्या कवीनें तिच्यावर ही 'फिर्याद' लाविली आहे! कवितेवर जसें केशवसुतांचे आत्यंतिक प्रेम होतें तसेंच तें पत्नीवरहि होतें असें त्यांच्या प्रेमगीता-वरून दिसतें. 'भटकणाराचें गाणें' हें त्यांचें प्रेमगीत अत्यंत हृदयस्पर्शी आहे. 'कर्तव्य आणि प्रीति' ही कविता गोड घरगुती उपमांनीं विशेष गोड झाली आहे. 'प्रणयकथन' या गीतांत लौकिक शहाणपणापलीकडील अमर्याद प्रेमाची याचना प्रियतमेजवळ करून कवि 'फार दिवसांनीं भेट' झाल्यावर तिला सांगतो—

कालें आणिक कष्टदशेनें
क्षीणत्वाला होतें जाणें
सगळ्यांचेंही, तरि प्रीतिचा
जोम वाढतो उलटा साचा!

केशवसुतांच्या कांहीं कवितांचें येथवर जें थोडेंबहुत विवेचन झालें त्यावरून केशवसुतांच्या कवितेचें बहुविध स्वरूप किती मनोहर आहे याचा प्रत्यय येतो. केशवसुतांचा काळ हा महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय संक्रमणाचा

काळ होता. नवीन ध्येयें, नवीन भावना, नवीन अनुभव असा हा सगळा नवलाईचा डाव मांडून पाश्चात्य संस्कृति महाराष्ट्राची नजरबंदी करीत होता. त्या नजरबंदीच्या मोहजालांतून केशवसुतांची प्रतिभा आपला मार्ग काढीत होती. सभोंवतालच्या या खवळलेल्या वातावरणाचा परिणाम केशवसुतांच्या कवितेवर स्पष्ट घडलेला दिसतो. जुनें कां नवें, पौरस्त्य कां पाश्चात्य, संस्कृत कां इंग्रजी अशा तऱ्हेचीं विचित्र कोडीं या नव्या परिस्थितीनें तत्कालीन तरुण पिढीपुढें– कर्तबगार तरुणांपुढें टाकिलीं होतीं. कीर्तिकर, महाजनि हे नवीनाच्या, पाश्चात्याच्या, इंग्रजीच्या मागून गेले; चिपळूणकर, मोगरे यांनीं प्राचीनाचें, पौरस्त्याचें अनुकरण करून पूर्वपरंपरा कायम ठेविली. केशवसुतांनीं कोणाचेंच अनुकरण न करितां नवीन मार्ग, नवीन सांप्रदाय काढिला. जुन्यानव्याचें, पौरस्त्यपाश्चात्याचें या सांप्रदायाला सारखेंच साहाय्य आहे. आधुनिक कविमंडळांत असलेली अव्यवस्था हा नवीन सांप्रदाय स्थापन करून केशवसुतांनीं नष्ट केली. इंग्रजी विचारांचा, इंग्रजी कल्पनांचा, इंग्रजी भाषापद्धतीचा पगडा जरी केशवसुतांच्या कवितेवर पडला असला तरी केशवसुतांच्या कवितेचें अंतःकरण पूर्ण महाराष्ट्रीय आहे. विश्वप्रेमाच्या विशाल स्वप्नांत केशवसुतांची प्रतिभा गुंग झाली असेल, सृष्टिसौंदर्याशीं समरस होतांना प्राप्तपरिस्थितीचा तिला क्षणभर विसर पडला असेल,– परंतु म्हणून कांहीं केशवसुतांची प्रतिभा महाराष्ट्राला परकी झाली नाहीं. विश्वप्रेमाचीं स्वप्नें पडत असतांनाच गरिबीनें गांजलेल्या, दास्यानें दडपलेल्या आणि निराशेनें निष्प्राण केलेल्या अभागी महाराष्ट्राचे करुणारव कानीं पडल्यामुळें दचकलेल्या, द्रवलेल्या, दुःखित झालेल्या केशवसुतांच्या प्रतिभेनें 'तुतारी' फुंकिली! नवीन विचारांची छाया 'तुतारी' या कवनावर अतोनात पडली आहे; केशवसुतांचें अंतःकरण कोणत्या विचारांनीं निरंतर व्यापिलें होतें, केशवसुतांच्या अंतःकरणांत कोणत्या भावना उचंबळत होत्या याची साक्ष 'तुतारी' देते. 'म्हातारी, 'झपूर्झा' असलीं कल्पनांची अगर तत्वांची जाळीं विणीत केशवसुत कदाकाळीं वातावरणांत विहरले असतील; पण त्या गीतांत,—तीं कितीहि उत्कृष्ट असोत, केशवसुतांनीं आपलें अंतःकरण ओतलें नव्हतें; देशाचें दैन्य पाहून रात्रंदिवस तडफडणाऱ्या केशवसुतांच्या अंतःकरणाची धडधड 'तुतारी–स्फूर्ती' तच ऐकूं येते. केशवसुत आणि इतर आधुनिक कवि यांच्यांत जर कांहीं वैषम्य असेल तर तें हेंच आहे. स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांत विरून गेल्यावर समाजाच्या सामुदायिक सुखदुःखांचें स्मरण इतरांना सहसा राहिलें नाहीं. रावबाजींच्या रंगेल राजवटींत इतर शाहीर इष्काचे पेले झोंकण्यांत दंग असतां,

कोण करिल प्रतिपाळ, तूर्त मुलखास लागली बती।

ही चिंता ज्याप्रमाणें ती अंदाधुंदी पाहून प्रभाकरशाहिराच्या जिवाला जडली होती त्याचप्रमाणें इतर कवि शृंगाराचे किंवा भाषांतराचे खेळ खेळत असतां

जाऊं बघतें नांव लयाप्रत,
तहशांत बनलां मऊ मेंढरें
अह ! घेरिलें आहे तिमिरें

हा घोर केशवसुतांच्या जिवाला लागला होता. केशवसुतांचें मराठी भाषेवर प्रभुत्व नसेल, केशवसुतांची भाषा खडबडीत असेल, पण

फणसा अंगीं कांटे । आंत अमृताचे सांठे

—शेखमहंमद.

या जगाच्या अनुभवाप्रमाणें केशवसुतांची कविता अत्यंत रसाळ आहे. केशवसुतांच्या वाणींत विलक्षण ओज होतें; आणि त्यांच्या वाणींतील या ओजस्वितेला राष्ट्रीय भावनांचें वर्णन करितांना अगदीं भरतें येत असे. अन्यायाची त्यांना चीड होती; पाश्चात्य विद्येच्या प्रभावानें महाराष्ट्रांत जें नवीन तेज अवतरलें होतें त्या तेजाची प्रभा 'तुतारी' या कवनावर पडली आहे.

नियमन मनुजासाठीं, मानव—
नसे नियमनासाठीं जाणा
प्रगतिस जरि तें हाणी टोणा—
झगारूनि तें देउनि, बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव !

अशी भाक त्यांनीं आपल्या स्वाभिमानशन्य देशबांधवांना घातली आहे.

प्राप्त काल हा विशाल भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरती नोंदा !

हा ऊर्जस्वल संदेश आजच्या निस्त्राण झालेल्या महाराष्ट्राला सांगण्याकरितांच त्यांनीं 'तुतारी' फुंकिली. केशवसुत हे क्रांतिकारक कवि होते असें म्हणावयाचें याच कारणाकरितां ! इतर कवींनीं जें केलें नाहीं, इतर कवींना जें करण्याची स्फूर्ति झाली नाहीं तें केशवसुतांनीं केलें. केशवसुत आणि इतर आधुनिक कवि यांच्यांत जें कांहीं अंतर आहे तें इथेंच आहे. इतरांनीं युगतेज ओळखलें नाहीं, परंतु केशवसुतांनीं युगतेज ओळखलें आणि तुतारीच्या सुराबरोबर त्याला पहिली ललकारणी दिली ! तुतारीची प्रत्येक ओळ वाचतांना अंतःकरण थरारतें आणि

गंगौघापरि भव्य केशवसुता ! सावेश वाणी तुझी

—रेंदाळकर.

हें स्तुतिगीत हृत्कुहरांत आपोआप घुमूं लागतें ! अध्यात्माकडून ऐहिकाकडे वळलेल्या महाराष्ट्रशारदेला तिथेंच स्थिर करून, ऐहिकातच अध्यात्म दाखविण्याचें सामर्थ्य महाराष्ट्रांत फक्त केशवसुतांच्या प्रतिभेंत होतें. कृत्रिमतेचा गंज चढून स्थिरावलेल्या काव्यचक्राला कलाटणी देण्याचें कार्य केशवसुतांनीं केलें; आणि म्हणूनच त्यांची तुलना विश्वाच्या भवितव्यांत क्रांति घडवून आणणाऱ्या अद्वितीय धूमकेतूशीं करावयाची ! मळलेल्या मार्गानें प्रवास करणाऱ्या पृथग्जनांचीं स्तुतिगीतें काळाच्या प्रचंड झंझावातांत नष्ट होतात; परंतु महाकवींच्या,—काव्यसृष्टीच्या भवितव्यांत क्रांति घडवून आणणाऱ्या धूमकेतूंच्या–यशस्तेजाची भरती प्रत्येक शतकाशतकाला अप्रतिहत वेगानें पुढें असते. महाकवींचें सांप्रदाय कोणीं निर्माण करावे लागत नाहीत; ते निर्माण होतात; ते स्वयंभू असतात. त्यांचें कार्य प्रगतीची दिशा दाखवावयाचें असतें. अनुसरणाकडे, सांप्रदायस्थापनेकडे लक्ष देण्याइतकें क्षुद्रत्व त्यांच्या वसुधैवकुटुंबक वृत्तींत संभवत नाहीं. केशवसुतांचा सांप्रदाय स्वयंभू आहे. केशवसुतांची कविता सदोष असेल, परंतु त्यांचें कार्य, त्यांनीं घडवून आणिलेली क्रांति निर्दोष निःश्रेयसाचा मार्ग दाखविणारी आहे.

केशवसुतांच्या कवितेचें अंतरंग जसें सुंदर आहे तसें बहिरंग सुंदर नाहीं. केशवसुतांनीं आधुनिक कवितेला जें नवें वळण लाविलें त्या नव्या वळणाला अनुरूप अशी सुंदर भाषा त्यांना अखेरपर्यंत लिहितां आली नाहीं. केशवसुतांची भाषा प्रथम संस्कृतप्रचुर असे. पुढें गांवढळ मराठी झाली व अखेर अखेर ते चांगली मराठी लिहूं लागले होते ! परंतु ही त्यांची चांगली मराठी सुद्धां सामान्य आहे. इंग्रजी कवितेवरच केशवसुतांचा व्यासंग फार असे. मराठीचा व्यासंग तुकारामापलीकडे गेलाच नाहीं ! इंग्रजी कवितांचीं पारायणें करून इंग्रजी विचार व कल्पना त्यांनीं अगदीं आपल्याशा करून टाकल्या होत्या. हे विचार व कल्पना यांचें आपलेंपण तादात्म्यानें आलें होतें. या तादात्म्याची छाया त्यांच्या कवितेवर फार पडली आहे. ते कविता करूं लागले कीं, ज्या गोड इंग्रजी कल्पना अगर विचार त्यांच्या अंतःकरणांत घोळत असत, त्या कल्पना अगर ते विचार त्यांच्या कवितेंत त्यांना अगदीं नकळत उतरत. केशवसुतांच्या कवितेंतील विचार व कल्पना यामुळें अगदीं नवीन परंतु परकी वाटतात. कल्पना व विचार यांचें हें परकेपण रूढ अगर सराईत भाषेच्या जिव्हाळ्यानें कमी करितां येतें. नित्याच्या वाचनांत येणाऱ्या शब्दांनीं गुंफिलेली जर एकादी नवीन रम्य कल्पना कवितेंत आढळली तर ती सहज आल्यासारखी वाटते व तिचा परकीपणा न भासून तिची मोहनी मात्र मनावर कायम राहते. नवीन कल्पना जुन्या शब्दांनी गुंफिल्या म्हणजे त्यांचें परकीपण जाऊन मनाला भुलविणारें नावीन्य तेवढेंच मागें उरतें. ही कला

केशवसुतांना साधली नाहीं; आणि ही कला साधण्याइतकें भाषाप्रभुत्व त्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळें ही कला साधणें त्यांना शक्यहि नव्हतें. कविता लिहितांना केशवसुत फार श्रम घेत असत. हातीं घेतलेल्या विषयाचें त्यांचें मनन कित्येकवेळां वर्षभरहि चालत असे ! विषयाचें व्यवस्थित मनन करून नंतरच ते कविता लिहावयाला प्रारंभ करीत असत; आणि लिहिल्यावरहि तिच्यावर पुनःपुन्हां सफाईचा हात फिरत असे. 'म्हातारी' व 'तुतारी' या त्यांच्या उत्तम कवितांचा इतिहास असेंच सांगतो. या दोन्ही कवितांची भाषा चांगली आहे, त्यांतल्या त्यांत 'म्हातारी' या कवितेची अधिक चांगली आहे. इतके श्रम घेऊनहि त्यांच्या कविता–उत्तम कविता–कर्णकटु कां रहाव्या ? भाषाप्रभुत्व नव्हतें हेंच याला उत्तर; दुसरें उत्तरच नाहीं. केशवसुतांची कविता अद्यापिहि तितकी लोकप्रिय होत नाहीं, याचें कारण ही रांगडी भाषा व त्यामुळें वाटणारा कवितेचा परकीपणा. सामान्य जनता साक्षर शब्दांच्या शोभेला तेव्हांच भुलते; ती शोभा मुळींच नाहीं, व उलट कल्पनांचा परकीपणा मात्र हवा तितका. त्यामुळें केशवसुत आजपर्यंत कवींचे कवि राहिले आहेत व आणखीहि कांहीं काळ ते लोकप्रिय होणार नाहींत असें वाटतें. त्यांच्या कांहीं थोडया कवितांची भाषा फार चांगली आहे, परंतु सामान्यतः केशवसुतांचें मराठी भाषेवर प्रभुत्व नव्हतें असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां त्यांच्या रांगडया भाषेला, त्यांनीं मुद्दाम नवीन बनविली असें म्हणून, गोड करून घेण्याचें कांहींच कारण नाहीं. केशवसुत हे जरी प्रतिभासंपन्न कवि असले तरी त्यांची कृति ही मनुष्यकृतिच अ हे; व मनुष्यकृतींत दोष असणें हें अत्यंत स्वाभाविक आहे. केशवसुतांच्या या दोषांवर पांघरूण घालून त्यांची आधीच सरस असलेली कृति कांहीं अधिक सरस होईल अशांतला बिलकूल भाग नाहीं. किंवा दोषाला दोष म्हटल्यानें तिची रसवत्ता कमीहि होणार नाहीं.

आरंभीं आरंभीं केशवसुतांच्या कवितेंत भाषादोष भरपूर असत; आणि पुढेंहि ते अगदींच कमी झाले होते असें नाहीं. निव्वळ मराठी शब्द घेतले तरी लाडीगुडी, लकडी, दह्यांडी, मुदली, अंतुरी, वस्ताद, चीज हे शब्द शुद्ध गांवढळ आहेत. चाडी, हळाळती, कुसमुडी हे अपप्रयोगहि शुद्ध मराठी आहेत. शुद्ध मराठी घरगुती शब्दांचे दुरुपयोगाप्रमाणें सदुपयोगहि केशवसुतांनीं केले आहेत. करमूं, पुता, जिवा, किरकिऱ्या हे सदुपयोग शोभादायक आहेत. याशिवाय 'दोन बाजी' ही कविता या सदुपयोगांचें उत्तम उदाहरण आहे. 'यो' व 'धजल' असले मोरोपंती व रामजोशी-थाटाचे प्रयोगहि क्वचित् आढळतात. निव्वळ संस्कृतप्रचुर कविता सोडल्या तरी इतर कवितांतहि भुवि, प्लृति, तिरमा, दाढर्यविशिष्ट, चोदक, स्फीति असले कठिण संस्कृत शब्द सांडपतात; शिवाय क्लिष्ट, उद्धर, कौरूप्य, हतवेला असे चमत्कारिक उपयोगहि आहेत. मोरोपंतांप्रमाणें संस्कृत वाक्यें घुसडण्याची हौसहि 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि' व 'फुकट दवडलेला तास' या दोन कवितांत कवीनें फेडून घेतली आहे. अनुप्रासादि शब्दचमत्कारांचें केशवसुतांना अगदीं वावडें होतें; अपवादादाखल

वाद्य वेडेंवांकुडें वाजवीन !

ही एकच नमुनेदार ओळ त्यांच्या काव्यग्रंथांत अनुप्रासाची अशी आढळते ! वृत्तविविधता हा एक त्यांच्या कवितेचा अनुकरणीय विशेष आहे. विषयाला अनुरूप वृत्त योजण्याकडे त्यांची फार प्रवृत्ति असे. 'भृंग' कवितेचें बागडतें वृत्त, म्हातारी' कवितेचें उडतें तुटक वृत्त हीं त्यांची योजकत्वाची साक्ष देतात. सद्वृत्ताप्रमाणें त्यांची कविता कांहीं ठिकाणीं दुर्वृत्तहि आहे. 'पुष्पाप्रत' ही स्रग्विणी वृत्तांतील कविता त्या वृत्तांत शोभत नाहीं. त्याचप्रमाणें 'फुलांतले गुण' 'मूर्तिभंजन' या कवितांची वृत्तेंहि चांगलीं नाहींत. 'फिर्याद' या कवितेचें वृत्त सदोष असून पुन्हां वाईटहि आहे. केशवसुतांची भाषा बहुधा विषयाला अनुरूप असते. 'भृंग' व 'पुष्पाप्रत' या गाण्यांची मधुर भाषा, 'दोन बाजी' व 'मयूरासन आणि ताजमहाल' यांची जोरदार भाषा– या सर्व कविता त्यांच्या समर्पक भाषापद्धतीची साक्ष पटवितात. परंतु अयोग्य भाषापद्धतिहि कित्येक ठिकाणीं आहे. 'तुतारी' या कवनांतील जाज्वल्य देशाभिमानावर विश्व-प्रेमाचा उतारा देणारें 'नवा शिपाई' हें गीत कवितेच्यापेक्षां गद्याच्या सदरांतच अधिक चांगलें दिसेल. वृत्ताच्या बाबतींत अभिरुचिभेदाला जागा असते, पण भाषापद्धतीच्या बाबतींत अभिरुचिभेद क्वचितच संभवेल. 'कविता आणि कवि', 'पटवर्धन यांस', 'पंतोजीस' या कविता म्हणजे शुद्ध छंदोबद्ध गद्य आहे. या वृत्तबद्ध गद्यांत कर्णकटुत्वा-चीहि कित्येक ठिकाणीं भर पडली आहे.

"डोक्याच्या भ्रमणामुळें बिघडुनी विक्षिप्त तीं जाहलीं"
"आलेख्यीं लिहिण्या मला गवसला उत्कष्ट हा मासला"
"ज्या मत्क्लृप्ति तुझ्याविशीं चघळितों त्या स्वांघ्रि जैशीं मुलें"

हीं वेंचक उदाहरणें वरील विधानांची सत्यता पटवितील. केशवसुतांच्या काव्य-रचनेला प्रारंभ भाषांतरानें झाला व पुढेंहि त्यांनीं कांहीं भाषांतरें केलीं. 'घुबड' हें त्यांचें भाषांतर सर्वोत्तम असून मूळ कृतीइतकेंच सरस वठलें आहे. 'मदन आणि मदनिका' 'तिने जातां चुंबिलें' हीं भाषांतरें बरीं आहेत. 'ईश्वराचा ग्रंथ' हें भाषांतर वाईट आहे. शेक्सपीअरच्या चतुर्दशकांचीं त्यांनीं केलेलीं सर्वच भाषांतरें भिकार आहेत. 'काल आणि प्रियेचें सौंदर्य' हें त्यांचें भाषांतर स्वतंत्रांत गणिलें गेलें आहे ! परंतु शेक्सपीअरच्या

" Since brass, nor stone, nor earth, nor boundless sea "

या अत्यंत सरस चतुर्दशकाचें तें अत्यंत नीरस भाषांतर आहे. भाषांतरापेक्षां इंग्रजींतून त्यांनीं केलेलें वृत्तांतर अधिक निर्दोष आहे. इंग्रजींतील चतुर्दशकाच्या (sonnet) धर्तीवर मराठींत त्यांनीं चतुर्दशक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'शार्दूलविक्रीडित'

हें जुनें वृत्तच त्यांनीं या कामीं उपयोजिलें आहे. गंभीर, उदास किंवा आवेशपर मनोवृत्तींना हें वृत्त अगदीं उत्कृष्ट वाहन आहे. कल्पनांचे व विचारांचे आरोह आणि अवरोहही या वृत्तांत उत्तम रीतीनें दाखवितां येतात. अर्थातच केशवसुतांची ही निवड यशस्वी झाली. 'आम्ही कोण' व 'प्रतिभा' या दोन उत्तम कविता या त्यांच्या यशस्वितेची साक्ष पटवितात. केशवसुतांच्या निर्यमक म्हणून समजल्या जाणाऱ्या कविता म्हणजे हीं त्यांचीं चतुर्दशकें होत. वस्तुतः हीं चतुर्दशकें निर्यमक नाहींतच; हीं आलटून पालटून सयमक आहेत. 'कोठें जातोस?' या कवितेंतील तिसरीं दिंडीहि अशीच सयमक आहे. केशवसुतांनीं अर्थातच निर्यमक कविता लिहिलेली नाहीं. हें बहिरंगपरीक्षण झालें. केवळ कर्तव्य म्हणून हें बहिरंगपरीक्षण अगदीं न्यायनिष्ठुर मनानें केलें आहे. परंतु केशवसुतांच्या कवितेचें महत्त्व या बहिरंगावर नाहीं. तें तिच्या आंतर आस्वादावरच आहे. आणि म्हणूनच बहिरंग इतकें खडबडींत असतांहि

मृत्कुंभसंभृत जरी असलें, असेना!
पीयूष! यास मज दोष मुळीं दिसेना.

——चंद्रशेखर.

अशा भावनेनें त्या क्रांतिकारक महाकवीचा हा प्रसाद आनंदानें व आदरानें ग्रहण करून त्याला धन्यवाद द्यावयाचे! केशवसुतांच्या कवितेचें बहिरंगपरीक्षण येथें पूर्ण झालें; आतां त्यांच्या उत्कृष्ट कवितांच्या आंतर आस्वादाचा लाभ घ्यावयाचा.

केशवसुतांच्या उर्वरित उत्कृष्ट कवितांचें विवेचन केलें म्हणजे त्यांच्या कवितेच्या अंतरंगाचें पूर्ण दर्शन होईल. अत्यंत क्षुद्र वस्तूंत अंतर्हित असलेलें शाश्वत सौंदर्य पहाण्याचें सामर्थ्य केशवसुतांच्या प्रतिभेंत होतें. नित्याच्या सरावानें सामान्य दृष्टीला जें नसतें झालें त्या नसत्यांतून नवीन तत्त्वसृष्टि ते उभी करीत असत. अजाण अर्भकांच्या पायदळीं नाहींशी होणारी रांगोळी;—पण केशवसुतांच्या अंतर्भेदी दृष्टीला त्या रांगोळींत अंतर्हित असलेलें अविनाशी तत्त्व दिसलें आणि तें तत्त्व त्यांनीं कवितेंत गुंफून अमर केलें! सामान्य दृष्टीला दिव्य दिसणाऱ्या दिवसाचें दुःखद स्वरूप, 'दिवस आणि रात्र' या हृदयंगम कवनांत त्यांनी उत्तम रीतीनें दाखविलें आहे. केशवसुतांच्या प्रतिभेला अदृश्य, अगम्य, अवाच्य असें कांहींच नव्हतें! महाराष्ट्रांतील मुलांच्या नित्य परिचयाच्या म्हातारीशीं तद्रूप होऊन केशवसुतांनीं एकदां गोड गाणें गाइलें. 'म्हातारी' आणि 'हरपलें श्रेय' या त्यांच्या दोन कविता

मज वय विसरूं दे——मुग्ध मधुबाल्यीं उतरूं दे!

या एकाच विचारसूत्रांत अनुस्यूत झाल्या आहेत. मुलीला घेऊन दारांत उभें असतां हवेंतून तरंगणारी ही म्हातारी कवीच्या दृष्टीस पडली. म्हातारीला पाहतांच मुलीचें

मन लोभावलें आणि तिला धरण्याकरितां मुलीनें आपले चिमुकले हात पुढें केले. त्या हातवाऱ्याबरोबर म्हातारी अधिकच दूर गेली. हें चित्र पहात असतां मुलीचें खिदळणें ऐकून दचकलेलें कवीचें सूक्ष्म मन जागें झालें आणि

दडपष संसृतिचें––निघालें मम चित्तावरचें

अशी स्थिति होऊन कवि त्या वाऱ्यावर तरंगणाऱ्या म्हातारीशीं बोलूं लागला. आपली वयस्कता पाहून तर ही म्हातारी परत फिरत नाहींना, अशी शंका मनांत येऊन कवीनें तिला, आपल्या मुलीकरितां तरी–तिच्या मधुर शैशवाकडे पाहून तरी ये अशी विनंती केली आहे. आणि बालभावाला भुलणारी ती म्हातारी आपली वयस्कता बघून परत फिरली, या भावनेनें उद्विग्न झालेला कवि म्हातारीला म्हणाला––

मज वय विसरूं दे––मुग्ध मधुबाल्यीं उतरूं दे !
ते दिन पुष्पांचे––कोंवळ्या किरणीं खेळाचे
हे दिन चिंतांचे––परंतू लटिकें हंसण्याचे !
हे दिन.....जाऊं दे––मला तुज गाणें गाऊं दे !

असें म्हणून कवीनें म्हातारीच्या स्थितीविषयीं मधुर कल्पना करीत तद्रूपतेनें हें गोड गाणें गाइलें आहे. गाणें गातां गातां अखेर कवि म्हणतो, तुझें ज्ञान जर होईल, तूं कोण आहेस हें जर मला कळेल,

.....तर जगीं भरला जो दिसतो
मी तो अंधार––लोपवूं झटेन साचार !

तुझ्या ठिकाणीं असलेल्या चित्तत्त्वाचें ज्ञान जर जगताला झालें तर लहान मुलाप्रमाणें वेडें होऊन जग तुझ्यामागें लागेल. तुझें स्वरूप, तुझें अस्तित्व अगम्य, अज्ञात आहे; परंतु तुझ्या ठिकाणीं जें अद्‌भुत वसत आहे तें, कवि म्हणतो

प्रत्यक्षांतुनि तें––परोक्षीं शीघ्र मला नेतें;

आणि तेथें गेल्यावर ज्या दिव्य अननुभूत आनंदाचा लाभ मला होतो त्या आनंदानें वेडावून जाऊन माझी प्रतिभा गाऊं लागते ! या गाण्यांत केशवसुतांची कल्पनासृष्टि पूर्णत्वानें अवतरली आहे. उत्तम कवितेचा उद्‌भव कसा होतो, कोणत्या स्थितींत होतो, याचें अत्यंत मार्मिक उत्तर या कवितेच्या शेवटच्या चार ओळींत केशवसुतांनीं दिलें आहे. या गाण्यांत दिसून येणारी, अतींद्रिय आनंदाच्या प्राप्तीकरितां कवीच्या मनाला लागलेली हुरहुर 'हरपलें श्रेय' या हृदयद्रावक गीतांत उत्कटत्वानें व्यक्त झाली आहे. अतींद्रिय आनंदाकरितां आसावलेल्या अंतःकरणाला ऐहिक सुखांत तथ्य

वाटत नाहीं; लहानपणीं लग्न होऊन माहेराला मुकलेल्या मुलीसारखी त्याची स्थिति होते आणि तें तळमळूं लागतें. बाळपणीं जो आनंद अनुभविला तो प्रपंचाच्या प्रखरतेनें नष्ट झाला; आणि आता

चुकचुकल्यापरि
वाटे अंतरिं
होउनि बावरि

कविप्रतिभा, कवीचें अंतःकरण त्या निजश्रेयाच्या शोधाला लागलें आहे. संसाराची क्षणभंगुरता ओळखून अंतर्मुख होण्याऐवजीं संसारांत रमलेल्या या बहिर्मुख बुद्धीला होऊन गेलेल्या हानीबद्दल आतां खेद वाटून उपयोग काय ? जो सौदा तूं आपण होऊन केला त्यांत खोट लागल्यास दोष कोणाचा ? परंतु हा 'हतविनिमय' आपण होऊनच केला असला,

दिलें हिरण्मय
हातीं मृण्मय

अशी फसगत जरी आपणच करून घेतली असली, तरी त्या फसगतीबद्दल मनाला खरखरा हा लागतोच, हळहळ ही वाटतेच ! मनाला अशी रुखरुख लागून विरक्त झालेलें मन सर्व सांसारिक उपाधींना दूर सारून, संसाराची हयगय करून अत्यंत क्षुद्र वस्तूंत सुद्धां–झरोक्यांतून पडलेल्या सूर्यकिरणांतसुद्धां–त्या निजश्रेयाचा शोध करूं लागतें !

मज माझें लाभेल कसें ?

ही एकच असोशी मनाला निरंतर लागून रहाते. त्या हरपल्या श्रेयाची साक्ष—त्या अलौकिक आनंदाचा ओझरता अनुभव विजनवासांत, सृष्टिसौंदर्याच्या सहवासांत उत्कंठित मनाला येतो; परंतु हें सुखहि,

स्वभाव दाउनि
परि तें झटदिनिं
जाई लोपुनि !

याप्रमाणें वेड लावून नाहींसें होतें. कविमनाला लागलेलें हें विचित्र वेड पाहून जडबुद्धि जग त्याचा उपहास करूं लागतें; परंतु,

जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे ?

ही जाणीव जागृत असल्यामुळें तें वेड कायमच रहातें, आणि

एक शब्द बोलेन जरी
सकलां कुंठित करिन तरी

असा आत्मविश्वास असतांना सुद्धां बेपर्वा झालेलें मन आपलें मौन सोडीत नाहीं. पुण्यश्लोक पतिव्रता प्रेमळ प्रियकराच्या शाश्वत सहवासाकरितां सर्वस्वहानि स्वीकारून सरणावर चढतात; पतंग दीपशिखेच्या दिव्य तेजाला लोलुप होऊन आत्मयज्ञ करितो. अशा तऱ्हेचें दिव्य करावयालाहि मन तयार आहे; परंतु त्या दिव्यानें तरि त्याचा लाभ होईल का ? त्रिखंड हिंडून झालें तरी

न परि हरपलें तें गवसे
म्हणुनि जीव पाखडीतसे !

ही स्थिति कायमच आहे, 'हरपलें श्रेय' तें हरपलेंच ! या गीताची रचना व भाषा नीटस नसून शिवाय वृत्तदोषहि आहेत. परंतु या गीतांतील कविमनाच्या उत्कटतेचें वर्णन केवळ अनुपमरम्य आहे. या गीतांत भरलेल्या निराशेची किंचित् अस्पष्ट छाया 'कोणीकडून कोणीकडे' या कवनावर पडली आहे. भारतीय युद्धाच्या वेळीं सगेसोयरे रणांगणावर जमलेले पाहून विषण्ण झालेल्या अर्जुनाचें समाधान करण्याकरितां

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ?

असा कोटिक्रम भगवंतांनीं लढविला आहे. परंतु असल्या कोटिक्रमानें कांहीं सुसंस्कृत मनाची रुखरुख रहात नाहीं. मनुष्य इकडून आला आणि तिकडे जावयाचा,

तिमिरामधेंच—तिमिरामधून

असल्या प्राकृत बोलांनीं कांहीं विचारी मनाचें समाधान होत नाहीं. ज्या प्रदेशांतून आलों तो प्रदेश अज्ञात व ज्या प्रदेशांत अखेर जावयाचें तोहि अज्ञात; या दोन्ही दिशांना अज्ञाताचें तिमिर दाटलें असतां

घडीभर पडे मधेंच ऊन

असलें हें सांप्रतचें दुःखमय जिणें. घडिभर पडणाऱ्या या आयुष्याच्या चंचल उन्हांतसुद्धां सांसारिक आपत्तींचीं अभ्रें; असलें हें चमत्कारिक दृश्य बघून निराशेनें काळीज फाटून जातें. परंतु ही निराशाहि टिकत नाहीं. सांप्रत आपण आहों ही जाणीव कायम असल्यामुळें

संशयडोहीं नौका फसे

याप्रमाणें मन संशयाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात रहातें. अशा रीतीनें अज्ञानाच्या अंधारांत चांचपडणाऱ्या या यत्नशील मनाला, वारंवार विचारणा करीत असतां

हा भ्रमबुद्बुद जातो फुटून

व भ्रमनिरास झाल्यामुळें दिव्यदृष्टि लाधते, आणि

शून्य म्हणूं जें मागें पुढें
त्यांतुनि दीप्ती दृष्टि पडे

याप्रमाणें जें आतांपर्यंत शून्य होतें, अंधारमय होतें, तेंच आतां दिव्य प्रकाशमय, आनंदमय दिसूं लागतें. या आत्मानुभवानें मनाची तळमळ नष्ट होऊन त्याला ऋणें–देव, पितर, ऋषि आणि राष्ट्र यांचीं ऋणें फेडून पुन्हां ज्या धामाहून आलें त्या धामाकडे–निजधामाकडे–परंधामाकडे जावयाला उत्साह येतो. 'झपूर्झा' हें गाणेंहि या गाण्याप्रमाणेंच तात्त्विक विचारांनीं भरलेलें आहे. 'झपूर्झा' हा शब्द केशवसुतांनीं मुद्दाम नवीन बनविलेला आहे. मुली फेर धरितांना 'झिम् पोरी झिम्' असें अर्थशून्य कडवें एकसारखें म्हणत असतात. तें म्हणत असतां फेर ऐन रंगांत येऊन देहभान हरपलेल्या मुली त्या कडव्याचा जो अपभ्रष्ट व अस्पष्ट उच्चार त्या तन्मयतेंत घाईघाईनें करितात, त्या अस्पष्ट व अपभ्रष्ट उच्चारावरून केशवसुतांनीं हा शब्द बनविला असावा असें वाटतें. अर्थातच हा शब्द मनाची देहभानविरहित स्थिति, गुंगी, तन्मयता, एकतानता दर्शवितो. अशा तऱ्हेची एकतान वृत्ति ज्या महात्म्याची झाली आहे, त्याच्या मनःस्थितीचें निरुपम मनोहर वर्णन या गाण्यांत केलें आहे. कंटकांचीं शल्यें आणि मखमालीची लव हीं ज्याला सारखेंच सुख देतात; प्रकाश आणि तिमिर हे ज्याच्या दृष्टीला सारखेच भासतात; हर्ष आणि खेद या द्वंद्वांपलीकडे ज्याचें मन गेलें आहे त्या स्थितप्रज्ञाच्या द्वंद्वातीत स्थितीला कोणतें नांव द्यावयाचें ? कवि म्हणतो––

झपूर्झा, गडे झपूर्झा !

हेंच नांव त्या स्थितीचें ! हर्ष-शोक हे ज्यांना जडलेले आहेत त्या प्रापंचिकांना काय विशेष कळतें म्हणून त्यांनीं या निर्विकार विभूतींना–या 'जडभरतांना'–हंसावें आणि त्यांच्या बाहेरून जड दिसणाऱ्या अवस्थेचा उपहास करावा ? सविकार व सांसारिक जग ज्यांना वेडयांत काढितें ते हे वेडे काय पहातात ?–

व्यर्थी अधिकचि अर्थ वसे
तो त्यांस दिसे
ज्यां म्हणति पिसे !

तुम्हां सांसारिकांना जें नसतें झालें, जें व्यर्थ झालें, त्या व्यर्थांतहि अर्थ पाहण्याचें सामर्थ्य या वेड्यांच्या वृत्तींत आहे. तो अर्थ कसा आहे ? कवि म्हणतो

झपूर्झा, गडे झपूर्झा !

एकतान झाल्याशिवाय, त्याच्या एकतानवृत्तीशीं एकरूप झाल्याशिवाय त्या अर्थाचें स्वरूप कळणें अशक्य ! मनुष्याच्या दुबळ्या कल्पनेनें जें ज्ञात म्हटलें, जें दृष्ट म्हटलें त्या दृष्ट-ज्ञातांच्या आकुंचित सीमा उल्लंघून, अज्ञात आणि अदृष्ट अशा अपरविश्वांत भराऱ्या मारणाऱ्या या 'चिद्घनचपलेला'–या चैतन्यघनमालेंत उद्भूत झालेल्या चंचल चपलेला त्या अज्ञात प्रदेशांत घुमणारीं जीं अप्सरोगीतें ऐकूं येतात त्या गीतांचेच, त्या उदात्त अवस्थेंतील अनुभवांचेच, हे अस्पष्ट पडसाद आहेत ! त्या अज्ञात विश्वांत अक्षुण्ण असे अनंत प्रदेश आहेत; पण तेथें जाणार कोण ?

सनदी तेथें कोण वदा ?–
हजारांतुनी एकादा !

याचा अर्थ असा नव्हे कीं तेथें जावयाला कोणाला अटकाव आहे. तेथें जाऊन दिव्य वस्तु आणावयाला–'वनमाला' आणावयाला कोणालाहि अटक नाहीं.

मात्र गात हा मंत्र चला––
झपूर्झा, गडे झपूर्झा !

हा झपूर्झाचा मंत्र गात चला, ही नितांत एकतानता प्राप्त करून घ्या ! पुरुषाशीं प्रकृति निरंतर क्रीडा करीत आहे : पुरुष,–चैतन्य,–या विश्वाचा अदृश्य आत्मा; प्रकृति,–जड,–या विश्वाची दृश्य कुडी. या प्रकृति–पुरुषांचा संगम म्हणजेच हें दृश्य विश्व होय. अमूर्त अर्थ हा कवितेंत ज्याप्रमाणें शब्दमालेनें मूर्त होतो त्याप्रमाणें पुरुष हा प्रकृतीनें मूर्त होतो. अर्थ ज्याप्रमाणें शब्दमालेला सदैव बिलगून असतो त्याप्रमाणें पुरुष प्रकृतीला बिलगून असतो. पुरुषप्रकृतीच्या त्या क्रीडेचा ध्वनि– स्वरसंगम ओळखणें, तिचें रहस्य जाणणें हा ज्ञानाचा हेतु;

तयाची सुंदरता
व्हाया चित्ता––
प्रत ती ज्ञाता
वाडेंकोडें गा आतां––
झपूर्झा गडे झपूर्झा !

त्या रहस्याचें अंतःसौंदर्य जर जाणणें असेल तर एकतान होणें हाच एक उपाय आहे ! अक्षयतेच्या सदाफुलीवरली फुलें तोडीत, नक्षत्रांना निस्तेज करीत सूर्य, चंद्र आणि ग्रहमाला जेथें नर्तन करीत आहेत तेथें जाण्याची जर इच्छा असेल तर

धरा जरा निःसंगपणा
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा--
झपूर्झा गडे झपूर्झा !

या कवीच्या अनुभविक उपदेशाप्रमाणें निःसंग होऊन, जगाची भीडमुरवत सोडून एकतान व्हा ! 'तुतारी' हें कवन म्हणजे केशवसुतांच्या हृदयांतील संवेदनांचा अत्यंत उत्कट उद्रेक, आणि 'झपूर्झा' हें गाणें म्हणजे केशवसुतांच्या कल्पनाशक्तीचें अत्यंत उच्छृंखल उड्डाण. आधुनिक महाराष्ट्रकाव्यरत्नाकरांतलीं हीं दोन दिव्य रत्नें आहेत. 'झपूर्झा' या गीताची रचना मुलींच्या फेराच्या धर्तीवर धांवत्या गिरगिरत्या वृत्तांत केली आहे; वृत्ताच्या या गिरगिरतेपणाचा प्रत्यय शेवटचें कडवें वाचतांना फारच येतो. 'झपूर्झा'ची भाषाही मधुर आहे. फक्त वृत्ताच्या दृष्टीनें तिसरें कडवें सदोष आहे. 'वातचक्र' या गीतावरहि सात्त्विक विचारांची उदास छाया पडली आहे. वरसातीचे दिवस जाऊन हिंवाळाही हळूहळू संपत आला होता. अशा सुमाराला मेघराज इंद्राच्या आज्ञेनें चतुर्मास आकाशांतून मेघांना वाहून नेणारे--मरुद्गण आतां कार्यमुक्त झाले होते. आणि

म्हणुनि मरुद्गण खेळांत
मग्न होउनि चक्रावरती

आरोहण करून मौजेनें

.....सांप्रत हे जाती
गरगर भरभर एका निमिषामध्यें गगनांत !

मरुद्गणांचा हा मजेचा खेळ चालला असतां, त्यांच्या त्या चक्रांत मिसळून धूळ, पक्ष्यांचे पर, पाचोळा हें सर्व क्षुद्र वस्तुजात वरती उड्डाण घेत होतें; आणि ह्यामुळें

सृष्टीचा हा असा भोंवरा

गरगर फिरत झपाट्यानें गगनाला भिडत आहे असें भासत होतें. असें हें विचित्र दृश्य पहातां पहातां तन्मय झालेला कवि वाग्देवीला म्हणतो आहे.

वाग्देवी गे ! दे शब्दांतें
भोंवऱ्यांत या फेंकुनि, त्यांतें
जरा जाउं दे निजधामातें

असे ते या भोंवऱ्यांतून चढत चढत निजधामाला गेले म्हणजे त्या शब्दांवर चढलेलीं पार्थिवतेचीं पुटें गळून पडून, पापी मनुष्यांच्या संसर्गानें सामर्थ्यहीन, निर्जीव झालेले ते शब्द सजीव व सचेतन होऊन परत पृथ्वीवर येतील. आणि ते शब्द, ज्यांच्या साहाय्यानें मी माझ्या अंतःकरणांतला अमूर्त अर्थ मूर्त करितों ते शब्द गेल्यावर मग मीहि कशाला इथें राहूं ? या जगद्वृक्षाचें मी अगदीं पिकलें पान आहें; मला त्रिविध तापतप्ताला सच्चिदानंदांत लीन होण्याकरितां

तर भरभर उडूं द्या मला शब्दांसंगें स्वर्गांत

हें गीत वाचीत असतां आपण जणुं कांहीं वावटळच पहात आहों असें वाटतें. इतकी याची रचना विषयाला अनुरूप आहे. केशवसुतांची ही अगदीं अखेर-अखेरची कविता असावी असें शेवटच्या उद्गारांवरून वाटतें. काव्यमय आयुष्याच्या आरंभीं ते सश्रद्ध होते असें 'सूर्यास' ही कविता वाचून कळतें. मध्यंतरीं त्यांची श्रद्धा डळमळली होती; परंतु पुन्हा अखेर अखेर त्यांची श्रद्धा बळावून त्यांना साक्षात्काराचा ध्यास लागला असावा असें 'वातचक्र', 'कोणीकडून कोणीकडे' व विशेषतः 'हरपलें श्रेय' या तीन गाण्यांवरून वाटतें. आणि हाच ध्यास वाढत जाऊन कदाचित् शेवटीं

तुझें नाम मुखीं, ध्यान तुझें डोळां ।
वृत्ति या चंचळा स्थिरावल्या ॥

अशी त्यांच्या मनाची स्थिति झाली असेल. 'सतारीचे बोल' हें गाणें एका विशिष्ट प्रसंगींच्या मनःस्थितीवर आहे. एके प्रसंगीं कांहीं कारणानें कवि अगदीं उद्वेगला होता. मनाच्या अशा अतिशय त्रस्त स्थितींत तो रस्त्यानें जात असतां त्याच्या कानावर एका खिडकींतून सतारीचा सूर पडला; तो मधुर नाद कानावर पडतांच कवीला अत्यंत चीड आली. त्या वेळीं सोसाटचाचें वादळ सुटतें किंवा भुतें भोंवतीं येऊन नाचतीं तरी तें त्याला पत्करतें;

कारण आंतील विषण्ण वृत्ती
बाह्य भैरवीं धरिते प्रीती.

परंतु तसें न होतां ही आनंदाची वीणावाणी कानांवर पडली. सतारीच्या बदलत्या गतीबरोबर कवीची वृत्ति कसकशी बदलत गेली याचें सुंदर शब्दचित्र येथून पुढें रेखाटलें

आहे. अगदीं शेवटीं शेवटीं त्या सतारींतून प्रेमरसाचे हृदयंगम सूर निघूं लागले. ते सूर कानांवर येतांच उद्वेगाच्या भरांत जगाला विटलेल्या कवीला सर्व विश्व सुखमय दिसूं लागलें आणि

स्वर्ग धरेला चुंबयाला
खालीं लवला–मजला गमला !

असा स्वभूसंगमाचा साक्षात्कार त्याला झाला ! अशा रीतीनें त्याचें निराश मन आनंदमय झालें असतां त्या सतारींतून शांत गती वाजूं लागली आणि सर्व विश्व शांत रसांत विरून गेलें असें कवीला वाटलें. मनाच्या अशा शांत व आनंदमय स्थितींतच कवि घरीं गेल्यावर त्याला निद्रा लागली. त्या निद्रेंतसुद्धां, कवि म्हणतो

बोल बोललों परी कितिकदां
स्वप्नीं–दिड दा, दिड दा, दिड दा !

रसिक मनुष्याच्या खिन्न मनावर मधुर गायनाचा किंवा वादनाचा परिणाम किती उत्तम होतो याचें अगदीं सूक्ष्म वर्णन कवीनें य कवितेंत केलें आहे. अतिशय मधुर गीतनादांतलें हें विलक्षण सामर्थ्य जाणूनच समर्थांनीं

धन्य ते गायनी कळा !

असे अत्यंत मार्मिक धन्योद्गार काढून तिचें महिमान गाइलें आहे. केशवसुतांना या सामर्थ्याचा अनुभव येऊन त्यांनीं हे 'सतारीचे बोल' महाराष्ट्राला ऐकविले आहेत. या गीताची भाषा व रचना दोन्ही चांगलीं आहेत. या कवितेप्रमाणें 'नैर्ऋत्येकडील वारा' या कवितेमध्येंहि कवीनें त्या वातलहरीच्या स्पर्शाबरोबर आपल्या अंतःसृष्टींत उद्भूत झालेल्या तरंगततीचें निरतिशय रम्य वर्णन केलें आहे. स्वजनांची ताटातूट हा केशवसुतांचा आवडता कवित्वविषय होता असें वाटतें. महाराष्ट्रांतील इतर आधुनिक कवींना बहुधा फक्त प्रियाविरहच जाणवला व जाणवतो असें त्यांच्या कवितेवरून दिसतें ! शृंगार हा मनुष्याला अत्यंत सहज आहे व तरुणवयांत मनुष्य क्वचितच तरुणीरक्त नसतो ! परंतु कवि हा सामान्य मनुष्यांहून श्रेष्ठ व उदात्त मनोवृत्तींचा असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं ही एकदृष्टीनें पाशवी मानलेली वासना असूं नये, निदान मर्यादेबाहेर तरी असूं नये असें सहजच वाटतें. परंतु संस्कृत कवींप्रमाणें आधुनिक मराठी कवींच्या बाबतींतहि हें वाटणें निखालस खोटें ठरतें ! आधुनिक कवींत केशवसुतांना मात्र प्रियाविरह आणि मित्रविरह किंवा इतर स्वजनांचा विरह सारखाच जाणवत असे. इतर आधुनिक कवि व केशवसुत यांच्या मनोवृत्तींमधला हा एक फार

महत्त्वाचा भेद आहे. तारुण्याच्या अगदीं ऐन भरांतसुद्धां, पत्नीविरहानें व्याकुळ होऊन त्यांनी ज्याप्रमाणें

अहा ! अंकीं माझे तुज बघतसें मी बसलिस,
शिरा स्कंधीं माझे लववुनि गडे तूं पडलिस,

अशा गोड आठवणी गाइल्या आहेत त्याचप्रमाणें मित्रविरहानें व्यथित होऊनहि

देशाविषयीं गोष्टी बोलत येथें
बसलों विसरुनि कितीकदां निद्रेतें;
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां,
अश्रूमध्यें अश्रु गळाले तेव्हां !

असे प्रेमळ उद्‌गार काढिले आहेत. ते स्वजनांचा हा वियोगकाल, त्यांच्या घडिघडी आठवणी काढून कंठीत असत, असें 'घराकडील गोष्टी' या कवितेवरून स्पष्ट दिसतें.

पाशांविण या कोठें कांहीं नाहीं,
पाशांकरितां चाले अवघें कांहीं;—
पाशांतुनि या सुटतां सुंदर तारे,
तेज तयांचें विझूनि जाई सारें.

अशी केशवसुतांची श्रद्धा असल्यामुळें विद्यार्जनाकरितां अगर वित्तार्जनाकरितां स्वजनांना सोडणें त्यांना अगदीं प्राणसंकट वाटत असे. अर्थातच हें संकट प्रियस्मृतींनीं शक्य तितकें सुखावह करण्याचा प्रयत्न ते करीत. 'नैर्ऋत्येकडील वारा' ही कविता अशीच अत्यंत हृदयद्रावक स्मृतींनीं भरलेली आहे. 'घराकडील गोष्टी' या कवितेंत त्यांनीं आपल्या मित्राला पडवीपासून माजघरापर्यंत अगदीं प्रत्येक दृश्य दाखवीत नेला आहे. त्या कवितेंतील तें वर्णन जसें अगदीं क्रमवार, सुसंगत व सूक्ष्म आहे तसेंच तें या कवितेंतीलहि आहे. या कवितेंत कविकल्पनेनें गांवाशेजारील डोंगरापासून घरापर्यंत प्रवास केला आहे. कवीच्या त्या वेळच्या बसण्याच्या ठिकाणापासून तों त्याच्या जन्मग्रामापर्यंत तिला वाटेंत जें जें दिसलें तें तें सर्व तिनें या कवितेंत चितारलें आहे. नैर्ऋत्येकडून वहात आलेला तो वारा,–आपल्या स्पर्शनें पुलकित होऊन तन्मय झालेल्या कवीच्या अर्धोन्मीलित नेत्रांपुढें त्याला अतिशय प्रिय असलेलीं दृश्यें–त्या दृश्यांचे चलच्चित्रपट आणीत होता. अत्यंत प्रियतम अशा जन्मभूमीवरून वहात आलेल्या त्या मरुद्‌गणांनीं त्याच्या त्या अर्धवट मिटलेल्या डोळ्यांपुढें ते गगनचुंबी उत्तुंग पर्वत, त्या धों धों वहाणाऱ्या नद्या आणि गिरिगव्हरांतून नाचणारे निर्झर, पराक्रमी पूर्वजांच्या पुण्यप्रतापांचा प्रत्यय पटविणारे व पूर्ववैभवांचें स्मरण देणारे ते पडके किल्ले–हें सगळें

पाहून कवीला असा भास झाला कीं, सांप्रतच्या दुरवस्थेनें दडपलेल्या त्या दुर्गदेवता त्वेषानें आपल्याला म्हणत आहेत––

कोठें पूर्वज धीर वीर तव ! तूं कोणीकडे पामरा!
ये येथें ! इतिहासपत्र पडकें वाचून पाहीं जरा !

अशा रीतीनें क्षणभरच टिकून हें दृश्य त्याच्या दृष्टीपुढून नाहींसें झालें. नंतर कवीच्या अंतश्चक्षूंपुढें त्याच्या जन्मग्रामाचें चित्र उभें राहिलें आणि मातापितरांचे आशीर्वाद त्या वाऱ्यावरून तरंगत येऊन कवीच्या कानांत गुणगुणूं लागले. त्याच्या दृष्टीपुढें तें मुग्ध मधुबाल्य उभें राहिलें व आजोळची आठवण होऊन त्याचें अंतःकरण दाटून आलें. हेंही चित्र नाहींसे होऊन त्या मरुद्गणांनीं आणिलेलीं विरही दयितेचीं, नितांतमधुर उष्ण निःश्वासांनीं लिहिलेलीं प्रेमपत्रें कवि वाचूं लागला. इतक्यांत त्याच्या दृष्टीपुढें त्या समुद्राचें रम्य तरंगतांडव दिसूं लागलें आणि व्याकुळ झालेला कवि–

प्रीति या जगतांत कंटकयुता ही एक वल्ली असे

असा निश्चय करून सागरिकांना–जलदेवतांना–मंजुमधुर गीतें गावयाला सांगत आहे. तीं गीतें ऐकून तरी त्याच्या विरहविषण्ण मनाला निद्रा येईल. ती निद्रा कशी ? कवि म्हणतो–

निद्रा दीर्घ––जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल.

या कवितेची रचना ओबड-धोबड आहे. परंतु अंतरंगाचें उत्कृष्टत्व बहिरंगाचें उणेपण भासूं देत नाहीं. केशवसुतांच्या जाज्वल्य देशभक्तीची छाया जशी या कवितेवर तशीच त्यांच्या 'निशाणाची प्रशंसा' या कवितेवरही पडली आहे. पटखंड–कापडाचा तुकडा पण त्या तुकड्याकडे पाहून रणांगणावर झगडत असलेल्या वीरांना आवेश चढतो, उत्साह येतो; राष्ट्राच्या यशापयशाचें, राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें भवितव्य त्या निशाणाच्या फडफडण्यावरोबर हेलकावत असतें. वर्षाकालांत ज्यांच्या सौधशिखरावर श्रांत झालेले वारिवाह विश्रांति घेतात, त्या देवालयांवर, त्या प्रासादांवरहि निशाण निरंतर फडकत असतें. 'ज्या ज्या ठिकाणीं दिव्यत्व, ऐश्वर्य, भक्ति आणि पौरुष वसत असतें, त्या त्या ठिकाणीं' कवि म्हणतो, निशाणा ! तुझा वास आहे.

म्हणूनि मानवचित्ताची उंचावर जी धांव
तीचें चिन्हचि तूं;–तुजला निशाण सार्थचि नांव !

असा सिद्धांत बांधून कवि पुढें म्हणतो—

मिळमिळीत ज्याची कविता न असे रंडागीत
खचित जडेलचि त्या कविची तुझ्यावरी रे प्रीत !

असें सांगून या स्वतंत्रतेच्या शाहिरानें आपल्या देशबांधवांना जीवितसंगरांत झटून लढावयाला आव्हान केलें आहे ! ओजो-गुणानें रसरसलेल्या या प्रशंसागीतांचें वृत्त 'दोहा' आहे. 'सवाई' वगैरे कांहीं हिंदी वृत्तें मराठींत शिरून स्थायिक झालीं आहेत; परंतु 'दोहा' हें हिंदीवृत्त मराठी कवितेला फक्त परघरचें म्हणूनच परिचित आहे. मोरोपंतांचें 'दोहारामायण' सोडलें तर मराठींत या वृत्ताचा उपयोग केलेला सहसा आढळत नाहीं. असें हें मराठीला विशेष परिचित नसलेलें जोरदार वृत्त उपयोगांत आणण्यांत केशवसुतांची योजकता व मार्मिकता दिसून येते. या दोह्यांत आढळणारा आवेश 'स्फूर्ति' या कवनांत अगदी उत्कट रूपानें व्यक्त झाला आहे. सामान्य लोक कवीची गणना उन्मत्तांत करितात. कवीला हा उन्माद स्फूर्तिमदिरेच्या प्राशनानें चढतो; आणि त्या उन्मादानें बेफाम झालेला हा शाहिर ही मदिरा जड जगताला द्यावयाला उद्युक्त झाला आहे. अशा तऱ्हेचें विलक्षण मादक पेय पिऊन बेफाम झालेल्या जगाचे रंग क्षणोक्षणीं पालटतील—जगांत क्रांत्या घडून येतील. जग आम्हांस बडबड्यांत काढतें, मद्यपी म्हणतें; मग आम्हीं तरी जगाची पर्वा कां करावी ? परमेश्वरानेंच आम्हांला हें बडबडण्याचें कार्य सांगितलें आहे. ज्या मदिरेच्या, ज्या दिव्य दारूच्या प्रभावानें—उष्णतेनें स्वर्भूसंगम होतो ती ही दारू पिऊन

होउनियां मग दंग मनीं
व्हावें तें आणा ध्यानीं
गा मग सुचतिल तीं गाणीं

आणि त्या धुंदींत, त्या दिव्य एकतानतेंत तुमच्या मुखांतून बाहेर पडलेलीं हीं गीतें गरिबांना गांजणाऱ्या गतानुगतिकांना गर्भगळित करून सोडतील ! तेजस्तत्त्वाची आराधना करितांना आद्यऋषींनीं जीं ओजःसूक्तें गाइलीं त्या ओजःसूक्तांचे प्रतिध्वनि आमच्या अंतःकरणांत घुमले कीं त्या ईश्वरी स्फूर्तीच्या अद्भुत सोमरसाच्या प्राशनानें धुंद होऊन आम्ही कल्पनेच्या विशुद्ध वातावरणांत विहार करूं– कल्पनेच्या नौकेंत बसून व्योमसागराचें आलोडन करूं आणि तिथून या गरीब धरेवर काव्यरत्नें उधळूं ! अशा त्या दिव्य वातावरणांत जातांना

अडवितील जर देव तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं
हार न खाऊं रतीभरी

आणि हा स्वर्गहि या दृश्यसृष्टीच्या बाल्यावस्थेंत तिला सन्मार्गाला लावण्याकरितां शब्दसृष्टीच्या ईश्वरांनीं निर्माण केला असें जगाला जाहीर करूं. विधिघटनेनें ही प्रतिभेची तरफ आमच्या हातीं आली आहे. जनतेच्या बधिरलेल्या बुद्धीवर ही प्रतिभेची तरफ टेंकून आपण विचारक्रांति करूं—हें जग उलथून टाकूं ! आज जगावर सर्वत्र जो जुलूम माजलेला दिसत आहे तो जुलूम या प्रतिभेच्या बळानें मातीला मिळवूं ! ईश्वरी आवेशाचे ऊर्जस्वल संदेश प्रत्येक क्षणाला, वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकेबरोबर आमच्या अंतःकरणाला येऊन भिडत आहेत; अशा वेळीं आम्ही जर स्वस्थ बसलों तर आम्हांला मरणाशिवाय दुसरी कोणती गति आहे ? म्हणून हा स्वतंत्रतेचा शाहिर साद घालीत आहे–

उठा ! उठा ! बांधा कमरा !
सत्त्वाचा उदयोस्तु करा !
मारा किंवा लढत मरा !
छंद फंद उच्छृंखल असुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या.

केशवसुतांच्या या कवनांत विलक्षण आवेश आहे. केशवसुत क्रांतिकारक कवि होते, कवींचे कवि होते अशी साक्ष हें त्यांचें कवन महाराष्ट्राला सदैव देत राहील. राष्ट्रोद्धाराला किंबहुना विश्वोद्धाराला हातभार लावण्याकरितां महाराष्ट्राच्या भावी कवींना या आधुनिक आद्यकवीनें हें उघड उघड आव्हान केलें आहे ! 'तुतारी' हें उत्तान कवन या कवनापुढें फिकें पडतें. 'प्रीति' हें केशवसुतांचें गाणें फार मधुर आहे. अंतःकरणांतून या गाण्याचा ओघ अगदीं सहज उचंबळलेला आहे; अर्थातच या गाण्याला वृत्ताचें तितकें दृढ असें बंधन नाहीं. प्रीति कोठें मिळेल ? प्रीति– बहिरुपाधींनीं असंश्रित प्रीति–कोठें मिळेल ? निःस्वार्थ, निरंतर प्रीतीचा उद्भव कोठें झाला ?––

नंदवनामधीं आला
कल्पलतेला बहर भला.
तिंचि हृदयीं बीजें पडलीं
प्रीति त्यांतुनी अवतरली !
प्रीतिची असे अशि ग मात;
पहा आपुल्या हृदयांत !

लाभाविणें कळवळणाऱ्या प्रीतीची जात स्वर्गीची आहे. ही प्रीतीची प्रभातरल ज्योत वसुधातलावर निर्माण होत नाहीं. निष्पाप, निर्दोष, निर्व्याजमधुर हृदयांत प्रीत

वास करिते. निरपेक्ष प्रीतीचा सौदा संपदेनें, सौंदर्यानें, सुखाच्या लालचीनें होत नाहीं' प्रीतीनें, फक्त प्रीतीनेंच होतो. अशा या निरपेक्ष प्रीतीला उपचार कोणते ?

हृदयीं आलिंगन पहिलें
चुंबन मुखकमलीं वहिलें

असल्या साध्या सरळ उपचारानें प्रीति वाढेल; आणि अशी प्रीति, कवि म्हणतो

पहा तूं प्रियजनहृदयांत !

या निर्हेतुक प्रीतीचा आपला अनुभव केशवसुतांनीं '–प्रत' या हृदयद्रावक कवितेंत नमूद केला असून 'प्रीतीची भाषा' या गोड कवितेंत तिच्या भाषेची ओळख करून दिली आहे. 'मयूरासन आणि ताजमहाल' हा याच निस्स्वार्थ प्रीतीचा जोरदार पोवाडा आहे.

केशवसुतांच्या या उत्कृष्ट आणि उद्‌बोधक कविता वाचीत असतां जे नवनवीन विचार प्रत्येक वाचनाला सुचले त्या विचारांचा परिपाक या विवेचनांत उतरला आहे. अपरब्रह्मांडांत अनिरुद्ध संचार करणाऱ्या चिद्धनचपलेनें जीं अद्वितीय अनुपम-सुंदर दृश्यें पाहिलीं त्या दृश्यांचें दर्शन रसिकमनाला येथें खचित होईल. केशवसुत महाकवि––काव्यसृष्टींत क्रांति घडवून आणणारे कवीश्वर होते. तरल कल्पनेच्या विशुद्ध वातावरणांत स्वैर संचार करणाऱ्या चिद्धनचपलेच्या स्वर्गीय संगीतलहरींचे नितांतमधुर निनाद, अस्पष्ट आलाप ज्या अंतःकरणांत उमटतात त्या उदात्त अंतः-करणांत उद्‌भूत झालेल्या गीततरंगांचा उच्छृंखल उद्रेक, म्हणजेच महाकाव्य होय ! अर्थहीन शब्दांचा अचेतन संसार,––त्याला महाकाव्य कोण म्हणेल ? मनाला मोहनी घालणारे,अंतःकरणाला उचंबळून सोडणारे अद्‌भुत रसतरंग ज्या रसतरंगिणींत हेलावत असतात, त्याच रसतरंगिणीला महाकाव्य अशी संज्ञा आहे. आणि अशा तऱ्हेचे अद्‌भुत रसतरंग केशवसुतांच्या काव्यतरंगिणींत निरंतर हेलावत आहेत. ज्याच्या निर्मितीनें नवतेजाचा, नवीन परंपरेचा उदय होतो आणि भविष्यत्कालीन वाङ्मयाला वळण लावण्याचें, नवीन स्वरूप देण्याचें सामर्थ्य ज्या काव्यांत, ज्या वाग्विलासांत वसत असतें, त्या वाग्विलासाला महाकाव्य म्हणतात. केशवसुतांच्या कवितेनें महाराष्ट्राच्या काव्यवाङ्मयांत क्रांति घडवून आणिली आणि एक नवीनच युग, नवीनच सांप्रदाय सुरू केला. प्रतापशाली पृथ्वीश्वरांच्या पार्थिव वैभवाची परिसीमा शकगणनेनें होते आणि वैभवशाली वागीश्वरांच्या विश्वविजयाची परिसीमा सांप्रदायनिर्मितीनें होते ! जीवसृष्टीच्या जुलुमी जेत्यांचे ते जयस्तंभ आणि त्या शकगणना काळाच्या प्रचंड वावटळींत नष्ट होतात; परंतु शब्दसृष्टीच्या ईश्वरांची विशाल वाग्वैजयंती त्या विश्व-

भक्षक वावटळीला न जुमानतां आचंद्रार्क अप्रतिहत फडकत राहते ! केशवसुत गेले,– परंतु केशवसुतांची काव्यसंपदा शाश्वत आहे, चिरंजीव आहे. जड देहाचा बंध तोडून अनंतांत अंतर्हित झालेल्या त्या चिद्धनचपलेचीं अमर गीतें महाराष्ट्राच्या कानांत जोंपर्यंत घुमत आहेत, परतंत्र राष्ट्राचा स्वाभिमान जागृत करणारे 'तुतारीचे' पडसाद ऐकतांच ईश्वरी 'स्फूर्तीनें' जोंपर्यंत महाराष्ट्राचें अंतःकरण थरारत आहे तोंपर्यंत महाराष्ट्र अभिमानानें आणि आदरानें म्हणेल——

केशवसुत कसले गेले ? केशवसुत गातचि बसले !

– गोविंदाग्रज.

(आधुनिक कवि पंचक—१९२१
पृ. क्र. ५३-८४).

१०

केशवसुत

लेखक : ग. त्र्यं. माडखोलकर

केशवसुतांनीं हें जग सोडल्याला गेल्या महिन्यांत दीड तप होऊन गेलें. एकुणिसाव्या शतकांत महाराष्ट्रामध्यें अनेक कवि उदयाला आले, आणि त्यांनीं काव्यरचनाही पुष्कळ केली. पण मानवी स्मृतिपट हा कितीही विशाळ असला, तरी विशेष प्रकारचें कर्तृत्व प्रकट केल्यावांचून, त्यावर कुणाच्याही नांवाची नोंद होत नसल्यामुळें, त्यांपैकीं बहुतेक कवि आज केवळ संशोधकांच्या कौतुकाचे विषय होऊन राहिले आहेत. आकाशांत लुकलुकणारे असंख्य तारे रोज रात्रीं शेंकडचांनीं तुटून पडतांना दिसतात– त्यांची गणती कोण करतो ? परंतु ज्यांच्या प्रभावानें युगचक्राला चलन मिळतें, त्यांच्या अस्तोदयांचीं घटकापळेंही मोजावयाला जग चुकत नाहीं. सन १९०५ सालीं, प्लेगच्या कहरांत केशवसुत ज्या वेळीं एकाएकीं मृत्युमुखीं पडले त्या वेळीं, महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांनींच काय, पण मासिकांनींही त्यांच्याबद्दल चार औपचारिक शब्द लिहिण्याची परवा केली नाहीं. पण आज त्यांच्याविषयींचा आदर व उत्सुकता हीं वाढत्या प्रमाणावर आहेत; आणि तींही इतकीं कीं, कालिदासाच्या कालगणनेबद्दल जसा वाद व्हावा तसा वाद त्यांची मृत्युतिथि निश्चित करितांना झाला. मनुष्याची अभिरुचि किती चंचल आहे ! स्वतःच्या कवितेविषयींचें प्रतिकूल मत पाहून चिडलेल्या भवभूतीला, वैतागाच्या भरांत, मानवी अभिरुचि किती झपाट्यानें बदलते, याचें भान राहिलें नाहीं. नाहीं तर, निरवधि काल व विपुल पृथ्वी यांच्याबरोबरच, चंचल अभिरुचीचाही उल्लेख करावयाला तो चुकता ना.

वस्तुतः केशवसुतांची कविता आज लोकप्रिय नाहीं, व पुढें कधीं होईल, असेंही वाटत नाहीं. विचारांच्या सखल भूमिकेवरून वघणाराला तत्त्वज्ञानाच्या दाट धुक्यांत दडलेलीं त्यांच्या कवितेचीं शिखरें दिसत नाहींत. आणि जें दिसत नाहीं, जें दुर्गम असतें, त्याच्याविषयीं आदर वाटेल, पण अभिरुचि उत्पन्न होणें कठिण आहे. कांहीं ग्रंथ असे असतात कीं, ते न वाचतांच त्यांची स्तुति करण्याचा प्रघात सामान्य लोकांत पडून जातो. केशवसुतांच्या कवितेची स्थिति आजच थोडीबहुत तशी झाली आहे, असें म्हटलें तरी चालेल. परंतु लोकप्रियता हें यशाचें केवळ लौकिक स्वरूप आहे. मराठी काव्य-वाङमयांत केशवसुतांनीं घडवून आणलेली क्रांति यशस्वी झाली किंवा नाहीं, याचा विचार करितांना लोकप्रियतेचें हें पोंचट प्रमाण मुळींच लक्षांत न घेतलें तरी सुद्धा चालेल. प्राचीन मराठी काव्य-वाङमयाहून विशेष असें त्यांनीं काय निर्माण केलें आणि पुढील काव्य-वाङमयावर त्याचा परिणाम काय झाला, याची मीमांसा केली म्हणजे त्यांच्या कामगिरीची उत्तम कल्पना येईल. केशवसुतांच्या मृत्यूनंतर गेल्या अठरा वर्षांत, बहुतेक प्रमुख आधुनिक कवींची कविता स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली असून, खुद्द त्यांच्या कवितेलाही त्रिवार मुद्रणसंस्कार घडला आहे. जिवंतपणीं अगर जवळून पाहून टीका करणारांच्या हातून जो अन्याय किंवा अतिरेक होण्याचें भय असतें, तें आतां त्यांच्या बाबतींत फारसें उरलेलें नाहीं. संशोधन, संकलन व संप्रदाय-स्थापना या कविकीर्तीच्या तिन्ही प्रकारांतून त्यांची कविता पार पडली आहे. आणि आणि त्यांना पाहिलेले किंवा त्यांच्याबरोबरच्या पिढींतील लोक जरी अद्यापि जिवंत असले तरी, उशिरानें व हळुहळू कीर्ति मिळत गेल्यामुळें, कवीच्या कवितेला त्याच्या हयातींतच कित्येक वेळां जो प्राचीनपणा आलेला दृष्टीस पडतो, तो केशवसुतांच्याही कवितेला आज आला आहे. तेव्हां मराठी वाङमयांतील त्यांचें स्थान निश्चित करावयाला आतां कांहीं हरकत आहे, असें वाटत नाहीं.

प्राचीन मराठी कवितेचे अभिजात व लौकिक असे सामान्यतः दोन भाग पडतात जिचा उद्भव आणि उत्कर्ष ग्रंथांपासून मिळविलेल्या परोपजीवी स्फूर्तीवरच प्रायः अवलंबून असतो, तिला अभिजात कविता म्हणतां येईल. उलट लौकिक कवितेची उभारणी सामान्य लोकांच्या साध्या अनुभवांवर व स्वतंत्र विचारांवर झालेली असते. अभिजात कवि केवळ कलाविलासाच्या हेतूनें लिहितो. उलट लौकिक कवीची कविता अंतःस्फूर्तीच्या उद्रेकांतून अवतरते. अनुकरणाची प्रवृत्ति लौकिक कवींतही नसते असें नाहीं. कारण मनुष्य स्वभावतःच अनुकरणशील आहे. पण ती स्फूर्तीहून प्रभावी होऊन प्रतिभेच्या उन्मेषाला कधींच अवरोध करीत नाहीं. अभिजात कवितेचा गुणविशेष संस्कृति हा होय. उलट लौकिक कवितेची संस्कृति थोर नसली, तरी अंतःकरणाचा जिव्हाळा तिच्यांत ओतप्रोत भरलेला असतो. कृत्रिम कल्पनांचें मोहक इंद्रजाल, नवीन शब्दांच्या सांच्यांत ओतलेल्या जीर्ण अर्थविभूति आणि व्यावहारिक सत्यांनीं भरलेलीं

चटकदार सुभाषितें यांची रेलचेल अभिजात कवितेंत पहावयाला मिळते. उलट मानवी अंत:करणांतील विकार-विचारांच्या सूक्ष्म तरल छटा लौकिक कवितेंत उमटलेल्या दृष्टीस पडतात. लौकिक कवितेची संस्कृति नेहमींच हीन किंवा कमी दर्जाची असते असें नाहीं. कवीची दृष्टि जितकी विशाळ, त्याची विचारसरणी जितकी व्यापक तितकी त्याची संस्कृतिही श्रेष्ठ असते. आणि मानवी प्रतिभेला होणारे सृष्टींतील दिव्याचे साक्षात्कार शब्द-संपुटांत सांठविण्याची शक्ति ज्याच्या वाणींत असते, त्या वर्डस्वर्थ-सारख्या कवीच्या लौकिक कवितेंतही अलौकिकाचें दर्शन झाल्याशिवाय राहात नाहीं. जगताच्या बाल्यावस्थेंत, शब्दांचा संसार ज्या वेळीं नुकताच सुरू होत होता त्या वेळीं, आद्यकवींनीं जीं सूक्तें गाइलीं त्यांत मानवजातीचें परमोच्च तत्त्वज्ञान प्रकट झालें आहे. जगांतील या जुन्यांतल्या जुन्या लौकिक काव्यांत अलौकिकाची स्फूर्ति इतकी भरली आहे कीं, पुढील सर्व तत्त्वज्ञानाचा उदय त्यांतूनच झाला, असें म्हटलें तरी बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं.

काव्य आणि तत्त्वज्ञान यांत मूलत: फार थोडा भेद आहे. मानवी प्रतिभेच्या एकाच उन्मनस्क अवस्थेंत अलौकिक काव्य आणि उदात्त तत्त्वज्ञान यांचा उदय होत असतो. सृष्टि आणि मनुष्य यांचें तादात्म्य होऊन, प्रतिभेला जडलेले पार्थिवतेचे पाश गळून पडले, म्हणजे त्या मुक्त स्थितींत मानवी आत्मा जे उद्‌गार काढतो, त्यालाच काव्य किंवा तत्त्वज्ञान म्हणतात. सत्य, सौंदर्य आणि स्वातंत्र्य यांच्या अभिन्नपणाचा साक्षात्कार त्याच उन्मनावस्थेंत होतो; आणि त्या साक्षात्कारांचें रहस्य भावनेच्या भाषेंत बोलून दाखविलें म्हणजे त्याला काव्य, व तर्ककर्कश पद्धतीनें उकलून सांगितलें म्हणजे त्याला तत्त्वज्ञान, म्हणतात. मानवी जीवितांत अंतर्हित असलेलें तत्त्वविचारांचें मुग्ध सौंदर्य कविता फुलविते; आणि त्याच तत्त्वविचारांची शास्त्रीय दृष्टीनें संगति बसवून, त्यांच्या अनुरोधानें जगाची उन्नति कशी होत आहे, हें दाखविण्याचा उद्योग तत्त्वज्ञान करितें. जडतेचें आवरण भेदून, स्वतंत्र झालेला आत्मा जीं स्वप्नें पहातो व जो आनंद उपभोगतो, त्यांचें प्रतिबिंब काव्य व तत्त्वज्ञान यांत पडलेलें असतें. अलौकिक काव्य व उदात्त तत्त्वज्ञान यांचा उगम व संगम त्या स्थितींत होतो, आणि उपनिषदां-सारखी दैवी स्फूर्तीची कविता जगताच्या दृष्टीस पडते. कवीचा द्रष्टेपणा जर खरोखरी कुठें प्रत्ययास येत असेल तर तो लौकिक कवितेंतच; कारण तिथें कवि स्वतंत्र असतो, त्याची स्फूर्ति परावलंबी किंवा प्रतिभा पंगु नसते. उलट अभिजात कवितेंत विचारांचा व कल्पनांचा स्वतंत्रपणा क्वचितच आढळून येतो. संप्रदाय व परंपरा यांच्या संकुचित सीमारेषा ओलांडण्याचें धाडस अभिजात कवींची परोपजीवी प्रतिभा कधींच करीत नाहीं; आणि प्राचीनांच्या ग्रंथसंपत्तीचे हे कष्टाळु वारसदार, जुने विचार व जुन्या कल्पना नवीन शब्दांनीं व्यक्त करण्याच्या व्यापांत, स्वत:च्या प्रतिभेला व्यर्थ शिणवितात).

पण जगांत लौकिक कवितेपेक्षां अभिजात कवितेचीच पैदास अधिक होते, व तें साहजिकही आहे. अनुकरण हें जरी केवळ सुकर नसलें तरी फारसें दुष्करही नाहीं. शिवाय मनुष्य जन्मतःच ज्या जिंदगीचा वारस होतो तिलाच भांडवल कल्पून, तिच्यावर कमाई अगर किफायत करण्याची उमेद जर त्यानें धरली, तर त्याबद्दल त्याला कोण नांव ठेवील ? त्यांत कल्पकता नसली तरी चातुर्य खास असतें. अज्ञाताच्या अक्षुण्ण प्रदेशांत संचार करावयाला साहसही लोकोत्तर लागतें. तें ज्यांच्या ठिकाणीं नाहीं, त्यांच्या कमकुवत प्रतिभेचे बैठे खेळ पाहून, जरी आनंद न झाला किंवा आश्चर्य न वाटलें तरी, तिचें कौतुक करावयाला काय हरकत आहे ? जगांत ध्वनि थोडे, प्रतिध्वनीच फार. पण प्रतिध्वनींचा उपयोग जरी दुसरा कांहीं झाला नाहीं तरी, ध्वनींची व्याप्ति व महती समजावयाला त्यांनीं अतिशय मदत होते. शिवाय एकंदर समाजाच्या उन्नतीलाही, हे अर्वाचीनांच्या ग्रंथांतून उमटलेले प्राचीनांच्या विचारांचे प्रतिध्वनि, पुष्कळ कारण होतात. तेच ते विचार, पण निरनिराळ्या रीतीनें निरंतर कानांवर पडत गेल्यानें, बहुजनसमाजाच्या भावडच्या मनांत अगदीं ठसून जातात; व या दृष्टीनें पाहिलें तर, विचारांची किंवा कल्पनांची पुनरुक्ति हा अभिजात कवितेचा एक गुणच म्हणतां येईल. पण हा गुण अभिजात कवींनीं सर्वच बाबतींत इतका अतिरेकाला नेला आहे कीं, त्याची गणना आतां दोषांत केली जाते. कालिदासासारखा पहिल्या प्रतीचा अभिजात कवि, पण तोही अजविलापाच्या प्रसंगीं जे अर्थालंकार योजतो, त्यांचाच उपयोग फिरून रतिविलापाच्या वेळीं करावयाला चुकत नाहीं. परंतु इतरांच्या उसन्या कल्पना जे आपल्याच समजून निःशंक वापरतात, त्यांना स्वतःच्याच कल्पना पुनःपुन्हा वापरावयाला कां खंत वाटावी ?

विक्रमोर्वशीय व मालविकाग्निमित्र या कालिदासाच्या दोन नाटकांत विचारांची, कल्पनांची किंवा प्रसंगांची पुनरुक्ति किती दृष्टीस पडते ? संस्कृतांतील कोणतेंही महाकाव्य घेतलें तरी त्यांत ऋतूंचीं, शृंगारांचीं किंवा शौर्याचीं ठरीव वर्णनें हीं हटकून सांपडतात. अभिजात कवींच्या ठिकाणीं प्रतिभाशक्ति कमी असते असें नाहीं; पण कृत्रिम नियमांच्या मर्यादा पाळण्याची सक्ति स्वतःच्या प्रतिभेवर ते इतकी करितात कीं, तिची स्थिति अखेर वर्तुळाच्या पोटांत गिरक्या घेणाऱ्या भोंवऱ्यासारखी होते. मानवी मनाला जर पूर्ण स्वातंत्र्य कुठें उपभोगावयाला मिळत असेल तर तें फक्त कल्पनेच्या साम्राज्यांत. पण परवशतेचें विष मनुष्याच्या बुद्धींत इतकें भिनलेलें आहे कीं, तिथेंही तिनें परंपरेच्या कृत्रिम मर्यादा घालून, मनाची गति कुंठित केली; आणि त्यामुळें, कवितेच्या–कल्पनेच्या साम्राज्यांतही, हें बौद्धिक दास्य सहन करणें ज्यांना अशक्य झालें, त्यांनीं बेदरकारपणानें बंडाचा झेंडा उभारला. वर्डस्वर्थ, व्हिट्मन किंवा केशवसुत यांनीं घडवून आणलेल्या क्रांतीमुळें, परंपरेच्या पाविल्याची जरी थोडी हानि झाली असली तरी, भावी कवींची प्रतिभा तिनें स्वतंत्र कांहींकेली, हा लाभ

सामान्य नाहीं. केशवसुतांच्या पूर्वी महाराष्ट्रांत जी कविता निर्माण झाली, तिच्यांत लौकिक म्हणजे स्वतंत्र स्फूर्तीचें काव्य फार थोडें आहे. मराठी कवितेचा आरंभ संस्कृताच्या अनुकरणानें झाला; पण बाल्यावस्थेंत पत्करलेलें हें परावलंबन झुगारून देण्याचें धाडस तिनें पुढें कधींच केलें नाहीं. ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचे पहिले अभिजात कवि; तथापि त्यांच्या कवितेंत कल्पकतेची स्फूर्ति व विचारांचा स्वतंत्रपणा इतका आढळून येतो कीं, तितका पुढील एकंदर मराठी कवितेंतही दृष्टीस पडत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. संतकवींची फुटकळ कविता आणि शाहिरांचे लावण्या–पोवाडे हेंच काय तें महाराष्ट्राचें लौकिक काव्य.

पण त्यांतही, तुकोबांचे अभंग सोडल्यास, अंतःकरणाची तळमळ, अपूर्व कल्पकता किंवा उदात्त तत्त्वविचार फारसे आढळत नाहींत. महाराष्ट्राच्या उत्तान व अधम मनोवृत्ति शाहिरांच्या लावण्यांतून व्यक्त झाल्या आहेत. पोवाड्यांत काव्यगुण बहुधा इतका कमी असतो कीं, त्यांनीं पत्करलेल्या वृत्ताच्या सैल बंधनाची भीड जर न पडती तर, त्यांचा काव्यांत कुणीही समावेश केला नसता. पोवाड्यांत लौकिक काव्याचे सर्व दोष व जोरकस गद्याचे कांहीं गुण यांची भेसळ झालेली दृष्टीस पडते. बखरींच्या तुटक पण तेजस्वी भाषेंतून खेडवळ कवीची रांगडी प्रतिभा बोलत आहे, असाही भास पोवाडे ऐकतांना पुष्कळ वेळां होतो. उच्च दर्जाची लौकिक कविता महाराष्ट्रांत निर्माण झाली नाहीं, याला कारण त्याची विशिष्ट समाजरचना होय. एकंदर समाजाचे विकार-विचार लौकिक कवींच्या मुखानें प्रकट होतात. पण महाराष्ट्राला सामाजिक आयुष्य असें कधींच नव्हतें. जातिभेदामुळें एकंदर समाजांत संस्कृतीचे उच्च-नीच प्रकार इतके उत्पन्न झाले आहेत कीं, नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या मराठी मुलुखांतील तमाम जनतेच्या अंतःकरणाराला हलवील, अशी विचारांची किंवा कर्तृत्वाची खळबळ महाराष्ट्रांत कधीं फारशी घडूनच आली नाहीं. प्रत्येक जातीची संस्कृति भिन्न, तिचे हितसंबंधही वेगळे. आचाराचा संकोच हा विचारांच्या संकोचाला कारण होतो; आणि विचारांच्या संकोचामुळें वाङ्मयाचा विकास होणें अशक्य होतें. महाराष्ट्रांतील व्यक्तींनीं स्वातंत्र्याचा उपभोग कधीं घेतलाच नाहीं, मग त्यांच्या विचारांत व वाङ्मयांत स्वतंत्रपणा कसा दिसून येईल? सर्व महाराष्ट्राला हलवील, ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्व दर्जाच्या व्यक्तींच्या अंतःकरणाला पीळ पाडील अशी एकच खळबळ महाराष्ट्रांत आजपर्यंत घडून आली; आणि समुद्रमंथनांतून जसा चंद्रबिंबाचा उदय झाला, तसें महाराष्ट्राचें लौकिक काव्य त्या क्षोभांतून जन्मास आलें. परंतु वारकरी संप्रदायाच्या या विचारक्रांतीचा परिणाम दुराराध्य पंडित-वर्गावर अगदीं थोडा झाला, व मराठी कवितेचें अभिजात वळण कायम राहिलें. देवभक्ति हा समाजांतील सर्व व्यक्तींच्या बुद्धीला भुलविणारा व अंतःकरणाला आकळणारा विषय; आणि महाराष्ट्राची बहुतेक लौकिक कविता या विषयावरच आहे.

नमुना ५४६६३ वि: ...

...2029... वो: वि: 2/3/07

मराठी कवितेची पराकाष्ठेची परवशता वामन-मयूरांच्या काव्यांत दृष्टीस पडते. ज्ञानेश्वरीनंतर मुक्तेश्वरी भारत हा एकच अभिजात काव्यग्रंथ मराठींत नांवाजण्यासारखा झाला. मुक्तेश्वराची प्रतिभा भव्य नसली तरी चपल होती; शिवाय त्याचें अंतःकरण मेलें नव्हतें. तत्कालीन समाजाचें चरित्र त्यानें जिव्हाळ्यानें पाहिलें व त्यामुळें त्याच्या वाणींत जिवंतपणा राहिला. श्रीधर हा मुक्तेश्वराहूनही पढिक व परंपरेचा एकनिष्ठ अनुयायी. त्याची प्रतिभा असामान्य नसली तरी, भोळ्या भावाची गोडी त्याच्या कवितेंत पुष्कळ आहे. महाराष्ट्रांतील बाकीच्या अभिजात कवींनीं भाषेचें वैभव अतोनात वाढविलें. पण कविता भाषेमुळें जगत नाहीं, भावनेमुळें जगते. प्राचीन मराठी कवितेचा हा इतिहास लक्षांत घेतला, म्हणजे केशवसुतांनीं केलेल्या कामगिरीचें महत्त्व ध्यानांत येतें. वर्डस्वर्थनें इंग्लंडांत किंवा व्हिट्मननें अमेरिकेंत जें केलें तेंच केशवसुतांनीं महाराष्ट्रांत केलें. पारमार्थिक किंवा पौराणिक विषयांवर खिळलेलें मराठी कवितेचें चित्त केशवसुतांनीं ऐहिकाकडे—सामान्य लोकांच्या रोजच्या आयुष्याकडे—वळविलें. सम्राटांचे दिग्विजय, योद्धयांचें वीरचरित किंवा कामिनींची रूपसंपदा हेच कवितेचे विषय होऊं शकतात असें नाहीं; गिरणींत खपणारा मजूर अगर शेतांत राबणारा नांगऱ्या यांच्याही जीवितांत प्रतिभेला भुलविणारी जादू असते; हरिभजन किंवा पुराणप्रवचन केल्यानें वाणीचें जितकें सार्थक होईल, तितकेंच किंबहुना त्याहूनही अधिक सार्थक अनाथांचीं व पतितांचीं दुःखें वाङ्मयाच्या वेशीवर टांगल्यानें होईल; ही जाणीव महाराष्ट्रांत प्रथम केशवसुतांनीं उत्पन्न केली. व्हिट्मननें म्हटल्याप्रमाणें, मानवी जीविताचें पूर्ण दर्शन ज्यांना झालें त्यांच्याच ठिकाणीं देववाणी आविर्भूत होते. केशवसुतांना मानवी जीविताचें पूर्ण दर्शन कदाचित् झालें नसेल; पण अत्यंत कोमल व संस्कारक्षम मनाच्या मनुष्याला जें जें कांहीं दिसणें, कळणें व जाणवणें शक्य आहे तें तें सर्व केशवसुतांनीं अनुभविलें होतें. व्हिट्मननें जग डोळे भरून पाहिले; आणि जें पाहिलें तें वर्णन करावयाला तो कचरला नाहीं. त्याच्या मानानें केशवसुतांच्या वांटणीला फार थोडी आयुर्मर्यादा आली; व जगाचा अनुभवही त्यांना त्या मानानें मर्यादित आला. परंतु समुद्राप्रमाणें तारामंडलाचें संपूर्ण प्रतिबिंब जरी सरोवरांत पडणें शक्य नसलें, तरी त्यामुळें त्याच्या बिंबग्राहित्वाला कसा कमीपणा येईल ?

वर्डस्वर्थ किंवा व्हिट्मन यांच्या मानानें केशवसुतांची योग्यता पुष्कळच कमी आहे, यांत शंका नाहीं. पण त्यांची धडाडी, तेजस्विता व तळमळ केशवसुतांत होती हेंही तितकेंच खरें. वर्डस्वर्थचें सुखाचें व शांततेचें जीवित आणि व्हिट्मनचा मोकाट व बेफिकीर स्वतंत्रपणा जर त्यांना लाभता, व त्यांचें दीर्घायुष्यही त्यांच्या वांटचाला येतें, ततें केशवसुतांनीं काय चमत्कार केले असते, हें आज कोण सांगूं शकेल ? दारिद्र्यानें त्यांच्या प्रतिभेला हैराण केलें व अकालमृत्यूनें त्यांचीं स्वप्नें धुळीला मिळविलीं

पण मनोरथाच्या उन्नत ध्वजावर बसलेल्या निराशेच्या घुबडाची भीषण छाया जीविताच्या खडतर मार्गावर पडली असतां, त्यावर स्वतःच्या प्रतिभेचें प्रखर तेज पाडून, त्याच्या प्रकाशांत जे धैर्यानें पुढें पाऊल टाकतात, त्यांचे धन्यवाद कोण गाणार नाहीं ? त्यांना यश मिळो अगर न मिळो, त्यांनीं प्रयत्न केला यांत जसें त्यांचें समाधान तसेंच जगाचें कौतुकही भरलेलें असतें. कवि या नात्यानें केशवसुतांना आज मिळालेलें यश भावी कवींच्या यशापुढें कदाचित् उद्यां लोपूनही जाईल; पण त्यांनीं मार्ग दाखविला, आणि त्या मार्गानें आम्ही इतके पुढें आलों, एवढा धन्यवाद जरी भावी कवींनीं उच्चारला तरी पुष्कळ आहे. त्यांनीं निर्माण केलेलें वाङ्मय दिसावयाला जरी थोडें असलें, तरी स्फूर्ति देण्याची शक्ति त्यांत विलक्षण आहे; व त्यांचें कर्तृत्व अलौकिक होतें असें जें म्हणतात तेंही याच कारणामुळें. कोणत्याही देशाच्या वाङ्मयांत युगांतर घडवून आणणें हें काम सोपें नाहीं; तें त्यांनीं केलें यांतच त्यांचा मोठेपणा दिसून येतो.

कवि या नात्यानें केशवसुतांची योग्यता असामान्य आहे. मराठी कवितेच्या मनोवृत्तींतच त्यांनीं क्रांति घडवून आणिली असें नाहीं, तर तिच्या भाषेला व रचनेलाही त्यांनीं स्वतंत्र वळण दिलें. केशवसुतांच्या पूर्वी महादेव मोरेश्वर कुंटे यांनीं, आपल्या 'राजा शिवाजी' या महाकाव्यांत, मराठी कवितेच्या भाषेचें पंडिती वळण टाकून देऊन, तिला बालबोध करण्याचा प्रयत्न केला. पण एक तर, समर्पक शब्दांच्या योजनेकडे कुंटे यांचें लक्ष कमी; आणि दुसरें, त्यांच्या भाषेचा सोपेपणा हा पुष्कळ वेळां अर्थबोधापेक्षां अर्थलोपालाच अधिक कारण होत असल्यामुळेंही, त्यांची ही टूम यशस्वी झाली नाहीं. तथापि सामान्य लोक जी भाषा बोलतात त्या भाषेंत कवित लिहिण्याची धडपड, अलीकडील काळांत, कुंटे यांनीं प्रथम केली, ही गोष्ट मराठी कवितेच्या इतिहासांत निस्संशय नमूद होऊन राहील. कुंटे यांच्या अपयशाला त्यांच्या निष्काळजीपणाइतकीच चिपळूणकरांची नालस्तीही कारण झाली. त्यामुळें त्यांच्या काव्यरचनेंत तर कायमचा खंड पडलाच, पण मराठी कवितेच्या प्रगतीचीही पाऊलवाट कांहीं काळ बुजून गेली, असें म्हटलें तरी चालेल. कुंटे यांच्या भाषेहून केशवसुतांची भाषा कदाचित् कमी बालबोध ठरेल; पण त्या मानानें तिच्यांत ग्राम्यपणाही थोडाच असून, अर्थहानि तर प्रायः कुठेंही झालेली आढळणार नाहीं. शब्दांची योजना समर्पक व्हावी, आणि अर्थाच्या दृष्टीनें ते जितके भेदक तितकेच नादाच्या दृष्टीनें वेधक असावेत, इकडे केशवसुतांचें लक्ष फार असे. 'म्हातारी', 'झपूर्झा', 'दोन बाजी', 'वातचक्र', 'गोफण' हीं त्यांचीं कवनें त्यांच्या योजकतेची उत्तम साक्ष देतात. पण केशवसुत नुसता भाषेंतच बदल करून राहिले नाहींत; मराठींत अगदीं अभिनव असे काव्यप्रकारही प्रचलित करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. Lyric व Sonnet म्हणजे 'भावगीत' व 'सुनीत' हे परदेशी काव्यप्रकार त्यांनींच महाराष्ट्रांत आणले; आणि ते आतां रूढही झाले आहेत, असें म्हणावयाला हरकत नाहीं.

त्यांची बहुतेक कविता त्रुटित म्हणजे भावगीतात्मक (Lyrical) आहे; व स्वतंत्र सुनीतें जरी त्यांनीं थोडींच लिहिलीं असलीं तरी तीं सर्व उत्तम असून, त्यांचें 'आम्ही कोण' हें सुनीत तर मराठी वाङ्मयांत केवळ अप्रतिम म्हणूनच गणलें जाईल.

भावगीत व सुनीत यांना अभिनवतेच्या दृष्टीनें जितकें महत्त्व आहे तितकेंच औचित्याच्या दृष्टीनेंही आहे. एड्गर पोनें म्हटल्याप्रमाणें, कविस्फूर्तीला प्रदीर्घ रचनेचे परिश्रम करणें स्वभावतःच शक्य नाहीं. स्फूर्ति म्हणजे भावनांची उचंबळ ही कितीही प्रबळ असली तरी ती फार काळ टिकून राहाणें कठिण आहे. मनःसृष्टींत दीर्घायुष्याचा भोगवटा फक्त विचाराला लाभला आहे; व म्हणून वार्धक्य आणि त्यामुळें येणारा पोक्तपणा त्याच्या ठिकाणीं भरपूर आढळतो. उलट स्फूर्ति ही आकाशांत क्षणभरच तळपून मावळणाऱ्या चपलेप्रमाणें अल्पायुषी आहे. परंतु अप्सरेप्रमाणें ती सदैव तरुण असते; व जरेचा गारठा झोंबून तिचें सौंदर्यपुष्प कधींच कोळपत नाहीं. पाण्यावरील बुडबुड्यासारखें तिचें जीवित क्षणभंगुर असल्यामुळें, विचाराप्रमाणें प्रदीर्घ रचनेचा प्रपंच करणें तिला मुळींच शक्य नसतें. कवीची प्रतिभा कितीही समर्थ असली तरी, सर्ग-प्रतिसर्गांचा किंवा प्रकरण-परिच्छेदांचा प्रवास, तिला स्फूर्तीच्या एका दमांत करणें अशक्य आहे. मजल दरमजल करीतच तिला मार्ग कंठावा लागतो; व त्यामुळें महाकाव्यांत किंबहुना खंडकाव्यांतही रसाचें प्रमाण सर्वत्र सारखें असें कधींच आढळून येत नाहीं. बायरनच्याइतकी तेजाळ प्रतिभा व प्रबळ स्फूर्ति फारच थोड्या कवींच्या ठिकाणीं सांपडेल; पण 'चाइल्ड हॅरोल्ड' या महाकाव्यांत त्याची ही प्रभावशाली प्रतिभाशक्तीही अनेक ठिकाणीं टेकीला आलेली दृष्टीस पडते. व्यास, होमर किंवा कालिदास यांच्यासारख्या लोकोत्तर प्रतिभेच्या कवींच्या काव्यांतूनही रसापकर्षाचीं स्थळें जीं पुष्कळ आढळतात, त्याचें कारण झालें तरी हेंच होय. भावनेची तीव्रता जोंपर्यंत टिकते तोंपर्यंत कवितेचा ओघ सहज असतो. पण तिचा भर एकदां ओसरला, म्हणजे रसाला ओहोट लागून, काव्यरचना हा केवळ एक क्लिष्ट व्यवसाय होऊन बसतो. जगांतील प्रायः कोणत्याही महाकाव्यांत या अनुभवाची साक्ष हटकून सांपडेल. आणि म्हणून, पोनें म्हटल्याप्रमाणें, महाकाव्य ही चीज कविसृष्टींत संभवतच नाहीं. ज्याला महाकाव्य म्हणतात, तो एक निरनिराळ्या प्रसंगीं स्फुरलेल्या भाव-गीतांचा गाथा असतो; त्याचें विषयसूत्र एक असतें इतकेंच काय तें. हृदयंगमता हें कवितेचें गुणसर्वस्व होय; तें भावगीतांत जितकें असतें तितकें दुसऱ्या कोणत्याही काव्यप्रकारांत दृष्टीस पडत नाहीं.

सुनीत हाही भावगीताचाच एक प्रकार गणला जातो. पण सुनीतांत रचनेचें बंधन फार, व म्हणून स्फूर्तीलाहि स्वातंत्र्य कमी. भावनेची तीव्रता, कल्पनेची तरलता व रचनेचा त्रुटितपणा हे भावगीताचे विशेष आहेत; आणि त्याचें सौंदर्य त्यांच्या समप्रमाण समुदायावर अवलंबून असतें. केशवसुतांच्या पूर्वी महाराष्ट्रांत भावगीतें

बुद्धिपुरःसर अशीं कुणी लिहिलींच नाहींत. कवितेची ही तरळ जात सामान्य मनुष्याच्या अंतःकरणाला कितीही भुरळ पाडीत असली, तरी पंडितांच्या बोजड बुद्धीला ती क्षुद्र वाटणें साहजिक आहे. शिवाय कवितेची किंमत जिथें लाखाच्या हिशोबावर होते तिथें या त्रुटित रचनेला कोण विचारतो ? महाराष्ट्रांतील संतकवींनीं जी अभंगात्मक स्फुट कविता लिहिली आहे तिची गणना भावगीतांत करितां येईल; पण ती सर्वच भक्तिपर असून, तींत उत्कटता असली तरी विविधता मुळींच नाहीं. शाहिरांच्या लावण्या हा भावगीतांचा अगदीं निकृष्ट प्रकार होय. त्यांतील कल्पना तर अश्लील आहेतच, पण ठरीवपणाही कमालीचा आहे. भावगीत म्हणजे भावनाप्रेरित किंवा विकारस्फूर्त काव्य. त्या दृष्टीनें विचार केला तर, लौकिक कवितेचें तें परिणत स्वरूप म्हणतां येईल. अर्थातच केशवसुतांसारख्या लौकिक कवीनें, आपले विकार-विचार प्रकट करण्याकरितां, या जनमनाला भुलविणाऱ्या भावनोत्कट काव्यप्रकाराचा आश्रय केला, यांत नवल नाहीं. भावनेची तीव्रता व कल्पनेचें तेज हें त्यांच्या भावगीतांतून जितकें दिसून येतें, तितकें दुसऱ्या कोणत्याही आधुनिक कवीच्या कवनांतून क्वचित्च आढळेल. उत्कट भावनेला उदात्त तत्त्वविचाराचें अधिष्ठान मिळालें म्हणजे, शुक्लपक्षांतील चंद्रकलेच्या निमुळत्या कडेवर टेकलेल्या अभ्रखंडाप्रमाणें, तिचें सौंदर्य खुलून दिसतें. केशवसुतांच्या बहुतेक भावगीतांतून तत्त्वविचारांच्या अनुषंगानें भावनांचा परिपोष झाला आहे. भावगीताची रचना करण्यांत ते किती कुशल होते याची उत्तम कल्पना, पोच्या 'Raven' या भावगीताचें त्यांनीं केलेलें 'घुबड' हें रूपांतर वाचून, येते. हें रूपांतर मूळ गीताहूनही सरस आहे, असें म्हटलें तरी चालेल. पोनें त्या काव्याची स्वतःच जी उत्पत्तिकथा सांगितली आहे तींत नमूद केल्याप्रमाणें नादाच्या अनिवार लालसेमुळें त्याला कृत्रिमपणा आला असून, त्याचा विस्तारही थोडा फाजील वाटतो. हे दोष रूपांतरांत मुळींच उतरले नाहींत. केशवसुतांनीं पोची कल्पना तेवढी उचलली; पण त्याच्या कारागिरीचें अनुकरण न केल्यामुळें, त्यांची कविता अधिक हृदयंगम झाली आहे.

महाराष्ट्राच्या लौकिक कवितेचा उदय केशवसुतांच्या या भावगीतांतून झाला, असें म्हणावयाला बिलकुल हरकत नाहीं. तुकारामाशिवाय त्यांच्या तोडीचा एकही लौकिक कवि महाराष्ट्रांत अजून झाला नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. त्यांची प्रतिभा जितकी चपल तितकीच भव्य व जितकी उद्दाम तितकीच उदात्त होती. स्वदेशाचा अभिमान त्यांनीं उत्कटतेनें वाहिला; पण त्यामुळें विश्वबंधुत्वाची कल्पना अव्यवहार्य आहे, असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. कवि हा जात, धर्म व राष्ट्र यांच्यापलीकडे असतो; व त्याच्या कल्पनेच्या आकाशाचें क्षितिज कुठेंच दृष्टीस पडत नाहीं असें जें म्हणतात, तें महाराष्ट्रांत फक्त केशवसुतांनीं खरें करून दाखविलें. त्यांच्यावरोबर ज्यांचें नांव घेतां येईल असे मराठी कवि नारायण वामन टिळक हे एकच झाले. पण

टिळकांच्या कल्पनेचें आकाश धर्माभिनिवेशाच्या टप्प्यावर हटकून टेकलेलें दिसतें. आपण कोणत्या धर्माचे आहों याचा विसर त्यांना कधींच पडला नाहीं. इतकेंच नव्हे तर, धर्मप्रसाराच्या कामीं त्यांनीं आपली वाणी मोठ्या ईर्ष्येनें झिजविली. मनुष्याचे विचार जितके स्वतंत्र तितकें त्याच्या वाणींत तेज अधिक. टिळकांच्या ठिकाणीं विचार-स्वातंत्र्य फारसें नव्हतेंच; त्या मानानें त्यांच्या वाणींतही तडफ कमीच आहे. उलट केशवसुतांनीं विचारस्वातंत्र्याच्या बाबतींत समाजाची किंवा परंपरेची भीड कधींच बाळगली नाहीं.

नियमन मनुजासाठीं, मानव नसे नियमनासाठीं, जाणा !

हें जसें त्यांच्या उपदेशाचें तसेंच आचाराचेंही परमसूत्र होतें. आणि म्हणूनच,

प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरती नोंदा, विक्रम कांहीं करा, चला तर !

असा निग्रहपूर्वक आदेश भावी पिढ्यांना करितांना, त्यांना यत्किंचितही शंका वाटली नाहीं. टिळकांच्या कवितेंतही क्वचित् आवेश आढळतो; पण त्यांचें तें अवसान एकंदरींत लटकें वाटतें. आदेश द्यावयाला–हुकुमाचे शब्द उच्चारावयाला– जो आत्म-प्रत्यय लागतो तो त्यांच्या ठिकाणीं नव्हता. त्यांची प्रतिभा सौम्य होती हेंच खरें. पण तो सौम्यपणाही मननशीलतेमुळें आलेला नसून, प्रतिभेच्या दुर्बलतेचेंच तें रमणीय स्वरूप होतें.

मराठी भाषेवर मात्र टिळकांचें केशवसुतांहून अधिक प्रभुत्व होतें. पण एवढा एक गुण सोडला तर, टिळक केशवसुतांची दुसऱ्या कोणत्याही बाबतींत बरोबरी करूं शकत नाहींत. इतर आधुनिक कवींची तर गोष्टच बोलावयाला नको. केशवसुतांची प्रतिभा अलौकिक होती; व टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें, 'म्हातारी' या कवितेंत तिच्या अलौकिकपणाची साक्ष उत्तम रीतीनें पटते. हवेंत भिरभिरणाऱ्या म्हातारीला पाहून त्यांना गंधर्वाच्या विमानाचें स्मरण झालें, आणि वाऱ्यावर हेलकावणारीं अप्सरोगीतें त्यांच्या कानांत गुणगुणूं लागलीं ! मुलींना फेर धरतांना–झिम्मा खेळतांना–पाहून, केशवसुतांना ग्रहमालेच्या परिभ्रमणाचें दृश्य दिसलें, आणि विश्वकुहरांत घुमणाऱ्या स्वर–संगमाच्या तत्त्वाची ओळख पटली ! मिलेटनें (Millet) म्हटल्याप्रमाणें, सौंदर्याचा–दिव्याचा–साक्षात्कार क्षुद्र वस्तूंतसुद्धां झाला पाहिजे; निसर्गांत जर कांहीं क्षुद्र–असुंदर–आढळलें तर तो आपल्या दृष्टीचा दोष, अंतःकरणाचा हीनपणा आहे. त्यानें स्वतः आपल्या आयुष्यांतील कर्तृत्वाचे दिवस खेड्यांत घालविले; आणि खेडवळांच्या दिनचर्येंतील क्षुल्लक प्रसंगांचीं चित्रें काढून आपली ही प्रतिज्ञा पूर्ततेल नेली. 'कापणी', 'धनगर व त्याचा कळप', 'शेतांत खत पसरणारा मनुष्य' किंवा

'शेतांत जन्मलेलें वासरूं घरीं नेणारे शेतकरी' या त्याच्या चित्रांनीं कलाकोविदांच्य विचारसरणींत क्रांति घडवून आणली. केशवसुतांनीं तरी याहून निराळें काय केलें? 'भृंग', 'दंवाचे थेंब', 'वातचक्र', 'रांगोळी' या त्यांच्या कवितांत, क्षुद्र वस्तूंतूनही शाश्वत सौंदर्य हुडकून काढणारी, त्यांची दिव्य दृष्टि प्रत्ययाला येते. त्यांच्याच शब्दांत सागावयाचे झालें तर,

साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे ?

या तत्त्वाची प्रतीति पहाण्यांत–सृष्टींतील स्वर्ग-समंक्षतेचा साक्षात्कार अनुभविण्यांत त्यांचें सर्व आयुष्य गेलें. अलौकिकाचें दर्शन केशवसुतांनीं लौकिकांत घेतलें. त्याकरितां अध्यात्माच्या कर्कश तर्कटाचा अवलंब त्यांनीं कधींच केला नाहीं.

"Poet ! beware lest your poems are made in the spirit that comes from the study of pictures of things—and not from the spirit that comes from the contact with real things themselves." हा जो इशारा व्हिट्मननें कवींना दिला आहे, तो उगाच नाहीं. अभिजात आणि लौकिक कवींच्या विचारसरणींतील भेद या इषाऱ्यांत उत्तम रीतीनें व्यक्त झाला आहे. अभिजात कवि हे जगाकडे इतरांच्या दृष्टीनें पहातात–इतरांनीं जग जसें पाहिलें तसें पहाण्याचा प्रयत्न करितात; स्वतःच्या दृष्टीचा उपयोग प्रायः करीतच नाहींत. उलट लौकिक कवि जगाकडे डोळे भरून पहातो. इतरांनीं कसें पाहिलें, त्यांना काय वाटलें, हा विचारही त्याला सुचत नाहीं. दंवाचे थेंब पानांवर पडतांना व सुकून जातांना अनेकांनीं पाहिले असतील; आणि इंद्रधनुष्य आकाशांत पडतांना व मोडून जातांनाही पुष्कळांना दिसलें असेल. पण केशवसुतांच्या डोळ्यांतून जशीं आसवें टपटपलीं, किंवा वर्डस्वर्थचें अंतःकरण जसें उचंबळून आलें, तशी स्थिति किती जणांची होते ? त्याला कवीची दृष्टि, कवीचें अंतःकरण लागतें. फुलाहून हळुवार व मुलाहून भावडया अशा कविहृदयालाच सृष्टींतील या सूक्ष्म संवेदना पीळ पाडतात. जुन्या मराठी कवींहून केशवसुतांत जर कांहीं विशेष असेल तर तें हेंच होय. प्राचीन-काळापासून चालत आलेली जी विचारांची विकृत दृष्टि, तींतून या जुन्या कवींनी जगाकडे पाहिलें व त्यामुळें दैन्य आणि दुष्टपणा याशिवाय त्यांत त्यांना दुसरें कांहीं दिसलेंच नाहीं. उलट केशवसुतांनीं जगाकडे पहातांना स्वतःच्या डोळ्यांचा उपयोग केला; आणि त्यांना सृष्टींत अढळ सौंदर्य भरून राहिलेलें दिसलें. केशवसुतांनीं मराठी वाङ्मयांत जी क्रांति घडवून आणली ती हीच होय. ही क्रांति होतांना छंदःशास्त्राच्या नियमांचा भंग झाला असेल व वृत्तांचे सांचेही फुटले असतील. पण वर्डस्वर्थच्या मानानें, केशवसुतांनीं रूढ नियमांचें बंधन पुष्कळच पाळलें, असें म्हटलें पाहिजे. व्हिट्मननें तर कोणतेंच बंधन कधींही पाळलें नाहीं. चव्हाट्यावर उभें राहून दवंडी पिटणाऱ्या

तराळाप्रमाणें, त्यानें एकंदर समाजाच्या कानांवर पडेल अशा बेतानें, खड्या सुरांत आपला संदेश पुकारला ! त्या मानानें केशवसुतांनीं बंडखोरपणा कमीच दाखविला.

महाराष्ट्रांत आज केशवसुतांचें युग चालू आहे. शब्दांच्या ललित बंधनांत आपले विचार गुंफण्याची उमेद अगर ऐपत ज्यांना ज्यांना म्हणून आहे, ते ते सर्व केशवसुतांचें अनुकरण करण्यांत आज धन्यता मानतात. ही प्रवृत्ति गैर नाहीं. पण क्रांतिकारक कवीचें अनुकरण करणें फार धोक्याचें असतें. बंडखोरपणांत पौरुषाची खुमखुम ही कितीही व्यक्त होत असली, तरी स्वातंत्र्याची फाजील लालसा ही केव्हांही वाईटच. शिवाय क्रांति ही केवळ एक प्रकारची प्रतिक्रिया असते. अतिरेकाचा उच्छेद करण्याकरितां निसर्गाची जी शक्ति वेळोवेळीं प्रकट होते, तिला क्रांति म्हणतात. विनाशाचा गृध्र तिच्या विजयध्वजावर आरूढ झालेला असतो; व तिचा साक्षात्कार होतांच, समाजांतील सर्व दडपलेलीं दुःखें सूड घेण्याच्या ईर्ष्येनें, एकवटून उभीं राहतात. आणि जुनाट जगाच्या उध्वस्त अवशेषांतून, नवीन सृष्टि निर्माण करण्याचा संजीवनी-मंत्र जरी ती तोंडानें पुटपुटत असली, तरी तिचा गृध्रध्वज दृष्टीस पडतांच पवित्र परंपरेचें उज्ज्वल मुखही काळवंडून जातें ! क्रांतीच्या या भयानक स्वरूपाची व्हिट्-मनला पूर्ण जाणीव होती; व म्हणून आपलें अंध अनुकरण न करण्याबद्दल भावी कवींना त्यानें इषाराही दिला आहे. "I myself but write one or two indicative words for the future" हे त्याचे उद्‌गार, जसे त्याला स्वतःला, तसेच केशव-सुतांनाही लागू पडतात. किंवहुना, टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें, केशवसुतांनीं फक्त मार्ग दाखविला; त्यांचें सर्वथैव अनुकरण करणें अनिष्ट होईल. परंतु त्यांनीं दाखविलेला मार्ग महाराष्ट्राच्या–मराठी वाङ्मयाच्या निःश्रेयसाचा आहे आणि महाराष्ट्राचे उद्यांचे कवि त्या अभिनव मार्गाचें अनुसरण उत्साहानें करतील, यांत शंका नाहीं.

(काव्य विचार १९२३;
रविकिरन मंडळ प्रकाशन; पृ. क्र. १–१०)

११

गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता

लेखक : ग. त्र्यं माडखोलकर

मराठी कवितेला सात शतकांची उज्ज्वल परंपरा असून तिनें महाराष्ट्राच्या अंतःकरणावर अनन्य प्रभुत्व गाजविलें आहे. किंबहुना, मराठी भाषा आणि मराठी कविता या सहजात आहेत, असेंहि म्हटलें तरी शोभेल. काव्य हें जरी भाषेचें अपत्य मानलें जात असलें, तरी तें आपल्या जन्मदात्रीबरोबरच बहुधा जन्माला येत असतें. पृथ्वीच्या पाठीवरील शहरें केव्हां स्थापन झालीं हें सांगतां येईल; पण नद्या केव्हां उगम पावल्या हें सांगणें मात्र कठीण. तसेंच गद्य आणि पद्य यांचेंहि आहे. नद्या या जशा पृथ्वीबरोबरच अस्तित्वांत आल्या, तसें पद्य हें भाषेबरोबरच जन्माला आलेलें आढळतें. उलट, शहरें हीं जशीं मानवी संस्कृतीच्या उत्कर्षाबरोबर वसत गेलीं, तसें गद्य हें मानवी विचारांच्या प्रगतीबरोबर विकसत गेलें. या दृष्टीनें कविता ही नदी-प्रमाणें मानवी संस्कृतीची जननी आणि धारिणी आहे असें म्हणतां येईल. त्यामुळें राष्ट्राच्या वैचारिक परंपरेचें वैशिष्ट्य आणि सातत्य हें जितकें त्याच्या कवितेंत प्रकट झालेलें असतें आणि प्रत्ययाला येतें, तितकें तें गद्यांत दिसून येत नाहीं.

अर्थात्, कवितेच्या स्वरूपांत घडून येणारी क्रांति ही एकंदर समाजाच्या विचार-क्रांतीची प्रातिनिधिक असते. प्राचीन मराठी कविता बव्हंशीं धार्मिक होती. भागवत धर्मानें तिला प्रेरणा व पराक्रमाचें वेदक्षेत्रहि मिळवून दिलें. उलट तिनेंहि त्याच्या प्रसारार्थ आपलें शक्तिसर्वस्व वेंचून त्याच्या या ऋणाची पुरेपूर फेड केली. जुन्या

मराठी कवितेला जे परभृत म्हणून नांवें ठेवतात त्यांच्या ही गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं जेथें महाराष्ट्राची भाषा, संस्कृति आणि विचारपरंपरा हीच मुळी परभृत म्हणजे घंस्कृतोद्भव होती, तिथें त्याच्या कवितेंत निराळेपणा कोठून आढळणार? मूळ वृक्षाचे गुणधर्म त्याच्या कलमांत दिसून यावे, हें स्वाभाविकच नव्हे काय? बहुजन-समाजाच्या गरजेप्रमाणें संस्कृत भाषेचें रूप हळुहळू पालटत जाऊन नवी मराठी भाषा अस्तित्वांत आली. पण विचारांचें वळण मात्र जुनें होतें तेंच बहुतेक कायम राहिलें. अशा स्थितींत जुन्या मराठी कवितेला परभृत म्हणणें, म्हणजे तिला मातृस्थानीं असलेली संस्कृत भाषा आणि तिच्यांतील वाङमय यांनाच पर्यायानें परकें लेखल्यासारखें सोत नाहीं काय? मुसलमानी अमदानींत अगदीं विजातीय अशा वाङमयाशीं महाराष्ट्राचा प्रथमच संबंध आला. पण, संस्कृत वाङमयापेक्षां तें वाङमय श्रेष्ठ नसल्यामळेंच मुख्यतः त्याला जुलमी राजसत्तेचा पाठिंबा असूनसुद्धां, महाराष्ट्राच्या विचारांवर त्याचा पगडा बसला नाहीं; व मराठीचें स्वरूप बहुतेक अविकृतच राहिलें. परंतु मुसलमानांच्या तीनशें वर्षांच्या सुलतानी कारकीर्दीतहि जें परिवर्तन मराठी कवितेंत डून येऊं शकलें नाहीं, तें ब्रिटिशांचा शांतताप्रधान अंमल सुरू झाल्यावर मात्र अवघ्या पन्नास वर्षांत घडून आलें. कारण, पाश्चात्त्यांच्या भौतिक संस्कृतीच्या प्रभावानें सुशिक्षित वर्ग आरंभीं तरी इतका दिपून गेला कीं, त्याला इंग्रजांचें निव्वळ अनुकरण करण्याशिवाय उन्नतीचा दुसरा मार्ग दिसला नाहीं. या अनुकरणाच्या भावनेंतूनच आधुनिक कवितेचा उदय झाला. जुनी मराठी कविता ही परभृत म्हणजे निव्वळ अनुवादात्मक आहे असें मानलें, तरी तींत परकेपणाची छटा मात्र यत्किंचितहि नव्हती. उलट इंग्रजीपासून स्फूर्ति घेऊन निर्माण झालेली ही आधुनिक कविता मात्र आद्यंत परभृत म्हणजे अंतर्बाह्य परकीय होती. इंग्रजी शिक्षणानें ज्याप्रमाणें बहुजनसमाजापासून अगदी भिन्न असा सुशिक्षितांचा वर्ग उत्पन्न केला, त्याप्रमाणें त्यानें बहुजन-समाजाच्या परंपरागत वाङमयापासून अगदीं विसदृश अशी नवीन कविता निर्माण केली. विलायतेहून लग्न करून स्वदेशीं आलेल्या फडर्चा बॅरिस्टराची गौरकाय वधू मराठी वेषभूषेंत जशी दिसावी, तसा आरंभीं या नव्या कवितेचा थाट निव्वळ मराठी वाचकांना भासला असावा. कै. महादेवशास्त्री कोल्हटकर यांचीं फुटकळ इंग्रजी चुटक्यांचीं रूपांतरें किंवा कै. रा. ब. माधवराव कुंटे यांचा 'राजा शिवाजी' या काव्याचा जो उपहास त्या काळीं झाला, तो बव्हंशीं याच कारणामुळें.

या क्रांतीमुळें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठी कवितेमध्यें दोन अगदीं परस्परभिन्न अशीं वळणें उत्पन्न झालीं. एक कविवर्ग असा निर्माण झाला कीं, ज्यानें स्वसंस्कृतीवरील श्रद्धेमुळें प्राचीन संस्कृत कवितेचे गुणविशेष आत्मसात् करून तदनुसार आपल्या कवितेची घडण बनविली. उलट स्वसंस्कृतीच्या थोरवीविषयीं साशंक असलेल्या दुसऱ्या वर्गानें, मराठी कवितेच्या पूर्वपरंपरेकडे अजिबात दुर्लक्ष करून

इंग्रजी पद्धतीवर आपला संसार थाटला. कवितेचीं हीं दोन निरनिराळीं वळणें, विचारांचे हे दोन परस्परभिन्न प्रवाह आजहि मराठी वाङ्मयांत समांतर वाहतांना दृष्टीस पडतात. सुशिक्षितांना प्रिय असलेल्या कोणत्याहि आधुनिक कवीची कविता पाहा. ती प्रणयप्रधान, आत्मपर आणि त्रुटित अशी आढळेल. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास किंवा श्रीधर यांची कविता ज्याप्रमाणें समाजाच्या अग्रभागीं उभ्या असलेल्या ब्राह्मणापासून तों त्याच्या पायदळीं तुडविल्या जाणाऱ्या अंत्यजापर्यंत साऱ्यांच्या काळजाला हात घालते, सर्व उच्चनीच वर्गांच्या हांकेला ओ देते, तें सामर्थ्य, ती भावनांची आणि विचारांची विशालता आधुनिक कवितेंत नाहीं. तिची हांक फक्त इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशा सुशिक्षितांपुरतीच मर्यादित आहे. किंबहुना, त्या वर्गांतल्याहि शेलेप्रभृतींच्या कवितेंत रंगलेल्या आणि प्रणयकेलींच्या कल्पनांत गुंगलेल्या फक्त तरुण–स्वप्नाळू–जीवनांत तिची ती प्रीतीची भाषा उमजते, आवडते. कचेरींत खर्डे घासणाऱ्या कारकुनाच्या, गिरणींत काम करणाऱ्या मजुराच्या, शेतांत नांगर धरणाऱ्या कुळवाडचाच्या, पाण्यांत जाळें फेंकणाऱ्या कोळचाच्या किंवा बाजारांत पाटचा वाहणाऱ्या हमालाच्या कष्टमय जीवनांत तुकारामाला स्थान आहे, केशवसुतांना नाहीं, सगनभाऊची बूज आहे, गोविंदाग्रजाची नाहीं. वस्तुतः भक्ति आणि शृंगार हे दोन रस असे आहेत कीं, ज्यांचें आवाहन अवघ्या मानव जातीच्या मनाला आजहि मोठचा उत्कटतेनें होतें. पण, आधुनिक कवींनीं आळवलेले हे रस मात्र, आज ग्रामोफोनसारख्या सर्वगामी प्रसारकाची मदत त्यांना मिळालेली असतांनादेखील, बहुजनसमाजाच्या हृदयांत भावनांचीं कारंजीं उडवूं शकत नाहींत. याचें कारण असें दिसतें कीं, आधुनिक कवींच्या कवितांतील भावना या जरी व्यक्तिशः त्यांच्यापुरत्या कदाचित् हृदयस्फूर्त आणि प्रामाणिक असल्या, तरी बहुजनसमाजाला त्या ओळखीच्या वाटत नाहींत, विजातीय वाटतात. एरवीं डफावर पडलेली थाप कानांवर येताच ज्यांचें चित्त पोवाडा किंवा लावणी ऐकावयाला आतुर होतें, त्यांनीं ग्रामोफोनमधून येणारे भावगीतांचे सुरेल आलाप केवळ संगीताच्या अपेक्षेनें ऐकावे याचा अर्थ काय ? आधुनिक कवितेंतील सर्वांत मोठी उणीव, किंबहुना वैगुण्य जर कोणतें असेल, तर तें हें कीं, तिच्यांत देश्य असें वातावरण अगदीं कमी आहे; तिच्यांतून व्यक्त होणाऱ्या कल्पना आणि कामना, विचार आणि विकार, संकेत आणि संप्रदाय हीं परभृत असतात, कुठल्या तरी अगदीं परकीय वातावरणांतून उचलून आणलेलीं असतात. कल्पना करा कीं, इंग्लंडांतला एखादा कवि जर संस्कृत किंवा फारशी कवितेपासून स्फूर्ति घेऊन तत्सदृश रचना करूं लागला, तर त्याच्या त्या मुलुखगिरीचें कौतुक जरी त्याच्या कोटींतल्या मूठभर रसिकांनीं केलें, तरी तेथील बहुजनसमाजाला त्यांतलीं तीं कमळें आणि गुलाब किंवा ते चकोर आणि ते बुलबुल काय रिझविणार ? तोच प्रकार आधुनिक मराठी कवितेच्या बाबतींतहि झालेला आहे. आधुनिक कवि समाजसुधारक आहेत आणि देशाभिमानीहि आहेत. पण ज्या समाजाच्या सुधारणेची ते चिंता वाहतात त्याच्या

राहणीची त्यांना जाणीव नाहीं आणि ज्या देशाच्या ऊर्जिताचा ते अभिमान वाहतात तोहि त्यांच्या डोळ्यांपुढें नसतो.

गेल्या पाऊणशें वर्षांत पैदा झालेल्या मराठी कवितेचें समालोचन केलें, तर हें तिचें वैशिष्ट्य म्हणा किंवा वैगुण्य म्हणा, मोठ्या जोरकसपणानें मनावर बिंबतें. प्रत्येक राष्ट्राच्या आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी असा एक काळ येत असतो कीं, ज्या वेळीं तत्त्वज्ञ आणि मुत्सद्दी व कवि आणि संशोधक हे भोंवतालच्या प्रगत राष्ट्रांकडून नवीन कल्पनांची स्फूर्ति घेऊन त्याला आलेलें जाडय आणि जीर्णत्व नष्ट करितात. मानवी आत्म्याप्रमाणें राष्ट्राचा आत्माहि कालांतरानें नवीन शरीर धारण करीत असतो. त्यानें जर अशा रीतीनें शरीरांतर न केलें, तर त्याच्या चैतन्यहीन अंगावर रूढीचीं वारुळें वाढून त्याचा आत्मा गुदमरून जातो व त्याच्या शक्ति गंजून जातात. संस्कृतीची देवघेव, विचारांचा विनिमय हें राष्ट्राच्या प्रगतीचें सर्वांत श्रेष्ठ साधन होय; व हा विनिमय नेहमीं त्यांतील बुद्धिप्रधान वर्गाकडून होत असतो. ऋतुमानानुसार थारेपालट करणारे पक्षी हे ज्याप्रमाणें वनस्पतींच्या बीजक्षेपणाला कारण होतात, त्याप्रमाणें कालमानानुसार तत्त्वशोधन करणारे प्रतिभाशाली ग्रंथकार हे अभिनव कल्पनांच्या प्रसाराला कारण होतात. मात्र हा विनिमय स्वयंस्फूर्त असला, तरच त्यामुळें निरामय अशी प्रगति घडून येते. जेत्यांनीं जितांवर लादलेलें आपल्या भाषेचें आणि वाङ्मयाचें शिक्षण म्हणजे मात्र विनिमय नव्हे; तर तो त्यांचें स्वत्व दडपून टाकून आपलें बौद्धिक वर्चस्व त्यांच्यावर स्थापन करण्याचाच जेत्यांचा एक प्रयत्न होय. इंग्रजी व मराठी भाषा यांचा जो संबंध एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत आला, तो जेता आणि जिता म्हणून; विनिमय करण्याच्या इच्छेनें नव्हे, तर वर्चस्व गाजविण्याचा इच्छेनें. त्याचा परिणाम असा झाला कीं, मराठी भाषेनें केलेल्या इंग्रजीच्या अनुकरणाला उसनवारीचें स्वरूप आलें व शिष्यत्वाला गुलामगिरीची अवकळा आली. हें बौद्धिक दास्य मराठी गद्याला फार काळ जाणवलें नाहीं. कदाचित् असें असेल कीं, गद्य हें स्वभावतःच ओजस्वी म्हणजे पौरुषसंपन्न असल्यामुळें त्याला पारतंत्र्याच्या शृंखला लवकर झुगारून देणें शक्य झालें. परंतु ललितमृदुल अशी कविता-कामिनी मात्र अजूनहि त्या दास्यांतून पुरती मुक्त झालेली दिसत नाहीं. मराठी भाषेचे शिवाजी म्हणून गाजलेले कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचीं मतें आज कोणाला मान्य होतील न होतील. पण, त्यांनीं आपल्या लेखणीच्या सामर्थ्यानें मराठी भाषेला स्वातंत्र्योन्मुख केली, यांत मात्र शंका नाहीं. त्यांच्या मागून गेल्या अर्धशतकांत जे लेखक उदयाला आले, त्यांनीं मराठी भाषेचें केवळ वैभवच वाढविलें असें नव्हे, तर महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या आकांक्षाहि उद्दीपित केल्या. परंतु गद्याकडून कविते-कडे वळलें, तर काय दृष्टीस पडतें? चिपळूणकरांची निबंधमाला निघाल्यानंतर दहा वर्षांनीं आधुनिक कवींचे कुलगुरु म्हणून गणल्या गेलेल्या केशवसुतांनीं काव्य-

लेखनाला प्रारंभ केला. परंतु, निबंधमालेंत जें भाषेचें प्रभुत्व, जी विचारांची स्वतंत्रता आणि जें देशाभिमानाचें ओज दिसून येतें, त्यांचा आढळ केशवसुतांच्या कवितेंत होतो काय? चिपळूणकरांकडून केशवसुतांकडे वळणें म्हणजे सामर्थ्याकडून क्षीणतेकडे आणि विजिगीषेकडून विषण्णतेकडे वळणें होय. चिपळूणकरांच्या प्रत्येक अक्षरा-अक्षरांतून प्रभुत्वाची आकांक्षा उसळतांना दृष्टीस पडते, तर केशवसुतांच्या प्रत्येक ओळीओळींतून विषादाचा सूर केंकाटतांना कानांवर येतो. चिपळूणकरांनीं ज्या वयांत 'संस्कृत कविपंचक' लिहून आपल्या प्राचीन वाङ्मयाची श्रेष्ठता लोकांच्या निदर्शनाला आणून दिली, त्या वयांत केशवसुत प्रियेचें ध्यान आळवीत होते; त्यांनीं ज्या वयांत निबंधमाला काढून मिशनरींच्या दुर्मतदलनाला प्रारंभ केला, त्या वयांत यांचा धर्मांतर करण्याचा विचार चालला होता; व त्यांनीं ज्या वयांत 'केसरी' सुरू करून लोक-जागृतीचें कार्य शिरावर घेतलें, त्या वयांत हे हरपलें श्रेय हुडकण्यांत गर्क झाले होते. ज्याच्या उत्तुंग शाखा अनेक पक्षिकुलांचें आश्रयस्थान होऊन बसल्या आहेत व ज्याच्या असंख्य पारंब्यांतून अनेक नवे तरू उद्भूत झाले आहेत, असा प्रचंड वटवृक्ष आणि कुंडींत वाढलेला खुरटा गुलाबाचा वेल यांत जो फरक, तोच चिपळूणकर आणि केशव-सुत यांच्यामध्यें.

केशवसुतांच्यामधील उणेपणा दाखविण्यासाठीं ही तुलना केलेली नाहीं; तर जे दोन पुरुष मराठी वाङ्मयांतील नव्या युगांचे प्रवर्तक म्हणून गणले जातात त्यांच्या मनोवृत्तींतील फरक तेवढाच येथें स्पष्ट केला आहे. कोणी कदाचित् असें म्हणेल कीं, इंग्रजी कवि ग्रे याच्या उक्तीप्रमाणें दारिद्र्यामुळें केशवसुतांची प्रतिभाशक्ति कोळपल्या-सारखी झाली. पण तें पटण्यासारखें नाहीं. केशवसुतांना ज्यांच्यापासून सामाजिक कल्पनांची स्फूर्ति झाली असल्याचें उघड उघड दिसतें, त्या आगरकरांचेंहि सारें आयुष्य खडतर दारिद्र्यांत गेलें होतें. तेव्हां हा फरक मनोवृत्तींतील आहे, परिस्थिति-जन्य नव्हे. वस्तुतः चिपळूणकर, आगरकर व टिळक यांच्या स्वार्थत्यागाचें आणि देशसेवेचें उदाहरण ज्या पिढीपुढें होतें, व ज्या पिढींतून कर्वे, गोखले, आपटे, राजवाडे, परांजपे यांच्यासारखे कर्तबगार आणि त्यागी पुरुष उदयाला आले, त्या पिढीपैकींच केशवसुत हेहि एक होते. पण आपल्या या समकालीनांच्या मानानें केशवसुतांनीं प्रकट केलेली मनाची संस्कारक्षमता किंवा बुद्धीची आक्रमकशक्ति एकंदरींत सामान्य वाटते. कवितांच्या संख्येवरून कवीची योग्यता ठरविणें हें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं, ही गोष्ट खरी. पण, संख्येच्या बाबीकडे जरी दुर्लक्ष केलें, तरी विचारांच्या मर्यादा वाढ-विणाऱ्या कल्पनेच्या भराऱ्या आणि वाङ्मयाचें सौंदर्य वाढविणारें भाषेचें सौष्ठव हे गुण तरी विशेष प्रमाणांत कवितेंत असले पाहिजेत कीं नाहीं? ग्रे याची काव्यरचना इतर इंग्रजी कवींच्या मानानें खरोखरी अत्यल्पच ठरेल. पण पांडित्य, प्रतिभा आणि प्रसाधन हे गुण तींत इतक्या समरसतेनें व्यक्त झालेले आहेत कीं, त्याची गणना इंग्लंडां-

तील श्रेष्ठ कवींच्या प्रणालिकेंत केली जाते. तसें केशवसुतांविषयीं खचित म्हणतां येणार नाहीं. त्यांच्या ठिकाणीं पांडित्याचा लवलेशहि नव्हता. 'गोल्डन ट्रेझरीं'तील कवितांतल्या कल्पना त्यांच्या बऱ्याच गीतांतून आणि सुनीतांतून प्रतिध्वनित झालेल्या आहेत; व त्यावरून असें दिसतें कीं, त्या पुस्तकापलिकडे त्यांच्या इंग्रजी कवितेच्या व्यासंगाची मजल फारशी गेलेली नव्हती. त्यांच्या साऱ्या कवितांचें बारकाईनें पृथक्करण केलें असतां, कवित्वाच्या अहंपणामुळें स्वतःविषयीं भलत्याच अचाट समजुती करून घेऊन फशीं पडलेला, बुद्धीच्या कोतेपणामुळें नवीन कल्पनांचें आकलन नीटपणें करूं न शकलेला, मनाच्या हळवेपणामुळें संसाराचा उबग येऊन जगावर कातावलेला व व्यासंगाच्या अभावामुळें आपल्या हृदयांतील खळबळ कशी तरी बोलून टाकण्यासाठीं धडपडत असलेला असा एक सुधारणावादी पण प्रणयपीडित आणि गलितोत्साह कवि डोळ्यांपुढें उभा राहतो. अशा या कृशप्रतिभ कवीच्या हातून युगप्रवर्तनाचें महत्कार्य घडून यावें, याचा कोणाला अचंबा वाटणार नाहीं? या चमत्काराचें मुख्य कारण हें कीं, इंग्रजी शिक्षणामुळें नवीन पिढींत उत्पन्न झालेल्या तारुण्यसहज वासना आणि भावना, शेक्सपियरचीं सुनीतें व शेलेचीं भावगीतें यांच्यापासून आविष्काराची प्रेरणा घेऊन, केशवसुतांच्या कवितेंत प्रथम आविर्भूत झाल्या. बजाबा रामचंद्र प्रधान यांच्यापासून तों विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्यापर्यंत अव्वल इंग्रजी अमदानींतील अनेक सुशिक्षित कवींनीं इंग्रजी काव्यांतील प्रणयरम्यता (Romance) मराठींत आणण्याचा प्रयत्न केला. पण तो बव्हंशीं भाषांतराच्या रूपानें. केशवसुतांचा विशेष हा कीं, त्यांनीं स्वतःच्या यौवनसुलभ भावनांचा मेळ आपल्या वाचनांत आलेल्या इंग्रजी प्रणयगीतांतील भावनांशीं, समजला व साधला तसा घालून, वस्तुतः परभृतच पण उत्कट आत्मपरतेमुळें स्वतंत्र भासेल अशी प्रणयकविता निर्माण केली. आणखीहि एका कारणामुळें त्यांच्या कवितेला हृदयस्पर्शी असें नावीन्य आलें. तें असें कीं, आगरकर–आपटे यांच्या वाङ्मयांतून विशेषतः स्त्रीजातीच्या समानतेचा आणि स्वातंत्र्याचा जो डिंडिम सारखा दुमदुमत होता, त्याचे प्रोत्साहक पडसाद त्यांनीं आपल्या 'तुतारी'-तून उमटविले. त्यामुळें, त्यांच्या कवितेला प्रणयाची आणि समतावादाची अशी दुहेरी नवलाई लाभून, इंग्रजी कवितेंत रमणाऱ्या व तत्सदृश असें कांहीं आपल्या काव्यांत आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आसुसलेल्या त्या वेळच्या युवकांना ती मोठी अपूर्व आणि स्फूर्तिदायक वाटली.

अर्थात्, केशवसुतांच्या कवितेनें जें नवीन युग महाराष्ट्रांत प्रवर्तित केलें, तें प्रणयप्रधान म्हणजे स्त्रैण होतें. प्रणय हा विकार मनुष्यमात्राला अत्यंत स्वाभाविक असून, कांहीं एका मर्यादेपर्यंत त्याची उत्कटता खचित दूषणीय नाहीं. पण, मानवी जीवनांत प्रणयाला जेव्हां वाजवीपेक्षां फाजील महत्त्व दिलें जातें, किंबहुना तो विकार हा मनुष्याच्या जेव्हां सर्व चेष्टितांचा प्रेरक आणि स्थायीभाव होऊन बसतो, तेव्हां

त्याचें पर्यवसान एक प्रकारच्या मनोविकृतींत म्हणजे स्त्रैणत्वांत होतें. केशवसुतांच्या कवितेंतील प्रणयोद्रेकाचें स्वरूप या जातीचें आहे. लालित्याचा अभाव आणि स्वातंत्र्याचा अभिनिवेश हे त्यांच्या कवितेचे दोन विशेष लक्षांत घेतले असतां त्यांच्या युगकर्तृत्वावर केलेला स्त्रैणपणाचा हा आरोप विसंगत वाटेल. पण त्यांच्या कवितेच्या गुणधर्मांचें पृथक्करण केल्यावर असें स्पष्ट दिसून येतें कीं, अंशतः पौरुषयुक्त आणि प्रोत्साहक भासणाऱ्या त्यांच्या कवितेनें निर्माण केलेलें युग मात्र मानसिक दौर्बल्याच्या आणि विकृतीच्या परिपोषाला कारण झालें. स्त्री, निसर्ग आणि स्वदेश हे तीन विषय त्यांच्या कवितेंत प्रामुख्यानें आलेले आहेत. त्यांपैकीं त्यांच्या स्त्रीविषयक कवितांत दोन प्रकार आढळतात; त्यांतील कांहीं कविता दयितेला तर कांहीं कवितेला उद्देशून लिहिलेल्य आहेत. जगांतील बहुतेक कवींना रमणीच्या चिंतनापासून रमणीयतेच्या नवनवीन उन्मेषांची प्रतीति होऊन काव्यरचनेची स्फूर्ति मिळाल्याचें अनुभवाला येतें; व म्हणूनच जगन्नाथ पंडितांनींहि आपल्या करुण विलासांत 'चेतोहरा सुकविता भविता कथं नः ।' असे उद्‌गार काढलेले दृष्टीस पडतात. खुद्द केशवसुतांनींहि आपल्या आरंभींच्या एका कवितेंत वल्लभेला 'अपरकवितादैवत' म्हटलेलें आहे. पण तारुण्याचा पहिला बहर ओसरल्यावर तें दैवत मागें पडून त्यांच्या अंतःकरणांतली वनितेची जागा कवितेनें बळकावली, व एखाद्या प्रणयी युवकानें आपल्या किंचित् निर्दय मनाच्या लहरी दयितेवर करुणपूर्ण प्रेमगीतें लिहावीं तशा तऱ्हेनें केशवसुतांनीं नंतर कवितेला आळविलें –आर्जविलें आहे. कवितेवर चेतनागुणाचा आरोप करून एखाद्या कामार्तप्रमाणें तिचें प्रणयाराधन करीत सुटणें, हा तरी एक मानसिक विकलतेचा किंवा विकृतीचा प्रकारच म्हणावा लागेल. संसारांतील सुखाविषयीं उपरति उत्पन्न झाल्यामुळेंच केशवसुतांना ही कवितारति आठवली असावी. ज्या प्रेमाचा वर्षाव पुरुषानें स्त्रीवर करावयाचा असतो, तें प्रेम त्यानें कवितेवर करीत सुटावें, याचा अर्थच हा कीं, त्याच्या वैवाहिक जीवनांत कांहीं तरी न्यूनता उत्पन्न झालेली असून, ती तो अशा रीतीनें भरून काढीत आहे. कवितेवर त्यांनीं केलेलीं निरनिराळीं रूपकें पाहून आणखी अशीहि एक शंका मनांत डोकावून जाते कीं, शेलेनें वर्णिलेल्या बौद्धिक सौंदर्याच्या अधिदेवतेलाच काव्याची स्फूर्तिदात्री आणि मांगल्याचें निधान मानून त्यांनीं आपल्या मनाच्या देव्हाऱ्यांत तिची स्थापना केली असावी; व तिचा साक्षात्कार वारंवार न घडल्यामुळें त्यांना जीवितांतलें श्रेय हरपल्यासारखें होऊन ते भ्रांतचित्त झाले असावे. वर्डस्वर्थ आणि शेले यांच्या दिव्यत्वाविषयींच्या आसक्तीचा आणि उत्कंठेचा संकर त्यांच्या तात्त्विक आणि प्रणयविषयक कवितांतून झालेला आहे. जगांतील इतर सर्व लाभांना आपल्या स्वभाववैचित्र्यामुळें पारख्या झालेल्या या कवीनें कविता हेंच आपलें जीवन-सर्वस्व मानल्याकारणानें, प्रेमी तरुणाला आपल्या प्रियतमेविषयीं वाटणाऱ्या एकांतिक गाढ अनुरागांत ज्या प्रकारची उत्कटता असते, ती त्यांच्या या अमूर्त ध्येयमूर्तीला उद्देशून लिहिलेल्या कवितांतून पाहावयाला मिळते. प्रेमाचा किंवा ध्येयाचा विषय

हा जर अशरीरी असेल, तर त्याच्या चिंतनामुळें कल्पनाशक्तीला अमर्याद चालना मिळून, माणसाच्या त्याच्याबद्दलच्या विचारांना आणि भावनांना एक प्रकारची चमत्कृतिजनक विशालता आपोआपच येते. केशवसुतांच्या प्रणयपर गीतांना आणि सुनीतांना जी इतकी उदात्तता आणि आकर्षकता आली आहे, ती याच कारणामुळें. पण, त्या आकर्षकतेचें बीज मनाच्या विकलतेंत–दुबळेपणांत आहे, हें विसरून चालणार नाहीं. या स्त्रीविषयक ध्येयीभूत प्रेमाला त्यांच्या कवितेंत सर्वंकष महत्त्व प्राप्त झालेलें असून, केव्हां त्याच्या प्रभावामुळें भावनांना येणारा बहर तर केव्हां त्याच्या अभावामुळें मनाची होणारी तगमग त्यांनीं मोठ्या उत्कटतेनें व्यक्त केली आहे. " प्रीती आणिक तूं– शिवाय न सुचे कांहीं मना माझिया " हे त्यांचे उद्‌गार त्यांच्या या मनःस्थितीचे निदर्शक आहेत. स्त्री-प्रेमाच्या अप्राप्तीनें जेव्हां जेव्हां त्यांचें मन रंजीस येतें, तेव्हां तेव्हां त्यांना वैराग्याचे झटके येतात व तत्त्वचिंतनाची स्फूर्ति होते. विरहामुळें होणारा मनस्ताप चुकविण्यासाठीं ते निसर्गाकडे धाव घेतात; सुखी, संयतचित्त वर्डस्वर्थप्रमाणें जगदात्म्याचा साक्षात्कार निसर्गाच्या भव्य रूपादर्शांत पाहण्यासाठीं नव्हे. " पुष्पपतंग-स्थिति ही कोठुनि आम्हांला मिळणें ? " हा त्यांनीं फुलपांखरूं बागडतांना पाहून केलेला प्रश्न अत्यंत सूचक आहे. " भिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं " अशी त्यांची जगाविषयीं भावना झालेली होती. या भावनेच्या, या निराशेच्या पोटीं त्यांचें हरपल्या श्रेयाचें तत्त्वज्ञान जन्मलेलें आहे. 'तुतारी'सारखी ओजोगुणानें रसरसलेली कविता त्यांनीं एखादीच रचली; व ती अर्थातच मनाच्या अपवादात्मक स्थितींत. ते देशाभिमानी होते, यांत शंका नाहीं. पण दुरंत, प्रमाथी प्रणय-विकारानें त्यांचें जीवित आणि काव्य इतकें ग्रासून टाकलेलें होतें कीं, खग्रास ग्रहणाच्या वेळीं चंद्राच्या सुंदर बिंबाच्या ठिकाणीं जसें त्याचें रक्तकश्मल वर्तुळ तेवढें दिसावें तशी त्यांच्या देशाभिमानाची अवस्था झाली आहे. स्वातंत्र्य आणि समता यांचा पुरस्कार त्यांनीं केला आहे खरा; परंतु तो बव्हंशीं स्त्री-विशिष्ट आहे. 'पण लक्षांत कोण घेतो ?'च्या कर्त्याचा गौरव करतांना " भूपृष्ठस्थित आद्य दैवत " असा त्यांनीं स्त्रीजातीचा जो उल्लेख केला आहे, तो कांहीं केवळ औपचारिक दाक्षिण्याचा द्योतक नसून, त्यांच्या स्वतःच्या मनाची स्त्रीपरताच त्यांत प्रतिध्वनित झालेली आहे. शेक्सपिअरपासून स्विनबर्नपर्यंत इंग्लंडांत होऊन गेलेल्या थोर कवींच्या काव्यांतून स्वकीयांच्या आणि परकीयांच्याहि राजकीय स्वातंत्र्याबद्दल जी तळमळ आविर्भूत झाली आहे, तिचा अस्पष्टसुद्धां पडसाद इंग्रजी काव्यांत रमलेल्या केशवसुतांच्या कवितांतून ऐकूं येत नाहीं. वस्तुतः, त्यांनीं ज्या वेळीं काव्यलेखनाला प्रारंभ केला, तो काळ राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा असून, राजकारणाच्या काळवंडलेल्या क्षितिजावर प्रक्षोभक ध्येयांची उषःप्रभा नुकतीच पसरूं लागली होती. पण त्यांच्या 'तुतारीं'तून सुद्धां तिची ललकारी झडलेली नाहीं. उलट नैराश्याच्या घुबडाचे घूत्कारच त्यांच्या कवितेंतून जास्त कानांवर येतात.

त्यांच्या या मनोवैकल्याचा ठसा त्यांनीं प्रवर्तिलेल्या युगावर स्पष्ट उमटला आहे. त्यांच्या समकालीन कवींवर त्यांच्या नावीन्याची छाप पडली असली, तरी ती एकंदरींत फार थोडी. त्यांच्या भोंवतालच्या कवींत विचारांच्या दृष्टीनें ज्यांना अंशतः तरी त्यांचे सवर्गीय म्हणतां येईल, असे कवि टिळक, विनायक आणि दत्त हे तिघेच दिसतात. त्यांच्यापैकीं टिळक आणि विनायक यांचें केशवसुतांशीं कांहीं बाबतींत साधर्म्य असलें, तरी ते दोघे परस्परांपासून मात्र सर्वथैव भिन्न होते. टिळक धर्मांतर करून चुकले होते, तर विनायकांना स्वधर्माचा प्रखर अभिमान होता. टिळकांच्या कवितेंत पूर्वेतिहासाचा उल्लेख चुकूनहि केलेला आढळणार नाहीं, तर 'पूर्वदिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काळ' ही भावना उद्दीपित करण्यांत विनायकांनीं आपलें प्रतिभासर्वस्व वेंचलें. टिळकांनीं ब्रिटॅनियेचा जयजयकार मोठ्या भक्तिभावानें केला, तर महाराष्ट्रलक्ष्मीला पारतंत्र्यामुळें आलेलें दैन्य पाहून विनायकांनीं दुःखाश्रु ढाळले. टिळकांची प्रतिभा सृष्टि आणि संसार यांच्या स्वरसंगमांत रमलेली होती, तर विनायकांनीं बव्हंशीं स्वदेशाच्या इतिहासापासून स्फूर्ति घेतलेली आहे. टिळकांनीं स्त्रीला महारथि म्हणून गौरवून "नरनारी जगि बरोबरी हीं चढती, कोसळती" हें टेनिसनचें तत्त्व प्रतिपादिलें आहे, तर विनायकांनीं वीरमणींचे पोवाडे जरी हिरीरीनें गाइलेले असले तरी स्त्री ही भोग्य वस्तु आहे ही कल्पना त्यांच्या मनांत बद्धमूल झालेली होती. परंतु अशा रीतीनें परस्परांना असमशील अशा या दोन कवींपैकीं टिळक हे केशवसुतांना निसर्ग-प्रेमाच्या बाबतींत व विनायक हे स्वदेश-प्रेमाच्या बाबतींत जवळ होते. केशवसुतांच्या वाणींतील ओज आणि आवेश हे गुण जर त्यांच्या समकालीनांतील अन्य कोणत्या कवीच्या वाणींत प्रत्ययाला येत असतील, तर ते फक्त विनायकांच्या. स्वदेशाची आणि स्वजनांची अवनति पाहून होणारी मनाची तळमळ हा या दोघां कवींचा समानधर्म होय. पण या तळमळीचें स्वरूप व ती व्यक्त करण्याची पद्धति यांत मात्र कोणत्याच प्रकारचें सादृश्य नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. केशवसुत देशाभिमानी असले, तरी त्यांच्या त्या अभिमानाला उज्ज्वल पूर्वेतिहासापासून प्रेरणा मिळाली होती, असें वाटत नाहीं. किंबहुना, त्यांच्या कवितेची एकंदर अंतर्बाह्य घडण ध्यानांत घेतली असतां, त्यांची प्रतिभा हा इंग्रजी काव्याचा प्रसव आहे, असेंच म्हणावें लागेल. त्यांनीं 'दोन बाजी' म्हणून जी ऐतिहासिक म्हणतां येईल अशी एकुलती एक कविता लिहिली आहे, तिचें मूळ फ्रेंच कादंबरीकार 'व्हिक्टर ह्यूगो' याच्या दोन नेपोलियनां-वरील कवितेंत सांपडतें. उलट 'यापुढें', 'महाराष्ट्रलक्ष्मी', 'हतभागिनी', 'शिव-राजदर्शन' वगैरे विनायकांच्या कविता दुःखदग्ध अंतःकरणांतून जणूं कांही जळतच बाहेर पडलेल्या आहेत. स्वधर्म किंवा स्वदेश यांच्याविषयीं त्यांनीं एकहि उणा शब्द काढलेला दाखवितां येणार नाहीं. उलट "भुललों पूर्ण विसरलों सारें। अंगीं भरलें नूतन वारें। मूर्खत्वाचे तुटती तारे" अशी भोंवतालीं चाललेल्या परिवर्तनाविषयींची त्यांची भावना होती. परंतु केशवसुतांच्या 'तुतारी'चा सारा भर "जुनें जाउं द्या

मरणालागुनि" या कल्पनेवर आहे. विनायकांची स्वदेशभक्ति इतकी जाज्वल्य होती कीं, त्यांचें सारें आयुष्य जरी बाह्यतः इष्कबाजीच्या रंगढंगांत जात होतें, तरी आपल्या हतभाग्य मातृभूमीचें दैन्य त्यांच्या डोळ्यांपुढून कधींच हललें नाहीं; व समुद्राच्या अंतरंगांतून वाहणाऱ्या उष्ण प्रवाहांनीं जसें त्याचें पाणी हिवाळ्यांतहि गोठूं देऊं नये, याप्रमाणें मनाच्या अत्यंत विकल स्थितींतहि त्यांच्या त्या देशभक्तीची तीव्रता अविचलित राहिली. उलट, तारुण्यांतील उसळत्या रक्ताच्या काळांत "आम्हां डोळे नसति वघण्या पारतंत्र्यामुळें हो" असे उद्‌गार जरी केशवसुतांनीं वेलींना व पक्ष्यांना उद्देशून काढलेले असले, तरी ही भावना कालांतरानें ओसरत जाऊन, शेवटच्या बारा वर्षांत "वेडा पीरच जाहलों जिवलगे आहें वियोगामुळें" या स्थितीला ते येऊन पोंचले. अर्थात् केशवसुत आणि विनायक हे समकालीन असले, तरी विनायकांच्या स्फूर्तीची ज्योत ही इतिहासप्रदीपावर पेटलेली होती, केशवसुतांच्या ठिणगीवर नव्हे. विनायकांप्रमाणेंच दत्तांचीहि कविता स्वतंत्र स्फूर्तीची दिसते. नाहीं म्हणावयाला, कवितेला प्रणयिनी कल्पून तिचें आराधन करण्याच्या केशवसुतांच्या विशिष्ट मनोविकृतीची छटा त्यांच्या 'बघसी अंत किती राजसे" या गीतांत काय आढळते, तेवढीच. त्या मानानें टिळक हे केशवसुतांपेक्षां चार वर्षांनीं वडील व अतिशय व्युत्पन्न असतांना सुद्धां त्यांच्यावर केशवसुतांची छाप बरीच पडलेली आहे. दोघेहि सुधारणावादी आणि निसर्गोपासक. टिळकांच्या सुधारणावादाचें पर्यवसान धर्मांतरांत झालें व केशवसुत स्वधर्मांत राहिले, पण त्यांचा कल निरीश्वरतेकडे झुकला. टिळकांचें 'रणशिंग' हा केशवसुतांच्या 'तुतारी' चा उघड उघड अनुध्वनि होय. टिळकांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि केशवसुतांच्याइतकी सूक्ष्म नसली, तरी त्यांची निसर्गोपासना अधिक प्रांजळ आणि प्रेमळ वाटते; व तत्त्वोपदेशाच्या हव्यासामुळें तिला थोडी कृत्रिमता आली असली, तरी केशवसुतांच्या नैराश्याची छटा तींत यत्किंचितहि उमटलेली नसून तिचें स्वरूप आनंदनिर्भर आहे. परंतु टिळकांच्या कवितेला जरी कोणत्याहि प्रकारच्या विकृतीचा डाग लागलेला नसला, तरी केशवसुतांप्रमाणें त्यांच्याहि प्रतिभेवर इंग्रजीचा पगडा जास्त पडलेला आहे.

टिळक हे केशवसुतांप्रमाणें क्रांतीचे प्रवर्तक नाहींत, तर संधिकालाचे प्रतिनिधि आहेत. त्यांचें धर्मांतर हें सुद्धां या संधिकालाचें द्योतक आहे असें म्हटलें तरी चालेल. व्युत्पत्ति आणि नावीन्यप्रियता या दोहोंचा मोठा विचित्र संगम त्यांच्या कवितेंत झालेला असून, ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यावरहि ज्याप्रमाणें त्यांनीं धर्मेतर सर्व बाबतींत आपलें हिंदुत्व कायम ठेविलें, त्याप्रमाणें केशवसुतांशीं समरस होऊनहि त्यांनीं काव्यरचनेची जुनीच प्रथा बव्हंशीं अनुसरिली. 'अभंगांजलि' किंवा 'ख्रिस्तायन' तर राहोच, पण त्यांची प्रेमकविता वाचतांना देखील आपल्याला शेलेच्या वैणिकांची कोठें चुकूनसुद्धां आठवण होत नाहीं. म्हणूनच त्यांना संधिकालाचे प्रति-

निधि म्हणावयाचे. केशवसुत ज्या वेळीं सुनीतें आणि भावगीतें लिहून नव्या युगाची ललकारणी करीत होते, त्या काळांतहि पंत-पंडितांच्या रचनेवर आपल्या विदग्धतेनें कांहीं बाबतींत तरी मात करणारी अभिजात कविता उदंड निर्माण होत होती. चिपळणकर, लेले, पारखी, कानिटकर, आगाशे, कुरुंदवाडकर, ओक, चिंतामणि पेठकर किंवा खरे प्रभृति केशवसुतांच्या पूर्वीच्या पिढींतील पंडित कवि सोडले, तरी मोगरे, लेंभे, भिडे प्रभृति त्यांचे समकालीन म्हणतां येतील असे, अथवा चंद्रशेखर, आनंदीरमण, मुजुमदार, माधवानुज प्रभृति त्यांच्या थोडे नंतरच्या काळांतील कवि पंडितवर्गांत मोडणारे असून, त्यांच्या रचनेवर इंग्रजीपेक्षां संस्कृत कवितेचीच छाप विशेष आहे. या कवींचा इंग्रजी वाङ्मयाचा व्यासंग केशवसुतांपेक्षां कमी होता, असें नाही; उलट यांपैकीं बहुतेक कवि बहुश्रुत आणि इंग्रजी काव्याचे मर्मज्ञ असून, त्यांच्या या विद्वत्तेची प्रतीति त्यांच्या कवितेंत पुष्कळ येते. किंबहुना, त्यांची कविता ही स्फूर्तीच्या क्षणिक आवेगांतून उत्स्फूर्त झालेली नसून, विद्वत्ता आणि परिश्रम यांच्या पोटीं जन्मलेली आहे. केशवसुतांनीं ज्या वेळीं काव्यप्रदेशांत बंडाची धामधूम उडवून दिली होती, त्या वेळीं या कवींचें अभिजात काव्यलेखन संथपणानें चाललें होतें. केशवसुत आणि हे त्यांचे समकालीन कवि यांच्या कवितेंत अशा तऱ्हेचा विलक्षण फरक पडावा, याला कारण काय सांगतां येईल? इंग्रजी वाङ्मयाच्या व्यासंगाचा आणि समाजांत चाललेल्या घडामोडींचा परिणाम या इतर कवींच्या मनावर न झाल्यामुळें त्यांनीं अशा प्रकारची कविता लिहिली असें म्हटलें, तर तें न्यायाचें होणार नाहीं. कारण, त्यांच्यापैकीं कांहींच्या कवितेचें बहिरंग जरी जुनें असलें, तरी विचारांचें नावीन्य, सुधारणावादित्व आणि देशाभिमान हे गुण तिच्यांत विपुल आढळतात. किंबहुना, सभोंवतीं प्रक्षोभक चळवळींचें वादळ घोंघावत असतां केशवसुत हे मात्र, पानिपतावरील संहाराबद्दल डोळ्यांतून एक टिपूसहि न काढतां आर्याभारत रचणाऱ्या मोरोपंतांप्रमाणें, 'म्हातारी' वर क्लिष्ट क्लृप्त्या लढविण्यांत दंग झाले होते. मग त्यांच्या व इतर समकालीन कवींच्या कृतींत हा फरक कां पडला? याचें कारण असें दिसतें कीं, ते कवि स्थितप्रज्ञ तर केशवसुत हे भ्रांतचित्त होते. केशवसुतांनीं आपल्या ओक्याच्या भ्रमणाचा जो उल्लेख केला आहे, तो वाच्यार्थानें घेतला तरीहि तें योग्यच होईल. विशिष्ट प्रकारच्या मादक वाङ्मयाच्या सतत सेवनानें त्यांच्या बुद्धीला तरलता आणि मनाला विकलता येऊन त्यांच्या कवितेला लोकविलक्षण असें स्वरूप प्राप्त झालें. त्या स्वरूपांत निरामयतेचा भाग थोडा, विकृतीचाच जास्त आहे. बायरन, शेले, कीट्स् प्रभृतींची प्रणयमदिर कविता वाचून तत्कालीन तरुण पिढींत ज्या भावना आणि वासना निर्माण झाल्या, त्यांच्या विचारांत आणि वृत्तींत जी उत्कंठा आणि अतृप्तता उत्पन्न झाली, तिला केशवसुतांच्या कवितेच्या रूपानें वाचा फुटली. त्यांनीं घडवून आणलेल्या क्रांतीचें नावीन्य या गोष्टींत आहे; व त्या दृष्टीनें त्यांना तत्कालीन तरुण पिढीचे प्रतिनिधि, त्या काळाचे उद्‌गाते म्हणतां येईल. त्याची साक्ष हीच कीं,

त्या वेळच्या प्रतिष्ठित कवींनीं किंवा रसिकांनीं जरी त्यांच्या कवित्वाची बूज फारशी केली नाहीं, तरी त्यांच्यापेक्षां सात आठ वर्षांनीं लहान असलेल्या तांबे, रहाळकर, देवधर प्रभृति उदयोन्मुख तरुण मात्र त्यांच्या नावीन्यानें मोहित झाले. हें नावीन्य टिळकांच्या कवितेंत असलें, तरी तींत केशवसुतांच्या कवितेंतील नावीन्यांतला उच्छृंखलपणा– उत्तेजकता नाहीं. उलट टिळकांच्या कवितेचें वळण प्रायः जुनेंच राहिल्यामुळें धर्मांतर करूनहि त्यांना लोकप्रियता मिळवितां आणि टिकवितां आली. आधुनिक कवितेंतील जुन्या नव्या प्रवाहांच्या मीलनरेषेवर ते उभे आहेत. मराठी काव्यवाङ्मयांत हीं जीं दोन भिन्न वळणें, दोन प्रवाह समान्तर वाहतांना दृष्टीस पडतात, त्याचें कारण काय ? पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गानें समाजांतील मूठभर सुशिक्षितांच्या विचारांत केवढेंहि परिवर्तन घडून आलेलें असलें, तरी बहुजनसमाज हा मात्र अजूनहि धार्मिक आणि वेदांतप्रियच राहिलेला आहे. शेषाच्या टाळूला जाऊन भिडणाऱ्या बलरामाच्या नांगरासारखा बोल्शेव्हिकांचा उत्पाती साम्यवादी बहुजनसमाजाच्या पंडित, चिवट मनोभूमींत खोलवर घुसून तिची उलथापालथ जेव्हां कधीं करील तेव्हां करो. आज तरी जुनाट धार्मिक कल्पना आणि रूढी तींत दृढमूल होऊन बसलेल्या आहेत. भारतीय मनावरील हें आध्यात्मिक कल्पनांचें अधिराज्य इतकें विलक्षण आहे कीं, भौतिक पाश्चात्य शिक्षणाचे संस्कार गेलीं शंभर वर्षें त्यांच्यावर सतत होत असतांना देखील वेदांताच्या पकडींतून तें सुटूं शकले नाहीं. इतकेंच नव्हे, तर हा अध्यात्मवाद आज बदललेल्या काळाला शोभेल असें नवें आकर्षक रूप धारण करून कवितेवर पुन्हां वर्चस्व गाजवावयाला पाहत आहे. आधुनिक मराठी कवितेंत हे जे दोन प्रवाह आरंभापासून उत्पन्न झाले, ते या अध्यात्मवादाच्या प्राबल्यामुळें, स्वसंस्कृतीच्या श्रेष्ठतेवरील श्रद्धेमुळें. केशवसुतांना अध्यात्माची सारी परिभाषा परिचित होती, ही गोष्ट खरी. पण त्यांच्या मनाचा कल अज्ञेयाकडे झुकल्यामुळें तज्जन्य गूढगुंजनाच्या विरळ छटांशिवाय त्यांच्या कवितेंत विचारांचें जुनें वळण असें कोणतेंच शिल्लक उरलें नाहीं; व ईश्वराची जागा दयिता आणि सृष्टि यांना मिळून, भक्तीची जागा प्रणयानें बळकावली. त्यामुळें त्यांची कविता जुन्या व नव्या इतर साऱ्या मराठी कवितेहून निराळी वाटते. परंतु त्यांचे समकालीन अन्य कवि हे जरी त्यांच्यापेक्षां व्यासंगी आणि बहुश्रुत होते, तरी त्यांच्या मनावर जुन्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कल्पनांचा पगडा कायमच होता. त्यामुळें प्राचीन भारतीय संस्कृतीचे केवळ प्रसवच अशा चंद्रशेखरांपासून तों स्वधर्माचा त्याग केलेल्या टिळकांपर्यंत त्यांच्या साऱ्या समकालीनांची कविता ही थोड्या फार प्रमाणांत जुन्या वळणाची झाली.

(अर्वाचीन मराठी साहित्य : १९२५;
'गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता'
ग. त्र्यं. माडखोलकर. पृ. क्र. ४ ते १८)

१२

मराठी काव्याची उत्क्रांति व केशवसुत

लेखक : बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

१ 'क्रांति' व 'उत्क्रांति' या दोन शब्दांच्या अर्थामध्यें मोठी तफावत आहे. 'क्रांति' शब्दानें, पूर्ववस्तुस्थितीचा समूळ विध्वंस व नवीन वस्तुस्थितीचा अपूर्व उदय, असा बोध होतो. परंतु उत्क्रांति शब्द पूर्ववस्तूचें वाढीमुळें अगर नवीन वळणामुळें घडून आलेलें स्थित्यंतर किंवा परिणत स्वरूप दर्शवितो. बी रुजून रोपटें उगवणें, तें वाढून त्याचें झाड बनणें, व त्या झाडाला फांद्या फुटून त्याचा विस्तार होणें; ही सर्व परंपरा उत्क्रांतिस्वरूपाची आहे. पण या उत्क्रांतिक्रियेनें वाढलेलें झाड तोडून, त्याचें जळाऊ किंवा इमारती लांकूड बनविलें, म्हणजे मात्र खरी क्रांति घडून आली. एकंदरींत पूर्वींचा पाया कायम राहून, त्यावरच नवीन कसबाचें, वळणाचें, किंवा थाटाचें, वाढीव काम झाल्यामुळें जें रूपांतर फलित होतें, तें उत्क्रांति होय. कोणत्याहि जिवंत राष्ट्राच्या वाङ्मयांत क्रांति होऊंच शकत नाहीं. राजकीय, सामाजिक, किंवा औद्योगिक उलाढालींनीं पूर्वीच्या संस्था, संप्रदाय, चालीरीती, वगैरेंचा लोप होतो, परंतु अशा प्रकारच्या उलाढालीनें पूर्वकालीन वाङ्मय अज्जी नष्ट होत नाहीं. शिवाय, कोणत्याही काळचे वाङ्मयसेवक घेतले, तरी त्यांचा पूर्वकालीन वाङ्मयाशीं परिचय असतोच असतो, आणि त्या वाङ्मयाचा त्यांच्यावर संस्कार झाल्यावांचून राहात नाहीं. तशांत, काव्यवाङ्मयाचा व्यवहार विशेषतः मनोभावनांशीं व अंतःसंवेदनांशीं असल्याकारणानें, व मानवी मनाचें मूलभूत स्वरूप सर्व काळीं सामान्यतः सारखें राहात असल्यामुळें, नवीन कवींना जुन्या वाङ्मयांत पटण्यासारखें, रुचण्यासारखें,

व घेण्यासारखेंही पुष्कळ सांपडतें, आणि अशा रीतीनें कवींची परंपरा चालू राहते या परंपरेंतील उत्तरोत्तर कालीन दुवे नव्या वळणाचे व तेजाचे आढळतील, परंतु पूर्वपरंपरेंतून एकदम अजीबात वेगळें पडण्याइतका नवखेपणा त्यांच्यात येऊं शकत नाहीं. अगदीं दूरदूरचे दुवे घेतल्यास, ही परंपरा नीटशी नजरेंत भरत नाहीं; परंतु, जवळजवळचे दुवे विचारांत घेतले असतां, उत्क्रांतीचा क्रम नजरेस पडल्यावांचून राहात नाहीं. इ. स. च्या तेराव्या शतकांतील ज्ञानदेवांच्या[1] काळापासून तों आजच्या विसाव्या शतकापर्यंत मराठी काव्यवाङ्मयाचीं जीं अनेक स्थित्यंतरें झालीं आहेत, तीं सर्व उत्क्रांतिस्वरूपाचीं आहेत. हे सर्व अवस्था-भेद त्या त्या काळच्या परिस्थिति-माहात्म्यानें साहजिक घडून आलेले आहेत, पण ते कोणाहि एका व्यक्तीनें बळजबरीनें किंवा बौद्धिक बंडखोरीनें घडवून आणिले होते, असा भाग दिसत नाहीं. आजकाल बहुशः असें प्रतिपादण्यांत येतें, कीं, "इ. स. एकोणिसाव्या शतकाच्या अन्त्य चरणांत केशवसुत कवीनीं 'न भूतो न भविष्यति' अशी क्रांति मराठी काव्यवाङ्मयांत घडवून आणिली." परंतु हें प्रतिपादन गैरसमजुतीचें असून, दोन दोषांनीं व्याप्त आहे. एकतर, केशवसुतांच्या काळीं मराठी काव्याला जें नवीन वळण लागलें, तें उत्क्रांतिस्वरूपाचें आहे, क्रांतिलक्षणाचें नाहीं. दुसरी गोष्ट अशी, कीं, हें नवीन वळण केशवसुतांनींच लाविलें असें म्हणणें, आजचा सूर्य माझ्या आवडत्या कोंबड्याच्याच आरवण्यानें उगवला, असें म्हणण्याइतकेंच आदरणीय आहे. परंतु या विषयाचा ऊहापोह करण्या-पूर्वी प्राचीन काव्य-वाङ्मयाचें स्वरूप व त्याची एकोणिसाव्या शतकापर्यंत घडून आलेली उत्क्रांति, यांचें संक्षिप्त पर्यालोचन करणें अवश्य दिसतें.

२. मराठींतील इ. स. एकोणिसाव्या शतकापूर्वीच्या काव्यवाङ्मयाचें स्थूल दृष्टीनेंही अवलोकन केलें असतां असें दिसून येतें कीं, त्याला तीन अंगें आहेत. एक अंग तात्त्विक, दुसरें ललित, व तिसरें विदग्ध. यांपैकी पहिलीं दोन विलग असून, तिसरें त्यांच्या मध्यंतरीं संधीवर मिश्रलक्षण-विशिष्ट आहे. वाङ्मयाचें पहिलें

१ मराठी सारस्वताचा उदय ज्ञानदेवांपासून झाला, असा सामान्य समज आहे. अलीकडे महाराष्ट्र सारस्वतकार रा. वि. ल. भावे, यांना महानुभावपंथी मराठी गद्यपद्य ग्रंथ शेंकड्यांवरी उपलब्ध झाले आहेत. त्यांतील एका पंथाचा रचनाकाल शा. श. ११९५ आहे; म्हणजे हा ग्रंथ ज्ञानदेवांच्या ज्ञानदेवीपूर्वी १७ वर्षें रचिला गेला होता, असें फलित होतें. परंतु हे मानभावी मराठी ग्रंथ सांकेतिक लिपींत लिहिलेले आहेत, आणि त्यांतील शक बरोबर वाचले गेले आहेत कीं नाहीं, व ते कितपत विश्वसनीय आहेत, याची अद्याप छाननी होऊन कसोटी लागावयाची आहे. पण या महानुभावपंथी जुन्या ग्रंथांतील शक खरे समजून हिशेबांत घेतले, तरीहि मराठी काव्य-वाङ्मयाचा प्रभातकाल ज्ञानदेवांपूर्वी अर्ध शतकाहून आणखी मागें ढकलला जाईल असें वाटत नाहीं. महानुभावपंथ शके ११२५ मध्यें उद्भवला, असें मानण्यात येतें.

अंग, म्हणजे तात्त्विक अंग, हें सरस्वतीमंदिराच्या ओटीमाजघरासारखें आहे. यांत विशेष दर्जाच्या व लायकीच्या परिचितांचाच प्रवेश होऊं शकतो. पण दुसरें अंग म्हणजे ललित अंग, हें या मंदिराच्या अंगणासारखें आहे; यांत कोणीही सहृदय आला, तरी त्याला मज्जाव नाहीं. ज्ञानदेवांचा अनुभवामृत हा ग्रंथ पहिल्या अंगांत मोडतो, तर स्फुट अभंग, पदें, भूपाळ्या, आरत्या, पाळणे, गोपीगीतें, विनोदी चुटके, इत्यादि किरकोळ रचना दुसऱ्या अंगाच्या सदरीं येते. तात्त्विक अंग अध्यात्माच्या खोल पाण्यांत शिरून परमवस्तूच्या तार्किक विवेकांत निमग्न होणाऱ्या शास्त्रज्ञ पंडितांकरितां निपजलें, तर ललित अंगाची बालबोध, सुरेल, व रसाळ रचना भाविक साक्षरच नव्हे, तर निरक्षर जनतेकरितांही अस्तित्वांत आली. तात्त्विक पारस्वत गंभीर व पारमार्थिक आहे, तर ललित सारस्वत उथळ व लौकिक आहे. पहिलें विचारप्रधान आहे, तर दुसरें भावनासंपन्न आहे. पहिल्याचें ध्येय 'सत्यज्ञान' व विषय अध्यात्म आहे; व त्यांत रसभाववृत्तींना दुय्यम स्थान आहे. परंतु ललित सारस्वताची उभारणी भक्ति, प्रेम, वात्सल्य, दया, शृंगार, विनोद, रागलोभ, इत्यादि मनोवृत्तींवर झाली असून, रसाविर्भावाला त्यांत प्रथम तिलकाचा मान आहे. तात्त्विक अंगांत उद्दिष्ट विषयाचा सांगोपांग विचार असल्यामुळे त्याची रचना सजड व सलग आढळते. परंतु ललित अंग प्रासंगिक असल्याकारणानें त्याची रचना त्रोटक व फुटकळ झालेली आहे. पहिलें सारस्वत प्रखर विचारांच्या द्वारें बुद्धीला भिडतें, तर दुसरें सारस्वत मनोवृत्तींशीं खेळतखेळत अंतःकरणाला कवटाळतें. या कार्यभेदामुळेंच पहिल्या सारस्वताचें स्वरूप भारस्त, रूक्ष, प्रौढ व संथ असतें; तर दुसऱ्याचें स्वरूप रसाळ, हृदयंगम, तरल, व ठेकेदार आढळतें. अर्थात् पहिल्या प्रकारच्या सारस्वताची पैदास पढीक पंडितवर्गांत होणें अगदींच साहजिक आहे. परंतु शास्त्रज्ञ पंडित झाले, तरी ते नेहमींच गंभीर व कठोर विचारांत गर्क राहून, सांसारिक भावनांना व लौकिक वृत्तींना निरंतर पारखे असतात, असें थोडेंच आहे! तेहि प्रसंगविशेषानें, प्रसंगानुसार तरलितांतःकरण होतात, आणि अशा मनःस्थितींत प्रासंगिक ललित वाणी प्रसवतात; याच कारणानें ज्ञानदेव-एकनाथ-दासोपंत-वामन प्रभृति अनेक पंडित कवींनीं फुटकळ ललित वाङ्मयांत पुष्कळ भर घातली आहे. दुसऱ्या पक्षीं विचार करितां असें आढळतें कीं, काव्यस्फूर्ति ही कांहीं पंडितांच्या खास मालकीची चीज नाहीं; किंबहुना असेंही म्हटलें असतां चालेल कीं, काव्यस्फूर्तीचा पांडित्याशीं प्रत्यक्ष असा कोणताच संबंध नाहीं. मनोवृत्तीच्या उद्दाम उद्रेकानें अंतःकरणाचा खळबळाट उडाला, म्हणजे सामान्य साक्षर व निरक्षर मनुष्यही काव्यस्फुरण पावतो, आणि त्याच्या ठिकणीं वाणीचें प्रागल्भ्य असल्यास तो प्रत्यक्ष काव्य प्रसवतो. अशीं काव्यें अर्थात्च प्रासंगिक ललित, व सहजोद्गारात्मक असतात. नामदेव, तुकारामादि संत कवींच्या काव्यकृती या थाटाच्या आहेत; आंग्ल भाषेंतील Lyrics चें या प्रासंगिक काव्यवाङ्मयाशीं फारच साम्य आहे, व या वाङ्मयास सामान्यतः 'भावगीतें' हें नांव

दिल्यास, तें त्यांस सार्थ साजण्यासारखें आहे. इ. स. एकोणिसाव्या शतकापूर्वी जीं भावगीतें निपजलीं, त्यांत ईश्वरविषयक रति, मोक्षाबद्दल आतुरता, वैराग्य, हे रस-भाव प्राधान्येंकरून आढळतात. परंतु विनोद, उपरोध, शृंगार, व हर्षशोकादि इतर सांसारिक जनांच्या वृत्तींना त्यांत मुळींच थारा नाहीं, असें मात्र दिसत नाहीं.

३. वरील कलमांत वर्णिलेल्या काव्यवाङ्मयाच्या दोन अंगांच्या मध्यंतरीं असणारें व उभयतांच्याही गुणांचा मनोहर मिलाफ करून महत्त्वास चढलेलें जें विदग्ध वाङ्मय, त्याचा या कलमांत विचार करावयाचा आहे. इंद्रधनुष्यांतील कोणत्याही जवळजवळच्या दोन प्रधान रंगांच्या मध्यंतरीं त्या दोन्ही रंगांच्या छटा परस्परांत मिसळून मिश्र-स्वरूपाचे अनेक रंग उत्पन्न होतात, त्याप्रमाणेंच हें तात्त्विक व ललित या अंगांच्या सांधीवरील विदग्ध काव्यवाङ्मय बाजूच्या दोन्ही अंगांच्या गुणमिश्रणानें नटलेलें असतें. हें मिश्र सारस्वत बहुशः दीर्घ काव्यांच्या, किंवा खंडकाव्यांचा, स्फुट काव्यांच्या रूपानें असतें. याचेही रचनेनुसार दोन पोटवर्ग पडतात. एक वर्ग तात्त्विक अंगाकडे विशेष झुकतो, तर दुसऱ्याचें धोरण ललिताकडे जास्त कलतें. पहिल्या वर्गांतील काव्यांचा मूळ विषय अध्यात्म असतो, परंतु रसाळ वाणी, लौकिक दृष्टांत, मनोहर व चमत्कार-पूर्ण अलंकारिक रचना आणि प्रसंगानुरूप नादमाधुर्य, या गुणांची जोड देऊन तत्त्व-चर्चेचा रूक्षपणा व कठोरपणा हे बरेच खरपूस व मवाळ केलेले आढळतात. ज्ञानदेवांची 'ज्ञानदेवी' हा ग्रंथ या वर्गाचा उत्कृष्ट मासला आहे. या मिश्राङ्गाचा दुसरा पोटवर्ग म्हणजे पौराणिक कथानकात्मक लहानमोठे काव्यग्रंथ होत. यांत कधीं अलंकार-मिषानें, तर कधीं उघड प्रवचनरूपानें ललित काव्यांत अध्यात्मतत्त्वविचारांचा वार ठांसून दिलेला आढळांत येतो. लौकिक प्रसंगाचीं वर्गनें, सृष्टिसौंदर्याचें दिग्दर्शन, मानवांचें विविध व्यवहार व स्वभावविषेष, इत्यादि विषय कथानकानुषंगानें रसभरित व हृदयंगम रीतीनें मांडून, त्यांतच तात्त्विक चर्चेचा ओघ नाना वळणांनीं खेळविल्याचे या काव्यांतून दृष्टोत्पत्तीस येतें. चोभा कवीचें 'उखाहरण', एकनाथांचें 'रुक्मिणीस्वयंवर,' वामन पंडितांची भागवती प्रकरणें, इत्यादि बहुसंख्य काव्यग्रंथ या मिश्रलक्षणवर्गांत येतात.

४. वरील दोन कलमांत विशद केल्याप्रमाणें मराठी काव्यवाङ्मयाचीं त्याच्या उदयाच्या प्रभातकालापासूनच तात्त्विक, ललित, व विदग्ध, अशीं तीन अंगें आढळतात; आणि यांपैकीं ललित व विदग्ध या दोन्ही अंगांची कालप्रवाहांत घडून येणाऱ्या राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, मानसिक, व बौद्धिक, अवस्थान्तरानुसार निरनिराळ्या वळणांनीं पण क्रमाक्रमानें परिणति होत गेलेली आढळते. केशवसुतांच्या काळीं म्हणजे इ. स. एकोणिसाव्या शतकाच्या अन्त्य चरणांत झालेल्या काव्यप्रांतांतील उत्क्रांतीची नीट कल्पना येण्याला, पूर्वकालीन मुख्य मुख्य टप्पांवर मराठी काव्य, परिस्थितीप्रमाणें कसकसें उत्क्रांत होत आलें होतें, याचा थोडक्यांत आढावा घेणें जरूर आहे.

५. ज्ञानदेवांच्या हयातींत त्यांनीं व नामदेवांच्या कुटुंबांतील सर्व माणसांनीं पुष्कळ फुटकळ ललित रचना केली, व ती रचना मराठी काव्यवाङ्मयांत अद्याप टकाव धरून राहिलेली आहे. ही रचना निरनिराळ्या चालींच्या सुरेल अभंगांत वि पदांत केलेली असल्यामुळें व तींत भक्ति, प्रेम व करुणा हे रस पुरोपूर बिंबल्यामुळें ती महाराष्ट्रांतील भाविक, व श्रद्धाळू बहुजन समाजास अत्यन्त प्रिय झाली. हें ललित वाङ्मय आज शेंकडों वर्षें साक्षर व निरक्षर समाजाच्याही हातींतोंडीं वावरत असल्या-कारणानें प्रत्येक शतकांत व प्रांतांत वक्ते, गायक, आणि लेखक यांनीं आपापल्या संस्कृतीप्रमाणें व संप्रदायानुसार त्यांतील जुन्या भाषेला व शब्दांना अर्वाचीन रूप देणें अगदीं अपरिहार्य होतें. तरी पण या संस्करणांनीं व शब्दांनीं मूळ अर्थाला किंवा कल्पनेला फारसा ढका लागला असेल, असें मानण्यास विशेष कारण नाहीं.

ज्ञानदेवांनंतर व नामदेवांच्या हयातींतच स्वराज्याचें आभाळ फाटून मुसलमानी वादळाची तोहमत महाराष्ट्रावर कोसळली, व सर्वत्र विलक्षण अस्वस्थता, अस्थिरता, व बंडाळी माजली. अर्थात् अशा स्थितींत वाङ्मयप्रवाहांत चलविचल होऊन थोडा-बहुत खंड पडणें साहजिकच होतें. ज्ञानदेवनाम-देवांनंतरच्या दोन अडीच शतकांतील वाङ्मय फारसें उपलब्ध नाहीं. या काळानंतर जरा स्थिरस्थावर झाल्यावर आणि मराठ्यांचा हात चालून त्यांस राजकारणांत महत्त्व आल्यावर व विस्कळित समाजाची पुन्हां संघटना घडत असतांना, मराठी वाङ्मयालाही नवाईचा व चलतीचा काळ लाभला. या काळांत एकनाथांनीं ज्ञानदेवीचा जीर्णोद्धार करून, ज्ञानदेवांच्या पावला-वर पाऊल ठेवीत आपल्या 'भागवता'ची रचना केली. यांत अध्यात्मास प्राधान्य आहे. तशींच त्यांनीं 'रुक्मिणी स्वयंवर' व 'रामायण' हीं दोन मोठीं विदग्ध काव्यें रसात्मकतेवर कटाक्ष रोंखून रचिलीं आहेत. शिवाय एकनाथांच्या हातून अभंगपदात्मक स्फुट ललितरचनाही विपुल निपजली. सारांश, ज्ञानदेवांच्या वेळच्या वाङ्मयाचा उद्धार करून व स्वतः द्विविध रचना करून, नाथांनीं मराठी काव्यवाङ्मयाचे ललित व विदग्ध प्रांत उजळ केले. यानंतरच्या काळांतील कवींनीं या दोन्ही प्रांतांत भर घालण्याच्या व त्यांस नवीन वळणें लावण्याच्या कामीं चांगलाच हातभार लाविला. नामदेवांच्या धोरणावर तुकारामांनीं स्फुट अभंगपदात्मक काव्यरसाचें ताट भाविक भक्तांपुढें मांडिलें. पण याच काळांत बरेच पंडित कवि निर्माण झाले व त्यांनीं विदग्ध वाङ्मयाला नवीन वळण लावून त्याचा स्वादिष्टपणा वाढविला. मुक्तेश्वरांनीं प्रसन्नराघव, अनर्घ्यराघव, भर्तृहरीचीं शतकें, वद्धचाणक्य, इत्यादि संस्कृत काव्य-नाटकांचा व सुभाषितांचा सढळ हातानें उपयोग करून व वर्णनपद्धति संस्कृत काव्याच्या संस्कृत काव्याच्या धर्तीवर नेऊन आपल्या रसवन्तीच्या लीलाविलासास कोमलता व प्रौढता या दोन्ही गुणांची जोड करून दिली. शिवाय मुक्तेश्वरांनीं आपल्या काव्यांना जिवंतपणा आणण्यासाठीं आपल्या काळची देशस्थिति, रीतरिवाज, व राजकारण

यांचाही प्रसंगवशात्–कालविपर्ययदोषांस न जुमानतां—उल्लेख केलेला आढळतो. मुद्गल कवींच्या रामायणांतही हाच प्रकार दृष्टीस पडतो.नागेश,सामराज, आनंदतनय, अनंत, वगैरे साधारण संस्कृतज्ञ कवींनीं संस्कृत अक्षरगणबद्ध वृत्तांमध्यें शब्दार्थालंकारांनीं नटलेलीं लहान लहान उपाख्यानें व खंडकाव्यें रचण्यास आरंभ केला. रघुनाथ पंडितांनीं नैषध काव्याच्या कांहीं भागाचा हरिकीर्तनास उपयोगी पडेल असा विविध वृत्तात्मक मराठी उलथा करून, मराठी काव्याचा एक पाट उघड रीतीनें संस्कृत काव्य-प्रांताकडे वळविला. विठ्ठलकवीनेंही याच दिशेनें प्रयत्न करून मराठी कवितेला शृंगाररसाची जरा खरपूस ओळख करून दिली. वामन पंडितांनीं निव्वळ अध्यात्म ग्रंथ रचल्यावर, नानारसान्वित, शब्दार्थचमत्कृतिमय, व नादमधुर अशीं संस्कृत श्लोकवृत्तांत भागवती प्रकरणें रचून व सगुणभक्तींत अध्यात्मचर्चेचें मिसळण घालून, कीर्तनकारांची मोठीच सोय केली. समर्थ रामदासांनीं अध्यात्मचर्चेबरोबरच आपल्या दासबोधांत देशप्रीति, राजकारण, समाजव्यवस्था, लोक-संघटना, संप्रदायस्थापना, वगैरे विषयांना स्थळ देऊन, मराठी वाङमयाला आपल्या काळच्या परिस्थितीस साजेल असा घाट दिला. रामदासांची फुटकळ ललित रचनाही याच थाटाची आहे. शिवाय, निव्वळ तत्कालीन ऐतिहासिक प्रसंगांवर व व्यक्तींवरही ललित व विदग्ध रचना होऊं लागली. हा काळ शिवाजी महाराजांच्या प्रौढ प्रतापाचा होता. यापूर्वीच्या तीनशें साडेतीनशें वर्षांच्या अवधींत मराठी कवींना, ज्यानें अभिमानाचें स्फुरण चढेल असा ऐतिहासिक प्रसंग घडला नाहीं, किंवा जिचें यश काव्यविषय होऊं शकेल अशी प्रौढप्रतापशालिनी राष्ट्रीय व्यक्तीही झाली नाही. परंतु शिवाजीमहाराजांच्या अप्रतिम यशस्वी राष्ट्रीय चरित्रानें हें कोंदटलेलें वातावरण अगदींच बदलून गेलें, व वीर, आणि मुत्सद्दी यांजबरोबर कवींनाही नवीन हुशारी आली. पौराणिक व आध्यात्मिक काव्यांतही तत्कालीन परिस्थितीचें अस्पष्ट प्रतिबिंब वठूं लागलें होतें, हें वर दर्शित केलेंच आहे. परंतु प्रत्यक्ष तत्कालीन प्रसंगांवरच लहानमोठीं काव्यें ही यावेळीं उदयास आलीं. यांतील कित्येक व्रज, संस्कृत, वगैरे भाषांत झालीं. तरीपण तीं महाराष्ट्रांतील काव्यवाङमयाची उत्क्रांति कोणत्या दिशेनें या कालीं होऊं लागली होती, हें स्पष्ट दर्शवितात. शिवभूषण काव्य, शिवकाव्यम्, राधामाधवविलासचंपू, पर्णालग्रहणम्, बखरींतून आढळणारे शिवचरित्रपर श्लोक, ही सर्व रचना या उत्क्रांतीची द्योतक आहे. या धर्तीवर ललित वाङमय रचणारे राष्ट्रीय शाहीर याच वेळीं उदयास आले व त्यांचे पोवाडे खेड्यापाड्यांतून, नगरोपनगरांतील चव्हाट्यांवर, आणि राजवाड्यांतील दरबार कचेरींत गाण्याची प्रथा सुरू झाली. एकंदरींत इ. स. सोळाव्या व सतराव्या शतकांत मराठी वाङमयाचीं ललित व विदग्ध हीं दोन्ही अंगें इतिहास व संस्कृत काव्यनाटकें यांकडे थोडींबहुत झुकूं लागलीं. परंतु काव्याचा प्रसार करण्याची जीं साधनें होतीं, तीं धार्मिक स्वरूपाचीं असल्यामुळें हा कल जितका स्पष्ट व्हावयास पाहिजे होता, तितका स्पष्ट आढळत नाहीं. वारकऱ्यांसारखें भक्तिसांप्रदायिक संघ

व हरिकीर्तनकार यांशिवाय काव्यप्रसाराला चांगलेंसें साधनच नव्हतें. त्यामुळें ग्रंथाला धार्मिक स्वरूप असल्याशिवाय त्याची चहा होणें शक्य नसल्यामुळें मराठी कवितेचा वरील कल बराच बोथट झाला, यांत शंका नाहीं. शिवशाहीनंतर अठराव्या शतकांत मराठेशाहीवर मोठेंच संकट गुदरून बहुतेक दाणादाण झाली. परंतु या धांदलींत अखेर ब्राह्मण पेशवे आघाडीला येऊन, त्यांनीं स्थावरास्थावर करून स्वराज्याचा आवर केला. व सुमारें पन्नास वर्षेपर्यंत महाराष्ट्राला स्वास्थ्य लाभलें. परंतु यानंतर लगेच पेशव्यांची चढती कमान पडती झाली, बेबंदशाही बोकाळली, आणि अखेर पेशवाईचा अंत होऊन, एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्याच चरणांत महाराष्ट्रांत आंग्लसत्तेची प्राणप्रतिष्ठा घडून आली. एकंदरींत अठराव्या शतकाचा प्रथम चरण व अन्त्य चरण हे धामधुमींतच गेले, व काव्यवाङमयाचा ऐतिहासिक प्रसंग व व्यक्ति यांना काव्य-विषय करण्याचा जो कल पूर्व शतकांत दिसूं लागला होता, त्याचा फारसा विकास झाला नाहीं. पेशवे प्रशस्ती, नारायणरावाचा मृत्यु, मोरोपंतकृत गंगावकिली, आर्या-केकावली, सन्मणिमाला, इत्यादि स्फुट प्रकरणें, जगन्नाथाचें शशिसेनाकाव्य, निरंजन माधवाचें कुलवृत्त व प्रवासवृत्त, इत्यादि खंडकाव्यें ऐतिहासिक किंवा ऐहिक विषयांवर रचलेलीं आढळतात; परंतु या प्रांतांत फारशी प्रगति दिसत नाहीं. महिपति ताऱ्हाबाद-करांनीं संतचरित्रें लिहिलीं, पण तीं ऐतिहासिक म्हणून नव्हत, तर भाविक भक्तांच्या भोळ्या मनाला रमविण्याशमविण्याकरितांच निर्मिलीं होतीं. परंतु या काळांत ऐति-हासिक स्वरूपाचें ललित वाङमय पोवाडे व लावण्या या दोन सदरीं बरेंच ग्रथित झालें; तथापि लौकिक विषयांत वावरणाऱ्या शृंगारविलासी ललिताला या काळांत फारच पालवी फुटली. शाहिरांच्या वीर्यशाली पोवाडचांच्या तुणतुण्यावर स्फुरण पावणारी सरस्वती, आतां पेशवाईच्या नमत्या व मावळत्या अमदानींत व चैनबाजीच्या रंग-प्रसंगांत शृंगारिक डफाच्या थापांवर नटवेगिरीनें थयथय करूं लागली. ही शृंगारिक ललित रचना जरी काव्यमय व रसाळ आहे, तरी बदफैली प्रेम व उत्तान शृंगारवर्णनें, यांनीं ती शिष्ट व अभिजात समाजाला त्यावेळीं साहजिकच गर्हणीय व तिरस्करणीय वाटली, व आजमितीस तशीच वाटत आहे. तरी लावण्यांच्या ठसकेदार व कर्णमधुर मोहक चालींची मोहनी समाजावर पडूं लागली व प्रतिष्ठितही तिचा आस्वाद घेऊं लागले. यामुळें शृंगारिक लावण्यांबरोबरच तात्त्विक, बोधप्रद, व भक्तिपर सभ्य लावण्या अस्तित्वांत येऊन, त्यांचा अंगीकार कीर्तनकारांनीं केला. याप्रमाणें लौकिक व ललित वाङमयाची बाजू उत्क्रांत होत असतां, विदग्ध वाङमय-मंडळांत एक महा-पंडित सारस्वत तेजानें तळपूं लागला. हें कविरत्न मोरोपंत पराडकर होत. पंतांनीं आपल्या काव्यांत रूक्ष अध्यात्मचर्चेला फारसा थारा केला नाहीं. रघुवंशासारखी मराठींत काव्यरचना करावी म्हणून त्यांच्या बरोबरीचे विद्वद्वर्य त्यांस सुचवीत असत, आणि तशा तऱ्हेचा प्रयत्न त्यांनीं जैमिनी अश्वमेधाच्या आधारें रचिलेल्या कुशलव चरित्र नांवाच्या खंडकाव्यांत केलाही आहे. परंतु पंत जरी परम रसिक होते, तरी

ईश्वरभक्ति हें त्यांचें मुख्य ध्येय होतें, आणि पुराणकथन हा त्यांचा धंदा होता. शिवाय, काव्याची जर कोणास विशेष जरूर असेल, आणि त्याचा प्रसार करण्याचें कोणास सामर्थ्य असेल, तर तो कीर्तनकारांचा वर्ग होय, ही मख्खी पंतांस पूर्ण कळली होती. या कारणसमवायानें पौराणिक कथा हरिदासांस उपयोगी पडतील अशा रीतीनें प्रौढ वृत्तांत व भाषेंत रचाव्या असें पंतांनीं ठरविलें आणि वामनपंडितांचें अनुकरण करून पुराणविषयावर लहानमोठीं बहुसंख्य काव्यें रचिलीं. संस्कृत छंदांची धाटणी, साहित्य-गुणाची जडणी, ओजस्वी शब्दसरणी, रसाविर्भावाची उभारणी, व भाषेची कमावणी, या गुणगणानें मराठी काव्याला पंतांनीं रसिकांतच नव्हे, तर पंडितवर्गांतही, आदरणीय करून सोडिलें. महिपति ताऱ्हावादकरादि पंतांच्या समकालीन लेखकांनीं सामान्य साक्षर व निरक्षर भाविक लोकांकरितां रचना केली. परंतु मोरोपंतांचा वाग्विलास गीर्वाणसाहित्यांत मनसोक्त रममाण होणाऱ्या पंडितांस मराठी वाङ्मयाची गोडी लावण्याकरितां अवतरला आणि त्यानें या कार्यांत चांगलें यश संपादिलें.

६. याप्रमाणें सोळाव्या शतकापासूनच मराठीचा कांटा लौकिक व ऐतिहासिक विषय आणि संस्कृत काव्यनाटकांची पद्धति यांकडे वळूं लागला होता; परंतु अठराव्या शतकाअखेरपर्यंत या दिशेनें फारशी प्रगति झाली नाही. यानंतर एकोणिसाव्या शतकांत नवीन परिस्थितीच्या अनुकूलत्वानें हा कांटा त्या दिशेनें झपाट्यानें कसा वळला, आणि या दिशेनें वाहात असतांना मराठी काव्यप्रवाहाला नवीं नवीं वळणें कशीं सहजा-सहजीं लागत गेलीं, याचा विचार पुढील कलमांत करावयाचा आहे.

७. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणांत आंग्लसत्ता प्रस्थापित होऊन अध्ययनाची दिशा अजीबात बदलली. वैदिकांपेक्षा व शास्त्रज्ञांपेक्षां साहित्यसेवकांची युरोपीय लोकांत विशेष चहा होऊं लागली. संस्कृत काव्यनाटकांचें मर्म उकलून त्यांचें यथास्थित स्तोत्र गाणारे युरोपिअन पंडित त्यावेळीं बरेच होते, व तत्कालीन महा-राष्ट्रीय पंडितांचा ओढा साहजिक या काव्यनाटकांचे मराठी उलथे करण्याकडे व त्यांच्या धर्तीवर मराठींत नवीन रचना करण्याकडे वळला. सामान्यतः हे पंडित मोरोपंती वळणाचे होते व भाषासरणींत त्यांनीं पंतांचाच कित्ता वळविला. या काळची बहुतेक रचना गंभीर व पोक्त संस्कृत छंदांत आहे, तरीपण कित्येक नाटकांत कीर्तन-कारांनीं आदरणीय केलेल्या चालीच्या लावण्या व पदें आढळतात. या पंडितकवींत गोडबोले, राजवाडे, लेले, चिपळूणकर, पेठकर, खरे, पारखी, बापूसाहेब कुरुंदवाडकर, हे अग्रगण्य होते. या सर्व कवींची भाषासरणी प्रौढ व शुद्ध आहे खरी, पण चिपळूणकर वगळले असतां इतरांच्या रसवंतींत रसाळपणा व मार्दव या गुणांची उणीव बरीच भासते. या कवींनीं भामिनीविलास, मेघदूत, रघुवंश, ऋतुसंहार, किरातार्जुन, इत्यादि संस्कृत भाषेंतील शिष्टमान्य काव्यग्रंथ, व शाकुंतल, नागानंद, प्रसन्नराघव, उत्तररामचरित, मृच्छकटिक, इत्यादि नाट्यप्रबंध मराठींत संक्रमित करण्याचा क्रम झपाट्यानें चालविला,

व अकबरकाव्य, यशवंतरायकाव्य, भट्टवंश, इत्यादि कृतींनीं ऐतिहासिक काव्यांचाही दंडक चालू केला. एकंदरींत मागील तीन शतकांत मराठी सारस्वतांत जो कल ओझरता व अस्पष्ट दिसत होता, तोच एकोणिसाव्या शतकांत अनुकूल परिस्थिति येतांच व्यक्त होऊन, मराठी सरस्वती पुराणवाङ्मयांतून बाहेर निसटून संस्कृत काव्यनाटकांत, ऐतिहासिक विषयांत, व लौकिक व्यवहारांत खुल्या दिलानें व मोकळ्या पायानें संचार करूं लागली. परंतु ही उत्क्रांति येथेंच थांबणें अशक्य होतें, कारण मराठीची आतां एका विदेशी मातबर भाषेशीं संगति होऊन, तिच्या गुणाची छाप मराठीवर वसणें वस्तुगत्याच प्राप्त झालें. ही विदेशी भाषा म्हणजे आंग्लभाषा होय. वर वर्णिलेल्या पंडितकवींच्या खांद्याला खांदा भिडवून शारदोपासना करणारे आंग्लभाषाप्रवीण नवशिक्षित पंडित उदयास आले. यांनीं आंग्लभाषेंतील काव्यें मराठींत उतरण्याची कामगिरी करण्यास सुरवात केली. वजाबा प्रधानांची देवसेनी, व कीर्तिकरांची इंदिरा, हीं दोन मोठ्या इंग्रजी काव्यांचीं भाषांतरें सुप्रसिद्ध आहेत. परंतु अशा तऱ्हेचीं मोठीं काव्यें मराठींत उतरण्याची प्रथा फैलावली नाहीं, व या जातीच्या काव्यांची फारशी चहाही झाली नाहीं. याला कारणें अनेक होतीं. एक तर अशीं दीर्घकाव्यें रचण्याला बरीच चिकाटी लागते व ती या काळांत फारच थोड्यांत आढळते. दुसरें कारण असें कीं या विदेशी काव्यांच्या मराठी प्रतिमांकडे संस्कृती वळणाचे पंडितकवि क्षुद्र दृष्टीनें पहात, व सामान्य जनतेला आधुनिक कविवर्गासंबंधीं तिळमात्रही आदर वाटत नसे. तशांत या आंग्लभाषाभिज्ञ नवशिक्षित कवींची भाषासरणी पंडितकवींच्या भाषेबरोबर तुलना केली असतां बरीच अप्रौढ व शिथिल असे, व त्यांतील लौकिक प्रसंगही अपरिचित व परदेशी असत, यामुळें समाजानें त्यास नाक मुरडणें त्या काळीं अगदीं साहजिक होतें. शिवाय कुंटयांच्या 'राजा शिवाजीनें' इंग्रजी शिकलेल्या आधुनिक कवींची हेटाळणी करण्यास टीकाकारांना फारच चांगली संधि साधून दिली. अशी एकंदर स्थिति असतांही या इंग्रजी शिकलेल्या लोकांतून एक निराळाच कविवर्ग तयार होऊं लागला होता. या वर्गाचें अंतःकरण आंग्लभाषेंतील भावनाप्रधान स्फुट काव्यांनी स्फुरण पावलें, व तें काव्यमय आलाप प्रसवूं लागलें. या धर्तीचे पहिले सुप्रसिद्ध कवि महाजनि हे होत. यांनीं वर्डस्वर्थ, ब्रौनिंग, वगैरे आंग्लकवींच्या लहान लहान भावकवनांचीं (Lyrics and Sonnets) मराठी सुंदर रूपांतरें व भाषांतरें केलीं. याच वेळीं आगाशे, मोगरे, लेंभे, ओक, आठल्ये, कानिटकर, वगैरे अनेक खंडकाव्यें व स्फुटकाव्यें गुंफणारे रसिक कवि उदयाला आले. यांनी केलेली रचना बहुशः सरळ, सरस व वेधक आहे. उसळती कल्पना व हृदयस्पर्शी रसाविर्भाव या काव्यांतून आढळतात. हें वाङ्मय स्फुट स्वरूपाचें आहे, आणि तें बहुतांशीं प्रौढ वृत्तांत गुंफलेलें आहे, व त्याचा समावेश विदग्ध अंगांत होण्यासारखा आहे. ठेकेदारपणा व तालबद्धता हे जे विशेष गुण ललित अंगाला लागतात, ते गुण या वाङ्मयांत अद्याप चांगले सरसावले नव्हते. परंतु या फुटकळ काव्यमय रचनेला खरें ललिताचें स्वरूप देणारी एक महत्त्वाची

गोष्ट एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या चरणांत घडून आली. ही गोष्ट म्हणजे संगीत नाटकांची टूम होय. संगीत नाटकांची गोडी आधुनिक सुशिक्षितांस लागली व त्यांतील सुरेल, तालबद्ध व ठेकेदार पदांची गुणगुण त्यांच्यांत सुरू झाली. यापूर्वी आधुनिक सुशिक्षिताचा मराठींतील ललित वाङमयाशीं संबंध तुटल्यासारखा झाला होता. नवीन शिक्षणाला धर्माचा संपर्क नसल्यामुळें भक्तिमार्गांतील हृदयंगम ललित वाङमयाला हा वर्ग बहुशः पारखा झाला होता. ऐतिहासिक पोवाडे व शृंगारिक लावण्या व पदें कनिष्ठ समाजांत वावरत असल्यामुळें त्यावर सभ्य वर्गाचा साहजिक बहिष्कार पडला होता आणि तेणेंकरून या शिक्षितवर्गाला त्या वाङमयाचा वाराही फारसा लागला नव्हता. या वर्गाला गायनाची गोडीही यथातथाच होती. या कारणसमवायानें ललित रचनेची प्रथा सुशिक्षित कवींत या काळांत क्वचित्च दृष्टीस पडे. परंतु संगीत नाटकाचा चटका कानाला लागून, त्यांतील कर्णमधुर पदें शिक्षितांच्या जिभेवर नाचूं लागल्यावर, त्यांच्या स्फुट काव्यकृतीनें या गोड चालींच्या ठेकेदार पदांत मुरडणें अगदीं अपरिहार्य होतें. याप्रमाणें आधुनिक कवींची फुटकळ ललित रचना सुरू झाली. या कवींचा आंग्ल-कवींशीं चांगला परिचय झाल्यामुळें एकोणिसाव्या शतकांतील आंग्ल काव्यवाङमयाला निसर्ग, सौंदर्य, प्रेम व राष्ट्राभिमान, यांनी बरेंच स्फुरण चढलेलें दिसतें; आणि या वस्तुचतुष्टयाची प्रेरणा आधुनिक मराठी कवींच्या मनोवृत्तींत होऊन, त्याचा संचार विदग्ध व ललित काव्यांत स्पष्ट भासूं लागला. वस्तूंत व साध्या देखाव्यांत, किंवा सांसारिक प्रसंगांत, अगर स्त्रीबालादिकांच्या मुग्ध लीलांत, मोठमोठीं गूढ तत्त्वें कल्पून, तीं उकलणारीं काव्यें आतां उसळी मारूं लागलीं. याच सुमारास धार्मिक, सामाजिक, व राजकीय, चळवळींसही चांगलें तोंड लागलें होतें. अर्थात् निसर्गभक्त व स्वभाववादी वनलेल्या आधुनिक कवीस मूर्तिपूजेवर, धार्मिक संस्कारांवर, जातिभेदांवर, देवांच्या संख्येवर, रूढ मार्गानें जाणाऱ्या भाविकांवर आणि भटाभिक्षुकांवर कोरडे ओढण्यास स्फूर्ति झाली व ते भराभर तडफदार ललितवाङमय प्रसवूं लागले. सामाजिक चळवळी-मुळें विधवांचे क्लेश, बालविधवा, विवाहसंबंधांत पूर्वप्रेमाचा अभाव, जरठकुमारी-विवाह, स्त्रियांची गुलामगिरी व अज्ञान, प्रेमाची अवहेलना, कृत्रिम निर्बंध, इत्यादिक मनाला खळबळून टाकणारे विषय आधुनिक कवींना लाभले. राजकीय चळवळीच्या गलबल्यांत अनेक पक्षभेद उत्पन्न झाले; व त्यांतून एक राष्ट्रीय पक्ष विशेष जोमाचा व तडफेचा म्हणून पुढें सरसावला. या कारणानें राष्ट्रीयत्वाची जी लाट उसळली, तिच्या तडाक्यांतून कवि सुटणें अशक्यच होतें. या राष्ट्राभिमानाच्या भावनेनें प्रेरित झालेल्या आधुनिक कवींनीं राष्ट्राचा आळस व अज्ञान झाडून, त्याच्या अंगांत नव-चैतन्य आणण्याकरितां शाहिरीबाण्याची खणखणीत काव्यरचना करण्यास व मराठे-शाहींतील अनेक राष्ट्रभक्तीचे प्रसंग भडक रंगांत रंगविण्यास सुरवात केली. अशा प्रकारें पैदा होणारें काव्यवाङमय बहुतेक सर्व स्फुट स्वरूपाचें होतें. असल्या लहान स्फुट काव्यांत बहुशः एकच कल्पना, एकच रस व एकच प्रसंग असल्यामुळें, व कवीच्या

मनांत प्रत्यक्ष वावरत असणारी वृत्तीच त्यांत खेळविल्यामुळें, तें साहजिकच हृदयंगम होतें; आणि अशा काव्यास पदलालित्य, नादमाधुर्य व तालबद्धता, या गुणांची जोड झाल्यास, तें मोहक ललित वाङमयाच्या पदवीस पोंचण्यास लायक होतें. मासिक पुस्तकांची वाढती संख्याही या वाङमयास वाढीस उत्तेजक झाली. एकदोन बैठकींत १०–१५ पंक्तींचें भावगीत लिहावें व तें थोडक्याच दिवसांनीं एकाद्या मासिकांत प्रसिद्ध व्हावें, ही गोष्ट, पोटापाण्याचा धंदा करून फावल्या वेळांत कवितादेवीची मनसोक्त व शक्त्यनुसार सेवा करणाऱ्या या आधुनिक कवींच्या फार पथ्यावर पडली. अशा तऱ्हेची सहजक्रमानें व परिस्थितिविशेषानें मराठी काव्यवाङमयाची सर्व बाजूंनीं उत्क्रांति होत असतां केशवसुत उदयास आले.

८. पांचदहा वर्षांच्या फरकानें केशवसुतांचे समकालीन असे बरेच, विदग्ध व ललित वाङमय प्रसवणारे, कवि मासिकांत मिरवलेले आहेत. त्यांत टिळक, गोरे, लेले, तांबे, मोडकद्वय, भिडेद्वय, कोल्हटकर, केळकर, घाटे, लिमये, नंदुरबारकर, रहाळकर, दडकर, करंदीकर (विनायक), मुजुमदार, आपटे (अनंततनय), काटदरे, इत्यादि नांवें व 'बी', रमामाधव, वसंत, सीताकांत, वनवासी, भृंग, इत्यादि टोपण नांवें, सामान्यतः वारंवार आढळतात. या सर्व कवींच्या स्फुट काव्याचें सामग्र्यानें अवलोकन केलें असतां, असें आढळून येतें कीं, वरील कलमांत वर्णिलेल्या एकाच परिस्थितीच्या मुशींत हे कवि वनले होते. त्यांच्या विदग्ध व ललितकाव्यांचें बाह्यांग कितीही निरनिराळें भासलें, तरी अंतरंगाचा ठाव घेतल्यास त्यांत समान वृत्ति, स्फूर्ति, व आकांक्षा आढळून येतात. प्रत्येकाचा व्यासंग, स्वाभाविक कल, आवडनिवड व परिश्रम, यांचा परिणाम काव्याच्या वहिरंगावर झालेला आढळेल, परंतु त्यांच्या काव्याचें अंतरंग वरील कलमांतील सहजक्रमप्राप्त परिस्थितीनेंच रंगलेलें आहे. तेव्हां या कवींनीं एकमेकांचें अनुकरण केलें, हें म्हणणें जितकें अप्रयोजक होईल, तितकेंच यांच्यापैकीं कोणी एकानें आपल्या अलौकिक कर्तबगारीनें व बुद्धिवैभवानें मराठीच्या काव्य-वाङमयांत क्रांति घडवून आणली, हें म्हणणेंही अप्रयोजक ठरेल. नव्या वळणाचा प्रवाह केशवसुत व त्यांचे समकालीन कवि यांच्या जन्माच्या पूर्वीच सुरू झाला होता, हें वरील कलमांत दर्शविलेंच आहे. हा प्रवाह अजूनही नवीन जोमानें भरघोसांत चालू आहे. असो. अशा रीतीनें एका चालू परंपरेंत केशवसुतांचा अभ्युदय झाला. मराठी कवितेस परिस्थितीच्या जोरानें लागलेल्या नव्या वळणाला त्यांनीं आपल्या सामर्थ्याप्रमाणें हातभार लावून काव्यप्रगति घडवून आणिली, हें खरें. परंतु केशवसुत हे एकाएकी एकाद्या 'धूमकेतूप्रमाणें' उगवले, किंवा एकाद्या ज्वालामुखीप्रमाणें एकदम पेटून व स्फोट करून त्यांनीं काव्यप्रदेशांत विलक्षण उलटापालट करून टाकिली, अशीं विधानें करणें म्हणजे 'रजाचा गज' किंवा 'पिसाचा कावळा' करण्यासारखें आहे. आज-मितीससुद्धां मराठी काव्य-वाङमयाची परंपरागत परिणति इतकी झाली आहे कीं,

दिवसानुदिवस केशवसुत हे मागील पिढींतील व जुन्या वळणांतील कवि भासूं लागले आहेत. तेव्हां केशवसुतांस क्रांतिवाले कवि ठरविणारांना, गेल्या दहावीस वर्षांतही वरेच क्रांतिवाले कवी हुडकून काढावे लागतील ! म्हणजे मराठी भाषेच्या काव्यप्रांतांत क्रांतीची अखंड मालिका ताणून, परंपराशृंखलेचा प्रत्येक दुवा खिळखिळा करून विलग केल्याचें घातकी धाडस त्यांच्या पदरीं खास पडेल ! "केशवसुत हे क्रांतिकारक कवि झाले", या कल्पनेला केशवसुतांचेच कांहीं उद्‌गार मूळ कारण झालेले आहेत. केशवसुतांच्या पूर्वीचे कवि किंवा त्यांचे समकालीन, यांच्या कृतींत आपल्या स्वतःच्या किंवा आत्मतुल्य इतरांच्या, प्रतिभेसंबंधीं अगर सामर्थ्यासंबंधीं प्रतिष्ठेचे उद्‌गार आढळत नाहींत. भवभूतीच्या बेपर्वा अहंमन्यतेचा ध्वनि प्रथमतः केशवसुतांच्या कवितेंत उठूं लागला. मासल्याकरिता पुढील उद्‌गार पहा—

(१) माझ्या दुर्मुखल्या मखामधुनि या, चालावयाचा पुढें
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्‌निष्यन्द् चोहींकडे !
तुम्ही नाहिं तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी !
कोणीही पुसणार नाहिं, 'कवि तो होता कसा आननीं ?'

(२) या अन्तरालांतिल तारकांत
आत्मे कवीलागुनि दीसतात;
कांचेमधूनी दिसतें जनाला,
धोंड्यामधूनीहि दिसे कवीला !

(३) (कवि म्हणजे कोण ? तरः—)
चाले तो धरणीवरी, तर पहा ! जेथून तो चालिला,
धूली तेथिल होतसे कनकिता ! घेऊं नका भ्रान्तिला,
दृष्टी तो फिरवी वरी, तर लवे आकाश तें खालती,
तारांचे गण गावयास वरुनी स्तोत्रें अहा ! लागती !
राही तो, तर देव भूमिवरती येतात हिंडावया,
जातां स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागिं धुंडावया !

(४) (धूमकेतु व महाकवि, यांसः—)
जगांतिल महाक्रान्तींचें तें भविष्य सांगाया,
तुम्ही येतसां ! लावितसांही तें लोकां गाया !
कधींमधिं तुम्ही विचित्र पुतळे उगवतसां थाटें !
वदा तर तुम्ही कोठुनि चुकलां इकडे हो वाटे ?

(५) होउनियां मग दंग मनीं,
व्हावें तें आणा ध्यानीं,

गा मग सुचतिल तीं गाणीं;
परिसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या !
औचित्याच्या फोल विवेका ! जा निघ त्या दुरवस्थेनें
अम्हां घेरिलें म्हणुनी घेतों झिंगुनियां या पानानें !
पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देउं कसे !
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलुमाचे वा करूं पहा तुकडे तुकडे !

(६) आम्ही कोण म्हणून काय पुससी ? आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया,
आम्हांला वगळा–गतप्रभ झणीं होतील तारांगणें;
आम्हांला वगळा–विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

(७) अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ?–पुसतों तुम्हांला.

अशा तऱ्हेचे उद्‌गार प्रत्यक्ष व्यवहारांत कोणी काढले तर तो खास उद्धट ठरेल. परंतु हेच उद्‌गार रंगभूमीवर, लेखांत व काव्यांत, मोठे मोहक व कौतुकास्पद वाटतात. जो निर्भीडपणा, जो अहंकार, किंवा जो विक्षिप्तपणा, सामान्यतः दोषार्ह ठरतो, तोच अशा स्थितींत आकर्षणहेतु होतो, आणि उद्दामपणाला स्वतंत्र वृत्तीचें श्रेय मिळतें. असाच प्रकार केशवसुतांच्या बाबतींत थोडासा झाला. तशांत आगरकरी वळणाची भाषासरणी आणि फटक्यासारखें तांडव करणारें वृत्त, यांचा अंगीकार करून जेव्हां केशवसुतांची ललित वाणी समाजावर तणाणूं लागली, तेव्हां त्यांचें निशाण उचलून ही आत्मश्लाघेची व समाजावर तोंडसुख घेण्याची ही मोहीम जयघोषानें पुढें चालू ठेवण्यास या नवयुगांत नवे भालाईत पुष्कळच मिळाले. आजकाल मराठी काव्यांत दुर्दम मदाच्या, अहंमन्यतेच्या, स्वातंत्र्यप्रेमाच्या व फटकळवृत्तीच्या, ज्या गर्जना कडाडत आहेत, त्यांचा कोमल उगम केशवसुतांच्या काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडतो, आणि त्यावरूनच केशवसुत हे 'क्रांतिकारक कवि' झाले, असा समज पसरलेला दिसतो.

(काव्यचर्चा–१९२५;
पृ. क्र. २०४–२१९)

१३

केशवसुत आणि कवीचा व्यापार

लेखक : रा. प. सबनीस, एम. ए.

मनुष्याला उपहासास्पद करण्याचे दोन मार्ग आहेत; एक त्याची सरळपणें फजिती उडवावयाची किंवा दुसरा त्याची अवास्तव स्तुति करावयाची. एखाद्याविषयीं 'मी समजतों हे गृहस्थ टिळक आणि गांधी यांच्यावर आहेत' असें म्हटलें व तो जर सुज्ञ असेल तर तो मान खालीं घालतो. हाच प्रसंग कांहीं मंडळींच्या उपद्व्यापामुळें केशवसुतांवर आला आहे. केशवसुत म्हणज कांहीं तरी अज्ञातपूर्व तत्त्वें प्रतिपादणारे कवि, त्यांच्यापुढें ज्ञानेश्वरादि कवि केवळ तुच्छ, दर्पोक्तींचा दुर्गंध पसरविणारे व वेडपे म्हणून मिरविणारे असे जे आम्ही ते त्यांचे सच्छिष्य असें कांहीं नवीन कवि व टीकाकार सांगत सुटले आहेत. ज्या जनसमाजाला केशवसुतांची खरी योग्यता अजून समजून द्यावयाची आहे त्याला असलीं बेसुमार विधानें ऐकून जास्तच बावरल्यासारखें होऊन जात असेल यांत संशय नाहीं. महाराष्ट्राच्या अविनाश वैभवाचे खरे वारसदार जे लोकोत्तर व लोकमान्य कवि ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत होऊन गेले त्यांच्याच मंदिरांत केशवसुतांना जागा आहे; केशवसुतांच्या मार्गानें आम्ही जात आहों असें दिमाखानें म्हणणाऱ्यांनीं स्वत:साठीं मात्र एक अजबखाना उभारावयाचा असल्यास उभारावा हें आम्हांस या आंखून दिलेल्या चतु:सीमांच्या लेखांत दाखवावयाचें आहे.

पूर्वकवींनीं अशी खडतर परंपरा घालून ठेविली आहे कीं, नवीन मराठी कवींनीं फार जपून रहावयास पाहिजे. या कवींमध्यें आपल्या मराठी भाषेचा अभिमान किती

जाज्ज्वल्य होता ! साहित्याला वोजवील व अमृताला चुकी ठेवील अशी आपली भाषा आहे हे शब्द ज्ञानेश्वरांनीं खरे करून दाखविले नाहीत काय ? भाषेच्या अभिमानाचा जो प्रचंड प्रवाह ज्ञानेश्वरांपासून उगम पावला त्यांत वामनासारखे संस्कृत भाषेचे कट्टे दुरभिमानी सुद्धां वाहून गेले व पवित्र झाले. या सर्वांच्या दृढ व दीर्घ प्रयत्नानें जन्मदरिद्री अशी मराठी वैभवसंपन्न झाली. त्यांचा आत्मविश्वास केवढा दांडगा होता. 'या मन्हाटीचिया नगरीं' ब्रह्मविद्येचा सुकाळ करावयाचा, सर्व जगाला भुलविणारा एवढा शृंगार पण त्याच्या डोक्यावर पाय ठेवतील अशा शांतिकथांची चटक जनमनाला लावावयाची हें कार्य त्यांनीं अंगावर घेतलें व यशस्वी रीतीनें पार पाडून दाखविलें. हा आत्मविश्वास अनेक रूपांनीं प्रकट झाला आहे. 'मोतियाची जैसी जाती' किंवा 'वसंतागमींचीं वाटोळी मोगरीं जैसीं' असें ज्ञानेश्वरांनीं आपल्या ओव्यांचें वर्णन करून आपला ग्रंथ म्हणजे ईश्वराजवळ 'पसायदान' मागण्याचा हक्क प्राप्त करून देणारा 'वाग्यज्ञ' आहे असे उद्‌गार कर्तव्यपूर्तीनें होणाऱ्या आनंदाच्या भरांत काढिले आहेत. अनेक मंवाजींना पायां पडावयास लावण्याचें सामर्थ्य आपल्या अभंगांत आहे अशी जाणीव तुकारामांना आहे. कवीचा व्यापार म्हणजे जगदुद्धार हें रामदासांनीं लिहिलें व पटवून दिलें. कर्तव्यनिष्ठा किती अगाध ! समजूत कमी अशा समाजानें छळ केला तर ज्ञानेश्वरांच्या तोंडून सबंध आयुष्यांत एक वांकडा शब्द निघाला नाहीं, झोळींत पडलेलें राज्य परत करून रामदासांनीं त्या झोळीचेंच भूषण मानिलें, हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी आपलें अभिमानास्पद दारिद्र्य तुकारामांनीं विटाळूं दिलें नाहीं. ज्या शक्ति आपल्याला ईश्वरकृपेनें प्राप्त झाल्या त्यांचा परमोत्कर्ष करून त्या आपल्या बांधवांच्या कारणीं लावावयाच्या हें एकच ब्रीद ते जाणीत होते; मग हें कर्तव्य चाललें असतां छळ झाला तर छळकारांना शांतीनें जिकण्याची व ऐश्वर्य चालून आलें तर तें साभार परत करण्याची त्यांची तयारी होती. देहधारणा करावयास जेवढें अवश्य तेवढेंच त्यांना पुरें होतें; आपल्या कामाचें मोल द्रव्यांत करून जिंदगी जोडून व वाडे उठवून देहाचें ओज करण्याला ते नाखुष होते. लोकसेवा करावयाची ती धनसंपन्न होण्यासाठीं करावयाची नाहीं; आत्मप्रतिष्ठा वाढविण्यासाठीं करावयाची नाहीं; समाजाला गाजरपारखी, कृतघ्न इत्यादि शिव्या देण्याची हौस पुरविण्यास सवड सांपडावी या उद्देशानेंहि करावयाची नाहीं; लोकसेवा हें कर्तव्य, तें केलेंच पाहिजे, कर्तव्य ज्यानें सांडिलें तो प्रेतवत् होय या उदात्त बुद्धीनें जगांत ते वावरले.

ही परंपरा आजच्या काळांत केशवसुतांनीं कवितेच्या क्षेत्रांत चालविली यांत त्यांच्या महतीचें बीज आहे. आपल्या समाजाची अशी कांहीं मनोरचना आहे कीं, चारित्र्यहीन कवींचा येथें कधींहि सन्मान व्हावयाचा नाहीं. इतर लोकांहून जास्त प्रतिभा जी तुम्हांला मिळाली तिच्यावर दुर्व्यसनांचा किंवा नीच कृत्यांचा थर बसवून तिचें तेज मलिन करण्याचा तुम्हांस हक्क नाहीं असें लोकांचें म्हणणें असतें. केशवसुत

हलाखीच्या स्थितींतहि—जिची कल्पना करणें फारसें कठिण नाहीं—निष्कलंक राहिले. दरमहा पंधरावीस रुपये मिळविण्यासाठीं स्थलांतरें करीत त्यांना भटकावें लागलें, व शेवटीं सरकारी शाळेंत जराशी बरी नोकरी मिळाली तोंच त्यांचा प्लेगनें बळी घेतला. असें एकोणचाळीस वर्षांचें आयुष्य क्रमणें म्हणजे कांटचांवरून चालण्यासारखें होतें. या भिकार जगांत इच्छित कांहीं मिळावयाचें नाहीं,[१] हें जग काळोखानें भरलें आहे,[२] या तिमिरांत आम्ही रखडावयाचें[३], जीवित्व म्हणजे एक शोकसंकुल नाटक आहे[४], हा दुःखाचा पेला डोळे मिटून पिऊन टाकावयाचा,[५] किती तरी आशांचे प्राण निघून जाऊन त्यांच्या भडकलेल्या चितांमधून पिशाच्चांप्रमाणें भटकावयाचें[६] हे जे उद्‌गार प्रसंगोपात्त त्यांच्या तोंडून निघून गेले त्यांवरून त्यांच्या आयुष्याची दुर्धरता आपल्याला जाणवते. पण कोटि गुणांचा नाश करणारें म्हणून दारिद्र्याचें आसुरी सामर्थ्य एका सुभाषितांत वर्णिलें आहे तें केशवसुतांच्या बाबतींत खोटें पडलें. कवितेपासून एक पैशाचाहि लाभ होत नव्हता तरी ते आपल्या त्या थोर व्यवसायापासून ढळले नाहींत. प्रत्यक्ष आपल्या भावाकडूनहि मदत घ्यावयाची नाहीं, त्यानें पैसे पाठविलेच तर ते परत करावयाचे इतका बाणेदारपणा त्यांच्यांत होता. जों जों बाह्य परिस्थितीचे घाव त्यांच्या मर्मीं बसत गेले तों तों त्यांचें अंतरंग अभिमानानें व उत्साहानें भरून त्यांना स्वसामर्थ्याची ओळख पटत चालली. अनेक वेळां मनोभंग झाले म्हणून शोक करण्यासाठीं कवि निर्जन ठिकाणीं गेला तों

तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी

अशी एका तारकेची म्हणजे हृदयस्थ ईश्वराची वाणी ऐकून समाधानी झाला.[७] सर्व कवितांचा कालानुक्रम जर बरोबर कळणें शक्य असतें तर ही गोष्ट निर्विवाद रीतीनें कदाचित् सिद्ध करून देतां आली असती. मराठी भाषेचा अभिमान, आपलें काम सर्वोत्कृष्ट वठावें अशी ईर्ष्या, देशोन्नतीविषयीं तळमळ यांनींहि केशवसुतांच्या चरित्राला सन्मान्यता आणिली आहे.

हें चरित्राविषयीं झालें. आतां कवीच्या सामर्थ्याचा उगम, कवीचें हळुवार मन, मनन व व्यासंग यांचा काव्यावर परिणाम, सत्काव्य निर्माण होण्यासाठीं स्वात्मनिवेदनाची किंवा आत्मार्पणाची आवश्यकता, व आत्मप्रत्यय यांविषयींचे केशवसुतांचे विचार काय आहेत ते पहावयाचे.

कवित्व म्हणजे 'ईश्वराचें देणें' आहे; तें असल्याशिवाय इतर सर्व खटाटोप व्यर्थ आहे. खताचे डोंगर व पाण्याचे समुद्र जरी निवडुंगाच्या अंकुराला सादर केले तरी तो अंकुर वटवृक्षांत परिणत होणार नाहीं. काव्य वाचितांना तुम्हांला 'सरस क्लृप्ति',

१ 'तुझें नाम मुखीं' इत्यादि. २ पुष्पाप्रत. ३ फुलपांखरूं. ४ नैर्ऋत्येकडला वारा. ५ पद्यपंक्ति. ६ पुष्पाप्रत. ७ दूर कोठें एकला जाउनीयां—इत्यादि.

'हृदयंगम पंक्ति', 'रेखलेलें वर्णन' हीं आढळून तुम्ही तल्लीन व्हाल, व कवीला धन्यवाद द्याल; पण कवि स्वतः त्यांचें श्रेय घेण्यास तयार नाहीं. तो म्हणतो—

शारदेनें जो मंत्र दिला कानीं
तसें लिहिलें मीं—काव्य तिचें मानीं ! [१]

कवि म्हणजे ईश्वराचा लाडका होय; 'तुला दिव्य दृष्टि दिली आहे, तुला दिक् आणि काल यांचा अडथळा होणार नाहीं, प्रतिभेच्या जोरावर या जगांत तूं वाटेल तसा विहार कर' असा ताम्रपट ईश्वराकडून कवीला मिळत असतो.[२] ईश्वराचा प्रसाद याप्रमाणें झाला तरच पुढची गोष्ट.

ईश्वरी प्रसाद झालेला असल्यानंतर कवीचें मन हळुवार होऊन त्याला साध्या विषयांत मोठा आशय आढळूं लागतो[३]. पहावें तेथें काव्य आहे; कुरूपतेंतहि असलेलें सौंदर्य कवि प्रकट करूं शकतो. जें रम्य आहे तें पाहून त्याला वेड लागतें[४]. खिन्न मनाला सुखविण्यासाठीं तो फुलपांखरावर कवन रचितो तेव्हां सुंदर विषयांवरून निश्चितपणें भ्रमण करणारा तो लहान जीव व उद्यांच्या चिंतेनें अकालीं मृत्युमुखीं पडणारा मानव प्राणी यांमधला विरोध त्याच्या दृष्टीपुढें उन्मेष पावतो[४]. पांढरी–सफेत न नाजुक म्हातारी उडतांना पाहून त्याचें मुग्ध मधुबाल्य त्याच्यापुढें उभें राहतें, किंबहुना त्या गंधर्वाच्या सूक्ष्म विमानांत बसून तो विश्वसंचार करावयास निघतो.[५] मोत्याच्या दाण्यांसारखे दवांचे थेंब पाहून त्याला एका दुर्दैवी आईचीं 'गतबाळें' आठवतात; तींहि त्या थेंबाप्रमाणेंच काल संध्याकाळीं नव्हतीं, आज सकाळीं आहेत व 'लौकरच गगनीं जातील.'[६] सफाईनें काढिलेल्या रांगोळीवरूनहि त्याच्या चित्तांत असेंच विचारांचें काहूर उठतें; उज्ज्वल दिव्यत्व संपादा, धर्मार्थकाम साधून जीवित सफल करा, पावित्र्य जोडा, सुदर्शनाचें सांकडें चुकविण्यासाठीं पापाची रजा घ्या, तुमचें अन्तर निर्मळ असूं द्या—एवढा गहन अर्थ हजारों वेळां ज्या आकृति आपण पाहिल्या असतील त्यांत भरलेला असतो.[७] या सुंदर ठरलेल्या वस्तु तर राहोतच; पण ओबडधोबड धोंडे त्यांतहि असेंच दिव्यत्व सांठविलें आहे. थोडे टांकीचे घाव त्यावर मारण्याची दिव्यदृष्टि मात्र पाहिजे.[८]

या दिव्य दृष्टीचा विकास होण्यासाठीं मननाची जरूर आहे. कल्पकता ही दुर्गम भूशिरावर वसलेली असते[९]. 'सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पंडिताः' इत्यादि गीतेंतील श्लोकांचें विवरणच केशवसुतांनीं केलें आहे असें वाटतें. संन्यास म्हणजे

---

१ काव्य कोणाचें? २ आम्ही कोण? ३ रांगोळी घालतांना पाहून. ४ फुलपांखरूं. ५ म्हातारी. ६ दंवाचे थेंब. ७ रांगोळी घालतांना पाहून. ८ सृष्टितत्त्व आणि दिव्यदृष्टि. ९ कल्पकता.

ध्यानस्थ राहून उदात्त विचार प्रसविणें व प्रसृत करणें, आणि कर्मयोग म्हणजे वीर-कृत्यें (केवळ रणांगणावर नव्हे !) करीत राहणें यांत श्रेष्ठ कोणतें हा वाद अनादि-सिद्ध व कधींहि न संपण्यासारखा आहे. आपल्या संस्कृतींत संन्यासाविषयीं आदर असला तरी सामान्य जनतेविषयीं अनादर नाहीं; मॉब किंवा क्राउड किंवा रॅबल असा जनसमूहाविषयीं निंदाव्यंजक शब्दच आपल्या भाषेंत नाहीं. म्हणून केशव-सुतांच्या कवितेंत 'मी गिरणातीरावर जाऊन गात बसलों तरी तुम्ही उत्सवांत दंग रहा, दोघांनीं आपापलीं कामें करावयास हवीं' असा 'पंडिता'ला शोभणारा विचार आला आहे.[१] 'वेड लागलेल्या जनसंमर्दाच्या क्षुद्र कलहांपासून लांब,*– असा 'बाला'ला शोभणारा अरेरावी विचार नाहीं. याच वादाचा ध्वनि पुनः 'दिवा आणि तारा' या कवितेंत उमटला आहे. नेपोलियनसारखे जे कर्मवीर असतात त्यांच्या मनांत विचारवीरांविषयीं जी तुच्छताबुद्धि असते ती कशी अनाठायीं होय हें येथें दाखविलें आहे. दिवा ताऱ्याला गर्वानें म्हणतो—"अरे तुझा प्रकाश किती अंधुक, तुझा उपयोग काय, माझ्यामुळेंच अंधारांत व्यवहार चालूं शकतो." तारा गंभीर व शांत स्वरानें उत्तर करितो, "बाबारे, तुझें तेज बाह्यापुरतें, आंतल्या आत्म्याला उज्ज्वल करणें तुझ्याकडे नाहीं." 'दिवस आणि रात्र' या कवितेंत कवि पुनः एकदां या विषयाकडे वळला आहे, आणि येथें विचारमग्नतेचा आयुष्यक्रम व कर्मयोगाचा आयुष्यक्रम हे जणूं काय त्यानें ताजव्यांत घालून तोलले आहेत व निर्णय वाचकांवर सोंपविला आहे. 'जीं अलौकिक स्वप्नें, ज्या दिव्याकृति आणि जे गंधर्वालाप भासमान होतात' त्यांपैकीं अगदीं थोडे देखील आठवून आपल्या करामतींत गोंवून ठेवण्यासाठीं कवीला स्वतःशीं किती तरी घेळ विचार करीत बसावें लागतें.[२]

व्यासंग किंवा दीर्घ प्रयत्न हा कवीलाहि सुटलेला नाहीं. स्फूर्ति येईल व मग मी काव्यें झपाटून टाकीन असें जो कवि म्हणत बसेल त्याच्या हातून फार थोडें काम होईल. दृढनिश्चयानें लिहीत राहिलें म्हणजे जो खरा कवि असेल त्यानें लिहिलेल्या शंभर ओळींत वीस पंचवीस ओळी अशा असणारच असणार कीं त्या फक्त तोच लिहूं शकला असता. आपले विचार मनांतच असेपर्यंत विस्कळित असतात ते कागदावर टिपले म्हणजे व्यवस्थित होतात, अंधुक असतात ते रेखीव होतात. या लेखनावर पुनः पुनः विचार करून त्याचीं अनेक संस्करणें करावीं लागतात. गटेबद्दल एमर्सननें म्हटलें आहे, "हा कामकरी मोठा आनंदी होता. त्याला लोकांच्या पसंतीची किंवा नापसंतीची बाधा झाली नाहीं. स्वतःचें ध्येय व स्वतःच्या कार्याचा नकाशा हीं त्याच्याच मनांतून बाहेर पडलीं. राक्षसालाहि न झेंपतील अशीं कामें त्यानें अंगावर घेतलीं.

१ दिवाळी. २ क्षणांत नाहींसे होणारे दिव्यभास.

* Far from the madding crowd's ignoble strife.

त्याची करमणूक किंवा विश्रांति म्हणजे एक काम सोडून दुसरें सुरू करणें. अशा रीतीनें पहिल्या दिवशींचा उत्साह शेवटच्या दिवशीं कायम ठेवून त्यानें ऐंशीं वर्षें एकसारखी मेहेनत केली." गिरणींतला मजूर ज्याप्रमाणें वारा तेरा तास कामाला जुंपलेला असतो तसाच प्रतिभाशाली कवि राहिला म्हणजे त्याला गटेप्रमाणें सर्व जगाला दिपवितां येतें. मनाला लोभविणारें फूल, चित्र, पुतळा किंवा काव्य दिसलें म्हणजे या वस्तु स्वयंभू अशाच होत्या असें मानणें अपक्व किंवा असंस्कृत बुद्धीचें द्योतक होय; जोपासना व पूर्वमेहेनत यांचा अव्हेर करितां येणार नाहीं. दुर्गम अशा पर्वताच्या टोंकावर मनुष्य चढलेला दिसला म्हणजे सामान्य जनांना तो देवच वाटेल. पण म्हणून तो कष्टानें एक एक पाऊल टाकीत तेथें पोंचला आहे[1], पक्ष्याप्रमाणें भरारी मारून तेथें एकदम गेला नाहीं हें शहाण्यानें विसरतां कामा नये. तास फुकट दवडिला तर कवीच्या डोळ्यांत अश्रु आले पाहिजेत, व मनांत पश्चात्ताप संचरला पाहिजे, पण हें रडणेंहि लौकरच संपवून पुढच्या उद्योगाला लागण्याची तयारी त्यानें ठेविली पाहिजे.[2]

परमेश्वरानें हृदयांत स्थापिलेल्या 'दिव्य ठिणगी'ची मननानें व व्यासंगानें ज्वाला केली म्हणजे त्या ज्वालेस सर्वस्वाचा बळि देण्यास कवीनें सिद्ध झालें पाहिजे. विठ्ठलभक्तीचा डांगोरा एकदां पिटिल्यानंतर तुकारामांचा असा निर्धार होता

न मिळो खावया, न वाढो संतान । परि हा नारायण चित्तीं जडो ।।
विटंबो शरीर, होत कां विपत्ती । परि राहो चित्तीं नारायण ।।

कवित्वाची दीक्षा म्हणजे सतीचें वाण! केशवसुतांनीं तें घेतल्यानंतर स्फूर्ति-ज्वालेवर जीविताचा होम केला[3] व्यवहारज्ञांनीं त्यांना वेडयांत काढिलें; आणि बरोबरच आहे. पैसा नाहीं, अधिकार नाहीं, लौकिक नाहीं, बोलबाला नाहीं. एकाच वर्षीं जन्म पावलेले गोखले व केशवसुत; एकावर मानांचा वर्षाव तर दुसऱ्याला सांधीकोपऱ्याचा शेवटपर्यंत लाभ. कवितेचा नाद लागल्यामुळें त्यांची 'हीन दीन छंदीफंदी' अशी तात्पुरती दुरवस्था होऊन गेली[4] तर त्यांना कालांतरानें अढळ पद मिळालें. केशवसुत हेच खरोखर चिरंजीव होणार!

वर वर्णन केलेला सर्व सरंजाम तयार झाला म्हणजे कवीला आत्मसाक्षात्कार होत असतो. 'तूं कोणी तरी आहेस, जगाला कांहीं तरी महत्त्वाचा संदेश देण्यासाठीं तुझा जन्म आहे' अशी आकाशवाणी तो ऐकितो. कविता अशी असावी व तशी नसावी हें तुम्ही कोण कवीला सांगणार, तो जें सहजरीत्या स्वयंस्फूर्तीनें गाईल तें ऐकण्याची

---

१ उत्तेजनाचे दोन शब्द. २ फुकट दवडलेला तास. ३ चिन्हीकरण. ४ फिर्याद.

तयारी ठेवा म्हणजे तुम्हांला काव्याची खरी माधुरी कळेल असें सांगण्याचा अधिकार त्याला प्राप्त होतो[१]. तो आपलें स्वतःचें भविष्य वर्तवितो[२]

याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं;
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवि !

* * *

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या वाहावयाचा पुढें--
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोहींकडे !
तुम्हीं नाहिं तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी !

कुडबुड्या जोशांच्या भविष्याप्रमाणें हें भविष्य खोटें ठरत नसतें. केशवसुतांचें एकहि छायाचित्र उपलब्ध नसल्यामुळें 'कवि तो होता कसा आननीं ?' असा प्रश्न कोणी फाजील जिज्ञासूनें विचारिला तरी त्याचें उत्तर मिळणार नाहीं; परंतु त्याच्या सरस वाङ्निष्यंदांत मात्र कोणालाहि पोहत राहतां येईल. कवि लिहितो म्हणजे काय, तो प्रेतांना ऊर्फ स्वकर्तव्य विसरलेल्या माणसांना उठवितील असे सूर तुतारीवर काढतो.[३] जगांत सर्वांहून जास्त अद्‌भुत रम्य अशी गोष्ट म्हणजे आयुष्यमार्गावर कवीनें पसरलेलीं आपल्या प्रतिभेचीं फुलें[४] ! शेवटीं जिचा उल्लेख केलाच पाहिजे अशी भव्य कल्पना म्हणजे

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे;
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनि या देउं कसे !

ही होय.[५] महाकवीचें सामर्थ्य हें अद्वितीय असतें; जग उलथून टाकण्याची शक्ति त्यांच्यांत असते. पापपुण्याच्या कल्पना आपण त्यांच्यापासून शिकतों व त्याच आपला आयुष्यक्रम ठरवून टाकीत असतात. जग मिथ्या आहे असें शिकवून ते विरक्ति उत्पन्न करितील किंवा जग सत्य आहे म्हणून लोकांमध्यें ऐहिक खटपटींविषयीं आस्था उत्पन्न करितील. महाकवि हा धूमकेतूप्रमाणें महाक्रांतीचा पुरःसर होय.[६]

कवीच्या व्यापाराविषयीं केशवसुतांचीं मतें अशा प्रकारचीं आहेत. पूर्व कवींच्या, विशेषतः रामदासांच्या मतांशीं तीं जुळतीं आहेत हें पाहून कांहीं टीकाकार मोठ-मोठ्यानें शोकहि करूं लागतील. इंग्रजी ज्ञानाच्या प्रसाराबरोबर पाश्चात्य काव्याचे नमुने आपल्यापैकी इंग्रजी शिकणाऱ्यांना परिचित झाले. या काव्यप्रकारांचा आश्रय

१ कविता आणि कवि. २ दुर्मुखलेला. ३ कवितेचें प्रयोजन. ४ कवि. ५ स्फूर्ति. ६ धूमकेतु आणि महाकवि.

केशवसुतांनीं आपल्या कविता गुंफण्यासाठीं केला. सुटसुटीत भावगीतें रचणें एवढेंच त्यांचें नवीनत्त्व. पण हें नवीनत्त्व उद्वेग आणणारें नसून मोहक होतें व म्हणून तें रुढ होण्याच्या मार्गास लागलें.

(काव्यचर्चा—१९२५;
पृ. क्र. २२०–२२७)

१४

केशवसुत

लेखक : कविवर्य साधुदास

कै. केशवसुत हे एक लोकोत्तर कवि होऊन गेले ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. तथापि अजूनसुद्धां त्यांच्या कवितेसंबंधीं क्वचित् तिरस्कारबुद्धि असलेली आढळून येते. पुष्कळांच्या मतें ते एक 'युगप्रवर्तक' महाकवि—आपल्या मागून लोकसमूहाचें बहुमत खेचून नेणारे असे एक वाङ्मयप्रभु होऊन गेले, तर कांहींच्या मतें त्यांची कविता म्हणजे एक अर्थशून्य व नीरस बडबड होती. आजपर्यंत होऊन गेलेल्या बहुतेक मोठमोठ्या कवींना मतविरोधाचे प्रहार सहन करावे लागलेले आहेत, तसेंच ते केशवसुतांनाहि लागलेले आहेत. आतां या दोन्ही मतांतील ग्राह्य भाग कोणता याचा थोडासा विचार करूं.

उपनिषदांच्या वचनाप्रमाणें 'ना ऋषिः क्रुरुते काव्यम्', कवि हा ऋषीचा अंशभूत होय. अर्थात् विचार, उच्चार व आचार अशा तिन्ही प्रकारांनी समाजसेवा करणारांमध्यें कवीकडे ऋषीची म्हणजे विचाराची कामगिरी विशेषेंकरून सोंपविली गेली आहे. या दृष्टीनें आपल्या विचारांची छाप लोकमतावर पाडून लोकमताचा प्रचंड ओघ आपल्याकडे ओढून घेणाऱ्या कवीसच जर 'युगप्रवर्तक' म्हणावयाचें असेल, तर खुद्द कालिदासासहि सर्व दृष्टीनें 'युगप्रवर्तक' म्हणतां येईल कां नाहीं याची शंका आहे. कालिदासाच्या काव्यसृष्टींत नवीन अद्भुत कल्पना पुष्कळ आहेत पण नवी अद्भुत सृष्टि नाहीं. जग कसें आहे हें मनोहर रीतीनें सांगितलें आहे पण जग कसें असावें याचें प्रमाणदर्शक पात्र कालिदासाच्या काव्यसृष्टींत, त्याचें स्वतःचें

असें नाहीं, आणि म्हणूनच व्यासवाल्मीकींनीं राम, सीता, भरत, लक्ष्मण, मारुती, धर्मराज वगैरे मनुष्य-स्वभावाचे आदर्शभूत नमुने जसे निर्माण करून ठेविले आहेत तसे कालिदासास निर्माण करतां आले नाहींत. पण एवढ्यावरून कालिदासाची योग्यता कमी होते असें नाहीं. उत्तम उत्तम समाजनेते व समाजसेवक कसे असावे हें दाखविणारे व्यासवाल्मिकींनीं निर्माण केलेले कित्ते प्रत्यक्ष सृष्टींत तर आढळत नाहींतच पण कोणत्याहि कवीच्या अगर कादंबरीकाराच्या सृष्टींतहि ते आढळणार नाहींत, अर्थात् व्यासवाल्मिकींच्या पश्चात् 'युगप्रवर्तक' कवि झालाच नाहीं असें म्हणणें प्राप्त होईल.

खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, मनुष्याच्या जीवितक्रमांत ज्याप्रमाणें तत्त्वबोध व आचार हे दोन पर्याय असतात त्याप्रमाणें राष्ट्राच्या जीवितक्रमांतहि हे दोन पर्याय असतात. राष्ट्र आपलें तत्त्वज्ञान ज्या वेळीं विसरून जातें त्या वेळीं तत्त्वज्ञानप्रचुर कविता निर्माण करणारे कवि जन्मास येतात व राष्ट्राचा आचार ज्या वेळीं बिघडतो त्या वेळीं राष्ट्रास आपल्या आचारांतील दोष दाखवून त्यास ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करणारे कवि उदयास येतात. अर्थात् या दोन्ही भूमिका वेगवेगळ्या आहेत; आणि म्हणूनच व्यासवाल्मीकींच्या वेळची तत्त्वबोधाची आवश्यकता कालिदासाच्या वेळीं राष्ट्रास राहिली नसल्यामुळें कालिदासानें व्यासवाल्मीकींचेंच तत्त्वज्ञान व पात्रें घेऊन व्यवहाराच्या भूमिकेंत आपलें काम केलें आहे. केशवसुतांच्या बाबतींतहि असाच प्रकार झालेला दिसून येतो.

पेशवाई नष्ट झाल्यावर पारतंत्र्याचा जडपणा देशास येऊन जें एक मंद वातावरण पसरलें त्यांत राजकीय प्रगति अजीबात बंद झाली होती. सामाजिक आचारविचारांत खुळ्या कल्पनांचा सुळसुळाट होऊन आर्यसंस्कृतीला एक प्रकारचें विकृत स्वरूप आलें होतें. अशा परिस्थितींत राजकीय व सामाजिक विचारक्रांतीची जी एक लाट उठली तिच्यांतच केशवसुतांचा उदय झाला. त्यांच्या सर्व कवितांतून सामाजिक विचार-क्रांतीचा गूढ प्रवाह वाहत असलेला दिसून येतो. 'रूढीच्या वाल्यांना' छातीठोक हांक मारून त्यांचीं ढेरीं पोटें फोडून टाकण्याचा केशवसुतांनीं विडा उचलला होता. पदोपदीं अनुभवास येणाऱ्या पारतंत्र्याच्या यातनांस कंटाळून ते फुलपाखराच्या काल्पनिक स्वातंत्र्याचा मत्सर करूं लागले. बाहेरून गुलामगिरीचें दाट आवरण पसरलें असतांना दिवाळीची मौज लुटणाऱ्या बंधूंना लाडू, करंज्या खाण्याची परवानगी देऊन ते स्वतः 'गिरणातीरावर' बसून वेडयापरी गाणीं गाऊं लागले. दुर्दैवानें केशवसुतांस उदंड आयुरारोग्य लाभलें नाहीं, पण त्यांच्या प्रयत्नास यश आलें व त्यांच्या सांप्रदायांत कै. गडकऱ्यांसारखा उत्तम चेला निर्माण होऊन त्यांनीं आपल्या गुरूचें कार्य 'गुरूसे चेला सवाई' या न्यायानें पुढें चालू केलें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

अशा दृष्टीनें विचार केला असतां केशवसुत हे 'युगप्रवर्तक' कवि होते ही गोष्ट

निर्विवाद आहे. यश, अर्थप्राप्ति, व्यवहारबोधन व अमंगलाचा नाश हीं जीं काव्याचीं चार प्रयोजनें सांगितलीं आहेत त्यांपैकीं पहिलीं दोन व शेवटचें हीं तिन्ही स्वार्थ-प्रेरित आहेत. त्यांस वगळून व्यवहारबोधनाचें प्रयोजन केशवसुतांच्या कवितेनें उत्कृष्ट साधिलें आहे यांत शंका नाहीं. केशवसुतांची प्रतिभा अत्यंत उज्ज्वल व हृदय अत्यंत मृदु असल्यानें त्यांच्या रसवंतींत चैतन्य खेळूं लागलें, व त्यांच्या सांप्रदायाला एकदम जोर चढला व त्यांचें अनुकरण करणारे कवि एकामागून एक पुष्कळ निर्माण झाले.

केशवसुतांना आणखी एका दृष्टीनेंहि 'युगप्रवर्तक' म्हणण्यास हरकत नाहीं. ज्ञानेश्वर महाराजांपासून तों तुकाराम महाराज, समर्थ यांच्या वेळेपर्यंत देशजागृतीला अवश्य अशी जी एक काव्यपद्धति निर्माण झाली, तिलाच पुढील स्वराज्याच्या काळांत विकृत स्वरूप येऊन तेंच कायम टिकून राहिलें होतें. तींच तींच आख्यानें, त्याच त्याच कल्पना यांचा सुळसुळाट होऊन कोरडें तत्त्वज्ञान शिल्लक राहिलें होतें व महाराष्ट्राचा आचार सुटला होता. अशा परिस्थितींत केशवसुतांनीं एक नवीच काव्यशैली निर्माण केली. ते रूढीचे पक्के द्वेष्टे असल्यामुळें काव्यसृष्टींतहि त्यांनीं जन्या रूढि पार पायांखालीं तुडवून टाकलेल्या आढळतात. त्यांनीं नवीन सोपीं वृत्तें प्रचारांत आणिलीं, यमकांचीं बंधनें पार झुगारून दिलीं, इंग्रजी कवींचें अनुकरण करून नवीन चतुर्दशकांचा प्रचार पाडला, व रसिकांना निसर्गाकडे वेगळ्या दृष्टीनें पाहण्यास शिकविलें.

केशवसुतांच्या कवितेचे हे विशेष होत. पण यामुळेंच कित्येकांची त्यांजवर इतराजी झाली आहे. खरें पाहिलें असतां केशवसुतांनी पाडलेल्या प्रचारांत वावगें असें कांहीं नाहीं. यमकांचा प्रचार प्राचीन संस्कृत कवितेंत फारसा नव्हताच. तो वामन-मोरोपंतांनी विशेष वाढविला म्हणून ज्याप्रमाणें महाराष्ट्र कवितेच्या सौंदर्यांत विशेष भर पडली असें म्हणतां येणार नाहीं, त्याप्रमाणें केशवसुतांनीं तो थोडा कमी केला म्हणून त्या सौंदर्याची हानि झाली असेंहि मानण्याचें कारण नाहीं. यमकें हीं कवितेचें सौंदर्य वाढविणारे अलंकार आहेत, खुद्द सौंदर्य नव्हे ही एकच मुद्द्याची गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे या बाबतींत केशवसुतांवर आक्षेप घेण्यास जागा उरत नाहीं. वृत्तांच्या संबंधानेंहि तसेंच म्हणतां येईल. शिखरिणी, हरिणी किंवा शार्दूलविक्रीडित अशीं संस्कृतांतील उष्टीं वृत्तें घऊन त्यांत नीरस काव्यरचना करण्यापेक्षां 'चंद्रकांत राजाची कन्या' किंवा 'काळोखाची रजनी होती' असल्या साध्या चाली घेऊन त्यांत केशवसुतांनीं आपली ओजस्वी काव्यरचना केली यांत कांहीं गैर केलें असें मानण्याचें कारण दिसत नाहीं. चौदा ओळींच्या काव्यरचनेचा प्रचार हा इंग्रजी कवींचें अनुकरण आहे ही गोष्ट खरी; पण तो केवळ अनुकरणात्मक आहे म्हणूनच त्याज्य मानावयाचें कारण दिसत नाहीं. केशवसुतांची भाषाशैली स्वतंत्र व सोपी असूनहि रसाळ नव्हती ही मोठ्या

आश्चर्याची गोष्ट आहे. या बाबतींत कै. गडकरी व परलोकवासी टिळक या दोघांनींहि केशवसुतांवर ताण केलेली दिसते. केशवसुतांची भाषा क्वचित् नीरस व बऱ्याच ठिकाणीं क्लिष्ट वाटते. निसर्गाकडे पाहण्याची केशवसुतांची दृष्टि पाश्चात्य कवींचें अनुकरणरूप आहे, व "चित्तास चमत्कार उत्पन्न करणारें व रसात्मक वाक्य तें काव्य" या मम्मटाच्या व्याख्येप्रमाणें निरपवादहि आहे; पण प्राच्य संस्कृतींत मुरलेल्या महाराष्ट्राच्या मनोभूमिकेवर ती आपली छाप प्रत्येक बाबतींत पाडूं शकेल असें वाटत नाहीं. निसर्गाकडे मिथ्या दृष्टीनें पाहणाऱ्या व जगांत पदोपदीं अनुभवास येणाऱ्या जीवनकलहांतील नानाविध भानगडी कर्मवादाच्या जोरावर पचनीं पाडून समाधानाची ढेकर देणाऱ्या भारत–पुरुषाला, कर्माकर्मांचे धागे न उलगडल्यामुळें निसर्गाच्या चक्रव्यूहांत चांचपडणाऱ्या पाश्चात्य कवींच्या व त्यांचें अनुकरण करणाऱ्या केशवसुतादिकांचे विचार जरी 'निश्चयं श्रृणु मे तत्र' असें ठांसून सांगणारे बिनतोड मार्गदर्शक होऊं शकले नाहींत तरी

'बाळक बापाच्या ताटीं रिगे। आणि बापातेंचि जेववूं लागे।
तो चोजवलेनि अंगें। मुखचि वोढवी'

या न्यायानें मनोरंजक होण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

केशवसुतांच्या हृदयांत उडालेल्या खळबळीला पाश्चात्य संस्कृतीचें जीवन मिळून ती इंग्रजी कवितेच्या वळणावर गेली. तोच तिला जर प्राच्य संस्कृतीचा जिव्हाळा लाभला असता तर तिनें याहून अधिक कामगिरी केली असती. सुदैवानें त्यांच्या सांप्रदायांत निर्माण होत असलेल्या कवींच्या काव्यांत तो अधिकाधिक दृष्टीस पडूं लागला आहे असें मानण्यास जागा आहे. देशाच्या सध्यां उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितींत कर्तव्यमूढ झालेल्या जनतेला तत्त्वबोध करून कर्तव्यप्रवण करण्याची धमक पाश्चात्य संस्कृतींत नाहीं ती प्राच्य संस्कृतींतच आहे; सबब केशवसुतांच्या सांप्रदायांतहि उत्तरोत्तर आर्यसंस्कृतिप्रधान काव्यें निर्माण होवोत अशी सदिच्छा प्रकट करून प्रस्तुत विवेचन पूर्ण करतों.

(काव्यचर्चा—१९२५;
पृ. क्र. २२८–२३१)

१५

केशवसुतांची कविता

लेखक : वा. कृ. ताटके, एम्. ए.

ज्या एका गोष्टीमुळें केशवसुतांकडे गुरुपणा अथवा सांप्रदायाचें संस्थापकत्व दिलें जातें ती गोष्ट म्हणजे मराठी कवितेच्या बहिरंगांत व कांहीं अंशीं अंतरंगांत, त्यांच्या कालापासून स्पष्ट जाणवला जाणारा फेरफार होय. विशेष ठळकरीतीनें हीच गोष्ट निराळ्या शब्दांत सांगावयाची म्हणजे केशवसुतांनीं ठराविक ठशांची (Stereotyped) अशी, कवितावृत्तें व विषय या दोन्हींतहि क्रांति केली म्हणून त्यांच्या समकालीन कवींतहि अग्रेसरत्वाचा मान केशवसुतांस सामान्यत्वेंकरून दिला जातो. आतां ती केशवसुतांनीं केलेली 'क्रांति' असो अथवा 'उत्क्रांति' असो. कारण सध्यां आमचा चर्चेचा विषय तो नव्हे. आम्ही म्हणतों कीं वास्तविक या दोन्ही बाबतींत केशवसुतांनीं असें स्वतंत्र कांहीं केलें नाहीं. त्यांच्या पूर्वी कित्येक शतकें अगोदर होऊन गेलेल्या नाथ, भागवत इ. सांप्रदायिक संतकवींचें उत्क्रांतिकारक व अत्यंत परिणामकारक व श्रेयस्कर असें तें कार्य गैरसमजुतीमुळें केशवसुतांवर लादलें गेलें आहे. व त्याचें अगदीं उघड व ढोबळ कारण म्हणजे केशवसुतांची सुधारणापर 'तुतारी' सारखी प्रासंगिक प्रकारची (ephemeral and of passing phase) लोकांना प्रिय वाटणारी कविता. खरें पाहूं गेलें असतां केशवसुतांनी तत्कालीन कवींमध्यें विशेष लोकदृष्टीनें अर्थात् श्रेष्ठच महत्त्वाचें कार्य जर कांहीं केलें असेल तर तें सुधारकी बाण्याचें म्हणजे लोकशिकवणुकीचें (didactic) होय. हा त्यांचा विशेष त्यांच्या सांप्रदायिकांना मान्य आहे; परंतु केवळ या शिकवणुकीच्या विशेषा-

मुळें केशवसुतांना तत्कालीन कवींमध्यें अग्रणीपणाचा जो मान दिला जातो, तें मात्र आमचे बुद्धीला पटत नाहीं. कारण या एका गोष्टीमुळेंच तत्त्वतः केशवसुतांचे काव्यास 'काव्य' या दृष्टीनें अुत्तमपणा येण्याचे ऐवजीं गौणपणा मात्र येतो. आणि तो कसा येतो हें आम्ही आमच्या वाचकांपुढें सदरहु लेखाचे द्वारें मांडतों.

केशवसुत कवि होते, परंतु साधारण प्रतीचे. त्यांच्या काव्यांत अमरत्वाचें म्हणजे त्रिकालाबाधित सत्याचें निदर्शक असें, चिरकाल टिकणारें, व म्हणन कोणत्याहि काळीं, कोणत्याहि परिस्थितींत मग ती राजकीय, धार्मिक अथवा सामाजिक असो मनुष्याच्या हृदयास पटणारें, असें तत्त्व आढळून येत नाहीं, असें आम्हांस प्रथमतःच स्पष्टपणें येथें नमूद करावेसें वाटतें. तें तत्त्व त्यांच्या कवितेंत कसें दिसून येत नाहीं, याचा ऊहापोह पुढें ओघाओघानें येणारच आहे.

केवळ भावनांच्या उद्रेकाचा उपयोग (exploitation) कविकालीन परिस्थित्यनुरूप प्रासंगिक म्हणूनच त्रिकालाबाधित नव्हे, तर केवळ त्या काळाला लागू असणाऱ्या गोष्टीकडे एखादा कवि करील, तर त्याच्या काव्यांतील स्वारस्य ती परिस्थिति बदलल्याबरोबर नाहींसें होणार हें अगदीं उघड आहे. म्हणूनच श्रेष्ठ कवि भविष्यवादी असतो. त्याची दृष्टि विशाल असते व लोकाभिरुचीची त्याला विशेष पर्वा नसते. किंबहुना लोकरुचीला नवीन वळण लावण्याची ताकद त्याच्या काव्यशक्तींत असते. मानवजीविताचें, संसाराचें अर्थात् भावनांचें उत्कटतेनें उदित झालेलें व काव्य-शक्तीनें प्रगट झालेलें आणि विशिष्ट विशेष व सिद्धांत न कळतच स्वयंस्फूर्तीनें ज्यांत गर्भित आहेत असें शांतं, शिवं, सुंदरम् चित्रण करणारा लेखक मग तो कवि असो अथवा नसो, चिरंतन असें universality चें सत्तत्त्वच पाळतो, म्हणूनच अमर (Imperishable) होतो. प्राचीन ग्रीक, रोमन पंडितांच्या काव्य अथवा गद्यमय ग्रंथांतील त्रिकालाबाधित अशा सिद्धांतात्मक किंवा मानवस्वभावचित्रणमय अशा ग्रंथांचें स्वारस्य ज्यांत आहे, असेच ग्रंथ व ते ग्रंथकार अजून आमचें मनोरंजन करून आम्हांस न कळत शिकवणूकहि देतात. त्यांच्या अमर अशा या ग्रंथांत universality of the aesthetic sense अवश्यमेव आहे; व त्यामुळें संसाराशीं समरसत्व पावणारे असे हे कवि आम्हांसहि क्षणभर का होईना जनताजनार्दनाचें स्वरूप दाखवून शांतिसुख प्रदान करण्यास समर्थ होतात. असें हें कार्य श्रेष्ठकवि कसें घडवून आणतो हें पाहण्याचें आमचें सध्याचें कर्तव्य नसून, तसे थोर काव्यप्रसू ईशप्रेषित कोणते व कसे असतात, हें दाखविण्याचें असल्यानें अशा श्रेष्ठ कवींचीं लक्षणें म्हणजेच त्यांचें काव्य कशा प्रकारचें असतें हें आम्हांस दाखविणें सध्यां प्राप्त आहे. कारण, अर्थात् जें काव्य एतत्सदृश नसेल, तें उत्कृष्ट प्रतीचें नव्हे, हें ओघानेंच सिद्ध झालें.

वर लिहिल्याप्रमाणें काव्याविषयीं समरस होणें म्हणजे वैयक्तिकत्व (personality) विसरणें. अर्थात् जेथें असा विसर पडत नाहीं तेथें उत्कृष्ट कलाविलास

दिसणें अशक्यच. केशवसुतांना स्वतःच्या 'क्रीड'चा विसरच कधीं पडत नाहीं; आणि म्हणूनच काव्य या दृष्टीनें त्यांचें काव्य कोणास रंगवूं शकत नाहीं. उत्तम पुस्तकाचें, मग तें काव्य असो अथवा नसो, मुख्य लक्षण म्हणजे त्याचें वेड लागणें हें होय. "The book must haunt." असें जें एकानें म्हटलें आहे, तें उत्कृष्ट वाङ्मयाचें एक निदानच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. विषयांचें विविधत्व, सुंदर विचारांची चमत्कृति आणि कल्पनादेवीचे रम्य विलासाचे अभावीं कवि कवीच होऊं शकत नाहीं. दिव्य कल्पनाशक्तीचे जोरावर भविष्याचे गर्भात चाललेल्या घडामोडींचें मापन ज्याची दृष्टि करूं शकते आणि त्या अमोघसामर्थ्याचेच बळावर, तत्कालीन विघ्न-पटलांचे आड असलेल्या, त्रिकालाबाधित अशा सत्यसूर्यास पाहण्यास समर्थ असलेली निश्चल दृष्टि जेथें आहे, तेथेंच काव्याचें श्रेष्ठत्व आहे. कारण असाच कवि सत्याचें सत्त्वपूर्ण रसायन दुःखीकष्टी व संकुचित दृष्टीच्या इतर सामान्यजनांस देऊं शकतो. तत्त्ववेत्ता मिल यानें वर्डस्वर्थच्या काव्याविषयीं स्वतःचा असाच अनुभव दिला आहे. तो म्हणतोः—

"The result was that I gradually but completely, emerged from my habitual depression, and was never again subject to it. I long continued to value Wordsworth less according to his intrinsic merits, than by the measure of what he had done for me." अशा प्रकारचा आशावादीपणा (Optimism) म्हणजे उत्कृष्ट काव्याचा एक विशेषच आहे. Browning च्या "Pippa passes"चा हाच आशापूर्ण संदेश कीं "God's in His heaven; All's right with the world"—जगतांत जें कांहीं चाललें आहे तें यथान्याय आहे. कारण, संसाराचा स्वामी हा सर्व कारभार चालवीत आहे." परंतु अशा प्रकारचें तत्त्वज्ञान काव्याचें प्रमुख अंग असत नाहीं, तर तें उत्कृष्ट काव्याचा एक विशेष गुण म्हणून तदंगीभूत असेंच असतें. सिड्नेच्या "Apology for Poesy" ग्रंथांतील काव्याच्या व्याख्येनुरूप सुंदर काव्य हें मनोरंजक असून बोधप्रदहि असलें पाहिजे. (Delightfully instructive). 'आनंद' हाच काव्याचा किंवा कोणत्याहि इतर कलेचा आत्मा आहे. सौंदर्याबरोबर त्याचे दुसरे दोन विशेषहि म्हणजे शिवम् (Godness) आणि सत्यम् (Truth) त्याच्या अनुषंगानेंच येतात. सौंदर्याचा भोक्ता कवि कीट्ससुद्धां आपल्या सुप्रसिद्ध काव्यपंक्तींत सत्यसौंदर्याच्या एकरूपत्वाचें असेंच तत्त्व मुक्तकंठानें सांगतो. उत्कृष्ट काव्याचा हा निकष केशवसुतांच्या काव्यास लावला असतां, तें फार हिणकस दिसून येतें. मुख्य गोष्ट म्हटली तर केशवसुतांची काव्यगंगा त्यांच्या हृदयाच्या आनंदांत उगम पावते कीं नाहीं याचीच शंका आहे. त्यांची काव्यस्फूर्ति केशवसुतांच्या शिकवणुकीच्या ध्येयामुळे दचकल्यासारखी भासते. कारण तिचा उपयोग प्रासंगिक गोष्टींकडे व

सुधारणांकडे Working up the situation and exploiting its possibibity केवळ कलाविलास आणि त्याचा प्रकर्ष म्हणजे अलौकिक असा जो आनंद त्याकडे ते करत नाहींत.

हें झालें त्यांच्या काव्याचें स्वरूप. आतां त्यांच्या कलेवराकडे आपण वळूंया. उत्कृष्ट वाङमय म्हणजे अचूक व हृदयस्पर्शी शब्दांच्या मंजूषेंत सांठविलेल्या उत्कट भावना. केवळ भावनांचा उत्कृष्ट उद्रेकच असून चालावयाचें नाहीं. त्यांना प्रगट करणारी भाषा सुद्धां तशीच ('Great words') योग्य असली पाहिजे. परंतु भाषेची सहजसुंदरता किंवा प्रसाद या काव्यगुणविशेषाचें अस्तित्व केशवसुतांचे काव्यांत अभावात्मकच आहे. व यालाहि कारण जें वर दिलें गेलें आहे तेंच आहे. केशवसुतांची, त्यांच्या ध्येयामुळें (Mission of life) काव्याचे संबंधांत जी हानी झाली तशी आंग्लकवींमध्यें मॅथ्यू आर्नोल्डची स्थिति झाली. केशवसुतसुद्धां आपल्या कांहीं वीणागीतांत जेव्हां आपलें शिकवणुकीचें ध्येय विसरतात, तेव्हां मॅथ्यू आर्नोल्डप्रमाणें आपल्या भाषेची सहजसुरम्यता दाखवूं शकतात. वास्तविक केशवसुतांचें जर कांहीं काव्य असेल, तर त्यांच्या प्रासंगिक कविता नसून, तें त्यांच्या भावगीतांतच सांठवलेलें आम्हांस दिसतें. तत्कालीन (Zeit Geist) लोकसुधारणेच्या त्यांच्या ध्येयामुळें त्यांच्या काव्यस्फूर्तीची फार हानि झाली आहे. हें समाजसुधारणेचें कार्य वाटल्यास आगरकरांसारखे निबंध लिहून करावयाचें होतें; परंतु तें कार्य त्यांनीं काव्यरूपानें करण्याचें मनांत आणल्यामुळें, अर्थात् काव्याचें विलोभनीय सौंदर्य, या त्यांच्या वैयक्तिकत्वाच्या जाणिवेमुळें, त्यांच्या उत्कृष्ट समजल्या जाणाऱ्या didactic कवितेंत दिसून येत नसल्यास त्यांत नवल तें काय? प्रो. स्टॉफर्ड ब्रुकनें वर्डस्वर्थ कवीला त्याच्या didactic कवितेमुळें त्यास Philosophical gentleman असा टोमणा दिला आहे. वर निर्दिष्ट केलेला काव्याचा एक विशेष जो 'आशावादीपणा' (Optimism) त्याचा प्रकर्ष, कवीच्या या सौंदर्यदर्शनांत (Realisation of the Absolute) असतो हेंहि येथें सांगणें अवश्य वाटतें. कारण, सुखदुःखादि द्वंद्वांच्या पलीकडे जाऊन कवि स्वतः आनंदाचें साधर्म्यसौख्य उपभोगतो, व तो आनंद काव्यरूपानें इतरांस प्रसविणें त्यास तद्नंतर अपरिहार्यच असतें. तो हा आनंद आपल्या हृदयांत सांठवूं शकत नाहीं. त्याचे भागीदार इतर जग व्हावें असें त्यास वाटून "या हो! या हो! हा आनंद सर्वजण लुटा" अशा प्रकारचें निमंत्रण या ब्रह्मानंदाची लयलूट करण्यासाठीं तो सर्वांस देतो. यासच आपण काव्याचा Mysticism म्हणा, अथवा दुसरें वाटेल तें अभिधान द्या. एवढें मात्र खरें कीं, नानात्वाचे बुडाशीं असलेलें एकजिनसी तत्त्व व जगताची न्यायाचे भक्कम पायावर रचलेली ही अघटित घटना योग्य, सुदृढ व सुव्यवस्थित आहे, याचा त्यास संशयच राहात नाहीं. अशा प्रकारची विश्वासवृत्ति असल्याशिवाय कवि आपल्या वाचकांस शांतिप्रदान करूं शकत नाहीं. हा 'आनंद'

व सर्व दुःखांपासून विरंगुळा देणारी अशी अप्रतिम शांति यांची निष्पत्ति ज्या काव्यापासून होते त्या काव्यांत वर्णिलेल्या रसपूर्ण कथानकाशीं श्रोत्यांच्या अंतःकरणांतील भावनांचें तादात्म्य झालें म्हणजे श्रोता हर्षभरित होत्साता "वाहवा! वाहवा!" असे उद्‌गार काढतो व आनंदानें टाळी पिटतो. मग, नंतर तो कारणीभूत असा प्रसंग सुद्धां विसरतो. त्याचें लक्ष एक मात्र प्रत्यक्षीकृत अशा आनंदमय स्थितीकडेच असतें. उत्कृष्ट काव्याची परीक्षा येथेंच आहे. केशवसुतांच्या कोणत्याहि काव्यवाचनानें अंतःकरणास अशा अप्रतिम, अलौकिक आनंदाची अनुभूति होत नाहीं. आधुनिक कवींमध्यें असे कित्येक कवि आहेत कीं या एका काव्यविशेषामुळें म्हणजे रसपरिपाकामुळें आणि तदनुषंगिक सुंदर काव्य नादमाधुर्यामुळें महाराष्ट्रांतील साधारण थोडें बहुत शिक्षण घेतलेल्या पुरुष बालकादिकांना मराठी कवितेची गोडी लावूं शकले आहेत, हें सर्वांस विदितच आहे. आणि प्रमुख कारण हेंच कीं मनास वेड लावण्याचा (the book that haunts) म्हणजे एखादें पालुपद, अथवा गाण्याचा चरण, त्यांतील गोड नादमाधुर्यामुळे गुंगत म्हणत राहण्याची इच्छा उत्पन्न करणारा त्या कवितेचा गुणविशेष. केशवसुतांच्या कवितेंत या गुणविशेषाचा अभाव आहे असें दिसून येईल. काव्यांतील नादमाधुरता (Music), पुष्पांतील सुवासाप्रमाणें अथवा चित्रांतील यथातथ्य चित्रांकनामुळे उत्पन्न होणाऱ्या आनंदाचें एक प्रमुख अंग आहे.

उत्कट भावनावृत्ति, विषयाशीं पूर्ण तादात्म्यता, अप्रतिम मनौदार्य, हृदयाची विशालता, बालसहज स्वभाव सरलता इत्यादि अनेक गुण पूर्णपणें उत्क्रांत झाले असल्यामुळे कवीला जणूं कांही साधारण मानवांपेक्षां एखादें अधिक इंद्रिय, अथवा दिव्यदृष्टि असल्यासारखें वाटतें. या दिव्यशक्तीमुळेंच त्याची दृष्टि संकुचित न राहतां, भविष्याचे गर्भात चाललेल्या धडामोडी पाहण्यास समर्थ होते. व यामुळें त्याचे कवितेंतील विषय त्रिकालाबाधित असतात. अतएव आजपावेतों जे पौर्वात्य अथवा पाश्चात्य कवि 'अभिजात' पदवीला पोहोंचले आहेत, त्यांची दृष्टि वर्तमानकाळ भेदून भविष्याकडे पोहोंचत होती. म्हणून अर्थात् यामुळें कवि, खरे कवि Visionary आणि Idealist असतात. क्षणोक्षणीं पालटणाऱ्या परिस्थितीनें परिवेष्टित असूनहि, त्यांची दृष्टि दिक्कालघनवच्छिन्न अशीच असते. अशा कवींनीं प्रासंगिक अशा विषयांवर तात्पुरतें लिहिलें असेल; परंतु, त्यांचें अमरत्व कालपरिस्थितीच्या बंधनापलीकडे गेल्यामुळेंच केवळ लोकानुरंजन करण्यासाठीं, अथवा शिकवणुकीचेंच ध्येय पत्करलेल्या कवितेंत न सांठविल्यामुळें, तात्कालिक परिस्थिति बदलल्यावरोबर जनविस्मृतीच्या पडद्याआड जाणार ही गोष्ट निर्विवाद आहे. मॅथ्यू आर्नाल्ड हा सद्यःकालींच त्याच्या टीकात्मक गद्य लेखनामुळेंच जितका लोकप्रिय आहे, तितका तो कवि या नात्यानें राहिलेला नाहीं. केशवसुतांच्या काव्याविषयीं हाच प्रकार कमी-अधिकपणानें सध्यांच झालेला आहे. आतांपर्यंत झालेल्या चर्चेवरून केशवसुतांचें काव्य कोणत्या प्रतीचें आहे, हें आम्हीं न ठरवितां वाचकांनींच आपल्या मनाशीं ठरविलें असतां ठीक होणार

आहे. आम्हांस यापुढें एक दोन मुद्दे आणखी सांगावयाचे आहेत, तिकडे आतां आम्ही वळतों.

केशवसुतांचे व्यर्थ गोडवे गाऊन इतरांची दिशाभूल करणारे कांहीं टीकाकार, कवितेचा विषय, वृत्तें, उपमा इत्यादिकांना त्यांच्या ठराविक ठशांच्या बंधनांतून मुक्त करून स्वतंत्र काव्यसंप्रदाय स्थापन करणाऱ्या संस्थापकाचें श्रेय देतात, असें या लेखारंभीं आम्हीं जें म्हटलें आहे, त्याचा फोलपणा आतांपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांस स्पष्ट झाला असेलच. परंतु यापुढें आमचें असें म्हणणें आहे, कीं सूक्ष्म दृष्टीनें वाचणाऱ्या कोणत्याहि वाचकांस केशवसुतांचे काव्यावर पाश्चात्य कवींच्या विषय-अनुकरणाची छाया किती दाट पडली आहे, हें स्पष्ट दिसेल. अनुकरण एरवीं वाईट नाही, परंतु कवि मुदलांत अनुकरण करूं शकत नाहीं, आणि अनुकरण करण्यानें आजपर्यंत कोणी कवि झालेला नाहीं. काव्यस्फूर्ति वायूप्रमाणें स्वतंत्र असून ती कवीच्या हृदयवीणेंतून काव्याचे झणत्कार त्यास नकळतहि उत्पन्न करते. जेथें जाणीव-नेणिवांचा निरास होतो, तेथें अनुकरणशीलता राहूंच शकत नाही. असो. परंतु हें झालें उत्कृष्ट काव्याविषयीं. साधारण कवितेंत विषय, वृत्तें इ. चें अनुकरण केलें जातें व त्यादृष्टीनें पाहतां केशवसुतांनीं पौर्वात्य वृत्तें सोडलीं, तर पाश्चात्य वृत्तानुरूप नवीन वृत्तें वसविलीं.परंतु त्यामुळें त्यांच्या कवितेंत नादमाधुर्य मात्र लुप्तप्राय झालें. कवि रवींद्रांच्या काव्यांतील पाश्चात्यानुकरणाचा प्रश्न त्यांच्या काव्याच्या टीकाकारांनी उचलला होता, परंतु त्या कविश्रेष्ठाची सुप्रसिद्ध गीतांजली, अथवा मालाकार (Gardener) इत्यादि काव्य लिहिण्याची स्फूर्ति त्यांना अनेक वैष्णव ग्रंथांच्या वाचनामुळें झाली, असा निष्कर्ष निघाला. असो.

एकंदरीत, सारांश एवढाच कीं त्यांच्या या शिकवणुकीच्या धोरणामुळें (didacticism) मुळें, त्यांच्या काव्यदेवतेची प्रसन्नतासुद्धां कमी झाली. टीकाकाराचा अधिकार फेटाळून लावण्याची कवीची किती जरी मोठी आकांक्षा असली तरी त्याच्या काव्याची परीक्षा ही होणारच. परकृत बंधनांना झुगारणारा कवि स्वयंकृत बंधनानें बद्ध होतच असतो. एरवीं शब्दांच्या बंधनाशिवाय अमूर्त अशा शब्द-ब्रह्मास गोचरत्व कसें प्राप्त होणार? संगीत, चित्रकला, काव्य इत्यादिकांच्या पूर्णत्वाच्या आड जरी सूर, रंग, वृत्तें इत्यादि बंधनें येऊन तीं असुखद जरी वाटलीं, तरी कलेवरामुळें ज्याप्रमाणें आत्म्याचें अस्तित्व त्याचप्रमाणें सर्वकलाविलासाची मदार या बंधनांवरच आहे. आतां एवढें मात्र खरें कीं हीं बंधनें उत्कृष्ट कलावंतांना बाधक न होतां, त्यांच्या कलापरिपूर्णतेस कारकच होतात. इतकेंच केवळ नव्हे, तर त्याच्या कलाविलासांत त्यांनीं नवीनच निर्माण केलेलें नियमबंधन असतेंच. तात्पर्य हें कीं, केशवसुतांनीं जुनीं बंधनें झुगारलीं, परंतु नवीन पाश्चात्य व स्वीकृत बंधनवृत्तांची टांकसाळ सुरू केली. परंतु हें त्यांना चांगलें साधलें नाही; कारण केशवसुतांच्या एकनिष्ठ भक्तांनाहि केशवसुतांच्या कवितेंत गानमाधुरी (music poetical)

आहे, असें म्हणतां येणार नाही. कवितेंचें आधान व प्रगटीकरण (conception and production) यामध्यें एक सीमा प्रांत (border land) असतो. त्या स्थितींत काव्यदेवतेच्या कमी अधिक प्रसन्नतेप्रमाणें सहजता, प्रसाद, शब्दसौष्ठव व नादमाधुर्य इ. गुण त्याच्या काव्यांत उतरतात. अमोघ, अचूक व सरळ अशा शब्दांचा सहज ओघ हाच काव्यांतील प्रसन्नपणा. वाकडेतिकडे प्रयोग, कर्णकटु शब्द, ओढून-ताणून जबरदस्तीनें बसविलेले शब्दसमुच्चय म्हणजे काव्याच्या कनिष्ठ स्वरूपाचीं स्पष्ट चिन्हें होत.

आतां केशवसुतांनी केलेलें कार्य व त्यांचें महाराष्ट्र-वाङमयांतील स्थान, या संबंधाने थोडासा विचार करून हें प्रकरण आटोपतें घेऊं. वास्तविक ज्या एका कार्यामुळें सी. के. दामल्यांच्या म्हणण्याप्रमाणें व केशवसुतांच्या कवितेच्या इतर अनुकूल टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणें केशवसुतांची कविता "आधुनिक विद्वानांच्या आदरास पात्र झाली" तो शिकवणुकीचा (Didacticism) गुण आणि त्यामुळें झालेलें कार्य आगरकरी धोरणाचें म्हणजे सुधारकाचें होतें. आणि त्या दृष्टीनें त्यांच्या काव्याचा तो प्रासंगिक महत्त्वपणा सध्यां जवळ जवळ नाहींसा झाला आहे. सध्यां राष्ट्रापुढें निराळे प्रश्न, व भिन्न भावना उभ्या आहेत; व अशी ही परिस्थिती नित्यशः बदलत राहणारच. आणि या एका कारणामुळेंच केशवसुतांच्या भावनांचा उपयोग (Exploitation) बदलणाऱ्या, क्षणिक अशा परिस्थित्यनुरूप झाल्यामुळें, त्यांच्या काव्यांतील स्वास्थ्य कमी झालें. अर्थात् भावनांचा उपयोग उपदेश करण्याकडे केला गेल्यामुळें त्यांच्या कवितेला (Utilitarianism) चें हीन स्वरूप प्राप्त झालें. व या दृष्टीनें पाहतां त्यांच्या समकालीन इतर कवींची कविता त्यांच्या कवितेपेक्षां प्रसाद, सहजता, नादमाधुर्य, रसपरिपुष्टि, शब्दसौष्ठव, गानसुलभता, कल्पनाप्राचुर्य इ. गुणांनीं कितीतरी पटीनें अधिक मंडित अशी आहे, असें माझ्या अल्प समजुतीला वाटतें. माझें मत चुकीचें ठरल्यास, मी माझें म्हणणें मोठ्या आनंदानें परत घेईन; परंतु सरस्वतीदेवीच्या दरबारांत खोटी भाटगिरी जी माजत चालली आहे, ती मात्र अयोग्य आहे, असें मला वाटतें. प्रत्येक टीकाकाराचें हें पवित्र कर्तव्य आहे कीं त्याला जें सत्य वाटत असेल, तें त्यानें निःसंकोच वृत्तीनें जगापुढें मांडावें व सत्यनिर्णयाचें कठोर कर्तव्य पक्षपातरहित वृत्तीनें राहून पार पाडावें. अशा प्रकारची प्रामाणिक बुद्धि मनांत बाळगून केशवसुतांच्या कवितेविषयीं जें वाटलें, तें प्रांजळपणें वाङमय-भक्तांच्यापुढें मांडलें आहे व याचा निर्णय त्यांनी करावा अशी त्यांना नम्र प्रार्थना करून ही अल्प सेवा पुरी करतों.

—*—

(मनोरंजन—डिसेंबर १९३०
पु. ३६ वें—भाग ६ वा. पृ. क्र. ४१७–४२१).

१६

केशवसुतकृत झपूर्झा

लेखक : मा. त्रिं. पटवर्धन, एम्. ए., डी. लिट्.

'झपूर्झा' ही कविता केशवसुतांच्या अत्यंत प्रसिद्ध अशा कवितांत मोडते. १८९३ सालीं जुलै महिन्यांत म्हणजे सुप्रसिद्ध 'तुतारी'च्या मागून तीनच महिन्यांनीं हिचा जन्म झाला; परंतु या दोन कवितांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. 'तुतारी' जितकी सुबोध आहे तितकी 'झपूर्झा' ही दुर्बोध आहे; पण 'तुतारी' जितकी गद्यमय वाटते तितकी 'झपूर्झा' ही काव्यमय वाटते. 'तुतारीं'त केलेला उपदेश अत्यंत कळकळीचा व आवेशाचा असला तरी तो व्यावहारिक–ऐहिक आहे; उलटपक्षीं 'झपूर्झा' या कवितेंत कांहीं गूढ सिद्धान्त मांडण्याचा हेतु असून तिचा झोक केशवसुतांचे स्नेही वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या एका सुप्रसिद्ध लेखाप्रमाणें 'घेडे व्हा घेडे!' आणि जा उच्च वातावरणांत, हें सांगण्याचा आहे. श्री. म. वर्दे यांनीं आणि 'केशवसुतांची कविता' या पुस्तकाच्या ३ ऱ्या आवृत्तींतील तळटीपेंत व प्रस्तावनेंतही सीताराम केशव दामले यांनीं झपूर्झा या कवितेचें रहस्य उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि सुशिक्षित बहुजनसमासही एकंदरीनें ही कविता अगम्यच वाटते. ती तशी अगम्य वाटली तरी स्तुतीला मुद्दाम होऊन आक्षेप घेणारा क्वचितच भेटतो म्हणूनच कीं काय जो तो कवितेचा सारांश देऊन स्तुतीच करितांना आढळतो. नाहीं म्हणायला दाजी नागेश आपटे यांनीं मात्र आपल्या 'इंद्रधनुष्यां'तील 'आनंद-गीता'च्या परीक्षणांत या कवितेवर विरुद्ध टीका करून अशा तऱ्हेचें गूढ-

गुंजन म्हणजे एक निरर्थक शब्दावडंबर व कवीच्या भ्रांत मनःस्थितीचें प्रतिबिंब होय, असें आपलें मत नमूद केलें आहे.

प्रथमतः 'करमणुकीं'त जेव्हां ही कविता प्रसिद्ध झाली, तेव्हां हरि नारायण आपटे यांना 'झपूर्झा' हें शीर्षक अर्थबोध न वाटल्यामुळें त्यांनीं त्या ठिकाणीं 'हर्षखेद ते मावळले' ही पहिली ओळच मथळा म्हणून दिली. हल्लीं या कवितेला जी तीन ओळींची प्रस्तावना आढळते ती केशवसुतांनीं मागाहून दिलेली आहे.केशवसुत म्हणतात, "आपल्याला जें कांहीं नाहीं असें वाटतें, त्यांतूनच महात्मे कल्याणाच्या चीजा बाहेर काढतात. त्या महात्म्यांची स्थिति लक्षांत बागवून पुढील गाणें वाचल्यास तें दुर्बोध होऊं नये असें वाटतें." तथापि 'या कवितेचें रहस्य कळत नाहीं' अशी तक्रार प्रो. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांच्यासारख्या रसिक पंडितांनाही करावी लागते. शिवाय केशवसुतांची तीन ओळींची जी प्रस्तावना ती प्रो. राजवाडे यांना 'अप्रस्तुत, निरर्थक किंवा चुकीची' वाटते. उलटपक्षीं आपल्या प्रस्तावनेंत सी. के. दामले म्हणतात कीं 'झपूर्झा' ही कविता सर्वसाधारण वाचकांच्या बुद्धीच्या टप्प्यांपलीकडची असल्यामुळें पुष्कळांना तिच्यांतील स्वारस्य समजलें नाहीं तर त्यांत त्यांचा दोष नाहीं !

कवितेची टीका ही आत्मप्रत्ययनिविष्ट (Subjective) असावी का वस्तुनिविष्ट (Objective) असावी ? ज्या अर्थीं कविता ही वाचक स्वतःच्या आनंदासाठीं वाचतो, त्या अर्थी त्या कवितेविषयीं मत ठरवितांना आणि देतांना मुख्य आधार आत्मप्रत्ययाचाच घेतला पाहिजे. परंतु अमुक असें कां, तर केवळ मला तें तसें वाटतें म्हणून, अशा विधानानें कार्यभाग होणार नाहीं. होतां होईल तितकी आत्मानुभवाची छाननी व्हायला हवी आणि इतरांच्या अनुभवांशीं हा स्वतःचा अनुभव ताडून पाहायला हवा.वरवर पाहतां लोकांच्या अभिरुची कितीही भिन्न दिसल्या तरी व्यक्तींच्या भिन्न भिन्न मनांत एक प्रकारचें मौलिक साधर्म्य असल्याकारणानें लोकांच्या विविध अनुभवांच्या तौलनिक अभ्यासानें मूलतः सुंदर व सरस कोणतें हें ठरवितां येतें. कलेच्या उत्कृष्ट कृतींत बहुजनसमाजास गम्य व रम्य वाटेल असें कांहीं तरी असतेंच असतें. एखादा मनुष्य सहृदय असूनही त्याला एखादी कृति रम्य वाटली नाहीं तर ती तशी कां वाटत नाहीं, दोष व्यक्तीचा आहे का त्या कृतीचा आहे इत्यादि गोष्टींचा विचार निःपक्षपणानें झाला पाहिजे. "अहो तें रहस्य कळायला, त्या शब्दांचा अर्थही कळायला अधिकार पाहिजे, श्रद्धा पाहिजे, गुरुकृपा पाहिजे." असें बुवाबाजीला बळी पडलेल्या एखाद्या भगताच्याच तोंडीं शोभणारें उत्तर दिल्यानें निकाल तर लागणार नाहींच, पण निकाल लागायला मदतही होणार नाहीं. तेव्हां 'झपूर्झा' या कवितेची पुढील चिकित्सा करितांना मुख्य आधार जरी आत्मप्रत्ययाचाच घेतलेला असला तरी इतरांच्या अनुभवाशीं तो ताडून पाहिला जावा आणि सत्यनिर्णय व्हावा हीच इच्छा आहे.

मुली 'झिम् पोरी झिम्' अथवा 'जा पोरी जा' (?) म्हणत खेळांत पूर्णपणें तन्मय झाल्यावर त्यांच्या तोंडांतून जो अस्पष्ट ध्वनि जलद जलद निघत राहतो त्याचें 'झपूर्झा' हें कविनिर्मित रूप आहे. पण हें रूप तितकें शुद्ध नाहीं. द्रुतलयामुळें 'जा पुरि जा' अथवा 'ज पूर जा' असेंही रूप होईल, पण ज चा झ करण्यांत कवीनें काय साधियलें आहे तें कळत नाहीं. 'झपूर्झा गडे झपूर्झा' ही ओळ म्हणतांना 'डे' मधील एकार लघु उच्चारिला जातो, तर 'झपूर्झा' मधील र् हा अकारयुक्त उच्चारिला जातो. मुलींच्या तोंडचे शब्द जसेच्या तसे उच्चारावयाचे असतात म्हणून जर दीर्घ स्वरांचें ह्रस्वीकरण तेवढ्यापुरतें क्षम्य व युक्त मानावयाचें तर 'जा-पोरी-जा' असेंच कां म्हणूं नये? भक्तिभावानें भजन करीत नाचणाऱ्यांच्या तोंडचे शब्द आपण 'ग्यानबा तुकाराम' असेच लिहून आठ मात्रांच्या कालांत उच्चारितों तसें 'जा-पोरी-जा' च्या बाबतींत व्हायला काय हरकत होती? 'झपूर्झा' हें रूप प्रथमदर्शनीं अधिक काव्यमय ठरतें काय? उद्यां 'ग्यानबा तुकाराम' याचेंही 'ग्याम्बातुक्काम्' असें संक्षिप्त रूप केलें तर त्यास आपण 'झपूर्झा' इतकें जादूमय मानूं काय? भजनें आणि पंढरीला जाणाऱ्या पालख्या ज्यानें पाहिल्या आहेत त्याला 'ग्याम्बा-तुक्काम्' हा शब्द 'ग्यानबा-तुकाराम' या मंत्राइतका परिचित, सूचक व रम्य वाटणार नाहीं. हाच नियम 'झपूर्झा' या शब्दास लावायला हवा. या विकृत शब्दावरून मुलींचा जा-पोरी-जा ध्वनित होत नाहीं, तो सुचवून द्यावा लागतो. छंदोरचनेकडे पाहिल्यास त्या शब्दाचें लेखन 'झपूरझा' असें असायला पाहिजे. शिवाय, मुख्य आक्षेप असा आहे कीं, पोरी झिम्मा खेळतांना– जा-पोरी-जा–असें म्हणतच नाहींत; त्या 'झिम्-पोरी-झिम्' असें म्हणतात त्या वेळीं म्हणावयाचें गाणें पुढीलप्रमाणें आहे :—

"झिम् पोरी झिम्
कपाळाचा भिडग
भिडग गेला फुटून
पोरी आल्या उठुन
अम्बा पिकतो,
रस गळतो,
कोकणींचा राजा बाई झिम्मा खेळतो."

म्हणजे ज्या शब्दसंघापासून 'झपूर्झा' हा शब्द साधण्यांत आलेला आहे तो मूलमंत्रच चुकीचा आहे. केशवसुतांचे कित्येक चाहते या शब्दावरच फिदा झालेले दिसतात आणि संभाषणांत हा शब्द म्हणजे काय काव्यसर्वस्व आहे असें अंधभक्तीनें बोलून दाखवितात. म्हणूनच या शब्दाची इतकी चिकित्सा करणें प्राप्त झालें, नाहींतर कर्तव्य एका शब्दाशीं, शीर्षकाशीं नसून सबंध कवितेशीं आहे. केशवसुत म्हणतात––

"हर्ष खेद ते मावळले,
हास्य निमालें,
अश्रु पळाले,
कण्टकशल्यें बोथटलीं,
मखमालीची लव वठली,
कांही न दिसे दृष्टीला,
प्रकाश गेला,
तिमिर हरपला,
काय म्हणावें या स्थितिला ! –
झपूर्झा गडे झपूर्झा ! "

हें तन्मयतेच्या स्थितीचें वर्णन असावें. मन एखाद्या ठिकाणीं एकाग्र, केंद्रीभूत झालें कीं त्या घेळेपुरता बाह्यउपाधींचा विसर पडतो. हर्षाची वा खेदाची, प्रकाशाची वा तिमिराची, कशाचीच जाणीव नसते. या स्थितींत देहांत कंटकशल्यें घुसूं शकत नाहींत असें नाहीं, तर तीं घुसल्याची जाणीव होत नाहीं; त्याचप्रमाणें मखमलीची लव अंगावर वठते असें नाहीं तर तिच्या सुखकर मृदुतेचीही जाणीव होत नाहीं. इकडे कंटकशल्यें बोथटतात तर तिकडे मखमलीची लव वठते हें वर्णन वज्राहून कठोर पण कुसुमाहून मदु या वर्णनाप्रमाणें परपस्परविरोधी व चमत्कृतिजनक वाटतें; परंतु येथें लोकोत्तर 'दुःखेष्वनुद्विग्नमनः सुखेषु विगतस्पृहः' अशा स्थितप्रज्ञाची स्थिति अभिप्रेत नसून केवळ तन्मयतेची, एकाग्रतेची स्थिति अभिप्रेत आहे.

"हर्ष शोक हें ज्यां सगळें
त्यां काय कळे ?
त्यां काय वळे ?
हसतिल जरि ते आम्हांला ,
भय न धरूं हें वदण्याला—
व्यर्थीं अधिकच अर्थ असे
तो त्यांस दिसे
ज्यां म्हणति पिसे.
त्या अर्थाचे बोल कसे ! —
झपूर्झा गडे झपूर्झा ! "

व्यवहारांतील सुखदुःखांत जे (सदैव) गुरफटलेले आहेत त्यांना कळणार तरी काय आणि त्यांच्या हातून होणारही काय ? त्यांना ज्या गोष्टी सामान्य, साध्या,

व्यर्थ व उपेक्षणीय वाटतात त्यांत खरोखर किती मोठा अर्थ असतो ! पण तो ज्यांना दिसतो त्यांना हे व्यावहारिक शहाणे वेड्यांत काढतात. त्या अर्थाचे जे बोल खरोखर 'झपूर्झा' असतात, म्हणजे तल्लीनतेंत स्फुरलेले ते बोल दुसऱ्यास वेडे करून सोडण्यास समर्थ असतात.

"समाधीमध्यें प्राप्त होणाऱ्या ब्रह्मानंदाचा जवळजवळ अनुभव शब्दामध्यें सांगण्याचा प्रयत्न 'झपूर्झा' या गूढ काव्यामध्यें केलेला आहे" असें आपल्या प्रस्तावनेंत (पृ. ३६) सी. के. दामले म्हणतात. पुष्कळांची अशीच समजूत होते. परंतु पहिल्या कडव्यांत वर्णिलेली स्थिति जीवन्मुक्ताच्या समाधिस्थितीची नसून काव्यतंद्रेची आहे. 'प्रतिभा' (पृ. १७८) या कवितेंत केशवसुतांनीं प्रतिभास्फुरणावस्थेचें जें अत्युक्तिपूर्ण वर्णन केलें आहे त्यांत,

'सायुज्यत्व विराट पूरुष अहा देतो स्वयें लौकरी

* * *

पिण्डीं जाय विलोपुनी विरुनिया ब्रह्मांड हें सत्वर
शब्दब्रह्म उचंबळून मग जें दाही दिशा व्यापितें'

याप्रमाणें सायुज्यत्व, ब्रह्माण्डाचा पिंडांत लोप, नादब्रह्माचें उद्भवन इत्यादि उल्लेख असल्याकारणानें काव्यतन्द्रेंतील सुख म्हणजे समाधींतील ब्रह्मानंद अशी लोकांची समजूत होते; इतकेंच नव्हे तर कवीचीही तशी समजूत झालेली दिसते. दोनच महिने झपूर्झाच्या आधीं लिहिलेल्या 'फुलांतले गुण' (पृ. ११०) या कवितेंत आपल्या बेहोष स्थितीला त्यांनीं 'उन्मनी' म्हटलें आहे ! स्फूर्तीच्या उमाळ्यावांचून काव्य करूं नये. उत्कृष्ट काव्य स्फुरून लिहीत असतांना मनाला एक प्रकारची एकाग्रता येते आणि एक प्रकारचें हायसें वाटण्यासारखें समाधान होतें, हें कबूल. केवळ अतिशयोक्ति म्हणून या एकाग्रतेला 'उन्मनी' वगैरे शब्द वापरणें हें एक वेळ क्षम्य ठरेल. ही एकाग्रता दुसरें कोणतेंही काम करितांना जी एकाग्रता होते तिच्यासारखीच असते. ब्रह्मानंद, उन्मनी वगैरे शब्दांवरून ती एकाग्रता दैवी समाधीसारखी आहे अशी भावना करून घेणें आत्मवंचक व परिणामीं आत्मघातकीपणाचें आहे. शेली, वर्डस्वर्थ यांच्या कांहीं कविता वाचून केशवसुतांची अशी समजूत झालेली होती कीं सृष्टीची म्हणून एक स्वतंत्र देवता (Spirit of Nature) आहे, तिचा व्यावहारिक प्रपंचाशीं एक प्रकारचा विरोध आहे. त्या सृष्टिदेवतेशीं तादात्म्य झालें कीं कविता स्फुरते, व्यर्थीं अधिकच अर्थ दिसूं लागतो आणि अनिर्वचनीय आनंदाची प्राप्ति होते. एखादी सुंदर वस्तु पाहून आनंदानें क्षणैक देहभान हरपणें व सृष्टि-देवतेचा चेतन गुणोक्तीसाठीं एक कविसंकेत म्हणून कवितेंत उपयोग करणें निराळें; आणि सृष्टिदेवतेच्या ठिकाणीं

तल्लीन झाल्यानेंच काव्यस्फूर्ति होते असें मानणें निराळें. शेलीनें Skylark वर कविता लिहिली तर केशवसुतांनीं 'भृङ्गा'वर लिहिली, आणि चण्डोल डोळ्यांनीं कधींहि न पाहतां 'वरुनि नभांतुनि चण्डोल। ओतितसे हेची बोल' असें विधान ठोकून दिलें! अशा वर्णनामुळे कृत्रिमतेचा संशय येतो आणि तो काव्याचें इन्द्रजाल नष्ट करून टाकितो; आणि मग तन्मयतादर्शक कितीही शब्द घातले तरी थेंबानें हरपलेलें श्रेय हौदानें परत मिळत नाहीं. 'भृङ्ग' ही कविता 'झपूर्झा'च्या आधीं तीन वर्षें लिहिली गेली आहे. तींत केशवसुत म्हणतात,

"परंतु भृंगा, तव गान
परमानंदें परिपूर्ण!
उदासीन ही जगाविशी
तव तन्मयता सृष्टीशीं!
अस्मदीय हृदयीं ठरलें!
कीं जग हें दुःखें भरलें!
म्हणून सुंदरतेला ही
कुसें आम्हां दिसती पाहीं!
परि तव गानांतून अले
थबथबला हा भाव गळेः—
गुङ्ग गुङ्ग गुङ्ग गुङ्ग!— भान नसे—
सृष्टि अहा गुङ्ग मधुर असे!" (पृ. ६४–६५)

प्रापंचिक गोष्टीविषयीं उदासीन होऊन सृष्टि-देवतेच्या ठिकाणीं मन तन्मय झालें म्हणजे जी स्थिति होते तिचें वर्णन केशवसुतांनीं 'झपूर्झा'च्या पहिल्या कडव्यांत केलें आहे. ही काव्य-तंद्रा ज्यांना वारंवार लागते त्यांना लोक 'वेडे' म्हणतात; पण या वेडयांनाच व्यर्थीं अधिक अर्थ दिसतो, व

'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे'

आणि मग तो अर्थ, तो आशय व्यक्त करणारे पण बाह्यतः अर्थशून्य, 'गुङ्ग गुङ्ग गुङ्ग गुङ्ग—भान नसे' असे झपूर्झाचे, तन्मयतेचे बोल बाहेर पडतात.

"ज्ञानाच्या कुंपणावरून
धीरत्व धरून्
उड्डाण करून्
चिद्घन चपला ही जाते
नाचत तेथें चकचकते,

अन्धुक आकृति तिस दिसती,
त्या गाताती
निगूढ गीती;
त्या गीतीचे ध्वनि निघती––
झपूर्झा गडे झपूर्झा !" ३

मोठमोठ्या शास्त्रज्ञांना त्यांच्या शोधांचें आकलन न झाल्यामुळें त्यांच्या समकालीन पंडितांनीं वेड्यांत काढल्याचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. ज्या विचार-प्रणालिकेंत त्यांना मध्येंच आश्चर्यजनक शोध लागले, त्या विचारप्रणालिकेला चालना अगदीं क्षुद्र व सामान्य गोष्टींपासून सुद्धां मिळालेली आहे. झाडावरून फळ पडतांना कोणीं पाहिलें नाहीं ? पण न्यूटनच्या विचारशक्तीला त्या दृश्यानें अशी चालना दिली की अखेर एकदम त्याला गुरुत्वाकर्षण सुचलें. हें पूर्वी अज्ञात होतें तें ज्ञात झालें. हा शोध कसा लागला असेल ? अमुक एका मार्गानें गेलें म्हणजे वाटेनें अमुक अमुक स्थळें हीं कोणालाही हटकून लागायचींच त्याचप्रमाणें निगमनपद्धतीनें (Deductive reasoning) विचार करीत अपरिहार्यपणें हा शोध लागला काय ? नाहीं; मग एकाग्रतेंत मध्येंच एकदम सुचणारे हे शोध मन एकाग्र करून कोणासही सुचवतील काय ? नाहीं. एकाग्रता ही एक अशी जादूची दुर्बीण आहे काय कीं जिचें एक टोंक अदृश्य अज्ञात अशा सृष्टीकडे रोखलेलें असून दुसरें टोंक मनुष्याच्या मनाला लावतां येतें आणि तें तसें लागल्याबरोबर सारें अज्ञात ज्ञात होऊन जातें? गुरूनें कोणत्याही शिष्याच्या शिरावर आपला वरद हस्त ठेविला कीं त्या शिष्याला ताबडतोब दिव्य-दृष्टि प्राप्त होऊन एका क्षणांत अखिल विश्वाचें त्रिकालज्ञान होतें म्हणून गूढविद्या-वादी सांगतात त्या प्रकारचा कांहीं चमत्कार या तन्मयतेच्या दुर्बिणीनें होतो काय ? साध्या दुर्बिणीनें दृष्टीचें सामर्थ्य मात्र वाढतें; पण ही वाढ किती मोठी व आश्चर्यकारक असली तरी तिनें अनंताचा ठाव घेतां येत नाहीं. न्यूटनसारख्या प्रतिभावान् शास्त्रज्ञाला-सुद्धां बेताचेच शोध लाविता येतात. 'दिक्कालांतुन आरपार अमुची दृष्टी पाहाया शके' असें केशवसुत म्हणतात; पण अज्ञाताची अशी पृथक् सृष्टि असती आणि तन्मयतेच्या दुर्बिणींतून ती एकदम गोचर झाली असती तर न्यूटननें सारें अज्ञात ज्ञात करून टाकिलें असतें व मागाहून येणाऱ्या शास्त्रज्ञांना कांहीं कामगिरीच उरली नसती.

कवीच्या प्रतिभेचें स्फुरण हें कांहीं अंशीं न्यूटन, आइन्स्टाइनसारख्या शास्त्रज्ञांच्या प्रतिभेच्या स्फुरणासारखेंच गूढ असतें. इतर चमत्कारांप्रमाणें या चमत्काराचाही संबंध योग्य ज्ञानाच्या अभावीं दैवी शक्तीशीं जोडण्यांत येतो. तसें करण्यांत आपल्याकडे एकप्रकारचें महत्त्व येतें म्हणून कवीही या दैवी संबंधास मान्यता देतांना दिसतात. प्रेषित हे ज्याप्रमाणें आपल्या बोलास ईश्वरी बोल समजतात, त्याचप्रमाणें कवि हे आपल्या कवनांना ईश्वरी निःश्वसितें, अंतःसाक्षात्काराचे उद्गार समजतात. अनंताचा

ठाव घेण्याचें सामर्थ्य रामनसारख्या शास्त्रज्ञांत नसेल, कँट-बर्गसाँ ह्यांसारख्या तत्त्वज्ञांत नसेल पण तें आपल्या ठिकाणीं आहे अशी आपली समजूत गूढगुंजनवादी कवींनी करून घेतलेली असते. चिद्घनचपला म्हणजे प्रतिभा ही ज्ञाताच्या झुंपणावरून उड्डाण करून अज्ञाताच्या प्रांतांत शिरून त्या प्रांतांस प्रकाशित करिते. तेथें तिला अंधुक आकृति निगूढ गीती गातांना दिसतात; आणि चालू असलेल्या फोनोयंत्रांतील ध्वनिलेखाच्या तवकडीवर ध्वन्युच्चारक डबीची टांचणी टेंकली कीं जसें तें पूर्वीचें मूकसंगीत सशब्द व अखिल मानवजातीस गोचर होतें, त्याप्रमाणें तन्मयतेच्या स्थितींत अज्ञातांतील अंधुक आकृतीच्या निगूढ गीती कवीला ऐकूं येऊं लागल्या कीं त्या काव्यरूपानें बाहेर पडून बहुजनसमाजास गम्य होऊं लागतात. निराळ्या शब्दांनीं सांगायचें म्हणजे कवि हा निर्माण कांहींच करीत नाहीं. दूरस्थ वास्तवास दृग्गोचर करण्याचें दुर्बिण हें जसें एक साधन आहे त्याप्रमाणें यदृच्छया मधून मधून तल्लीन होऊन अज्ञात वास्तवास गोचर करण्याचें कविमन हें एक साधन आहे; आणि न्यूटनसारख्या शोधक शास्त्रज्ञाच्या ठिकाणीं असणाऱ्या प्रतिभेप्रमाणें कवीची प्रतिभा ही एक निसर्गदत्त देणगी वा ईश्वरी प्रसाद आहे.

येथें एक अडचण उपस्थित होते. शास्त्रज्ञाला सुचलेली कल्पना जरी त्याला गूढ अशा अंतःस्फूर्तीनें सुचली असली तरी तो इंद्रियगोचर अशा प्रयोगांनीं त्याची खात्री होईपर्यंत तिच्यावर विश्वास टाकीत नाहीं; आणि त्याची खातरी झाल्यावर तो इतरांचेंही सप्रमाण समाधान करूं शकतो. या गूढ अंतःस्फूर्तीनें सुचलेल्या कल्पना वाढत्या ज्ञानानें कित्येकदां अपुऱ्या, असमाधानकारक व टाकाऊ ठरलेल्या आहेत, हें शास्त्रांच्या इतिहासांत नमूद आहे. उलटपक्षीं कवीचे बोल हे वास्तव तथापि अज्ञात अशा सत्याचे पडसाद होत हें विधान एकदां मान्य केलें कीं तें ग्राह्य आहे का अग्राह्य आहे हें ठरविण्याचा प्रश्नच नाहींसा होतो. श्रद्धावानास तें सत्य ताबडतोब पटतें व अश्रद्ध मनुष्यास तें कधींही पटणार नाहीं, अशी विचारसरणी सुरू होते आणि कवीचे शब्द प्रेषिताच्या बोलाच्या तोलाचे ठरतात!

पण मौज कशी आहे पाहा. स्वप्नांत घेतलेल्या अनुभवाचें जर कोणी वर्णन करून ठेविलें, तर तें वर्णन कितीही हृदयंगम झालें तरी त्याला श्रुतिप्रामाण्य कधीं मिळत नाहीं! वस्तुतः केशवसुतांनीं वर्णिलेल्या एकाग्रतेच्या स्थितींत आणि जींत स्वप्नें पडतात अशा निद्रावस्थेंत असा कोणता मौलिक भेद आहे कीं काव्यानुभूतीस साक्षात्कार-माहात्म्य व श्रुतिप्रामाण्य लाभावें आणि स्वप्नानुभूतीवर असत्याचा कायमचा छाप बसावा? ज्याप्रमाणें प्रतिभेचें स्फुरण ही स्वाधीनची गोष्ट नाहीं, त्याप्रमाणें अमुक स्वप्न पडणें ही गोष्टसुद्धां स्वाधीनची नाहीं. याच्यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं स्वप्नांत मनुष्यानें पूर्वी घेतलेल्या अनुभवांचेंच विकृतीकरण व मिश्रण असतें तर उलट प्रतिभाप्रस्फुरित काव्यांत वास्तव अज्ञाताचें आविष्करण असतें. पण येथेंच मोठी चूक आहे.

पूर्वीचेच अनुभव हे स्वप्नाचे घटक असतात परंतु स्वप्नांत नावीन्य असतेंच. त्याप्रमाणें काव्यांत नावीन्य प्रतीत झालें तरी त्या नावीन्याचे मूलघटक हे कवीच्या अनुभवांपैकींच असतात. ध्वन्युच्चारक डबी ध्वनिलेखाच्या तबकडीवरील लेखाचें यथातथ्य उच्चारण करिते, यापलीकडे ती पदरचें कांहीं करूं शकत नाहीं. तबकडीवरील लेखाच्या सत्यासत्याशीं ध्वन्युच्चारक डबीचा कांहीं संबंध नसतो. त्याप्रमाणें कवि आपल्या काव्यापासून पूर्णपणें अलिप्त असतो काय? नाहीं. काव्य हें कवीच्या ज्ञात गोष्टींचेंच एक तऱ्हेचें मिश्रण असतें. काव्यांतील नावीन्याचा उगम ज्ञाताच्या पलीकडील अगदीं पथक् व अज्ञात अशा प्रदेशांत नसून कवीच्या मनांतच असतो. जन्मापासून सांचत आलेल्या अगणित वैयक्तिक अनुभूतींनीं खळबळणारें परंतु एरव्हीं इच्छाशक्ति व विवेक यांच्या दडपणाखालीं संथ अचल भासणारें जें अज्ञात मन असतें, त्यापासून कवितेचा उगम होतो. कोणत्याही कारणानें वरचा पापुद्रा जरा बाजूला झाला कीं आंत जणूं काय गुदमरल्यामुळें बाहेर पडूं इच्छिणाऱ्या गोष्टी ज्वालामुखींतील लाव्हारसाप्रमाणें अथवा उतास जाणाऱ्या द्रवाप्रमाणें कमीअधिक जोरानें व कांहीं एका अपूर्व निश्चित क्रमानें बाहेर पडूं लागतात. याच प्रकारास आपण स्फूर्ति म्हणतों. स्फूर्तीचा हा ओघ कालेंकरून कमजोर होत जाऊन बंद पडतो. हा ओघ हुकमी व कष्टसाध्य नाहीं; या क्रियेंतील कांहीं गोष्टी अद्यापि अज्ञात, गूढ आहेत एवढ्याचसाठीं त्याला दैवी म्हणायचें असल्यास गोष्ट निराळी. नाहींतर दैवी असें यांत काय आहे? शिवाय प्रतिभा स्फुरण पावून काव्यनिर्मिति होऊं लागली कीं मनाची एक प्रकारची तन्मयता होते. गणिताचा प्रश्न सोडवितांना गणिततज्ज्ञाची अशीच तन्मयता होते. परंतु केवळ तन्मयता झाल्यानें गणिताचा प्रश्न जसा सुटतोच असें नाहीं, त्याप्रमाणें केवळ तन्मय झाल्यानें प्रतिभेचें स्फुरण होऊन काव्यप्रवाह वाहूं लागेल असें मुळींच नाहीं. तन्मयतेचा सारखा भंग होत राहिला तर काव्यप्रवाह थांबेल. पण मन पुन्हां तन्मय झाल्यानें तो काव्यप्रवाह सुरू होईलच अथवा पूर्वी तो वाहिला असता तसाच वाहील असें नाहीं. तन्मयता ही काव्यनिर्मितीला अनुकूल अशी स्थिति आहे. काव्यनिर्मितीचें आद्यकारण ती नव्हे. तथापि 'जगाविषयीं उदासीन अशी' सृष्टीशीं तन्मयता प्राप्त झाली तर कोणालाही 'अज्ञातांतील निगूढ गीतींचे पडसाद उमटवितां येतील' असा केशवसुतांचा आशावाद आहे.

"नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी,
पण शेतकरी
सनदी तेथें कोण, वदा?—
हजारांतुनी एखादा!

तरी न येथुनि वनमाला
आणायला
अटक तुम्हांला ;
मात्र गात हा मंत्र चला—
झपूर्झा गडे झपूर्झा !" ४

अहो, अज्ञाताचें काव्यरान अगदीं मोकळें आहे. क्वचितच एखादा शेतकरी सनद घेऊन तेथें जातो म्हणजे काय ? तुम्ही सारे जाऊन लूट करून कां आणीत नाहीं ? 'झपूर्झा गडे झपूर्झा'! हा मंत्र मात्र म्हणत जा. 'तिळा उघड' म्हटल्याबरोबर अरबी 'निशासहस्रीं'तील चाळीस चोरांच्या गुहेच्या तोंडाशीं असलेली शिळा ज्याप्रमाणें दूर होऊन आंतील संपत्ति लुटायला मुभा देई, त्याप्रमाणें 'झपूर्झा गडे झपूर्झा !' हा मंत्र उच्चारिल्याबरोबर अज्ञातांतील अफाट वैभव तुम्हांला उपलब्ध होईल.

पण 'झपूर्झा गडे झपूर्झा !' हा मंत्र गात जा म्हणजे काय करीत जा ? पंचाक्षरी, षडाक्षरी मंत्रांत एक प्रकारचें अद्‌भुत सामर्थ्य असतें म्हणून गूढविद्येचे नादी सांगतात; तसें कांहीं सामर्थ्य 'झपूर्झा' या त्र्यक्षरी शब्दांत आहे काय ? का हा मंत्र जपत जा याचा जेणेंकरून प्रापंचिक उपाधींचा विसर पडेल व मन तन्मय होईल असें कांहीं तरी करा एवढाच मर्यादित अर्थ घ्यायचा ? 'ग्यानबा तुकाराम' म्हणत झांजा वाजवीत फेर धरून नाचत राहिल्यातें तेवढ्यापुरती एक प्रकारची तन्मयता येऊन हर्षखेद मावळतात ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. पण तेवढ्यानें मनुष्याचें एरव्हींचें मन निर्मल होऊन त्याला दैवी संपत्तीचा लाभ हटकून होतोच हें अनुभवसिद्ध नाहीं. मग 'झपूर्झा गडे झपूर्झा' हा मंत्र गात राहिल्यानें 'अज्ञातांतील निगूढ गीति' ऐकूं येऊन काव्यस्फूर्ति होईल का ? तशी ती होत असती तर झिम्मा खेळण्यांत 'झिम् पोरी झिम्' म्हणत देहभान हरविणाऱ्या पोरी कवयित्री कां होऊं नयेत ? उत्तर उघड आहे. तन्मय होण्यानें कोणाला कवि होतां येत नाहीं. कवि हा उपजत असावा लागतो. असो. त्या अज्ञाताच्या प्रांतांत चिद्‌घनचपलेला काय दिसतें ?

"पुरुषाशीं त्या रम्य अती
नित्य प्रकृति
क्रीडा करिती;
स्वरसङ्गम त्या क्रीडांचा
ओळखणें हा ज्ञानाचा
हेतु; तयाची सुंदरता
व्हाया चित्ता-

प्रत ती ज्ञाता,
वाडें कोडें गा आतां––
झपूर्झा गडे झपूर्झा !" ५

पुरुष-प्रकृतीच्या क्रीडा म्हणजे सृष्टींतील घडामोडीच ना ? मग प्राचीन सांख्य-वादांतील पारिभाषिक संज्ञांचें अवडंबर कां ? बाकी त्या तत्त्ववादांतील सोंवळचा प्रतिष्ठित शब्दांचा दुसऱ्यावर वजन पाडायला चांगलाच उपयोग होतो हें कबूल केलें पाहिजे. पण सृष्टीच्या घडामोडी या अज्ञात अतीन्द्रिय अशा प्रांतांत होतात का या इंद्रियगोचर अशा सृष्टींतच होतात ? सृष्टीच्या साऱ्याच घडामोडी रम्य आहेत का त्यांचा स्वरसंगम ओळखणें यांत रम्यता आहे ? जिज्ञासु वैद्याला एखादा दुर्मिळ रोगाचा रोगी पाहूनही जो फार आनंद होतो तो रोगी रम्य आहे म्हणून नव्हे तर डोकें चालवून, निदान करायला, प्रयोग करून पाहून आपली जिज्ञासा तृप्त करायला संधि त्या ठिकाणीं मिळते म्हणून. या दृष्टीनें जिज्ञासु मनाला सृष्टीच्या घडामोडींचा अभ्यास हा नेहमींच गम्य व रम्य वाटतो. 'पुरुष-प्रकृतींच्या क्रीडांचा स्वरसंगम' म्हणजे या घडामोडींचे नियम शोधून काढणें हा ज्ञानाचा हेतु आहे. या सृष्टींत जेथें जेथें विसंवाद आढळतो, तेथें तेथें ज्ञानाच्या साहाय्यानें मूलभूत मानण्यांत आलेला संवाद पाहून समाधान मिळवणें हा तत्त्वज्ञानाचा हेतु आहे. परंतु काव्याचें कार्य तें नाहीं. क्वचित् एखादे वेळीं कवीस अंतःस्फूर्तीनें एखादा नियम, एखादें तत्त्व भासमान होईल व तो त्यास कवितेंत मांडीलही; पण शास्त्रीय ज्ञान मिळविणें वा शास्त्रीय तत्त्वें शोधून काढणें व सांगणें हा काव्याचा हेतु नाहीं. सामान्य नीतितत्त्वें अथवा तात्त्विक सिद्धान्त अलंकारिक भाषेनें सांगणें म्हणजे शोधक शास्त्रज्ञ वा तत्त्वज्ञ होणें नव्हे. एखाद्या गोष्टीमुळें कवीच्या संस्कारक्षम मनाला होणारी भावना, संवेदना शब्दांच्या द्वारा इतरांस प्रतीत करून देणें हें काव्याचें आद्यकर्तव्य आहे. एखादें सुंदर दृश्य पाहून कवीला जो आनंद झाला तो त्यानें कविता लिहून दुसऱ्यास प्रतीत करून द्यावयाचा असतो.

केशवसुत म्हणतात कीं, सृष्टीच्या घडामोडींतील सुंदरता तुम्हांला पाहायची असेल तर 'झपूर्झा गडे झपूर्झा !' हा मंत्र वाडें कोडें गा. पण हा मंत्र म्हणत राहून प्रतिभा जागृत होईलच असें जर नाहीं, तर सृष्टींतील सुंदरतेचा अनुभव यायचा कसा ? पण कवि म्हणून तो घेतां आला नाहीं तरी रसिक काव्यवाचक म्हणून तो घ्यायला कांहींच हरकत नाहीं. परंतु या ओळी रसिक वाचकांस उद्देशून नसून कवि होऊं इच्छि-णाऱ्यांस उद्देशून आहेत; कारण

"सूर्यचन्द्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें

खुडित खपुष्पें फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें
धरा जरा निस्संगपणा,
मारा फिरके,
मारा गिरके
नाचत गुंगत म्हणा म्हणा—
झपूर्झा गडे झपूर्झा !"

'सूर्यचन्द्र आणिक तारे' हे ज्ञाताच्या कुंपणाच्या पलीकडे नाहींत; ते इंद्रियगम्य अशा प्रदेशांतच परिभ्रमण करीत आहेत. ते कोणतीं खपुष्पें खुडीत फिरत आहेत ? एखाद्या अशक्य असंभवनीय गोष्टीचा उल्लेख 'खपुष्पानें' करितात. सूर्यचन्द्र कोणत्या अशक्य गोष्टी घडवून आणीत आहेत तें कळत नाहीं. सूर्य-ताऱ्यांच्या परिभ्रमणाचे गूढ नियम वा हेतु येथें अभिप्रेत असतील काय ? पण ते कवींनीं शोधून काढलेले दिसत नाहींत. तें कार्य ज्योतिष्यांनीं केलें आहे. असो; सूर्य-चन्द्राच्या उच्च वातावरणांत जायचें असेल तर केशवसुत म्हणतात कीं 'झपूर्झा गडे झपूर्झा' म्हणा आणि गिरके फिरके मारा व त्या खेळांत देहभान हरपून जरा निःसंग व्हा. येथेंही पूर्वीचाच आक्षेप उद्‌भवतो. तल्लीन व्हायचें कसें आणि केवळ तल्लीन झाल्यानें ग्रह-तारे ज्या अज्ञाताच्या प्रदेशांत खपुष्पें खुडीत फिरत आहेत तेथें जातां येईल काय ? कविता वाचल्यानें त्या प्रदेशांत गेल्यासारखें एखादे वेळीं वाटेल, पण खरोखर तेथें जातां येईल का ?

प्रो. वैजनाथ काशिनाथ राजवाडे आपल्या 'केशवसुतांची कविता—चर्चा' या लेखमालेंत म्हणतात कीं, "'झपूर्झा' या कवितेचें रहस्य कळत नाहीं. तथापि 'तुतारी'-पेक्षांही ही कविता आनंद देते . . . ही कविता अत्युत्तम व अत्युत्कृष्ट आहे." कवितेचें रहस्य न कळतांही तिच्यापासून आनंद होत असेल तर तो मूळ विषयामुळें न होतां तदनुषंगिक गौण गोष्टींपासून होत असला पाहिजे हें उघड आहे. या कवितेचें रहस्य तसें गूढ नाहीं. तन्मयतेच्या स्थितींत प्रतिभा स्फुरली कीं ती कवीला ज्ञाताच्या कुंपणावरून पलीकडे घेऊन जाऊन त्याला कशीं रम्य दृश्यें दाखविते व गूढ गीतें ऐकविते आणि केवळ तन्मय होण्याचा अवकाश कीं कसें कोणालाही जातां येऊन ते दिव्य अनुभव घेतां येतात याचें 'झपूर्झा' या कवितेंत कवीनें अलंकारिक भाषेनें वर्णन केलें आहे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे या कवितेंत कवीनें काव्यतंद्रेचें आणि काव्यस्फूर्तीचें वर्णन केलेलें आहे. या वर्णनावरून कवीचें माहात्म्य न्यूटन-आइन्स्टाइनच्या माहात्म्याच्या तोडीचें आहे असा काव्यगौरवाचा ध्वनि निघतो आणि अर्थातच तो कवींना प्रिय वाटणें स्वाभाविक आहे. कवि हा दैवी सामर्थ्यवान्, अज्ञात-विहारी, संदेष्टा व तत्त्वज्ञानी आहे अशी एक भ्रामक समजूत प्रचलित आहे. अशा समजुतीच्या लोकांना 'झपूर्झा' ही कविता पराकाष्ठेची आवडल्यास नवल नाहीं. पण केशवसुतांची विचार-

सरणी सदोष कशी आहे हें मागें विवेचनांत दाखवून देण्यांत आलेंच आहे. परंतु कवी कल्पनेच्या साहाय्यानें आपल्या विषयाची मांडणी गोचरवाचक भाषेंत मांडतो. ही कारागिरी या कवितेंत चांगलीच पाहायला मिळते. प्रारंभींच 'कंटकशल्यें वोथटतात पण मखमालीची लव वठते', 'व्यर्थीं अधिकच अर्थ वसे' वगैरे विधानांनीं चमत्कार व कुतूहल हीं वाटूं लागतात, तोंच ज्ञाताच्या कुंपणावरून पलीकडे उडून लखलखत राहणाऱ्या चिद्घनचपलेच्या प्रकाशांत अंधुकतेमुळें अधिकच कुतूहलजनक वाटणाऱ्या आकृतींचें गूढ गायन चालत असल्याचें दृश्य दिसतें. लगेच या मोकळ्या रानांत जाऊन हवी ती वनमाला लुटून आणायला कुणालाही अटक नाहीं असें जाहीर आश्वासन मिळतें. या प्रदेशांत पुरुष-प्रकृतीच्या संवादी लीला चालल्या आहेत आणि ग्रह-तारे जणूं काय दिव्य श्रेयांचीं खपुष्पें खुडीत नाचत आहेत अशीं दृश्यें पुढें येतात. हीं दृश्यें मनोज्ञ आहेत यांत शंका नाहीं. यांतच चित्, निगूढ, मंत्र, पुरुष, प्रकृति, ज्ञान-हेतु, सूर्य-चंद्र-तारे, खपुष्पें, निःसंगपणा इत्यादि ब्रह्मज्ञानाचें व ब्रह्मानंदाचें उच्च वातावरण सूचित करणारे शब्द आढळले कीं वाचकाला आपण उदात्त अशा भूमिकेवर गेल्याचा आरंभीं आरंभीं तरी भास होतो आणि कारागिरीमुळें, बाह्य भपक्यामुळें डोळे दिपून क्षणभर समाधान होतें. पण 'क्षणैः क्षणैः यन्नवतामुपैति' असें जें त्यांतच खऱ्या कलेचा विलास असतो. न्याहाळून पाहिल्यावर ज्या कवितेंतील विसंगति अधिकाधिक प्रतीत होऊं लागते ती खरी कलाकृति नव्हे. तल्लीनतेंतील चमत्कार अलंकारिक भाषेनें वर्णन करण्यापेक्षां एखाद्या दृश्यानें तल्लीन होऊन कवीनें त्या दृश्यावर कविता लिहिली असती तर ती अधिक काव्यमय व भोवनोद्दीपक झाली असती. परंतु कवीनें कांहीं तत्त्वें शोधून काढून तीं शिकविलीं पाहिजेत या विचारानें केशवसुत ग्रस्त झाले होते आणि त्यामुळें त्यांच्या कवितेला एक चमत्कारिक वळण लागत गेलें. 'पुष्पाप्रत' (पृ. ९०) आणि 'फुलांतले गुण' (पृ. ११०) या त्यांच्या कविता बरोबर एक वर्ष आणि एक पंधरवडा यांच्या अंतरानें लिहिल्या गेल्या आहेत. पण पहिल्यांतली भावनोत्कटता दुसरींत मुळींच नाहीं. परंतु पहिल्या कवितेंत तोतयें तत्त्वसंशोधन नाहीं. तें दुसरींत मात्र आढळतें. या दोन कवितांची तुलना फार बोधप्रद होईल. "झपूर्झा ही कविताच नव्हे, तींत शुष्क तत्त्वज्ञान आहे." असें कविवर्य तांबे यांनीं संभाषणाच्या ओघांत एकदां मत दिलें होतें. वस्तुतः तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें 'झपूर्झा' ही कविता सदोष आहे. काव्यदृष्ट्या ती निष्कारण दुर्बोध व रूक्ष आहे. कारागिरीचा बाह्य भपका मात्र तिच्यांत आहे म्हणून पुष्कळांना ती न समजतांही आवडते. याच कवितेनें मराठी आधुनिक कवितेंत गूढगुंजनाचें खूळ पसरविलें.

(काव्य चिकित्सा, प्रगती साप्ताहिक : १९३०–३१
द्वारा : काव्य चिकित्सा, व्हीनस प्रकाशन, ६४;
पृ. क्र. ७३–८३)

१७

केशवसुत–व्हिट्मन्–वर्डस्वर्थ

लेखक : श्री. प. मा. टोळे

केशवसुतांची कविता वाचल्यानंतर इंग्रजी काव्याशीं परिचित असणाऱ्या वाचकांना अमेरिकन क्रांतिकारक व्हिट्मन् आणि आंग्ल क्रांतिकारक वर्डस्वर्थ या कविद्वयांची आठवण होणें साहजिकच आहे. केशवसुतांच्या बंडखोरीविषयीं लिहितांना सुप्रसिद्ध टीकाकार माडखोलकर लिहितात, 'वर्डस्वर्थनें इंग्लंडांत किंवा व्हिट्मन्नें अमेरिकेंत जें केलें तेच केशवसुतांनीं महाराष्ट्रांत केलें,' आणि ह्या विधानाची सत्यता पाहण्यासाठीं आपणांस व्हिट्मन् आणि वर्डस्वर्थ ह्यांच्या काव्याकडे दृष्टिक्षेप करावा लागेल.

१८१९ त जन्मल्यानंतर वडिलांच्या हयातींत निरनिराळ्या प्रकारचे उद्योग करून १८५५ त वडिलांच्या निधनानंतर व्हिट्मन्नें आपल्या काव्य-संसारास सुरवात केली. पुढील वर्षीच आपल्या बारा कवितांचा संग्रह (" Leaves of Grass ") ह्या नांवाखालीं त्यानें प्रसिद्ध केला आणि १८५७त आणखी बत्तीस कविता त्यांत घालून व्हिट्मन्नें आपल्या संग्रहाची दुसरी आवृत्ति काढली. याच आवृत्तीनें त्याला क्रांतिकारक ठरवलें. सडेतोडपणें स्वतःच्या मनाला जें वाटलें तें त्यानें आपल्या कवितांत लिहून काढलें असल्यामुळें त्याच्यावर खटला होणार अशी दाट वदंता सगळीकडे पसरली होती. आणि ज्यावेळीं या संग्रहाची प्रत सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत पडली तेव्हां तर सरकारी नोकरींतून त्याला काढूनच टाकण्यांत आलें होतें. परंतु लोकांत त्याची

चहा झाली असल्यामुळें त्याच्यासाठीं सर्वांनीं रदबदली केली व पुन्हां त्याला सरकारी नोकरीवर घेतलें.

व्हिट्मन्च्या वंडखोरीचें मूळ त्याच्या स्त्री-पुरुषांतील लैंगिक संबंधावरील स्पष्ट शब्दांत केलेल्या काव्यरचनेंत (Sex poems) आहे. त्यांत त्याला नीतितत्त्वांचें खंडण करावयाचें नव्हतें, किंवा रस्त्यांतील एखाद्या लफंग्याप्रमाणें फाजिलपणाचे बोल बोलून लोकांत आपणाविषयीं कुतूहल उत्पन्न करावयाचें नव्हतें; तर निसर्गसिद्ध व निसर्गनियमित गोष्टीचें सत्यस्वरूप साध्या शब्दांत जगापुढें मांडावयाचें होतें. या गोष्टीची इतकी स्पष्ट मांडणी अगदींच अकल्पित असल्यामुळें लोकांच्या भावनांवर या कवितांनीं एकदम आघात केला व नीतितत्त्वांना झुगारून दिल्याचा भास सरकारला झाला ! परंतु व्हिट्मन्च्या एकंदर काव्याकडे पाहिल्यास आपणांस असेंच आढळून येईल कीं वायरन्प्रमाणें व्हिट्मन् विलासी (Passionate) नव्हता किंवा आपल्या प्रीतिदेवतेशीं रममाण होण्याची ओढ त्याला कधींहि लागली नव्हती; आणि त्याच्या टीकाकारांनीं देखील या कविता (Sex poems) वर "अनीतिपर" असा आरोप केलेला नाही ही अभिनंदन करण्यासारखी गोष्ट आहे !

केशवसुतांचें व्हिट्मन्शीं या बाबतींत मुळींच साम्य नाहीं. केशवसुत आणि व्हिट्मन् ह्यांच्यांतील साम्य दोघांच्याहि ठिकाणीं असणाऱ्या दांडग्या आत्मविश्वासांत आहे ! व्हिट्मन्ला आपल्या अंगांत वसत असलेल्या शक्तीची जाणीव होती. आपल्या योग्यतेची त्याला पूर्ण कल्पना होती व हा आत्मविश्वास आपल्या कवितांत प्रतीत करण्यास तो कचरला नाहीं.

"I will leave all and come and make the hymns of you;
None has understood you, but I understand you
None but would subordinate you; I only am he who will
never consent to subordinate you."

* * *

Painters have painted their swarming groups, and the centre
figure of all;
From the head of the centre figure, spreading a nibus of
gold coloured light.
But I paint myreads of head,
but paint no head
withont its nimbus gold coloured light.

From my hand, from the brain of every man, and woman
it effulgently flowing for ever.
O ! I could sing such grandeurs and glories about you !

किंवा

You will never understand who I am or what I mean
But I shall be good health to you nevertheless,
And filter and fiober your blood.

अशा प्रकारचे आत्मविश्वासाचे बोल ठिकठिकाणीं व्हिट्मन्च्या काव्यांत वाचावयास मिळतात. केशवसुतांच्या 'कविता आणि कवि', 'कवितेचें प्रयोजन', 'कवि', 'स्फूर्ति', 'आम्ही कोण ?' वगैरे कविता आपण वाचूं लागलों तर व्हिट्मन्प्रमाणेंच केशवसुतांना देखील आत्मसामर्थ्याची जाणीव होती असें दिसून येईल. आमच्या अंगांत स्फूर्ति संचरली म्हणजे

कल्पतीची मग धरुनी नौका व्योमसागरावरि जाऊं,
उडुरत्नें या गरीब धरेला तेथून फेकूनि या देऊं ।
अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं
हार न खाऊं रतीभरी ।

अशा तऱ्हेचे उद्गार केशवसुत काढतात; आणि ह्या आत्मसामर्थ्याची जाणीव त्यांना 'तुम्ही कोण ?' असा खडा सवाल कोणीं तरी टाकला तेव्हां अतोनात टीका झाली आणि ते उत्तर देतात

'आम्ही कोण म्हणून काय पुसतां ?– आम्ही असूं लाडके–
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया,
विश्वीं या प्रतिभाबलें विहरतों चोंहीकडे लीलया,
दिक्कालांतून आरपार अमुची दृष्टी पहाया शके ।
* * *
आम्हांला वगळा– गतप्रभ झणीं होतील तारांगणें,
आम्हांला वगळा– विकेल कवडीमोलावरी हें जिणें ।'

स्वत:विषयीं असणाऱ्या ह्या उच्च भावनांच्या साम्यांतच केशवसुत आणि व्हिट्मन हे परस्परसूचक आहेत, नाहींतर दोघेहि बंडखोर म्हणून जरी साम्य दर्शवीत असले

तरी त्यांच्या बंडखोरवृत्तींत मुळींच साम्य नाहीं. एवढें मात्र खरें कीं आजपावेतों चालत आलेल्या रूढीस (Tradition) दोघांनीं झुगारून दिलें,– काय झुगारून दिलें तें मात्र दोघांच्याहि बाबतींत अगदीं भिन्न आहे. व्हिट्मन्च्या क्रांतिकारक प्रश्नाला केशवसुतांनीं ओझरता स्पर्शदेखील केला नाहीं व ह्या दृष्टीनें पाहिल्यास केशवसुत आणि वर्डस्वर्थ ह्यांतच अधिक साम्य आढळतें.

वर्डस्वर्थला निसर्गाचा कवि (Nature Poet) म्हणून जरी जग ओळखत असलें तरी विश्वांत लपून वसलेल्या अतिरम्य आणि शाश्वत सत्यांचें संशोधन करण्याएवढीच त्याची क्रांति मर्यादित नव्हती, तर निसर्गांतील या शाश्वत सत्यांची ठरावीक संकेत दूर सारून, ठराविक काव्यरचनापद्धति बाजूस करून, आणि ठराविक काव्यमर्यादांचें उल्लंघन करून आतांपावेतों अपरिचित अशा साध्या व सोप्या भाषेंत (Biblical Language) जी त्यानें मांडणी केली त्यांत देखील ही क्रांति सामावलेली होती. पोप कवीनें घालून दिलेल्या काव्यमर्यादा आणि काव्यनियमांप्रमाणें सर्व कवि काव्यरचना करीत होते. आणि या बंधनांत वृत्तांचींदेखील बंधनें होतीं ! वर्डस्वर्थनें ज्याप्रमाणें काव्यविषयांत एक नवीन प्रदेश निर्माण केला त्याचप्रमाणें त्यानें पूर्वीच्या कवींनीं घालून दिलेलीं बंधनें देखील झुगारून देऊन नवीन काव्यरचनापद्धति सुरू केली. त्यानें वृत्तांचीं बंधनें पाळलीं नाहींत, तेच तेच काव्यसंकेत मानले नाहींत, आणि "आम्हांला बंधनें नकोत" अशा तऱ्हेचा पुकार करतांना 'भावनांच्या प्रबलतेमुळें होणारी सहजस्फूर्त रचना" अशी काव्याची व्याख्या केली. १७९८ सालीं वर्डस्वर्थ आणि कोलरिज् ह्या कविद्वयांनीं प्रसिद्ध केलेल्या क्रांतिकारक काव्यसंग्रहाला (Lyrical Ballads) प्रस्तावना लिहितांना वर्डस्वर्थनें आपला काव्य लिहिण्याचा हेतु आणि दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. सामान्य लोक जी भाषा बोलतात त्याच भाषेंत सामान्य लोकांच्याच जीवितांतील विविध प्रसंग रेखाटण्याचा प्रयत्न मी करणार आहें असें वर्डस्वर्थनें लिहिलें आहे. साधारण गोष्टींमधील असाधारण अर्थ दाखविणें हेंच त्याचें ध्येय होतें. (To make the common uncommon)

केशवसुतांनीं तरी या पलीकडे काय केलें ? माडखोलकरांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें सांगतां येईल कीं, "पारमार्थिक किंवा पौराणिक विषयांवर खिळलेलें मराठी कवितेचें चित्त केशवसुतांनीं ऐहिकाकडे– सामान्य लोकांच्या रोजच्या आयुष्याकडे– वळविलें. सम्राटांचे दिग्विजय, योध्यांचें वीरचरित व कामिनीची रूपसंपदा हेच कवितेचे विषय होऊं शकतात असें नाहीं; गिरणींत खपणारा मजूर अगर शेतांत राबणारा नांगऱ्या ह्यांच्याहि जीवितांत प्रतिभेला भुलविणारी जादू असते; हरिभजन किंवा पुराणप्रवचन केल्यानें वाणीचें जितकें सार्थक होईल, तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक सार्थक अनाथांचीं व पतितांचीं दुःखें समाजाच्या वेशीवर टांगल्यानें होईल ही जाणीव महाराष्ट्रांत प्रथम केशवसुतांनीं उत्पन्न केली."

वर्डस्वर्थप्रमाणें केशवसुतांना देखील विश्वामध्यें ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव झाली होती आणि विश्वांतील प्रत्येक वस्तूंत ओतप्रोत अर्थ भरलेला असून तिच्यांत आपणांस कांहीं ना कांहीं शिकविण्यासारखें आहे याची देखील त्यांना जाणीव होती. 'एक खेडें" या वळणें गांवाचें वर्णन करितांना ईश्वराचें वास्तव्य निसर्गातच आहे असें निक्षून सांगितलें आहे. केशवसुत म्हणतात,

'देवळीं त्या देवास बळें आणा,
परी राहे तो सृष्टिमध्यें राणा'

"फुलांतले गुण" ही कविता वर्डस्वर्थच्या (Daisy) या कवितेसारखीच आहे. 'डेझी' हे एक साधें, इवलेसें फूल पण त्याला पाहून देखील वर्डस्वर्थला अंतर्भेदक दृष्टि प्राप्त होते. केशवसुतांना देखील लहान लहान गोष्टींत ज्ञातांतून अज्ञातांत, प्रत्यक्षांतून अपरोक्षांत नेण्याचें सामर्थ्य आढळून येतें. म्हातारी, झपूर्झा (जा पोरी जा ?) फूल, भृग केशवसुतांना अंतर्भेदक दृष्टि प्राप्त करून देतात आणि अत्यंत उच्च अशा वातावरणांत ते रममाण होतात. "सृष्टि आणि कवि' या कवितेंतील पुढील चरणांत वर्डस्वर्थच्या निसर्गाच्या कल्पनांची सुंदरशी समालोचनाच केली आहे कीं काय असा भास झाल्याशिवाय राहात नाहीं.

'पुष्पामध्यें प्रकट होय न जें जराही
सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं;
ज्याचा ध्वनि न उमटे खगकूजितांत
नाहीं निगूढ इतिहास असा जगांत !'

वर्डस्वर्थनें देखील अशाच तऱ्हेचा दणदणीत सिद्धांत आपल्या Tables Turned ह्या कवितेंत अत्यंत जोरदार परंतु सोप्या शब्दांत मांडला आहे.

One impulse from a vernal wood
May teach you more of man,
Of moral, evil and of good
Than all the sages can.

सुप्रसिद्ध Ode on the Intimations of Immortality ह्या कवितेची मध्यवर्ति कल्पना हीच आहे कीं "शैशवांत आपणांभोंवतीं ईश्वराचें वास्तव्य असतें. (Heaven lies about us in our infancy), परंतु जसजसें आपण मोठे होत जातों तसतसें ऐहिकांतील आधिभौतिकाचें दडपण आपणावर अधिकाधिक होत जातें व आपण ईश्वरापासून दूरदूर जातों." आपणांमध्यें लहान

मुलाला देव कल्पिण्याची कल्पना रूढ आहेच. हीच कल्पना केशवसुत आपल्या म्हातारी ह्या कवितेंत विशद करतात. म्हातारी दूर उडून जात असतांना ते पाहतात तेव्हां त्यांना वाटतें कीं मी मोठा आहें– ईश्वरापासून दूर आहें म्हेणून ही दूरदूर जात आहे व म्हणूनच ते म्हणतात कीं–

वयस्कता माझी म्हणुनि जर करिसी इतराजी,
तर माझी सोनी पाहुनी, ये गे परतोनी ।

आणि सोनीप्रमाणेंच आपणहि सुख अनुभवावें असें वाटल्यावरून ते म्हणतात.–

मज वय विसरूं दे मुग्ध-मुग्ध-बाल्यीं उतरूं दे ।

वर्डस्वर्थच्या निसर्गातील लपलेला अर्थ दाखविण्याच्या प्रयत्नांत निसर्गातील मनुष्याला अंतर्दृष्टि प्राप्त करून देणाऱ्या स्वरूपाचीच (Spiritual aspect) त्याला जास्त जास्त ओळख पटली आणि वर्डस्वर्थच्या या आध्यात्मिक वाजूचाच केशवसुतांवर वराच परिणाम झालेला दिसून येतो. वर्डस्वर्थला निसर्गातील अनलंकृत वनश्री देखील समाधींत गुंग करून टाकीत असे आणि प्रत्येक वस्तूचा अंतर्गत अर्थ जाणण्याचें सामर्थ्य त्याच्यांत उत्पन्न करीत असे (To see into the life of things) केशवसुतांना ह्या ब्रम्हानंदाची, ह्या समाधीची ओढ अतोनात लागली होती आणि त्यांनीं तो आनंद, ती समाधी वर्डस्वर्थप्रमाणें अनुभविली देखील ! 'म्हातारी', 'लहान मुलाचा फेर', 'फूल' इत्यादिकांत त्यांनीं हा आनंद अनुभविला. 'हरपलें श्रेय' या गूढ (कारण समजत नाही) कवितेंत हरपलेलें श्रेय सांपडण्याची, थोडीशी का होईना, आशा त्यांना अरण्यांत, निसर्गांतच वाटते.

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी
कारण कांहीं खूण तिथें
मम त्या श्रेयाची पटते.

यावरून केशवसुत आणि वर्डस्वर्थ यांचें परस्परसूचकत्व किती नियमित आहे याची कल्पना करण्यास हरकत नाहीं.

व्हिट्मन् आणि वर्डस्वर्थ ह्या दोन जगन्मान्य क्रांतिकारक कवींशीं केशवसुतांचें असें विलक्षण साम्य पाहिल्यानंतर एक प्रश्न आपोआपच उद्भवतो. वर्डस्वर्थप्रमाणें केशवसुतांचें काव्यक्षेत्र फक्त निसर्गापुरतें मर्यादित नव्हतें. व्हिट्मन्चें व त्यांचें आत्म-सामर्थ्याची जाणीव करून देणारें काव्य-वाङ्मय सोडून दिलें तरी देखील व्हिट्मन्-

प्रमाणेंच त्यांचें काव्यक्षेत्र विशाल होतें. व्हिट्मन् स्त्रीपुरुषांच्या एका जिव्हाळ्याच्या प्रश्नावर केंद्रीभूत झाला असला तर केशवसुत आपल्या समाजाला सुधरविण्याच्या, त्याच्या चुका त्याच्या नजरेस आणून देण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नावर केंद्रीभूत झाले होते. व्हिट्मनला लोकांच्या सुखासाठीं तळमळ लागली असेल (Poet of Democracy) तर केशवसुतांनादेखील आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी–

" ..... ही हासाची
रजनी केव्हां जाइल विरुनी साची ?
स्वतंत्रतेची पहांट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ?'

अशी तळमळ सारखी लागून राहिली होती. असें असतांना व्हिट्मन् आणि वर्डस्वर्थ ह्यांना त्यांच्या हयातींत, त्याचप्रमाणें त्यांच्या पश्चात् देखील मिळालेलें अप्रतिम यश, सर्व जगानें मुक्तकंठानें गाइलेलीं स्तुतिस्त्रोत्रें, केशवसुतांच्या वांट्याला त्यांच्या हयातींत तर राहोच पण त्यांच्या पश्चात् देखील कैक वर्षेपर्यंत कां येऊं नये ? व्हिट्मन्चें नांव अमेरिकन वाङ्मयाच्या इतिहासांत ज्याप्रमाणें सुवर्णाक्षरांनीं कोरलें गेलें, वर्डस्वर्थला ज्याप्रमाणे इंग्रजी वाङ्मयांत चॉसर, शेक्सपियर, मिल्टन सारख्या वाङ्मय-सूर्याच्या बरोबरीला स्थान मिळालें त्याप्रमाणें केशवसुतांचें नांव मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत लिहिलें जाईल; परंतु त्यांना मिळालेल्या तत्कालीन आणि नंतरच्या उज्ज्वल कीर्तीचा शतांश देखील केशवसुतांच्या वांट्याला आजपावेतों तर आला नाहींच, पुढें केव्हां येईल कुणास ठाऊक !

केशवसुत, व्हिट्मन्, वर्डस्वर्थ यांनीं ज्या परिस्थितींत काव्यनिर्मिति केली तिच्याकडे जर आपण लक्ष दिलें तर या प्रश्नाचें उत्तर दूर नाहीं. वर्डस्वर्थनें लिहिलेल्या निसर्गावरील काव्यांच्या पाठीमागें लहानपणापासूनचें त्याचें निसर्गाशीं असणारें साहचर्य होतें. निसर्गाच्या सान्निध्यांतच वाढल्यामुळें व रूसोच्या शिकवणीमुळें घडून आलेल्या फ्रेंच क्रांतीशीं निकटचा संबंध आल्यामुळें निसर्ग आणि मानव ह्यांच्या परस्पर-संबंधांचा त्याला व्यक्तिगत (Personal) अनुभव आला होता. स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलेल्या व स्वतः अनुभवलेल्या घटनांनी त्याच्या भावना हलविल्या गेल्या व अशा रीतीनें प्रबल झालेल्या भावनांची सहजस्फूर्त शब्दरचना काव्यात्मक झाल्यास त्यांत नवल तें काय व तिच्यांतील जिव्हाळा आणि काव्यगुण चित्त हलवून सोडणारें असल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ?

त्याचप्रमाणें व्हिट्मन्चा काव्यसंभार वयाच्या छत्तीस वर्षेपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं प्रत्ययास आलेल्या त्याच्या अनुभवावरच आधारलेला होता. त्यानें छापखाना धुंडाळला होता; त्यानें मास्तरगिरी केली होती; त्यानें पत्रकाचें संपादकत्व पत्करलें

होतें; राजकारणांत त्यानें पाऊल टाकलें होतें; सुतारकामांत त्यानें आपला हात चालविला होता; आपापसांतील विनाशक दुहीच्या (Civil War) वेळीं जखमी झालेल्यांची शुश्रूषा करण्यासाठीं त्यानें स्वतःला वाहून घेतलें होतें! त्यानें सरकारी कारकून म्हणूनहि नोकरी पत्करली होती. "जग त्यानें डोळा भरून पाहिलें", समाजांतील विविध स्वभावांच्या व्यक्तींच्या सहवासांत तो आला होता. त्यामुळें जगाचें संपूर्ण दर्शन त्याला झालें होतें आणि ह्या सर्व अनुभवाची कविता लिहिण्यास सुरवात करतांना त्यानें उपयोग करून घेतला. या दृष्टीनें पाहतां वर्डस्वर्थची कविता रम्य आणि जिव्हाळ्याची आहे, तितकीच जिव्हाळ्याची आणि रम्य व्हिट्मन्ची कविता देखील आहे यांत शंका नाहीं.

परंतु यानंतर केशवसुतांच्याकडे वळल्यास आपल्या पदरीं निराशाच येते. केशवसुतांनीं निसर्गावर वर्डस्वर्थप्रमाणेंच आपलीं मतें बेधडक काव्यांत मांडण्यास आयुष्याचा कितीसा काळ निसर्गाच्या सान्निध्यांत घालविला होता? व्हिट्मन्प्रमाणें जगाचा अनुभव त्यांना किती आला होता कीं ज्या योगानें त्यांनीं आत्मसामर्थ्याचीं ठिकठिकाणीं विधानें करावींत? प्रापंचिक कष्टामुळें व अकालींच संसाराची जबाबदारी अंगावर पडल्यामुळें त्यांना काव्यनिर्मितीसाठीं लागणारी मानसिक स्वस्थता कधींच लाभली नाहीं. बडोदें, वर्धा, नागपूर, पुणें याप्रमाणें सारखें फिरत असतांना त्यांना प्रपंचाचीच काळजी अधिक होती. साहजिकच वर्डस्वर्थप्रमाणें निसर्गसहवासांत न वाढतां, व्हिट्मप्रमन्याणें जगाचा पूर्ण अनुभव न घेतां केशवसुतांनीं काव्य करण्यास प्रारंभ केला. अशा परिस्थितींत उत्पन्न झालेल्या काव्यांत जिव्हाळा व काव्यगुण तर दिसत नाहींतच, परंतु नेहमीं एकाच कल्पनेची पुनरावृत्ति होत असल्यामुळें कृत्रिमता मात्र आढळून येते. केशवसुतांचा इंग्रजी वाङ्मयाशीं असणारा परिचय त्यांच्या काव्यनिर्मितीस कारणीभूत झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांनीं वर्डस्वर्थ, व्हिट्मन् वगैरे कवींच्या कविता वाचल्या आणि त्याप्रमाणें आपणहि कविता लिहाव्यात अशी इच्छा होऊन त्यांनीं कविता लिहिल्या. स्वतःच्या अनुभवाला दूर सारून या आंग्लकवींच्या अनुभवावर आपली काव्यरचना त्यांनीं केली. वर्डस्वर्थच्या निसर्गसहवासाचा उपयोग करून घ्यावयाचें केशवसुतांनीं ठरवलें. आणि त्यांनीं त्याच्याप्रमाणेंच निसर्गाविषयींचे सिद्धांत अनुवादात्मक पद्धतीनें मांडले. वर्डस्वर्थनें साध्या व सोप्या भाषेंत कविता लिहिल्या म्हणून केशवसुतांनीं देखील साधी व सोपी भाषा वापरली. वर्डस्वर्थनें वृत्तबंधनें झुगारून देऊन मुक्तछंदांत किंवा आपल्या ऐच्छिक छंदांत काव्यरचना केली आणि केशवसुतांनीं त्याचें अनुकरण केलें! परंतु हा सर्व गतानुगतिकासारखा व्यवहार झाल्यामुळें केशवसुतांच्या काव्यांत वर्डस्वर्थचा जिव्हाळा व तन्मयता दिसून येत नाहीं. ब्रह्मानंदांत, समाधींत वर्डस्वर्थ दंग झाला म्हणून आपणहि त्यांत दंग व्हावें असें वाटल्यावरून साध्या गोष्टींत ब्रह्मानंद आणि समाधि कशीं आणतां येतील

हें पाहून त्यांनीं काव्यरचना केली ! त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास "कोठें स्वर्गसमक्षता प्रकटते हें नेहमीं पाहणें" याप्रमाणें ते कोठें कोठें स्वर्गसमक्षता पाहतां येईल हेंच पाहात गेले आणि ह्यांत ते इतके गुरफटले कीं, "प्रीति "सारख्या सरळ आणि सुंदर कवितेंतदेखील त्यांनीं प्रीतीचा उगम सांगतांना नंदनवनांत आपणांस नेलेंच; आणि "हरपलेलें श्रेय" ही अन्यथा सरळ व सुबोध झाली असती तिला दुर्बोध आणि अर्थशून्य बनविलें. "आम्ही कोण" आणि "स्फूर्ति" ह्या कविता सोडून दिल्या तर इतर कवि आणि कवितेवरील कविता किती कृत्रिम वाटतात ! "मी एक कवि आहें" अशी मी-पणाची कल्पना करून घेऊन तर ह्या कविता लिहिल्या नाहींत ना, अशी हळूच एक शंका येते. ह्याच कारणानें त्यांच्या काव्यानें जनतेचें लक्ष क्रांतिकारक ह्या दृष्टीनें जेवढें वेंधून घ्यावयास पाहिजे होतें तेवढें वेंधून घेण्यास ते असमर्थ ठरले !

स्वतःच्या देशांतील परिस्थिति पाहून स्वतःच्या समाजांत चाललेल्या अंदाधुंदीच्या व्यवहारानें होरपळलेल्या हृदयानें त्यांनीं ज्या ज्या कविता लिहिल्या त्या त्या निःसंशय यशस्वी झाल्या आहेत व अखिल महाराष्ट्रानें त्याबद्दल त्यांचे गुणानुवाद गायिले आहेत. "तुतारी", "गोफण" ह्या कविता हृदयाचे लचके तोडून बाहेर पडल्या आहेत याची साक्ष पटविण्यास कां पाहिजे ? जें सुंदर असतें तें स्वयंप्रकाशितच असतें. 'झपूर्झा' ही कवितादेखील तितकीच सुंदर आहे. परंतु हाताच्या बोटावर मोजल्या जाणाऱ्या या सुंदर कवितांच्या विरुद्ध इतर शेवट बसलेल्या कवितांचें पारडें कसें उचललें जाणार ? आणि म्हणूनच केशवसुतांच्या एकंदर कवितांविषयीं निराशाच प्रकट करावी लागते.

केशवसुतांच्या अयशस्वितेचें हेंच कारण आहे. त्यांनीं कविता लिहावयाच्या म्हणून लिहिल्या–अमक्यानें असें केलें म्हणून मलाहि असें केलें पाहिजे ही त्यांची वृत्तीच त्यांच्या यशाला विघातक ठरली ! सहजस्फूर्त कवनें फारच थोडीं असल्यामुळें केशवसुतांच्या एकंदर कवितेचें विस्मरण होणें साहजिकच आहे. परंतु हेंहि त्याबरोबर तितकेंच खरें कीं, जोंपर्यंत तुतारीची कर्णभेदक किंचाळी महाराष्ट्राच्या कानावर आदळत आहे तोंपर्यंत महाराष्ट्राचे कान केशवसुतांच्या बाबतींत अगदींच बधीर होणें शक्य नाहीं ! अन्य कार्यव्याप्तीमुळें तिचे पडसाद कांहीं काळ अस्पष्ट ऐकूं येतात इतकेंच !

(सहविचार–१९३६;
वर्ष १५; अंक १–२; पृ. क्र. १७–२३)

१८

केशवसुतांच्या कवितेचा अभ्यास

लेखक : अ. म. जोशी

'सह्याद्रि' मासिकाच्या जानेवारी १९३९ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या श्री. देवदत्त नारायण टिळक यांच्या 'माधवानुज' ह्या लेखांत केशवसुतांच्या कवित्वाबद्दलचीं त्यांनीं केलेलीं विधानें आणि कांहीं दिवसांपूर्वी 'ज्ञानप्रकाश'मधून श्री. टिळकांच्या विधानांना प्रत्युत्तरादाखल प्रसिद्ध झालेले श्री. लं. रा. परांजपे यांचे लेखांक असे माझ्या वाचनांत आले. केशवसुतांच्या कवित्वशक्तीबद्दल परस्परभिन्न मतें व मतांतरें केशवसुतांच्या हयातीपासूनच चालत आलीं आहेत. केशवसुतांच्या भक्तांनीं केशवसुतांचा संप्रदाय सुरू केल्यापासून या मतांतरांना सांप्रदायिक स्वरूप येत चाललेलें आहे. वास्तविक वाद अगर चर्चा शास्त्रीय स्वरूपाची असावी असा शिष्टसंकेत आहे. मीं केशवसुतांची समग्र कविता प्रथम वाचली त्या वेळीं केशवसुतांना 'आधुनिकांतील नव्या काव्यरचनेचे आद्यजनक', 'महाराष्ट्राचे महाकवि' व 'क्रांतिकारक कविश्रेष्ठ' म्हणून म्हणण्याचा नवाच प्रघात पडत चाललेला होता. अशा त्या उत्तेजक काळांत सुद्धां केशवसुतांच्या कवित्वाची छाप माझ्या मनावर त्या प्रघाताला अनुकूल अशी पडूं शकली नाहीं व आजहि तीच स्थिति आहे.

मी केशवसुतांच्या कवितांचा अभ्यासू आहें. केशवसुतांच्या कवितांचा मी जो कांहीं अभ्यास करूं शकलों व त्याचेसंबंधीं माझीं जीं कांहीं मतें बनलीं तीं मी आज वाचकांच्या पुढें मांडीत आहें.

कवितेकडे कसे झुकले ?

केशवसुतांच्या कवितांचा अभ्यास त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यापासूनच सुरू

होतो. या स्वभाववैशिष्ट्यामुळेंच केशवसुत कवितेकडे ओढले गेलेले आहेत. केशवसुत लहानपणीं अशक्त म्हणून किरकिरे असल्यामुळ साधारण बालस्वभावसुलभ खेळकरपणा त्यांच्या अंगीं नव्हता. समवयस्कांशीं सुद्धां हंसण्याखिदळण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत लहानपणापासूनच कमी होती. कुठेंतरी एकटेंच बसावें, एकटेंच फिरावें असा एककल्ली आणि एकलकोंडा स्वभाव, आणि त्यांतहि स्वभावविशेष म्हणून मुखदुर्बळपणा, त्यांच्या अंगीं लहानपणींच मुरलेला होता. 'आमच्यासारख्यांचा फोटो काढून काय करायचें ?' अशा हेकट आणि एककल्ली स्वभावामुळें उभ्या हयातींत त्यांनीं आपला फोटोसुद्धां कोणाला काढूं दिला नाहीं !

'याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित भुवि ।'

विधिवशात् आणि कदाचित् यांचेमध्यें भरून उरलेली महत्त्वाकांक्षाहि त्यांना 'जगाआगळा' म्हणवून घेण्यास प्रोत्साहन देत असावी. आणि म्हणूनच बालपणचा एककल्ली, एकलकोंडा, मुखदुर्बळ स्वभाव त्यांनीं मोठेपणींहि टिकवून धरलेला असावा. मनुष्यप्राण्याची स्वभावतःच काव्याकडे ओढ असते. वेळेवर तो त्याचा जन्मसिद्ध हक्क असतो, हेंहि मानलें पाहिजे. या जन्मसिद्ध हक्काच्या जाणीवेनेंच केशवसुतांना लहानपणापासूनच पद्यपंक्ति रचण्याचा नाद लागलेला होता. त्यांतून कवीच्या जगाआगळेपणाची, विक्षिप्तपणाची, भ्रमिष्टपणाची, वेडेपणाची मोहिनी केशवसुतांच्या स्वभावाला अधिकच वश करती झाली.

'अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया' यासारख्या पद्यपंक्तींतून केशवसुतांनीं भ्रमिष्टपणाचें, वेडेपणाचें मोठें कोडकौतुक, कविस्वभावाचें द्योतक म्हणूनच, ठिकठिकाणीं केलेलें आढळतें. अजून सुद्धां कवींच्या जगांत भ्रमिष्टपणा, वेडेपणा, विक्षिप्तपणा यांना अलौकिक म्हणन उच्च स्थान दिलें जातेंच. थोडक्यांत म्हणजे एककल्ली आणि एकलकोंडचा स्वभावानेंच केशवसुतांना कवितेकडे प्रथम झुकविलें असावें.

केशवसुतांचा कालखंड

केशवसुतांचा काळ म्हणजे सत्तावन्न सालच्या दंगलीनंतरचा स्वराज्याचा अंक संपून राणीच्या राज्याचा नवलाईचा नवा अंक सुरू झालेला होता, तो होय. राणीच्या राज्याचे मंगलाचरण म्हणून 'विद्येची प्रशंसा' सर्वतोमुखीं पाठांतरांत आलेली होती; आणि राणीची भाषा जी इंग्रजी ती 'वाघिणीचें दूध' म्हणून म्हणवूं लागलेली होती. राणी सरकारनें राजधर्म म्हणून आणि सरकारच्या सहधर्मी मिशनऱ्यांनीं सेवाधर्म म्हणून नेटिवांच्या अिंग्रजी विद्यार्जनाचा जो राजमार्ग आंखून दिलेला होता, तो आतां

रुळला गेलेला होता. नेटिवांनीं सुद्धां 'कर्मयोग' म्हणून अिंग्रजी शाळा काढण्यास सुरुवात केलेली होती. अिंग्रजी शाळेंत जाणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांनीं तर हातीं पडेल तें 'इंग्रजी बुक' मुखोद्गत करण्याचा सपाटा लाविला आणि इंग्रजी जाडचा साहित्यिकांचीं जाडीं पुस्तकें त्यांनीं भराभर वाचून काढलीं!

वाघिणीच्या दुधाचा गुणधर्म थोडाच लटका होता? दुधाचा कैफ शिक्षितांच्या तोंडीं 'आम्हीं' ची भाषा बोलूं लागला होता. आणि या 'आम्हीं' ना स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, स्वसमाज कुठें तरी अगदीं निरयांत लोळत पडलेला दिसूं लागलेला होता. सुधारक-उद्धारकांची धूम गर्दी उडालेली होती. केशवसुत या काळांतील विद्यार्थि होते.

सर्वच दृष्टींनीं हा काळ क्रांतीचा होता. या वेळीं मराठी साहित्यांतहि क्रांति होणें क्रमप्राप्तच होतें. या काळच्या मराठी साहित्याचा विहंगम दृष्टीनें विचार करतां, मराठी साहित्याला जर एकाद्या उपवनाची उपमा दिली, तर संत कवींची आणि पंडितपंत-कवींची, त्याचप्रमाणें पोवाडे-लावणीच्या शाहीर-पठ्ठचांची, मराठी बाग फुलविण्याची संस्कृत-मराठी पद्धत त्यांच्याबरोबर पंचत्वास पोंचण्याच्या पंथांत होती. जुन्यांच्या पाठांतरांत असलेला आणि नव्यांनीं कथा-कीर्तनांत, पुराण-प्रवचनांत ऐकलेला ऐकीव भाग तेवढाच जीव धरून उभा होता. क्रांतीनंतर या मराठी बागेच्या मशागतीची वहिवाट पूर्वकालीन आधुनिकांकडे आलेली होती. या आधुनिकांच्या मनावर जात्या संस्कृतची व येत्या इंग्रजीची छाप पडली असल्यामुळें त्यांनीं संस्कृत व इंग्रजी साहित्यांतील निवडक भाग धडाक्यासरशी भाषांतरित करून सोडला. मराठींत साहित्याचीं छापलेलीं पुस्तकें दिसूं लागलीं; आणि अशा रीतीनें मराठी वाङ्मयाचा बाग दुसरीकडून उचलून आणलेल्या आयत्या झाडांच्या कुंड्यांनीं मंडित झालेला दिसूं लागला. इंग्रजीच्या या ऊर्जित काळांत विद्वानांच्या डोक्यांना इंग्रजींतून विचार करण्याची संवय जडत चाललेली असल्यामुळें साहजिकच मराठी वाङ्मयावर इंग्रजी मराठीची छाप दिसूं लागली. वास्तविक मराठी साहित्याला इंग्रजी मराठीपेक्षां संस्कृत मराठी अधिक जवळचें असलें तरी काळ फिरलेला होता! इंग्रजी वाङ्मय मराठी मुंडासें चढवून मराठी बनूं लागलें होतें हें खरें! मराठी वाङ्मयांत निव्वळ भाषांतर करून कांहीं, रूपांतर करून इतर, तर आधारासाठीं म्हणून बाकीचें कांहीं, असें बरेंचसें इंग्रजी वाङ्मय मराठीनें आत्मसात् करून घेतलें. थोडक्यांत म्हणजे, माती मराठी, माळी मराठी, झाडें मात्र विलायती धर्तीचीं! वेळेवर शुद्ध मराठी झाडांवर विलायती पानांफुलांचाच डौल अधिक! केशवसुत या काळांतले कवि होते. या काळाला अनुसरून केशवसुतांची बरीचशी कविता ही इंग्रजी कवींच्या स्फुट काव्यावरून सुचलेली अगर त्यांच्याच काव्य-विषयावर उभारलेलीच दृष्टीस पडते.

कवितेची वर्गवारी

केशवसुतांच्या काव्यरचनेचा काळ इ. स. १८८५ ते १९०५ पर्यंत साधारणपणें वीस वर्षांचा आहे. या वीस वर्षांच्या काळांत केशवसुतांनीं १३१ कविता लिहिलेल्या आढळतात. या १३१ कवितांची विषयानुसार वर्गवारी केली तर साधारणपणें काव्य व कविताविषयक २३; हुरहुरदर्शक १८; उपदेश व सद्विचारप्रवर्तक ३७; प्रीति-प्रेम-शृंगारात्मक १६; ऐतिहासिक, सामाजिक, देशस्थितिपर १०; तत्त्वज्ञान, आध्यात्मिक ८; भाषांतर ५; मुलें-फुलें विषयक ४; विनोदी ४; निसर्गवर्णन १; किरकोळ स्फुट ५; अशी वर्गवारी पडते. विषय-विवेचनाकरितां सोयिस्कर म्हणून मी प्रास्ताविक आणि अवतारी या दोनच विभागांत त्यांची विभागणी केलेली आहे.

(१) प्रास्ताविक विभाग

केशवसुतांच्या कवितांचा विचार करतांना प्रथमदर्शनींच आगरकर-टिळकां-सारख्या अस्सल सुधारक-उद्धारक, पट्टीचे तेजस्वी लेखक व ओजस्वी वक्ते, अशा नामवंत गुरूंचा हा प्रौढ विद्यार्थि 'कवि' न होतां गुरुवर्यांच्या पावलावर पाऊल टाकणारा एखादा मार्मिक लेखक अगर सडेतोड वक्ता निर्माण व्हावयास पाहिजे होता, असें सहजच मनांत येऊन जातें. पण केशवसुतांना त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यानें 'कवि' ठरवून ठेवलेलें होतें, हें लक्षांत आलें म्हणजे मनाचा विरस होतो!

केशवसुतांनीं विद्यार्थिदशेंत असतांना एक नाटक का कांहीं एक गद्य ग्रंथ लिहिलेला होता; तो त्यांनीं बक्षिसाकरितां 'दक्षिणाप्राइज' कमिटीकडे पाठवलाहि होता. परंतु दुर्दैवानें कमिटीला तो ग्रंथ पसंत न पडल्यानें त्याला बक्षीस मिळूं शकलें नाहीं. वास्तविक पाहतां त्या काळीं नव्या ग्रंथरचनेला उत्तेजन देण्याकडे कमिटीचा विशेष कटाक्ष असला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां, केशवसुतांचें हें कमिटीने बक्षिसार्ह नाहीं असें ठरविलेलें गद्य लेखन कदाचित् ग्रंथ या नांवाला शोभेल अशा वकूबाचें नसलें पाहिजे, असेंच अनुमान करणें प्राप्त होतें. केशवसुतांच्या मानी स्वभावानें कमिटीवरील राग दाखवण्याकरितां म्हणूनहि तेव्हांपासून गद्य-लेखन गौण मानून टाकून देऊन पद्य-लेखन (निरंकुशत्व) स्वीकारलें असावें.

गद्याबद्दल तुच्छता

केशवसुतांना गद्य लिहिणें कमीपणाचें कसें वाटत होतें त्याचा पुरावा म्हणून त्यांच्या 'दिवस आणि रात्र' या कवितेंतील खालील पद्यपंक्ति उद्धृत करणें जरूर आहे. दिवसाचें गौणत्व सिद्ध करतांना त्यांनीं गद्याचेंहि गौणत्व सिद्ध करून दाखविलें आहे.

'दिवस जगाला देव दिसें, परि गद्यचि त्याच्या वदनीं'

त्याचप्रमाणें 'शब्दांनो, मागुते या' या कवितेंत ते लिहितात कीं, (शारदेचा देव्हारा उचलणाऱ्या)

'शब्दांच्या कूजितानें सहजचि मम हृत्प्रांत गुंगूनि गेला
मी ज्या स्वप्नांत गद्यग्रथित जग मुळीं लोटिलें तुच्छितेला!'

या पद्यपंक्तींनीं त्यांनीं गद्यग्रथित जगाला तुच्छतेनें ढकलून दिलेलें आहे. गद्यग्रथित जगाला याप्रमाणें डावलण्यामध्यें त्यांच्या मनांत अढी धरून वसलेला गद्याचा तिरस्कार आणि पद्याचा अभिनिवेश स्पष्टपणें नजरेस येतो. चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, आपटे, परांजपे, इ. शेलक्या गद्यलेखकांची नामावळी डोळ्यांसमोर उभी राहिली म्हणजे केशवसुतांच्या वेळचें गद्य त्या वेळच्या पद्यापेक्षां हमखास श्रेष्ठ होतें, हें सूर्यप्रकाशाइतकें ढळढळीत सत्य सिद्ध करावें लागत नाहीं. तरीसुद्धां गद्यापेक्षां पद्यच श्रेष्ठ ठरवून केशवसुतांनीं आपलें मोलाचें मनोगत पद्यामध्येंच अट्टाहासपूर्वक लिहिण्याचा प्रयत्न केलेला पाहून दैवदुर्विलास यापेक्षां कोण काय म्हणणार? स्वभाव-वैचित्र्याला अनुकूल म्हणून पद्य-पंक्ति रचण्याकडे मनाची प्रवृत्ति आणि गद्य-लेखनाच्या सुरवातीलाच झालेला अपशकून यांचा मानसिक परिणाम म्हणूनच आपण 'कवीच्या' जन्माला आलेलों आहोंत व आपण 'कवि' होऊनच जनमनें थक्क करून टाकणारें कांहींतरी कार्य करून जाऊं, अशा विचारानें केशवसुतांच्या मनाची पकड घेतलेली असावी. एखादा माणूस एखाद्या विचाराच्या आहारीं गेला म्हणजे तो त्याच विचाराच्या पुष्टयर्थ असें वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो, याचें प्रत्यंतर 'नैर्ऋत्येकडील वारा' या कवितेंत मिळतें. तींत मालगुंड येथील वनदेवतांकडून व जलदेवतांकडून केशवसुतांनीं आपला कसा जयजयकार करवून घेतलेला आहे हें पाहण्यासारखें आहे.

गाऊं या! हृदयांत या अमुचिया प्रीती असें दाटली।
गाऊं या हृदयांत या अमुचिया कां स्फूर्ति ही वाढली?
वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामांत, या लागुनी
जैजैकार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनी।'

त्याचप्रमाणें,

'माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढें
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोंहीकडे'

असें ठणठणीत भाकित जाहीर करण्याचे पोटीं 'आत्मसाक्षात्कार' झालेला 'कवि' अनुकूल वातावरण असें निर्माण करण्याचा प्रयत्न केशवसुतांनीं केलेला आहे.

अतिमानुषत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न !

जुन्या कवींनीं आपल्या ग्रंथांचें 'अतिमानुषत्व' प्रस्थापित करण्यासाठीं ज्या मार्गांचा अंगिकार केलेला होता तोच मार्ग केशवसुतांनीं स्वीकारलेला दृष्टीस पडतो. या 'कविपणाच्या' आविर्भावांतच केशवसुतांनीं 'आम्ही कोण' या कवितेंत

आम्ही असूं लाडके–
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया–
आम्हांला वगळा गतप्रभ क्षणीं होतील तारांगणें
आम्हांला वगळा विकेल कवडीमोलावरी हें जिणें

किंवा 'कवि' या कवितेंत

राही तो तर देव भूमिवरती येतात हिंडावया
जातां स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागीं धुंडावया ।

अशा तऱ्हेचा आपल्या कविकुळाचा बडीवार घोषित केला आहे.

'कवि' या संस्थेचें इतरेजनांहून स्थिर असलेलें उच्चस्थान अशा रीतीनें परस्पर दर्शित करून उच्च वातावरणांत विहार करणाऱ्या आम्हां कविश्रेष्ठांना

' असावी कविता फिरुन,
तशी नसावी कविता म्हणून,
सांगावया कोण तुम्ही कवीला,
आहांत मोठे पुसतों तुम्हांला ?

अशा तऱ्हेचा रसिक टीकाकारांची मुस्कटदाबी करणारा बिनतोड कमालखानी सवाल करणाऱ्या केशवसुतांकडे पाहिलें, म्हणजे हे बोल आपकमाईचे नाहींत, बापकमाईचे, वारसाहक्कानें प्राप्त करून घेतलेल्या 'कविपणाचे' आहेत हें चटकन् लक्षांत येतें.

आपलें मनोगत पद्यामध्यें गातांना म्हणजे लिहितांना कवीची जी एक प्रकारची मनोभूमिका तयार व्हावी लागते ती मनोभूमिका आपणांला सृष्टि (निसर्ग) दर्शनानें लाभलेली आहे याचा निर्वाळा म्हणून 'सृष्टि आणि कवि' या कवितेंत केशवसुत लिहितात–

मी एकला फिरतसें बहुवार रानीं
यालागुनी न समजा मजला अडाणी
आराधुनी विपिन-दैवत मी तिथूनी
त्याचीं प्रसाद-वचनें मनुजास आणीं

तसेंच आपण लिहिलेलें काव्य म्हणजे प्रत्यक्ष शारदेचेच बोल आहेत, असेंहि त्यांनीं आपल्या 'काव्य कोणाचें' या कवितेंत नमूद करून ठेवलेलें आहे–

काव्य लिहिलें मीं खरें परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं ।
तसें लिहिलें मीं काव्य तिचें मानी

त्याचप्रमाणें 'फुकट गेलेला तास' या कवितेंत त्यांनीं लिहिलेलें आहे कीं,

'आतां व्यर्थ रडून काय फळ रे ! ' आशा असें बोलली ।
बा ! कांहीं तरि गा नवीन कविता आज्ञापिती जाहली ।

याप्रमाणें आपण जो नवीन कविता लिहिण्याचा उद्योग आरंभलेला आहे त्याच्या मुळाशीं काव्य-देवतेचा दृष्टान्त आहे ! त्याला मी काय करणार ? अशा तऱ्हेचें देव-देवतांचें दैवी छत्र पुढें करून आपल्या काव्य-लेखनांतील अधिकउणा भाग वाचकांच्या माथीं मारण्याचा, त्याचप्रमाणें आपल्या नव्या कमाईची (देवता-दत्त) कविता रसिक विद्वानांच्या गळीं उतरविण्याचा केशवसुतांचा 'स्वप्नाळूपणा' पाहिला म्हणजे केशवसुतांनीं लढविलेल्या 'कवि-कारणाची' कारणमीमांसा प्रत्ययाला येते आणि आधुनिकांच्या या 'नवीन कवितेच्या जनक' कविश्रेष्ठाचा यथायोग्य तो उठाव मन घेईनासें होतें.

जन्मसिद्ध हक्काचे कवि !

केशवसुतांनीं आपलें कविता-लेखन यशस्वी करण्याकरितां याप्रमाणें आटोकाट प्रयत्न केलेला आहे. जन्मसिद्ध हक्कानें माणूस पद्यपंक्ति लिहूं लागला, म्हणजे तो अर्धा कवि हा झालेलाच असतो; त्याला फक्त बाकीचें अर्धें कवित्वच मिळवावयाचें राहिलेलें असतें. जांघ्या-लंगोट शिवन ठेवलेलेच आहेत, बदाम-पिस्त्यांचे डबे भरून ठवलेले आहेतच, करेले-हत्ते मांडूनच ठेवलेले आहेत, मुलतानमाती सुद्धां अंगाला फांसून अंग रंगवून घेतलेलें आहे; आता काय पहिलवानच बनावयाचें राहिलेलें आहे ! असें म्हणणारा जवान, म्हातारा होईपर्यंत तरी कधीं पहिलवान होईल काय ? दूर्दैवानें केशवसुतांच्या कवित्वाच्या बाबतींतहि असेंच झालेलें दिसतें. आपल्या कवितेंत निसर्गाचा प्रसाद आणि शारदेचा वरदहस्त आहे, असें निक्षून सांगणारे हे कवि ज्या वेळीं

'शूल कपाळीं कंडन हृदयीं कंप शरीरीं भरलासें
सलिल लोचनीं, शीण अवयवीं हाय निराशा मनीं वसे

तरि माझी ती भेटेल का ?
पांग मनींचा फिटेल का ?
आलिंगूं ती झटेल का ?
क्षमा करिल का मला चुक्यांची, पुसतों मी माझें बरवें
धीर न आतां क्षणिं धरवे'

(भटक्याचें गाणें)

'उत्कंठा हृदयीं मनोज्ञ तव ती पाहीन मूर्ती कदा ?
वेडापीरच जाहलों जिवलगे आहें वियोगामुळें

(वियोगामुळें)

विषण्ण तो मग विष-वृक्षाचीं फळें
सुधारसाचीं मानुनि गिळिलचि बळें
दोष तयाचा काय त्यामधें ? वद मधुरे सत्वरी
करूं ना मीहि आतां त्या परि ? '
'किंवा तुझिया कृपेस नाहीं पात्रच मी लवभरी ?
सोक्ष कीं मोक्ष बोल लौकरी ?' (रुष्ट सुंदरीस)

याप्रमाणें आशेची निराशा होत्साते धाय मोकलीत आत्महत्येपर्यंत गोष्टी थराला आणून सोक्ष कीं मोक्ष याच्या कडचापर्यंत येऊन उभे राहिलेल्या कविश्रेष्ठांची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली, म्हणजे सृष्टिसुंदरीला, शारदादेवीला, काव्यदेवतेला वेळोंअवेळों तोंड भरून साद घालण्याच्या या महाकवीची या सुज्ञ देवींनीं अखेरपर्यंत अशी कां उपेक्षा केली, असा प्रश्न उद्भवतो. प्रश्नाचें उत्तर सुज्ञांस देणें नलगे. 'फिफ्टी पर्सेंट' कवीची 'सेंट पसट' प्रीति देवीवर जडलेली होती ; पण– पण– देवींची कवीवर अंशमात्रहि होऊं शकलेली नव्हती ! आणि म्हणूनच उभ्या आयुष्यांत काव्य-देवता प्रसन्न न झालेले हे कविश्रेष्ठ रसिक विद्वानांच्या दृष्टीला अर्ध (वट) कवि दिसल्यामळें त्यांनीं यांच्याकडे दुर्लक्ष केलें असेल तर त्यांत रसिकांच्या काय दोष ?

निष्फळ ठरलेले प्रयत्न

केशवसुतांच्या हयातींत जरी त्यांनीं रचलेली सर्व कविता प्रकाशित होऊन गेलेली होती, तरी त्या वेळच्या कोणाहि मोठ्या माणसानें त्यांच्या कवितेच्या गौरवपर व स्तुतिपर असे केव्हांहि व कोठेंहि उद्गार काढलेले नाहींत. म्हणून महाराष्ट्राच्या वाचकवर्गामध्यें खरी गुण-ग्राहकताच नाहीं, असा केशवसुतांचा ग्रह झालेला दिसतो. आपली कविता 'विविध-ज्ञान-विस्तारा' सारख्या भारदस्त मासिकांत छापून येत

नाहीं म्हणून आपल्याला श्री. मोगरे यांच्याइतका देखील विद्वान् वाचकवर्गामध्यें मान नाहीं, याबद्दल केशवसुतांना अत्यंत वाईट वाटत असे. ते कोणाचा हेवा करणारे नव्हते. आपण जीव तोडून कविता लिहीत असतां महाराष्ट्रांतील रसिक विद्वानांनीं प्रोत्साहनाचे चार स्तुतिपर उद्‌गारहि काढूं नयेत, याचें शल्य त्यांच्या हृदयाला सारखें बोंचत होतें. स्तुतीपर उद्‌गार राहोत, पण कोणाकोणाकडून धिक्काराची व उपहासांची बोलणीं सुद्धां केशवसुतांच्या अनुभवास आलीं असावींत. केशवसुत आपल्या या मानसिक क्लेशांचें दिग्दर्शन करण्याकरितां 'दिव्य ठिणगी' या कवितेंत लिहितात–

'तेथें येउनि पोचतां बलि दिला ज्वालेस त्या मीं किती
तें मातें कळलें पुरें, परि तुम्हां त्याची कशाला मिती ?
ज्याला मी मुकलों विषाद मजला त्याचा मुळींही नसे
जें पृथ्वीवर आणिलें जन तया धिक्कारिती हा ! कसे !'

याप्रमाणें केशवसुतांच्याच अवतरणांमधून एकच एक ध्वनि निघतो कीं, केशवसुतांनीं जो प्रयत्नपूर्वक अंगिकार केला होता तो त्यांच्या दृष्टीनें निष्फळ ठरला ! तेल नाहीं, तूप नाहीं; धुपाटणें हातीं राहावयाचें, तेंहि हातीं न लागतां डोक्यांत बसलें, असा आर्तनाद केशवसुतांची कवि, काव्य व कविताविषयक कविता लक्षपूर्वक अभ्यास करणारांच्या कानांत घुमल्यावांचून राहात नाहीं.

कवीच्या हृदयाला लागलेली हुरहुर तो आपल्या कवित्वांत हेतुपूर्वक म्हणा अगर अहेतुपूर्वक म्हणा, दर्शवीत असतो, असा कविसंकेत मानला तर

अहा ! अज्ञात स्थळीं अशा, मातें
एक गवतारुं खोप रहायातें
शेतवाडी ती एक खपायाला
लाधती, तर किति सौख्य मन्मनाला
तेथ गरजा माझिया लहान्या त्या
सहजगत्या भागुनी सदा जात्या;
पुढें माझें चालेल कसें ऐशी
तेथ चिंता त्रासिती न मिजासी
नीच लोकांला मला नमायास
वेळ पडती थोडीच त्या स्थळास

'एक खेडें' या कवितेंतील वरील पद्य-पंक्तिमधून जगताच्या धकाधकीच्या मामल्यापासून अलिप्त राहून अल्पसंतोषी असें साधें आणि सरळ जीवन कंठण्याची

केशवसुतांनीं आपली मनीषा व्यक्त केलेली आहे. त्याचप्रमाणें 'समृद्धि आणि प्रीति' या कवितेंत–

'आम्हांला रुचती न तीं श्रमफळें कान्ते दिल्यावांचुनी
तेथें सेविल कोण अश्रमफळें तीं एकला राहुनी'

आयतोबासारखें मोठ्या राजमहालांतलें एकटें राहाणें आम्हांला पसंत नसून, प्रियेसमवेत, मग तें कोठें जंगलांत का असेना, कष्टाच्या मीठभाकरीवर सुद्धां गुजराण करून मोठ्या प्रीतीनें आम्हीं राहणें पसंत करतों. अशा प्रकारच्या सात्त्विक आणि आदर्श संसाराची इच्छा स्पष्ट करण्यांत त्यांच्या हृदयांतील साधेपणाच दृग्गोचर होतो.

केवळ पराक्रमाच्या अभावींच केशवसुतांना त्यांच्या कल्पनेप्रमाणें साधा संसारदेखील साधतां आला नाहीं, तेथें मनोराज्यांतील बंड यशस्वी करणें कसें साधणार? कवीचें दुर्दैव सर्वच ठिकाणीं आडवें आलेलें आहे. म्हणूनच–

'संध्येला प्रणयी तुम्ही जन सुखें द्या हो दुवा; मी करीं
हेवा तो न मुळीं; नसे प्रणय तो माझ्याहि का अंतरीं?
आहें मी घर सोडुनी पण दुरी; चित्तीं म्हणोनी असें
मी संध्यासमयीं उदास; अथवा व्हावें तरी मी कसें!
खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि वा खेळणें,
जैसें ज्यांस रुचेल त्यापरि तुम्हीं या उत्सवीं वागणें;
मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेडचापरी गाउनी! (दिवाळी)

याप्रमाणें मंगल प्रसंगीं सुद्धां उदास आणि दळभद्री कविता गाण्याचें दुर्दैव कवीच्या वांट्यास आलेलें पाहिलें, म्हणजे केशवसुतांच्या 'रडक्या कविते'चें कोडें उलगडतें. त्याबरोबरच अशी ही रडकी कविता भरल्या घरांत कोण आणि कां वाचणार, हें दुसरें कोडें मनांत उभें राहतें.

काव्यदेवीच्या प्रसन्नतेची रुखरुख

प्रापंचिक परिस्थितीसंबंधीं जशी केशवसुतांना एक प्रकारची रुखरुख लागलेली त्यांच्या कवितांतून दिसते, तशीच त्यांना आपल्यावर काव्यदेवी कशी प्रसन्न होईल हीहि एक रुखरुख लागून राहिलेली होती.

न त्या कमलीं, किति जरी दिव्य झालें;
परी अगनग लंघुनी, मधुर बाले,
ओष्ठ तव, जे स्मित दाविती मधून,
सखे! चुंबुनि ते, सुखें मग मरेन! (अहा पक्षी)

हीन म्हण तूं मज दीन तसा काळा
आणि म्हण कीं त्रासला हा जिवाला
तरी म्हटलें पाहिजे हेंहि तूं तें
'तिनें जातां चुंबिलें असे यातें'

(तिनें जातां)

काव्यदेवतेच्या प्रसन्न मुखाचा प्रसाद-योग केशवसुतांच्या कवित्वाला कधींच लाभला नाहीं. दुर्दैव ! प्रापंचिक दुर्दैवावरोबरच याहि दुर्दैवाचें रडगाणें केशवसुतांनीं आपल्या कवितांतून ठिकठिकाणीं गाइलेलें आहे.

नीरसतेची स्पष्ट जाणीव

आपली कविता वाचक वाचावयाला कंटाळा करतात, विद्वानांना तींत कांहीं आकर्षण दिसत नाहीं, टीकाकार तर काय बेमुर्वतखोरपणानें उपहासच करतात, महाराष्ट्रांत खरी गुणग्राहकता कमीच आहे, असें वरपांगीपणानें केशवसुत म्हणत असले, तरी त्यांना आपली कविता इतरांच्या मानानें नीरस आणि नादान आहे, याबद्दलची स्पष्ट जाणीव अंतर्यामीं तरी खास असली पाहिजे. आपली कविता कशीहि असली, तरी ती वाचली जावी हीहि एक त्यांच्या मनाला लागून राहिलेली रुखरुख होतीच.

संतांच्या खांद्यावर जसें हक्कानें ओझें लादण्याचा युक्तिबाज व्यावहारिकांना अधिकार प्राप्त झालेला असतो, त्याप्रमाणेंच शेवटीं या महाकवींनीं देखील आपलें कवित्ववाचनाचें ओझें आपल्या म्हणविणाऱ्या आपल्या प्रियपत्नीवर कसें अधर आणून ठेवलें व आपली कविता वाचली जावी अशी जी हृदयांत घर करून बसलेली आकांक्षा ती कशी पुरवून घेतली, याचें एक नमुनेदार व मोठें अनुकंपनीय चित्र कोणास पाहावयाचें असेल तर त्याला केशवसुतांची 'आपल्या प्रियेला कवीचा निरोप' (नव्या आवृत्तींतील 'मरणानंतर') ही कविता संपूर्ण वाचावी लागेल

माझ्या अस्थि जधीं कठोर यम तो नेईल मातीमधीं
माझे प्राणसखे ! रहालिस जरी लोकींच तूं या तधीं
हे तूं आपुलिया गत प्रियकराचे श्लोक साधे तरी
वाचायास पुनः स्मरोनि मजला घेशील कां गे करीं ?
घे ते तूं सखये तयास पुढल्या श्रेयःकृतींशीं तुळी
ते त्या आणि जरी तुळेंत ठरले नादान ऐसे मुळीं
मत्प्रीतीकरितां तयां जप, न त्यां तत्सौष्ठवाकारणें
जे तत्सौष्ठव पाडितील पुढले मोठे कवी ते उणें

प्रेमें आण मनांत हें " जर सखा माझा पुढें वांचतां
काव्य-स्फूर्ति तदीय उन्नत तरी होती न का तत्वता
या पद्यांहुनि फार सुंदर अशा पद्यांस तो गुंफिता
प्रीतिप्रेरित होउनी निज मनीं ये माझिया हें मना
हा ! हा ! तो मजपासुनी परी यमें नेला असे हो वरी
आतांचे कविही विशेष ठरती हे श्रेष्ठ पाहूं जरी
यांच्या पद्धतिला, म्हणूनि भुलूनी यांच्या कृती वाचितें
त्याची वाचितसें परि स्मरुनि मी त्याचे अहा प्रीतितें ।।

याप्रकाराला काय म्हणावयाचें ? 'कवि' म्हणवून घेण्याचा अदम्य हव्यास नाहीं तर काय !

खरी ओढ कशाची ?

केशवसुतांच्या अंतरंगांचें यथेचित चित्र त्यांच्या 'कविता आणि प्रीति' या कवितेंत स्पष्ट असें चित्रित झालेलें दिसतें.

प्रसंग असा आहे कीं, आपल्या एका मित्राबरोबर कवि फिरावयास गेलेले आहेत. एका उपवनाजवळ ते आलेले आहेत. उपवनांत भुंगे उडत होते, पक्षी गात होते, मृग हिंडत होते, मुलें बागडत होतीं, अशा त्या सुरम्य स्थलीं–

मधें अंगना स्पृष्ट ज्या यौवनानें,
निजाऽव्याज रूपास साध्या मदानें,
इथूनी तिथें चंचला नाचविती,
पदालंकृती झंकृती तैं करीती;
अशा तेथली पाहुनी रम्य लीला,
मुखीं घालुनी ठाकलों अंगुलीला;
वदे मित्र मातें 'पुढें चालणें ना ?'
परी पाय तेथूनिया काढवेना ।
बोले सखा " गढुनि कां इतुका मनीं तूं "
मी बोललों " बघ मनांत विचारुनी तूं ?"
तेव्हां पुसें " अडविते कविता ?"– " नव्हे रे,
प्रीती मला भुलविते नच हालवे रे ! "

असा मित्रद्वयांचा संवाद झालेला आहे, त्यावरून कविवर्यांच्या मनाला खरी खरी लागणी कोणती होती, हें स्पष्टच दिसतें. खरी लागणी प्रीतीची होती. कवितेची नव्हती ! वेळीं अवेळीं कवितेसाठीं कवीनें जो जीव पाखडलेला दिसतो, तो कवि-श्रेष्ठांची प्रथा म्हणूनच !

विविध कविता

मुलें व फुलेंविषयक कविता केशवसुतांनी फारच थोडी लिहिलेली आहे. फुलांचें वेड दाखविण्यापुरतेंच या कवितांचे प्रयोजन आहे.

केशवसुतांना स्वभावतःच विनोदाचें वावडें होतें. विनोदाच्या म्हणून त्यांनीं ज्या कांहीं चारदोन कविता लिहिलेल्या आहेत, त्यांत विनोद कोठें व हंसावयाचें कोंठें असाच प्रश्न उद्भवतो. तें तसें सांगावें लागतें. सांगणाराला व ऐकणाराला यामुळें जें हंसूं येतें तेवढेंच फक्त तें विनोद-स्थान !

आत्मचरित्रपर कवितांचें असेंच झालेलें आहे. मृत कवीच्या वैयक्तिक आणि आणि प्रापंचिक गोष्टींसंबंधीं उणेंअधिक लिहिलें जाऊं नये असा शिष्टसंप्रदाय आहे व तो पाळणेंच चांगलें ! केशवसुतांचें सांसारिक जीवन अत्यंत कष्टाचें व नीरस असें असल्यामुळेंच–

'वाटे नाटक शोकसंकुल असें जीवित्व हें याजला'

याप्रमाणें उदासीनतेचे उच्छ्वास टाकणारी केशवसुती कविता वाचल्यानें मन विषण्ण होतें.

आपलें केविलवाणें वैयक्तिक जीवन पद्यांत लिहून तें जगापुढें मांडण्यांत कवींना काय साधतें, हा एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. त्यामुळें फारतर कवीसंबंधीं वाचकांना अनुकंपा वाटण्याचा संभव असतो. पण त्यांच्या काव्यांतील दोषांकडे अनुकंपित वाचक दुर्लक्षच करतील कीं काय ? तें उचित ठरेल कीं काय ? उचित ठरो अगर न ठरो, पण ही प्रथा अनिष्टच समजली पाहिजे.

(२) अवतारी विभाग

येथपर्यंत प्रास्ताविक म्हणून केशवसुतांच्या अर्ध्याअधिक कवितांचा आपण अभ्यास केलेला आहे. कवि, कविता, काव्य, कवीची हुरहुर, कवीचें आत्मचरित्र अशा प्रकारच्या या सर्व प्रास्ताविक पद्धतीच्या कवितांचा साकल्यानें विचार केला, म्हणजे नमनालाच नऊ मण तेल जाळलें गेलें, गोंधळाला तर सुरवातहि झालेली दिसत नाहीं, असें मनांत येतें. केशवसुतांच्या समग्र कवित्वांत त्यांच्या अवतारकार्याच्या कवित्वाला मिळालेला गौणभाग पाहून कवीनीं लिहिलेली ही सर्व प्रास्ताविक पद्य-पंक्ति लिहिलीच नसती तर या निष्कारण पद्यपंक्तींकरितां खर्च झालेली केशवसुतांची शक्ति आणि वेळ त्यांना त्यांच्या अवतारकार्याच्या कवित्वाकडे राबवितां आलीं असतीं व इच्छित 'कविकार्य' करण्यास त्यांस पूर्ण अवसर मिळाला असता, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. पण दुर्दैव !

आतां केशवसुतांच्या अवतारकार्याच्या कवितांचा विचार करावयाचा. या कवितांत प्रामुख्यानें—प्रीतिप्रेमशृंगारात्मक, उपदेशात्मक, सद्विचारप्रवर्तक गूढ, व आध्यात्मिक आणि सामाजिक देशस्थितिपर अशा चतुर्विध कवितांचा समावेश होतो.

प्रीति-प्रेम-शृंगार

केशवसुतांच्या कवित्वांत त्यांच्या प्रीतिप्रेमशृंगाराच्या कविता अनुभवावरच उभारल्या गेल्या असल्यामुळें मनोविश्लेषणाच्या दृष्टीनें मोठ्या उत्तेजक अशा उतरल्या आहेत. यांच कवितांतून त्याचें खरेखुरें कवित्व वाचकांच्या अंतःकरणाला स्पर्श करूं शकतें. 'मुळामुठेच्या तीरावर', 'स्फुट ५८', 'स्मरण आणि उत्कंठा', 'प्रीतीची भाषा', 'प्रीति' इत्यादि कविता सुंदर आहेत.

कंपायमान कलिका सुकुमार झाली
खेदें तदीय तनु चिंब भिजोनि गेली
भेणे तिनें मुरकुनी शिर नम्र केलें
बाष्पीय बिंदुहि अहा । सहसा गळाले

अशा मुग्ध शृंगारापासून

जैसा जैसा नव-युवतिहृन्मंदिरीं कामदेव
वागूं लागे हळु हळु तसा हट्ट काठिण्यभाव
दूरी सारी तिथुनि मग ते राहण्याला स्तनांत
येती अर्थात् कुच, तरिच हे पीन काठिण्ययुक्त

अशा उत्तान शृंगाराच्या किंवा

'कंठीं घालुन हात चुंबन हळू माझें गडे तूं करीं
मेरी जान्! गुलनार! सांग निघुनि जायास मातें दुरीं'
'मद्यासक्त नरें जशी नच कधीं कान्ते कुणी झोकिली
तैशी सेविन गोड ओष्ठवटिका तुझी गडे सुंदर'

यासारख्या बेहोष शृंगाराच्या पद्य-पंक्ति वाचल्या म्हणजे केशवसुतांच्या कवित्वाचा विशेष पूर्णपणें दृष्टीच्या टप्प्यांत येतो; आणि केशवसुतांच्या प्रीतिप्रेमशृंगारात्मक ज्या कांहीं कविता लिहिल्या गेल्या आहेत त्याच बऱ्यापैकीं आहेत असें म्हणावें लागतें.

उपदेशपर कविता

उपदेश व सद्विचार-प्रवर्तक कवितांसंबंधीं विचार करतांना—

'जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें
कराया श्रम तुजला योजिलें'

'जें शिकलों शाळेमाजी । अध्याहृत ही टीप तया
द्वितीय पुरुषी हें जोडीं । प्रथम पुरुष तो सोडुनियां'
'असुनि जीभ ही त्याचिया विना
मौन लागतें घ्यावया जना
काय तें बरें ? बोलिजे खरें
ज्ञान तें बरें । ज्ञान तें बरें'
'महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें
परी तुजमध्यें महतीचें जें बीज
त्याहुनि कांहीं मोठी नाहीं चीज
ठसव मनीं हें साचें
बापा ! हें वच बहु मोलाचें'

अशा प्रकारची हरदासी पद्धतीची मूर्तिमंत मास्तरी कविता दृष्टीपुढें उभी राहते. वैशिष्ट्य-हीन म्हणूनच ती हातावेगळी करावी लागते.

गूढ व आध्यात्मिक कविता

केशवसुतांच्या गूढ आणि आध्यात्मिक म्हणून ज्या कांहीं कविता आहेत, त्यांपैकीं 'झपूर्झा', 'हरपलें श्रेय', 'म्हातारी' या कवितांचा विशेष रूपानें उल्लेख करतां येईल. त्यांतले त्यांत 'हरपलें श्रेय' ही कविता सर्व दृष्टींनीं केशवसुतांच्या कवित्वांतील एक उत्तम कविता आहे.

'होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळलें परोपरी
लुटुपटीच्या घरदारीं
लटकिच जहाल्यें संसारी
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हातां
चुकचुकल्या परि
वाटे अंतरिं
होऊनि बावरि
निज श्रेय मी पाहतसें
न परि हरपलें तें गवसे!'

हृदयस्थ भावना अनुभवांच्या कड्यावरून हळुवारपणें पावलें टाकीत श्रेयसांकडे जातांनाचें मोठें रम्य आणि हृद्य असें हें चित्र आहे. केशवसुतांच्या उत्तर आयुष्यांतील

कवित्वाचा परिपाक म्हणून या कवितेकडे पाहिलें म्हणजे केशवसुतांच्या जन्मजात दुर्दैवानें अकाली मृत्यूच्या रूपानें त्यांच्यावर सूडच उगविला असेंच म्हणावें लागतें.

'हरपलें श्रेय' ही कविता अनुभवजन्य आहे. तशी 'झपूर्झा' ही कविता नाहीं. ती श्रुतिजन्य आहे. अनुभवावर आधारलेले विचार आणि ऐकीव माहितीवर उभारलेले विचार यांचेमध्यें जमीनअस्मानाइतकें महदंतर कसें असतें, तें 'झपूर्झा' या गूढ म्हणविल्या जाणाऱ्या कवितेच्या परीक्षणानें कळून येतें.

मोठा धीर करून ज्ञाताच्या कुंपणावरून अज्ञाताच्या अफाट प्रदेशांत चिद्घन-चपला जेव्हां प्रवेश करते तेव्हां तिच्या विहाराला आणि विलासाला कल्पनातीत क्षेत्र मिळतें. चिद्घनचपलेचा हा मुक्त विहार म्हणजेच समाधि आणि तिचा मुक्त विलास म्हणजे त्या समाधींत उपभोगावयास मिळणारा कल्पनातीत आनंद, अर्थात ब्रह्मानंद. 'झपूर्झा' या कवितेंत विचारांची अशी मांडणी आहे–

'पुरुषाशीं त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करिती;
स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें हा ज्ञानाचा––
हेतु; तयाची सुंदरता
व्हाया चित्तां–
प्रत ती ज्ञाता
वाडें कोडें गा आतां–
झपूर्झा गडे झपूर्झा'

वरील पद्य-पंक्तींनीं कवि ज्ञानाचा हेतु सांगतात, पण त्यापुढील भाग सांगतांना 'तयाची सुंदरता, व्हाया चित्ताप्रत ती ज्ञाता' असा परस्परच हवाला देऊन फक्त 'झपूर्झा गडे झपूर्झा' करीत घुमण्याचा उपदेश कवि करते झालेले पाहून मनाची तहान भागत नाहीं. आतां खूप खूप लांबच्या अशा क्षितिजावर जावयास मिळेल अशा आशेनें उंच कडे चढून जाणाऱ्या उत्कंठेचा त्याच कड्यांवरून एकाएकीं कडेलोट व्हावा तसें वाटतें. मुक्तविहारापर्यंत कवीची उडी जाऊं शकते, मुक्त-विलासापर्यंत उडी मारण्याचें सामर्थ्य कवीच्या अंगीं नाहीं, असेंच म्हणावें लागतें. विषय ज्ञान-गम्य, अनुभव-गम्य असल्यामुळें नुसत्या ऐकीव गोष्टींचा निर्वाळा देऊन कसें भागणार? म्हणूनच 'झपूर्झा' ही कविता अर्थशून्य शब्दांची बडबड या आक्षेपाला पात्र झालेली आहे.

'म्हातारी' या कवितेंत कवि कल्पनांच्या भराऱ्या मारीत गूढापर्यंत विहार करते झालेले आहेत.

'स्वरूप सत्य तुझें । मुळींही तें मजला नुमजे;
तरी तुझ्या ठायीं । वसतसे अद्‌भुत तें कांहीं;
प्रत्यक्षांतुनि तें । परोक्षीं शीघ्र मला नेतें;
तेथें स्वच्छंदें । विचरतां मोद मनीं कोंदे; '

इतकें वाचल्यानंतर साहजिकच वाचक परोक्षांतील आनंदरसाचे चार दोन थेंब आपणांसहि आतां चाखावयास मिळतील या आशेनें कवीच्या रसवंतीकडे आतुर नेत्रांनीं पाहूं लागतो तोंच

"मग गणमात्रांतें
जोडणें केशवपुत्रातें"

अशा बालिश टाळ्या वाजविणाऱ्या पद्य-पंक्ति डोळ्यांसमोर येऊन उभ्या राहिल्या म्हणजे निराश होऊन नाइलाजानें केशवपुत्र फक्त गणमात्रा जोडण्याचेंच कार्य करूं शकतात, 'दुरुनि पाहिली मजा' या पलीकडे जाण्याची त्यांची शक्ति नाहीं', ते आव मात्र मोठा आणूं शकतात, असें वाचकांचें मत होतें.

युगप्रवर्तक काव्य

आतां केशवसुत ज्या कवितांवरून युगप्रवर्तक व क्रांतिकारक कविश्रेष्ठ ठरविले जातात त्यांचा म्हणजे ऐतिहासिक, सामाजिक व देशस्थितिपर अशा कवितांचा विचार करावयाचा. पैकीं ऐतिहासिक म्हणून म्हटल्या जाणाऱ्या कवितांपैकीं 'दोन बाजी' ही कविता सोडून बाकीच्या यथातथाच, म्हणून त्यांचा विचार करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. राहिलेल्या सामाजिक आणि देशस्थितिपर कवितांचा विचार करतांना 'एका भारतीयाचे उद्‌गार', 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'गांवी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून', 'दाते यांस' इ. कवितांचा देश-स्थितिविषयक कवितांत अंतर्भाव होऊन, 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न', 'तुतारी', 'स्फूर्ति', 'मूर्तिभंजन', 'नवा शिपाई' इ. कवितांची गणना सामाजिक कवितांत होते. या कवितांची साधारण रूपरेषा दृष्टीसमोर उभी राहावी म्हणून त्यांतलीं कांहीं अवतरणें उद्‌धृत करणें जरूर आहे.

देवा ! केव्हां परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून
केव्हां आम्ही सुटुनि सहसा पंजरांतूनि देवा
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हां ?

(एका भारतीयाचे उद्‌गार)

या डोळ्यांनीं पहांट ती बघण्याचें
असेल का हो नशिबी दुर्दैव्याचे
किंवा तीतें आणायाचे कांहीं
यत्न आमुच्या होतिल काय करांहीं

(गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून)

सर्वांस देवा बघतोसि सारखा
होतोस कां रे गरिबांस पारखा
कांहींस सुग्रास सदन्न तूं दिलें
साधी अम्हां भाकरही न कां मिळे ?

(मजुरावर उपासमारीची पाळी)

होती श्रेष्ठ पदास आर्य जननी जी एकदां पावली
दुर्दैवें परि जी विपद्‌गणशतीं सध्यां असे गांजिली
तीचें दुःख जरा तरी शमविण्या आम्हांस या भूवरीं
ढाळायास सखेदलोचनजलें तूं धीर आज्ञा करी ।

(दाते यांस)

सुधें बोलली ! हें परी काय तीतें !
कळें कीं जगीं नाडुनीया परातें
म्हणूनी करुनी अधीं घोर पाप
जनीं गाजवी मानवी स्वप्रताप !

(अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न)

'जनें जाउं द्या मरणालागनि'
'निसर्ग निर्घृण त्याला मुरवत–
नाहीं अगदीं पहा कशाची !'
'धर्माचें माजवूनि डम्बर
नीतीला आणिती अडथळे ,
विसरुनियां हे जातात खुळे,
नीतीचें पद जेथें न ढळे–
धर्म होतसे तेथेंच स्थिर'
'नियमन मनुजासाठी, मानव–
नसे नियमनासाठीं जाणा'

(तुतारी)

'देव-दानवां नरें निर्मिले हें मत लोका कळवळूं द्या !
'बंडाचा तो झेंडा उभवनि धामधूम जिकडे तिकडे–
उडवनि देऊनि जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे !'
'निजती ते ठारचि मरती !'

(स्फूर्ति)

'तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !'
'शांतीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जों आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें !'

(नवा शिपाई)

'कोडें घालूनियां बसली कैदाशीण,
उकलिल्यावीण खाईल ती !'

(मूर्तिभंजन)

याप्रमाणें देशस्थितिपर व सामाजिक कवितांत केशवसुतांची देशाबद्दलची व समाजाबद्दलची आंतरिक तळमळ बोलून उठलेली आहे. विशेषतः 'तुतारी', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई' या कवितांतून केशवसुतांना विचारांचा आणि शब्दांचा जो ठोसपणा भरतां आलेला दिसतो, तो त्यांच्या हृदयांत पेटलेल्या देश व समाजविषयक जाणिवेचाच परिणाम होय हें निर्विवाद आहे. पण म्हणून केशवसुत हे युगप्रवर्तक किंवा क्रांतिकारक कसे ठरतात ?

"बंडाचा झेंडा उभवनि धामधूम जिकडे तिकडे–
उडवुनि देऊनि जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे !"

असें त्यांनीं पद्य-पंक्तींत लिहलें म्हणून ?

प्रवर्तक नव्हे प्रचारक !

या प्रकारचें लिखाण म्हणजे केशवसुतांच्या विद्यालयीन शिक्षणाचे ते संस्कार होते. देशकालवर्तनाप्रमाणें 'सुशिक्षित' म्हणविल्या जाणाऱ्यांच्या श्रीमुखाची ती शोभा होती. बोलविता धनी वेगळाच होता. लोकमान्य टिळकांच्या आणि समाज-सुधारकाग्रणी आगरकरांच्या ओजस्वी वाणीचे आणि तेजस्वी लिखाणाचे ते पडसाद होते. टिळक-आगरकरांनीं विचारक्रांतीचें, युगप्रवर्तनाचें जें बहुमोल कार्य आधींच करून ठेविलें होतें त्या कार्याची ही फलश्रुति होती. केशवसुत हे नव्या विचारांचे, नव्या युगाचे 'प्रवर्तक' नव्हते, 'प्रचारक' होते, असें म्हणणेंच सत्याला धरून होईल.

'मग गणमात्रांतें, जोडणें केशवपुत्रातें, लाभलेलें होतें ! याच दृष्टीनें ते पद्य-पंक्तींतले पहिले मानकरी होत !

केशवसुतांच्या काळाकडे दृष्टि वळविली तर त्या काळीं देशभक्तांनीं अगर समाजसुधारकांनीं प्रत्यक्ष करण्यासारखा असा कोणताहि विधायक कार्यक्रम नव्हता. कार्यप्रवणतेच्या पूर्वतयारीचा म्हणून विचारप्रवणतेचाच तो काल असल्यामुळें त्याच दृष्टीनें देशांत नव्या विचारांच्या प्रचाराचें कार्य सुशिक्षितांकडून सर्वतोंमुखीं सुरू झालेलें होतें. तेंच कार्य केशवसुतांनीं पद्यलेखनानें केलेलें आहे; विशेष असें कांहीं नाहीं !

याप्रमाणें केशवसुतांच्या समग्र कवितेच्या अंतरंगाचा कार्यकारणभाव लक्षांत आला म्हणजे केशवसुतांच्या कवितेचें स्थान सामान्यतेच्या कक्षेंतच आहे हें स्पष्ट होतें.

थोडा बाह्यांगाचा विचार

अंतरंगाबरोबरच केशवसुतांच्या कवितेच्या बाह्यांगाचाहि थोडाफार विचार करणें इष्ट आहे. याच लेखांत ठिकठिकाणीं उद्धृत झालेलीं अवतरणें केशवसुतांच्या पद्यलेखनाची साक्ष देऊं शकतील. त्यांवरून केशवसुतांची कविता बाह्यांगाच्या दृष्टीनें निकृष्ट दर्जाची आहे, असेंच कोणीहि म्हणेल. प्रथमदर्शनींच भाषेचें दारिद्र्य आणि त्यांत हेंगाडेपणाची भर, दूरान्वय आणि त्याला क्लिष्टतेची जोड, ओबडधोबड शब्द-रचनेशीं संगनमत करणारी सैल पद्यरचना, अशा थाटाची केशवसुती कविता पाहिली, म्हणजे अभ्यासू गलितगात्र होतो. समग्र कविता वाचण्याइतका उत्साह त्याच्या अंगीं राहूंच शकत नाहीं. आगबोट लागावी, अगदीं तशीच केशवसुतांची कविता अभ्यासूंना लागते !

नमुन्याच्या कांहीं स्थलांचें दिग्दर्शन करूं म्हटलें, तरी तोहि एक ग्रंथच होऊन बसेल. तरी पण अगदींच थोड्या प्रमाणांत म्हणून कांहीं स्थलांचें दर्शन घेऊं—

भाषेचें दारिद्र्य

१ लकडीनें = शिसपेन्सिलीनें. २ दिसवुनी = दाखवून. ३ सदरुणपण = लाली. ४ साकोटी = सहा कोटी. ५ चुथडवूं = उलथवूं. ६ शूलारोपणयप = सूळ. ७ गल्लींचा = गालाचा. ८ चलद्वेझषकीं = विमानांत.

हेंगाडेपणा

१ श्रुतिद्वारें चित्तीं तंव दवडिली जाण असती = ऐकविली असती.

२ स्तनीं तूझे व्हावीं तर रचिन काव्यें स्वनखरीं : व्हावीं तर = पाहिजे तर.

३ त्याचेविशीं **अलग** हे दिसतात **मट्ट = परके, निर्जीव.**
४ भाळीं न तें **यो** अमुच्या = **येवो.**
५ गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंहि नसे थोडकें–
६ काय समजोनी समजलें तुम्हांला का ?
७ या जनाला किंवा याला = कवीला, मला.
८ वस्ताद् जी चीज जगीं असावी.
९ घराला मी आलों अटन करुनी फार दिवशीं.
१० फुटकळ वाक्यें मग दोघांहीं परस्परां जीं म्हटलीं कांहीं.
११ आलिंगूं ती झटेल का ?

दूरान्वय

१ दुरावूं, अन्योन्यां कवळुनि, दिलें आम्हि नसतें.
२ छायेला जल तें असे जर कुठें फेंसास तें गाळित.
त्या ठायी जमती गुरें, पथिकही धापांस ते टाकित.
३ न परि हरपलें तें गवसे !
४ होतों मी बसलों समीप रमणी एके दिनीं घेऊनी.

क्लिष्ट

१ गमे तूं तें ध्याया मज न दुसरी आकृति बरी
रतीचे वेळींच्या शिरति हृदयीं अन्यहि जरी
२ पापेच्छेस शिवाय चोदक नसे देहीं तुझें यौवन
३ संसारा मी समरांगणीं उचलुनि म्हणूनि निशाण
साद घालितों 'योद्धे हो ! झटुनि मोडुनी द्या प्राण'
४ जिकडे जावें तिकडें माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
५ त्यांचा स्वर्ग समग्र ही झडपितां चोपून त्याला फुका !

याप्रमाणें उडदांमाजी काळे गोरे काय निवडावें निवडणारें ? अभ्यासूंच्या सहनशक्तीला कांहीं मर्यादाहि आहेच कीं नाहीं ? केशवसुतांच्या कवितेचा अभ्यास करणें कंटाळवाणें होऊन बसण्याचें हें एक मोठेंच कारण आहे. अभ्यासाच्या अभावीं, पानाला पान चिकटवून पुढें सारून देण्याचा प्रघात पडल्यामुळेंच "केशवसुत महाकवि" 'तर हो बोवा ! महाकवि' असा सादाला पडसाद येणें अनिवार्य झालेलें असतें. आणि मग साद-पडसाद वर्गमूळ-घन- मुळानें 'महाकवि', 'महाकवि' 'महाकवि', 'महाकवि' असा आवाज सारखा घुमूं लागतो. अशा रीतीनें अनेकांकडून

केशवसुतांचें 'महाकवित्व' वदविल्यानें काय साधणार? या 'महाकवींच्या' ग्रंथपठनाचें फळ साधकांना काय मिळणार? रूक्षपणा, मठ्ठपणा, हेंगाडेपणा, शिवराळपणा! दुर्दैव!!

'कवि' स्वयंभू असतात, ते लिहितील ती कविता आणि बोलतील तें काव्य! असें मानण्याच्या काळ आतां राहिलेला नाहीं.

महत्पदाचें विडंबन–

काव्य ही एक कला आहे. ती अक्षरविद्या आहे. भाषा तिचें वाहन आहे, रसात्मकता तिचें अंग आहे, कल्पना तिचा अंगविक्षेप आहे, प्रतिभा तिची कांति आहे, लालित्य तिचा अलंकार आहे, संकेत तिचा कटाक्ष आहे, आणि संवेदना तिचा विलास आहे. अशा प्रकारच्या शास्त्रोक्त कलेची संभावना रसिक करूं लागलेले आहेत. शास्त्रशुद्ध साहित्याच्या सौंदर्यदर्शनाकडे रसिकांची आतुरता वाढत आहे. अशा या प्रगमनशील काळीं केशवसुतांचें 'महाकवित्व' अंगांत आणून केशवसुतांचें ढोलकें वडवीत राहण्याचा प्रयत्न निरर्थक ठरणारा आहे. पालटलेल्या काळाकडे आतां डोळेझांक करून निभणारें नाहीं.

महाराष्ट्रांत बऱ्याच वर्षांत 'महाकवि' जन्माला आलेला नाहीं. 'महाकवी'च्या जन्माकडे महाराष्ट्राचे डोळे लागून राहिलेले आहेत. 'महाकवी'संबंधीं महाराष्ट्राची उत्कंठा पराकोटीला पोंचलेली असली, तरी नितांतलेपणानें केशवसुतांनाच 'युगप्रवर्तक महाकवि' ठरविणें म्हणजे त्या महत्पदाचें व त्यावरोबरच केशवसुतांचें शुद्ध विडंबन होय!

(सह्याद्रि–सप्टेंबर १९४०
वर्ष ६ वें; अंक ९ वा, पृ. क्र. २–१२)

१९

कवि केशवसुत—एक बाजू

लेखक श्री. हरी श्रीधर शेणोलीकर

मराठी भाषेंतील टीकावाङ्मयाइतकें विकृत टीकावाङ्मय दुसऱ्या एखाद्या भाषेंत सांपडेल असें वाटत नाहीं. धाकट्या शास्त्रीबोवांची निबंधमालेंतील प्रतिपक्षाला अगदीं जमीनदोस्त करणारी जाज्वल्य टीका पाहिली, 'महाराष्ट्र भाषा-चित्रमयूर' कृष्णाजी नारायण आठल्ये यांचा 'केरळकोकिळा'च्या द्वारें 'कलमबहादूरास शेला-पागोटें' देण्याचा छद्मी, दंशपूर्ण, सर्वस्वी विघटनात्मक असा उपक्रम पाहिला, अगर अगदीं अलिकडचा अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या 'संदेश'मधला टीकेचा कुत्सित विषार पाहिला कीं, माझ्या वरील विधानाची सत्यता कोणालाहि पटेल.

टीकावाङ्मयांतील ही खंडनाची पद्धति एका दृष्टीनें फार बरी. अशा तऱ्हेचे टीकाकार जर नसतील तर 'कविता गवताऐसी उदंड वाढली असे' असेच उद्गार एकंदर वाङ्मयाविषयीं काढण्याची पाळी यायची. पण ह्या टीकाकारांमध्यें तोंडांत नेहमीं साखर घोळूं देणारा वर्ग आहे, त्यानें मराठी वाङ्मयाला फाजील गौरवाचे जे पुष्पहार घातले आहेत, ते मागें उल्लेखिलेल्या कडक टीकाकारांच्या विषारापेक्षां जास्ती दाहक आणि बाधक आहेत. ह्या लोकांच्या दृष्टीला मराठी वाङ्मयाच्या कोणत्याहि प्रांतांत कुठेंहि उणीव अशी बिलकूल दिसत नाहीं. त्यामुळें फुकट पदव्यांची खैरात करण्याचा लाटसाहेबांचा अधिकार जणूं कांहीं वाङ्मयप्रांतांत आपल्याच हातीं आला आहे अशा भावनेनें, हे टीकाकार अगदीं सामान्य अगर मध्यम दर्जाच्या वाङ्मयसेवकांनाहि बडघा बडघा पदव्या देऊन टाकतात.

ह्या अशा खैरातीमुळें ह्या पदवीदानाच्या रमण्यांत शास्त्रीबुवा महाराष्ट्राचे मेकॉले होतात. खाडिलकरांना शेक्सपियरची जागा मिळते, वरेरकरांना महाराष्ट्राचा शॉ ठरविण्याची बुद्धि होते, बायरन्चा शिक्का विनायकाच्या कपाळीं बसतो, चंद्रशेखर मिल्टन ठरतात, ख्रिस्ती झालेल्या टिळकांना टिळक ह्या हिंदु नांवालाहि मुकून टेनिसन हें इंग्रजी नांव मुकाट्यानें धारण करावें लागतें. आणि आपल्या केशवसुतांना शेले ह्या नांवानें मिरवावें लागतें.

'केशवसुत हे महाराष्ट्राचे शेले आहेत' असें म्हणणें म्हणजे मराठी टीकाकारांना टीका करतां येत नाहीं, त्यांच्या शरीराप्रमाणें त्यांचें मन आणि बुद्धि इंग्रजांच्याकडे गहाण पडली आहे असें सिद्ध करणें आहे. ह्या विधानानें केशवसुत आणि शेली ह्या दोघांचीहि किंमत त्या त्या मानानें कमी केलीच, पण शिवाय ह्या दोघां कवींच्या काव्याविषयींचें स्वतःचें अज्ञान मात्र टीकाकारानें स्पष्ट केलें, असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

'भृंग' आणि 'वातचक्र' ह्या कवितांची शेलीकृत Skylark आणि Ode to the West-wind या कवितांशीं तुलना करून पहा. केशवसुतांच्यांत काय 'शेलीपण' आढळलें आणि शेलेमधें काय केशवसुतत्व दिसलें; एक 'राम' जाणे (!) आणि केशवसुतांना महाराष्ट्राचा शेली ठरविणारा तो टीकाकार जाणे !

केशवसुतांचें सांसारिक आणि वैचारिक आयुष्य, त्यांची वृत्ति आणि स्वभाव-वैशिष्ट्य, त्यांनीं पद्यरूपानें मांडलेले आपले विचार या सर्वांचा सामग्र्यानें विचार करून असें म्हणावेंसें वाटतें कीं केशवसुत हे कवि नव्हेत. त्यांनीं १३२ छंदोबद्ध पद्यें लिहिलीं तरी त्या कविता नव्हेत आणि त्यांचा जनक कवि नव्हे.

कवि आणि त्याचा स्वभाव, त्याची मनोवृत्ति यांचा त्याच्या काव्यरचनेशीं निकट संबध असतो, हें कोणी नाकबूल करणार नाहीं. तसेंच शरीर आणि मन यांचा फार जवळचा संबध आहे असें मानसशास्त्रज्ञ म्हणतात तेंहि खोटें ठरवितां येणार नाहीं. हीं दोन्हीं विधानें गृहीत धरून आपण केशवसुतांची 'पर्सनॅलिटी' (ह्यांत मनोवृत्ति आणि शरीरठेवण ह्या दोहोंचाहि आपण उल्लेख करत असतों) त्यांच्या कवितांवरून ठरवूं लागलों कीं ती कवीची पर्सनॅलिही नव्हती असेंच स्पष्ट दिसतें.

त्यांच्या बंधूंनीं त्यांचें चरित्र लिहितांना त्यांच्या स्वभावाविषयीं जे उद्गार काढले आहेत ते आपल्या वरील विधानाला पुष्टिकारकच आहेत. ते म्हणतात, "लहानपणापासूनच केशवसुत अशक्त आणि किरकिऱ्या प्रकृतीचे, दुर्मुखलेल्या चेहऱ्याचे, एककल्ली, मुग्ध, एकलकोंडे आणि मुखदुर्बळ होते." केशवसुतांच्या हट्टी आणि हेकेखोर स्वभावामुळें त्यांचा फोटो आज उपलब्ध नाहीं. नाहीं तर त्यांच्या चेहऱ्यावरूनहि त्यांच्या (कवीला विसदृश अशा) स्वभावाविषयीं आपणांला अधिक अनुमान काढतां आलें असतें. तरीपण मनुष्याचें लेखन हें त्याच्या मनोवृत्तीचें प्रतिबिंब

असतें असें म्हणतात. तेव्हां केशवसुतांच्या पद्यरचनेवरून, त्यांच्या खाजगी पत्रव्यवहारावरून अगदीं हेंच अनुमान आपणांला कसें काढतां येतें हें श्री. माडखोलकरांच्या उद्‌गारावरून, स्पष्ट होईल. केशवसुतांच्या पद्यरचनेवरून त्यांनीं जें केशवसुतांचें शब्दचित्र काढलें आहें, तें केशवसुतांच्या बंधूंनीं त्यांच्याविषयीं काढलेले उद्‌गार वर उद्‌धृत केले आहेत, त्यांना अगदीं जुळतें आहे, असेंच दिसून येतें. माडखोलकर लिहितात, "कवित्वाच्या अहंपणामुळें स्वतःविषयीं भलत्याच अचाट समजुती करून घेऊन फशीं पडलेला, बुद्धीच्या कोतेपणामुळें नवीन कल्पनांचें आकलन नीटपणें करूं न शकलेला, मनाच्या हळवेपणामुळें संसाराचा उबग येऊन जगावर कातावलेला, व व्यासंगाच्या अभावामुळें आपल्या हृदयांतील खळबळ कशीतरी बोलून टाकण्यासाठीं धडपडत असलेला असा एक सुधारणावादी पण प्रणयपीडित आणि गलितोत्साह कवि–"

कवि म्हणजे एक सदा आनंदी, सदा हंसतमुख असा प्राणी असतो, ही नेहमींची कल्पना जरी अगदीं दूर सारली तरी केशवसुतांची मनोवृत्ति सर्वसामान्यपणें कवीची नव्हती असेंच वरील दोन अवतरणें वाचून कोणालाहि वाटेल.

कवि कसा असावा, हें वर्णन करून सांगण्यापेक्षां तो कसा गलितोत्साह आणि विकृत मनोवृत्तीचा नसावा हें आपल्याला केशवसुतांच्या चरित्रावरून आणि स्वभाववैशिष्ट्यांवरून सहज सांगतां येईल; आणि विरोधानें आपलें म्हणणें सिद्ध करण्याकरितां आपणांला टिळक, बालकवि आणि तांबे यांच्या 'पर्सनॅलिटी 'कडे बोट दाखवावें लागेल. गडकरी आणि खाडिलकर ही जोडी डोळ्यांपुढें आणून एक कवि आणि दुसरा अ-कवि असें आपण छातीठोकपणें सांगूं शकतों, तसेंच केशवसुत आणि तांबे ह्या जोडीकडे पाहून आपणांला असेंच विधान करतां येईल कीं, तांबे हे मनोवृत्तीनें खरेखुरे कवि आहेत आणि केशवसुत हे पद्यरचनेनें कवि म्हटले गेले आहेत. वास्तविक ते कवि नव्हेत.

त्यांच्या सांसारिक चरित्रांतहि काव्यानुकूल असे कांहीं मोठेसे चांगले आणि मोठेसे वाईट प्रसंग त्यांच्यावर आले असें दिसत नाहीं. सामान्य दर्जाच्या माणसाप्रमाणें त्यांचें आयुष्य गेलें. कुढच्या वृत्तीच्या आणि संकोची स्वभावाच्या, पैशाच्या दृष्टीनें गरीब म्हटल्या जाणाऱ्या हटवादी माणसाचा संसार जसा व्हायचा तसाच त्यांचा झाला. वाचनाच्या गोडीनें इंग्रजी कवितेचें वाचन होऊन त्यांतल्या नव्या कल्पनांचा पगडा मनावर बसला. आणि त्याच वेळीं कविता करून सुशिक्षितांत मानमान्यता पावलेल्या वि. गो. महाजनी, टिळक, मोगरे वगैरे कवींच्या पद्यरचनेकडे पाहून आपणहि कांहीं रचना करावी अशी केशवसुतांना इच्छा झाली. त्या इच्छेच्या आणि कवि म्हणून आपलें नांव व्हावें ह्या ईर्षेच्या योगानें त्यांनीं आपली दृष्टि पद्यरचनेकडे वळवली. इतरांपेक्षां आपण कांहीं नावीन्य दाखविलें पाहिजे म्हणून वाचनांत आलेल्या (सामान्य दर्जाच्याच) इंग्लिश कवींचें अनुकरण करायला त्यांनीं सुरवात केली. नावीन्यासाठीं

भुकावलेल्या सुधारक-चमूचे त्या वेळचे कर्णधार ह. ना. आपटे आणि प्रो. वा. व. पटवर्धन यांनीं केशवसुतांच्या कवित्वाबद्दल–नव्हे पद्यरचनेंतील नावीन्याबद्दल त्यांची पाठ थोपटली. केशवसुतांना हुरूप येऊन ते आपली पद्यसंख्या वाढवूं लागले. असा त्यांचा पद्यरचनेचा इतिहास आहे.

त्यांच्या मूळ वृत्तीला देखील एक प्रकारची विकृति यायला त्यांची ईर्षा आणि त्यापोटीं जन्म पावलेली काव्यविषयक भ्रामक समजूतच कारण आहे. पद्यरचना करूं लागल्याबरोबर आपण कोणी मोठे आहोंत असें त्यांना वाटूं लागलें. कवि म्हणजे कोणी जगावेगळा प्राणी असतो, त्याच्याकडून प्रतिभा नांवाची कोणी दैवी शक्ति मोठें अचाट कार्य करून घेते, त्याचे विचार, आचार– सगळेंच कांहीं विलक्षण दिव्य असतें, अशी त्यांची ठाम समजूत बनत चालली (काव्य आणि कवि यांविषयीं-च्या त्यांच्या कविता पहा). सर्व जगानें आपणांला डोक्यावर घेऊन नाचलें पाहिजे अशी भलतीच आकांक्षा काव्यविषयक अहंकारयुक्त भ्रामक समजुतीमुळें त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. पण महाराष्ट्रानें ती पुरवली नाहीं. कारण सार्वजनिक प्रियतेचा तो काळच नव्हता. साहजिकच निराशेचे आणि उदासीनतेचे उद्‌गार त्यांनीं काढले.

त्यांच्या कवितेंत दिसून येणारी हुरहूर ही शेलीसारख्या खऱ्या कवीच्या मनोवृत्तींत दिसून येणारी दैवी किंवा काव्यात्मक हुरहूर नसून वैयक्तिक आकांक्षेच्या निराशेंतून निर्माण झालेली उदासीनता आहे. पण त्या उदासीनतेचेंच त्यांच्या चहात्यानीं मोठें स्तोम माजविलें. पण मी कवि आहें ही रोगट जाणीव त्यांच्या मनांत जी दवा धरून बसली होती तिचें मुख्य लक्षण म्हणजे हें उदासीनतेचे रडवे सूर आहेत. तिचें दुसरें लक्षण म्हणजे कवीच्या महात्मेपणाचें जें अवास्तव बढाईखोर वर्णन केलें आहे तें, आणि तिचें तिसरें लक्षण म्हणजे द्रष्टेपणाचा आव आणून त्यांनीं जी गूढगुंजनात्मक हचा सदरांत येणारीं ' झपूर्झा ', ' हरपलें श्रेय ' यासारखीं गीतें रचलीं आहेत तें. हचा तिन्ही प्रकारच्या कविता वाचून कै. माधवराव पटवर्धनांप्रमाणेंच आपणांला असें वाटतें कीं, " आत्मकवित्वाच्या रोगट जाणिवेनेंच त्यांची दारुण निराशा केली आणि त्यांच्या वृत्तीस विपरीत करून टाकलें. "

ज्या तुतारीविषयीं इतका गाजावाजा केला जातो ती कविता अशाच स्वार्थी दारुण निराशेमुळें उत्पन्न झालेल्या विपरीत वृत्तींतून निर्माण झाली आहे. निराशेनें संतापलेला इसम ज्या चिडखोर आवेशानें बोलतो, तो चिडखोर आवेश त्या कवितेंत भरलेला आहे. त्या चिडखोर आवेशाला आणि त्यांतल्या पोकळ आणि रोगट अहं-काराला च केशवसुतांचे अनुयायी उत्साह, आवेश, ओज अशीं नांवें देतात.

कवित्वांतला खराखुरा आवेश पाहायचा असेल तर तो विनायकाच्या कवितेंत आपणांला दिसून येतो. विनायकाची काव्यात्मक उत्साहशीलता, त्याच्या वाणींतलें ओज, वृत्तींतला दमदारपणा, केशवसुतांच्यांत नाहीं. त्यांच्या तुतारीच्या नादानें

असतें असें म्हणतात. तेव्हां केशवसुतांच्या पद्यरचनेवरून, त्यांच्या खाजगी पत्रव्यवहारावरून अगदीं हेंच अनुमान आपणांला कसें काढतां येतें हें श्री. माडखोलकरांच्या उद्‌गारावरून, स्पष्ट होईल. केशवसुतांच्या पद्यरचनेवरून त्यांनीं जें केशवसुतांचें शब्दचित्र काढलें आहें, तें केशवसुतांच्या बंधूंनीं त्यांच्याविषयीं काढलेले उद्‌गार वर उद्‌धृत केले आहेत, त्यांना अगदीं जुळतें आहे, असेंच दिसून येतें. माडखोलकर लिहितात, "कवित्वाच्या अहंपणामुळें स्वतःविषयीं भलत्याच अचाट समजुती करून घेऊन फशीं पडलेला, बुद्धीच्या कोतेपणामुळें नवीन कल्पनांचें आकलन नीटपणें करूं न शकलेला, मनाच्या हळवेपणामुळें संसाराचा उबग येऊन जगावर कातावलेला, व व्यासंगाच्या अभावामुळें आपल्या हृदयांतील खळबळ कशीतरी बोलून टाकण्यासाठीं धडपडत असलेला असा एक सुधारणावादी पण प्रणयपीडित आणि गलितोत्साह कवि–"

कवि म्हणजे एक सदा आनंदी, सदा हंसतमुख असा प्राणी असतो, ही नेहमींची कल्पना जरी अगदीं दूर सारली तरी केशवसुतांची मनोवृत्ति सर्वसामान्यपणें कवीची नव्हती असेंच वरील दोन अवतरणें वाचून कोणालाहि वाटेल.

कवि कसा असावा, हें वर्णन करून सांगण्यापेक्षां तो कसा गलितोत्साह आणि विकृत मनोवृत्तीचा नसावा हें आपल्याला केशवसुतांच्या चरित्रावरून आणि स्वभाववैशिष्ट्यांवरून सहज सांगतां येईल; आणि विरोधानें आपलें म्हणणें सिद्ध करण्याकरितां आपणांला टिळक, बालकवि आणि तांबे यांच्या 'पर्सनॅलिटी 'कडे बोट दाखवावें लागेल. गडकरी आणि खाडिलकर ही जोडी डोळ्यांपुढें आणून एक कवि आणि दुसरा अ-कवि असें आपण छातीठोकपणें सांगूं शकतों, तसेंच केशवसुत आणि तांबे ह्या जोडीकडे पाहून आपणांला असेंच विधान करतां येईल कीं, तांबे हे मनोवृत्तीनें खरेखुरे कवि आहेत आणि केशवसुत हे पद्यरचनेनें कवि म्हटले गेले आहेत. वास्तविक ते कवि नव्हेत.

त्यांच्या सांसारिक चरित्रांतहि काव्यानुकूल असे कांहीं मोठेसे चांगले आणि मोठेसे वाईट प्रसंग त्यांच्यावर आले असें दिसत नाहीं. सामान्य दर्जाच्या माणसाप्रमाणें त्यांचें आयुष्य गेलें. कुढ्या वृत्तीच्या आणि संकोची स्वभावाच्या, पैशाच्या दृष्टीनें गरीब म्हटल्या जाणाऱ्या हटवादी माणसाचा संसार जसा व्हायचा तसाच त्यांचा झाला. वाचनाच्या गोडीनें इंग्रजी कवितेचें वाचन होऊन त्यांतल्या नव्या कल्पनांचा पगडा मनावर बसला. आणि त्याच वेळीं कविता करून सुशिक्षितांत मानमान्यता पावलेल्या वि. गो. महाजनी, टिळक, मोगरे वगैरे कवींच्या पद्यरचनेकडे पाहून आपणहि कांहीं रचना करावी अशी केशवसुतांना इच्छा झाली. त्या इच्छेच्या आणि कवि म्हणून आपलें नांव व्हावें ह्या ईर्षेच्या योगानें त्यांनीं आपली दृष्टि पद्यरचनेकडे वळवली. इतरांपेक्षां आपण कांहीं नावीन्य दाखविलें पाहिजे म्हणून वाचनांत आलेल्या (सामान्य दर्जाच्याच) इंग्लिश कवींचें अनुकरण करायला त्यांनीं सुरवात केली. नावीन्यासाठीं

भुकावलेल्या सुधारक-चमूचे त्या वेळचे कर्णधार ह. ना. आपटे आणि प्रो. वा. ब. पटवर्धन यांनीं केशवसुतांच्या कवित्वाबद्दल–नव्हे पद्यरचनेंतील नावीन्याबद्दल त्यांची पाठ थोपटली. केशवसुतांना हुरूप येऊन ते आपली पद्यसंख्या वाढवूं लागले. असा त्यांचा पद्यरचनेचा इतिहास आहे.

त्यांच्या मूळ वृत्तीला देखील एक प्रकारची विकृति यायला त्यांची ईर्षा आणि त्यापोटीं जन्म पावलेली काव्यविषयक भ्रामक समजूतच कारण आहे. पद्यरचना करूं लागल्याबरोबर आपण कोणी मोठे आहोंत असें त्यांना वाटूं लागलें. कवि म्हणजे कोणी जगावेगळा प्राणी असतो, त्याच्याकडून प्रतिभा नांवाची कोणी दैवी शक्ति मोठें अचाट कार्य करून घेते, त्याचे विचार, आचार– सगळेंच कांहीं विलक्षण दिव्य असतें, अशी त्यांची ठाम समजूत बनत चालली (काव्य आणि कवि यांविषयीं-च्या त्यांच्या कविता पहा). सर्व जगानें आपणांला डोक्यावर घेऊन नाचलें पाहिजे अशी भलतीच आकांक्षा काव्यविषयक अहंकारयुक्त भ्रामक समजुतीमुळें त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. पण महाराष्ट्रानें ती पुरवली नाहीं. कारण सार्वजनिक प्रियतेचा तो काळच नव्हता. साहजिकच निराशेचे आणि उदासीनतेचे उद्‌गार त्यांनीं काढले.

त्यांच्या कवितेंत दिसून येणारी हुरहूर ही शेलीसारख्या खऱ्या कवीच्या मनोवृत्तींत दिसून येणारी दैवी किंवा काव्यात्मक हुरहूर नसून वैयक्तिक आकांक्षेच्या निराशेंतून निर्माण झालेली उदासीनता आहे. पण त्या उदासीनतेचेंच त्यांच्या चहात्यानीं मोठें स्तोम माजविलें. पण मी कवि आहें ही रोगट जाणीव त्यांच्या मनांत जी दबा धरून बसली होती तिचें मुख्य लक्षण म्हणजे हें उदासीनतेचे रडवे सूर आहेत. तिचें दुसरें लक्षण म्हणजे कवीच्या महात्मेपणाचें जें अवास्तव बढाईखोर वर्णन केलें आहे तें, आणि तिचें तिसरें लक्षण म्हणजे द्रष्टेपणाचा आव आणून त्यांनीं जी गूढगुंजनात्मक हचा सदरांत येणारीं ' झपूर्झा ', ' हरपलें श्रेय ' यासारखीं गीतें रचलीं आहेत तें. हचा तिन्ही प्रकारच्या कविता वाचून कै. माधवराव पटवर्धनांप्रमाणेंच आपणांला असें वाटतें कीं, " आत्मकवित्वाच्या रोगट जाणिवेनेंच त्यांची दारुण निराशा केली आणि त्यांच्या वृत्तीस विपरीत करून टाकलें. "

ज्या तुतारीविषयीं इतका गाजावाजा केला जातो ती कविता अशाच स्वार्थी दारुण निराशेमुळें उत्पन्न झालेल्या विपरीत वृत्तींतून निर्माण झाली आहे. निराशेनें संतापलेला इसम ज्या चिडखोर आवेशानें बोलतो, तो चिडखोर आवेश त्या कवितेंत भरलेला आहे. त्या चिडखोर आवेशाला आणि त्यांतल्या पोकळ आणि रोगट अहं-कारालाच केशवसुतांचे अनुयायी उत्साह, आवेश, ओज अशीं नांवें देतात.

कवित्वांतला खराखुरा आवेश पाहायचा असेल तर तो विनायकाच्या कवितेंत आपणांला दिसून येतो. विनायकाची काव्यात्मक उत्साहशीलता, त्याच्या वाणींतलें ओज, वृत्तींतला दमदारपणा, केशवसुतांच्यांत नाहीं. त्यांच्या तुतारीच्या नादानें

लोक खडबडून उठले असें म्हणतात, नव्हे, असें दिसतें, पण त्यांतल्या आवेशापेक्षांहि चिडखोर अहंकारामुळेंच लोकांचें लक्ष तिकडे जास्त वेंधलें. राष्ट्रीय भावनेचा पहिला उद्‌गाता म्हणूनहि केशवसुतांकडे पाहतां येत नाहीं. कारण तो मान १८७१ सालीं 'राजा शिवाजी' हें काव्य लिहिणाऱ्या कै. रा. ब. कुंटे यांचा आहे. कुंटयांच्याच ऐतिहासिक परंपरेंत विनायक पुढें सरसावला. त्यानंतरच्या काळांत कवि गोविंद आणि बॅ. विनायकराव सावरकर हया कविद्वयांनीं राष्ट्रीय कवितेचें साम्राज्य वाढविलें. प्रतिभा, पांडित्य, आणि पौरुष यांचा ऊर्जस्वल संगम ज्या बॅ. विनायकराव सावरकर यांच्या काव्यप्रांतांत आढळतो, त्या राष्ट्रीय कवितेच्या प्रांतांत केशवसुतांना स्थान नाहीं.

तुतारीबरोबरच त्यांच्या 'झपूर्झा' आणि 'हरपलें श्रेय' हया शून्यशोधनात्मक दोन कवितांची मोठी स्तुति केली जाते. या प्रकाराचे पहिले प्रणेते असें त्यांना म्हटलें जातें, पण ही गूढगुंजनाची प्रवृत्तीहि मोठी काव्यात्मक आहे असें वाटत नाहीं. तन्मयतेच्या स्थितींत ज्ञाताच्या पलीकडे जाऊन प्रतिभा कोणतीं दिव्य दृश्यें दाखविते आणि गूढ गीतें ऐकवते याचें अलंकारिक वर्णन 'झपूर्झा' कवितेंत आहे, तर तन्मयतेच्या सुखांत ज्या दिव्य शक्तींचा भास झाला, ती दिव्यशक्ति हरपली याबद्दलची हळहळ 'हरपलें श्रेय' या कवितेंत आहे. प्रतिभाविषयक सामर्थ्याची जी भ्रमजन्य गैरसमजूत केशवसुत उराशीं धरून बसले होते, तिचींच प्रतीकें म्हणून या दोन कविता दाखवितां येतील.

यांतील प्रतिभाविषयक विचारसरणी जरी सदोष असली तरी सश्रद्ध मनानें गोचर भाषेंत मांडण्याची कारागिरी केशवसुतांनीं परिश्रमपूर्वक दाखविली आहे. पण आध्यात्मिक परिभाषेचा दुरुपयोग करून, अत्युक्तिपूर्ण व परस्परविरोधी अशा वर्णनानें चमत्कृतिजनक रचना करण्याची कारागिरी व्यक्त करणें म्हणजे कांहीं जिवंत काव्य-निर्मिति नव्हे.

त्यांच्या हया गूढगुंजनपर कवितांतून दिसून येणारी आध्यात्मिक परिभाषा, ख-पुष्प, अज्ञातध्वनि, यदृच्छा, अज्ञेय, दिक्काल, स्वरसंगम, पुरुष, प्रकृति, इ० शब्दांनीं निर्माण केलेलें व्याजोदात्त वातावरण, यामुळें ते मोठे तत्त्ववेत्ते असावेत असा आपला ग्रह होतो. पण अधिक खोलांत शिरतांच त्यांच्या असल्या कवितांतून आणि विचारात्मक अशा लहान लहान चुटक्यांतून त्यांनीं मांडलेली विचारसरणी सदोष आणि हेत्वाभास मूलक आहे असें दिसून येतांच ते तत्त्वज्ञानी कवि तर नाहींच नाहीं, पण साधे चिंतनशील कवि होते असें म्हणणेंहि चुकीचें वाटूं लागतें. चिंतनशीलपणाच्या बाबतींत जुन्या परंपरेंत वाढलेले चंद्रशेखर किंवा जुन्या नव्यांच्या संगम-रेषेवर उभे असलेले टिळक हे देखील त्यांच्याहून उंच दिसूं लागतात. केशवसुतांचें जुनें वाचनच मुळीं तोकडें होतें. तुकाराम-श्रीधर यांच्या पलीकडे वाङ्मय पाहिलेलें नाहीं आणि 'गोल्डन-

वरोरा [illegible] महाविद्यालय, वरोरा
क्रमांक ७४६६३ दि: [illegible]

ट्रेझरी' पलीकडे इंग्रजी वाचन नाहीं. अशा परिस्थितींत देखील त्यांनीं जी अंतर्मुख प्रवृत्ति दाखविली तिचें विशेष कौतुक केलें पाहिजे. पण त्यांची ही अंतर्मुखप्रवृत्ति काव्यनिर्माणक्षम न होतां वृत्तिवैपरित्याला कारण झाली असें दिसून येतें.

आणि म्हणूनच शुद्ध स्वरूपाचीं प्रेमगीतें पुढच्या काळांत त्यांना लिहितां आलीं नाहींत. 'पत्नीपासून दूर असलेल्या काळांत तिचीं प्रेमचित्रें काढण्याकरितां त्यांनीं वरींच विरहगीतें रचलीं' असें त्यांचे मित्र रा. रहाळकर लिहितात. तरीसुद्धां त्या त्या प्रेमगीतांत काव्यात्मक जिव्हाळा बिलकुल आढळत नाहीं. पहिल्या पहिल्या कांहीं प्रणयविषयक कविता खरोखरच सुंदर आहेत. पण पुढल्या काळांतील बहुतेक प्रेमगीतें हीं नाटकी वाटतात. आत्मानुभवाची स्मृति होऊन सहसंवेदना न झाल्यानें त्यांतल्या भावनेविषयीं शंका वाटूं लागते. शिवाय 'प्रयाणगीत', 'प्रणयकथन', 'माझें ठेवुनि चित्त घे' इत्यादि कवितांतून चमत्कृतिजनक क्लिष्ट क्लृप्ति व मजेदार पण अतर्कशुद्ध विचारसरणी स्पष्ट दिसूं लागल्यानें प्रेमापेक्षां बुद्धिमत्तेच्या चमत्कृतीचाच तो एक विलास आहे असें वाटूं लागतें. यांपैकीं बऱ्याचशा कविता प्रतिभेलाच प्रणयिनी समजून कामार्ताप्रमाणें तिचें प्रणयाराधन करण्याकरितां लिहिलेल्या आहेत. अशा रीतीनें काल्पनिक काव्यशक्तीला रति करणें हा मानसिक विकलतेचा आणि विकृतीचाच परिणाम आहे असें म्हणावें लागतें. तरीपण प्रेमगीतांचा भाग इतर कवितांपेक्षां बराच सरस आहे. आधींच्या कवींपेक्षा नवीन तऱ्हेच्या प्रणयाविष्काराचा पायंडा केशवसुतांनीं पाडला आणि त्यांच्या चेल्यांनीं याच प्रकारच्या गीतांचें मोठ्या अहमहमिकेनें अनुकरण करून सर्वत्र प्रेमगीतांचे निनाद दुमदुमून सोडले, यासाठीं त्यांना कवि जरी आम्ही म्हणत नसलों तरी 'प्रेमाचा पहिला शाहीर' असें म्हणायला तयारी आहे.

"सृष्टि हें एक सगुणशक्तीचें स्वरूप आहे. त्यांतील पृथक् वस्तूंशीं संस्कारक्षम मनुष्याचा गूढ संवाद होऊं शकतो, त्या तशा तन्मयतेच्या संवादांत मनुष्याला थोर थोर तत्त्वें शिकवितात इ. कल्पना वर्डस्वर्थ वगैरे आंग्लकवींच्या द्वारा मराठी कवींच्या डोक्यांत शिरल्या आणि सृष्टीशीं तन्मयता हा एक आधुनिक कवींचा मूलमंत्र होऊन बसला." केशवसुतांनीं हयाहि प्रांतांत 'फुलपांखरूं' 'भृंग', 'दंवाचे थेंब', इ. सृष्ट वस्तूंवर रचना करून नवीन पायंडा पाडून दिला. या दृष्टीनें त्यांनीं नावीन्य दाखविलें खरें, पण त्यांत सहजस्फूर्तिजन्य काव्यत्मकतेचा भाग बिलकूल नाहीं. इंग्रजी कवींनीं निसर्गविषयक कविता हृदयस्पर्शी करून दाखविली, आपणहि तशी मराठींत करून दाखवूं, हया ईर्षेनें त्यांनीं फुलांवरचीं व पक्ष्यांवरचीं पद्यें रचिलीं. हया अनुकरणाच्या लालसेनें लिहिलेल्या कवितांतील सृष्टिवर्णनें अगदीं सामान्य आहेत. प्रो. राजवाडे यांनीं असाच निर्वाळा दिला आहे.

पण डॉ. गुणे आणि रहाळकर यांना मात्र केशवसुतांनीं प्रत्यक्ष सृष्टि पाहून

हृदयांत सांठवून ठेवली होती, ते तिच्याशीं अगदीं एकरूप, तल्लीन झाले होते, असें वाटतें. कोणत्या आधारावर कोण जाणे ! केशवसुतांना प्रत्यक्ष सृष्टीविषयीं प्रेम होतें असें दिसत नाहीं. अशा कवितांतून चमत्कृतिजनक कल्पना लढविण्याच्या अगर एखादा सामान्यबोध शोधून काढण्याच्यामागें ते लागतात. निसर्गाशीं तन्मय झालेल्या कवीचें हें लक्षण नव्हे.

ज्याच्याशीं केशवसुतांची तुलना केली जाते त्या शेलीच्या निसर्गवर्णनांपुढें केशवसुतांचीं निसर्गवर्णनें अत्यंत फिकीं पडतात, हें धडधडीत स्पष्ट दिसत असतां त्यांना निसर्गाचे कवि म्हणून संबोधण्यांत काय अर्थ आहे ? एखाद्याचा खोटा गौरव करणें हें त्याची निंदा करण्यासारखेंच आहे, मग ही आत्मवंचना व परवंचना कशाला ?

'पर्जन्याप्रत' हचा एका पदाखेरीज बाकीचीं पद्यें सामान्य उतरलीं यावद्दल केशवसुतांना दोष देतां येत नाहीं. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच सृष्टिवैभवाचें आगर अशी त्यांची मायभूमि कोंकण सोडून त्यांना पोटासाठीं दूरदेशीं भटकत यावें लागलें. पुणें, मुंबई, नागपूर, धारवाड अशा निसर्गवैभवशून्य वातावरणांत ज्याचें सारें जीवन व्यतीत झालें, त्यानें खऱ्या निसर्गाऐवजीं पुस्तकांतील निसर्गाची आराधना करूं नये तर काय करावें ? शेलीच्या पुढें काव्य रचतांना इटली-स्वित्झर्लंड या देशांतील प्रत्यक्ष सृष्टि मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभी होती, तर केशवसुतांच्या पुढें आंग्लकाव्य-वाङ्मयांतील प्रतिबिंबरूप निसर्गसृष्टि उभी होती व तत्सदृश रचना करण्याची ईर्षा पोटीं होती म्हणून हटातटातें त्यांनीं हीं पद्यें लिहिलीं, यावद्दल त्यांचा गौरव करायला कोणीहि नाहीं म्हणणार नाहीं. पण त्यांची निसर्गपर कविता सहजस्फूर्त होती व ते निसर्गकवि होते असें मात्र कोणी कबूल करणार नाहीं.

नैसर्गिक सौंदर्यानें मन थयथय नाचूं लागून तो आनंद खळखळणाऱ्या शब्दांनीं काव्यरूप पावला आहे, असें केशसुतांच्यांत कुठेंच आढळत नाहीं. (एकच अपवाद 'टिप् फुलें टिप्', 'पहा फुलांची पखरण झिप्') ज्यांनीं सृष्टि पाहिली आहे, अनुभवून हृदयांत सांठवून ठेविली आहे ते ऐकेका शब्दांनीं सृष्टीचें विशिष्टरूप डोळ्यांपुढें उभें करूं शकतात. बालकवींच्या कविता पहा–'सृष्टीचा लाडका कवि' हें संबोधन बालकवीलाच सर्वस्वीं योग्य आहे.

कड्यावरुनि घेऊन उड्या, खेळ लतावलयीं फुगड्या
घे लोळण खडकावरती, फिर गरगर अंगाभंवतीं

यांसारख्या बालकवींच्या ओळींत दिसून येणारी जादू केशवसुतांच्यांत नाहीं. ते विशिष्ट भावनेची उणीव चमत्कृतीनें, वर्णनांतील हुबेहूबपणाची उणीव क्लृप्तीनें भरून काढतात. चमत्कृति आणि क्लृप्ति यांनीं भडक पद्यरचना करतां आली तरी जबंत काव्य निर्माण करतां येत नाहीं. तसेंच फुलांकडे, पक्ष्यांकडे पाहून सामान्य

बोध काढण्याचा खटाटोप करण्यांतला बुद्धिविलास चमत्कृतिजनक असला तरी सरसतेची उणीव तो भरून काढूं शकत नाहीं.

काव्य हें निसर्गतादात्म्यानेंच निर्माण होतें ही परकी कल्पना उराशीं धरून वसल्यानें मनुष्यव्यवहारांत कांहीं काव्य आहे असें त्यांना बिलकूल वाटेना. एकंदर मानवी जगाविषयींच विपरीत वृत्तीनें उदासीन झाल्यामुळें त्यांनीं आत्मस्वकीयांच्या-विषयीं जी उत्कट प्रेमनिदर्शक कविता केली आहे तींत महत्त्वाची उत्कटता तितकी प्रत्ययास येत नाहीं. केशवसुत ईर्षेनें पद्यरचना करूं लागले. त्यांत थोडीशी गति होतांच भलत्या आकांक्षेच्या भरीं पडले, ती आकांक्षा पुरी होत नाहीं असें पाहून 'भिकार या जगीं इच्छित न मिळे कांहीं' असें म्हणून निराश झाले. आपल्या भोंव-तालच्याच मानवी जगाला जुनाट समजून चिडखोरपणानें चारदोन फटकारें लगावूं लागले. अखेर गलितोत्साह होऊन निसर्ग आणि कविताशक्ति यांच्या आराधनेस लागले. काव्यमय रम्यासाठीं विजनवास पत्करावा असें त्यांना वाटूं लागलें.

जेथें ओढे वनराजी, वृत्ति रमे तेथें माझी
कारण कांहीं साक्ष तिथें, मम त्या श्रेयाची पटते.

पण सांसारिक दुःस्थितीमुळें ओढे-वनराजींच्या प्रदेशांत त्यांना फार काळ कधींच राहतां आलें नाहीं. निसर्गाशीं तादात्म्य न होतांच त्यासाठीं हुरहुरावें लागलें.

याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे?' असें तत्त्व लोकांपुढें मांडूनहि त्यांनीं स्वतः मात्र साध्या साध्या मानवी व्यवहारांतलें काव्य अजिबात दुर्लक्षिलें.

निसर्गाकडे धांव घेण्याऐवजीं खराखुरा कवि प्रथम नित्यपरिचयांतील व्यक्तीं-च्या मनोभावनांकडे धांव घेतो. त्या चालत्याबोलत्या मनुष्यांच्या हृदयांतील मुके भाव आपल्या दिव्य संगीत माधुरीनें बोलके करतो. खराखुरा, मनोवृत्तीनें कवि असणारा कवि प्रथम भाव-कवि असतो आणि मग निसर्ग-कवि असतो. कविवर्य तांबे आणि यशवंत यांची कविता हेंच सांगते.

तांबे आत्मभावनांशीं जितक्या तन्मयतेनें रंगून गेले तितक्याच तन्मयतेनें स्वकीयांच्या मनोभावनांशीं, बालाशीं बाल होऊन, स्त्रीशीं स्त्री होऊन, वृद्धाशीं वृद्ध होऊन, तरुणांशीं तरुण होऊन ते रंगून गेले, आणि आपल्या सूक्ष्मग्राही, सौंदर्यप्रवण आणि शुचि अशा मनोवृत्तीनें त्यांनीं हृदयस्पर्शी नाट्यगीतें रचलीं. केशवसुत मात्र मानवी जग विसरून नाटकी वेडानें अहंकारून जाऊन 'हरपल्या श्रेया' बद्दल हळहळत बसले. तांबे खरे कवि ठरले. केशवसुत आभासरूप कवि ठरले.

केशवसुतांचें मन प्रत्यक्षसृष्टिनिवृत्त झाल्यानें त्यांना मानवी मनोभावनांशीं समरसच होतां येईना. म्हणून त्यांच्या सामाजिक म्हटल्या जाणाऱ्या कविता (अंत्य

जाच्या मुलाचा प्रश्न, मजुरावर उपासमारीची पाळी) निर्जीव ठरल्या. परकायाप्रवेश करून इतरांच्या मनोवृत्तींशीं समरस होणें हा जो मोठा थोरला कवीचा गुण तो केशवसुतांच्यांत बिलकुल नव्हता. त्यांच्या तुतारींतील आवेशानें अन्तःकरण क्षणभर थरारतें, पण त्याचा परिणाम कायमचा रहात नाहीं. उलट तांब्यांची तुतारी-सदृश वाटणारी 'रुद्रास आवाहन' ही कविता पहा. प्रत्येक शब्दन् शब्द कानांत घुमूं लागतो. त्यांचीं विधवांच्या विषयींचीं पांच नारगीतें पहा, अन्तःकरण कळवळून सोडतात. हें सामर्थ्य केशवसुतांच्या वाणींत नाहीं.

केशवसुतांच्या भाषेविषयीं बोलायलाच नको. त्यांच्या कवितांना कविमंडळी-बाहेर फारशी प्रसिद्धि मिळाली नाहीं याचें कारण त्यांच्यांतील भाषासौष्ठवाचा अभाव हें होय. पुढच्या काळांत त्यांची भाषा नादपूर्ण होऊं लागली होती हें खरें, पण एकंदरीनें भाषागुण त्यांच्या कवितेंत कमीच.

भाषा खडबडीत, संमिश्र स्वरूपाची, संस्कृतशब्दप्रचुर, अप्रयुक्तत्व, निहितार्थत्व, क्लिष्टत्व, ग्राम्यता इ. दोषांनीं युक्त अशी आहे. ती ओजोगुणाची दर्शक म्हणून नव्हे. भाषाप्रभुत्वाच्या, वृत्तप्रभुत्वाच्या अभावाची दर्शक म्हणून! केशवसुतांची अगदीं आत्मनिष्ठ स्वरूपाची जी भावपूर्ण पद्यरचना आहे तींत तांबे यांचें सहजोद्गारी संगीत नाहीं, टिळकांचा रसाळपणा नाहीं, गोविंदाग्रजांचा ओघ नाहीं, विनायकांची सफाई नाहीं आणि बालकवींचें ललितमार्दवहि नाहीं. अशा पद्यरचनाकाराला त्यानें जुनें पंतपंडिती वळण सोडून जरा वेगळी रचना केली एवढ्याचसाठीं म्हणून त्याला 'कवि' 'शब्दसृष्टीचा ईश्वर' असें कसें म्हणायचें?

वास्तविक त्यांनीं दाखविलेला वेगळेपणा लोकविलक्षण होता असें नाहीं. इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनाचा एतद्देशीय वाङ्मयावर जो परिणाम व्हायचा त्याची सुरवात काव्यप्रांतांतहि केशवसुतांच्या आधींपासूनच झाली होती. क्रांतींत सांपडलेले आणि तत्कालीन इतर मराठी कवींच्यापेक्षां पाश्चात्य कवित्वांत अधिक रंगून गेलेले आणि त्यामुळें उठावदारपणानें वेगळे भासणारे असे केशवसुत होते. जास्त उतावळे, बंडखोर वृत्तीचे, जनमताची पर्वा न करणारे, एक भावपूर्ण रचना करणारे पद्यकार एवढेंच त्यांचें वैशिष्ट्य होतें. तन्मयतेनें काढलेले पडसाद, तडफेनें उमटविलेले विचार, समाजाला धिक्कारण्याचा केलेला आविर्भाव यामुळें ते स्वतंत्र वाण्याचे व प्रतिभेचे असें इतरेजनांना वाटलें. त्यांनीं त्यांच्या दोषांनाहि गुणांचें स्वरूप दिलें.

त्यांच्या पद्यरचनेंतील बोधपरता व अवतरणक्षमता यांत कित्येकांना नावीन्य वाटलें. खडबडीत रांगडेपणांत सामर्थ्य आढळलें, क्लिष्ट अतर्कशुद्ध विचारसरणी व मूर्तिकरण यांत कल्पनेचा चमत्कृतिजनक विलास दृग्गोचर झाला, अत्युक्ति म्हणजे

उत्कटता वाटली, अध्यात्मवादांतील परिभाषेच्या दुरुपयोगांत आणि अंतरांतील उल्लेखांत उदात्त दिव्यता भासमान झाली आणि अतिस्तुतीचा लोंढा वाहूं लागला.

गडकऱ्यांसारखा असामान्य कल्पकतेचा, प्रभावी वाणीचा, भावनोत्कट अंतःकरणाचा, भाषाप्रभु त्यांचें गुरुपद जाहीर करून आपल्या करुणमधुर गीतांनीं महाराष्ट्राला डोलावूं लागला म्हणूनच केशवसुतांचें महत्त्व वाढलें. बुवाबाजीच्या संप्रदायाप्रमाणें वाङ्मयाच्या संप्रदायांतहि शिष्यामुळेंच गुरूचें प्रस्थ विशेष वाढलें जातें असें बऱ्याच उदाहरणांवरून दिसून येतें, त्यांतलाच हा एक प्रकार आहे. गडकऱ्यांना स्वतःच्या प्रतिभाशक्तीचा आत्मविश्वास–निदान अगदीं सुरवातीला–तरी नव्हता. त्यामुळें त्यांना कुणाची तरी वारसदारी पत्करायची होती, म्हणून ते आपल्या अगोदर होऊन गेलेल्या कवींकडे पाहूं लागले. त्यांत नावीन्याच्या भडक रंगानें उठून दिसणारे केशवसुत त्यांना आदरणीय वाटले. गडकऱ्यांनीं त्यांना आपले गुरु ठरविले (आणि केशवसुतांनीं जें जें नवीन आणलें होतें त्याचा विपर्यय मात्र केला). गडकऱ्यांचे गुरु नवयुगाचे प्रवर्तक ठरले. 'कवींचे कवि' ही पदवी त्यांना देण्यांत आली. पण हा आत्यंतिक स्तुतीचा भर ओसरल्यावर केशवसुतांचें खरें स्वरूप जेव्हां ध्यानांत आलें तेव्हां त्या वेळीं त्यांच्या कविपणाविषयींच शंका निघूं लागल्या. फुलांच्या भाराखालीं दबून गेलेली देवमूर्ति देव मानली गेली पण ती वास्तविक दगड आहे हें विचारवंतच जाणूं शकतात. 'कवींचा कवि' हा वास्तविक कवीच नव्हे हें सहृदय रसिक ओळखूं शकतात.

अखेरी-अखेरीला केशवसुतांनाहि आपल्यांतील कवित्वशक्तीच्या अभावाची जाणीव होऊं लागली होती. ते लिहितात–

"मी खुजट आहें हें पाहून मला वाईट वाटतें. उंच वाढण्याचीं चिन्हें कांहीं अजून माझ्यांत दिसत नाहींत, म्हणून माझा मलाच राग येतो. जे केवळ लहानसहान प्रयत्न करतात ते मला आवडत नाहींत."

अशा तऱ्हेचें पत्र लिहिणारी व्यक्ति मनोवृत्तीनें कवि आहे असें कोण म्हणेल ? जी व्यक्ति मनोवृत्तीनें कवि नाहीं, जिचे विचार काव्यरूपानें प्रकट होत नाहींत त्या व्यक्तीनें १३२ छंदोबद्ध पद्यें लिहिलीं म्हणून तिला कवि कसें म्हणायचें ?

(फर्ग्युसन कॉलेज षाण्मासिक, सप्टेंबर १९४०;
पुस्तक ३२, अंक १ ला; पृ. क्र, २–९).

२०

नव्या नव्यायुगाचा प्रणेता – केशवसुत

लेखक : अनंत हरी जोशी, बी. ए.

लोकमत अगदीं विलक्षण लहरी असतें हेंच खरें ! एरवीं ज्या केशवसुतांना 'कवींचे कवि' ही मानाची पदवी देऊन रसिकांनीं गौरविलें, ते केशवसुत कवीच नव्हत असें म्हणणारा टीकाकार पुढें आला नसता. अर्थात् अशा तऱ्हेच्या वावटळी मराठी साहित्याला अगदींच अपरिचित नाहींत. 'मोरोपंत व वामनपंडित कवीच नव्हत' असें एका लेखकानें कांहीं वर्षांपूर्वी आग्रहपूर्वक प्रतिपादिलें होतें. आतां तोच आरोप केशवसुतांवर करण्यांत आला आहे. केशवसुतांना 'कविकुलगुरु' मानणारे व ते कवीच नव्हत म्हणणारे दोघेहि आत्यंतिक टोकाला गेले आहेत. खरें सत्य सुवर्ण-मध्याच्या कोठें तरी आसपास असलें पाहिजे.

केशवसुतांच्या कवितेची खरी योग्यता ज्यांना जोखावयाची असेल त्यांनीं मराठी काव्यवाङ्मयाकडे ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें पाहिजे. जुन्या मराठी काव्य-वाङ्मयाची बिनी ज्ञानेश्वरादिकांनीं सजविली व मोरोपंत, वामनपंडित इत्यादि कवि पिछाडीचे मानकरी शोभले. आमचें राज्य नाहींसें झालें त्या वेळीं शाहिरी काव्याचा गोड पण छोटासा कालखंडहि संपुष्टांत आला होता. त्यानंतर 'टोपीकरांचें राज्य' सुरू झालें. व मेकॉलेनें धूर्तपणानें आंखलेल्या शिक्षणपद्धतीमुळें आमच्या जीवनांत हलके हलके बदल होऊं लागला. अर्थात्च या बदलाचें स्वरूप 'साहेबां'ना इष्ट असेंच झालें. जुन्या गोष्टींचा आम्हांस तिटकारा वाटूं लागला. व या नव्या मायाबाजारानें आम्ही लोभावून गेलों. हावर्डसाहेबाचीं चार पुस्तकें शिकलीं कीं मोठ्या पगाराच्या

मानाच्या नोकऱ्या मिळतात असें समजतांच आमच्यांतील बुद्धिमान् वर्ग इंग्रजी शिक्षणाच्या कच्छपीं लागला व तेव्हांपासून इंग्रजी राजवटींतील फेरफार सुरू झाले. पोशाखांत व आचारविचारांत तर बदल झालाच पण वाङ्मयावरहि त्याचा परिणाम हळूहळू पण निश्चितपणें होऊं लागला.

मोरोपंत, वामनपंडित यांच्या वेळपर्यंतच्या बहुतेक सर्व कवींनीं रामायण, महाभारत व भागवत यांचें यथेष्ट मंथन करून आपली काव्यसंपदा सजविली होती. इंग्रजी पाठशाळेंतून बाहेर पडणाऱ्या आमच्या शास्त्री-पंडितांनीं आपलें लक्ष पुराणेतर संस्कृत वाङ्मयाकडे वळविलें व लेले, राजवाडे, चिपळूणकर यांनीं मराठींत काव्य-रचनाहि केली. पण त्यांचें वळण जुनेंच असल्यामुळें त्यांना नव्या काव्य-युगाचे जनक असें म्हणतां येणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर चिंतामणि पेठकर, लेंभे, मोगरे यांच्या काव्यांतहि आधुनिक काव्यवाङ्मयाचीं बीजें आढळणार नाहींत. काव्याच्या नव-युगाचीं पहिलीं पाउलें जर कोणाच्या काव्यांत उमटलीं असतील तर तीं केशवसुतांच्याच. त्यांच्या काळापर्यंत इंग्रजी शिक्षण पुष्कळच स्थिरावलें होतें. व शेले, कीट्स्, वर्डस्वर्थ, लाँगफेलो इत्यादि कवि वाचण्यांत येत होते. इंग्रजी काव्य वाचून हें कांहींतरी नवें आहे, यासारखें आपण कांहींतरी लिहावें अशी इच्छा केशवसुतांच्या अंतःकरणांत निर्माण झाली असल्यास नवल नाहीं. वर्डस्वर्थ आदि कवींचे जे पडसाद केशवसुतांच्या कवितांत उमटले आहेत, त्याचेंहि कारण हेंच नावीन्य होय. जेव्हां केशवसुतांची कविता प्रसिद्ध होऊं लागली तेव्हां लोकांना त्यांच्या याच नवेपणाचें कौतुक वाटलें. व त्याच प्रेमभरांत त्यांनीं त्यांना नव्या काव्ययुगाचा प्रणेता ठरविलें. बालकवि, टिळक, बी, गोविंदाग्रज इत्यादि कवि त्यांच्याकडे आदरानें पाहूं लागले व आधुनिक काव्यवाङ्मयाची ध्वजा केशवसुतांच्याच हस्तें रोंविली गेली.

इंग्रजी राजवटींतील नव्या तऱ्हेची कविता करणारे पहिले कवि केशवसुत होते, एवढ्या एकाच कारणानें मात्र मी त्यांना मोठेपणा देत नाहीं. भावना व कल्पना यांचें योग्य चित्रण करणारे कवि याहि दृष्टीनें त्यांची योग्यता मोठी आहे. फ्रेंच राज्य-क्रांतीच्या काळानंतर शेले, वर्डस्वर्थ वगैरे कवींच्या काव्यांत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या कल्पना शिरल्या. त्या कवींच्या परिशीलनानें व परिस्थितीच्या तीव्र बोंचणीमुळें केशवसुतांनाहि त्या कल्पना स्वागतार्ह वाटल्या. अर्थात्च या कल्पना म्हणजे परक्यांच्या कल्पनांची नुसती उसनवारी नव्हती. वयाच्या विसाव्या वर्षीं 'मित्राच्या लागलेल्या खोलीस पाहून' लिहिलेल्या कवितेंत त्यांची स्वातंत्र्याची तळमळ व्यक्त झाली आहे. शारीरिक व मानसिक गुलामगिरीचा त्यांना भयंकर संताप होता. समाजांत त्यांना हरघडी अनुभवास येणाऱ्या कटु अनुभवाचें दुःख ते स्वतः विसरूं शकत नव्हते. महा-राष्ट्रांत त्या वेळीं लो. टिळक, आगरकर, रानडे, गोखले यांसारखे राष्ट्रनेते नव्या नव्या विचारांचीं वादळें उठवीत होते. केशवसुतांच्या संस्कारक्षम हळुवार मनावर त्यांचा

परिणाम निःसंशय झाला. 'आगबोटीच्या कांठाशीं उभ्या असलेल्या तरुणीस पाहून' या कवितेंत ते म्हणतात–

"कधीं कोणी राष्ट्र प्रबल दुसऱ्याला बुडविण्या–
जहाजें मोठालीं करिल जरि गे सज्ज लढण्या,
तरी, सांगोनीया प्रवर वरुणाला खवळवूं–
समद्रा, तेणें त्या सकल खलनौका चुथडवूं!"

या कवितेंतील उतरार्धांतील जोरांत श्री. तांबे यांच्या 'रुद्रास आवाहन' या कवितेंतील श्रुतिरम्यता नसली तरी आवेश मात्र भरपूर आहे. 'स्फूर्ति' या कवितेंतहि जोम किती आहे तो पहा.

"कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या!
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या!"
आणि
"बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे–
उडवुनि देउनि जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे!"

कारण त्यांना असें निश्चित वाटतें कीं–

"नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें–
कोण मला वठणीला आणूं शकतो, तें मी पाहें!"

अशा रीतीच्या आवेशाची परमावधि 'तुतारी' या कवितेंत झालेली आहे. नव्या युगाचें हें नेतेपण मीं स्वतः स्वीकारलेलें आहे, या काळांत जगांतील दुःख, दारिद्र्य व दैन्य नाहींसें झालेंच पाहिजे, त्याकरितां सबंध समाजरचना उलथी पालथी करावी लागली तरी हरकत नाहीं, अशा रीतीचा काव्योन्माद या कवितेंत स्पष्ट दिसतो. उदा.–

"फुंकिन मी जी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें
अशी तुतारी द्या मजलागुनि!"

या कवितेंतील खरें रहस्य समजण्यास केशवसुतांना समाजांत कशी लाचारी सहन करावी लागली तें ध्यानांत घेतलें पाहिजे. पिळवलेल्या अंतःकरणाखेरीज पुढील उद्‌गार निघणार नाहींत.

"जुनें जाऊं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनि टाका
सडत न एक्या ठाईं ठाका
सावध ! ऐका पुढल्या हांका
खांद्यास चला खांदा भिडवुनि ! "

आपली परिस्थिति समाधानकारक नाहीं याची तीव्र टोंचणी केशवसुतांना लागली होती. या जगांत कोणी उगाच ओरडत उठत नाहीं; कांटा टोंचतो तोच ओरडतो. या दृष्टीनें पाहतां 'भृंग' या साध्या कवितेंतहि कवि व भृंग यांतील तफावत स्पष्ट दिसते.

'तुजमागुनि वाटे यावें । गोड फुलें चुंबीत गावें'

पण हेंहि कवीच्या नशिबीं नाहीं – भृंगाची मात्र हेवा करण्यासारखी स्थिति आहे.

"परंतु भृंगा ! तव गान
परमानंदें परिपूर्ण !
उदासीन ही जगाविशीं
तव तन्मयता सृष्टीशीं ! "

'पुष्पाप्रत' या साध्या कवितेंत सुद्धां–

"दिव्यत्वाला स्पर्श कराया
भय वाटे मजला ! "

अशी कवीची मनःस्थिति आहे.

अशा प्रकारची उदासीनता त्यांनीं उसनी आणलेली नाहीं. त्यासाठीं प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांना आंसवांचें मोल द्यावें लागलेलें आहे. फुलाला उद्देशून ते पुढें म्हणतात–

"सौकुमार्य तव अजुनी आहे
हंसतचि आहे हास्य तुझें हें,
परि मम भाळीं ढग अश्रूंचा
हाय ! डंवरलाहे ! "

हृदयाच्या तळमळीनें हे उद्‌गार निघाले आहेत. कविता वाचायला गोड वाटतात पण असली कलेचीं कैलासलेणीं कोरायला अंतःकरण फोडावें लागतें. कलावंताचें हृदय भंग पावतें तेव्हांच त्या भंगलेल्या मनाच्या पायावर तुमच्या-आमच्या मनास सुखविणारे कलेचे ताजमहाल उभारले जातात.

"असुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा
पितां बुडाशीं गाळ दिसे
त्या अनुभव हें नांव असे !"

पण असल्या अनुभवांनीं कवीची वृत्ति जगाचा तिरस्कार करणारी झाली नाहीं.

"फेकुनि द्या तो जगावरी
अमृत होऊ तो कुणातरी !"

केशवसुतांनीं ज्या प्रतीकात्मक कविता लिहिल्या त्यांवर कांहीं टीकाकारांचा राग आहे. त्या कविता किंचित् गूढगुंजनात्मक आहेत ही गोष्ट खरी. पण कविमनाचे कैक अनुभव त्यांत ग्रथित केलेले आहेत. आपल्या अंतःकरणांत निर्माण होणाऱ्या सर्वच कल्पना व सुखस्वप्नें आपण गद्यांत तरी उतरवूं शकूं का ? कित्येक वेळां कवीच्या अंतःकरणाला अतींद्रिय व अज्ञात अशा कांहीं कल्पनांची प्रचीति येते व तो ती काव्याच्या भाषेंत मांडण्याचा प्रयत्न करतो. तसाच प्रयत्न केशवसुतांनीं 'हरपलें श्रेय' व 'झपूर्झा' या कवितांत केला आहे. 'हरपलें श्रेय' या कवितेंतील स्त्रीभूमिकेचा आविष्कार सोडून देऊं हवा तर, पण–

'त्रिखंड हिंडुनि धुंडितसें । परि न हरपलें तें गवसे !'

या ओळी केशवसुतांचे आयुष्यांतील सहजोद्गार या दृष्टीनें तरी रम्य आहेत कीं नाहींत ? आयुष्यांतील दुःखाशीं झुंजतां झुंजतां सुखाची व दुःखाचीहि चव नाहींशी झाली आहे अशी अवस्था प्राप्त होणें शक्य आहे कीं नाहीं ? आणि अशा अवस्थेचें वर्णन 'झपूर्झा' या कवितेच्या पहिल्या कडव्याइतकें सुंदर रीतीनें चितारलेलें तुम्हीं पाहिलें आहेत का ? गूढगुंजनाव्यतिरिक्तहि केशवसुतांच्या या कवितेंत गोडी आहे ही गोष्ट रसिकांना मान्य करावीच लागेल. जे मुळीं दोषैक दृष्टीच घेऊन बसले असतील 'तान्प्रति नैष यत्नः ।'

कल्पनांच्याहि बाबतींत केशवसुत मागें पडणार नाहींत. आयुष्याचे कडवट अनुभव आलेला माणूस असेंच म्हणणार–

"काळोखल्या जगामध्यें या
मृत आशांच्या चितांवरूनिया
पिशाच्च माझें भटकत आहे
शांति नसेचि तया !"

कित्येक वेळां ते असेंहि आशावादीपणानें सांगतात–

"प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुन्दर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरती नोंदा"

'घुवड' या कवितेंतहि

"श्यामा राणी गभीर रजनी
अलंकृता जी नक्षत्र गणीं;
वेत्र आपुले उंच धरोनी
बसुनी राज्यासनीं दरारा दावित आहे जों फार!"

हें चित्र 'पो' कवीलासुद्धां लोभनीय वाटणार नाहीं काय? प्रीतीबद्दल ते म्हणतात—

"नंदनवनामधीं आला
कल्पलतेला बहर भला
तिचीं हृदयीं बीजें पडलीं
प्रीति त्यांतुनी अवतरली"

असल्या ओळी श्री. भास्करराव तांबे अगर बालकवि यांची आठवण करून देत नाहींत का?

"दिवस जनाला देव दिसे,
परि गद्यच त्याच्या वदनीं;
रात्र राक्षसी भासतसे,
परि गाते सुंदर गाणीं!"

असली कल्पना लिहिणारा माणूस कवि नव्हता असें कसें बरें म्हणतां येईल?

केशवसुतांच्या कवितेंत अशा पांचपंचवीस कविता सहज काढतां येतील कीं ज्या मराठी वाङ्मयाला शोभा आणतील. कोणताहि ललितलेखक सर्वच कृति पहिल्या दर्जाच्या लिहूं शकत नाहीं ही गोष्ट टीकाकारांनीं लक्षांत धरावी. केशवसुतांच्या कमी प्रतीच्या कवितांवरून त्यांना ते कवीच नव्हत म्हणणें हें बरोबर नाहीं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं आपल्या आजच्या कल्पनेनें आपण त्यांची किंमत जोखतां कामा नये. तांबे, माधव ज्युलियन यांसारख्या कवींचे मानदंड केशवसुतांची योग्यता ठरवतांना उपयोगी पडणार नाहींत. मराठी कवितेचें क्षितिज आपल्या नजरेस फारच भव्य व दिव्य दिसतें आहे. पण हें क्षितिज दिसण्यासाठीं आपण पूर्वसुरींच्या

खांद्यावर उभे आहोंत ही गोष्ट विसरूं नये. मराठी काव्याला आजची स्थिति प्राप्त होण्यास पूर्वजांची पुण्याई खर्ची पडलेली आहे. त्यांचें क्षितिज लहान म्हणून त्यांना हिणविणें ही आपल्या मनाच्या कोतेपणाची खूण आहे.

केशवसुतांच्या पद्यांतील एखादा उतारा काकदृष्टीनें निवडून ते खुजट वृत्तीचे होते म्हणून सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला आहे. आकृतीच्या लहानमोठेपणावर अंतःकरणाची लांबीरुंदी अजमावतां येत नाहीं. नाहींतर सुप्रसिद्ध मल्ल गामा हा हिंदुस्थानचा 'महात्मा' ठरला असता. केशवसुत मनानें किती मोठे होते याचें प्रत्यंतर त्यांच्या कवितेंत दिसून येईलच. 'आम्ही कोण?' या सुनीतांत वर्णन केलेली कवीची थोरवी त्यांच्या मोठेपणाची ग्वाही देत नाहीं काय? वर्गामध्यें शिक्षकांनीं त्यांना 'दुर्मुखलेला' म्हणून हिणवतांच त्यांनीं दिलेलें उत्तर किती बाणेदार आहे! 'तुमच्या पोराबाळांना माझ्या कविता शिकाव्या लागतील, त्या वेळीं माझ्या चेहऱ्यामोहऱ्याची विचारपूस कोणी करणार नाहीं!' हें उत्तर देणारा कवि वृत्तीनें खुजट व दुबळा खास नाहीं.

केशवसुतांचीं वैगुण्यें मलाहि माहीत आहेत. बालकवींची निसर्ग-वर्णनाची तन्मयता, गडकऱ्यांचें भाषाप्रभुत्व, तांब्यांची श्रुतिरम्य, अर्थवाही भाषाशैली अगर माधव ज्यूलियनांच्या प्रीति-गीतांची उन्मादकता केशवसुतांत नाहीं हें मी जाणून आहें. पण ज्याला त्याला त्याच्या क्षेत्राच्याच दृष्टीनें मापलें पाहिजे. एंजिनीयरच्या टेपानें माणसाची लांबीरुंदी मोजली आहे का कोणीं? एकाद्या शिल्पकाराला गातां येत नाहीं हा त्याचा दुर्गुण कसा ठरणार? त्याच्या कलेची योग्यता शिल्पशास्त्राच्याच नियमांनीं ठरविली पाहिजे.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं केशवसुत हे रंगणांत प्रथमच उतरल्यामुळें त्यांच्यापुढें आदर्शच नव्हता. ते करतील तोच आदर्श गोविंदाग्रज, बालकवि, टिळक वगैरे कवींनीं ठरविला. म्हणून त्यांची इतर कवींशीं तुलना करणें त्या दृष्टीनें चूक ठरेल. सरिता व सागर यांच्या संगमाची शोभा उगमाजवळ दिसणार नाहीं कदाचित्, पण म्हणून त्या उगमाची थोरवीच नाकबूल करणें हा कोण वेडेपणा!

(फर्ग्युसन कॉलेज षाण्मासिक : फेब्रु. १९४१.
पुस्तक ३३ वें, अंक २ रा; पृ. क्र. २–७).

२१

केशवसुत

लेखक : मं. वि. राजाध्यक्ष, एम. ए.

"केशवसुता, तूंहि कवींचा कवि"

आधुनिक कवितेचा हा जनक निश्चित कोणत्या दिवशीं मृत्यु पावला यासंबंधीं कालपरवांपर्यंत वाद होता. जो कधीं मेला हें नीट ठाऊक नाहीं. तो कसा जगला याची माहिती अगदींच अपुरी आहे यांत आश्चर्य कसलें ! ही अनास्था केशवसुतांना खुपत असावी असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. त्यांची वृत्ती किंचित् एकलकोंडेपणाची असली तरी त्यांच्या अस्थिर आयुष्यांतही त्यांना मित्र लाभले. शाळकरी दिवसांत हरि नारायण आपटे, नारायण वामन टिळक, पुढें प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन, नरहर शंकर रहाळकर, कवि विनायक, किरात, माधवानुज, हे त्यांचे नांव मिळविलेले मित्र; इतर अनेक असतीलच. यांपैकीं रहाळकरांशिवाय केशवसुतांविषयीं कोणीं लिहिलेलें नाहीं आणि रहाळकरांनींही केशवसुत या व्यक्तीऐवजीं कवीविषयींच प्रामुख्यानें लिहिलें आहे. त्यांच्या कवितांचा संग्रह १९१७ मध्यें प्रथम हरि नारायण आपटे यांनीं प्रकाशित केला; पण त्यांत कवीविषयीं त्यांनीं मौनच पाळलें. मात्र या संग्रहाच्या प्रकाशनानें काव्यरसिकांत केशवसुतांविषयीं जागृति उत्पन्न होऊन, मुख्यतः वासुदेवराव पटवर्धनांच्या परिश्रमांमुळें, केशवसुत-दिन साजरा करण्याची प्रथा पडली. कवींचे कनिष्ठ बंधु सीतारामपंत यांनीं १९२१ मध्यें पुनश्च समग्र संग्रह प्रसिद्ध करून त्याला कविचरित्रविषयक विस्तृत प्रस्तावना जोडली. या बंधूंच्या वयांतील बारा

वर्षांचें अंतर, केशवसुतांचीं नोकरीनिमित्त वारंवार झालेलीं स्थलांतरें आणि मूळ घराशीं सुटलेला संबंध यांमुळें त्या चरित्रांत ऐकीव माहितीचा तुटकपणा आला असला तरी त्याची स्थूल रेखा मनांत ठसते.

कोंकणांतील आडगांवीं जन्म आणि बालपण; शिक्षणासाठीं वडोदें, वर्धा, नागपूर, पुणें; पुढें शिक्षक म्हणून मुंबई, फैजपूर,भडगांव, सावंतवाडी व धारवाड; अशी यात्रा परिस्थितीच्या जुलमानें त्यांना घडली. कोठें पाऊल टिकलें नाहीं. दारिद्र्याला मानीपणाची धार, म्हणून वरिष्ठांशीं सहसा पटलें नाहींच पण सुस्थितींतील बंधूंचीही मदत स्वीकारली नाहीं. " निःस्पृह, बाणेदार, करारी " हीं टिळकांनीं त्यांना लाविलेलीं विशेषणें पोकळ उपचाराचीं नाहींत. केशवसुतांच्या काव्याचें जिवंतपणीं कौतुक तर झालें नाहींच पण त्याच्या वेगळ्याच स्वरूपामुळें त्याची टवाळीच फार झाली असावी. त्यांना खंती वाटली असेल तर ती आपली अवहेलना झाली यापेक्षां खऱ्या कवितेची बूज महाराष्ट्रांत राहिली नाहीं याचीच असेल. पहिला आधुनिक आत्मपर कवि म्हणून त्यांना आपण गौरवतों तरी केवळ खाजगी तक्रारींचीं रडगाणीं त्यांनीं लिहिलीं नाहींत. आपल्या इवल्याशा संसारांतील नफ्यातोट्याच्या स्वार्थापर्यंत आत्मपरत्वाचा संकोच करणाऱ्या कांहीं कवींशीं तुलना केल्यास केशवसुतांच्या कवि-वृत्तीची धीरगंभीर विशालता ध्यानांत येईल. त्यांचें छायाचित्र कधीं निघालें नाहीं ; काढून घेण्याचें त्यांनीं कटाक्षानें टाळलें. ' कवि तो होता कसा आननीं ' याचें कल्पनाचित्र रेखाटण्या-इतकाही तपशील कोणीं मागें ठेवलेला नाहीं; फक्त रहाळकरांनीं त्यांचे डोळे 'पाणीदार' असल्याचें म्हटलें आहे. त्या पाणीदारपणांत त्यांच्या आंतरिक काव्य-जीवनाची रूपरेखा प्रतिबिंबित झाली असावी.

पण विशाल संसाराची ओढ लागलेल्या या कवीला आपल्या संसाराविषयीं आसक्ति नव्हती असा उथळ निष्कर्ष कधींकधीं काढला जातो, तो खरा नव्हे. त्यांच्या प्रणयगीतांतील उन्माद हा कल्पनेच्या ठरीव संकेतांतून उपजला असणें शक्य नाहीं. तसेंच आपले आईवडील व भावंडें यांच्या ताटातुटीचे कढ कांहीं कवितांत इतक्या स्पष्टपणें उमटले आहेत कीं सामाजिक बंडखोरीची आणि अलौकिकाच्या शोधाची ओजस्वी कविता लिहिणाऱ्या या माणसांत अथांग कोमलपणा होता याचा प्रत्यय येतो.

केशवसुतांना समाजसुधारणेची तळमळ लागली होती, तस्मात् राजकीय स्वातंत्र्याविषयीं ते उदासीन होते हें माडखोलकरांचें तर्कशास्त्र दोन तपांपूर्वी बहुजनसमाजाच्या सहज पचनीं पडलें असतें; मेळ्यांची सवंग देशभक्ति लोकप्रिय असण्याचा तो काळ होता. नवे विचार म्हणजे देशद्रोह हें तेव्हांचें सोपें समीकरण ! पण केशवसुतांच्या कविता फक्त वाचल्या तरी सुजाण माणसाला असल्या आरोपांतील फोलपणा कळून येईल.

आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो !
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो !

* * *

आनन्दाचे सर्मीय मजला पारतंत्र्य स्मरून
वाटे जैसें असुख, तुतिकें अन्य वेळीं गमे न !

हे वि ग्रार्थि-दर्शेत केशवसुतांनीं काढलेले उद्‌गार फार तर नाटकीपणांतच कमी पडतील, इतका त्यांचा आवेग प्रामाणिक आहे. पुढच्याच वर्षी लिहिलेल्या एका कवितेंत 'स्वतंत्रतेची पहांट' केव्हां उगवेल याच्या आंसवांनीं भिजलेल्या गोष्टी करीत ज्याच्याबरोबर रात्री जागून काढल्या तो मित्र देशसेवेसाठीं कोठें नाहींसा झाला याची दुःखी कहाणी आहे. तिच्या इमानाची शंका घेणें धाडसाचें काम आहे. केशवसुतांच्या चरित्रांतील हीं अज्ञात प्रकरणें कधींकाळीं प्रकाशांत आलीं तर त्यांचें व्यक्तित्व किती उजळून निघेल !

केशवसुत निर्व्यसनी होते याचा कटाक्षानें उल्लेख केला पाहिजे. कारण सुधारकाविषयीं समाजाची दृष्टि तेव्हां इतकी गढूळ असे कीं पराचा सहज कावळा बनावा आणि कुत्सित टोंचणी सुरू व्हावी. आगरकरांसारखा शीलाचा कणखरपणा असल्याशिवाय त्याला तोंड देणें अशक्य. पण माडखोलकरांना केशवसुतांत 'स्त्रैणपणा' आणि 'विकलपणा' आढळला ! स्त्रीविषयक काव्य लिहिलें म्हणून 'स्त्रैणपणा' आणि उदात्त ध्येयाच्या अप्राप्तीनें लागलेली हुरहूर म्हणजे 'विकलपणा' इतकाच त्यांचा अर्थ असावा. केशवसुतांना व्यसन होतें तें कवितेचें. "हीन दीन झालों छंदी फंदी मी तुझिया नामीं". त्यांच्या गरिबीच्या आणि भटक्या आयुष्याच्या मानानें त्यांनीं काव्याचा अभ्यास पुष्कळ केला असें दिसतें. मराठी कवींपैकीं तुकाराममहाराज हे त्यांचे विशेष आवडते. त्यांच्या वृत्तीचा बळकटपणा आणि शैलीचा फटकळ साधेपणा केशवसुतांत उतरला असें म्हणतां येईल. इंग्रजी कवींचा व्यासंगही त्यांनीं कसोटीनें केला. विशेषतः Golde Treasury हा प्रसिद्ध कवितासंग्रह त्यांना फार प्रिय असल्याचे अनेक उल्लेख आहेत ; त्यांतील कांहीं कवितांची आठवण केशवसुत वाचतांना होते, या गोष्टीला फार ताण देऊन त्यांच्यावर प्रच्छन्न रूपान्तरें केल्याचा आरोप क्वचित् होतो तो अगदींच व्यर्थ आहे. सांगून-सवरून पोच्या Raven वरून लिहिलेली 'घुबड' ही कविता मुळाहून सरस असल्याची माधवराव पटवर्धनांसारख्या, केशवसुतांबाबत पक्षपाताची ज्यांच्यासंबंधीं शंका घेतां येणार नाहीं अशा टीकाकारानेंही कबुली दिली आहे. प्रतिभेची उसनवारी करतां येणें शक्य असतें तर खरें काव्य इतकें दुर्मिळ झालें नसतें ! केशवसुतांची एकच इंग्रजी कविता आपणांस माहीत आहे ; ती व त्यांच्या इंग्रजी पत्रांतील कांहीं उतारे वाचून त्या भाषेंतही ते डौलदारपणें लिहूं शकत असें दिसतें. संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास गाढ असावा याचा पुरावा भाषान्तरापेक्षांही त्यांच्या संस्कृत शब्दांच्या

रेखीव योजनेंत आढळेल. अशा विविध व्यासंगानें त्यांच्या कवित्वाचा ताजेपणा हरपला नाहीं ; त्याचें सत्त्व त्यांनीं शोषून घेतलें पण कवि म्हणून आपलें स्वत्व गमावलें नाहीं !

कवि आणि काव्य हा केशवसुतांच्या सुमारें वीस कवितांचा विषय आहे. कवीला दिव्य दृष्टीचें देणें असतें; तिच्या सामर्थ्यानें तो निर्जीवांतील जीव पाहातो आणि दिक्कालाचा भेद करून मुक्तात्म्याप्रमाणें विश्वांत अनिरुद्ध संचार करतो. पण अशा अक्षय आनंदानें बेहोष होणारा कवि 'जगांतील महाक्रान्तीचें तें भविष्य सांगाया' जागृत असतो. जुलुमांविरुद्ध क्रान्तीची उठावणी करण्यास, सत्तांध माणसांइतकेंच देवांविरुद्धही झगडण्यास, दलितांना स्फूर्ति देणें हें त्याचें कार्य. हा कविगौरव माधवराव पटवर्धनांना 'चमत्कारिक' व 'रोगटपणाचें लक्षण' वाटतो. माडखोलकरांच्या मतें हा "एक मानसिक विकलतेचा किंवा विकृतीचा प्रकार" आहे. पटवर्धनांना जो 'रोग' वाटतो त्याची लागण आजवर बी, टिळक, तांबे, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, बालकवि, इत्यादि अनेक श्रेष्ठ कवींना झाली असें प्रो. कुसुमावती देशपांडे यांनीं या आरोपांना दिलेल्या मार्मिक उत्तरांत म्हटलें आहे. त्याच लेखांत केशवसुतांच्या काव्यविषयक विचारांचें वेधक विवरण आढळेल. अर्वाचीनांचा दाखला माडखोलकरांसारख्या प्राचीनांच्या अभिमान्याला पटला नाहीं तरी कवीला 'मुमुक्षूचें अंजन' आणि 'सामर्थ्यवंताची सत्ता' अशा किंवा याहून चढ्या शब्दांत वंदन करणाऱ्या रामदासांनाही ते दुबळे ठरविणार ? केशवसुतांच्या "वैवाहिक जीवनांत कांहीं तरी न्यूनता उत्पन्न" झाल्याची माडखोलकरांची शंका धाडसी आहे ! काव्याचा शब्दशः अर्थ लावून असले भडक निष्कर्ष काढणें धोक्याचें आहे. केशवसुतांनीं कवीचें सामर्थ्य वर्णन केलें म्हणजे त्यांनीं स्वतःभोवतीं दिवे ओवाळून घेतले असें नाहीं. 'भृंगा' या कवितेंत 'मी गणमात्रा जुळणारा,' तेव्हां

"'कवि' आम्हांलागुनियां म्हणणें
कविशब्दार्था लोळवणें !
अस्मद्‌गान नव्हे 'गान'
तें गान चिंध्यादान"

अशी त्यांनीं स्वतःची केलेली संभावना वाचून त्यांना न्यूनगंडाची बाधा झाली होती असा घोर अंदाज बांधणें तेवढेंच अनुचित ठरेल. कवि-प्रतिभेच्या अपार तेजोबलाची केशवसुतांना जाणीव झाली होती; उपासक-भावानें, कधीं साधकाच्या ओजस्वी श्रद्धेनें, त्यांनीं तिचें संकीर्तन केलें ; आपलें नव्हे. उपास्य दैवतावर प्रणयिनीचा आरोप करण्याची प्रथा सनातन आहे ; ती केवळ हिंदी नसून इस्लामीही आहे. मात्र , केशवसुतांत बावळट भक्तीचें ढोंग नाहीं ; त्या तेजाची एक ठिणगी तरी आपल्यांत उतरावी ही त्यांची दुर्दम मनीषा ; कारण त्या तेजानें भोवतालचें कोंदाटलेलें आणि 'रोगट' जग त्यांना धुऊन काढावयाचें होतें !

काव्याविषयीं मेलेल्या कल्पना उराशीं आवळणाऱ्या त्या जगाला जिवंत काव्याची झळाळी सहन होणें शक्य नव्हतें. त्याची मनधरणी करणारे प्रवाहपतित होतेच ; केशवसुतांनीं बेडर आत्मविश्वासानें त्या समाजाशीं झुंज घेतली ; त्यासाठीं पाजळलेलें त्यांचें कवित्वशक्ति हें अस्त्र ; त्याची ही चमक आहे. येथें क्षुद्र अहंकार नाहीं. जगन्नाथपंडिताच्या अथवा " भवभूतीच्या बेपर्वा अहंमन्यतेचा ध्वनि " केशवसुतांच्या अशा ओळींत उठतो हें म्हणणें अन्यायाचें आहे.

अशीच राठ टीका केशवसुतांच्या 'गूढगुंजना'वरही झाल्याचें वर आलेंच आहे. येथें त्या प्रश्नाची विस्तारानें उकल करणें शक्य नाहीं. इंद्रियें अथवा बुद्धि यांना अगम्य अशा भव्य सौंदर्याची केशवसुतांना आलेली प्रतीति तुम्हांआम्हांला सहसा येत नाहीं म्हणून ती प्रतीतीच खोटी, म्हणजे केशवसुत खोटे, असलीं विधानें धूर्तता दाखवितात ; रसिकता नव्हे. पण त्या 'अगम्य'तेचाहि फार बाऊ केला जातो. जगांतील अनेक सौंदर्यांना मठ्ठपणामुळें आपण मुकतों ; केशवसुतांसारख्या कवीच्या तरल दृष्टीला तीं दिसलीं व तसें त्यांनीं म्हटलें हा त्यांचा दोष खास नव्हे ! या लौकिक सौंदर्यांत त्यामागील अलौकिक सौंदर्याची चाहूल घेणारा कवि गूढतेंत शिरतो हें खरें. ती लागली तर विलक्षण हर्ष आणि चुकली तर विदारक खेद असे भावनांचे अमर्याद हेलकावे 'भीड भाड' सोडून घेणाऱ्या त्या कवीला पाहून व्यवहाराला जुंपलेल्या संभावित संसारी माणसाला भोंवळच येणार. 'झपूर्झा' अथवा 'हरपलें श्रेय' यांसारख्या काव्याच्या रहस्याचा माग काढण्यास उदंड तकवा हवा आणि विनीतवृत्ति हवी. त्याच्या परिमळानें भारावलेल्या अनेक कवींनीं पुढें ती दिशा धरली; कांहीं चार पावलें पडलीं नाहींत तोंच गूढ-मधुर शब्दांच्या भोवऱ्यांत सांपडून आपल्याच भोवतीं गिरक्या घेत राहिले. पण अशा सर्व आधुनिक कवींना केशवसुतांनीं काव्याचे बंद तोडून टाकले याची नेहमीं कृतज्ञ आठवण राहिली व राहील. केशवसुतांच्या प्रतिभेच्या या भेदकतेचा योग्य गौरव कांहीं कवींनीं केला आहे.

" ये ये कृष्णा ! चढव आपुला सूर जो भौतिकाला
विंधी, जाई वरतिवरति, भेदुनी अंतराला "

—टिळक

" जिनें आतांही मारितां भरारी
गूढ गगनें भेदुनी पार सारीं
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्यखाणी
ती कृष्णाची महाराष्ट्रवाणी "

—गोविंदाग्रज

ही स्वातंत्र्याची लालसा काव्याच्या सर्व अंगांना स्पर्श करते. फार काळ विद्वज्जड

टीकाकारांच्या आणि नीरस पद्यकारांच्या करडचा हुकमतीखालीं वागलेलें मराठी काव्य केशवसुतांत चवताळून उठलें.

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ?-पुसतों तुम्हांला.

प्रीतीच्या तंत्राप्रमाणें काव्याचें तंत्र सांगणाऱ्या पढतमूर्खांचा केशवसुत उपहास करतात. कविता स्वच्छंद असते ; कोणाच्या खुषामतीसाठीं ती नटीप्रमाणें रंगणार नाहीं असें ते वजावतात. तोंवर बाह्यांगाची केवढी आढचता होती ! केशवसुत त्यासंबंधीं उदासीन आहेत; अंतरंग हेंच काव्याचें सर्वस्व ही त्यांची निष्ठा कृतींत उतरली. त्यांचें काव्य हा शब्दांचा खेळ नाहीं ; उत्कट भावना आणि त्यांतून स्फुरलेल्या कल्पना यांचीच फक्त प्रतिष्ठा ; शब्द आणि पद्य हीं केवळ त्या व्यक्त करण्याचीं साधनें ; म्हणून गौण. अलंकारांचें दडपण त्यांनीं झुगारून दिलें ; काव्यविषयानें मनांत निर्माण केलेल्या प्रतिमा हेंच काव्याचें खरें ऐश्वर्य ही त्यांची व बहुतेक आधुनिक कवींची भूमिका आहे. शब्दाऐवजीं अर्थाला प्राधान्य दिल्यामुळें केशवसुतांच्या कवितेंत सामान्य वाचकाला मोहिनी घालणारा शैलीचा गोडवा आढळत नाही. त्यांची रचना खडबडीत, गद्यप्राय आणि म्हणून नीरस आहे अशी टीका होते. तींत तथ्य आहे पण तें फार थोडें. बालकवींच्या भाषेंतील सहज-माधुर्य केशवसुतांत नाहीं; केवळ नादानेंच डोलावयास लावतील अशीं तांब्यांसारखीं गीतेंही त्यांनीं लिहिलीं नाहींत. पण केशवसुतांच्या काव्याची प्रकृति विचारशील आहे; तांबे-बालकवींची तशी नाहीं. ज्या काव्यांतील ओळीओळींत विचाराच्या गाभ्याला हात घालावयाचा तेथें नादाची गुंगी हा दोषच ठरेल. तेथें शब्दाचें काम बुद्धीला चेतना देणें हें आहे; तिच्यावर गोड फुंकर घालून तिला भूल घालणें हें नव्हे. अशा कवितेला हीं बाह्यसौंदर्यें अनावश्यकच नाहींत तर अपकारक ठरतात. भाषेच्या धुंदींत बालकवीसारखा सच्चा कलावंतही क्वचित घसरतो; कल्पना आणि शब्द यांची पुनरावृत्ति होते. केशवसुतांत ती होत नाहीं इतकी त्यांची ओळन्ओळ स्वतंत्र आहे याचें महत्त्व जाणलें पाहिजे. गोविंदाग्रजांत तर भाषेच्या वेडानें काव्याची अनेक ठिकाणीं हानि झाली आहे हें बहुतेक टीकाकार मान्य करतात. नादमाधुर्याच्या हव्यासामुळें गेल्या कांहीं वर्षांतील मराठी "भावगीतें", कोणत्या अर्थहीन अवस्थेपर्यंत पोचलीं आहेत हें पाहिल्यावर केशवसुतांच्या साधेपणाचें मर्म मनांत भरेल. आवेश हा ज्या कवितेचा पहिला गुण तिला नरम आणि नखरेल शैली कशी शोभणार ? रॉबर्ट ब्राउनिंग या प्रसिद्ध इंग्रज कवीचें केशवसुतांशीं या बाबतींत साधर्म्य आहे; ब्राउनिंगविरुद्धही अशीच हाकाटी करण्यांत येत असे.

यामुळें केशवसुतांची कविता समजावयास थोडी कठीण जाते हें खरें; पण कृत्रिम

आणि क्लिष्ट रचनेमुळें न समजणारी कविता निराळी आणि अर्थपूर्णतेमुळें न समजणारी ही कविता निराळी. दोष असलाच तर तो गुणांतून उद्‌भवतो. थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ हा तो गुण. त्यासाठीं केशवसुतांनीं ओबडधोबड, काव्यांत अस्पृश्य किंवा ग्राम्य समजले जाणारे, शब्द धडाडीनें वापरले, कारण ते बोलींत जिवंत म्हणून अर्थवाहक होते. काव्यमय समजल्या जाणाऱ्या गोंडस शब्दांचें तेज अतिरिक्त उपयोगामुळें 'मळलें' हें जाणून त्यांनीं आपल्या शैलींत त्यांना स्थान दिलें नाहीं. अर्थात्, भाषादोष केशवसुतांत आहेतच. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं दाखविले ते असे : अक्षरपूर्ती-करितां सर्वनामाचा दुरुपयोग (उदाहरणार्थ : तसेंच, वरें, इत्यादि) ; क्वचित् अशुद्धें (सख्यत्व); रूढ नसलेले शब्द (कृतकज्ञता); अपरिचितार्थी शब्द (कल्पना या अर्थीं क्लृप्ति–पण अर्थ चुकीचा नाहीं !) ; 'कौरूप्य' सारखे बेढब प्रयोग; इंग्रजी वळण ; शिथिल यमकें ; परसवर्णांचा उपयोग ; इत्यादि.

केशवसुतांच्या असाधारण गुणांपुढें हे वरवरचे दोष फिके पडतात. त्यांच्या काव्याचा आशय इतका गाढ आहे कीं तो व्यक्त करण्याचें साधन यापलीकडे भाषेला त्यांत महत्त्व नाहीं. शब्द-शृंगारापेक्षां येथें विचारवैभवाची मातबरी अधिक. त्या धगधगत्या विचारांनीं गोठून गेलेल्या मराठी काव्यांत जीव आणला. अनेक कवींचें तें स्फूर्तिस्थान. 'तुतारी मंडळें' स्थापन झालीं आणि नव्या,स्वतंत्र विचाराच्या,समाजाचीं सुखदुःखें आणि आशानिराशा चितारणाऱ्या, काव्याची ओजस्वी परंपरा सुरू झाली, म्हणून हा " कवींचा कवि ". केशवसुतांच्या मृत्यूची बातमी ऐकून टिळक उद्‌गारले, " आपल्यांतला वर्डस्वर्थ आज गेला. " वर्डस्वर्थच्या अर्ध्यानें आयुष्य आणि अल्पांशानें स्वास्थ्य मिळालेल्या या कवीचें ऐतिहासिक कार्य अधिक मोठें आहे. तें त्यांनीं एकले-पणानें विरोधाच्या वावटळीला तोंड देऊन पार पाडलें होतें. केशवसुतांची काव्यज्योत अखेरपर्यंत तेवत राहिली ; मंदावली नाहीं. स्नेहशून्यता, अनास्था अथवा उपहास यांची बाधा तिला झाली नाहीं. मृत्यूनंतर सुमारें पंधरा वर्षांचा काळ जाईपर्यंत केशव-सुत बहुसंख्य वाचकांना अज्ञातच राहिले. इतक्या उशिरां जाग आली तरी मराठी रसिकतेनें त्यांचें ऋण मान्य केलें व आधुनिक काव्याचा मुकुट त्यांना निष्ठेनें अर्पण केला. केशवसुतांच्या संग्रहाचें पहिलें प्रकाशन १९१७ मध्यें झालें तेव्हां डॉ. पांडुरंग दामोदर गुणे या प्रसिद्ध पंडितानें लिहिलें, " अचाट कल्पनाशक्ति, प्रचंड निरीक्षण, पराकाष्ठेची सहृदयता, प्रासादिक वाणी, भाषेवरील प्रभुत्व, तिला वाटेल तशी लववा-वयाचें सामर्थ्य व आपणाला आपल्या देशबांधवांना सृष्टीचा, परमेश्वराचा, उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना, ही महाकवि होण्याला लागणारी सामग्री केशवसुत यांच्यामध्यें होती. "

(पांच कवि, प्रथमावृत्ति १९४६; पृ. क्र. ३–१०
द्वारा : कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २)

२२

केशवसुतांची कविता

लेखक : आचार्य स. ज. भागवत

जीवनाला वळण

केशवसुतांचें काव्य लहानपणापासून माझ्या जीवनाला वळण लावण्यास उपयोगी पडलें असल्यामुळें मला जर केशवसुतांच्याविषयीं अतिशय आदर वाटत असला, तर त्यांत आश्चर्यकारक अथवा अस्वाभाविक असें कांहींहि नाहीं हें आपल्या सहज लक्षांत येईल. केशवसुतांवर मराठींत कितीतरी प्रकारांनीं लिहिलें गेलें आहे आणि आणखीहि कितीतरी प्रकारांनीं तें लिहितां येण्यासारखें आहे व लिहिलें जाईलहि. मला केशवसुतांच्याबद्दल जें सांगावयाचें होतें तें मी शाळेंत व टिळक महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना व तुरुंगांत माझ्या सहकाऱ्यांना शिकविलें आणि सांगितलें आहे. पण आपणांसारख्या रसिकांसमोर मात्र तें मी अद्यापि व्यक्तविलें नाहीं अगर लिहावयास पाहिजे होतें तें लिहिलें नाहीं. आपल्याजवळ असलेले विचार वाणीनें वा लेखणीनें इतरांसमोर मांडणें हें आपलें एक कर्तव्य आहे. व हें कर्तव्य न केल्याचा गुन्हा माझ्या हातून घडला आहे हें कबूल करावयास मला मुळींच संकोच वाटत नाहीं.

केशवसुतांवर किती प्रकारांनीं व किती पैलू पाडून बोलतां येईल हाहि एक महत्त्वाचा भाग होऊं शकतो. पण माझी शक्ति आणि आपल्या मर्यादा ओळखून मी माझे यासंबंधींचे विचार मांडणार आहें. त्यासाठीं केशवसुतांच्या काळचें जीवन कसें होतें तें आपणास समजून घेतलें पाहिजे. कारण साहित्य अणि जीवन यांचा

परस्परसंबंध आहे असें मला वाटतें. म्हणून त्या वेळच्या जीवनाची व साहित्याची ओळख आपण आगोदर करून घेतली, म्हणजे त्याला वळण लावण्यासाठीं केशवसुतांनीं काय केलें तें आपल्या लक्षांत येऊं शकेल.

क्रांतिवादी नवकाव्य

केशवसुतांनीं नवकाव्य निर्मिलें हें विधान सिद्ध करीत वसण्याची आज जरूरी राहिलेली नाहीं. त्यांच्या काव्यांत जो नवयुगाचा साक्षात्कार घडतो त्याचें स्वरूप क्रांतिवादी आहे कीं उत्क्रांतिवादी आहे हा वादही आतां संपुष्टांत आला असून ते क्रांतिवादी होते हें सर्वमान्य झालेलेंच आहे. केशवसुतांच्या वेळच्या परिस्थितींत हे वदल कसकसे घडून आले तें आपण तपासून पाहिलें कीं, केशवसुत निर्माण होण्याचें कारण मनामध्यें आहे कीं बाह्य परिस्थितींत आहे याचाहि उलगडा सहजच होणार आहे.

दोन संस्कृतींचा संगम

केशवसुतांच्या जन्मकालीं भारतीय जीवनांत एक मोठी क्रांति घडून येत होती. या क्रांतीचा जन्म होण्याचे अगोदर भारतीय जनता, फक्त भारतीय आचार, विचार, साहित्य, संस्कृती यांतच गुरफटून गेली होती. परंतु त्या संस्कृतीला नंतर पाश्चात्य संस्कृतीच्या योगानें एक मोठा जोराचा धक्का बसला. व भारतीय मन पाश्चात्य मनाशीं जुळलें गेलें. भारतीय व पाश्चात्य संस्कृतीचे हे जे संबंध आले, ते स्वेच्छेनें किंवा जाणीवपूर्वक घडले होते असें मला म्हणावयाचें नाहीं. पण अनिच्छेनें, नाइलाजानें व जबरदस्तीनें जरी हे संबंध जुळून आले असले, तरी **त्यापासून ज्या मोठमोठ्या गोष्टी तेव्हांपासून होण्यास प्रारंभ झाला त्यांचा शेवट अद्यापहि झाला नाहीं असें मी मानतों.** पूर्वीपूर्वी भारतीय व पाश्चात्य मतें, अपेक्षा, कल्पना, यांची तुलना करून भारतीय तेवढें कमीपणाचें, युरोपियनांचें तेवढें चांगलें असें समजण्याचीहि एक अवस्था येऊन गेली. आपल्याकडे कमीपणा घ्यावयाचा व परक्यांना मीठेपणा द्यावयाचा अशीहि एक मनाची ठेवण सुरुवाती–सुरुवातीस बनत गेली. पण पुढें-पुढें तींत वदल घडून आला. या पौर्वात्य व पाश्चिमात्य, भारतीय आणि अभारतीय संस्कृतींच्या संगमांत एकवेळ भारतीय संस्कृतीनें आपल्याकडे कमीपणा घेतला, भारतीय मन वांकलें. पण नंतर त्यानें पुनः उत्थानहि केलें. या पतनापासून उत्थानापर्यंतच्या ज्या ज्या अवस्था हिंदुस्थानांत घडत गेल्या, त्या त्या अवस्थांत महाराष्ट्राचें असें एक विशिष्ट स्थान आहे. आणि महाराष्ट्रांत जें जें घडलें त्यांत साहित्याला एक विशिष्ट स्थान असून त्यांत केशवसुतांच्या कार्यालाहि महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

केशवसुत व आगरकर

कांहींजण असें विचारतात कीं, केशवसुतांनीं तरी असें कोणतें महत्त्वाचें कार्य केलें ? आगरकरांनीं जें गद्यांत सांगितलें तेंच केशवसुतांनीं पद्यांत सांगितलें नाहीं का ? या म्हणण्याला अवसर सांपडावा अशांतल्यासारखी परिस्थिति आहे खरी. पण आगरकरांवरहि हाच आक्षेप घेऊन कोणी असें म्हणतील कीं, आगरकरांनीं तरी हें सारें मिलवरूनच घेतलें ना ? या म्हणण्यांत कांहीं अंशीं सत्य आहे आणि कांहीं अंशीं नाहींहि ! कारण मिल जरी पुष्कळांनीं वाचला होता, तरी तो फारच कमी लोकांनीं समजावून घेतला होता हें आपणास विसरून चालणार नाहीं. आगरकरांच्या निबंधांत जे अतिशय तिखट, जळजळीत विचार व्यक्त झाले आहेत, जी भावनेची जळजळ, अंतःकरणाच्या ऊर्मी, शब्दांतला कडकपणा व्यक्त झाला आहे, तोच केशवसुतांच्या काव्यांतहि उतरला आहे. पण त्याला कारण त्यावेळची भारतीय परिस्थिति हीच होती.

थंड गोळा कां झाला ?

टिळक-आगरकरांच्या जीवनापूर्वीं महाराष्ट्राचें जीवन कसें होतें याचें वर्णन स्वतः लोकमान्य टिळकांनीं कै. रानडे यांच्या मृत्युलेखांत केलें आहे. 'महाराष्ट्र हा एक थंड गोळा होऊन पडला होता व न्यायमूर्ती रानडे यांच्या चळवळीनें त्या गोळयांत थोडी ऊब आली' असें टिळक सांगत आहेत.

यावर प्रश्न असा उद्भवतो कीं, आपली आर्यसंस्कृती जर सर्वश्रेष्ठ, 'कृण्वन्तो विश्व आर्यम्' ही जर आपली महत्त्वाकांक्षा तर आपला थंड गोळा कां होतो ? आपण घरांत कां पडून रहातों; आणि आपली ही दुर्बलावस्था टिळकांसारखा महापुरुष कबूल तरी कां करतो ? ही परिस्थिति कां आली हें समजावयास आपल्याला थोडें मागें जावयास पाहिजे.

मुमूर्षु अवस्था

आपल्या संस्कृतीचा एक थंड गोळा होऊन पडण्याचें कारण असें कीं, त्यावेळी भारतीय संस्कृतीची 'मुमूर्षु अवस्था' सुरू झाली होती. मुमूर्षु अवस्था व मृत्यू यांत तफावत आहे. मुमूर्षु अवस्थेंत अगदीं मृतवत् झाल्यासारखें वाटलें, तरी थोडीशी धुगधुगी आंत शिल्लक असते. ती संपून मृतावस्था प्राप्त होईपर्यंत थांबावयाची नेहमीं आवश्यकता असते. या अवस्थेंत असतांना मृत्यू झाला असें बांह्यांगीं भासलें, तरी खरोखरच मृत्यू घडून आला याची तज्ज्ञांकडून खात्री करून घ्यावयाची असते व मगच मृताची राख करावयाची असते. आमची संस्कृती त्यावेळीं मरणापर्यंत जाऊन पोहोंचली असली, तरी मेली नसल्यानें तिला सरणावर चढविण्याचें

जरुरी नव्हती. आणि म्हणूनच या थंड गोळ्यांत ऊब आणावी म्हणून रानडे, आगरकर, इत्यादिकांचे प्रयत्न चालले होते. आगरकरांनीं म्हटल्याप्रमाणें, भारतीय संस्कृतीचा वटवृक्ष आतां बराच जीर्ण झाला असल्यानें त्याला खच्ची केला तरच नवी पालवी फुटण्याची शक्यता होती. वाहेरचीं आवरणें तोडून फोडून टाकलीं असतीं, तरच आंत धुगधुगी शिल्लक रहाण्याची शक्यता होती. म्हणूनच आगरकर-केशवसुतांना या वटवृक्षावर कठोरपणानें कुऱ्हाड चालवावी लागली.

हिंदुस्थानांत जीर्ण संस्कृतीवर कुऱ्हाड चालविण्याचा पहिला मान राजा राममोहन राय यांच्याकडे जातो. अशींच नवविचाराचीं माणसें त्यावेळीं प्रत्येक प्रांतांत निर्माण झालीं होतीं. ह्या महापुरुषांनीं मृतजीवनाला नवी कळा आणली. गौरीशंकराच्या उच्च शिखरावरून खालीं कोसळून जसा गंगेचा अधःपात व्हावा किंवा एखाद्या माणसाला वेशुद्धी यावी, अशीं आमच्या संस्कृतीची अवस्था झाली होती व तिला बाहेरून एक जोराची लाथ बसण्याची जरुरी निर्माण झाली होती. हें लाथ देण्याचें कार्य पाश्चात्य संस्कृतीनें केलें.

अनावश्यक कवचें

आपल्या संस्कृतीवर आचारविचार, रूढी यांचीं जबरदस्त अशी कवचें बाजलेलीं होतीं. एकेकाळीं आवश्यक असलेल्या रूढी व गोष्टी आज अनावश्यक वाटत असल्या, तरी त्या तशाच चिकटून बसल्या होत्या. एखाद्या संस्कृतीचा उत्कर्ष होण्यास विकासवाद आवश्यक असला, तरी त्या विकासाचीहि गती कुंठित होत असते. व मग अशा प्रसंगीं या विकासाविरुद्धहि प्रतिक्रिया होऊं लागते. एकच एक अवस्था सर्वच काळ जीवन प्रगत करण्यास उपयोगी पडत नाहीं. कोंबडीच्या अंड्याचें उदाहरण घेतलें म्हणजे ही गोष्ट आपल्या ध्यानीं चांगल्याप्रकारें येईल. अंड्याच्या आंतील जीवाच्या विकासाला कवच कांहीं काळ उपयोगी पडतें. कवचामुळेंच त्या जीवाचें संरक्षण होत असतें. व अशावेळीं कवच फोडलें तर आंतील जीवाचा नाश होतो हें सर्व खरें आहे. पण आंतील जीवाच्या विकासास व संरक्षणास कारणीभूत झालेलें हें कवच पुढें पुढें विकासास निरुपयोगी होतें व तें फोडून जीव बाहेर आला नाहीं तर आंतल्या आंत गुदमरून जाऊन त्याचा अंत होण्याचा संभव असतो. अशा वेळीं आंतून तो जीव कवच फोडण्यासाठीं धडपडत असतोच. आपल्या भारतीय संस्कृतीची अवस्था अशीच झाली होती. एकेकाळीं तिच्या विकासास साहाय्यभूत झालेलीं कवचें आतां तिच्या विकासास बाधक होऊं लागलीं होतीं. आंत धुगधुगी होती. पण आंतून कवच फोडण्याचें त्राण तींत नव्हतें, तिला बाहेरून कोणी तरी धक्का देणारा हवा होता. हा धक्का पाश्चात्य संस्कृतीनें दिला व नंतर भारतीय संस्कृतीनें पुनः आपल्या विकासास प्रारंभ केला.

रानड्यांची श्रद्धा

रानडे व आगरकर यांच्यांत एक महत्त्वाचा फरक असा होता कीं, रानडे हे श्रद्धावादी व आगरकर हे बुद्धिवादी होते. रानडे म्हणत कीं, आपण गुलाम झालों हीसुद्धां (Divine dispensation) दैवी घटना आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. या पतनांतूनच आपला उद्धार होणार आहे, अशी त्यांची भावना होती. मंगलाचा मंगलाशीं संबंध झाला, तर त्याची परिणती मंगलांतच होणार अशी त्यांची मनापासून श्रद्धा होती. रवींद्रनाथांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे भारतभाग्यविधात्याचा आपल्याला दुःख देऊनहि पुढें नेण्याचा हेतु असेल असें ते मानीत व पाश्चात्यांच्या मस्तींतहि त्यांना एक प्रकारची नम्रता आढळून येई. योग्यवेळीं बसलेल्या आघाताचा-सुद्धां उन्नतीसाठीं उपयोग होत असतो.

पेशवाई बुडाल्याबद्दल पुण्यांत आनंद झाला होता. याचा अर्थच असा कीं, पेशवाईचें राज्ययंत्रच इतकें जड आणि जीर्ण झालें होतें कीं, तें कोसळून केव्हां पडतें याची वाट लोक पहात होते. राजा हा आपण पित्याप्रमाणें मानतों. पण तो उलथून पडला म्हणून आनंद होत होता ! याचें कारण एवढेंच कीं, राजामुळें वाटणारी आनंदाची अवस्था संपून गेली होती ! मुलामुलींच्या विकासास जोंपर्यंत पिता मदत करीत असतो तोंपर्यंत तो हवासा वाटतो; पण तोच बाप मुलामुलींच्या विकासाच्या आड येऊं लागला कीं, तो मरावा असें मुलांना वाटूं लागतें ! भारतीय संस्कृतीची त्यावेळीं अशीच अवस्था झाली होती. त्या संस्कृतीला तंत्रबद्धतेचें स्वरूप आलें होतें. पुष्कळांना तंत्राचा फार मोह असतो. पण जो तंत्रशुद्ध असतो, तो जड असतो. जो अगदीं नियमबद्ध वर्तन करतो तो जड समजावयास हरकत नाहीं. जिवंत वस्तूंत हालचाल असते, घडविण्याची व मोडण्याची शक्ति असते. शांति व क्रान्ति, निर्मिति व नाश या दोन्ही क्रिया जीवनास अत्यावश्यक असतात. पेशवाईच्या काळीं सर्वांत शहाण्या समजलेल्या नाना फडणीसालासुद्धां कित्येक गोष्टी माहीत नव्हत्या ! फ्रान्समध्यें भयंकर मोठी राज्यक्रांती झाली होती. पण तिची आमच्यावरील प्रतिक्रिया अवघ्या एकाच वाक्यांत सांठवलेली आहे. तें वाक्य म्हणजे 'फराशांनीं राजा मारला.' या वाक्यापुढें कांहीं ज्ञान त्या वेळच्या तत्त्वज्ञान्यांना, शहाण्यांना व ब्रह्मज्ञान जाणणाऱ्यांनाहि होऊं शकलें नाहीं. आणि म्हणूनच आमचें अधःपतन होत चाललें होतें.

महान ध्येयामुळें पतन

आमचीं ध्येयें कमी दर्जाचीं होतीं म्हणून आमचें अधःपतन झालें काय ? या प्रश्नाचें उत्तर 'नाहीं' असें येईल. **उलट मी तर असेंहि म्हणतों कीं, आमचीं ध्येयें मोठीं होतीं म्हणूनच आमचें पतन झालें !** आमचीं ध्येयें महान्, पण तीं आमच्या अनुभवास न पेलणारीं अशीं होतीं. नुसती पोपटपंची करून आम्हीं हीं ध्येयें मिळविलीं

होतीं. **पोपटपंचीनें उचललेलीं चांगलीं ध्येयें व अनुभवानें मिळविलेलीं वाईट ध्येयें यांच्यांतून निवड करायची असली, तर प्रसंगीं तुम्हीं अनुभवांनीं मिळविलेलीं वाईट ध्येयें निवडलीं तरी चालेल असें मी म्हणतों.** कारण या वाईट अनुभवांतूनसुद्धां त्याला चांगल्या मार्गाकडे जाण्याची आशा असते. वाईट झालांत तरी हरकत नाहीं; पण जीवंत व्हा. कारण जीवंत असणें हें चांगुलपणाचें पहिलें लक्षण आहे. वाईट मार्गानें गेलेले लोक सन्मार्गावर आल्याचीं उदाहरणें म्हणून वाल्या, नाम्या यांचीं उदाहरणें सांगतां येतील ! पण जीवंतपणाचा नाश करायला पुष्कळ वेळां तंत्रवाद उपयुक्त ठरतो. आणि जीवंतपणाचा नाश करावयाचा सर्वांत उपयुक्त मार्ग म्हणजे कोणत्याहि संप्रदायाचा स्वीकार करणें हा होय.

सामान्य माणसें आपल्या डोक्यावर, पाठीवर, कांखेंत मोठमोठीं ध्येयाचीं गांठोडीं घेऊन गड चढण्याचा हव्यास धरतात. आणि मग त्यांना मुळींच हालचाल करतां येत नाहीं ! सत्य, ब्रह्म, माया, इत्यादींत ते गुरफटतात. ब्रह्मीभूत होण्याचा प्रयत्न करतात. पण साधें स्वातंत्र्यहि त्यांना मिळवितां येत नाहीं ! म्हणून मी म्हणतों कीं, ध्येयाचें ओझें टाका. बापजाद्यांचा मोह, उपनिषदांचीं वचनें, ज्ञानेश्वर, एकनाथ यांचे बोल यांचा मोह टाका. केशवसुतहि म्हणतात कीं, '**हृदयांतून न जे बोल, निघती ते सर्वहि फोल**' आणि ह्याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. हें तंत्रांत बसलेलें आहे कीं नाहीं, ह्या शब्दांत नादमाधुर्य आहे कीं नाहीं, वृत्तरचना चुकली आहे कीं नाहीं, अशा शाळेंतील मुलांना शिकवितांना लावावयाच्या कसोट्या या काव्याला लावून उपयोगाचें नाहीं. हृदयांतून जे बोल निघाले असतील ते पाहिले पाहिजेत, समजावून घेतले पाहिजेत; तंत्राचें नुसतें अवडंबर माजविण्यांत अर्थ नाहीं. **चांगल्या ध्येयाच्या बडबडीपेक्षां चांगल्या ध्येयाचें जीवन जगणें याला जास्त महत्त्व आहे.** संत असेंच जीवन जगले. तें जीवन निराळें व आपण बडबड करून जें जीवन जगूं पहातों तें जीवन निराळें. थोरांना आपला आत्मा बद्ध आहे, तो मुक्त झाला पाहिजे अशी तळमळ लागलेली असते. अशा तळमळीनें संत साहित्य लिहितात ! केशवसुतहि असेंच विशेष जीवन जगून गेले. केशवसुतांनंतर मराठींत अनेक कवी होऊन गेले, पण केशवसुतांच्यापुढें अजून कोणताहि कवि गेलेला नाहीं.

सामान्य लोकांना 'मरगळ'

सामान्य माणसांना पुष्कळ वेळां 'मरगळ' पडलेली असते. जे मोठे झाले, जे शिखरावर जाऊन बसले त्यांच्यापुढें आमचा काय पाड असें ते मानतात. माणसाचें आयुष्य स्वतःकरिता नसून दुसऱ्यांच्या कौतुकाकरितां आहे असें ते समजतात. या कौतुकांतून निर्माण झालेलें, मरगळलेलें, गुलाम झालेलें साहित्य म्हणजे संतलीलामृत, भक्तिलीलामृत इत्यादि ग्रंथ होत. या ग्रंथांत वर्णिलेले संत जें जीवन जगले तें अनु-

भवाचें जीवन होतें. पण त्यांचा महिमा गाणाऱ्यांजवळ गुलामीशिवाय दुसरें कांहींच नव्हतें ! एकनाथ महाराजांना अतिशय भूक लागल्यावर त्यांनीं स्वहस्तें पोळ्या केल्या व त्या ते खावयास बसणार तोंच कुत्र्यानें त्या नेल्या ! त्याला कोरड्या पोळ्या खाव्या लागतील म्हणून एकनाथ महाराज तुपाची वाटी घेऊन त्याच्या मागें धांवले. ही आमची आर्यसंस्कृती ! एकनाथमहाराज किती थोर ! आम्ही किती क्षुद्र म्हणून हरदास वर्णन करतात ! आणि सर्वांच्या डोळ्यांत घळघळा अश्रू येतात ! ते गेले तो मार्गा चोखाळावा, नाहींतर गप्प बसावें असा कांहींचा समज. गौरीशंकरासारखीं उच्च ध्येयें पाहूनच आमच्या मनाला मरगळ यावयाची ! संतांचा असा हेतू नव्हता. पण त्यांच्या साहित्याचा परिणाम तसा झाला खरा. तुकाराम महाराज अनुभवानें बोलतात कीं, 'न मिळो खावया, न वाढो संतान.' आम्हीहि भजनांत तेंच म्हणतों, टाळ कुटण्यांत दंग होतों, ब्रह्मानंदीं टाळी लागते ! पण या ढोंगांत अर्थ असतो का ? पोटांत कावळे ओरडत असतांना 'न मिळो खावया' म्हणून म्हणण्यांत काय अर्थ आहे ? हें जीवन नव्हे, ही जडता आहे. एवढा मोठा मोरोपंत! पण तो सुद्धां म्हणतो कीं, 'कांहीं आपण तरावया गावें.' त्याचें म्हणणें असें कीं, संतांचा विहंगममार्ग असला तरी आमचा आपला पिपीलिका - मार्गच बरा. सिद्धांचीं लक्षणें हीं साधकांचीं साधनें असतात. खरें बोलतां येत नसेल तर निदान खरें बोलण्याचें ध्येय तरी डोळ्यासमोर ठेवा. एकनाथासारखें औदार्य दाखवितां येत नसेल तर निदान पंक्तिप्रपंच तरी करूं नका.

ध्येयांचीं हीं जोखडें शिरावर ठेवल्यानें आमचा प्रपंच रडका झाला. व्यक्तींचा विचार अजिबात न करतां सर्वांचें तंत्र ठरून गेलें. भरतानें नाट्यशास्त्राचें तंत्र ठरवून टाकलें. स्वतः कांहीं हालचाल करण्याऐवजी जीवंत माणसें जीवंत नसल्यासारखीं वागूं लागलीं ! आणि अशा मरगळलेल्या अवस्थेंतहि आम्ही आमच्या संस्कृतीचे पोवाडे गायला लागलों ! या साधनांत-ध्येयांत-बदल करा म्हणून आगरकर-केशवसुत आम्हाला सांगूं लागले !

पाखंड म्हणजे जागृती

आपल्या वैदिक कालांतील पाखंडें हीं जागृतीचीं लक्षणें होत. बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव यांचा उदय हीं एका अर्थानें वैदिक संस्कृतीविरुद्ध बंडें होत. त्यांनीं सर्व मानव समान अशी शिकवण समाजांत पसरवली !

महाराष्ट्रांत जुन्या विषमतेच्या कल्पना राहिल्या, ब्राह्मण श्रेष्ठ ही भावना राहिली म्हणून महाराष्ट्र मागें पडला. ब्राह्मण-श्रेष्ठत्वाच्या भावनेनें इतरांचें व्यक्तित्व मारलें गेलें.

पाश्चात्य संस्कृतींत व्यक्तित्व, वासना, भावना, आशाआकांक्षा यांना एक

मानाचें स्थान आहे आणि हें एक जीवंतपणाचें लक्षण आहे. केशवसुतांनीं आर्यसंस्कृतीवर गोफणींतून दगड फेकलेले आहेत.

आमचीं ध्येयें वाईट नव्हतीं पण तीं जागृत नव्हतीं !

एक संत झाला कीं, अनेक 'संताळे' निर्माण होतात ! या संताळचांनीं महाराष्ट्र बुडविला. सर्वच जण देवभजनीं लागले. मला देव नको, मी पाखंडी रहाणार असें म्हणणाऱ्यांचेंहि त्यांच्या स्वतंत्र बुद्धीबद्दल कौतुक करावयास हवें. आपणांत ही प्रवृत्ती नाहीं. धर्मनिष्ठ होतां येत नाहीं म्हणून आपण धर्मभीरू होऊं पहातों. असलें ढोंग उपयोगाचें नाहीं. जेवायला हवें असेल तर 'न मिळो खावया' म्हणून टाळ कुटीत बसूं नका !

पाखंडचांचा गौरव करण्याची बुद्धि पाश्चात्यांत आहे. सेटन आणि ईश्वर यांच्यांत सेटन हा एक प्रामाणिक मनुष्य दाखविला आहे. तो आहे देवदूतच, पण बंडखोर आहे. हें फळ खाऊं नको म्हटलें, तर तो म्हणतो मी खाऊन पहातों, अनुभव घेऊन पहातों. मला ज्या वासना आहेत त्या मी पूर्ण करणार म्हणून तो म्हणतो ! तो बंडखोर आहे पण माणूस आहे ; मेणाच्या बाहुलीसारखा तो नाहीं. तो बाहेरच्या देवाला भीत नाहीं. तो अंतःकरणाला प्रतीत होतें तसेंच वागतो. प्रसंगीं त्यांत आत्मनाश होईल. पण तोही सोसण्यास तो सिद्ध होतो ! शेले रूढ अर्थानें पाखंडी होता म्हणतात. पण त्याचा श्रेष्ठ आध्यात्मिक कवि म्हणून आज गौरव होतोच कीं नाहीं !

भारतीय 'बंडखोर'

प्राचीन धर्मग्रंथांतसुद्धां अशा बंडखोर माणसांचीं उदाहरणें नाहींत असा गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं. महाभारतांत व्यासांनीं दुर्योधनाचें पात्र रंगविलें आहे. त्यांत जोरदारपणा वाटतो व त्यावरून या माणसाविषयीं व्यासांच्या मनांत आदर आहे असें वाटूं लागतें. कालिदासाच्या काव्यांतहि सीतेचा पतीला निरोप वर्णन करण्याचा प्रसंग आला आहे, शकुंतला दुष्यंताला खडसावीत आहे, तेव्हांचे प्रसंग किती रम्य वाटतात. वाल्मिकी रामायणांतहि रावण, वाली यांचीं पात्रें माणसांसारखीं वाटतात. मोरोपंतांतहि कर्णाचें वर्णन करतांना 'दैत्य' संचरतो. कर्ण, दुर्योधनादिकांचे पंतांचे आर्याभारतांतील संवाद जितके रंगतात तितके पांडवाचे रंगत नाहींत. दूर्योधन मोडतो पण वांकत नाहीं. त्यांत खरा जीवंतपणा वाटतो. जीवंतपणाची पूजा हें जीवन जगणें होय. नीति नीति म्हणून आपण म्हणतों ; पण जीवंतपणा हीच पहिली नीति. व ही नीति म्हणजेच, सत्यजीवनाला चिकटला तर सर्व कांहीं मिळेल. सत्य नाकारलें तर कांहीं मिळणार नाहीं.

नवीनतेचें सूचक

बंगालमध्यें वाल्मिकी ते कृत्तिवास यांच्यापर्यंत रामायण कसें बदलत गेलें तें रवींद्रांनीं एका निबंधांत दाखविलें आहे. पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतींचा संगम झाला, त्यावेळीं प्रथम पाश्चात्य साहित्यांतील अभिनव कल्पनांनीं पौर्वात्य लोक भारले गेले. पाश्चात्यांची संस्कृती जिजिगीषूच नव्हती तर विजिगीषु होती. त्यांच्या साहित्याकडे पौर्वात्यांच्या मनाचा ओढा गेल्यानंतर जुन्या काळीं ज्या कांहीं नव्या कल्पना प्रगट होण्याला अडथळा होत होता तो नाहींसा होण्यांत झाला. आणि या संस्कृतीचा नवा प्रयोग साहित्यांतहि सुरू झाला. मायकेल मधुसूदन यांनीं 'मेघनादवध' काव्याचें केलेलें लेखन हें एक नवीनतेचें सूचक होतें. या काव्यांत रामायणांतीलच कथा व पात्रें निवडण्यांत आलेलीं होतीं. पण रामायणांतील मिळमिळीत पात्रांऐवजीं मानवी भावना व्यक्त करणाऱ्या पात्रांना प्रधान स्थान देण्यांत आलें होतें. आत्मनाश होणार हें माहीत असूनहि मेघनादासारखा बंडखोर, पण आत्मविस्मृत नसलेला माणूस शेवटपर्यंत आपल्या बलाढ्य शत्रूशीं झुंजत रहातो यांत त्या काव्याचें सारें वैशिष्ट्य प्रतीत होत होतें. मेघनादाचा शेवटीं वधच होतो. पण जीवांत जीव असेपर्यंत तो प्राणपणानें लढतच जातो. या लढाऊपणांत जें मानवाचें दर्शन होतें तेंच या काव्यांत दाखविलें आहे. या काव्याची रचना करतांना त्यानें छंद बदलले, पद्धत बदलली हें मान्य करूनहि त्यानें जो बाह्य बदल घडवून आणला त्यापेक्षां आंतील बदलालाच जास्त महत्त्व द्यावयास हवें.

केशवसुतांनींहि प्राचीन विचारांना व कल्पनांना धक्का देण्याचें कार्य एवढ्या मोठ्या प्रमाणावर केलेलें आहे कीं, **त्यांनीं आक्रमिलेल्या मार्गांत अजूनहि मराठी कवितेचें पाऊल पुढें पडलेलें नाहीं.** हें सांगण्यांत आपण पुढें जाऊंच शकणार नाहीं असें सांगण्याचा हेतू नाहीं ; आज तरी ही वस्तुस्थिति आहे एवढें मात्र खरें.

नवकाव्याचा जन्म

आधुनिक मराठी नवकाव्याचा जन्म केशवसुतांच्या कवितेपासूनच झाला. त्यांच्या कविता संख्येनें थोड्या असल्या, तरी संख्येच्या मानानें त्यांत आलेले विषय व विविधता ही खचित कौतुकास्पदच ठरेल. त्यांतल्या अपवादरूप कांहीं कविता गाळल्या तर बाकीच्या साऱ्याच कविता प्रातिनिधिक स्वरूपाच्या ठरतील. आणि या साऱ्याच कवितेंतून एक प्रकारची बंडखोरी वृत्तीच सूचित केलेली आढळून येईल. सर्वच कवितांतून अशी बंडखोरवृत्ती प्रगट होण्याचें कारण तरी काय ? असा प्रश्न मनांत उद्भवणें साहजिकच आहे व या बंडखोरीची मीमांसा लागते कीं काय तें पाहिलें पाहिजे.

बंडखोरीची मीमांसा

माणसांत बंडखोर वृत्ती तरी केव्हां येते ? जेव्हां सरळ विकासास वाव मिळत

नाहीं,प्रगतीच्या सर्व वाटा रोखून धरलेल्या असतात,त्यावेळीं बंडखोर वृत्तीचा अंगीकार करावा असें वाटूं लागतें. कारण अंतर्यामीं कार्य करण्याची इच्छा अनावर झालेली असते, तें केल्यावाचून रहावत नाहीं. उसळलेल्या वृत्ती स्वस्थ बसत नाहींत. रवींद्रनाथ टागोरांनीं 'निर्झरेर स्वप्नभंग' या कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें कपारीच्या कोंडींत कोंडलें गेलेलें पाणी जसें बाहेर जाण्यासाठीं धडपड धडपड करीत असतें, आपल्या आजूबाजूस असलेले खडक आपल्या मार्गांत आडवे येतातसें वाटतें तेव्हां त्या पाण्यांतल्या बिंदूबिंदूला असें वाटतें कीं, मला सागराची हांक येत आहे आणि या खडकाचा चुरा करूनहि मला धांवत तिकडे गेलेंच पाहिजे. त्यावेळीं पाणी खडकाला धडका देऊन देऊन त्यांतून वाट काढून शेवटीं सागराला जाऊन मिळतेंच. त्याचप्रमाणें परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडलेल्या असामान्य पुरुषाला भोवतालची स्थिति असह्य होते. या परिस्थितीचा भेद करूनहि पुढें गेलें पाहिजे असें सारखें प्रतीत होत असतें व ते बंडखोर होऊन पुढें पुढें जाण्यासाठीं झटत असतात. असा एक सिद्धांत सांगता येण्यासारखा आहे कीं, जितकें समाजाचें पतन जास्त तितका पुढारी अधिकाधिक जास्त ध्येयवादी व अव्यवहार्य मार्गाचें अनुसरण करणारा निघतो. परिस्थिति फारशी बिघडलेली नसली, तर पुढारी अनुयायांच्या चार पावलेंच पुढें असेल. पण परिस्थिति जर अतिशय बिकट असली तर तितक्याच प्रमाणांत पुढाऱ्याचा ध्येयवाद अतितीव्र व मार्ग अति-अव्यवहार्य आणि विलक्षण श्रद्धावादी होत जातो. आज महात्मा गांधींचे मार्ग आपणास व्यवहार्य वाटत नाहींत याचा अर्थच असा कीं, आपल्या समाजाची परिस्थिति अतिशय वाईट झालेली आहे.

क्रांतीची स्थूल कल्पना

अशा वेळीं ज्या आत्म्यांना बंडखोरीची प्रेरणा मिळते, त्यावेळीं क्रांतीची तपशीलवार कल्पना पुढें मांडणें शक्य होत नाहीं. या आत्म्यांना जें काय वाटत असतें तें ते स्थूलपणानें मांडत असतात. आपले विचार तपशीलवार रीतीनें लावून दाखविण्याचें किंवा आचरणांत कसे आणून दाखवावयाचे याची निश्चित कल्पना त्यांनाहि अशा प्रसंगीं असत नाहीं. म्हणून ते जें जें सुचेल, जसें जसें सुचेल तसें तसें ते मांडीत असतात. कोणत्याहि क्रांतीच्या दोन अवस्था असतात. एक अवस्था युटोपियन (ध्येयवादी) व दुसरी सायंटिफिक (बुद्धिवादी) असते. कोणताहि ध्येयवाद प्रारंभीं युटोपियनच असतो व नंतर त्याला सायंटिफिक स्वरूप प्राप्त होत जातें.

क्रांतीचा जन्म शब्दांत

क्रांतीची सुरुवात प्रथम हृदयांत होते. भौतिक परिस्थितीमुळें क्रांति होण्यास मदत होते हें खरें. पण ही क्रांती मुख्यतः आध्यात्मिकच असते.

सुरुवाती–सुरुवातीस क्रांती ही शब्दांनीं व्यक्त होत असते. प्रथम ती साहित्यांत शब्दरूपानें अवतरत असते व मग आचरणांत येऊन तिचें शास्त्र बनत असतें.

ही गोष्ट जर आपण नीट लक्षांत ठेवली, तर केशवसुतांच्या काव्यांत बंडखोर वृत्ती कां आहे व कांहीं ठिकाणीं गूढता व अस्पष्टता कां आहे हें सहज आपल्या ध्यानांत येईल.

बंडखोरी नव्हे : नवा आविष्कार !

दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें तर केशवसुत-आगरकर हे असावे तितके बंडखोर नाहींत. कारण ते भारतीय संस्कृतीचा एकप्रकारें नव्या स्वरूपांत आविष्कार करीत होते. भारतीय संस्कृतींत अद्वैत कल्पना सांगितलेली आहे व ही अद्वैत कल्पना त्यांनीं सामाजिक क्षेत्राला लावली एवढेंच. पाश्चात्य संस्कृतीची लाथ बसतांच पौर्वात्य संस्कृतीला जाग आली व कांहीं कांहीं ठिकाणीं तर या उभय संस्कृतींचें एवढें मीलन घडून आलें कीं, अमकें म्हणणें पाश्चात्य संस्कृतीचें असें पृथक्करण करून दाखविणेंहि कठीण होऊन वसलें. प्राचीन काळीं भगवान श्रीकृष्ण, बुद्ध यांनीं वैदिक संस्कृतींतूनच नवीन विचारप्रवाह काढले तसलेंच कार्य केशवसुतांसारख्या कवींनीं व आगरकरांसारख्या विचारवंतांनीं पुढें चालविलें. या दोघांनीं ज्या कार्याला प्रारंभ केला, त्याला प्रेरणा पाश्चात्य साहित्याच्या योगानें मिळाली एवढेंच. आगरकरांच्या लेखनांत कुठें कुठें पाश्चात्य श्रेष्ठतेची भावना तरी आढळते. पण केशवसुतांच्या काव्यांत असें कांहींच सांपडत नाहीं. याचा अर्थच असा कीं, आपण जें काय नवें घेत आहोंत त्यांत फारसें नावीन्य आहे असें त्यांना वाटत नव्हतें एवढेंच !

नवी कविता, नवी प्रतीकें

नवीन कविता असली म्हणजे तिचीं प्रतीकेंही नवीन असावयास पाहिजेत असें कांहींजण म्हणतात. केशवसुतांनीं आग्रहपूर्वक आणि स्पष्टतेनें नवीनाचा स्वीकार केला नसला, तरी त्यांच्या काव्यांत नवीन प्रतीकें आलेलीं आहेत. प्रतीकें आपण निरनिराळ्या दृष्टींनीं पहात असतों. उदा० आकाशांतून गंगा खालीं येते. कांहींजण त्यांतून उदात्त अर्थ काढून सगरपुत्रांच्या उद्धारासाठीं गंगा खालीं अवतरली असें म्हणतात. तर दुसरे कांहींजण असें सांगतात कीं, स्वर्गांत गंगा होती तिचा अधःपात झाला, ती खालीं आदळली व तिला शतमुखांनीं समुद्रास जाऊन मिळावें लागलें. पतंग व दीपक यांबद्दल आपल्याकडील प्रतीकाची कल्पना अशी आहे कीं, पतंग म्हणजे वासना व ज्योत म्हणजे भोग. पण उर्दू काव्यांत ज्योत म्हणजे परमात्मा व पतंग म्हणजे आत्मा अशी कल्पना करून पतंग दिव्यावर झडप घालतो, म्हणजे आत्मा परमात्म्यांत मिळून ज्योतिर्मय होतो असें आहे. ' हरपलें श्रेय 'मध्यें केशवसुत म्हणतात, ' दीप-

शिखेवरी पतंग तो प्रेमें प्राणाहुति देतो' या ओळींत केशवसुतांनीं दुसऱ्या अर्थानें प्रतीक वापरल्याचें स्पष्टच आहे. 'दुर्मुखलेला' यांत दुर्मुखलेल्या मुलाकडे पाहून हा पुढें मोठा कवी होईल अशी कल्पना तुम्हांला कां सुचत नाहीं म्हणून ते विचारतात. मुंग्यांना पंख फुटल्यानंतर त्या मरतात ही जुनी भावना. पण केशवसुत विचारतात, मुंग्यांना पंख फुटल्यानंतर त्या आकाशांत भरारी कशावरून मारणार नाहींत ? आज दुर्मुखलेलीं व मुंग्यांसारखीं वाटणारीं मुलें उद्यां मोठीं माणसें कशावरून होणार नाहींत ?

दलालांची लुडबूड नको

आजूबाजूच्या परिस्थितीमुळें व इतर बाह्य बंधनांनीं त्यांचा बंडखोर आत्मा अतिशय चिडून गेलेला होता. जुन्या मिळमिळीत रूढीबंधनांना तटातट तोडावें असें त्यांना सारखें वाटत होतें. कविता कशा कराव्या याचें काव्यशास्त्र ठरून गेलेलें आहे. प्रेम कसें करावें हें कामशास्त्रांत नमूद करून ठेवलें आहे. जीवनाला लागणाऱ्या अन्न वस्त्रादिकांच्या गरजांसाठीं अर्थशास्त्र आहे. उच्चनीचता धर्मशास्त्रानें ठरवून ठेवलेली- या साऱ्याच नियमबद्ध शास्त्रांच्या बंधनांची त्यांना चीड येऊन निदान साहित्याच्या. प्रांतात तरी या रूढींचा संचार चालूं द्यावयाचा नाहीं म्हणून ते गरजले कीं, 'अशी असावी कविता फिरून, तशी नसावी कविता म्हणून' आम्हांला सांगणारे तुम्ही आहांत तरी कोण ? आणि तुमची लुडबूड आम्ही चालूं तरी कां द्यावयाची ? जोरदार गद्यांत जर ही कविता वाचली तर असें वाटूं लागतें कीं, जणुं काय केशवसुतांसमोर कोणी तरी लढायला म्हणून उभा ठाकला आहे आणि केशवसुत त्याच्याशीं झुंजच करीत आहेत. हे प्रश्न विचारतांना ते स्वतःपुरतेंच पहात आहेत असें नाहीं. तर ते साऱ्याच कवींचे प्रतिनिधी बनून या दलालांना, मध्यस्थांना व भटजींना सांगत आहेत कीं, तुम्ही एकदम या प्रांतांतून चालते व्हा. कवी आणि कविता हे दोघेजण काय करावयाचें तें पाहून घेतील.

'नियमन मनुजांसाठीं'

समाजांतली स्थितिप्रियता त्यांना आवडत नव्हती. समाजांत गतिप्रियता असावी असें त्यांना सारखें वाटत होतें. सुरुवातीस चांगल्या असणाऱ्या बाबींनासुद्धां रूढींमुळें विपर्यस्त रूप येत असतें. सहा दिवस काम करून एक दिवस विश्रांतीसाठीं ठेवला तर लोक सत्कार्यालासुद्धां विश्रांती देऊं लागले. देवापुढें बकरा कापण्याच्या रूढीचें एवढें विटंबन सुरू होतें कीं, 'बकऱ्यापुढेंच देव कापला जाऊं लागतो.' आणि हा आंधळेपणाचा प्रकार सर्वत्रच आढळून येत असतो. विश्रांती ही मानवांसाठीं बनविलेली आहे; विश्रांतीसाठीं मानव बनविला नाहीं, ह्याचा विसर पडूं लागतो. आणि असे प्रकार धर्मसंस्था, राजसंस्था, या सर्वच ठिकाणीं नकळत सुरू होऊन

उन्नतीऐवजीं अधोगती होत जाते. संयम जर आंतून आलेला असला तर आजचा माणूस उद्यांचा देव होतो आणि संयम जर बाहेरून लादला गेला तर आजचा माणूस उद्यांचा दगड होत असतो. ब्रह्मचर्यांत संयम आंतून आलेला असतो ; पण वैधव्यांत तो बाहेरील दडपणामुळें लादलेला असतो. म्हणून केशवसुत म्हणतात कीं, 'नियमन मनुजांसाठीं', नियमनासाठीं मानव नसतो.

मजूर उपाशी

मजुरावर उपासमारीची पाळी येते यावर केशवसुतांनीं एक कविता लिहिली आहे. श्रीमंतांचीं घरें माझ्या वाडवडिलांनीं बांधलीं मग मला आज भाकरीहि कां मिळूं नये ? अर्थव्यवस्थेवर रचलेली ही कविता मार्क्सवादाचा आपल्याकडे बोलबाला होण्यापूर्वी जन्माला आलेली आहे ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

अंत्यज व ब्राह्मण

समाजांतील जातिभेद व ब्राह्मणवर्गाची क्षुद्र वृत्ती यांवर 'अंत्यजाच्या मुलानें आईला केलेला प्रश्न' प्रकाश पाडील. आईनें त्याला उत्तर दिलें त्यांत कारुण्य आहे, उपरोधहि आहे.

'धावा, फोडा ही मूर्ती'

'मूर्तिभंजन' ही त्यांची एक अत्यंत सुंदर कविता आहे. त्यांत ते 'धावा, फोडा ही मूर्ती' म्हणून सांगत आहेत. कारण मूर्ती फोडून त्यांना आंतली संपत्ति लुटावयाची आहे. हें सारें रूपक आहे. मूर्ती फोडल्यावर आत्मा बाहेर यावयाचा आहे. रूढीचीं कवचें त्यांना छिन्नभिन्न करून टाकावयाचीं आहेत. महंमदानें नाहीं का सोमनाथाची मूर्ति फोडली ? त्यावेळीं त्यालाहि पुजारी मूर्ति विकायला तयार झाले. पण तो म्हणाला, 'मी मूर्ति विकणार नाहीं. मला बुत्फरोश (मूर्तिविक्या) व्हावयाचें नाहीं. मी बुत्शिकनच (मूर्तिभंजकच) होणार व मूर्ती फोडून आंतली संपत्ति लुटणार.' केशवसुतहि जीर्णशीर्ण मूर्ती फोडायला आवेशानें धांवत आहेत. मूर्तीचें अस्तित्व त्यांना असह्य झालेलें आहे. 'कोडें घालुनिया बसली कैदाशीण, हिच्या खळीमध्यें आम्हां नाहीं जाणें' असें केशवसुत म्हणतात. यांत 'स्फिन्क्स'ची कल्पना आणलेली आहे. त्या 'स्फिन्क्स'नें जसें कोडें घातलें होतें, तशीच ही कैदाशीण बसली आहे. यांतल्या 'खळी' शब्दाचा सरळ अर्थ 'खड्डा' असा आहे.

मूर्तीचे शिल्पकार

केशवसुत हे नुसतेच मूर्तिभंजक नाहींत. ही मूर्ती फोडल्यानंतर आम्ही पुन्हा जोडूनहि देऊं म्हणून ते सांगत आहेत. बुरसटलेल्या रूढींना चिरडून टाकून आम्ही

नव्या कल्पना, नव्या रूढी निर्माण करूं. पण कालांतरानें आज नवीन वाटणाऱ्या रूढी बुरसटणारच. पुन्हा मूर्तीवर पुटें चढणारच आणि पुन्हा मूर्तिभंजनाची आवश्यकता पडणार. नव्या पिढीनें हें मूर्तिभंजन व मूर्तीचें घडण सतत चक्रनेमिक्रमानें चालू ठेवलें पाहिजे. महंमदाप्रमाणें एकदां संपत्ती लूटून भग्नमूर्ती तशीच ठेवून जाण्याचें कारण नाहीं.

'अमुचा पेला दुःखाचा'

१८९८ सालीं 'पद्यपंक्ती' म्हणून केशवसुतांनीं कांहीं ओळी लिहिल्या आहेत. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, 'आम्ही नव्हतों अमुचे बाप, उगाच कां मग पश्चात्ताप ?' आमच्या वांट्याला जीं दुःखें आज आलेलीं आहेत, आज आम्हाला लहान लहान वैयक्तिक सुखेंहि उपभोगावयास मिळत नाहींत याचें कारण काय ? ह्याचा त्यांनीं विचार करून सिद्धांत काढला आहे कीं, आजच्या परिस्थितीला आम्ही सर्वस्वी जबाबदार आहोंत असें नाहीं. कांहीं भाग पूर्वीच्या लोकांचा आहे. आणि हा विवेक येतांच ते म्हणतात कीं, 'उगाच कां मग पश्चात्ताप ? आसवें न आणूं नयनीं, मरूनि जाऊं एक दिनीं.'

'अमुचा पेला दुःखाचा' म्हणून केशवसुत पुढें सांगत आहेत : दुःखी तरी कोण असतो ? तर ज्याच्या अपेक्षा मोठ्या असतात तो. आमच्या अपेक्षा असफल झाल्या म्हणून ते म्हणतात कीं, 'अमुचा पेला दुःखाचा। डोळे मिटुनी घ्यायाचा।' सॉक्रेटिसासारखे डोळे उघडे ठेवून देखील पेल्यांतील पेय प्राशन करणारे थोर हुतात्मे असूं शकतात, तेवढ्या अवस्थेपर्यंत आपल्याला जातां न आलें तरी मानवी भावनेनें त्यांनीं डोळे मिटून घेण्याचें ठरविलें आहे. 'पितां बुडाशीं गाळ दिसे। अनुभव हें त्या नांव असे॥ फेंकुनि द्या तो जगावरी। अमृत होऊं द्या कुणापरी' या व पुढील काव्यपंक्तींचा अर्थ विशेष स्पष्ट करावयास नकोच.

आम्हाला वगळा ?

'आम्ही कोण ?' या कवितेंत 'आम्हाला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें। आम्हाला वगळा विकेल कवडीमोलावरी हें जिणें' असे उद्‌गार केशवसुतांनीं काढले आहेत. त्यांत अहंकार नाहीं. 'आम्ही' म्हणजे 'केशवसुत' नव्हेत. 'आम्ही' म्हणजे बुद्ध, ज्ञानेश्वर, व्यास, वाल्मिकी इत्यादि थोर कवी होत. ह्या थोर कवींना वगळल्यावर जीवन कवडीमोलाचें होणार नाहीं काय ? तुतारी, स्फूर्ती, गोफण, नवा शिपाई इत्यादि त्यांच्या कविता प्रसिद्धच आहेत.

मिस्टिसिझम

याप्रमाणें केशवसुतांनीं समाज, धर्म, साहित्य इत्यादि सर्वच क्षेत्रांत आधुनिक

युग आणण्याचा प्रयत्न केला आहे. आतां त्यांच्या 'मिस्टिसिझम्' कडे आपण वळूं. तत्पूर्वी त्यांच्या काव्यावर येणारे एकदोन आक्षेप आपण तपासून पाहूं. म्हणजे ते 'मिस्टिक' कसे आहेत तें अधिक चांगल्या रीतीनें स्पष्ट होण्यास मदत होईल.

कांहीं कविमित्रांचा प्रश्न असा आहे कीं, केशवसुतांच्या काव्यांत ओज आहे, सामर्थ्य आहे हें मान्य आहे. पण त्यांत सौंदर्य आहे काय ? व नसेल तर त्यांची कविता अर्धवटच मानावयास काय हरकत आहे ? आक्षेप रास्त आहे. पण सौंदर्य म्हणजे तरी काय असा प्रश्न पुन्हा उभा रहातोच कीं नाहीं ? भारतीय काव्यशास्त्रांत 'सौंदर्य' हा शब्द आढळत नाहीं. रसनिर्मितीबद्दल मात्र ऊहापोह आढळतो व रसनिर्मितीचा प्रधान हेतू आनंद हा मानला आहे. मनुष्याच्या मनाला ज्याच्या योगानें बरें वाटतें, तें तें चांगलें असें आपणांस म्हणतां येईल. एका कवीनें म्हटलें आहे, 'यस्य मनः यत्र संलग्नं, तत्तस्य सुंदरम् भवेत्'. या वासना-भावना, त्यांचें संलग्न होणें इत्यादिकांचे अर्थ करायला तत्त्वज्ञानाकडे जावें लागतें. केशवसुतांनीं 'प्रीतीची कविता' लिहिली आहे. प्रीति ही दोन प्रकारची असते; एक स्वतःसंबंधींची व दुसरी इतरांसंबंधींची. ही दुसरी प्रीति 'मिस्टिसिझम्' कडे नेत असते. प्रीति ही एक जीवनाची उसळणारी भावना आहे. या भावनेला दडपण्याचा प्रयत्न होतो, आत्म्यावर बंधनें लादलीं जातात तेव्हां तो ओरडतो 'ते आणि मी एकच आहे.' आत्मा नेहमीं स्वतंत्र होण्याची अशी धडपड करीत असतो; तशी त्याला तळमळच लागलेली असते.

केशवसुत रडके नाहींत

केशवसुतांवर दुसरा एक आक्षेप असा आणण्यांत येतो कीं, ते एक रडके कवि आहेत. कारण त्यांना आयुष्यांत धड शिक्षण मिळालें नाहीं, नोकरी मिळाली नाहीं. त्यांना कीर्ति हवी होती, प्रीति हवी होती अशी समजूत टीकाकार स्वतःवरून करून घेतात. आणि त्याच कसोट्यांवर केशवसुतांना रडके कवि ठरवितात. केशवसुत हे अश्रू गाळणारे, रडणारे कवि आहेत असें म्हणतात. पण हें वर्णन केशवसुतांपेक्षां यशवंतांनाच जास्त लागू पडेल. आपल्याला संसारांत हरघडीं जीं दुःखें भोगावीं लागतात त्याबद्दल रडून दाखविणारे प्रातिनिधिक कवि म्हणजे यशवंतच होत. त्यांनीं काव्यांत वर्णिलेलीं दुःखें संसारांत हरघडीं प्रत्ययाला येत असतात. त्यामुळें त्यांच्या काव्याशीं आपण चटकन् समरस होतों. कवि सर्वांच्याच आशाआकांक्षा, भावना, सुखें, दुःखें, पराक्रम, कौर्य इत्यादि भावनांचें चित्रण करीत असतो. केशवसुतांच्या काव्यांत उसासे, निःश्वास, करुणा, प्रार्थना यांना फारसें स्थान नाहीं. ते सह्याद्रींतल्या कणखर माणसासारखे वाटतात. त्यांचें काम फार कडक आहे. त्यांच्या आयुष्यांत दुःख आहे. पण त्या दुःखांतच ते रममाण होणारे नाहींत. केशवसुत कवि यशवंतांच्या वळणाकडे जाऊं लागल्याच्या खुणा आहेत. पण ते त्या प्रवृत्तींच्या आहारीं गेलेले नाहींत. कविवर्य

यशवंतांप्रमाणें रडणें हें केशवसुतांच्या काव्याचें चिन्ह नव्हे ! ते झुंजार योद्धे आहेत. एखाद्या पर्वतावर पर्जन्याच्या धारा कोसळून त्या वहात गेल्या तरी पर्वत जसा अचल असतो तसेच केशवसुतहि दुःखें आल्यामुळें विचलित झालेले नाहींत. म्हणूनच मिस्टिसिझम्मध्यें त्यांची प्रगती होऊं शकली. नाहींतर फार फार तर ते भक्तीपर्यंत जाऊन पोहोंचले असते. परमेश्वर भक्तांच्या संकटकाळीं धांवत येतो, हें भक्तांचें आवडतें सूत्र आहे. जनाबाईला तूं दळायला मदत केलीस, कबिराचे शेले विणून दिलेस, मग माझ्याच संकटप्रसंगीं कां धांवून येत नाहींस असें म्हणण्यांतहि काव्य आहे. पण तें केशवसुतांच्या कवितेंत सांपडावयाचें नाहीं. त्यांच्या काव्यांत संयम फार आहे, दुःखें सोसण्याची हिंमत फार आहे. 'मृत आशांच्या चितेवरुनिया पिशाच माझें भटकत राहे शांति नसेचि तया' यांत दुर्बलता नाहीं. त्यांच्या आशा सफल झाल्या नव्हत्या. पण या जगांत कुणाच्या साऱ्याच आशा सफल झाल्या आहेत ? मानवांच्या साऱ्याच्या साऱ्या वासना पुरविण्यासाठींच का परमेश्वर आहे ? कांहीं वासना सफल होतील तर कांहीं वासना विफल होतील. आणि याचें ज्ञान मानवास हवें. हें माहीत असल्यामुळेंच कीं काय केशवसुतांच्या काव्यांत कुरकूर दिसत नाहीं. तर शांनें म्हटल्याप्रमाणें (Face the facts) परिस्थितीचा स्वीकार करण्याची तयारी केलेली दिसते. दुःखांना पचविण्याची हिंमत प्रतीत होते. आणि यांतूनच वर नमूद केलेली 'आम्ही नव्हतों अमुचे बाप' ही कविता स्फुरलेली आहे.

सुखांचेसुद्धां दोन प्रकार आहेत. एक व्यक्तिगत व दुसरें सामुदायिक. व्यक्तिगत सुखें सोडून जाणें म्हणजे ध्येयवाद स्वीकारणें. 'सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म', असें एक उनिषदांतील वचन आहे. मी त्याचा अर्थ असा लावतों कीं, सत्य हेंच ज्ञान आहे, तें अनंत आहे, त्यालाच ब्रह्म म्हणतात. या जीवनसत्याची अनुभूती प्रचीत होणें म्हणजेच 'मिस्टिसिझम्.' कांहींजण याला विराट अज्ञानानें 'गूढगुंजन' म्हणतात. व गूढगुंजन म्हणजे न समजेलसें बोलणें असें म्हणतात. त्यांत तथ्य नाहीं. 'मिस्टिक' असतो तो जीवनाच्या मूलभूत केंद्रापर्यंत जाऊन राहण्याचा प्रयत्न करतो. केशवसुतांनीं 'कोठें जातोसी' यांत 'कुठें जातों हें मला कळत नाहीं' असें म्हटलें आहे. यांत मृत्यूचें गूढत्व सूचित केलें आहे. अशा प्रकारची अवस्था झाली कीं, ज्ञानाला मर्यादा आहेत याचें दुःख होऊं लागतें व 'ज्ञाताच्या कुंपणावरून, धीरत्व धरून, उड्डाण करून' जीवनाच्या शोधकाला पलीकडे जावेंसें वाटतें. पलीकडे न नांगरलेली बरीच जमीन पडलेली आहे. तिच्यांत पेरणी करून बरींच पिकें काढतां येतील. केशवसुत हे तेथील सनदी शेतकरी झाले नसले, तरी तेथील अंधुक आकृती त्यांना दिसत होत्या व आपल्य. प्रतिभेच्या चोंचीनें त्यांनीं एकादी वनमाला आणण्याचें कार्य केलेलें आहे

'झपूर्झा' व 'हरपलें श्रेय'

केशवसुतांनीं 'झपूर्झा' व 'हरपलें श्रेय' या कविता रचल्या आहेत. मानस-

शास्त्रादृष्ट्या 'हरपलें श्रेय' ही आधींची अवस्था व 'झपूर्झा' ही नंतरची अवस्था आहे. कारण 'हरपलें श्रेयां'त आत्म्याची तळमळ असून 'झपूर्झा' कवितेंत निर्द्वंद अवस्थेचें वर्णन आहे. पण कालमानानें पहातां केशवसुतांनीं 'झपूर्झा' अगोदर लिहिली असून 'हरपलें श्रेय' नंतर लिहिली आहे. याचा अर्थ 'झपूर्झा' ही एक नैमित्तिक अनुभूति आहे पण 'हरपलें श्रेय' ही केशवसुतांच्या जीवनांत नित्य अनुभवास येणारी वस्तु आहे. झपूर्झांत 'हर्ष खेद ते मावळले' असें वर्णन आहे. तें रडकें आहे असें कांहीं जण म्हणतात. 'सुखदुःखे समे कृत्वा' हें माहीत असून असें म्हटलें जावें हें आश्चर्यकारक आहे! यांत द्वंद्वातीत अवस्था दिग्दर्शित केलेली आहे. 'कंटक शल्यें बोधटलीं, प्रकाश गेला, तिमिर हरपला, काय म्हणावें या स्थितिला, झपूर्झा गडे झपूर्झा' यांत देहभान विसरल्यानंतरची वृत्ती वर्णिली आहे आणि 'हरपलें श्रेयां'त विशाल ध्येयें हृदयाशीं बाळगणाऱ्या आत्म्याची कथा आहे. त्याच्या हक्काचें जें आहे, तें त्याला प्रत्यक्षांत लाभत नाहीं. आणि प्रत्यक्षांत जें सांपडतें त्यांत त्याला समाधान वाटत नाहीं.

ईश्वरभक्ति

केशवसुत हे ईश्वर मानीत होते किंवा नाहीं असा एक प्रश्न येण्यासारखा आहे. ते एकदां पिंडीवर नाचले होते अशी कथा सांगतात. केशवसुत रूढ अर्थानें अज्ञेयवादी किंवा नास्तिक असले तरी ते जीवनाचा खोल विचार करणारे व जीवनाचा अनुभव पारखणारे असल्यामुळें त्यांना तत्त्वज्ञानी कवि म्हणावें लागतें. मूर्ति, पूजा, आराधना इत्यादि रूढ भक्तिमार्ग त्यांना मानवला नसला तरी निसर्गाच्या द्वारा अनंताशीं एकरूप होण्याची त्यांची साधना त्यांच्या काव्यांत स्पष्ट दिसून येते.

कवि व तत्त्वज्ञ यांचे मार्ग भिन्न असले, तरी त्यांचें ध्येय एकच असतें. व्यास, वाल्मिकी, हे तत्त्वज्ञानी होते. खरा महाकवि तत्त्वज्ञानी असावा लागतो.

तरुण कवींपुढील ध्येय

केशवसुतांना मागें टाकणारा कवि अद्याप महाराष्ट्रांत झाला नाहीं हें विधान थोडें जास्त स्पष्ट करून हें विवेचन संपवावयाचें आहे. कारण हें केशवसुतांचें वैभव असलें तरी आपलें लाघव आहे. आधुनिक कविपंचकांत नारायण वामण टिळक, विनायक, गडकरी, बालकवी यांचाहि समावेश होतो. पण या सर्वांच्या काव्यांत एका एका शाखेचा उत्कर्ष झालेला आपणांस दिसून येईल. टिळक हे फुलामुलांचे व गृहजीवनाचीं चित्रें रंगवणारे कवि आहेत. विनायक हे आपल्या प्राचीन उज्ज्वल इतिहासाचे पोवाडे गाणारे शाहीर आहेत. गडकरी हे प्रेमाचे शाहीर म्हणून नांवाजलेले आहेत व बालकवी हे सृष्टींत रममाण झालेले आहेत. या चौघांनीं विशेषत्वानें जो जो एकेक सूर आळविला आहे, त्या साऱ्याच सुरांचें मिश्रण केशवसुतांच्या काव्यांत

आहे. केशवसुतांच्या पुढें अजून महाराष्ट्र गेला नाहीं असें मी म्हणतों, तेव्हां त्यांना सर्वच बाबतींत सामग्र्यानें मागें टाकणारा कवि अजून झाला नाहीं असें मला म्हणावयाचें असतें. त्यांच्यानंतर झालेल्या कविवर्य तांबेप्रभृतींनीं त्यांना एका एका क्षेत्रांत मागें टाकलें असेल. पण त्यांना सर्वच क्षेत्रांत सामग्र्यानें मागें टाकणारा कवि महाराष्ट्रांत निर्माण व्हावा असें मला वाटतें. कुसुमाग्रज, अनिल, बोरकर, ना. ग. जोशी इत्यादि कवींचीं नांवें व्यक्तिगत नव्हे तर प्रातिनिधिक म्हणून मी घेत आहें. व त्यांच्यासारख्या प्रवृत्तींच्या कवींना केशवसुतांच्या काव्याचें भांडार उपयोगी पडण्यासारखें आहे. केशवसुत ज्या काळीं जन्माला आले, त्याकाळीं पाश्चात्य संस्कृतीचें मंगल स्वरूप तेवढेंच आपल्या दृष्टीसमोर आलें होतें. आज त्याच संस्कृतीचें अंमगल व विनाशात्मक स्वरूपहि स्पष्ट झालेलें आहे. याच संस्कृतींतून भांडवलशाही, साम्राज्यशाही यांचा जन्म झालेला आपणांस दिसत आहे. समाजवाद व गांधीवाद हे दोन नवे मार्गहि आज या परिस्थितीवर उपाय करण्यासाठीं म्हणून पुढें आलेले आहेत. मानवी ध्येयवाद नष्ट होतो कीं काय अशी आज भीती वाटत आहे. अशावेळीं मानवी ध्येयवाद जीवंत ठेवण्यासाठीं झटणारा महाकवि आपल्याला हवा आहे. व तसा एखादा कवि निघून त्यानें केशवसुतांस मागें टाकावें असें मलाहि वाटत आहे.

(सत्यकथा, फेब्रु. १९४८
१४, अं. १; पृ. क्र. ६-१४)

२३

केशवसुत

लेखक : लालजी पेंडसे

आधुनिक मराठी काव्याचे महान् प्रणेते कविश्रेष्ठ केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले यांचें निधन होऊन आज ४२ वर्षें लोटलीं. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करतांना आज कितीतरी घटना मनांत जाग्या होत आहेत. हा स्वातंत्र्याचा शाहीर फक्त २० वर्षांचेंच काव्यजीवन जगला. वीस वर्षांच्या या काळांत मोजक्या म्हणजे अवघ्या १३२ कविता त्यांनीं लिहिल्या. पण या मूठभर कवितांनीं, स्वतः कवींच्या शब्दांत बोलावयाचें तर या तेजोकणांनीं, काव्यसृष्टीचीं नवीं क्षितिजें निर्माण केलीं. आणि विशेष हा कीं, जों जों काळ लोटतो तों तों केशवसुतांच्या काव्यांत नवरस प्रतीत होतो, नवसंदेशाचा त्यांत साक्षात्कार होतो आणि मन नव्या निरूपणासाठीं त्या जीवंत काव्याकडे पुनःपुनः वेधलें जातें.

काय आहे असें त्या काव्यांत कीं, ज्यानें कविवर्य टिळक भारले जावे, "हा बडा बंडवाला पुढें आला" म्हणून बी कवींनीं उद्घोष करावा आणि गडकरी-अत्र्यांसारख्या चोखंदळच नव्हे, तर एकपरीनें नाठाळ कलावंतांनीं मंत्रमुग्ध बनून भक्तिभावानें त्यांच्यापुढें मस्तक नम्र करावें ?

पण या चर्चेला या १५ मिनिटांत वाव नाहीं; नि ती चर्चाहि पण नवी नाहीं. केशवसुतांच्या हयातींत त्यांच्या काव्याची कुणी फारशी प्रशंसा केली नाहीं, किंबहुना तिची हेटाळणीच झाली. पण त्यांच्या मृत्यूनंतर उपहास व मत्सराचे चोरटे सूर

मधूनमधून डोकावले असले, तरी त्यांच्या नवोन्मेषी काव्यानें तरुण महाराष्ट्र भारला गेला. पुष्कळ हिरीरीची चर्चा झाली, पण प्रत्येक चर्चेंतून केशवसुतांची महत्ता अधिकच उजळून निघाली. "त्यांच्या कवितेंत विलास नसला तरी सुवास व प्रभाव आहे; अलंकार नसले तरी हृदयाचा ठाव घेणारें सौंदर्य आहे; मादकता नसली तरी प्रेरकता आहे; मनाला भ्रांति पाडण्याचें समर्थ्य नसलें तरी क्रांति घडवून आणण्याचें तेज व ओज तिच्या ठिकाणीं आहे." श्री. बेहेरे यांनीं केलेलें हें वर्णन म्हणजे तरुण महाराष्ट्राला केशवसुतांनीं कां भारलें असावें याचें अचूक निदान आहे. आणि म्हणूनच आधुनिक काळाच्या प्रणेत्याचें निरपवाद पद केशवसुतांना प्राप्त झालें.

केशवसुत हे स्वातंत्र्याच्या मदानें अंतर्बाह्य धुंदावलेले बंडखोर कवि होते. या धुंदीनें ते इतके बेहोष बनलेले होते कीं, मानवाची समता, बंधुता, स्वतंत्रता यांच्या आड दानव तर काय पण देव जरी आले तरी त्यांनाहि धुळीला मिळवायला ते पवित्र्यावर उभे होते. कारण देव झाला तरी तो कोण मोठा असा तिरशिंगराव लागून गेला आहे ! अरे, देवालासुद्धां आम्ही मनुष्यांनींच निर्माण केला आहे. आणि म्हणून तो जरी निरनिराळे बुरखे घेऊन आड आला, तरी त्याचेंहि आम्ही निर्दालन करूं ही त्यांची कृतनिश्चिती आहे. स्वातंत्र्य व समता यांचा हा मद त्यांच्या शब्दाशब्दांत भरलेला आहे. म्हणूनच अगदीं आरंभीच्या अवस्थेंत सृष्टिसौंदर्याचा निरागस आनंद उपभोगतांना व घरची आठवण होऊन बालपणींच्या रम्य स्मृती ताज्या करीत धाकट्या भावाचा विचार करतांना, मजुरांचें कष्टमय जिणें पाहतांना व समुद्रावर तरंगत असलेल्या अजस्र बोटीकडे निरखन बघतांना, फार काय, सृष्टींत रोजच्या रोज घडणाऱ्या उदयास्ताच्या गतिचक्रांत संध्याकाळीं पश्चिमेला कांति चढलेली आणि आणि पूर्व निष्प्रभ झालेली पाहून कवीला आपल्या देशाचें रूपक दिसतें :

संध्याकाळीं बघुनि सगळी क्रांति ती पश्चिमेला
वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला

आणि स्वातंत्र्याचें तुफान कवीच्या मनांत माजूं लागतें.

—आणि योगायोग असा कीं, स्वातंत्र्यासाठीं तगमगणारी त्यांची काव्यप्रतिभा नि स्वातंत्र्यासाठीं लढणारी हिंदी राष्ट्रीय काँग्रेस या दोघी एकाच वर्षीं नव्हे तर एक महिन्याच्या अंतरानें जन्माला आल्या. १८८५ सालीं जन्माला येऊन कविप्रतिभेनें डोळे उघडले तों कांग्रेसप्रमाणेंच तिला हें दिसलें :

माता ही सुजला स्वभूमि सुफला तीच्या परी लेकरां
खायाला पुरतें पहा नच मिळे, कीं हाल आहे पुरा;
झांकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेसें मिळे

ही दुःखस्थिति पाहून तिनें आपलें अवतारकार्यहि स्पष्ट केलें. कलेकरितां, मन रिझविण्याकरितां किंवा विकल मनाला गुलगुलित शब्दांनीं आंजारीत गोंजारीत भूल पाडण्याकरितां त्यांची प्रतिभा शिणली नाहीं. तिचें अवतारकार्य स्पष्ट होतें. दुःखस्थिति पाहून कवि उद्घोष करतो :

हातीं घेउनिया निशाण कवि तो पाचारितो बांधवा
या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा !

आणि 'प्रेतेंहि उठवील जी निजरवें' अशी ओजस्वी 'तुतारी' या कविश्रेष्ठानें फुंकली. या तुतारींत त्यांनीं रूढीची व धर्माची अंधता, राजकीय परवशता, सामाजिक उच्चनीचता व जुलूम यांचें जगावरून उच्चाटन करण्याच्या प्रतिज्ञेनें क्रांतिध्वज उभारला आहे. इतकेंच नव्हे तर ही क्रांति सिद्ध करूं शकणारा, नव्या समतेच्या म्हणजेच लोकशाही मनूची विजयी प्रस्थापना करण्याची धमक असणारा द्रष्टा व समर्थ असा 'नवा शिपाई' पण निर्माण करून ठेवला आहे.

स्वातंत्र्याचा बेहोष कैफ चढलेला हा कविराज आज हयात असता तर ८१ वर्षांच्या जराजीर्ण अवस्थेंत कवि बी या आपल्या मित्रासमवेत आपलें स्वातंत्र्यस्वप्न बहुतांशीं सत्यसृष्टींत अवतरलेलें त्यांना गेल्या १५ ऑगस्टला दिसलें असतें. पण उतावीळ झालेल्या कवीला तेवढा धीर होता कुठें ? आपलें 'हरपलें श्रेय' प्राप्त करून घेण्याची तगमग त्याला लागली होती :

दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो,
मी न करिन कां तेंचि कधीं
माझें मज लाभेल जधीं ?

अशी केशवसुतांच्या मनाची अधीर अवस्था झाली होती. यामुळें ४२ वर्षांपूर्वी ता. ७ नोव्हेंबर १९०५ सालींच त्यांची जीवनयात्रा आटोपली होती.

केशवसुतांच्या काव्यप्रतिभेच्या जन्माला जसा एक योगायोग आपण पाहिला, तसा त्यापेक्षांहि त्यांचा मृत्युसंकेत महत्तम आहे. त्यांच्या मृत्यूनंतर बरोबर १२ वर्षांनीं असमानता, गुलामगिरी व पिळणुकीचे तट उच्छेदून ता. ७ नोव्हेंबरला रशियन जनतेनें जागतिक स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा केला. आज रशियन जनता कृतार्थतेनें, तर साऱ्या जगावरची जागृत दलित जनता उत्स्फूर्ततेनें हा ७ नोव्हेंबरचा दिन साजरा करीत आहे. याच दिवशीं केशवसुतांचें निधन झालें. आणि म्हणून आपल्या जीवंत वाणीनें स्वातंत्र्य व समतेचा महान् संदेश देणाऱ्या या कवीला आपण आपली श्रद्धांजली अर्पण करीत आहों. कविश्रेष्ठाचा अपूर्ण राहिलेला संकल्प पूर्ण करण्याच्या प्रतिज्ञा आपण करीत आहों.

अपूर्ण राहिलेला संकल्प–! यांतच केशवसुतांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेची महत्तमता आहे. पुष्कळ कवींनीं स्वातंत्र्यगीतें आळवलीं आहेत, पण त्यांची बैठक पूर्ववैभवावर आहे. म्हणून जेव्हां ते स्वातंत्र्य-गीत गातात, तेव्हां पूर्ववैभवाची स्प्रथापना ही त्यांच्या भावमनाची तितीक्षा असते. अर्थात् परसत्ता जाऊन पूर्ववैभव स्थापन करणें म्हणजे स्वातंत्र्य असें समीकरण त्यांच्या संदेशांतून निर्माण होतें. पण केशवसुत यापेक्षां निराळे आहेत. ते पूर्वेतिहासावरून शिकवण व स्फूर्ति घेतात, तसेच नवोदित मूल्यांपासून ध्येय व चेतना मिळवतात; व त्या दोहोंच्या मिलाफांतून नवनिर्मिती करूं पाहतात. म्हणूनच–

जुन्या नभीं या ताजे तारक
जुन्या भूमिवर नवी टवटवी
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी–
काय नव्हे ती श्रेयस्कारक ?

तर याच्या उलट–

जुनें जाउं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरूनि टाका
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध ! ऐका पुढच्या हांका
खांद्यास चला खांदा भिडवुनि !

असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. यांतला विवेक स्पष्ट आहे. ज्या जुन्यांत गतिक्षमता आहे, तें नवनिष्पत्तीला उपयोगी पडेल. पण ज्याच्यामुळें जीवनप्रवाह कुंठित होऊन प्रगति थांबते, त्याचा निष्ठेनें त्याग केला पाहिजे. उपयुक्तता नष्ट झालेल्या जराजीर्ण वस्तूंना डागडुजी करून मुलामा चढवीत बसण्यांत जीवनाचें साफल्य नाहीं. म्हणून डागडुजीचा बदसल्ला न देतां केशवसुत नवनिर्मितीचा दिव्य मंत्र तरुण विद्यार्थ्यांना देत आहेत. तूं नवशास्त्र व नवविद्या शिकतोस, त्याचें साफल्य कशांत आहे तें नीट समजून घे. ही बेगडी डागडुजी पुरे झाली.

ठसव मनीं हें साचें
बाबा ! जग हें बदलायाचें

म्हणूनच केशवसुत जेव्हां स्वातंत्र्याची जल्पना करतात, तेव्हां त्यांना

उंच अशा बैसुनि तक्तावर
एक वैभवा थोर भोगितो

धुळीमधें तो अन्य लोळतो
हाल न त्याचे कुत्रा खातो
काय असे ही स्थिती बरोबर ?

ही स्थिति त्यांना असह्य होते आणि यावर कुणी सांगेल कीं, हा देवाघरचा न्याय आहे तर केशवसुत निःशंक मनानें सांगतात :

वंदुनिया या देवालागुनि
धाई धाई मानव रडती
पायपोस त्या हाणा संप्रति
देव कशाचे ? अश्रु जे पिती
क्रूरतर न कां ते असुराहुनि ?

जिथें देवांची अशी वासलात लागते, तिथें तक्तावर बसून दुसऱ्यांना धुळींत लोळवणारांचें काय होणार ? केशवसुत म्हणतात :

हल्ला नेण्या करा त्वरा रे
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे
वीरांनो, तर पुढें सरा रे
आवेशानें गर्जत 'हर हर'

प्रगति व समता यांच्या आड येणाऱ्या तत्त्वांचा असा नायनाट करून 'माझें तें सर्वांचें' या वृत्तीवर समाजाला आणायचें आहे.

अल्प पुष्पही बिंदु हिमाचे
अपुल्या पेल्यांतले
वाटिते भांवडीं आपले

ज हिमबिंदु आपल्या पेल्यांत गोळा केले, ते सर्व भावंडांना वाटून द्यावयाचे आहेत, हें सोशॅलिझम्‌चें तत्त्व वरील ओळींत साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांना प्रतीत झालें.

ही वृत्ति समाजांत निर्माण करतांना देवधर्म, जातिसंस्कृति, व्यवस्था-क्षमता या ना त्या नांवानें मानवामानवांत द्वेष, भेदभाव, उच्चनीचता माजलेली आहे, ती नष्ट करून स्वातंत्र्याचें श्रेयस् सर्वांना वाटून देण्यासाठीं आणि–

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत

ही मानवतेची वृत्ति निर्माण करण्यासाठीं केशवसुत गर्जना करतात :

शांतीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे
प्रेषित त्याचा नव्या दमाचा (मी) शूर शिपाई आहे.

परसत्ता झुगारून देऊन हिंदुस्थाननें स्वातंत्र्य प्राप्त करून केशवसुतांचा संदेश आचरणांत आणला. हा संदेश देणाऱ्या कविश्रेष्ठास आपली भाव-सुमनांजली अर्पण करतांना आपण याच पंक्ती गाऊं; त्यांचें स्वप्न परिपूर्ण करणारे त्यांचे आपण शिपाई बनूं.

(सत्यकथा, फेब्रु. १९४८
वर्ष १४ अं. १ पृ. क्र. ३६–३८)

२४

केशवसुत : कांही विचार

लेखक : वा. ल. कुलकर्णी, एम् ए.

अध्यात्माची भूक

केशवसुतांची वृत्ति ही मूलतः अध्यात्मप्रवण आहे. आधिभौतिकापेक्षा त्यांचें मन अध्यात्मामध्येंच स्वाभाविकापणें अधिक रंगतें. जें वरवरचें आहे त्यापेक्षां जें आंतरिक आहे त्याचें संशोधन करण्याकडेच त्यांच्या मनाचा स्वाभाविक कल आहे. ते केवळ अध्यात्माची भाषा बोलत नाहींत तर अध्यात्म अंगीं बाणविण्याचा यत्न करितांना आढळतात. मला असें वाटतें कीं मराठींतील सर्वच श्रेष्ठ कवींचा व पुरुषांचा–वीरपुरुषांचा–अध्यात्माकडे ओढा आहे. अध्यात्म हाच मराठी वाङ्मयांतील प्रमुख विचार आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास ह्यांचीं नांवें घेतलीं काय किंवा रानडे, टिळक, आगरकर, गोखले इत्यादींचीं नांवें घेतलीं काय, ह्या सर्व महाराष्ट्रांतील थोर पुरुषांचे ठिकाणीं अध्यात्माचें विलक्षण आकर्षण होतें असें दिसून येईल. ह्या सर्वांनी केलेलें लोकोत्तर कार्य त्यांच्या अध्यात्मपर मनोवृत्तींतूनच जन्माला आलेलें आहे. अगदीं अलीकडे वारलेल्या काकासाहेब खाडिलकरांसंबंधीं–त्यांच्या लौकिक व वाङ्मयीन कार्यासंबंधीं–विचार करतांना मला असेंच दिसून आलेलें आहे कीं त्यांची तत्त्वनिष्ठा, त्यांची प्रसिद्धिपराङ्मुखता, त्यांच्या लिखाणांतील प्रखर तत्त्वतेज व त्यांची अबोलपणें कार्य करण्याची शक्ति ह्या सर्व गोष्टी त्यांचे ठिकाणीं मुरलेल्या अध्यात्मविचारांतून जन्माला आलेल्या होत्या. महाराष्ट्रांतील सर्व लोकोत्तर स्त्री-पुरुषांकडे पाहिल्यावर हेंच दिसून येतें : मूळच्या अध्यात्म विचारानें, पिढ्यानुपिढ्या चालत

आलेल्या अध्यात्मविचाराच्या शिकवणीनें तयार झालेल्या त्यांच्या मनोभूमींत समाज-सेवेचें रोपटें फार जोमानें फोफावलें आहे.

मला येथें इतर कार्यक्षेत्रांत लोकोत्तर कार्य केलेल्या महाराष्ट्रीयांच्या मनोभूमिकांचें परीक्षण करावयाचें नाहीं; मी केशवसुतांसंबंधीं बोलत आहें; व केशवसुतांसंबंधीं विचार करीत असतां मला असें दिसून आलें आहे कीं, त्यांच्या काव्यांतील जो विशेष लक्षणीय व आकर्षक असा भाग आहे तो त्यांच्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तींतूनच स्फुरलेला आहे. 'हरपलेलें श्रेय' शोधण्यासाठी त्यांची चाललेली धडपड, 'साध्याहि विषयांत मोठा आशय' पाहण्यासाठीं भिरभिरणारी त्यांची दृष्टि, 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' शब्दरूपांत पकडून ठेवण्याची त्यांना लागलेली हुररहूर, 'झपूर्झा' स्थितींत अनुभवास येणारा दिव्य निर्विकल्प आनंद चाखण्याची त्यांच्या मनाला लागलेली तहान, 'म्हातारी'ला उद्देशून

'अज्ञातामधला मूर्त तूं गमसी ध्वनि मजला;
अर्थ तुझा कोण मला तो देइल सांगोन ?
कळेल जर मज तो, तर जगीं भरला जो दिसतो
मी तो अंधार
लोपवूं शकेन साचार !

असे त्यांनीं काढलेले उद्‌गार, किंवा ह्याच 'म्हातारी'चें सत्य जरी आपणांस उमजलेलें नसलें तरी तिचे ठिकाणीं जें कांहीं अद्‌भुत वसत आहे

'प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें
तेथें स्वच्छंदें विचरतां मोद मना कोंदें'

अशी त्यांनीं दिलेली कबुली इत्यादि अनेक गोष्टी ह्या कशाच्या द्योतक आहेत ? त्यांच्या अंतरात्म्याला लागलेली अध्यात्माची भूकच ह्यांवरून सूचित होते. ह्या मूळच्या अध्यात्मप्रवण, सर्वांभूतीं एक तत्त्व पाहणाऱ्या, जीवनांतील परमतत्त्वाचा शोध घेऊं इच्छिणाऱ्या भूमिकेला जर फ्रेंच राज्यक्रांतींतून उदयास आलेल्या समता, बंधुता व स्वातंत्र्य ह्या तत्त्वत्रयीबद्दल जबरदस्त आकर्षण वाटूं लागलें तर त्यांत नवल तें काय ? अध्यात्मविचारांतून स्फुरलेली अद्वैताची शिकवण आणि पाश्चात्यांच्या संपर्कानें इकडे आलेली समता, बंधुता व स्वातंत्र्य ह्या तत्त्वत्रयीची शिकवण ह्या दोन परस्परपोषक शिकवणुकींचें केशवसुतांच्या मनोभूमिकेंत मधुर मीलन झालें आहे. पाश्चात्यांच्या ह्या शिकवणींतून पुढें जडवाद, सुखवाद व भोगवाद जन्माला आले : परंतु केशवसुतांच्या अध्यात्मप्रवण मनोभूमींत ह्या तत्त्वत्रयीची पेरणी होत असतां त्यांतून जडवाद किंवा भोगवादाचें रोपटें वर येण्याची भीतिच नव्हती. भोगवादाचा स्पर्शहि केशवसुतांच्या विचारांना होण्याचा संभव नव्हता. ह्या दोन परस्परपोषक

विचारसरणींच्या मंथनांतून केशवसुतांचा क्रांतिवाद मात्र जन्माला आलेला आहे. खऱ्याखुऱ्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तीला अन्याय, विषमता, पारतंत्र्य इत्यादि जीवनाला ग्रासणाऱ्या गोष्टींचा तिटकाराच असतो. ही दृष्टि जेव्हां जेव्हां आधिभौतिकाकडे वळते तेव्हां तेव्हां तिला प्रथम मानवाचें दुःख दिसतें. व जीवनांतील दुःखें कशानें निर्माण झालीं आहेत ह्याचा शोध घेण्यांतच ह्या मनाला स्वारस्य वाटत असतें; व हीं दुःखें मनुष्यनिर्मित असून त्यांच्या मुळाशीं माणसाची स्वार्थपरता आहे, अज्ञान आहे असें जेव्हां त्या मनाला आढळून येतें तेव्हां एकीकडे त्याला दुःख वाटतें तर दुसरीकडे त्वेषाचे कड येतात. केशवसुतांच्या काव्यांत आपणांस ह्या दोन्हीहि भावना पदोपदीं अनुभवावयास मिळतात. हरतऱ्हेचा अन्याय, हरतऱ्हेची विषमता, हरतऱ्हेचें दास्य, हरतऱ्हेची स्वार्थपरता पाहून त्यांचें हृदय एकीकडे पिळवटून जातें तर दुसरीकडे त्यामधून उफाळून बाहेर पडणाऱ्या शब्दांत त्यांच्या अन्तःकरणांतील संवेगाची भावना प्रगट होते. अनेकांच्या अव्यक्त दुःखांना वाचा फोडण्याचें कार्य केशवसुत करितात. 'अवकाशाच्या ओसाडींतील आजपर्यंत जे मुके पडसाद होते' ते आपल्या तुतारींतून निनादविण्याचें कार्य ते करितात. हेंच त्यांचें एक श्रेष्ठ कार्य आहे व म्हणूनच त्यांच्या ज्या 'गाण्यांतून' ह्या कार्याचे उर्जस्वल ध्वनि उमटले त्या गाण्यांचे शेकडो प्रतिध्वनि त्यांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांतील इतर कवींच्या काव्यांतून घुमले. आपलीं हीं 'गाणीं' ऐकून 'रूढींच्या दासांनीं' खवळावें अशीच केशवसुतांची मनीषा होती. केशवसुतांच्या मनाची उडी फार मोठी होती. यःकश्चित् गोष्टींनीं ह्या मनाचें समाधान होणें शक्यच नव्हतें. त्यांची प्रतिभा जीवनांतील वरवरचीं सत्यें बघत नाही; ह्या वरवरच्या सत्यांनीं सुखावत नाहीं. 'फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें' असे ते जे कलावन्तांच्या कार्यासंबंधी उद्‌गार काढतात ते त्यांच्या स्वतःच्या कार्याला सर्वथैव लागू पडतात. ते आत्मलक्षी कवि आहेत असें आपण नेहमींच म्हणतों. परंतु त्यांच्या काव्यांत जें दुःख व्यक्त झालेलें आहे, जो त्वेष व संवेग व्यक्त झाला आहे तो आपल्या व्यक्तिगत सुखदुःखांच्या विचाराने निर्माण झालेला नाहीं. केशवसुतांचा 'नवा शिपाई' म्हणतो,

'पूजितसें मी कवणाला ? तर मी पूजीं अपुल्याला
अपुल्यामध्यें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला;
'मी' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टीं हे लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख,

'नव्या शिपायाचे' हे उद्‌गार केशवसुतांना किती यथार्थपणें लागू पडतात ! आपल्या सुखदुःखांपेक्षा आपल्या भोवतालच्या जगाचें सुखदुःख केशवसुत आपल्या

काव्यांतून व्यक्त करितांना आढळतात. एवढचा तेवढचा गोष्टींनीं आपलें समाधान होत नसून आपली भूक फार मोठी असल्याची तेच ग्वाही देतात :

खादाड असे माझी भूक
चतकोरानें मला न सूख
कूपांतील सीं नच मंडूक
मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !

केशवसुतांच्या कवितांतील 'नवा शिपाई' ही कविता त्यांच्या व्यक्तित्वावर फारच चांगला प्रकाश टाकणारी आहे; परंतु ह्या कवितेच्या किंवा 'स्फूर्ति', 'झपूर्झा', 'तुतारी' इत्यादि त्यांच्या इतर उत्तमोत्तम कवितांच्या प्रकाशांत केशवसुतांचें जें व्यक्तित्व आपल्या नजरेस पडतें तें अध्यात्मप्रवण आहे, हें ताबडतोब लक्षांत येतें. त्याची अभिव्यक्ति होत असतांना तीमधून दुःखाचेच सूर अधिक घुमत असले तरी त्यांत रडवेपणा, दुबळीक, असहायता, शरणागति व्यक्त होत नसून त्वेष, आत्मसामर्थ्य-प्रतीति, बंडखोरी, सत्याभिनिवेश इत्यादि भाव प्रकट होतात, हें विसरून चालणार नाहीं. केशवसुतांची कविता ही 'रंडागीत' नाहीं.

'अस्मद्गान नव्हे 'गान'
तें गाना चिंध्यादान !

असें जरी ते 'भ्रमरा'ला उद्देशून म्हणत असले तरी त्यांत त्यांच्या काव्याच्या वास्तव रूपापेक्षां आपल्या समोर त्यांनीं ठेविलेल्या काव्याच्या भावोदात्त आदर्शाला आपली कविता उतरत नसल्याबद्दल त्यांच्या मनाला वाटणारी तळमळच अधिक व्यक्त होते. केशवसुतांच्या काव्यांत आपणांस हीच एक विशेष गोष्ट आढळून येते. त्यांना आत्मसामर्थ्याची यथोचित जाणीव असली तरी स्वतःच्या काव्यावर ते स्वतःच खूप नाहींत. त्यांची आध्यात्मिक भूक जशी सामान्य नाहीं तशीच त्यांची कलात्म वाङ्मयीन भूकहि सामान्य नाहीं; व आपल्या कृतींनीं तिचें समाधान होणें अशक्य आहे, जें साधतें आहे त्यापेक्षांहि अधिक वरचें असें साधलें पाहिजे अशी तळमळ केशव-सुतांच्या मनाला लागली आहे. क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास पाहून

हा ! हा ! हें जर सर्व भास धरतां येतील मातें तर
पृथ्वीचा सुरलोक की बनवुनि टाकीन मी सत्वर

असली हुरहूर त्यांच्या अंतर्मनाला सदैव लागलेली आहे.

अल्पसंतुष्टतेची किंवा आत्मसंतुष्टतेची बाधा ह्या त्यांच्या मनाला कधींच होत

नाहीं. हें मन सदैव असंतुष्ट आहे; व ही असंतुष्टता divine discontent च्या स्वरूपाची आहे.

कवीचा असामान्य आदर्श :

केशवसुतांनीं आपल्या नेत्रांसमोर उभा केलेला कवीचा आदर्श सामान्य नाहीं. हा आदर्श मोठा भव्योदात्त आहे; केशवसुत ज्या काळांत कविता लिहीत होते त्या काळांत प्रचलित असलेल्या काव्यादर्शाकडे पाहतांच त्याची अपूर्वाई व भव्योदात्तता अधिकच लक्षांत येते. कवि व त्यांचें कार्य हा केशवसुतांच्या मननाचा, चिंतनाचा विषय बनलेला होता. केशवसुतांच्या एवढ्याशा काव्यसंग्रहांत ह्या विषयावर लिहिलेल्या कमींत कमी तीस पस्तीस कविता सांपडतात. कांहींना हें मोठें चमत्कारिक वाटतें. त्यांत एक प्रकारचा दुबळेपणा वाटतो. मला तसें वाटत नाहीं. 'तें हें दिव्य कवित्व दुर्विधिवशें हीनत्व कीं पावलें' हें पाहून केशवसुतांना वाईट वाटतें. ह्या कवित्वाला त्याचें 'दिव्यत्व' परत मिळवून देणाचा प्रयत्न केशवसुत करीत होते; व म्हणूनच कवि व त्यांचें कार्य हे त्यांच्या सुदीर्घ चिंतनाचे विषय बनलेले होते. केशवसुतांच्या कवीला आणि कलावन्ताला केवळ स्थूल सत्याच्या दर्शनानें आनंद होत नाहीं; त्यांची धडपड आंतरिक सत्यें शोधून काढण्यासाठीं आहे. त्या सर्वांना हरपलेलें श्रेय शोधून काढण्याची हुरहूर लागलेली आहे. केवळ स्थूलामध्यें प्रकृतिशःच रंगून जाऊं न शकणाऱ्या त्यांच्या दृष्टीला दिव्य सत्यांचे अपूर्व भास मधून मधून होत असतात व ते अभिव्यक्त करण्यासाठीं त्यांची धडपड असते. स्फूर्ति, प्रतिभा, प्रतिभेचें कार्य इत्यादींचें केशवसुतांनीं कल्पिलेलें स्वरूप उर्जस्वल आहे. ज्या ज्या त्यांच्या कविता त्यांच्या एतद्विषयक चिंतनांतून जन्मलेल्या आहेत त्या त्या कवितांत त्यांनी वापरलेल्या प्रतिमा ('दिव्य ठिणगी', 'स्फूर्ति', 'कल्पकता', 'प्रतिभा', 'कविता') आपल्या दीप्तीनें वाचकांचे डोळे दिपवून टाकतील अशाच आहेत : कोठें 'स्फूर्तीचें यान' 'तेजाच्या उगमाकडे' प्रवास करितांना दिसत आहे, कोठें 'स्फूर्ति' हें स्थंडिल म्हणून कल्पिलेलें असून त्यामधील धगधगत्या ज्वालेला साक्षी ठेवून कवि हा उपाध्याय भाव आणि मूर्ति ह्यांचा विवाह लावतो आहे असें दृश्य आहे. प्रतिभा ही 'अत्युद्भुत गूढ शक्ति' 'देवांची जननी' आहे, तिचा संचार अंतःकरणांत होतांच आत्मा मुक्त होतो व अशा रीतीनें विमुक्त झालेला तो आत्मा

'मुक्तात्मा गगनीं उडे, बिथरतो ईंद्राश्व तें पाहुनी
दैत्यांचें बल, देवसत्त्वहि तसें अंगीं चढे त्या क्षणीं
सायुज्यत्व विराट पूरुष अहा! देतो स्वयें लौकरी'

ह्या दिव्य शक्तीच्या हिरण्मय मंडलावर देव आपल्या बोथटून गेलेल्या जुन्या शस्त्रांना धार लावून घेतात व दानव त्यांजकडे कीटकाप्रमाणें आकृष्ट होऊन 'पतंगापरी नाशा-

प्रती पावती.' हिचा संचार झाल्याबरोबर पिंडीं ब्रह्मांड विलोपून जातें; शब्दब्रह्म उचंबळून दाही दिशा व्यापतें व मग त्यांतून जे भविष्यनाद निघतात त्यांनीं प्रत्यक्ष सृष्टिरचना करणाऱ्या ब्रह्मदेवाला देखील 'नवीन-रचना कार्य' करावयास 'सामर्थ्य' लाभतें. प्रतिभावान मनुष्याचे अंगीं एकाच वेळीं दैत्यांचें बल व देवसत्त्व असतें, त्याची ममत्व-भावना लुप्त झालेली असून त्याला भूतमात्रांत परब्रह्म दिसत असतें व त्याचे शब्द, त्याच्या कृती नव-रचना-कार्य करावयास लोकांना प्रवृत्त करितात, अशी केशवसुतांची कल्पना होती. केशवसुतांनीं आपल्या डोळ्यांपुढे ठेविलेल्या कलावन्ताचा सत्य, शिव व सुंदर ह्या त्रिपुटीवरील विश्वास किती अढळ होता ह्याची कल्पना वरील वर्णनावरून येऊं शकते. जें जें अ-शिव आहे, अ-सुंदर आहे, अ-सत्य आहे तें तें नष्ट करण्यासाठीं जें दानवांचें बल आवश्यक असतें त्याचा आढळ केशवसुतांनीं कल्पिलेल्या कलावंताच्या ठिकाणीं दिसून येतो. (केशवसुतांच्या कवितेंत भोवतालच्या अशिवाविरुद्ध त्यांनीं चढविलेला हल्ला जो आपणांस दिसून येतो तो ह्या भूमिकेशीं किती संबद्ध आहे व केशवसुतांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवलेला कलावंताचा आदर्श व स्वतः केशवसुत ह्यांत अनेक बाबतींत कशी अभिन्नता दिसून येते ह्याबद्दलचे विचार येथें आपल्या मनांत आल्यावांचून राहात नाहींत.) कलावंताचे ठिकाणीं असणारी प्रमुख शक्ति जी कल्पकता तिची मूर्ति कल्पितांना केशवसुतांना तिच्या विशाल भालप्रदेशाचें विस्मरण झालेलें नाहीं– कलावंताच्या कल्पनाशक्तीला प्रदीर्घ विचारांचें पाठबळ असतें असेंच येथें केशवसुतांना सुचवावयाचें आहे : म्हणूनच तिचे शोधक नेत्र, तीक्ष्ण कर्ण ह्यांजबरोबरच तिचा विस्तीर्ण भालप्रदेशहि त्यांनीं वर्णिलेला आहे. ती वस्त्र विणीत असून तिनें विणलेलें तें 'वस्त्र लेववितांचि त्या वृद्ध वसुधेवरि पहा ! तारुण्य ओथंबलें' असें त्यांनीं म्हटलें आहे. कल्पनाशक्तीच्या द्वारां कलावंतानें अभिव्यक्त केलेलें सत्य हें सुरूप बनून कसें अवतरत असतें, कलेची किमया होतांच सत्याला कसें सुंदर रूप प्राप्त होतें तें केशवसुतांनीं येथें जणूं स्पष्ट केलें आहे. 'तारकांच्या द्युतिबलानें' आपलें काव्य लिहिणारा कवि हा 'वृद्ध' वसुंधरेलाहि 'तरुण' बनवितो.

'पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तुप्रती द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या'

कवीच्या कार्याचें वर्णन करितांना ते म्हणतात,

श्वासोच्छ्वास करी परी नवल हें : जीवित्वसंहारक
वायू घेउनि आंत, तो त्यजितसे वायूस त्या पोषक !
राही तो, तर देव भूमिवरती येतात हिंडावया,
जातां स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागि धुंडावया !

केशवसुतांचा कवि हा द्रष्टा आहे, 'त्याला धोंड्यामधूनहि दिसतें आहे', 'दिक्कालांतुनि आरपार अमुचि दृष्टि पहाया शके',

'अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया
जीव निर्जीवांतलाहि नेमिलें पहावया'

तो नरजातीचा शक्तिवान् नेत्र आणि कर्णच आहे,

'ऐकती न बघती न जें जन
गम्य होयचि कवीस तें पण',

अव्यक्ताला व्यक्तता देणारा,

'अवकाशाच्या ओसाडींतील
पडसाद मुके जे आजवरी'

ते सत्वर 'वाचाल' करणारा, धूमकेतूप्रमाणें स्वयंप्रकाशी, अप्रतिहत गतीनें सर्वत्र फिरणारा व जगांतील महाक्रांतीचें भविष्य सांगणारा भविष्यवादी आहे. बुळबुळीत शब्दांचीं गिळगिळीत भावगीतें–केशवसुतांच्या शब्दांत 'मिळमिळीत रंडागीत'–करणें हें त्यांचें कार्य नाहीं. त्याच्या शब्दांच्या ठिकाणीं अपूर्व सामर्थ्य आहे. कविमुखांतून बाहेर पडणाऱ्या शब्दांची शक्ति केशवसुतांनीं अनेक ठिकाणीं वर्णिलेली आहे. हाहि केशवसुतांचा प्रदीर्घ चिंतनाचा विषय झाल्यासारखा दिसतो. 'हें जग उलथविण्याची शक्ति' शब्दांत आहे. शारदेचा देव्हारा आपल्या स्कंधावर उचलून गगनांतून भराऱ्या मारीत चाललेली शब्दपंक्ति ही 'तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवीत' चाललेली आहे असें त्यांना दिसतें. 'आपली चित्तभूमि विकसित हिरवी' दिसतांच त्या तेजाचे पंख हालवीत चाललेल्या शब्दपंक्तींनीं तो शारदेचा देव्हारा गौरवून आपल्या अंतःकरणांत स्थापन केला; आपण त्या शब्दपंक्तींना बरोबर घेऊन मग आपल्या 'हृदयवनामाजी संचार केला' व 'कल्पपुष्पें खुडुनि नमुनि तीं वाहिलीं शारदेला' व ह्या 'शब्दांच्या कूजितानें सहजचि मम हृत्प्रांत गुंगूनि गेला' असें ते म्हणतात. ह्या शब्दांचें सामर्थ्य अपूर्व असून त्यांच्या साहाय्याशिवाय वाग्देवीचें भजन आपल्याला साधणेंच अशक्य आहे व दरम्यानच्या कालांत तर 'गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी दूर देशास गेले' अशी त्यांना जाणीव होते व म्हणूनच 'शब्दांनो! मागुते या!' अशा आर्त स्वरानें ते शब्दांची आळवणी करितात. माणूस मूळचे विशुद्ध भाव आणि विचार व्यक्त करण्यासाठीं निर्मिले गेलेले हे शब्द मळवितो. त्यांना विशुद्ध केल्याशिवाय त्यांचा काव्यांत उपयोग होऊं शकत नाहीं. एवढ्यासाठीं 'वातचक्र' ह्या कवितेंत केशवसुत म्हणतात,

'वाग्देवी गे! दे शब्दांतें
भोवऱ्यांत या फेकुनि, त्यांतें

जरा जाउं दे निजधामातें
नरें मळविलें अहह ! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत ! '

व शेवटीं तर

' जगद्द्रुमाचें पिकलें पर्ण
गलित असें मी अगदीं जीर्ण;
तर भर भर भर उडूं द्या मला शब्दासंगें स्वर्गात '

अशी आपली मनोमन इच्छा व्यक्त करितात.

वर वर्णिलेला जो भव्योदात्त आदर्श केशवसुतांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेविला होता तो त्यांच्या मनोवृत्तीशीं जमेल असाच होता. केशवसुतांची सगळी कविता ह्या आदर्शाला उतरेल अशी अर्थात् नाहीं. त्यांतील कांहीं थोडीफार पारंपारिक स्वरूपाची आहे; कांहींवर इंग्रजी कवितेची जबरदस्त छाप आहे. . . . परंतु केशवसुतांची कविता म्हणून आपण जेव्हां त्यांच्या काव्याचा विचार करितों तेव्हां त्यांची ही कविता आपल्या डोळ्यांपुढें येत नाहीं. एवढेंच नव्हे तर केशवसुतांची निसर्गाच्या प्रेमाची आणि स्त्री-प्रेमाची महती गाणारी जी कविता आहे तिचीहि आठवण आपणांस फारशी होत नाहीं. त्याचें कारण असें; केशवसुतांच्या निसर्गप्रेमांत बालकवींच्या निसर्ग-प्रेमासारखा सहजस्फूर्तीचा भाग नाहीं. त्यांचा निसर्ग हा पुष्प, भ्रमर, फुलपांखरूं, दवाचे थेंब, सायंकाळ, एक खेडें ह्यामध्येंच सामावलेला आहे. ते निसर्गाकडे वळतात तेहि तत्त्वचिंतकाच्या दृष्टीनेंच. त्यांत निसर्गाच्या सान्निध्यांत बालकवींना जो सहजानंद होतो त्याचा भाग फारसा नाहीं.

' पुष्पामधें प्रकट होय न जें जराही
सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं
ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजनांत
नाहीं निगूढ इतिहास असा जगांत

एवढेंच त्यांचें निसर्गाबाबत म्हणणें आहे. जीवनाचा अर्थ शोधून काढीत असतांना केशवसुत मानवाबरोबरच निसर्गाचें चिंतन करितात. मानवाला निसर्गापासून शिकण्या-सारखें पुष्कळ आहे हीच त्यांची ह्या कवितेमार्फत शिकवण आहे :

' पुष्पीं गुण जे तुजसी
आढळले, तुजमध्यें कितिक त्यांतुनी ?–
बा, घेइं पाहुनी ! '

एवढेंच त्यांना म्हणावयाचें आहे. ह्या निसर्ग-कवितेंत अर्थात् केशवसुतांचें वैशिष्ट्य नाहीं. तिच्यांतहि जर कांहीं सौदर्यस्थलें असलीं तर तीं त्यांच्या निसर्गप्रेमानें निर्माण केलेलीं नसून त्यांच्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तीनेंच निर्माण केलेलीं आहेत.

त्यांचें स्त्री-प्रेम :

केशवसुतांच्या स्त्री-प्रेमाची महती गाणाऱ्या गीतांचीहि तीच स्थिति आहे. हीं गीतें केशवसुतांच्या एकंदर काव्यसंग्रहांत तिसांच्या वर असतील. त्यांतहि प्रत्यक्ष अनुभव आणि अनुकरण ह्या दोन्हींचाहि भाग आहे. आपल्या पत्नीच्या वियोगामुळें म्हणजे पत्नीपासून दूर जावें लागल्यामुळें, दूर राहावें लागल्यामुळें जो अनुभव आला त्याचें चित्र केशवसुतांनीं प्रामाणिकपणें रेखाटलेलें असलें तरी त्यांत वैशिष्ट्य असें फारसें कांहीं नाहीं. स्त्री-प्रेमाची महति केशवसुत वर्णितात, परंतु प्रेमानुभवाचें वर्णन करितांना त्यांत वारंवार पुनरुक्ति होते. ह्या प्रेमानुभवाच्या विविध भाव छटा ते रंगवूं शकत नाहींत. कारण ते जसे निसर्गांत निसर्ग म्हणून रंगून जाऊं शकत नाहींत, त्याच्या सान्निध्यांत सहजानंद, निर्भेळ निसर्ग-सान्निध्याचा आनंद उपभोगूं शकत नाहींत, तसेंच प्रेमानुभवांतहि मश्गुल होऊं शकत नाहींत. कवितेपेक्षांहि ते प्रीतीला जीवनांत अधिक महत्त्व आहे असें सांगत असले, प्रीति ही बाजारांत मिळत नसून 'पहा शोधुनी हृदयां'त असें बजावीत असले,

कालें आणिक कष्टदशेनें
क्षीणत्वाला होतें जाणें
सगळयांचेंहि, परि प्रीतिचा
जोम वाढतो उलटा साचा

असें प्रीतीचें तत्त्वज्ञान सांगत असले तरी त्यांत प्रेमाची महति गाण्याचा संकेतच अधिक प्रबलंविलेला दिसतो. केशवसुतांनीं गायिलेलीं 'वियोगाचीं गाणीं' हींच काय तीं प्रत्यक्षानुभूतींत स्फुरलेलीं वाटतात. परंतु वरच म्हटल्याप्रमाणें त्यांत तेच ते अनुभूतीचे सूर वरचेवर आळविलेले आढळतात. केशवसुत आपल्या ह्या 'वियोगांच्या गाण्यां'त मीलनाचे वेळीं अनुभवास येणाऱ्या विविध सुखांची उजळणीच करीत बसतात. त्यांत चुंबन, आलिंगन इत्यादींनीं मिळणाऱ्या सुखांचें वर्णन परत परत येतें. त्यामुळें केशवसुतांची ही स्त्री-प्रेमविषयक कविता काव्यवाचनापासून जो खराखुरा आनंद व्हावयास पाहिजे तो रसिकांना देऊं शकत नाहीं. तिच्यांत पुष्कळ ठिकाणीं केवळ कल्पना-चमत्कृतीचा भागहि आढळल्याशिवाय राहत नाहीं. अशा ठिकाणीं कवितेंतील चतुर-वचनामुळें आनंद होत असला तरी तो खराखुरा काव्यानंद असत नाहीं; तो लेखकाचें कल्पनाचातुर्य लक्षांत आल्यानें झालेला आनंद असतो. मराठींत ही असल्या प्रकारची प्रेमविषयक कविता केशवसुतांच्या नंतर पुष्कळच जन्मास आली. सारांश, केशवसुतांच्या ह्या स्त्री-प्रेमविषयक कवितेंत प्रेमानुभवाचें व प्रेमाच्या महतीचें वर्णन–तेंहि बरेंचसें–सांकेतिक आहे; प्रेमानुभवाचें प्रत्यक्ष दर्शन असें फारसें नाहीं; जें आहे त्यांतहि वैशिष्ट्य असें फारसें नसल्यामुळें तें आपलें चित्त वेधून घेऊं शकत नाहीं. केशवसुतांच्या ह्या प्रेमविषयक कवितेला महत्त्व द्यावयाचें तें एवढ्याचसाठीं कीं स्वस्त्रीविषयक

का होईना, परंतु आपली ही प्रेमभावना मोकळेपणानें प्रगट करणारे, व तिच्यांत केवळ वासनिक भागापेक्षा वरचा असा विशुद्ध भावनेचा कांहीं भाग आहे ह्याची कल्पना देणारे ते पहिले मराठी कवि होत. तेव्हां त्या दृष्टीनें पाहतां मराठी प्रेमविषयक कवितेच्या इतिहासांत तिला निःसंशय स्थान आहे. तिच्यांत थोडा अतिरंजितपणाचा भाग असला तरी कविमनाचा दुबळेपणा तद्द्वारां व्यक्त होतो असें दिसत नाहीं.

तेव्हां निसर्गाची किंवा स्त्रीप्रेमाची महति गाणारी कविता ही केशवसुतांची खरी कविता नव्हे. केशवसुत तद्द्वारां डोळ्यांत भरत नाहींत. त्यांचें खरेंखुरें व्यक्तित्व ह्या कवितेंतून उमलून येऊं शकत नाहीं. तें 'हरपलेलें श्रेय', 'झपूर्झा', 'वातचक्र', 'म्हातारी', 'नवा शिपाई', 'कोणीकडून-कोणीकडे', 'स्फूर्ति', 'तुतारी' 'सतारीचे बोल', 'मूर्तिभंजन', 'तहान भूक आरंभीं नव्हती', 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास' इत्यादि छोट्या मोठ्या कवितांतून किंवा त्यांचें काव्यविषयक तत्त्वज्ञान अभिव्यक्त करणाऱ्या कवितांतूनच खरें प्रगट होतें. त्यांच्या अध्यात्मप्रवण मनाचा खरा विलास ह्या कवितांतूनच पाहावयास मिळतो.

'फोलें पाखडितां तुम्ही निवडितों तें सत्त्व आम्ही निकें,

असें केशवसुत म्हणतात तें बरोबरच आहे. ते फोलपटांतील सौंदर्य पाहूंच शकत नाहींत किंवा त्यानें आनंदूनहि जाऊं शकत नाहींत. त्यांचे नेत्र आंतरिक सत्त्वाचाच शोध करीत असतात. परंतु फोलपटांतहि सौंदर्य नसतें असें नाहीं. हें आकृतीचें, रंगाचें, रूपाचें, स्पर्शाचें, गंधाचें, नादाचें, विविध कोमल भावांचें स्थूल सौंदर्य केशवसुत आस्वादूं शकत नाहींत. परंतु असेहि कित्येक कवि असतात कीं ते अंतःसौंदर्याचा जसा शोध घेऊं शकतात तसेंच जीवनाच्या बाह्यांगावर तुकतुकणाऱ्या ह्या विविधरंगी व ढंगी सौंदर्याचेंहि दर्शन घडवूं शकतात. शेक्सपियर, कालिदास व ज्ञानेश्वर ह्यांच्या बाबतींत ही गोष्ट दिसून येईल. त्यांच्या काव्याच्या द्वारां जीवनाचें स्थूल जसें लक्षांत येतें तसेंच सूक्ष्म हेंहि लक्षांत येऊं शकतें. ज्ञानेश्वर जीवनांतील आंतरिक सत्यांचा एकसारखा शोध घेत असतांना व तीं प्रगट करितांना दिसतात. परंतु ते तीं सत्यें ज्या प्रतिमांच्या किंवा कल्पनाचित्रांच्या द्वारां प्रगट करितात त्या प्रतिमा मनावर उमटत असतांना जीवनांतील कितीतरी स्थूल सौंदर्य, स्थूल सत्यें तद्द्वारां प्रगट होत असतात. केशवसुतांना हें जमत नाहीं. त्यांच्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तीला हें स्थूलांतील विविधरंगी सौंदर्य अवलोकण्याचें, त्यानें वेडें होऊन त्यांत रंगून जाण्याचें, त्यांचीं विविधरंगी चित्रें रंगविण्याचें समाधान लाभणें प्रकृतिशः अशक्य आहे; म्हणूनच त्यांना निसर्गाचें सौंदर्य बालकवींप्रमाणें जाणवलें नाहीं. तत्त्वचिंतन करणें, जीवनांतील दुःखाचा अर्थ शोधून काढणें, सत्तत्त्वांच्या आड येणाऱ्या गोष्टींचें भंजन कसें होईल ह्याचा विचार करणें, आत्मशुद्धी आणि खराखुरा आत्माविष्कार कसा करितां येईल ह्याबद्दल तळमळ वाटणें, प्रत्यक्षांतून परोक्षांत जाण्याची मनानें एकसारखी धडपड करणें, आपल्या

आत्म्याच्या कक्षा वाढवीत वाढवीत त्याला परमात्मरूप बनविण्याचा प्रयत्न करणें, त्या स्थितीचा अनुभव व आस्वाद घेऊन तिच्यांतील आनंद चाखणें हाच त्यांचा खरा धर्म. हें साधलें तर मग सगळें साधतां येईल हाच त्यांचा विश्वास. ह्याच व्यापक ज्ञानानुभवानें त्यांनीं 'तुतारी' फुंकलेली आहे. म्हणूनच तिनें निर्माण केलेल्या नादाचे अनेक पडसाद उमटले. केशवसुतांचें सामाजिक तत्त्वज्ञान हें एखाद्या जडवाद्याचें सामाजिक तत्त्वज्ञान नाहीं. सर्व प्रकारची विषमता नष्ट व्हावी, 'मजुरावर उपासमारीची वेळ' येऊं नये असें त्यांस वाटतें त्यांत केवळ तेवढाच आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक विचार नाहीं.

तेच पतित कीं जे आखंडिती प्रदेश साकल्याचा
. . . . . .
जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत
. . . . . .
'मी' हा शब्दच मजला नलगे, संपुष्टीं हें लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख !

हाच प्रबल विचार त्या सर्व सामाजिक, आर्थिक, समतेच्या तत्त्वज्ञानामागें आहे. हा विचार त्यांच्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तींतून स्फुरलेला स्वयंभू विचार आहे, व त्या विचारानेंच त्यांची उत्कृष्ट कविता निर्माण झालेली आहे. व म्हणनच केशवसुतांच्या ह्या काव्यांत एवढें प्रचंड सामर्थ्य आलेलें आहे. हेंच केशवसुतांचें खरें काव्य होय. केशवसुतांच्या कवितेंत जें टिकून राहील असें वाटतें तेंहि हेंच होय.

(साहित्य, ऑक्टोबर १९४९;
पृ. क्र. ५–१३)

२५

पुन्हा केशवसुत

लेखक : वसन्त कानेटकर, एम्. ए.

कै. केशवसुतांच्यावर आतापर्यंत मराठी टीकासाहित्यांत इतकी विपुल चर्चा झालेली आहे कीं 'पुन्हा केशवसुत' उगाळण्याचें कारण उरलें आहे कीं काय असा प्रथमच प्रश्न निर्माण होतो. आजचा काळ नवकाव्याच्या विकासाचा आणि विलासाचा आहे. याच वेळीं जुन्या कवींचें, काव्यांचें, आणि परंपरांचें पुनर्मूल्यमापन व्हावें हा टीकाशास्त्रांतला एक संकेत आहे. परंतु माझ्यापुरतें तरी हें नुसतें निमित्त आहे याची मला जाणीव आहे. केशवसुतांचा अभ्यास करतांना आणि नवकाव्याचें स्वरूप न्याहाळतांना जे विचारतरंग मनांत डोकावले ते सुज्ञ वाचकांच्या आणि विचारवंतांच्या चिकित्सेसाठीं मी मांडीत आहें.

या प्रयत्नाला आणखीहि एक कारण आहे. सामान्यतः काव्य आणि टीका या दोन्ही कलांचा उत्कर्ष बरोबरीनें होत असतो. परंतु काव्याची परंपरा साक्षात्काराची तर टीकेचा मार्ग संशोधनाचा असल्यानें, टीकाकार जर कवीचा समानधर्मा होऊं शकत नसेल तर काव्याच्या गरुडभरारीपुढें टीका नेहमीच कासवाच्या पावलानें रखडूं लागते. त्यामुळेंच अभिजात काव्यसौंदर्य हें टीकेचें चिरंतन लक्ष्यस्थान होऊन राहात असल्यास नवल नाहीं. कवीप्रमाणेंच टीकाकाराला परिस्थितीच्या आणि प्रकृतिधर्माच्या कुंपणाशीं सतत झुंज द्यावी लागते. महान् कलाकृतींतील अबोध सौंदर्यावर स्वामित्वाचा झेंडा लावण्याची मक्तेदारी कोणत्याहि कालांतील एका टीकाकाराला वा टीकासंप्रदायाला मिळालेली नाही. असें असूनहि कलेंतील एव्हरेस्टवर

मात करणारे सौंदर्य-शोधकांच्या तुकडींतील बहाद्दर किती ? असा, प्रश्न केला तर केशवसुतांच्या भाषेंत "सनदी तेथे कोण वदा ? । हजारांतुनी एखादा ।" असेंच उत्तर द्यावें लागतें. कलेच्या क्षेत्रांत मार खाऊन पळालेले वीर टीकाकाराची कफनी घालून जुन्या निकषांचा जप करीत पुन्हा प्रवेश करिते झाले कीं पोकळ पांडित्य आणि पोटभरूपणा यांचाच सुकाळ व्हायचा. अशा कफनीवहाद्दर टीकाकारांच्या हिशेबीं संशोधन म्हणजे विद्वज्जड पांडित्य (तें बहुधा 'परोपदेशे 'च असतें–), चिकित्सा म्हणजे पाठभेदांचा चिवडा, मीमांसा म्हणजे अन्वयार्थ, आणि रसग्रहण म्हणजे विस्तार-पूर्वक वर्णन अशा समस्या पडून गेलेल्या असतात. कै. केशवसुतांवर आतांपर्यंत विपुल टीकासाहित्य निर्माण होऊनही त्यांच्या कवितांचें पुनर्मूल्यपमापन झालें पाहिजे असें वाटतें तें यामुळेंच.

आधुनिक मराठी काव्याच्या जन्मकाळीं घडलेल्या क्रांतीला केशवसुत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत झाले ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे. परंतु टीकाकारांच्या या क्रान्तिविषयक कल्पनांमध्यें इतकें वैचित्र्य आणि विरोध आहे कीं परस्पर छेद जातां 'क्रांति' या शब्दाला शब्दापलीकडे अर्थच उरत नाहीं. कै. भिडे यांना ती उत्क्रांन्ति वाटते, तर श्री. माडखोलकरांना त्यांत कविमनाच्या विकृतीचा आणि अधोगतीचा इतिहास दिसतो. कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांना काव्याचे विषय आणि आविष्काराची पद्धति यांत मूलग्राही फरक दिसतो, पण त्याचें श्रेय ते केशवसुतांना द्यायला तयार नाहींत; तर प्रा. जोग हे ही क्रान्ति वाङ्मयीन होती असें सांगून काव्यप्रकार आणि तंत्रप्रकार यांवर बोट ठेवतात.

लोकहितवादींपासून आगरकरांच्यापर्यंत (केशवसुतांच्या आधीं आणि नंतर) अनेक विचारवंतांनीं निबंध-भाषणांच्या रूपानें तत्कालीन सामाजिक दुःखें वेशीवर टांगून सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला असल्यानें केशवसुतांनीं सामाजिक क्रान्ति केली या म्हणण्याला कांहीं अर्थ उरत नाहीं. समाजामध्यें उठणारीं वावटळें आणि होणारे फेरबदल यांना ललितलेखक व्यावहारिक दृष्टीनें कितपत कारणीभूत होऊं शकतो हा प्रश्न दूर केला तरी केशवसुतांच्या कवितांचे विषय न्याहाळून सामाजिक क्रान्तिकार-काचें विरुद त्यांना बहाल करणें धोक्याचें आहे. या प्रकारच्या प्रयत्नाच्या प्रतिक्रियेंतूनच केशवसुतांनीं घडणाऱ्या क्रान्तीचे आपल्या काव्यांतून फक्त पडसादच उमटविले, हें मत फैलावलें. आणि त्यांतूनच कविवर्य तांब्यांच्यासारख्या रसिक कवीनेंही 'केशवसुत हा सामाजिक तत्त्वज्ञान पद्यामध्यें मांडणारा पद्यकार होता' असा शेरा झाडला. केशवसुतांच्या आंधळ्या प्रीतीनें त्यांना सामाजिक क्रान्तीचें बिरुद बहाल करणाऱ्या विचारवंतांवर येणारी ही अनवस्था त्यांच्याच क्रान्तिविषयक चुकीच्या समजुतीचा परिपाक आहे यांत शंका नाहीं. या अनवस्थेला भिऊन ललित कलांच्या सामर्थ्या-बद्दल माफक मूल्यें बाळगणारे टीकाकार दुसऱ्या टोकाला जातात आणि ही क्रान्ति केवळ काव्यप्रकारांत घडली असा दावा मांडून पोटभरूपणाच्या पांघरुणाआड दडून

जातात. साहजिकच कै. पटवर्धनांनीं उपस्थित केलेला प्रश्न निर्माण होतो, कीं काव्यप्रकारांतील क्रान्ति केशवसुतांवांचून अडून राहिली असती कीं काय ? काव्य-प्रकारांतील जातिरचनेच्या प्रयोगाला शाहीरांच्या काळींच आरंभ झालेला होता. फार तर इंग्रजी काव्यपरिशीलनानें केशवसुतांनीं मराठींत आणलेले कांहीं प्रकार दुसऱ्या कोणी तरी जरा उशीरा आणले असते इतकेंच. मग ही क्रान्ति घडली तरी कसली ? या प्रश्नाला उत्तर द्यावयाचें म्हणजे असें पोटभरूपणानें दडून वा नुसतेंच उत्साहानें उचंबळून येऊन चालणार नाहीं. त्यासाठीं केशवसुतांच्या कवितांचें अंतरंग रसग्राही पण चोखंदळ दृष्टीनें तपासलें पाहिजे.

केशवसुतांच्या काव्यांत अनेक तत्कालीन सामाजिक दुःखें त्वेषानें व्यक्त झालीं आहेत ही गोष्ट खरी आहे; आणि सामाजिक सुधारकांप्रमाणे त्यांनाहि समाज-जीवनांत कांहीं बदल अभिप्रेत होता हेंहि मान्य करावयास हवें. परंतु म्हणून सामाजिक सुधारणांचा पुकारा काव्यांतून करणारे केशवसुत हे प्रचारकी कवि होते हा निष्कर्ष मात्र अज्ञानमूलक आहे. सामाजिक सुधारकांनीं सुधारणांचा जो हिरीरीनें गवगवा केला तो निव्वळ सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टिकोनांतून. याउलट केशवसुतांच्या काव्यांतील त्यांचा आविष्कार हा कविमनाच्या सौंदर्यवादी प्रवृत्तींतून झालेला आहे. समाज आणि व्यक्ति यांना बांधणारे नीतिनियम उपयुक्त असावेत असा सुधारकांचा दृष्टिकोन, तर उपयुक्त नीतीहि 'सुंदर' असली पाहिजे हा सौंदर्यावादी कविमनाचा आग्रह. पतिपत्नींवर सामाजिक दडपणाने वा कायद्यानें लादलेली एकनिष्ठा आणि त्यांच्या उज्ज्वल प्रीतींतून निर्माण होणारी एकनिष्ठा, सामाजिक दृष्टीने सारखीच उपयुक्त असली तरी, दुसरी अधिक सुंदर आणि म्हणून श्रेष्ठ आहे. सुधारक आणि सौंदर्यवादी यांतील फरक मूलभूत आहे. सुधारकांचा संबंध समष्टिजीवनाशीं प्रामुख्यानें असल्यानें त्यांच्या चळवळींचें स्वरूप नेहमींच सनदशीर आणि व्यापक पण तत्कालिक राहिलें. सौंदर्यवादी कवि नेहमीच व्यक्तिजीवनाला आणि व्यक्तिमत्त्वाला आपली प्रयोगशाळा मानीत असल्यानें समाजाला आलेली अवकळा बदलण्यासाठीं 'नवा मनुष्य आणि नवीं मूल्यें' घडविण्याच्या धडपडींत असतो. या अर्थानें सौंदर्यवादी विचारवंतांचा लढा सामाजिक दुःखांशी नसून तीं निर्माण करणाऱ्या व्यक्तिजीवनाच्या खुरटेपणाशीं असतो. व्यक्तिजीवनाचा आणि मनाचा खुरटेपणा हा सामाजिक दुःखांचा गाभा आहे अशी त्यांची नेहमींच श्रद्धा असते. स्वार्थपरायणता, ज्ञानविद्वेष, आणि सुखलोलुपता यांतून निर्माण होणारा खुरटेपणा नाहींसा करण्यासाठीं इतिहासकालांत अध्यात्मवादी योगमार्गानें, संत संप्रदायी भक्तिमार्गानें आणि आधुनिक कालांत सौंदर्यवादी विविध कलांच्या साहाय्यानें व्यक्तिजीवन उजळण्याचा प्रयत्न करीत आलेले आहेत. या दृष्टीनें अध्यात्मवादी, भक्तिमार्गी आणि सौंदर्यवादी यांच्या साधनांत आणि दृष्टिकोनांत कितीही फरक असो, त्यांचें ईप्सित एकच आहे, असा सूक्ष्म चिकित्सकास प्रत्यय येतो. जुन्या संतांच्या अभंगवाङ्मयांत आणि आधुनिक

भावकवींच्या काव्यांत जो दुवा सापडतो तो केवळ 'आत्मलेखनाचा' नसून तज्जन्य व्यक्त झालेल्या 'आत्मविकासाच्या धडपडींत' आहे यांत शंका नाहीं. अध्यात्मवादी भक्तिमार्गी आणि सौंदर्यवादी यांचीं सांधनें आणि ईप्सितें यांतील तुलना या दृष्टीनें उद्‌बोधक आणि मनोरंजक असली तरी या ठिकाणी अप्रस्तुत आहे.

मात्र सौंदर्यवाद्यांचा मार्ग म्हणजे उठवळ खुशालचंदांचा मार्ग नव्हे हेंहि स्पष्ट करणें जरूर आहे. मराठी साहित्यांत उपभोगाला धर्म मानणाऱ्या सौंदर्यवादी कलावंतांचा सुळसुळाट झाल्यानें खऱ्या सौंदर्यवादी कलावंतांचा वर्ग असल्या नकली सौंदर्यवाद्यांपासून वेगळा काढावा लागतो. असले नकली सौंदर्यवादी हे खऱ्या अर्थानें सौंदर्यवादीच नसतात, तर मूलतः विलासवादी आणि भोगवादी असतात. त्यांची विविध कलांची आणि ज्ञानांची उपासना आत्मिक उन्नतीसाठी नव्हे तर भोगमय सुखासाठीं चाललेली असते. असे कलावंत वृत्तीनें नेहमीं आत्मनिष्ठ असतात, पण ते कधींच अन्तर्मुख होऊं शकत नाहीत. अन्तर्मुखतेंतून आत्मपरीक्षण आणि आत्मपरीक्षणांतून आत्मविकास या मार्गानें खरा सौंदर्यवादी, संवेदनक्षम कविवृत्ति, बालकाची निरागस मनोवृत्ति आणि साधुसंतांची अनासक्ति यांची जोपासना करीत असतो. केशवसुतांच्या कविता वाचतांना याच वृत्तीचा प्रत्यय येतो; म्हणून त्यांच्या काव्यांतून व्यक्त झालेला सौंदर्यवाद हाच त्यांचा क्रान्तिवाद होता असें वाटूं लागतें.

केशवसुतांच्या कांहीं गाजलेल्या कवितांचें धावतें पण डोळस परीक्षण केलें तर याच गोष्टीची साक्ष पटेल. उदाहरणार्थ, त्यांची "सतारीचे बोल" हीच कविता पाहावी. सामान्य माणसावर संगीताचा किती उत्कट परिणाम होतो तें कवीनें या कवितेंत फार मार्मिकपणें दाखविलें आहे, असा शेरा मारून टाकण्यापलीकडे या कवितेची अजून सखोल मीमांसा झालेली नाही. वस्तुतः सतारीचे बोल कवीनें ज्या संगीतकलेच्या बोधचिन्हासाठीं वापरले आहेत ती संगीतकलादेखील या कवितेंत सर्व कलांच्यासाठीं आणि पर्यायानें सौंदर्यवादासाठीं प्रातिनिधिक स्वरूपांत उभी असलेली दिसून येईल. कला, मग ती संगीत असो वा काव्य असो, तिचा स्पर्श जडवादानें आंधळया झालेल्या आणि सामान्य स्वार्थ-अहंकारानें लडबडलेल्या पोटभरू वृत्तीच्या सामान्य माणसास होतांच ती कोणती किमया करूं शकते तें भावपूर्ण रीतीनें चित्रित करण्यांत केशवसुतांनीं पहिल्या दर्जाची प्रतिभा व्यक्त केली आहे. काळोख्या रात्रीं विमनस्कपणें रस्त्यांत रेंगाळणारा, हृदयाला अनेक वैफल्यांच्या खंती लागलेला, आणि स्वतःवर आणि जगावर अकारण कावलेला कवि, व्यावहारिक सुखदुःखांच्या खालीं गाडलेल्या सामान्य माणसाचें प्रतीक वाटतो. हा जीव अंधारांत चाचपडत जात असतांना त्याला अचानक सतारीचे सुन्दर बोल ऐकूं येतात आणि त्याच्या जीवनकलहाशीं विसंवादी असलेले ते स्वर ऐकून तो चिडून जातो, आणि म्हणतो–

'आटप आटप मूर्खा।
सतार फोडुनि टाकिसी न कां?
पिरपिर कसली खुशालचंदा।
करिसी दिडदा दिडदा..."

रुपये, आणे आणि पै आणि डाळ-तांदूळ याच ज्यांच्या आन्तर्जीवनाच्या मर्यादा आहेत असल्या जिवाणूंना कलेचा विकास आणि विलास म्हणजे केवळ खुशालचंदाची पिरपीरच वाटावयाची पण त्याच कलेचा डोळस स्पर्श त्याला घडतांच त्याचीं पाउलें काव्यांतील जडवाद्याप्रमाणें स्वरमोहित होऊन रेंगाळतात आणि त्याची–

..."तों मज न कळे काय जाहलें।
गति मम वळली तरि माघारी।
ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलों।
असा स्ववशता विसरुनि बसलों..."

अशी स्थिति होते. सौंदर्याच्या पहिल्या स्पर्शानें स्वतःला विसरणें ही अन्तर्मुखतेचीच पहिली पायरी होय. अन्तर्मुखतेंतून आत्मपरीक्षण सुरू होतें; डाळतांदुळाखालीं बुजून गेलेल्या भावना जागृत होतात आणि साध्या करुणरसपूर्ण गतींच्या श्रवणानें

"...हृदय निवालें। तन्मय झालें।
द्रवलें, आलें लोचनांतुनी तोय कितीकदा..."

इतकें अन्तःकरण कोमल होऊन जातें. आणि मग या शुद्धिकरणानें डोळ्यावरचीं झापडें उडतात आणि इतका वेळ ज्यांच्या अस्तित्वाची दादच नव्हती

"...नक्षत्रें तों अगणित दिसलीं..."

अशीं भव्य वैभवें दिसूं लागतात. आणि या जाणिवेचें अखेरचें पर्यवसान

"...तों मज गमलें विभुती माझी।
स्फुरत पसरली विश्वामाजी..."

या सौंदर्यवादी प्रत्ययांत होतें. अध्यात्मवाद्यांचें ब्रह्म आणि सौंदर्यवाद्यांची सर्वस्पर्शिता (Universality) म्हणजेच हा प्रत्यय होय. या प्रक्रियेंत सृष्टि बदलली नाही तर सृष्टीकडे पाहणारें पोटभरू मन बदललें. हा बदल ज्या जाणिवांमुळे (Consciousness) घडला ती खरी क्रान्ति, आणि म्हणून केशवसुतांचा सौंदर्यवाद हाच खरा क्रान्तिवाद.

या सौंदर्याची प्रचीती येतांच केशवसुतांनीं विविध सामाजिक विषय आणि प्रतिभा यांच्या द्वारें आपली 'तुतारी' फुंकली आणि त्याच्या रक्षणासाठीं त्यांनीं 'नवा शिपाई' निर्माण केला. हा नवा शिपाई शस्त्रधारी आहे व सैनिकाप्रमाणें

त्यालाहि युद्धाची खुमखुमी आहे. परंतु 'स्थंडिल' संप्रदायी आणि फुटकळ युगप्रवर्तन करणाऱ्या कांहीं आधुनिक क्रान्तिवादी कवींच्याप्रमाणें तो नुसतीच (मानवतेचा जप करीत) जाळपोळ करीत सुटलेला नाहीं. त्याची सौंदर्यदृष्टिहि अत्यंत सूक्ष्म आणि चोखंदळ आहे. तो म्हणतो–

"...सावलींत गोजिरीं मुलें।
उन्हांत हसती गोड फुलें।
बघतां मन हर्षून डुले।
तीं माझीं, मी त्यांचा।
एकच ओघ अम्हांतुनी वाहे."

केशवसुतांनीं फुलामुलांचें प्रतीक योजून ज्या शाश्वत सौंदर्याच्या जोपासनेची (विशेषतः विध्वंसनकालांत–) जाणीव व्यक्त केली तिचें कौतुक करण्याचें सोडून प्रा. जोगांच्यासारखे सहृदय टीकाकार आपल्या केशवसुतांवरील ग्रंथांत शेरा काय मारतात, तर सावलींत असणारीं गोजिरीं मुलें आणि उन्हांत हसणारीं गोड फुलें यांचा अर्थ संदिग्ध वाटतो (के. पृ. ९४). आणि खरेंच ! कवितेबरोबर अन्वयार्थाची झटापट खेळणाऱ्या पंडितांना सहज लागावा इतका केशवसुतांच्या काव्यांतील अर्थ शाळकरी सुगम नसतो हें कबूल करावयास हवें. पण त्याला कारण कवीची दुर्बोध रचना नसून टीकाकारांची लुळीपांगळी कल्पनाशक्ति असते हेंहि अशा वेळींच प्रत्ययाला येतें. 'हें विश्वचि माझें घर। ऐशी मति जयाची स्थिर' असें साधु-लक्षण सांगणारा एखादा ज्ञानियांचा राजा अथवा 'वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरें।' असे उद्‌गार काढणारा एखादा सन्तशिरोमणी अशा पंडितांना वंद्य वाटतो. कारण व्यक्तिमत्त्वाची ही विशालता देवोपासनेंतून निर्माण झालेली असते. परंतु सौंदर्याची उपासनादेखील शेवटीं व्यक्तिजीवनाला विशालताच प्राप्त करून देते असें कोणीं प्रतिपादिलें कीं त्यांना कसेंसेंच वाटतें. केशवसुतांचा 'नवा शिपाई' याच जाणिवेनें पुलकित होऊन म्हणतो–

पूजितसें मी कवणाला ?
तर मी पूजीं अपुल्याला।
अपुल्यामध्ये विश्व पाहुनी
पूजितसें मी विश्वाला

समाजाच्या जीवनाशीं एकरूप झालेल्या महात्म्यांच्या बाबतींत व्यक्तिजीवन आणि त्यांचें समाजजीवन यांत अंतर उरत नाहीं हा या 'मी पूजे' चा अर्थ अगदीं स्पष्ट आहे. पण प्रा. जोग म्हणतात : 'मी पूजीं अपुल्याला' या शब्दांतील भावनेला उदात्त अर्थानेंहि स्थान कसें मिळतें तें कळणें कठीण आहे.' (पृ. ९४) प्रा.

जोगांनीं पुढल्या ओळी अधिक डोळसपणें वाचल्या असत्या तर 'हें कळणें' अगदींच कांहीं कठीण नव्हतें.

केशवसुतांनीं काव्यनिर्मितीमधील विविध अवस्था आणि अनुभव 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास', 'शब्दांनो मागुते या', 'दिव्य ठिणगी', 'कल्पकता' यांसारख्या कांही कवितांतून नमूद करून ठेवले आहेत. धर्ममोक्षाचा बाजारभाव वसल्यानंतर भावनांच्या उदात्तीकरणाचें कला हें एकमेव साधन सापडल्यामुळें कविमनाला आलेलें भरतें, कोलंबसाला अमेरिका सापडल्यावेळीं झालेल्या आनंदासारखें असल्यास नवल नाही.

"माझी दृष्टि असे अलौकिक, मला जाणीव ही जाहली..."

असें जेव्हां केशवसुत म्हणतात तेव्हां ते व्यक्तीबद्दल बोलत नसून कलेच्या सामर्थ्याबद्दल बोलत आहेत ही गोष्ट कोणाहि मार्मिकास स्पष्ट होते. कांहीं ठिकाणीं त्यांनीं योजिलेलीं प्रतीकें आणि व्यक्त केलेला आशय, काव्यशास्त्रज्ञांनीं नोंद करून ठेवावा इतका मौलिक उतरला आहे. परंतु मराठींतील नामवंत टीकाकारांनीं त्यांत कविमनाची विकृति आणि आत्मश्लाघाच फक्त पाहिली आहे हें पाहून खेद होतो. "...वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा, येऱ्यांनीं वहावा भार माथां..." असें म्हणणारा तुकाराम देव्हाऱ्यांत जाऊन वसला म्हणून त्याच्यावर हे टीकाकार घमेंडखोरीचा आरोप करूं शकले नाहीत. ब्रह्मसाक्षात्काराप्रमाणेंच सौंदर्याचा साक्षात्कार मनाला समृद्ध आणि सामर्थ्यसंपन्न करूं शकतो हें, दास्यवृत्तींतच स्वर्ग मानणाऱ्यांना कसें उमजावें? समर्थांनीं पारमार्थिकांचे बद्ध, मुमुक्ष, साधक आणि सिद्ध असे जे वर्ग केले आहेत ते टीकाकारांनाहि लागू करावे असें कांहीं वेळेला वाटतें तें यासाठींच.

केशवसुतांच्या सौंदर्यवादाचा प्रत्यय एका विशिष्ट विषयावरील कवितांतूनच येतो असें नाहीं. त्यांनीं हाताळलेल्या कोणत्याहि विषयावरील कविता डोळसपणें वाचली तरी याच वृत्तीची साक्ष पटते. केशवसुतांच्या काव्यसंभारांत काव्यहीन अशा कविताहि पुष्कळ सापडतात. पण आजच्या नवकवींच्या समोर उपलब्ध असलेलें काव्यशास्त्र त्यांच्या काळीं जन्मालाहि आलें नव्हतें याची जाणीव ठेवल्यास, कवीचें मूल्यमापन त्याच्या कवितांच्या संख्येवरून करावयाचें नसून, चांगल्या कवितांतून प्रगट झालेल्या उंचीवरून ठरवावयाचें असतें या सत्याचाहि उमज पडतो. त्यांची प्रेमविषयक कविता या दृष्टीनें वैशिष्टचपूर्ण आहे. लग्नाच्या बाजारांत स्त्रीसुख विकत घेणाऱ्या आणि तोंडानें मात्र "...स्त्री ऐसी लाघवाची बेडी, दूरी राखतां हेंचि बरें..." असा जप करणाऱ्या तत्कालीन (आणि आजच्याहि–) पोटभरू प्रपंचवाद्यांना "प्रीति" या कवितेंत त्यांनीं विचारलेला प्रश्न "...प्रीति मिळेल कां हो बाजारीं? शेजारीं? शेतांत? बागांत?..." जितका मार्मिक तितकाच हृदयस्पर्शी आहे. उज्ज्वल प्रीति हृदयांत शोधून पाहिली तरच दिसते, आणि प्रेमळ कृत्यांची माळ प्रियजनकंठीं

घातली तरच ती द्विगुणित होते. प्रीतीचा जन्म कसा झाला तें सांगतांना केशवसुतांनीं योजिलेलें कल्पनाचित्र

"...नंदनवनामधीं आला।
कल्पलतेला बहर भला।
तिचीं हृदयिं बीजें पडलीं।
त्यांतुन प्रीती अवतरली..."

जितकें कल्पक आणि भावरम्य तितकेंच सार्थ आहे. "कर्तव्य आणि प्रीति" या कवितेंत त्यांनीं कर्तव्य आणि प्रीति या दोन भावनांत केलेला सूक्ष्म फरक या दृष्टीनें अतिशय उद्‌बोधक आहे. स्वामिनिष्ठेपासून देशनिष्ठेपर्यंत अनेक प्रकारांचा त्याग नेहमींच कर्तव्य-भावनेंतून केला जातो. उपयुक्ततावादाच्या दृष्टीनें हा त्याग कितीहि मोलाचा असला तरी केवळ कर्तव्यासाठीं केलेली कृति खऱ्या सौंदर्यवाद्यास नेहमींच असुंदर वाटते. ते म्हणतात कीं, कर्तव्यपालनांतून परस्परसंबंध सुखाचे झाले तरी उज्ज्वल प्रीति त्यांतून जन्माला येत नाहीं. परंतु–

अन्यानें न अपेक्षिलें प्रियतमे जें आपणापासुनी।
तें सद्‌वर्तन दावितां सहज तो जातो मनीं मोहुनी...

आत्मार्पणाच्या सौजन्यांतूनच खरी प्रीति जन्म घेते. "समृद्धी आणि प्रीति" त्या कवितेंत तर त्यांनीं ऐहिक समृद्धीचें महत्त्व तुच्छ मानून प्रीतीचें वैभव गायिलें आहे. यापूर्वी ऐहिक ऐश्वर्याचा तिरस्कार करण्याची फक्त साधु-संतांची मिरासदारी होती. पण वैराग्याची दीक्षा न घेतां, जीवनाकडे तोंड करून बसलेला, आणि विविध प्रकारच्या भावनाविलासांत रमलेला सौंदर्यवादीहि ऐहिक ऐश्वर्य उज्ज्वल प्रीतीसाठीं त्याज्य मानतो हा प्रत्यय केशवसुतांच्या कालीं नवीन होता. उज्ज्वल प्रीतीचें हें दर्शन म्हणजे त्यांच्या सौंदर्यवादाचा नवा अवतार होता.

सौंदर्याच्या स्पर्शानें ज्याची विभूति स्फुरत विश्वामाजी पसरली आहे अशा काव्यात्म्याचें दुःखहि डाळतांदूळवादी व्यावहारिकाच्या सुखापेक्षां श्रेष्ठ आणि सुन्दर असतें. कारण तें दुःख अपूर्णतेची जाणीव आणि आत्मविकासासाठीं धडपड यांच्या पोटीं जन्माला आलेलें असतें. केशवसुतांची "हरपलें श्रेय" ही नितान्त सुन्दर कविता याच मनोवृत्तीचें दर्शन घडविते. या कवितेचा अर्थ लावण्याच्या निमित्तानें तिच्या दुर्बोधत्वाचा बराच गाजावाजा झालेला आहे. परंतु अर्थ लावण्याची आपली पद्धति निर्दोष आहे कीं नाहीं हें न तपासतांच सारे टीकाकार कवीवर तुटून पडलेले दिसतात. कल्पनाशक्तीचे डोळे फोडून काव्यप्रान्तांत चाचपडत हिंडणाऱ्या टीकाकारांनीं अंधाराबद्दल तक्रार करण्यांत काय अर्थ आहे? केशवसुत जेव्हां "A crab in the heart! But Alas! Where is the restorative" अथवा 'I am

a dwarf, and show no signs of outgrowing my limitations' असे उद्‌गार काढतात तेव्हां ते स्वतःचा हीनपणा अथवा न्यूनगंड व्यक्त करतात हें म्हणणें निर्बुद्धपणाचें आहे. ज्ञानाचें कुंपण ओलांडलें म्हणजे भेटणाऱ्या प्रदेशांत कलावन्त काय किंवा ब्रह्मवादी काय, दोघांचीं सुखदुःखें आणि मुक्तीचे मार्ग एकाकी असतात. कलावंतांचें दुःख कलावंताच्या पातळीवर जाऊनच अनुभवलें पाहिजे. हें सौंदर्य, म्हणजे ही जाणीव (Consciousness) आणि विश्वरूप होण्यासाठीं त्याची धडपड ज्यानें अनुभविली त्याला कविमनाचे आर्त उद्‌गार पिळवटून टाकतील. बालपणांतील निरागसता अज्ञानांजन्य असते. पुढें प्रौढपणीं व्यावहारिक संसारसुखाच्या सौद्यांत '...दिलें हिरण्मय। हातीं मृण्मय...' अशी स्थिति होते. सौंदर्याचा स्पर्श घडून मन चिंतनशील झालें कीं ही बद्धावस्था खुपूं लागते. आणि मग झरोक्यांतून पडणाऱ्या किरणांतील अणूंबरोबर मन उडून जातें. "...जेथें ओढे वनराजी। वृत्ति रमे तेथें माझी..." असें होऊं लागतें. आत्म-मर्यादांपुढें सौंदर्यपर्वतावरील मोक्षाचीं शिखरें नेहमींच अजिंक्य राहातात, आणि कविमनाची तगमग वाढते. हिमालयावरील स्वारींत ज्यांनीं शेकडो मैल पायांखालीं तुडवून एव्हरेस्ट दृष्टिपथांत आणलें आहे अशा प्रवाशांची अस्वस्थता नैनितालच्या हॉटेलमधून दुर्बिणींतून हीं शिखरें पाहणाऱ्या खुशालचंदांना कशी समजावी ? या अस्वस्थतेंतूनच तुकारामाला "...येणें दुःखें माझा फुटो पाहे प्राण.." हा हृद्रोग लागला आणि केशवसुतांना "म्हणुनी जीव पाखडीतसें..." असे आर्त उद्‌गार काढावे लागले. कर्मठ ब्राह्मणांना तीक्ष्ण उत्तरें देणारा आणि दगडांत देव पाहाणारा तुकाराम आणि निजहृदयाची गोफण करून कठीण शब्दांची हाणाहाण करणारे आणि "झपूर्झा" या अक्षरांत सौंदर्याचा महामंत्र पाहाणारे केशवसुत हे दोघेहि नुसतेच सामाजिक सुधारक नव्हते असें वाटतें तें यामुळेंच.

याच सीमारेषेवर अनुभूतींची पातळी आणि भावनांचें विश्व बदलतें आणि म्हणून अत्यंत अपरिचित, गूढ, संमिश्र आणि शब्दातीत अशा भावना व्यक्त करण्यासाठीं "प्रतीकात्मक" (Imagist) कविता जन्म पावते. केशवसुतांच्या कांही कवितांचा अर्थ लावण्याच्या पद्धतींत बदल झाला पाहिजे असें वाटतें याचें कारण केशवसुत हे मराठींतील आद्य प्रतीकात्मक कविता लिहिणारे (Imagist) कवि आहेत. आजचे नवकवि या प्रकारच्या माध्यमांतून कविता लिहीत आहेत म्हणून हा मराठींत नवीन प्रयोग होत आहे असें वाटणें स्वाभाविक आहे. परंतु केशवसुतांच्या "झपूर्झा", "हरपलें श्रेय" सारख्या कांहीं कविता या दृष्टीनें तपासल्या तर त्यांच्या या कवितांची जात हीच असल्याचें प्रत्ययास येतें टीकाकारांनीं आजवर या कविता दुर्बोध आणि विसंगत म्हणून धोपटल्या आणि तरीहि त्या विलक्षण हृदयस्पर्शी आहेत असें त्यांना मान्य करावें लागलें, याचें कारण त्यांचीच सदोष मीमांसापद्धति होती. प्रा. जोगांच्या सारखे टीकाकार "हरपलें श्रेय"

या कवितेवर आक्षेप घेतांना म्हणतात, " . . . हरपलें श्रेय या कवितेचा अर्थ लावण्यामध्यें अडचण येते, तीमध्यें निरनिराळ्या कडव्यांचा संबंध स्पष्ट नसणें हें एक प्रमुख कारण आहे. त्या कडव्यांचा क्रम चुकला आहे असें नाहीं. पहिल्या कडव्यांतून दुसऱ्याची आणि दुसऱ्यांतून तिसऱ्याची प्राप्ति कशी होतें तें एकदम कळत नाहीं . . . " काव्यामध्यें तार्किक सुसंगति असलीच पाहिजे या मनोगंडानें पछाडलेले टीकाकार याच निष्कर्षाशीं येऊन घोटाळावयाचे यांत नवल नाहीं. विविध कडव्यांतील विविध कल्पनाचित्रांनीं साखळीसारखी गुंफित झालेली कविता टीकाकारांना विसंगत वाटते याचें कारण, अभिव्यक्तीचा हा नवीन प्रयोग आहे याची ते दखल करून घेत नाहींत. अशा काव्यनिर्मितींत कवि केवळ रुचिपालट वा पांडित्यप्रदर्शन म्हणून असे नवीन प्रयोग करीत नाहीं. अपरिचित, गूढ आणि संमिश्र भावना व्यक्त करण्यासाठीं जुनीं साधनें निकामी होतात आणि अभिव्यक्ति हीच कवीची एक धडपड होऊन बसते. त्याच्या अनुभूति हिमाच्छादित पर्वतशिखराप्रमाणें असतात. त्या त्याला दिसतात, भासतात आणि जाणवतात; पण शब्दांच्या चिमुटीनें त्या धरून ठेवतां येत नाहींत. मग जवळचा मार्ग म्हणून जें जें त्याला दिसलें, भासलें आणि जाणवलें त्याशीं सुसंवादी अशीं कल्पनाचित्रें (Images) तो भराभरा पतंगाप्रमाणें सोडून आपल्या अनुभूती प्रगट करूं लागतो. या कल्पनाचित्रांत तार्किक दृष्टीनें सुसंगतता असेल, परस्परांत दुवे लागत असतील तरच आश्चर्य. कल्पक रसिकानें अशीं कल्पनाचित्रें फोडलीं कीं त्याच्या मनांत प्रत्येक कल्पनाचित्र एक एक भावनेचा ढग निर्माण करून विरून जातें. सबंध कवितेंतील कल्पनाचित्रांनीं निर्माण केलेले भावनांचे ढग एकत्र आले कीं एक सुसंगत भावना चित्र निर्माण होतें अशा कवितांतून तार्किक सुसंगति (Logical continuity) पाहावयाची नसून भागवत सुसंगति (Emotional Continuity) पारखावयाची असते ती यासाठींच. 'झपूर्झा' कवितेंतील अनुभूति शब्दातीत होती म्हणूनच कवीनें एका कल्पनाचित्राच्या साहाय्यानें हा शब्द तयार केला आणि त्याला नवा अर्थगौरव प्राप्त करून दिला. या प्रकारच्या अनुभूति आत्मसात् करावयाच्या असतील तर टीकाकारानें " अर्थवादा "चा धोपटमार्ग सोडून

'ज्ञाताच्या कुंपणावरून। उड्डाण करून।
चिद्घन चपला ही जाते। नाचत तेथें चकचकते।
अंधुक आकृति तिस दिसती'

त्या पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

केशवसुतांच्या भाषेंतील खडबडीतपणा ही देखील एक चिरचर्चित गोष्ट आहे. भावरम्यता आणि ओजस्विता या दृष्टीनें अनेक ठिकाणीं स्पृहणीय रचना करणाऱ्या केशवसुतांना शैली साध्य नव्हती असें म्हणणें निर्बुद्धपणाचें आहे. त्यांच्याजवळ जर

कांहीं नसेल तर शैलीच्या सौंदर्याविषयीं सांकेतिक कल्पना नव्हत्या. साखरपाकाच्या चुळा थुंकत काव्य लिहिणाऱ्या कवींनीं कितीहि नाकें मुरडलीं तरी समुद्रावरील लाटांचें नर्तन वर्णन करतांना केशवसुतांनीं दिलेली "जशा कांहीं नाडया अनवरत देहांत उडती" ही उपमा, किंवा कामुक प्रियकरावर दिलेला "नाहीं ज्या परि डोंगळा कधिंहि तो गेला झणीं साखरे..." हा दृष्टान्त समर्पक नाहीं असें कोण म्हणेल ? केशवसुतांच्या भाषेंत खडबडीतपणा असलाच तर तो उत्कटता आणि समर्पकता यासाठींच आलेला आहे. जीवनाच्या हरएक क्षेत्रांतील उच्चतम आसन नेहमींच कर्तृत्वसंपन्न व्यक्तींच्या अभावीं रिकामें असतें हें सांगण्यासाठीं त्यांनीं योजलेलें–

"...नांगरल्याविण भुई बरी।
असे किति तरी।
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?
हजारांतुनी एखादा..."

हें कल्पनाचित्र (Image) सर्वस्पर्शी आहे हें निर्विवाद. मग काव्यसौंदर्याबद्दलच्या नकली आणि ठोकळेबाज निकषांचें बुजगावणें दाखवून जुन्या संकेतांचे देव्हारे माजविण्यांत काय अर्थ आहे ? कवितांच्या माध्यमाबाबत केशवसुतांनीं दाखविलेली अभिरुचि सांकेतिक अर्थानें अभिजात नसली तरी सौंदर्याच्या दृष्टीनें अधिक डोळस, उत्कट आणि प्रामाणिक होती.

प्रस्तुत लेख म्हणजे केशवसुतांच्या काव्यपरीक्षणाचा सविस्तर प्रबंध नव्हे; त्यामुळें केशवसुतांच्या सौंदर्यवादी वृत्तींतून उजळलेल्या अनुभूती, भावना आणि त्याच्या अभिव्यक्तीचीं साधनें यांची तपशीलवार चिकित्सा अर्थातच स्थल-कालाच्या मर्यादांच्या कक्षेबाहेर पडते. परंतु या धावत्या परीक्षणांतूनहि केशवसुतांनीं मराठी काव्याच्या जन्मकाळीं घडविलेल्या क्रान्तीचें स्वरूप आणि त्यांच्या काव्याच्या रसग्रहणाची पद्धति यांवर मार्मिक रसिकांना थोडा प्रकाश पडलेला दिसेल आणि त्यांतून अपरिहार्यपणें प्रगट होणारा निष्कर्षहि त्यांना उमजेल कीं, खरा क्रान्तिवाद हा सौंदर्याच्या डोळस जाणिवेंतून निर्माण होतो आणि म्हणूनच तो काळाच्या चाळणींतून टिकून राहतो. "स्थंडिल" सांप्रदायिकांनीं निर्माण केलेलें आधुनिक आळांतील क्रान्तिकाव्य आम्ही डोक्यावर नाचवून अजून फार काल उलटलेला नाहीं तोच त्यांच्या श्रद्धा आणि त्यांचीं आशास्थानें कशीं धडाधड कोसळून पडत आहेत त्याचें दृश्य रसिकांना परिचित आहे. किंबहुना आजच्या नवकवींच्या काव्यांतील तीव्र अश्रद्धेचे आणि विफलतेचे उद्गार, क्रान्तीचें शब्दजंजाल माजविणाऱ्या कवितांच्या प्रतिक्रियेंतूनच निर्माण झाले आहेत असें

म्हणतां येईल. रक्तामांसाचा काला ओरपून त्या झिंगेंत आशागीतें गाणाऱ्या या औटघटकेच्या क्रान्तिकवींना नवकवींपैकीच एका कवीने...

"...इरेस पडलों जर बच्चंजी,
याद राख तर मीहि गाइन
आशासूक्तें जीवनदर्शी
–जरा टण्टणीत नि पारदर्शी..."

हा केलेला घरचा अहेरच अधिक बोलका आहे नव्हे काय?

(साहित्य, मे १९५०; पृ. क्र. ३३–४२)

२६

केशवसुत आणि सामाजिक क्रांति

लेखक : नाथ माधव

कवि आणि क्रांति ! किती भिन्न वाटतात नाहीं या कल्पना ! आपल्या कोमल लेखणीनं भावसुमनं फुलविणारा कवि कोणीकडं आणि निर्दय परिस्थितीशीं कठोर झुंज घेणारी क्रांति कोणीकडं ? परन्तु कोमल गुलाबपुष्पापासून तीक्ष्ण कांटे फारसे दूर नसतात हा निसर्गातला नेहमीचा अनुभव आहे. बाह्यतः विरोधी भासणाऱ्या गोष्टी पुष्कळदां एकमेकांना साहाय्यक आणि पूरक असतात हेंच खरं. कवि आणि क्रांति याचंसुद्धां असंच आहे. कवींनी क्रांतीला चालना आणि प्रेरणा दिली आहे, तर उलट क्रांतीनं अनेक कवींना नवकल्पना, नवीं मूल्यं आणि नवे संकेत यांचा पुरवठा केला आहे. कवि आणि क्रांति यांचं नातं अत्यंत जवळचं आहे.

केशवसुतांना युगप्रवर्तक कवि असं म्हटलं जातं. केशवसुतांनीं आपल्या पूर्वीच्या काव्यांत बद्धमूल झालेल्या उपमा, प्रतीकं आणि संकेत या सर्वांना विजेचे धक्के दिले. एवढंच नव्हे तर प्रत्यक्ष काव्यविषयांच्या बाबतींत असलेलीं रूढींचीं बंधनं पार तोडून टाकलीं. देवदानव, परमार्थ आणि भक्ति यांव्यतिरिक्त इतर विषयांवरील कविता ही मुळीं कविताच नव्हे, असा ज्यावेळीं पंडितांचा हट्टी समज होता त्यावेळीं सामाजिक अन्याय आणि दुरवस्था यांच्याविरुद्ध आरोळी ठोकणारी बंडखोर कविता लिहिण्यास केशवसुतांनीं मोठया धाडसानें सुरुवात केली. ज्या रूढी आणि चालीरीती आपण उराशीं कवटाळून बसलों होतों त्यांवर, त्या कवीनं कठोर हल्ले चढविलेले पाहून

रुढिभक्तांचं पित्त खवळलं. यापूर्वी कोणी अशा तऱ्हेची कविता केलेली नव्हती. रुढिभक्तांना हा अनुभव सर्वस्वीं नवीन होता आणि याचवेळीं महाराष्ट्राला सामाजिक क्रांतीच्या प्रसववेदना होऊं लागल्या होत्या. ह्या सामाजिक क्रांतीशीं केशवसुतांचा कसा, किती आणि कोणत्या तऱ्हेचा संबंध आला हे प्रस्तुत लेखांत पाहायचं आहे.

समाजमंदिरांत रुढी आणि जुलूम यांचीं असंख्य कोळिष्टकं माजलेलीं होतीं. कोळिष्टकांनाच तो आपली संस्कृति मानीत होता. समाजवृक्षावर अनेक भ्रामक आचार-विचारांचीं बांडगुळं वाढलीं होतीं. परन्तु बांडगुळांमुळं आपली प्रगति कुंठित होते याची समाजाला जाणीव नव्हती. "समाजाची ही स्थिति ईश्वरी नियमानं प्राप्त झालेली अवस्था आहे. म्हणून तिच्या परमभक्तीची भावना बाळगिली पाहिजे," अशा विचारांचा पगडा त्यावेळच्या विद्वान मंडळींच्या मनावर बसलेला होता.

अशा परिस्थितींत इंग्रजी विद्या शिकून जी पहिली पिढी महाराष्ट्रांत तयार झाली ती आपल्या समाजाचं हें भयाण स्वरूप पाहून बिथरली. इंग्रजी विद्येमुळे नव्या कल्पना आणि नवे विचार मिळालेल्या दुसऱ्या पिढींत तरुणांना आपल्या समाजांतील अन्याय आणि जुलूम असह्य वाटूं लागला. समाजाचं तळं तुंबलेलं होतं. रुढी आणि जुलमाचे किडे त्यांत वळवळत होते. भ्रामक समजुतींचं शेवाळ माजलं होतं. कुवट वासाची दुर्गंधी सुटली होती. ही भयंकर दुर्गंधी या नवोदित तरुणांना असह्य वाटूं लागली. या दुर्गंधीचं कारण त्यांनीं हेरलं आणि त्या दुर्गंधीचं रूपांतर सुगंधांत करण्यासाठीं त्यांनीं कमरा कसल्या.

पावलापावलागणिक समाजांत अन्याय दृष्टीस पडत. केशवसुतांना याची तीव्र जाणीव होती. अस्पृश्यता हा हिंदु समाजावरचा एक फार मोठा कलंक आहे असं त्यांना वाटायचं. एकाच मातेचे पुत्र असूनसुद्धा आपल्यापैकीच कांहीं जणांना आपण क्षुद्र, हीन लेखतों, एवढंच नव्हे, तर त्यांच्या सावलीचा स्पर्श होणंसुद्धां अभद्र लक्षण समजतों. हा केवढा अन्याय ? किती भयंकर जुलूम ! समाजाच्या एका वर्गानें सारे श्रेष्ठ हक्क बळकवावे आणि दुढ्ढाचार्याचा आव आणून ईश्वरोपासनेचा मक्ता आपणालाच असल्याची शेखी मिरवावी आणि त्याच समाजांतील दुसऱ्या एका विशिष्ट वर्गाला मात्र सेवाचाकरी करून यांची लाळ घोटण्याचा प्रसंग यावा ही केवढी क्षोभजनक परिस्थिति ! या क्रूर अन्यायाची जाणीव होऊन केशवसुतांनीं या प्रश्नाला तोंड फोडलें. अस्पृश्यांतर्फे ते उच्चवर्णाला प्रश्न विचारूं लागले,

जरी त्यावरी सांवली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेविलेली ? ।।

सात कोटी अस्पृश्य ही फार मोठी शक्ति आहे. आज ती शक्ति सुप्तावस्थेंत

असेल, ते आज अशिक्षित, दरिद्री व बलहीन असतील, परंतु ते सुद्धां मानवप्राणीच आहेत. म्हणूनच केशवसुत म्हणतात, शिक्षणाच्या–

" टाकीचे, म्हणुनी, तयावरि जधीं आधात मी वोपिले,
मूर्ती दिव्य अशी अहा उतरली धोंडयांमधूनी भली "

धर्माच्या नांवाखालीं अस्पृश्यतेसारखे अनेक अन्याय समाजावर होत असत. धर्माचं वुजगावणं दाखवून विधवांचा निर्दय छळ केला जाई. विधवा ही एक अडगळीची वस्तु; फुकट पोसावा लागणारा पांढरा हत्ती असं तर मानण्यांत येईच. (अशा वेळीं, रक्ताचा घाम गळेपर्यंत ती रावते हें सोइस्करीत्या लोक विसरून जात !) परंतु मन मानेल त्याप्रमाणें खेळण्याचं ती एक बाहुलं आहे असंसुद्धां समजत. तारुण्यानं मुसमुसलेल्या विधवांच्या अतृप्त वासनांचा गैरफायदा घ्यायला समाजांतील दांभिक सद्गृहस्थ सदैव टपून बसलेले असत. आणि कुलीन पतिव्रतेचं आयुष्य पुन्हां एकदां कंठण्याचा मार्ग रुढीच्या पोलादी तटबंदीनं कायमचा बंद केलेला असल्यामुळें तरुण विधवा संधिसाधूंच्या जाळ्यांत क्वचित् प्रसंगीं सापडल्यास नवल तें काय ?

रूढीचा दुष्ट अंमल फक्त विधवांपुरताच होता असं नव्हे. अनेक बावतींत रुढीं आपला करडा अंमल गाजतीत असे. धार्मिक बावतींत तर रूढींचं प्राबल्य अतोनात वाढलं होतं. देवदर्शन, ईश्वरोपासना ही एका वर्गाची मक्तेदारी झाली. सोंवळ्या-ओंवळ्याचा प्रचंड धिंगाणा सुरू झाला. बुवाबाजी बोकाळली. तपस्वी साधु-संतांच्या ठिकाणी भोंदू हरिभक्त आले. या कृत्रिम आणि संधिसाधु धार्मिकतेला पाहून केशवसुत म्हणतात,

देवळीं त्या देवास बळें आणा
परी राही तो सृष्टिमधें राणा

ईश्वराला आवाहन करण्याचं सामर्थ्य ब्राह्मणांच्या मंत्रांतच फक्त आहे असं नव्हे तर सृष्टीच्या प्रत्येक अणुरेणूंत तें सामर्थ्य आहे.

देवावर परमश्रद्धा ठेवणारा स्त्रीवर्ग तरी समाजांत चांगल्या रीतीनें वागविला जात होता काय ? मुळींच नाहीं. स्त्री आणि विद्या यांची कधीं गांठ पडतच नसे. त्यामुळें समाजांतील बहुतेक सर्व क्षेत्रांत स्त्री अभावानेंच तळपत असे. चूल आणि मूल या विश्वांतच तिला आयुष्य कंठावं लागे. नीतीचीं तत्त्वं तर्कशुद्ध आणि शास्त्रीय कल्पनांवर आधारलेलीं नव्हतीं. त्यामुळें स्त्री-पुरुष संबंधांत नैसर्गिक मोकळेपणा दिसण्याऐवजीं कृत्रिम सभ्यताच पाहायला मिळे. जीवनसागरावर साथ करणारी एक जोडीदारीण या दृष्टीनं स्त्रीकडे आपला समाज कधींच पहात नसे. मग तिला समान हक्क आणि वागणूक देणं तर बाजूलाच राहो. समाजाच्या स्थैर्यास अत्यंत

आवश्यक आणि महत्त्वाच्या असलेल्या या घटकावर होणारा अन्याय केशवसुतांना सहन होत नाहीं. धीरोदात्त तरुणाला ते सांगतात,

" धीरा ! उन्नतिचे पथांत उमदा राऊत तूं चालसी !
नाहीं काय ? करूनि चीत अगदीं ही रुढिका राक्षसी,
टांकानें अपुल्या दुराग्रह जुना मर्मीं तसा विंधुनी,
स्त्रीजातीस असाच काढ बरती घे कीर्ति संपादुनी ! '

स्त्रीवर्गाला दास्यांत दडपून टाकणाऱ्या आणि अज्ञानाच्या अंधःकारांत पिचत ठेवणाऱ्या दुष्ट चालींचा केशवसुतांनीं उच्च स्वरानं धिक्कार केला आहे.

समाजांत एका बाजूला पंचपक्वानांवर ताव मारणारे लक्ष्मीपुत्र होते तर दुसऱ्या बाजूला भाकरीच्या तुकड्याला सुद्धां महाग झालेले दरिद्री श्रमजीवी होते. कष्ट करणाऱ्या कामगारांनीं बांधलेल्या घरांत श्रीमंतांचे विलास चालायचे आणि त्याच कामगारांच्या मुलाबाळांना मात्र घांसभर अन्नसुद्धां मिळणं मुष्किलीचं होई.

हीं मंदिरें हो खुलतात चांगलीं;
माझ्या वडीलींच न काय बांधिलीं ?
मी मात्र हो आतां मरें भुकेमुळें,
श्रीमंत हे नाचति मंदिरीं भले ?

देवाच्या राज्यांत सर्वांना सारखा न्याय मिळतो अशा तऱ्हेच्या घोषणा केल्या जातात, तर एकाला सुग्रास भोजन आणि दुसऱ्याला कदन्न अशी स्थिति कां ? परमेश्वराला ते कळवळून विचारतात–

सर्वांस देवा ! बघतोसि सारखा,
होतोस का रे गरिबांस पारखा ?
कांहींस सुग्रास सदन्न तूं दिलें;
साधी अम्हां भाकरही न कां मिळे ?

आर्थिक विषमतेच्या राक्षसानंच ही परिस्थिति निर्माण केली याची केशवसुतांना पुरेपूर जाणीव होती. साम्यवादाच्या नवविचाराचं अमृतसिंचन झालेलं त्यांचं अंतःकरण समाजाला सवाल करुं लागलं, " काय असे ही स्थिती बरोबर ? "

हाच काय देवाचा सारखा न्याय ? हीच का समानता ! हेंच का सर्वेपि सुखिनः सन्तु ? न्यायदेवतेची श्रीमंतावर बहार आणि गरिबांवर खप्पा मर्जी आहे

हे लोकांना स्पष्ट दिसत तर होतं; मग न्यायदेवतेविषयींची समाजांतील आदराचीं भावना टिकावी कशी ? न्यायाचा सौदा करणाऱ्यांना केशवसुत सांगतात,

पैशासाठीं न्याय टाकी !
स्वर्गीं शून्य त्याची बाकी

अशा तऱ्हेच्या अनेक सामाजिक अन्याय, जुलुम, भ्रामक चालीरीति आदि वेंडगळ आचारविचार यांची केशवसुतांना तीव्र जाणीव होत होती. इंग्रजी विद्येच्या संस्कारानं त्यांच्या डोळ्यावरचीं झापडं गळून पडलीं आणि आपल्या समाजाची अशी अवनति होण्याचीं कारणं त्यांना स्पष्ट दिसूं लागलीं. याचवेळीं गतसंस्कृति आणि वैभवाचे गोडवे गाणारी एक पिढी समाजांत निर्माण झाली. राष्ट्रवादाच्या नांवाखालीं वैदिक संस्कृति आणि धर्म टिकवून धरण्याचा यांचा प्रयत्न होता. विष्णुबुवा ब्रह्मचारी हे या राष्ट्रवाद्यांचे अध्वर्यु होते. हिंदू संस्कृति, धर्म आणि आचार विचार गंगोदकाप्रमाणें स्वच्छ, शुद्ध आणि कल्याणकारक आहेत अशी समाजाची समजूत करून द्यायला विष्णुबोवांनी प्रारंभ केला. त्यांच्या या प्रयत्नाला यश येऊन साऱ्या समाजाला एक प्रकारची मोहनिद्रा आली. समाजाला या मोहनिद्रेंतून जागं करण्यासाठी केशवसुतांनीं तुतारी फुंकली. समाजाच्या कानाचे पडदे फाटतील इतक्या जोरानें फुंकली. समाजाची अधोगति इतक्या पराकोटीस पोंचली होती कीं सारंगी, सतार, वीणा किंवा अलगुज यांचा काडीमात्र उपयोग नव्हता. गगनभेदी किंकाळी फोडणाऱ्या तुतारीचीच आवश्यकता होती. सारा समाज खालपासून वरपर्यंत किडलेला-सडलेला होता. समाजाला रूढीच्या राक्षसाचं ग्रहण लागलं होतं. अशास्त्रीय कल्पनांवर नीतीचं मंदिर उभं होतं. धर्माच्या नांवाखाली दांभिकता पसरली होती. म्हणूनच,

तेणें माथें फिरुनि सगळें जें म्हणोनी दिसावें, ।
त्या त्या मध्यें स्वजनकुदशा वाचुनी मी रडावें ।

केशवसुत यानंतर रडत बसले नाहींत. त्यांनीं सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला सुरुवात केली. वैदिक आणि उपनिषदकालीन संस्कृतीचं पुनरूस्थापन करूं पाहणाऱ्या विष्णुबोवांसारख्यांना ते निर्भीडपणें सांगतात,

अलिकडलें तें सगळें खोटें ?
म्हणती धरुनी ढेरी पोटें,
धिक्कार अशा या मूर्खांलागुनि ।

वठलेला समाजवृक्ष पुन्हां टवटवीत करायचा असेल तर त्याची छाटाछाट

करून नवविचारांचं पाणी त्याला दिलं पाहिजे हेंच केशवसुतांनीं कवितेंत सांगितलं आहे. ज्यावेळीं आपल्या चुका जाणून घेण्याची चिकित्सक बुद्धि, नवे विचार आणि कल्पना समजावून घेण्याची जिवंत जिज्ञासा, नवं कार्य हातीं घेण्याची इच्छा आणि तें तडीस नेण्याचा प्रखर प्रयत्नवाद समाजांतून नष्ट होतो त्यावेळीं समाजाची प्रगति कुंठित होते आणि त्याच्या अधोगतीला निश्चितपणें प्रारंभ होतो.

चुकी भरुनि काढणें फिरुनि, हें घडेना कधीं

नव्या विचारांचं स्वागत करायची कुवतच बुद्धींतून नष्ट होते आणि आशाळभूतपणें वर डोळे लावून वसण्याशिवाय कांहीहिं करण्याची ताकद अंगी रहात नाहीं. सारा समाज दुबळ्या दैववादाच्या आहारीं जातो.

म्हणूनिच अम्हांपुढें घनतमिस्र सारें दिसे,
पुढें उचलण्या पदा धृति मुळींहि आम्हां नसे,।

या दूबळ्या दैववादाच्या मगरमिठींतून समाजाला सोडवण्यासाठीं केशवसुतांनीं आरोळी ठोकली,

अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं,
हार न खाऊं रतीभरी।

एवढंच नव्हे तर प्रत्यक्ष,

देवदानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कवळूं द्या !

या दैववादामुळें लोकांतील संघशक्ति आणि सामाजिक जाणीव (Social Consciousness) नष्ट झाली होती. आपण ज्या समाजाचे एक घटक आहोंत त्या समाजाच्यासंबंधीं कांहीं जबाबदाऱ्या आणि कर्तव्यें आपण पार पाडलीं पाहिजेत हें कुणाच्याच ध्यानींमनीं नव्हतें. सर्वत्र बेजबाबदारपणा आणि फुटीरपणाच दृष्टीस पडायचा आणि हेंच समाजाच्या निर्बलतेचें रहस्य होतें.

संघशक्तिच्या भुईत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले"

हे खंदक भरून काढल्याशिवाय समाज बलशाली होणार नाहीं याची केशवसुतांना स्पष्ट कल्पना होती.

भावी समाजाचें एक मनोहर स्वप्न केशवसुतांच्या डोळ्यांपुढें तरळत असे.

या आदर्श समाजचित्राच्या रेषा त्यांच्या काव्यांतून ठिकठिकाणीं स्पष्ट झालेल्या आहेत. या समाजांत नकली धर्माचं अवडंबर माजलेलं असणार नाहीं. तर्कशुद्ध आणि शास्त्रीय पायांवर नीतीचं पवित्र मंदिर तेथें उभारण्यांत येईल. दांभिकता, अस्पृश्यता, अन्याय, जुलूम, आर्थिक विषमता पार नष्ट करून उन्नतीचा आणि समतेचा ध्वज उंच, अगदी उंच धरण्यांत येईल तिथें,

"नियमन मनुजासाठी, मानव–
नसे नियमनासाठीं जाणा"

असा सुंदर, प्रेमळ आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला जास्तींत जास्त संधी देणारा समाज त्यांच्या मनश्चक्षूंना दिसत होता.

अशा प्रकारचा सामर्थ्यशाली, तेजस्वी आणि प्रगतीशील समाज जर निर्माण करायचा असेल तर,

जुनें जाउं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनी टाका;
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध, ऐका पुढल्या हांका
खांद्यास चला खांदा भिडवुन ?

कांहीं निराश आत्म्यांना असा भास होतो की आपल्या समाजांतील प्रत्येक व्यक्ति कर्तव्यशून्य, नामर्द आणि मूढ बनली आहे. पण तो केवळ भासच आहे. 'नव्या मनूंतील नव्या दमाच्या शूर शिपायानं' नववविचारांची फुंकर घातल्यानंतर

"राखेचीं ढिपळें म्हणोनि दिसत जीं तीं उद्यां या जगा"

भस्मसात करणार नाहींत, अशी तुम्ही हमी द्याल का ?"

विचारक्रांतीच्या 'बंडाचा तो झेंडा उभवनि धामधूम जिकडे तिकडे' करून टाकायला हवी. ज्या अनेक मूर्ति आणि दैवतं समाजानं निर्माण केलीं आहेत त्या,

मूर्तीं फोडुनियां देऊं न त्या
परी विकूनियां टाकूं न त्या ?

आणि समाजांतील प्रत्येक व्यक्तीला शिकवूं;

'झटणें हें या जगण्याचें
तत्त्व मनीं तूं जाण;
म्हणून उद्यम सोडूं नको
जोंवरि देहीं प्राण !"

आतां समाजापुढं 'जगणं किंवा मरणं' हाच एक पर्याय आहे. केशवसुत कंठरवानं आरोळी ठोकतात,

महादेव हरहर! समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येऊनि घुमतो अमुच्या कर्णीं–
'निजतीं ते ठारच मरती!'
उठा! उठा! बांधा कमरा।
मारा किंवा लढत मरा।
सत्त्वाचा 'उदयोऽस्तु करा

'नवसमाजनिर्मिती' हें जें ध्येय आज आपण दृष्टीसमोर ठेवलं आहे, त्याची किती स्पष्ट कल्पना ६५ वर्षांपूर्वी केशवसुतांना होती! सामाजिक क्रांतीच्या ऐतिहासिक गरजेची जाणीव करून देणाऱ्या या बंडखोर कवीबद्दल महाराष्ट्राला सदैव अभिमानच वाटेल,

(वाङ्मयशोभा–फेब्रुवारी १९५१;
पृ. क्र. ५३ ते ५७)

२७

केशवसुतांच्या काव्यदृष्टींतील उत्क्रांति

लेखिका : कुसुमावती देशपांडे, एम्. ए.

कोणत्याहि कवीच्या काव्याचा अभ्यास करतांना त्याच्या कवितांची विषयानुसार वर्गवारी करण्याची प्रथा आहे. विषयांच्या विविधतेप्रमाणें किंवा प्राधान्याप्रमाणें त्या कवीच्या प्रतिभेचें स्वरूप ठरविलें जातें व कवीलाहि बिरुदें दिलीं जातात. फुटकळ कवितांचा अभ्यास व वाचन यांच्यापुरती ही पद्धत उपयोगी ठरत असावी. परंतु यामुळें कवितेचा खरा आस्वाद लाभत नाहीं; कवितेचें मर्म हस्तगत होत नाहीं; व कविमनाचा साक्षात्कार तर होतच नाहीं. कवितेच्या अभ्यासाची ही पद्धत विषयनिष्ठ असते. अमुक एका विषयाबद्दल काय म्हटलें गेलें–एकानें काय म्हटलें, अनेकांनीं काय म्हटलें–आज काय म्हणतात, काल काय म्हणत होते, या प्रकारचा हा विचार झाला. काव्याच्या सर्वांगीण अभ्यासाला असा विचार आवश्यकहि असतो. परंतु, काव्याचें खरें रहस्य कविमनाच्या साक्षात्कारांत असतें; कवीच्या सौंदर्यप्रतीतीशीं समरस होण्यामध्यें, त्याच्या भावनेशीं एकरूप होण्यामध्यें असतें. याच्याहि पलीकडे जाऊन असें म्हणतां येईल कीं, काव्याच्या वा कोणत्याहि उच्च कलाकृतीच्या आकर्षणाची, आस्वादाची वा आनंदाची परिसीमा, मानवी मनाच्या साक्षात्कारांत असते. या सर्व कलाकृतींत जीवनाच्या देवघेवींतला व्यक्तिमनाचा आविष्कार आढळून येतो.

व्यक्तिमनाचा आविष्कार या दृष्टीनें एखाद्या कवीच्या काव्याकडे पाहूं

लागल्यास, तो कवि जिवंतपणें जगला असेल, त्याच्या जिवंत जाणिवांतून त्याचें काव्य निर्माण झालें असेल, तर त्याच्या जीवनाबरोबर त्याच्या काव्याचीहि उत्क्रांति झालेली दिसून येईल. जीवनानुभवाप्रमाणें त्याच्या काव्यांत फरक झालेला दिसून येईल. जीवनानुभवाबरोबर त्याची जीवनदृष्टि विकास पावलेली आढळेल व तिच्याबरोबर काव्यदृष्टि व काव्याचीं अंगोपांगेंहि. बदलणें, विकास पावणें, उत्क्रांत होणें हा जीवनाचा धर्म आहे. सर्व सृष्टीमध्यें अतितरल अशा मानवी प्रतिभेचा तो प्रमुख गुण आहे.

केशवसुतांच्या काव्याच्या वेगवेगळ्या अंगांमध्यें अशा प्रकारची उत्क्रांति आढळून येते. त्यांच्या प्रतिभेच्या विकासाबरोबर त्यांच्या प्रतिमासृष्टींत बदल झाला, त्यांची शब्दकळाहि पालटत गेली. त्यांच्या काव्यदृष्टींत झालेली उत्क्रांति विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. केशवसुतांच्या काव्यविषयक कवितांची बरीच चर्चा झाली आहे. त्यांचे पहिले उत्साही समीक्षक श्री. रहाळकर व प्रा. राजवाडे यांनीं त्यांच्या कवितांचे विषयानुसार विभाग पाडले व त्यांची चर्चा केली. ही प्रथा प्रा. रा. श्री. जोग यांच्या अद्ययावत् ग्रंथापर्यंत चालू आहे. परंतु या वर्गवारीमध्येंदेखील मतभेद आढळून येतात. श्री. रहाळकर व श्री. राजवाडे यांच्या केशवसुतांच्या काव्यविषयक कवितांच्या याद्यांमध्यें फरक आहे. 'झपूर्झा', 'हरपलें श्रेय' या कविता प्रामुख्यानें काव्यविषयक आहेत, असें डॉ. मा. त्रिं. पटवर्धनांचें मत आहे; परंतु प्रा. जोगांना तें मान्य नाहीं. असे मतभेद पडणें व काव्यविषयक कवितांची यादीदेखील निश्चित करणें कठीण होणें, हें स्वभाविक नव्हे तर अपरिहार्य आहे. निसर्ग आणि मानवी जीवन, त्यांतील शक्ति आणि सौंदर्य, काव्याचें आकर्षण व त्याचें व्यावहारिक जीवनांतील स्थान, हे केशवसुतांच्या नित्याच्या चिंतनाचे विषय. परंतु त्यांच्या मनोविश्वांत हे विषय व त्यांच्याविषयींच्या अनेक भावभावनांची अनुभूति या सर्वांचे वेगवेगळे कप्पे थोडेच असणार ! त्यांचा समाहारच नैसर्गिक. व प्रत्येक कवितेंत जी कल्पना वा जी अनुभूति त्या मनोविश्वाच्या अथांग जलाशयांतून मूर्त रूपानें बाहेर पडली ती त्या सर्व प्रकारच्या लहरी आपल्याबरोबर ओढून घेऊनच. केशवसुतांचें काव्यजीवन जसजसें उत्क्रांत होत गेलें, तसतसे हे वेगवेगळे विषय अधिकाधिक एकजीव झालेले आढळून येतात. त्यांच्या एकेका कवितेंत त्यांच्या मनोविश्वांतील संचिताचें वैभव एकत्रित झालेलें आढळून येतें. पण म्हणूनच त्यांच्या काव्यांतील उत्क्रांतीचीहि स्पष्ट जाणीव होते. केशवसुतांवरील समीक्षणांत मात्र अशा उत्क्रांतीचा विशेष विचार झालेला आढळून येत नाहीं. काव्यरचनेच्या अनुभवाबरोबरच व जीवनानुभवाच्या सापेक्षतेनें त्यांच्या काव्यदृष्टींतहि कसें परिवर्तन झालें याची विशेष चर्चा झालेली आढळत नाहीं. या दृष्टीनें केशवसुतांच्या काव्यविषयक कवितांचें सूक्ष्मपणें परीक्षण केल्यास उद्बोधक होईल.

अशा परीक्षणांतील एक प्रारंभींचीच अडचण येथेंच नमूद करून ठेवणें अवश्य आहे. केशवसुतांच्या सर्वच कवितांचा रचनाकाल नमूद केलेला आहे, असें नाहीं. चौथ्या आवृत्तींतदेखील प्रस्तुत विषयावरील कांहीं कवितांच्या तारखा दिलेल्या नाहींत. त्यामुळें त्यांचा कालानुक्रम ठरवणें व त्यावरून त्यांच्या बाबतींत उत्क्रांतिविषयक अनुमानें काढणें रास्त होणार नाहीं. 'सृष्टि आणि कवि' या शीर्षकाच्या त्यांच्या दोन कविता आहेत. त्यांपैकीं पहिली–'वयस्या गाते ही' या प्रथमपदाची–१८८६ तील आहे, हें नमूद आहे. परंतु दुसऱ्या, 'मी एकला फिरतसें बहुवार रानीं' या प्रथमपदाच्या कवितेचा रचनाकाल उपलब्ध नाहीं. विषय व भाषासौष्ठव यांच्या दृष्टीनें दोन्ही जवळच्या व समान दर्जाच्या वाटतात. पहिलीविषयीं कोणी विशेष विचार केलेला नाहीं. दुसरी इमर्सनच्या 'अपॉलॉजी' या कवितेचें भाषांतर आहे, असें प्रा. जोग यांनीं म्हटलें आहे. याचप्रमाणें 'कवि आणि धूमकेतु', 'चिन्हीकरण' याहि कवितांचा रचनाकाल उपलब्ध नाहीं.

'सृष्टि आणि कवि' (१८८६) या आपल्या पहिल्या काव्यविषयक कवितेमध्यें केशवसुतांनीं निसर्गाला–सृष्टीला–शरणचिठ्ठी दिली आहे. डॉ. पटवर्धनांना हा केवळ एक संकेत वाटतो. उपमारूपकादि अलंकारांसाठीं निसर्गदृश्यांचा उपयोग कालिदासापासून सर्वांनीं केला आहे. परंतु केशवसुतांची ही कविता केवळ संकेतात्मक किंवा उत्प्रेक्षेच्या स्वरूपाची आहे, असें वाटत नाहीं. 'मृदु घनरव' अथवा 'श्रुतिसुभग' अशीं 'पाक्षिकवनें' हीं सृष्टीचीं गीतें आहेत, वृष्टीच्या मिषानें सृष्टि खळखळ रडते, निशीथसमयीं ती 'मृदु उच्छ्वास' करते, अशा प्रकारें सृष्टीला चेतनामय व भावनाक्षम समजून केलेलीं वर्णनें मराठी काव्यांत नवीनच असावीं. 'कवि आणि सृष्टि' या कवितेच्या मुळाशीं एक वेगळी सृष्टिविषयक वृत्ति, वेगळी जाणीव आहे, व तीमुळें वर्डस्वर्थच्या 'लाइन्स रिटन् इन् अर्ली स्प्रिंग' या कवितेची आठवण होते. सृष्टीला चेतनापूर्ण व भावनाक्षम समजण्याच्या वर्डस्वर्थच्या प्रवृत्तीविषयीं, त्याच्या अशा निष्ठेविषयीं, इंग्रजी टीकाकारांच्या भाष्यांचीहि आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. इंग्रजी काव्याचा ज्यांच्यावर खोल संस्कार झाला, त्यांतील केशवसुत हे पहिले मराठी कवि. तेव्हां 'सृष्टि आणि कवि' या कवितेमध्यें असा संस्कार–पडसादच नव्हे–जाणवला तर तें साहजिकच. अशा प्रकारची निसर्गविषयक वृत्ति ही केशवसुतांच्या काव्याचें एक मुख्य अधिष्ठान आहे. या वृत्तीची साक्ष त्यांच्या 'सृष्टि आणि कवि' या नांवाच्या दुसऱ्या, भाषांतरित कवितेंतहि पटते.

प्रस्तुत विषयांच्या दृष्टीनें विशेष लक्षांत घ्यावयाचें तें हें कीं, वरील कवितांत केशवसुतांनीं स्वतःच्या काव्याविषयीं अत्यंत सौम्य व विनयशील अशी वृत्ति धारण केली आहे. स्वतःची काव्यशक्ति व भोंवतालचा नैसर्गिक परिसर एवढेच चिंतनविषय असले म्हणजे त्यांची वृत्ति प्रसन्न व विनयशील दिसते. सृष्टिसौंदर्याच्या जाणिवेंत

व स्वतःच्या भावनेच्या उत्कट अभिव्यक्तीमध्यें रममाण होण्यांत ती समाधान मानते. काव्याच्या इतर कांहीं प्रयोजनाची कल्पना येथें उदयास आलेली दिसत नाहीं. 'कविता आणि कवि' (१८८६) या त्यांच्या दुसऱ्या कवितेंतहि हाच दृष्टिकोण आढळतो. कविता ही स्वानंदासाठीं आहे, स्वगत अभिव्यक्तीसाठीं आहे,

करूनियां काव्य जनांत आणणें
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें
करूनि तें दंग मनांत गुंगणें
तदीय हा सुंदर हेतु मी म्हणें

असें त्यांना वाटतें. प्रेयसीशीं कसें बोलावें, तिला कसें वश करावें, हें युवकाला जसें दुसऱ्या कोणींहि सांगण्याचें प्रयोजन नसतें, तसें कवीला कविता कशी लिहावी, हें कोणीहि सांगूं नये. ह्या बाह्य प्रशासनाच्या, ठोकळेवजा नियमबाजपणाच्या अधिक्षेपार्थ ही कविता लिहिली गेली. कांहीं तरी टीकेला प्रत्युत्तर म्हणून ही कविता लिहिली गेली असावी, हें पहिल्या श्लोकावरून उघड होतें. परंतु या प्रत्युत्तरात्मक वृत्तीपेक्षां काव्याविषयीं आत्मनिष्ठ व केवळ आत्मलक्षी दृष्टिकोण येथें व्यक्त झाला आहे, तो अधिक महत्त्वाचा आहे. सभारुचिनिष्ठ कविता, सांचेबंद कविता ही केवळ कृत्रिम, नाटकी व म्हणून सवंग होते, तींत खरा काव्यानंद नाहीं, हें केशवसुतांनीं स्पष्ट केलें आहे. कवितेचें इतर कोणतेंहि प्रयोजन किंवा इतर कोणावर होणारा परिणाम केशवसुतांना येथें अभिप्रेत नाहीं. तशा प्रयोजनाची किंवा परिणामाची अंधुक जाणीवहि येथें आढळून येत नाहीं.

यानंतर दोनच वर्षांनीं केशवसुतांच्या काव्यदृष्टींत बदल झालेला दिसतो. रा. वा. ब. पटवर्धन यांस उद्देशून लिहिलेल्या कवितेंत (१८८८) हा फरक स्पष्टपणें व्यक्त झाला आहे. ही कविता 'कविता आणि कवि' या कवितेइतकी प्रसादपूर्ण किंवा एकसंधपणें उफाळून आलेली वाटत नाहीं. कदाचित् नव्या कल्पना, नवा दृष्टिकोण त्यांच्या मनांत अजून रुजावयाचाहि असेल. एका उद्योन्मुख कवीचें मार्गदर्शन करण्याच्या इच्छेमुळेंहि त्यांत बहिर्मुखता, थोडा औपचारिकपणा व म्हणून वृत्तीचा थंडपणा आला असेल. परंतु तरीहि व्यक्त झालेला काव्यविचार हा निःसंदिग्ध आहे. कवीची दृष्टि व्यापक, सर्वसंचारी असते (श्लो. ४), तशी इतरांना अगोचर अशा अंतस्तत्त्वांपर्यंत पोंचणारी असते (श्लो. ५), हें तर त्यांनीं प्रतिपादलेंच; परंतु त्याशिवाय

निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला
जन्तूंस लावहि विचार करावयाला

आम्हां शिकीव सुचीं सुर व्हावयाला
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला

या ओळींत कवितेच्या सामाजिक संस्कारक्षमतेचीहि जाणीव व्यक्त झाली आहे. कवितेच्या सामाजिक प्रयोजनाचा विचार येथें स्पष्टपणें उमटला आहे. कवि हे समाजाच्या नेत्रकर्णाच्या स्थानीं आहेत, या कल्पनेंत 'आम्ही कोण ?' या नंतरच्या कवितेंतील विचारश्रेणीचें बीज आहे.

याहि कवितेंत केशवसुतांनीं स्वतःच्या कवित्वशक्तीच्या तोकडेपणाविषयीं पुनः एकदां कबुली दिली आहे. जें जाणवतें तें पूर्णपणें व्यक्त करण्याच्या स्वतःच्या असमर्थतेची कबुली केशवसुतांनीं प्रथमपासूनच अखेरपर्यंत अधिकाधिक असहायपणें व उत्कटपणें दिली आहे. व इतकें असूनहि त्यांच्यावर दुर्दम्य आत्मश्लाघेचा आरोप केला गेला आहे, हें एक नवल म्हणूनच नमूद केलें पाहिजे.

काव्याचा समाजावर कसा परिणाम होतो, व त्यामुळें कवितेला समाजांत कोणतें स्थान प्राप्त होणें उचित, हा यापुढील 'कवितेचें प्रयोजन' (१८८९-९०) या कवितेचा विषय आहे. ही कवितादेखील प्रत्युत्तराच्या स्वरूपाची आहे. कोणीं तरी उपस्थित केलेल्या काव्याच्या वैय्यर्थ्याच्या आरोपाला तींत उत्तर दिलें आहे, रा. वा. ब. पटवर्धन यांना उद्देशून लिहिलेल्या कवितेंतील दृष्टिकोणाचा येथें पुनरुच्चार व विस्तार केला आहे. कवीच्या कार्याच्या विविध प्रकारच्या महत्त्वाचा येथें निर्देश झाला आहे. समाजांत परिवर्तन घडवून आणण्यास झटणाऱ्यांचा उत्साह कवीच्या गाण्यानें द्विगुणित होतो, असें म्हणून केशवसुतांनीं काव्याला प्रगतीचें एक प्रमुख साधन गणलें आहे. कवी हा आजच्या कर्तृत्वाचा साक्षी व म्हणून पुढल्या पिढीला स्फूर्तिदायक प्रेरणा देणारा असतो. कवीचें काव्य हें तुतारीसारखें आव्हान देणारें, जागविणारें असतें, आजहि ही तुतारी नादवती आहे, व म्हणून कवीची 'चाकरी' निरर्थ कशी, असा प्रश्न त्यांनीं टाकला आहे. त्यांच्या 'तुतारी' या महत्त्वपूर्ण कवितेचें बीज येथें आढळतें व त्या कवितेंत 'तुतारी' म्हणजे 'काव्य' हेंच त्यांना अभिप्रेत आहे हें स्पष्ट होतें. काव्य आणि समाजजीवन यांचा असा निःसंदिग्ध संबंध केशवसुतांनीं येथें जोडला आहे. व काव्याच्या, क्रांतिकारक नव्हे तरी क्रांतिसहायक शक्तीविषयीं ग्वाही दिली आहे. त्यांनीं हीं विधानें केवळ सर्वसामान्यपणेंच केलीं नाहींत; तर

आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी
याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं

असें समकालीन कवितेविषयीं म्हटलें. कवितेमध्यें युगप्रवृत्तीचीं लक्षणें सामावलीं जातात, हा एक नवा विचार येथें सूचित झाला आहे. अशा रीतीनें या कवितेंत केशवसुतांची काव्यदृष्टि स्पष्टपणें समाजनिष्ठ झालेली दिसते.

असें असलें तरी कवितेचा मूळ उगम व्यक्तिगत प्रतीतीमध्यें आहे, याचा विसर केशवसुतांना पडला नाहीं. व्यक्तिगत प्रतीति व सामाजिकता या दोन ध्रुव-बिंदूंच्या आधारानेंच त्यांच्या काव्यदृष्टीचा विकास होत राहिला. या दोन ध्रुवबिंदूंच्या स्वरूपाच्या अधिकाधिक स्पष्ट व खोल आकलनामुळें तिची उत्क्रांति घडून आली. त्यांच्या 'सृष्टि, तत्त्व व दिव्य दृष्टि' (१८९०) या, पुढच्या, कांहींशा क्लिष्ट पण महत्त्वपूर्ण कवितेवरून हें स्पष्ट होतें. या कवितेंत वस्तुवस्तूंतील सौंदर्याची प्रतीति, अशा प्रतीतीचें स्वरूप पूर्णपणें जाणून घेतांनाच त्या सौंदर्याचा कलाकृतीच्या रूपानें होणारा आविष्कार, यांची प्रक्रिया एका रूपकाच्या द्वारें वर्णिली आहे. अंतर्मुखपणें स्वतःच्या अंतरंगांतील प्रक्रियेचें विश्लेषण करण्याचा, तिच्या प्रारंभापासून परिणती-पर्यंत तिचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केशवसुतांनीं येथें केला आहे. हा अनुभव त्यांना नवीन वाटला व मराठी कवितेंतहि तो नवीन आहे. प्रत्येक वस्तूमध्यें सौंदर्याचा चित्कण आहे, त्याची प्रतीति कवीच्या आत्म्याला होते व त्या चित्कणाचें स्पष्ट दर्शन करून घेण्याच्या प्रयत्नांतून कलेची निर्मिति होते, ही धारणा तेथवरच्या मराठी कवितेंत अभिनव आहे. वास्तव जीवनांतील प्रत्येक क्षणाचा गाभा सौंदर्यपूर्ण आहे; जीवनाच्या अखंड गतिमानतेंतून असा एकच क्षण मानवी प्रतिभेनें विलग करून घेतला व त्याचें निरीक्षण केलें तर हा सौंदर्यमय गाभा प्रतीत होईल आणि म्हणून सत्य व सौंदर्य हें एकरूप आहे, असें कीट्स्नें आपल्या 'ओड टु दि ग्रीशिअन् अर्न' या कवितेंत प्रतिपादिलें. त्या कवितेंतील प्रतिमावैभव व लालित्य केशवसुतांच्या या कवितेला लाभलें नसलें, तरी अर्थगौरवामध्यें केशवसुतांची कविता कमी ठरणार नाहीं.

१८९० ते १८९३ मधील केशवसुतांच्या काव्यविषयक किंवा त्या विषयाशीं संबद्ध असलेल्या अशा बहुतेक कविता—'सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि' (१८९०), 'दिव्य ठिणगी' (१८९०), 'भृंग' (१८९०), 'कल्पकता' (१८९१), 'शब्दांनो मागुते या' (१८९२), 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (१८९३)– अशा अंतर्मुख विश्लेषणांतून स्फुरलेल्या आहेत. कविता कशी स्फुरते, कोणत्या वृत्तींनीं वा अनुभूतींनीं ती काळवंडून जाते, शब्द व आशय यांची सांगड कशी पडेल, सौंदर्याचे मूलस्रोत कशामध्यें आहेत, सौंदर्यप्रतीति किती तरल व क्षणिक असते, इत्यादि अंत-र्विश्वाच्या सर्व छटांची ओळख करून घेण्यांत, त्यांचें विश्लेषण करण्यांत केशवसुतांची प्रतिभा या काळांत गुंतली होती. या तीन वर्षांत काव्याच्या सामाजिक आशयावर त्यांनीं भर दिला नाहीं. १८८६ मध्यें त्यांनीं पहिली काव्यविषयक कविता लिहिली. त्या वर्षांतील दोन्ही कविता आत्मनिष्ठ आहेत; सौंदर्याच्या स्वगत अभिव्यक्तीमध्यें आनंद मानणाऱ्या आहेत. १८८८ ते १८९० मधील कविता काव्याच्या सामाजिक प्रयोजनाचें व पदवीचें प्रतिपादन करणाऱ्या आहेत. १८९० ते १८९३ या कालांतील कविता अंतर्मुखतेकडे परतल्या आहेत. पण ही अंतर्मुखता १८८६ मधील कवितांतील वृत्तीपेक्षां अधिक खोल, सुजाण व सूक्ष्म आहे; अधिक प्रभावी आहे, विश्लेषणक्षम

आहे. कवितेच्या अनेक अंगांचा विचार करण्यास प्रवृत्त झालेली आहे, तशी वास्तवाच्या अनुभवानें प्रौढ झालेली आहे. व म्हणून ती प्रारंभींच्या आत्मनिष्ठेपेक्षां परिणत व गंभीर बनलेली आहे. तिच्या सौंदर्यानुभूतीमध्यें व भावनानुभूतीमध्यें जितकी भर पडली आहे, तितकीच आपल्या अभिव्यक्तीच्या तोकडेपणाची तिची जाणीवहि तीक्ष्ण झाली आहे.

'दिव्य ठिणगी', 'शब्दांनो मागुते या', 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' या कवितांमध्यें काव्यशक्ति कोणत्या कोणत्या अनुभूतींनीं काळवंडून जाते याविषयीं जाणीव व्यक्त झाली आहे. या अंतर्मुखतेच्या काळांत केशवसुतांनीं काव्याच्या समाजावर होणाऱ्या परिणामाऐवजीं व्यावहारिक जीवनाच्या व समाजाच्या काव्यविषयक वृत्तीच्या, काव्यशक्तीवर होणाऱ्या परिणामाचाच विचार केलेला आढळतो. सर्वसाधारण समाजांतील काव्याविषयींचें औदासीन्य केशवसुतांना नेहमीं जाणवत असे, हें उघड आहे. एकीकडे जीवन उजळण्याची काव्यांतील शक्ति व दुसरीकडे व्यावहारिक जीवनांतील काव्याविषयींचें औदासीन्य यांच्यामुळें होणारी कविमनाची दुरवस्था 'दिव्य ठिणगी' या कवितेंत व्यक्त झाली आहे. 'शब्दांनो मागुते या' या कवितेंत याच अनुभवांच्या अनुरोधानें काव्यजीवनांतील तीन वेगवेगळ्या अवस्थांचा निर्देश आला आहे. प्रथम कवीची 'विकसित हिरवी चित्तभूमी' बघून 'तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित' चाललेली 'शब्दपंक्ति' शारदेचा देव्हारा तेथें उतरविते. जीवनारंभीं उत्साहपूर्ण अशा वृत्तीनें कवि शब्दांचे खेळ करण्यामध्यें, नादमाधुर्यांत वा चमत्कृतिप्रधान व कल्पनारम्य अशा कवितांमध्यें रंगून जातो. त्याचा हृत्प्रांत शब्दांच्या कूजितांनीं भरून जातो. त्या खेळांत त्याला गद्यग्रथित अशा वास्तव जीवनाचा विसर पडतो. तो त्याला तुच्छ लेखूं लागतो. ही प्रथमावस्था झाली. आपली प्रथमावस्थेंतील कविता अशी होती, असें केशवसुतांना वाटत असावें, असें दिसतें. वस्तुतः केवळ शब्दांच्या फवाऱ्यासाठीं लिहिलेल्या कविता त्यांच्या रचनेंत जवळ जवळ नाहींतच. प्रारंभींच्या भाषांतरित कविता, किंवा 'आगबोटीच्या कांठाशीं उभ्या असलेल्या तरुणीस' यासारखी एखादी कविता यांच्याविषयींच असें वाटणें शक्य आहे. या काव्यप्रयत्नांत त्यांना वास्तव जगाचा विसर पडला, त्याच्याकडे त्यांचें दुर्लक्ष झालें, व लवकरच त्याचा परिणाम भोवूं लागला, असें त्यांचें म्हणणें. काव्याविषयींच्या सर्वसाधारण औदासीन्याविषयीं केशवसुतांनीं अनेकदां विषादपूर्ण उद्गार काढलेले आपण पाहिलें आहे. कांहीं अंशीं काव्यमग्नतेमुळें नशिबीं आलेली त्यांच्या व्यावहारिक जीवनांतील निराशा व त्यांच्या काव्यसिद्धीविषयीं इतरांची अनास्था यांचा परिपाक म्हणूनच

रागानें या जगातें अहह ! म्हणुनियां शापिलें या जनाला
तेणें चिंताग्नि माझी हृदयहरितता नाशिता फार झाला

असें त्यांनीं वर्णन केलें असावें. या ओढाताणींत काव्यमय विचार, काव्यात्म अनुभूति येत राहिली तरी शब्द आटून गेले.

गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी दूर देशास गेले,
वाग्देवीपीठ येथें परि मम हृदयीं दिव्य तें राहियेलें

असें त्यांनीं म्हटलें. ही दुसरी अवस्था. या दोन्ही प्रकारांच्या अनुभवांच्या संश्लेषणांतून वरच्या व पुढच्या पातळीवर जाणारी तिसरी अवस्था अखेरच्या श्लोकांत दिसून येते. आज, कांहीं काळानंतर, कांहीं मानसिक परिवर्तनानंतर आशामेघालि उदयास आली आहे; चिन्तानल विझवूं लागली आहे. त्यामुळें कदाचित् चित्तभूमि पुनः विकसित होईल व हृदयस्थ वाग्देवी शारदेला कल्पपुष्पें वाहतां येतील. परंतु त्यासाठीं शब्दांनीं मागें परतावें, ही कवीची प्रार्थना. अशा रीतीनें जीवनाच्या पहिल्या बहरांतील शब्द-चमत्कृति व नादमाधुर्य यांचें आकर्षण, याच गुणांनीं परिलुप्त अशा काव्याच्या आकर्षणाला बळी पडल्यामुळें व्यावहारिक जीवनाकडे होणाऱ्या दुर्लक्षाचे परिणाम, व नंतर या परस्परविरोधी शक्तींच्या समन्वयांतून उदयास येणाऱ्या नव्या आशांच्या नव्या सामर्थ्याच्या सूचक अशा काव्याचा संभव, अशा तीन अवस्थांचा निर्देश केशव-सुतांनीं या कवितेंत केला आहे.

आपल्या काव्याच्या वेगवेगळ्या अवस्थांविषयींची केशवसुतांची स्वतःची कल्पना येथें सूचकतेनें व्यक्त झाली आहे. पण त्याबरोबरच काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेंतील दोन मुख्य अंगांच्या परस्परसंबंधाविषयींहि एक महत्त्वाचा विचार येथें मांडला गेला आहे. केवळ शब्दसौंदर्यानें काव्य निर्माण होत नाहीं. अनुभूति व शब्दसंपत्ति यांच्या समन्वयांतून, आशय व शब्द यांच्या संयोगांतून तें निर्माण होतें, असा समतोल काव्यविचार येथें मांडला आहे. यावरून 'तददोषौ शब्दार्थौ सगुणौ काव्यं ...' या मम्मटाच्या उक्तीची कांहीं पंडितांना आठवण होणें शक्य आहे. आणखीहि एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. व ती ही कीं केशवसुतांनीं काव्यनिर्मितीस आवश्यक अशा मनःस्थितीचाहि उल्लेख करून ठेवला आहे. आशयशून्य वाढाळूपणा उत्साहानें परिपूर्ण असतो, परंतु खऱ्या काव्याला तो निरुपयोगी. व्यवहारी व्यग्रताहि तितकीच निरुपयोगी. या दोहोंच्या अनुभवावर आधारलेली, पण या दोहोंच्या पलीकडे गेलेली व म्हणून संयतचित्त अशा प्रसन्नतेला जेव्हां तितक्याच प्रसादपूर्ण शब्दकलेची जोड लाभते तेव्हांच 'अदोष' असें काव्य निर्माण होतें.

'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (१८९३) या कवितेंत काव्यात्मता व व्यवहार यांच्या संघर्षाची एक वेगळी व अधिक आशयपूर्ण बाजू व्यक्त झाली आहे. कवीला अचानकपणें सौंदर्यप्रतीति होते. 'बी' कवींच्या शब्दांत सांगायचें तर 'सौंदर्याचीं प्रस्फुरणें' त्याच्या अनुभवास येतात. त्या प्रतीतीमध्यें जर कांहीं नावीन्य,

कांहीं स्वयंपण असेल तरच ती सार्थ होते, असाहि एक सूक्ष्म विचार केशवसुतांनीं सहज ओघांत––

कांहीं नांव नवीन देउनि तिला जेव्हां स्वयें वाहिलें
तों तीनें वळुनी प्रसन्न वदनें त्याच्याकडे पाहिलें

या ओळींत गोवला आहे. पण हीं द्युतिपूर्ण सौंदर्याचीं प्रस्फुरणें क्षणिक ठरतात व लागलीच 'आकाची हांक' ऐकूं येते. व्यावहारिकापुढें तीं प्रस्फुरणें विलीन होतात. त्यांचें स्मरणदेखील रहात नाहीं. तें स्मरण, पुनः त्याच ठिकाणीं फिरतांना–म्हणजेच संलग्न कल्पनांच्या न्यायाप्रमाणें–होतें, हा विचार किंवा अनुभवहि मोठा सूक्ष्म आहे. परंतु आठवण्याची खटपट करून प्रतीतीचा पुनःप्रत्यय येत नसतो. आत्माराम केवळ 'सखेद' वदतो,

कांहीं सुंदर देखिलें खचित मी, यामाजिं शंका नसे
हा ! हा ! हे जर सर्व भास धरतां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर !

या शेवटच्या ओळींत अनाकलनीय व अनिर्वचनीय अशा कशाच्या तरी जाणिवेमुळें लागणारी हुरहूर प्रथम व्यक्त झाली आहे. याच जाणिवेंतून पुढें 'हरपलें श्रेय' ही कविता निर्माण झाली.

काव्योत्पत्तीच्या अंतर्गत प्रक्रियेविषयीं 'चिन्हीकरण' ही आणखी एक महत्त्वाची कविता आहे. तिचा रचनाकाल उपलब्ध नाहीं. केशवसुतांच्या संग्रहांत तिला वरेंच पुढचें स्थान दिलें आहे व ती 'कल्पकता' इत्यादि १८९०–९१ तील कवितांहून नंतरची वाटतेहि. 'कल्पकता' (१८९१) या कवितेंत केशवसुतांनीं म्हटलें कीं, सृष्टीमध्यें जें जें म्हणून सुंदर व भव्य असेल तें घेऊन देवी कल्पकता पृथ्वीला नटविते. म्हणजेच सर्व सुंदर व भव्य निसर्गदृश्यांचा ज्यांत वापर केला गेला आहे, अशा काव्यानें पार्थिव जीवनाचें सौंदर्य प्रतीत होऊं लागतें. प्रभावी काव्यांतील प्रतिमासृष्टि सुंदर व भव्य अशा निसर्गदृश्यांवर आधारलेली असते. हा एक काव्यविषयक विचार झाला. दुसरा विचार यापूर्वीच्या 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि' या कवितेंत प्रगट झाला. त्यांत वास्तव जगांतील साध्यासुध्या गोष्टींत लपलेल्या सौंदर्याची जाणीव व्यक्त झाली आहे, हें आपण पाहिलें. 'चिन्हीकरण' या कवितेंत कल्पकता व प्रतीति, कल्पनारम्यता व भावपूर्णत्व यांचा एका वेगळ्या तऱ्हेनें समन्वय घातला आहे. या कवितेंतील मूलभूत काव्यविचार अधिक उत्क्रांत व व्यापक आहे, परंतु तींत योजिलेलें रूपक मात्र मोठेंसें सहजस्फूर्त वाटत नाहीं. चिन्हीकरण म्हणजे सूक्ष्म आशयाच्या अभिव्यक्तीसाठीं ज्यांचा चिन्हांप्रमाणें सूचकपणें उपयोग केला जाईल, अशा प्रतिमांची निर्मिति. या

प्रतिमा वेगवेगळ्या ज्ञानेंद्रियांशीं संलग्न असतात. दृक्प्रतिमा, श्रुतिप्रतिमा, स्पर्श-प्रतिमा, रुचिप्रतिमा व वासाचीहि प्रतिमा असते. प्रत्येक कलेंत, तिच्या माध्यमाप्रमाणें यांतील कांहीं प्रतिमांचा आणि काव्यांत व साहित्यांत यांतील सर्वांचा उपयोग केला जातो. विशेषतः काव्य हें मुख्यतः प्रतिमांवर, व सर्व प्रकारच्या प्रतिमांवर, अवलंबून असतें. या प्रतिमा जुन्या झाल्या, परंपरागत बनल्या, म्हणजे त्यांत प्राण राहात नाहीं. त्यांचें पुनरुज्जीवन होण्यास वा नव्या प्रतिमा निर्माण होण्यास नव्या भावनेचें व प्रतीतीचें संजीवन त्यांना मिळावें लागतें. या नवोन्मेषशाली मीलनांतून काव्य निर्माण होतें, असें केशवसुतांचें म्हणणें. प्रस्तुत कवितेमध्यें कवीचा आत्मा, कवीच्या क्लृप्ति व विचार इत्यादि शब्द आल्यामुळें येथें केवळ शब्दांच्या द्वारें होणारें चिन्हीकरण अभिप्रेत आहे. एरव्हीं, भाव आणि मूर्ति यांच्या संयोगाचें क्षेत्र सर्व कलांना व्यापून राहतें. कवीच्या ध्यानमग्न स्थितींत, स्फूर्तीच्या क्षणीं, कांहीं मनोमय प्रतिमांमध्यें भावनेमुळें प्राण ओतला जातो; स्फूर्तीच्या क्षणीं घडून आलेल्या, मनोमय प्रतिमा व भाव यांच्या संयोगांतून विविधरम्य काव्यनिष्पत्ति होते, असें या रूपकाच्या द्वारें प्रतिपादिलें आहे. अशा प्रकारें वरील तीन कवितांमध्येंहि विचारांचा विकास दिसून येतो.

१८९३ पर्यत केशवसुतांची काव्यदृष्टि याप्रमाणें काव्याच्या वेगवेगळ्या भूमिका, तदंतर्गत वेगवेगळ्या प्रक्रिया, काव्याचीं अनेक अंगोपांगें इत्यादि विषयींच्या उलटसुलट विचारांनीं विकसत व वातचक्राप्रमाणेंच वर वर चढत जातांना दिसते. त्यांच्या काव्यदृष्टीच्या या व्यापकतेचें व उच्च अधिष्ठानाचें, तिच्यामध्यें झालेल्या आत्म-प्रतीति व समाजाभिमुखता, प्रतीकात्मता व भावचैतन्य यांच्या संयोगाचें जणुं प्रात्यक्षिकच त्यांच्या 'तुतारी' (१८९३) या कवितेंत मिळतें. व यानंतरहि या वातचक्राचें वर्तुळ व उंची वाढतच जाते. 'झपूर्झा' (१८९३) ही कविता केवळ काव्यविषयक नाहीं; झपूर्झा हा शब्द तन्मयतेचा सूचक आहे; व प्रा. जोग यांनीं म्हटल्याप्रमाणें, ही तन्मयता सर्व प्रकारच्या 'अपूर्ववस्तुनिर्मिती'स आवश्यक असल्याचें या कवितेंत प्रतिपादिलें आहे; हें आतां बहुतेक सर्वमान्य झालें आहे. परंतु या अपूर्व-वस्तुनिर्मितीमध्यें काव्यहि येतें, हें लक्षांत धरूनच चाललें पाहिजे. कवि, कलावंत वा शास्त्रज्ञ हर्षशोकाच्या पलीकडे जाऊन, निःसंग बनून, जें व्यर्थ वाटतें त्यांतील अर्थ शोधण्यांत मग्न झाला, तरच त्याला ज्ञाताच्या पलीकडील रहस्य हळुहळू आकळूं लागेल, जेथें

सूर्य, चंद्र आणिक तारे
नाचत सारे हे प्रेमभरें

अशा प्रकाशाच्या विश्वापाशीं तो पोचूं शकेल, ही येथील सूचित कल्पना. केवळ कवीच्या कार्याच्या विचारापेक्षां अधिक व्यापक अशा भूमिकेवर केशवसुत येथें पोंचले आहेत,

हें लक्षांत घेतलें पाहिजे. काव्यांतर्गत आत्मप्रतीति, काव्याचें सामाजिक प्रयोजन, काव्य-रचनेंतील मानसिक प्रक्रिया, काव्य आणि जीवनानुभव यांची सांगड इत्यादि प्रश्नांचा विचार करतां करतां ते ज्ञानसाधनेचा निःसंग आनंद व त्याची अनिर्बंध अभिव्यक्ति या, वरील सर्व प्रश्नांना आश्लेषून उरणाऱ्या विचाराकडे वळले. या विचारानें त्यांना 'नांगरल्याविण भुई'कडे नेलें; परंतु त्यांचें विचारांचें पूर्वसंचितहि त्यांच्याबरोबर येथें आलें. त्यांना 'न धरतां येणारे दिव्य भास' आतां पुरुष–प्रकृतीच्या क्रीडांचा स्वरसंगम झाले. 'गद्यग्रथित जगाचा' ताप त्यांना जाणवत असे; 'आका'च्या हांकेनें भासांची स्मृतिहि विरून जात असे; परंतु आतां हर्षशोक मावळले, कंटकशल्येंहि बोथटलीं. अशा रीतीनें पूर्वानुभूतींच्या चक्राचें आवर्तन आठवणीदाखल येथें आढळलें, तरी त्याची पातळी फार वेगळी, त्याचा परिघ विस्तृत झाला आहे.

'स्फूर्ति' (१८९६) या कवितेचें विश्लेषण केल्यास तेथेंहि याप्रमाणें पूर्वानुभूति व पूर्वीचे विचार यांचीं आवर्तनें वेगळ्या पातळीवर व वेगळ्या प्रमाणांत उमटलेलीं दिसतील. पहिल्या कडव्यांत अनिर्बंध काव्योन्मादाची मागणी आहे; दुसऱ्या कडव्यांत वास्तव जीवनाच्या दुरवस्थेमुळें कंटाळलेल्या जीवानें केलेलें कल्पनारम्यतेचें आवाहन आहे. 'कल्पकता' या कवितेंतील विचारांप्रमाणें चंद्र-सूर्याचें वस्त्र पार्थिव जीवनासाठीं विणावयाचें असेल किंवा 'स्फूर्ति' याच कवितेंत म्हटल्याप्रमाणें व्योमसागरावर जाऊन या गरीब धरेसाठीं उडुरत्नें फेंकावयाचीं असतील, तर औचित्याचा फोल विवेक सोडला पाहिजे. याचा परिणाम कदाचित् व्यावहारिक दृष्ट्या वाईट होईल. पापपुण्याचीं ठरीव मूल्यें, देवदानवांविषयींच्या भ्रामक कल्पना क्षणभर अडबूं लागतील; पण या स्फूर्तीच्या क्षणीं ही जाणीव होऊं द्या कीं, या कल्पना केवळ मानवानेंच निर्माण केल्या आहेत, मानवानेंच मानवाला बांधून टाकलें आहे; आणि मग, म्हणूनच तिसऱ्या कडव्यांतील समूळ क्रांतीचा विचार––केवळ काव्यांतील क्रांति नव्हे तर, 'तुतारी'मध्यें ज्या प्रकारचा प्रयत्न केला गेला तशी काव्याच्या द्वारां जीवनपरिवर्तन घडवून आणण्याची खटपट; जनताशीर्षाचा कणा घेऊन काव्याच्या पहारीनें जगाचा गोल उलथून देण्याची आकांक्षा.

केशवसुतांच्या यानंतरच्या कवितांपैकीं 'आम्ही कोण?' (१९०१) व 'प्रतिभा' (१९०४) या दोन काव्यविषयक आहेत, असें समजलें जातें. परंतु 'झपूर्झा' या कवितेंत जसा केशवसुतांपुढें काव्य आणि त्याबरोबरच निःसंग प्रतीतीवर आधारलेल्या सर्व ज्ञानसाधनेचा विचार होता, त्याप्रमाणेंच 'आम्ही कोण' या कवितेमध्यें अशा निःसंग प्रतीतींतून उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या प्रतिभाशाली निर्मितिप्रकारांचा विचार होता, असें दिसतें. 'झपूर्झा' या कवितेप्रमाणें येथेंहि केशव-सुतांनीं केवळ एका प्रकारच्या प्रतिभेचा द्योतक असा 'कवि' हा शब्द कोठेंहि वापरला नाहीं. 'आम्ही' या सर्वनामांत 'कवि' या सामान्यनामाबरोबर, ज्यांच्या अंगुलींच्या

प्रतिमा वेगवेगळ्या ज्ञानेंद्रियांशीं संलग्न असतात. दृक्प्रतिमा, श्रुतिप्रतिमा, स्पर्श-प्रतिमा, रुचिप्रतिमा व वासाचीहि प्रतिमा असते. प्रत्येक कलेंत, तिच्या माध्यमाप्रमाणें यांतील कांहीं प्रतिमांचा आणि काव्यांत व साहित्यांत यांतील सर्वांचा उपयोग केला जातो. विशेषतः काव्य हें मुख्यतः प्रतिमांवर, व सर्व प्रकारच्या प्रतिमांवर, अवलंबून असतें. या प्रतिमा जुन्या झाल्या, परंपरागत बनल्या, म्हणजे त्यांत प्राण राहात नाहीं. त्यांचें पुनरुज्जीवन होण्यास वा नव्या प्रतिमा निर्माण होण्यास नव्या भावनेचें व प्रतीतीचें संजीवन त्यांना मिळावें लागतें. या नवोन्मेषशाली मीलनांतून काव्य निर्माण होतें, असें केशवसुतांचें म्हणणें. प्रस्तुत कवितेमध्यें कवीचा आत्मा, कवीच्या क्लृप्ति व विचार इत्यादि शब्द आल्यामुळें येथें केवळ शब्दांच्या द्वारें होणारें चिन्हीकरण अभिप्रेत आहे. एरव्हीं, भाव आणि मूर्ति यांच्या संयोगाचें क्षेत्र सर्व कलांना व्यापून राहतें. कवीच्या ध्यानमग्न स्थितींत, स्फूर्तीच्या क्षणीं, कांहीं मनोमय प्रतिमांमध्यें भावनेमुळें प्राण ओतला जातो; स्फूर्तीच्या क्षणीं घडून आलेल्या, मनोमय प्रतिमा व भाव यांच्या संयोगांतून विविधरम्य काव्यनिष्पत्ति होते, असें या रूपकाच्या द्वारें प्रतिपादिलें आहे. अशा प्रकारें वरील तीन कवितांमध्येंहि विचारांचा विकास दिसून येतो.

१८९३ पर्यंत केशवसुतांची काव्यदृष्टि याप्रमाणें काव्याच्या वेगवेगळ्या भूमिका, तदंतर्गत वेगवेगळ्या प्रक्रिया, काव्याचीं अनेक अंगोपांगें इत्यादि विषयींच्या उलटसुलट विचारांनीं विकसत व वातचक्राप्रमाणेंच वर वर चढत जातांना दिसते. त्यांच्या काव्यदृष्टीच्या या व्यापकतेचें व उच्च अधिष्ठानाचें, तिच्यामध्यें झालेल्या आत्म-प्रतीति व समाजाभिमुखता, प्रतीकात्मता व भावचैतन्य यांच्या संयोगाचें जणुं प्रात्यक्षिकच त्यांच्या 'तुतारी' (१८९३) या कवितेंत मिळतें. व यानंतरहि या वातचक्राचें वर्तुळ व उंची वाढतच जाते. 'झपूर्झा' (१८९३) ही कविता केवळ काव्यविषयक नाहीं; झपूर्झा हा शब्द तन्मयतेचा सूचक आहे; व प्रा. जोग यांनीं म्हटल्याप्रमाणें, ही तन्मयता सर्व प्रकारच्या 'अपूर्ववस्तुनिर्मिती'स आवश्यक असल्याचें या कवितेंत प्रतिपादिलें आहे; हें आतां बहुतेक सर्वमान्य झालें आहे. परंतु या अपूर्व-वस्तुनिर्मितीमध्यें काव्यहि येतें, हें लक्षांत धरूनच चाललें पाहिजे. कवि, कलावंत वा शास्त्रज्ञ हर्षशोकाच्या पलीकडे जाऊन, निःसंग बनून, जें व्यर्थ वाटतें त्यांतील अर्थ शोधण्यांत मग्न झाला, तरच त्याला ज्ञाताच्या पलीकडील रहस्य हळुहळू आकळूं लागेल, जेथें

सूर्य, चंद्र आणिक तारे
नाचत सारे हे प्रेमभरें

अशा प्रकाशाच्या विश्वापाशीं तो पोचूं शकेल, ही येथील सूचित कल्पना. केवळ कवीच्या कार्याच्या विचारापेक्षां अधिक व्यापक अशा भूमिकेवर केशवसुत येथें पोंचले आहेत,

हें लक्षांत घेतलें पाहिजे. काव्यांतर्गत आत्मप्रतीति, काव्याचें सामाजिक प्रयोजन, काव्य-रचनेंतील मानसिक प्रक्रिया, काव्य आणि जीवनानुभव यांची सांगड इत्यादि प्रश्नांचा विचार करतां करतां ते ज्ञानसाधनेचा निःसंग आनंद व त्याची अनिर्बंध अभिव्यक्ति या, वरील सर्व प्रश्नांना आश्लेषून उरणाऱ्या विचाराकडे वळले. या विचारानें त्यांना 'नांगरल्याविण भुई'कडे नेलें; परंतु त्यांचें विचारांचें पूर्वसंचितहि त्यांच्याबरोबर येथें आलें. त्यांना 'न धरतां येणारे दिव्य भास' आतां पुरुष–प्रकृतीच्या क्रीडांचा स्वरसंगम झाले. 'गद्यग्रथित जगाचा' ताप त्यांना जाणवत असे; 'आका'च्या हांकेनें भासांची स्मृतिहि विरून जात असे; परंतु आतां हर्षशोक मावळले, कंटकशल्येंहि बोथटलीं. अशा रीतीनें पूर्वानुभूतींच्या चक्राचें आवर्तन आठवणीदाखल येथें आढळलें, तरी त्याची पातळी फार वेगळी, त्याचा परिघ विस्तृत झाला आहे.

'स्फूर्ति' (१८९६) या कवितेचें विश्लेषण केल्यास तेथेंहि याप्रमाणें पूर्वानुभूति व पूर्वीचे विचार यांचीं आवर्तनें वेगळ्या पातळीवर व वेगळ्या प्रमाणांत उमटलेलीं दिसतील. पहिल्या कडव्यांत अनिर्बंध काव्योन्मादाची मागणी आहे; दुसऱ्या कडव्यांत वास्तव जीवनाच्या दुरवस्थेमुळें कंटाळलेल्या जीवानें केलेलें कल्पनारम्यतेचें आवाहन आहे. 'कल्पकता' या कवितेंतील विचारांप्रमाणें चंद्र-सूर्यांचें वस्त्र पार्थिव जीवनासाठीं विणावयाचें असेल किंवा 'स्फूर्ति' याच कवितेंत म्हटल्याप्रमाणें व्योमसागरावर जाऊन या गरीब धरेसाठीं उडुरत्नें फेंकावयाचीं असतील, तर औचित्याचा फोल विवेक सोडला पाहिजे. याचा परिणाम कदाचित् व्यावहारिक दृष्ट्या वाईट होईल. पापपुण्याचीं ठरीव मूल्यें, देवदानवांविषयींच्या भ्रामक कल्पना क्षणभर अडवूं लागतील; पण या स्फूर्तीच्या क्षणीं ही जाणीव होऊं द्या कीं, या कल्पना केवळ मानवानेंच निर्माण केल्या आहेत, मानवानेंच मानवाला बांधून टाकलें आहे; आणि मग, म्हणूनच तिसऱ्या कडव्यांतील समूळ क्रांतीचा विचार––केवळ काव्यांतील क्रांति नव्हे तर, 'तुतारी'मध्यें ज्या प्रकारचा प्रयत्न केला गेला तशी काव्याच्या द्वारां जीवनपरिवर्तन घडवून आणण्याची खटपट; जनताशीर्षाचा कणा घेऊन काव्याच्या पहारीनें जगाचा गोल उलथून देण्याची आकांक्षा.

केशवसुतांच्या यानंतरच्या कवितांपैकीं 'आम्ही कोण?' (१९०१) व 'प्रतिभा' (१९०४) या दोन काव्यविषयक आहेत, असें समजलें जातें. परंतु 'झपूर्झा' या कवितेंत जसा केशवसुतांपुढें काव्य आणि त्याबरोबरच निःसंग प्रतीतीवर आधारलेल्या सर्व ज्ञानसाधनेचा विचार होता, त्याप्रमाणेंच 'आम्ही कोण' या कवितेमध्यें अशा निःसंग प्रतीतींतून उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या प्रतिभाशाली निर्मितिप्रकारांचा विचार होता, असें दिसतें. 'झपूर्झा' या कवितेप्रमाणें येथेंहि केशव-सुतांनीं केवळ एका प्रकारच्या प्रतिभेचा द्योतक असा 'कवि' हा शब्द कोठेंहि वापरला नाहीं. 'आम्ही' या सर्वनामांत 'कवि' या सामान्यनामाबरोबर, ज्यांच्या अंगुलींच्या

स्पर्शनिं वस्तुवस्तूला सौंदर्य प्राप्त होतें असे प्रतिभाशाली शिल्पकार–चित्रकार, निःशब्दाच्या ओसाडींत जे सुरांचें, नादाचें, संगीताचें विश्व वसवतात असे संगीतकार, किंवा सुर व असुर यांच्या कल्पना व त्यांविषयीं श्रद्धा निर्माण करणारे व्यासवाल्मीकी-सारखे आद्य ऋषि, आपल्या प्रतिभेच्या साहाय्यानें सामाजिक पुनर्रचनेचें स्फूर्तिदायी कल्पनाचित्र पाहून पृथ्वीचा स्वर्ग बनवण्यास झटणारे ध्येयनिष्ठ कृतिवीर, या सर्वांच्या अभिधानाचीं सामान्यनामें समाविष्ट आहेत. व या सर्वांना वगळलें तर जीवन कवडीमोल होईल, असा निर्वाणीचा इषारा त्यांनीं देऊन ठेवला आहे.

'प्रतिभा' (१९०४) ही कविता 'आम्ही कोण?' या कवितेइतकी ओजस्वी व प्रसादपूर्ण नाहीं. तींत तेवढी सहजताहि नाहीं. तिच्यांतील परिभाषेंत व शब्दकलेंत अवास्तव जडपणा वाटतो. कांहीं उपमा व शब्दप्रयोग यथार्थपणें साधलेहि नाहींत. त्यामुळें कवितेचा दर्जा खालावला आहे. परंतु काव्यविचाराच्या किंवा प्रतिभे-विषयींच्या विचाराच्या दृष्टीनें पहावयाचें तर ज्या 'प्रतिभावलें' 'आम्ही कोण?' मधील 'देवाचे लाडके' विश्वामध्यें 'लीलया' विचरतात, त्या अत्यद्भुत शक्तीचेंच येथेंहि वर्णन आहे. प्रतिभेचा आविष्कार कशा प्रकारें होतो, त्या आविष्काराचा जीवनावर काय परिणाम होतो, याविषयींच्या कल्पनाहि दोन्ही कवितांमध्यें जवळ जवळ सारख्या आहेत. 'देव' आणि 'दानव' या शब्दांचा उपयोग आधींहि केशव-सुतांनीं केवळ पौराणिक किंवा पारंपरिक पद्धतीनें केला नाहीं. 'तुतारी' मधील 'देवांच्या मदतीस चला तर' या ओळीच्या आठवणीवरून हें स्पष्ट होण्यासारखें आहे. आध्यात्मिक परिभाषेचें अवडंबर दूर केलें तर काव्याच्या महत्त्वाच्या दृष्टीनें एक विचार लक्षणीय आहे. व तो म्हणजे,

शब्दब्रह्म उचंबळून मग जें दाही दिशा व्यापितें
त्याच्यांतून भविष्यवाद निघतो, ऐकून ते सादर;
ब्रह्म्यातें क्षमता नवीन-रचना-कार्य-क्रमीं लाधते!

या ओळींत व्यक्त झालेला. प्रतिभावंतांच्या द्रष्टेपणाचा. त्यांच्या शब्दाशब्दांतून भविष्यवाद (नाद?) निघतात. त्यांतून ब्रह्म्यालाहि नवीन जीवनाच्या निर्मिती-साठीं, जीवनपरिवर्तनासाठीं स्फूर्ति मिळते.

आधीं झालें रामायण मग राम जानकीवर

या 'वी' कवींच्या ओळींत एका रूढ कल्पनेच्या आधारानें हेंच सुचविलें आहे.

१८९३ ते १९०३ या काळांत केशवसुतांच्या कांहीं अत्यंत प्रभावी व उत्कृष्ट अशा काव्यविषयक कविता रचल्या गेल्या. त्यांपैकीं कित्येक कवितांमध्यें काव्य-विषयक विचारांपेक्षां अधिक खोल आशय सुचविला वा स्पष्टपणें निर्देशिलाहि गेला

आहे. त्यांच्या विचारांचें वर्तुळ आणि अभिव्यक्तीची झेंप व सूक्ष्मता वाढली. त्यांची काव्यदृष्टि केवळ आत्मलक्षी राहिली नाहीं, तशी केवळ काव्याच्या सामाजिक परिणामावरहि खिळून राहिली नाहीं. पुनः या दोहोंना आश्लेषून, त्यांच्या समन्वयाच्या शक्तीनेंच ती आणखी वरच्या पातळीवर गेली. काव्य आणि इतर प्रतिभाशाली अभिव्यक्तीचे प्रकार यांच्या साकल्यात्मक विचाराकडे ती वळली. जीवनांतील प्रतिभावंतांच्या स्थानाविषयीं स्पष्ट व व्यापक कल्पना तिनें मांडल्या. अशा या व्यापक व उत्क्रांत काव्यदृष्टीच्या परिपूर्तीचें प्रात्यक्षिक त्यांनीं पुनः एकदां आपल्या 'गोफण' व 'हरपलें श्रेय' या अखेरच्या कवितांत दिलें. या काव्यदृष्टींतून निर्माण झालेली कविता केवळ कल्पनारम्य, नाजुक वा स्वप्नाळू रहात नाहीं; हा कवि 'स्वहृदय फाडुनि निजनखरीं' त्या 'चिवट दोराची' 'गोफण' करतो, व्यक्तिविनाशक वा समाजविरोधी अशा सर्व मानवी प्रवृत्तींवर तो वैर पुकारतो व कठीण शब्दांच्या धोंड्यांची 'हाणाहाण' करून त्या प्रवृत्तींना नाहींसें करण्यास उद्युक्त होतो. परंतु, त्यावरोबरच या कवीच्या अंतर्जीवनांत दुसराहि एक खोल, नाजुक, व्यापक व आर्त भावप्रवाह आहे. त्याला कुठली तरी ओढ लागली आहे. त्याचें कांहींतरी गमावलें आहे. आपलें कैवल्य कांहीं वेगळेंच आहे, याची त्याला नित्य जाणीव आहे. त्या कैवल्याचा कोठें कोठें पुसट भास होतो व ती ओढ आणखी बळावते. जीवनरुचि नष्ट होते. जें सांपडत नाहीं, उमजत नाहीं, त्याचाच ध्यास लागतो. तें व्यक्तीच्या पार्थिव जीवनापलीकडचें आहे, व्यक्ति आणि समाज यांच्या परस्परसंबंधांपलीकडचें आहे, काव्याच्या वा विविध प्रकारच्या ज्ञानाच्या पलीकडचें आहे. हें केशवसुतांचें 'हरपलें श्रेय'.

(मौज, दिवाळी १९५२;
पृ. क्र. ३७–४४)

२८

केशवसुतांचें व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निराशा

लेखक : शरच्चंद्र मुक्तिबोध

केशवसुतांच्या काव्यावर आजवर अनेकांनीं लिहिलें आहे; व त्यांच्या काव्याचा निरनिराळ्या दृष्टीनें विचारहि करण्यांत आला आहे. अगदीं अलीकडे प्रा. भवानीशंकर पंडित यांनीं केशवसुतांच्या काव्यांतील निराशेकडे रसिकांचें लक्ष वेधलें असून त्यांची निराशा वैफल्याच्या भावनेंतून निर्माण झाली होती असें ते सुचवूं इच्छितात. केशवसुतांचा जोमदार आशावाद व द्रष्टेपणा यांशीं विसंगत अशी ही वृत्ति आहे हेंहि त्यांना सुचवायचें असावें. मागें एकदा श्री. माडखोलकरांनींहि केशवसुतांवर स्त्रैणपणाचा आरोप केल्याचें वाचकांना स्मरत असेलच. या व अशा प्रकारच्या टीकालेखकांनीं वाचकांच्या विचारास चालना मिळत असली तरी गोंधळ वाढण्याचा संभवहि अधिक असतो. मला वाटतें केशवसुतांचें काव्य समग्रतेनें समजून घेण्यासाठीं त्यांच्या कवितेच्या एकेका अंगाचा वेगवेगळा विचार न करतां काव्यांत प्रकट होणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्वाच्या मूळवृत्तीचा विचार झाला पाहिजे. केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेतल्यास त्यांच्या कवितेचें मर्म आपणांस अधिक सुस्पष्टपणें कळूं शकेल.

युरोपीय विज्ञानवाद महाराष्ट्रांत इंग्रजांनीं आणला; आणि त्या काळच्या ब्राह्मण समाजाला इंग्रजी शिक्षण देऊन स्वतःच्या भारतीय समाजाकडे या शास्त्रीय विवेकवादाच्या दृष्टीनें पहावयास त्यांनीं शिकविलें. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाची बैठक इहलोकनिष्ठा ही होती. मानवी प्रयत्नांच्या आपार शक्तीवर आधारलेलें

हें व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्वज्ञान विवेकवादाच्या मदतीनें समजून घेतांच या नव्या सुशिक्षित समाजाचे डोळे खाडकन् उघडले; या दैववादी, परलोकनिष्ठ, रूढिग्रस्त, जातिभेदावर आधारलेल्या भारतीय समाजाची अंतर्घटनाच पूर्णपणें बदलून टाकली पाहिजे अशी त्यांची दृढ समजूत झाली. जुन्याचा आणि नव्याचा प्रचंड संघर्ष अशा रीतीनें सुरू झाला. घोर रूढिनिष्ठ अशा समाजाला डिवचलें असल्यामुळें हा लढा अतिशय निकराच्या स्वरूपाचा झाला. व्यक्ति आणि समाजांत, व्यक्ति आणि कुटुंबांत, पिता आणि पुत्रांत, स्त्री आणि पुरुषांत असा हा लढा सर्व क्षत्रांत होता. सुमारें शंभर वर्षे हा लढा सतत आणि अत्युग्र स्वरूपांत चालत राहिला.

ही सुशिक्षित मंडळी ब्राह्मणच असल्यामुळें त्यांना हा लढा घरीं आणि दारीं दोन्ही ठिकाणीं करावा लागला. हिंदू-ब्राह्मण कुटुंबांतील स्त्रीची दशा ही दासीहूनहि निकृष्ट दर्जाची असल्याचें त्यांना आढळून आलें; आणि स्त्रीदास्यविमोचन हें त्यांचें पहिलें कर्तव्य ठरलें. तसेंच जातिभेद हा माणुसकीला काळिमा फासणारा आहे हें कळून चुकल्यामुळें तोहि नष्ट करणें हें त्यांना आपलें आद्य कर्तव्य वाटलें. समाजाच्या रूढींवर घणाचे घाव करून त्याला नुसतें जागवून काय उपयोगाचें ? त्याला नवें ज्ञानहि दिलें पाहिजे व त्याच्या आधारावर त्याला स्वतःचें जीवन बदलविण्यास शिकविलें पाहिजे. परंतु तसें करण्यास परतंत्र भारतांत वाव मिळणें अशक्य होतें. म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलें पाहिजे ही प्रबळ इच्छाहि तत्कालीन सुधारकांच्या मनांत वास करूं लागली. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य मिळवणें हें आपलें परम कर्तव्य होय या नव्या जाणिवेनें भारलेल्या नवशिक्षित वर्गानें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत मोठ्या हिरीरीनें स्वमतप्रतिपादनार्थ संघर्ष करण्यास आरंभ केला. सर्वारंभीं सामाजिक सुधारणांकडे या वर्गाचें लक्ष्य वेधलें जाणें साहजिकच होतें. म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापासून विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणापर्यंत रूढिग्रस्त भारताचे सरंजामी संबंध तटातट तोडून टाकण्यासाठीं मोठ्या अटीतटीच्या लढाया देण्यांत आल्या. आणि कमींतकमी मराठी ब्राह्मण समाज या संघर्षामध्यें पूर्णपणें घुसळून निघाला. त्या युगाच्या मानवकल्याणासंबंधीं सर्वोच्च मूल्यांनीं अनेक लोक भारले गेले; म्हणून महाराष्ट्रानें त्या काळांत एकाहून एक वरचढ नररत्नें निर्माण केलीं. केशवसुत हे त्यांपैकीच एक होते. केशवसुतांनीं नवचैतन्यानें सळसळणाऱ्या अशा महाराष्ट्रांत जन्म घेतला होता.

याउलट, दुसऱ्याहि प्रकारची घडामोड मराठी समाजांत होत होती.

ती म्हणजे पांढरपेशा वर्ग दुभंगत होता. सर्वस्वाचा त्याग करून समाजहितार्थ झटावें असें ज्या प्रकारें अनेकांना वाटत होतें त्याचप्रमाणें शिकून चांगलीशी नौकरी मिळवून सुस्थिर आयुष्य घालवावें असेंहि शेंकडा नव्वद टक्के लोकांना वाटत असे. इंग्रजी शिक्षणानें समाजक्रांति करणें जसें शक्य होतें तसेंच तें शिक्षण विकून उत्तम

तन्हेनें चरितार्थ चालविणेंहि शक्य होतें. तसें व्हावें अशी इंग्रजांचीहि इच्छा होतीच. तशीच आर्थिक परिस्थितीहि उदयाला येत होती. या नव्यानें सुस्थिर होऊं पाहणाऱ्या मध्यमवर्गाचीं स्वतःचीं अशीं मूल्यें तयार होत होतीं. व्यवहारांत हुषार, चारचौघांत वजन पाडणारा, शिकून वरचा सामाजिक दर्जा मिळविणारा तरुण साहजिकच आदर्श समजला जात होता. निव्वळ मानवी सद्गुणांना एकंदर व्यवहारांत गौणत्व येणें साहजिक होतें. अतिशय दारिद्र्यांत राहून आईबाप, मुलगा पुढें कमावता होऊन दारिद्र्य दूर करील या एका आशेवर मुलांना शिकवूं लागले. मुलें भराभर शिकून नोकऱ्या पटकावूं लागलीं व चारचौघांच्या कौतुकास पात्र ठरूं लागलीं. वरिष्ठांशीं नमून व इमानदारीनें वागूं लागलीं; इंग्रजधार्जिणी मनोवृत्ति आत्मसात् करूं लागलीं; म्हणूनच तीं एकंदर समाजकारणाकडे मोठ्या उदासीनतेनें पाहूं लागलीं. शहाणा-व्यवहारवाद बाळगणारा मध्यम वर्ग जसजसा स्थिर होऊं लागला तसतशी त्यांच्यांत आणि समाजसुधारकांच्या झुंजार तुकडींत फारकत पडूं लागली ! या मध्यमवर्गीयांच्या दृष्टीनें हे सुशिक्षित क्रांतिकारी वेडेपीर ठरले असल्यास नवल नाहीं.

नव्या सुधारकांची ही नवी तुकडी आणि शहाणा मध्यम वर्ग यांच्यांत मोठीच तफावत पडली असली पाहिजे. सुधारकांनीं इंग्रजांकडून विवेकवाद घेतला, नवीं व्यक्ति-मुक्तीचीं मूल्यें घेतलीं, तर शहाण्या मध्यम वर्गानें त्याच विचारसरणींतून भोगवाद घेतला व इंग्रजधार्जिणेपणा स्वीकारला. नवसुधारकानें नवज्ञानाच्या प्रकाशांत स्वतःचें जीवन बघून त्याला वदलण्यासाठी हिरीरीनें, मनस्वीपणानें विचारांत आणि आचारांत बदल घडविण्यास सुरुवात केली, तर नोकरपेशी मध्यमवर्गानें अलिप्तपणाची, तडजोजोडीची, सुवर्णमध्याची वृत्ति स्वीकारली व मवाळपणाला 'युक्तायुक्त-विवेकाचें' स्थान देऊन गौरविलें. अशा रीतीनें इंग्रजी शिकून तयार झालेल्या मध्यमवर्गाला दोन फाटे फुटले. त्यांचे मार्ग परस्परविरुद्ध झाले.

आणि हे नवशिक्षित सुधारक मध्यमवर्गाचेच असल्यामुळें त्यांचें अस्तित्व त्या समाजाला डोळ्यांतील खडयासारखें बोचत असे. नवध्येयानें भारलेल्या त्यागी तरुणांच्या कुटुंबांतील आणि समाजांतील लढा वर विस्तारानें सांगितलेल्या दोन मूल्यांचा, दोन वृत्तींचा, दोन दृष्टिकोणांचा लढा ठरत असे. प्रत्येक नवसुधारकाला त्या लढ्याला तोंड द्यावें लागलें.

केशवसुत हे अशा तरुणांपैकीच एक होते. त्यांचा एकंदर कौटुंबिक आणि सामाजिक लढा वरील दोन मूल्यांचा लढाच ठरत होता. तो लढा ते फारच सच्चेपणानें, बाणेदारपणानें लढले असल्यामुळें अतिशय प्रिय अशा आप्तजनांचाहि त्यांना विरोध सहन करावा लागला; व त्याची खंतहि त्यांना अतिशय लागून राहिली. परंतु ध्येयदृष्ट्या 'दुःखाचा पेला' अगदीं अवश्यभावी असल्याचें त्यांनीं तितक्याच निर्भय वृत्तीनें ठरवून टाकल्यामुळें तो 'डोळे मिटुनी' प्यायाचें कर्तव्यहि त्यांनीं

तितक्याच निर्भय वृत्तीनें ठरवून टाकलें होतें. ज्यांच्यावर जिवापाड प्रेम होतें त्यांचाच अपेक्षाभंग करण्याचें कृत्य त्यांना करावें लागल्यामुळें त्यांची व्याकुळ विव्हलता जागोजाग व्यक्त होते; व त्यांच्या ध्येयमार्गावरील अशीं निरनिराळीं द्वंद्वें यामुळें त्यांच्या काव्यांतून उत्तम तऱ्हेने प्रकट होतात.

कर्ते सुधारक आणि केशवसुत यांच्यामध्येहि एक भेद होता. या भेदानेच केशवसुतांची मनोवृत्ति निश्चित केली. कर्त्या सुधारकांचें कार्य नजरेंत भरणारें होतें; सर्वांना जाणवणारें असें व्यावहारिक होतें. त्यांना अनुयायी लाभत, व त्यांचा मध्यमवर्गावर दबदबा असे; त्यांचें कार्य चटकन् दिसणारें, तात्कालिक परिणाम करणारें असे. म्हणून समाजांत त्यांना मान्यता असे. त्यांच्या मागे उभ्या असलेल्या शक्तीमुळें, त्यांचा दरारा वाटत असे. परंतु केशवसुतांचें हेंहि कार्य नव्हतें. तें नजरेंत भरण्यासारखें नव्हतें. त्या कार्यानें अनुयायांचा पाठिंबा मिळणें फारसें शक्य नव्हतें. त्या कार्याचा परिणाम तावडतोब दृष्टिगोचर होण्यासारखा नव्हता. त्यामुळें त्यांच्या ध्येयाला व कार्याला व्यवहारी लोकांच्या दृष्टीनें किंमत शून्य होती. आपल्या ध्येयमार्गाचे केशवसुत एकटेच वाटसरू होते. नवमूल्यांच्या ध्येयाकडे त्यांनाहि चालायचें व चालवायचें होतें; आणि त्याबद्दल त्यांना संपूर्ण उपेक्षाच सहन करावयाची होती.

केशवसुतांचें ध्येय होतें काव्य करणें, नवें काव्य करणें, संपूर्ण समाजाला पुढें नेईल असा नवसंदेश देणारें काव्य करणें, साध्या माणसाच्या तीव्र अनुभतींना उत्कटतेनें वाचा फोडील असें काव्य करणें. आणि त्या दृष्टीनें समाजाच्या गर्भांतून फुटूं पाहणाऱ्या चैतन्य-लोळाशीं त्यांना एकजीव व्हावयाचें होतें. हेंच त्यांचें ध्येय असल्यामुळें आणि या ध्येयाच्या महानतेची त्यांना पूर्ण कल्पना असल्यामुळें वांट्याला येणारी सर्व उपेक्षा व उपहास सहन करावयाची त्यांची पूर्ण तयारी होती. म्हणूनच ते मध्यमवर्गीय समाजांत राहूनहि एकटेच होते–भ्रमिष्ट होते.

कल्लोळांच्या क्षोभें गर्जत आहे
त्या सागरतीरीं उभा गडे मी आहें!

केशवसुतांच्या कवितेंत 'गर्जणाऱ्या सागराच्या तीरीं ते उभे आहेत' ही जाणीव जशी दिसून येते, तशीच त्यांचा एकाकीपणाहि मनाला खोलवर जाणवतो. त्यांच्या विषण्ण काव्यांत त्यांचा संपूर्ण एकाकीपणा प्रकट झाला आहे. ते दिवाळींत गिरणातीरावर एकटेच जाऊन बसतात; काळोख्या रजनींत हृदयीं खंती बाळगून ते विमनस्कपणें एकटेच रस्त्यावरून हिंडत असतात; मध्यरात्रीच्या एकांतांत घुबडाची सोबत त्यांना आवडते. कारण 'वाटे मनुजांचा कंटाळा; दुःख करित बैसणें आवडे, जेथें राहे अंधार' अशी त्यांची मानसिक दशा असते. आणि पुष्पाची सुकुमारता पाहून

सौकुमार्य तव अजुनी राहे
हंसतचि आहे हास्य तुझें हें
परि मम भाळीं ढग अश्रूंचा—हाय डंवरलाहे !

अशी त्यांची स्थिती झालेली आहे. आणि या आत्यंतिक निराश कवितांमधून कल्लोळांच्या क्षोभांनी गर्जणाऱ्या सागरतीरावर कवि एकटाच उभा आहे असें दिसून येतें !

आणि खरोखरच केशवसुत एकाकी होते. ते ज्या समाजांत राहत होते तो 'औचित्याचा फोल विवेक बाळगणारा' शहाणा–व्यवहारवादी समाज होता. केशवसुतांनीं त्या समाजाकडन कसलीहि अपेक्षा केलेली नव्हती. कुटुंबांतील सर्व मंडळी भराभर वरच्या पदावर पोचत असूनहि केशवसुतांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. समाजांत वसून स्वतःचा एक फोटोहि त्यांनीं कधींच काढून घेतला नाहीं; कारण त्या सर्वांच्या दृष्टीनें केशवसुत कुचकामाचे, पैसा न कमावणारे, स्वाभिमानाला मुळींच मुरड न घालणारे, नेहमींच स्वतःच्या एका विशिष्ट पातळीवर राहणारे व त्यांच्या प्रत्येक दोषांकडे आतिशय चिकित्सक दृष्टीने पाहणारे असे असावेत. त्यामुळें त्यांनीं त्यांची गणना भ्रमिष्टांत केली असणें साहजिकच होतें. आणि अशा स्वाभिमानाला दुखविणाऱ्या आप्तेष्टांच्या समाजापासून दहा हात दूर राहणें केशवसुतांना क्रमप्राप्तच होतें. आणि येथें राहणेंहि कवीला जड वाटावें अशी त्यांची मनःस्थिति नेहमीं होत असल्यास नवल काय ?

मलाही या पृथ्वीवरिल गमतें गे जड जिणें
इथें या दुःखांतें सतत मनुजाला दडपणें
इथें न्याय–स्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो
नरालागीं येथें नरच चरणांहीं तुडवितो ! !

आणि अशा वेळीं–

आजवेरी बहु मनोभंग झाले
बहुत आशांचे प्राण निघुन गेले
तया शोचाया निर्जनांत जावें
एकतारी छेडीत मीं बसावें

अशी निर्जनवासाची कधी कधी इच्छा होत असणें साहजिकच आहे. आणि यावाबत कवीने थोडीशी स्वतःवर टीकाहि करून घेतली आहे.

अस्मदीय हृदयीं ठरलें
कीं जग हें दुःखें भरलें
म्हणुनी सुंदरतेला ही
कुसें अम्हां दिसती पाहीं

केशवसुतांचा हा एकाकीपणा, ही निराशा त्यांनीं जाणनबुजून, डोळे उघडे ठेवून पत्करली होती. त्यांचा संघर्ष सदोदित जिवंत होता हें सिद्ध करणारा हा एकाकीपणा होता. सच्चा माणूस भांडवलशाही समाजरचनेंत एकाकीच राहतो. आणि भारतांत भांडवलशाही स्वातंत्र्याचें निशाण घेऊन अवतरली नव्हती तर गुलामगिरीचा गळफांस हातांत घेऊन आली होती. गुलामींत आनंद मानणारांना केशवसुतांचा ध्येयवाद उपहास करण्यालायक वाटला असणें स्वाभाविक आहे. आणि उद्याचें दिव्य स्वप्न हृदयांत वागविणारा कलावंत अशा समाजांत एकाकी न राहिला तरच नवल !

तेव्हां केशवसुतांचा एकाकीपणा हा त्यांच्या ध्येयवादांतून उद्भवणारा सुस्पष्ट परिणाम होय.

केशवसुतांच्या एकाकीपणाच्या अनुषंगाने त्यांच्या कविविषयक कल्पनेकडे वळणें आवश्यक आहे. केशवसुतांच्या दृष्टीने वस्तूंना कवीच्या स्पर्शाने सौंदर्य प्राप्त होतें; सर्व मूल्यें जिवंत ठेवणारा कवीच, तो नसेल तर जिणें कवडीमोलावर विकेल, सर्व साधारणांना जें व्यर्थ वाटतें त्यांतूनच कवि अर्थ शोधून काढील, शब्दशक्तीची तरफ घेऊन जग उलथून देऊन बंड करणारा कवीच; कोणत्याहि महान ध्येयाला प्रभावी करणारा व पुढील पिढ्यांना युगाच्या स्फूर्तीचा साक्षी राहूं शकणारा कवीच, आणि 'भविष्यवाद' वर्तविणारा देखील कवीच. केशवसुतांचा कवित्वाचा आदर्श एवढा उत्तुंग होता आणि तो स्वतःच्या काव्यांतून साकार करण्यासाठीं त्यांनीं अक्षरशः जिवाचें रान केलें. त्या काळच्या उत्तुंग सामाजिक ध्येयांप्रमाणें हेंहि महान ध्येयच होतें आणि या ध्येयाप्रीत्यर्थ वांट्याला येणारी निराशा व अपेक्षाभंग हाहि त्याच दर्जाचा समजला पाहिजे. कारण त्यांमधून असेंच उत्कट महान व्यक्तिमत्त्व प्रकट होतें.

कवितेची आराधना करतांना केशवसुतांना कधीकधी अगदीच हताश एकाकी वाटत असल्यास नवल नाहीं. आपल्या हातून कविता-निर्मिती होऊं शकेल कीं नाही याबाबत त्यांना कधी कधी फारच संशय वाटे. ते म्हणत–

हीन दीन झालों फंदी मी तुझिया नादीं
त्यामुळे परी न मनाला घालितों कधिहि विषादीं
बूज तुवां या दासाची केली गे नाही अजुनी
दुःख हेंच वाटे, म्हणुनी गातसें अशीं गान्हाणीं

केशवसुतांची अपेक्षा होती ती हीच !

केशवसुतांचे वैय्यक्तिक गाढ मित्रत्वाचे संबंध केवळ याच ध्येयवादाच्या आधारावर होऊं शकत असत. हें ज्यांना अमान्य असे अशा उपहास करणाऱ्यांशीं सूज्ञपणें वागणें केवळ अशक्य होतें. त्यांचा लहान भावावर मोठा लोभ; पण त्याच्याकडून त्यांची अपेक्षा पहा.—

'बापू! गडचा ध्वज उभा धरशील काय?
तूं देशकारण करूं झटशील काय?
बापू! जनांत दिवटी धरशील काय?
स्वातंत्र्य-देव मनसा भजशील काय?'

मित्राच्या खोलीवर गेले तेव्हा खोलीला कुलूप होतें. तो नसल्याचें पाहून त्यांना फार दुःख वाटलें; व त्यांची परस्पर मैत्री डोळ्यांसमोर साक्षात् उभी झाली. ही मैत्री कशा प्रकारची होती? ते दोन ध्येयासाठीं तळमळणारे जुळे आत्मे होते! त्यांनी एकत्र बसून अत्यंत उत्कटतेने ध्येयें पाहिलीं होतीं. तोच त्यांच्या मैत्रीचा दुवा. तें सारें सारें त्यांच्या डोळ्यांसमोर उभें झालें. ते म्हणातात–

देशाविषयी गोष्टी बोलत येथे
बसलों विसरुनि कितीकदा निद्रेतें
श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हा
अश्रूंमध्ये अश्रु गळाले तेव्हा.
तेव्हा आम्हीं म्हटलें ही ग्रहासाची
रजनी केव्हा विरून जाइल साची
स्वतंत्रतेची पहाट ती येईल
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील?

आणि—

कोठें असशिल आतां मित्रा माझे?
करीत असशिल काय काय तीं काजें
देशासाठी शरीर झिजवायाला
स्फूर्ती आणित असशिल का कोणाला?

ही त्यांची मित्राकडून अपेक्षा होती.

आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो!
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळे हो!

अहोरात्र अशा तळमळीने वागणाऱ्या कवीच्या वैयक्तिक व्यावहारिक आकांक्षा

असतील असें सिद्ध करण्याला कोठेहि पुरावा सापडत नाही. त्यांनी व्यवहारी जगाची पर्वाच कधी केली नाही–

छंद फंद उच्छृंखळ अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या
काठोकाठ भरूं द्या पेला फेस भराभर उसळूं द्या !

अशीच त्यांची अत्यंत निधडी वृत्ती होती. त्यांची निराशा म्हणजे ध्येयमार्गावर चालतांना होणारी निराशा ! 'मला कीर्ति मिळाली नाही, मला संपत्ति मिळाली नाही, मला मान मिळाला नाही' म्हणून रडणारी ती निराशा नव्हती. आपली दुर्दशा होणार हें काय त्यांना माहीत नव्हतें ? पण या दुर्दशेमधूनच काव्यौघ निघतील अशी त्यांना खात्री होती. त्यांनी स्पष्टच म्हटलें आहे–

वाणीचे कवि-दुर्दशांमधुनिया ते ओघ यावे जसे

कवीने दुर्दशेचें व्रत अंगिकारलेंच पाहिजे. दुःखाचा पेला प्यालाच पाहिजे. कारण बुडाशीं अतिशय मौल्यवान अनुभवाचा गाळ असतो ना ? तो काव्यांत अमृताचें स्वरूप धारण करतो. केशवसुतांच्या काव्यांत ही डोळस वृत्ती अगदी सर्वत्र दिसते. म्हणूनच ते–

पूजितसें मी कवणाला ? तर मी पूजी अपुल्याला

असें अहंकाराने म्हणूं शकतात आणि प्रीतीसमोर–

पुष्पीं या प्रीति असे
ती 'मी' पण हाणितसे
परविषयी तन्मयता प्रेरिते उरीं
ने दृष्टि अंतरीं

असा अत्यंत नम्र व सखोल अनुभव लिहूं शकतात. आणि वरील दोन्ही उताऱ्यांमध्यें तफावत नसून त्यांच्या मागे एक एकजिनसी व्यक्तित्व उभें आहे हें मार्मिकांना सांगणें नलगे.

अशा या अत्यंत नम्र परंतु माणुसकीचा दृढ अहंकार बाळगणाऱ्या कवीच्या निराशेमधून 'तुतारी', 'शूर शिपाई', 'काठोकाठ भरूं द्या पेला' 'नैर्ऋत्येकडील वारा', 'म्हातारी', 'गोफण' ह्या व ह्यांसारख्या अनेक अजरामर कविता निर्माण होऊं शकत होत्या. भविष्याचाहि वेध घेणारी तशी प्रतिभा महाराष्ट्रांत अजून जन्माला यावयाची आहे. नवें काव्य केल्यामुळे रूढिपूजकांकडून होणारा उपहास, व्यवहारीपणाला दूर लोटल्यामुळे होणारी निंदा व स्वतःच्या या वृत्तीमुळे मातापितरें व

स्वकीयांना होणाऱ्या दुःखाबद्दल वाटणारी हळहळ व समाजाकडून उपेक्षा अशा तिहेरी आक्रमणांतून अगदी निःशब्दपणें परंतु अत्यंत बाणेदारपणें मार्ग काढीत वाटचाल करून मराठी भाषेला अमोल काव्य देणाऱ्या या कवीची खरी प्रकृति समजून त्या दृष्टीनेच त्यांच्या 'भिकार या जगीं इच्छित न मिळे कांही' या व अशासारख्या ओळींचा अर्थ लावला पाहिजे. तरच कवीला न्याय होऊं शकेल; त्याची निराशाहि अत्यंत स्फूर्तिप्रद होऊं शकेल.

या लेखांकांत केशवसुतांच्या निराशेपुरताच त्यांच्या व्यक्तित्वाचा विचार करणें शक्य झालें आहे. त्यांच्या कवितेच्या निरनिराळ्या पैलूंचा विचार करून अनेक नवीन तथ्यें हातीं लागण्याचा संभव आहे. परंतु तो विचार पुढील एखाद्या लेखावर ढकलणेंच भाग आहे. त्यांच्या निराशेबावत एवढें आणखी म्हणतां येईल कीं अत्यंत निराश अनुभवामधूनहि केशवसुतांची–

तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी

ही अनुभूति जन्म पावत असे.

*

(महाराष्ट्र साहित्यपत्रिका, जाने.–फेब्रु.–मार्च १९५४;
वर्ष २७ वें; अंक १०८; पृ. क्र. ९ ते १५).

२९

सौंदर्यवादाचे प्रणेते केशवसुत

लेखक : श्री. के. क्षीरसागर, एम्. ए.

आधुनिक काव्याचे कुलगुरु केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले यांना दिवंगत झाल्याला हा लेख प्रसिद्ध होण्याच्या दिवशीं पन्नास वर्षें पूर्ण होतील. त्यांचा स्मृतिदिन ता. ७ नोव्हेंबर रोजीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं साजरा होणार आहे. व त्या निमित्तानें त्यांच्या काव्याचें पुन्हा एकदां मूल्यमापन होत आहे हें स्वाभाविकच आहे.

केशवसुतांचा सूर मराठी काव्याच्या प्रांतांत इतका नवीन होता, व कांहीं दृष्टींनीं इतका लहान होता कीं त्याचं आकलन त्यांच्या हयातींत अजीबात झालं नसतं तरी नवल नव्हतं. कांहीं प्रतिभावन्तांना त्यांच्या हयातींत कुणी सहचरच न मिळाल्याचंहि वाङ्मयाच्या इतिहासावरूनच दिसून येईल. सुप्रसिद्ध 'इलेजी'चा कर्ता आंग्ल कवि ग्रे 'हा जन्मांत कधीं बोललाच नाही!' असं एका टीकाकारानं त्याच्या सहचरशून्यत्वाला अनुलक्षून अलंकारिक भाषेंत म्हटलं आहे! केशवसुतांची कविता इतकी वेगळी होती व इतकी थोडी होती कीं, हरिभाऊ आपट्यांसारख प्रतिभावंत समानधर्मे त्यांस लाभले नसते तर ती कांहीं काळ विसरून जाण्याचाहि संभव होता. पण हरिभाऊ आपटे, वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्यासारखे स्वतंत्र बुद्धीचे रसज्ञ, रेव्हरंड टिळकांसारखे उदार वृत्तीचे समकालीन कवी, आणि गोविंदाग्रजांसारखे उघडपणें स्वतःला सच्चा चेला म्हणवून घेणारे पुढच्याच पिढीचे विख्यात अनुयायी केशवसुतांना लाभले हें त्यांचं भाग्य होय यांत शंका नाहीं. एवढ्या मोठ्या

प्रतिभावंतांनीं त्यांचं युगप्रवर्तकत्व आधींच मान्य करून ठेवलं नसतं, तर त्यानंतरच्या अस्थिर आणि चंचल बुद्धीच्या जमान्यांत त्यांना कोणतं स्थान दिलं गेलं असतं हा एक प्रश्नच आहे.

वास्तविक प्रत्येक पिढीला अशा युगप्रवर्तक कवीचं मूल्यमापन अधिकाधिक स्पष्ट आणि निश्चित व्हायला हवं. ज्यांनीं या अगदी नव्या आणि वेगळ्या अशा सुरांतला जोम आणि नाजुकपणा ओळखला, ते अर्थातच धन्यवादाला पात्र आहेत. पण त्यांच्यामागून येणाऱ्या टीकाकारांनीं त्या सुरांचा उमाळा कुठून येतो आहे हें निश्चित विशद करणं जरूर होतं. नवमत म्हटलं, कीं तें भिन्नच असायला पाहिजे, असं मानणाऱ्या आजच्या वैचित्र्यलोलुप जमान्यांत मूल्यांपेक्षां मतभिन्नतेलाच अधिक मोल आलं तर नवल नाहीं! केशवसुतांच्या मूल्यमापनांतली 'तेजीमंदी' शोधीत जाणं मोठं मनोरंजक होईल! आजच्या अर्धशतसांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगीं समोर पुस्तकांच्या– आणि विशेषतः मासिकांच्या– फायली घेऊन बसणं हास्यास्पद ठरेल. पण स्थूलमानानं काव्यभक्तांना जें आठवत असेल त्याचं पुनःस्मरण या स्मृतिदिनाच्या निमित्तानं करायला हरकत नाहीं.

हरिभाऊ, रेव्ह. टिळक यांच्या पिढीनंतर आणि गोविंदाग्रजांच्या अकालीं निधनानंतर कांहीं काल मराठी काव्याच्या प्रांतांत कांहीं एक प्रकारची शून्यता भासूं लागली होती. चंद्रशेखर आणि तांबे या काळांत प्रतिभेच्या ऐन माध्यान्हीला होते हें खरं; पण हे मराठी शारदेचे सरदार दूरदूरच्या सुभ्यावर– बडोदें–ग्वालहेरला–अडकून पडले होते. अशा स्थितींत पुण्यांत कांहीं रावबाजींच्या करामतीला अवसर मिळाला असला तर नवल नाहीं. ज्या संधिकालांत पुण्यांत कोणी एक अनंततनय हेहि दरबार भरवूं शकत होते त्या काळाच्या मंदप्रभतेची कल्पनाच केलेली बरी! याच सुमाराला काव्यांत जाणीवपूर्वक आणि सहकार्यपूर्वक हालचाल करण्याकरितां कांहीं तरुण कवी महाराष्ट्रशारदामंदिर या मोठ्या संस्थेंतच सवता संसार स्थापून बसले. ते रविकिरण-मंडळाचे कवी होत. या मंडळांत नव्या दमाचे कवी होते, तसे नव्या मूल्याचे टीकाकारही होते. नव्या मूल्याचा पहिला टीकाकार–माडखोलकर–याच मंडळानं महाराष्ट्राला दिला. माडखोलकरांनीं आपल्या 'कविपंचकां'त क्रांतिकारक केशवसुतांचं रौद्ररसपूर्ण स्तोत्र गायिलेलं मजप्रमाणं अनेक काव्यभक्तांना आठवेल. पण याच माडखोलकरांनीं त्यानंतर दहाच वर्षांनीं आपल्या मूल्यमापनाचा, काव्यभक्तीचा आणि क्रांतिपूजेचा 'फेरविचार' केला! १९३५ च्या सुमारास श्रीमंत सयाजीराव यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं निघालेल्या समालोचन-ग्रंथांत, त्यांनीं विष्णुशास्त्र्यांच्या तुलनेनं केशवसुतांना स्त्रैण ठरवून, त्यांच्या क्रांतीच्या ध्वजावर स्वतःच चढवलेल्या 'गृध्रा'ला त्यांनीं स्वतःच अवघ्या दहा वर्षांच्या अवधींत 'चिमणी' ठरवून टाकलं!

पण याच्याहि आधीं, याच मंडळांतल्या एक प्रतिभावंत कवीनं आणि विद्वा

पंडितांनीं केशवसुतांच्या कवितेवर एक विद्वत्ताप्रचुर प्रबंध लिहून एका वाङ्मयीन कोशांत प्रसिद्ध केला होता. हे पंडित म्हणजे आमचे माधवराव पटवर्धन होत. त्यांच्या या सुमारें ऐंशी पानांच्या निबंधाइतका सशास्त्र असा केशवसुत-काव्याचा अभ्यास यापूर्वी तर काय, पण यानंतरहि झाला नाहीं असं मी म्हणेन. पण आजकाल बोकाळलेल्या काव्यविनाशक शवविच्छेदनाचं खरं मूळ माधवरावांच्या या प्रामाणिक, विद्वत्तापूर्ण पण भरकटलेल्या काव्यविवेचनांतच आहे !

दरम्यान केशवसुतांच्या कवितेची भ्रान्त स्तुति आणि भ्रान्त निन्दा होतच होती. कोणी तिजमध्यें समाजक्रांतीला आवाहन आहे म्हणून ती क्रांतिकारक असें म्हणत; कुंणी तिजमध्यें नैराश्य आहे म्हणून ती रडवी आहे असें म्हणत; कुणी यमक आणि वृत्तें यांच्या परंपरा केशवसुती कवितेनं मोडल्या, यांतच तिचं क्रांतिकारकत्व मानीत; तर कुणी हें सर्वच नाकारून इंग्रजी काव्याच्या वाचनानं जें सहज सगळीकडेच पसरलं, तें काव्यांतच तेवढं क्रांतिकारक कसं म्हणतां येईल ? अशी शंका काढीत; तर कुणी केशवसुतांचं सामाजिक क्रांतिकारकत्व सुद्धां आगरकरांकडून उसनं घेतलेलं होतं असं ठरवून त्यांना एकटचालाच नव्हे, तर सर्व काव्यालाच गद्याच्या मानानं नकली आणि 'सेकंड हँड' ठरवीत ! मधून मधून नकळत शहाणपणाचं मूल्यमापन आणि काव्यनिदान होत नव्हतं असं नाहीं. पण एकंदरींत वर संग्रहित केलेल्या शहाणपणाच्या ताऱ्यांच्या मानानं तें कमीच पडलं असं म्हटलं पाहिजे. नाहीं तर आज केशवसुतांच्या निधनाला अर्ध शतक लोटल्यावर पुन्हा त्यांच्या संबंधींच्या प्राथमिक शंका कां निघाव्या ?

या निमित्तानं 'लोकसत्ते'नं प्रसिद्ध केलेल्या लेखांपैकीं प्रो. जोगांच्या लेखांत, केशवसुत काव्यदर्शनांतील आपलाच अखेरचा परिच्छेद जोगांनीं उद्धृत केला आहे. त्यांत ते 'केशवसुतांचें महत्त्व टीकाकारांनींहि ओळखण्यास कोणता प्रत्यवाय असावा ?' असा प्रश्न विचारतात. या प्रश्नाचं उत्तर त्यांच्या या विषयावरील अभ्यासग्रंथांत तर सापडेलच, पण त्यांच्या 'लोकसत्तें'तल्या लहानशा लेखांतहि सापडेल. तपशील परिश्रमपूर्वक गोळा करावयाचा परंतु मूळ गड्डयाला हात घालायलाच मात्र मोठ्या सौजन्यानं कचरायचं, आपल्या प्रतिपाद्य मताचं सर्वतोपरि समर्थन करायचं, पण अखेर (वाचकांच्या) कोर्टानं आपल्या पक्षकाराचा संपूर्ण दावा मान्य केलाच पाहिजे असं कांहीं नाहीं असा अर्ज आपणच नेऊन गुदरायचा ! यांसारख्या तऱ्हांमुळं मराठी टीकावाङ्मयांत बाह्यतः समतोल वाटणारा, परंतु अंतस्थपणें निर्णयशून्य ठरणारा एक प्रवाह बराच मोठा आहे. या संप्रदायामुळंच मराठी वाङ्मयाच्या 'हातीं' 'चांगला' माल कधीं पुरेसा 'चांगला' म्हणून म्हटला जात नाहीं, आणि भिकार मालहि पुरेसा 'वाईट' म्हणायला कुणाला धीर होत नाहीं ! भिकार आणि ओंगळ कविताहि नांदूं द्या ! म्हणून गळ घातली जाते; आणि उत्तम कविताहि थोड्या

तोऱ्यानंच Patronising वृत्तीनंच ! – कोपऱ्यांत बसवली जाते ! उघडच आहे. कुणालाहि नांदवून घेण्याइतके सन्त टीकाकार घरधनी झाल्यावर जिला नांदवायला हवं तिला नांदवण्यांत थोडी हयगय होणारच !

केशवसुतांची कविता प्राचीन कवितेच्या तुलनेनं "लौकिक, जीवननिष्ठ, आत्मलेखनात्मक भावगीत स्वरूपाची म्हणजेच वेगळी नाहीं काय ?" असं जोग आपल्या लेखांत मोठ्या तळमळीनं विचारीत आहेत. पण लगेच "अर्वाचीन कवितेचे प्रणेते, युगप्रवर्तक हीं विशेषणें केशवसुतांस लावायचीं नसलीं तर लावूं नयेत" अशी (प्रतिपक्षाला) औदार्याची सवलत देत आहेत ! आणि लगेच पुढें सर्वच सज्जनांना प्रिय होणारा 'दुहेरी निषेध' (Double Negative) वापरून ते लिहितात : "पण तेवढ्यानें मराठी कवितेला इंग्रजी कवितेच्या अभ्यासामुळें निराळें वळण मिळून मराठी कवितेचें, इतर मराठी वाङ्मयप्रकारांप्रमाणेंच निराळें युग सुरू झालें नाहीं असें होत नाहीं." पण एवढ्यानेंच समाधान न होऊन, ते पुढें विचाऱ्या केशवसुतांना आणखीहि कांहीं अभावात्मक आहेर (Left-handed Compliments) करतात, ते पाहण्यासारखे आहेत ! ते म्हणतात तें स्थान कोणाला द्यावें याचा शोध घेतां घेतां अखेर केशवसुतांसमोरच येऊन थांबावें लागेल. परंतु फेरविचार करावयास कांहींच हरकत नाहीं."

या "कांहींच हरकत नसणाऱ्या" सौजन्यामुळंच श्री. आवळीकरांसारख्या नवीन लेखकांच्या मनांत गोंधळ होतो आणि त्यांना सर्वमान्य गोष्टींचाहि 'फेरविचार' करायला धीर होतो !

रा. आवळीकर यांचं इतर कांहीं लिहिणं माझ्या पाहण्यांत नाहीं. तरी या लेखावरून त्यांची काव्यविषयक रुचि अविकृत दिसत आहे. कोमल भावनांचे केशवसुत, प्रेषितांच्या आवेशानं वज्रहृदय भासणारे केशवसुत आणि सहज गमतीनं एखादी बोधप्रद कल्पना सुचली म्हणून कविता लिहून टाकणारे केशवसुत अशी त्रिविध दत्तात्रयस्वरूप मूर्ति त्यांच्या काव्यसंग्रहांत दृष्टीस पडते, असं एखाद्यानं म्हटलं तरी त्यालाहि माझी 'ना' नाहीं. फार काय, केवळ 'रियाज्' म्हणून कालिदासाच्या एखाद्या सर्गाचं भाषांतर करणारं त्याचं चौथं मुखहि त्यांत भरीला घालून त्यांना चतुरानन ठरवायलाहि माझी तयारी आहे. पुष्कळ लोकांचं त्यांच्या भावनात्मक कवितांकडे दुर्लक्ष तरी झालं किंवा लक्ष गेलंच तर त्यांना रडवे ठरविण्याकरतां गेलं, हेंहि खोटं नाहीं. केशवसुत म्हटलं कीं, तुतारी; केशवसुत म्हटलं कीं गोफण; अशा ठराविक कविता लक्षांत आणणारे लोक न कळत त्या कवितांतील ओजाचं आणि सौंदर्याचं मूळ कशांत आहे हें विसरत असत. आणि म्हणूनच त्यांना 'स्त्रैण' केशवसुत आणि 'क्रांतिकारक केशवसुत' असं द्वैत तरी दिसे. नाहीं तर 'सुधारक' साप्ताहिकांत मिल्, स्पेन्सरच्या कोटच्या लढविणारे 'गद्यप्रेषित' आगरकर आणि त्याच विषयावर

मराठी ७१६६३ वि: ...
क्रमांक ...2029... दि: ...

'पादाकुलकांत' नाहीं तर दोह्यांत लिहिणारे 'पद्यप्रेषित' केशवसुत या दोघांत अद्वैत तरी भासे !

पण वस्तुस्थिति निराळीच आहे. केशवसुतांचा रडवेपणा आणि केशवसुतांचा प्रक्षोभ, स्त्रैणपणा आणि त्यांचं पौरुष यातलं अद्वैत या मंडळींनीं ओळखायला शिकलं पाहिजे आणि प्रत्येक खरा काव्यभक्त तें ओळखून असतोहि ! मजसारखा केशवसुतभक्त केवळ कांहीं विरोधीभासांच्या पकडी करून दाखवीत आहे किंवा Special pleading करीत आहे असं ज्यांना वाटेल त्यांना मला एवढंच सांगायचं आहे कीं केशवसुतांचे उत्तम भाष्यकार आणि वकील केशवसुत हेच होत. त्यांनीं आपल्या 'कवितेचें प्रयोजन' या कवितेंत त्यांच्या पिढीच्या अरसिकांना ज्या गोष्टी समजाविल्या आहेत त्याच त्यांच्या वतीनं आजच्या पिढींतल्या 'रसिकांना' समजावून देणं आवश्यक दिसतं ! केशवसुत म्हणतात–

त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असें हें दूरहि भूवरी
कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांहीं नसे
प्रौढत्वीं निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे

ज्यांना इथं केशवसुतांनीं सांगितलेल्या कवींचा विचित्र बाणा उमगला त्यांनाच आधुनिक कविता म्हणजे काय हें समजेल. त्यांनाच केशवसुत हेच तिचे प्रणेते कां तें समजेल, आणि त्यांनाच आधुनिक कवितेचा खरा संप्रदाय कोणता आणि जुन्यांना ठाऊक असलेल्या काव्यसंप्रदायापासून वेगळा कसा तें समजेल. हें सर्व अवघड नाहीं; पण पांडित्याच्या जोरावर समजून घ्यायचं म्हटलं तर मात्र अवघड आहे; 'बाल्याच्या' ऋजुतेनं समजून घ्यायचं म्हटलं तर अवघड नाहीं !

जुन्या कवितेंत जर कोणत्या एखाद्या काव्याला प्राणभूत अशा गोष्टीची गळचेपी होत असेल तर ती कवीच्या बालसदृश सहज भावनांची ! जुन्या काळांत कवीला बालकाचं मुग्धत्व पाहून नाचावंसं वाटत नसे का ? त्याला महाराष्ट्राच्या निसर्ग-रम्यभूमींतील हिरवींगार रानं आणि सह्याद्रीच्या अजस्र कडयांवरून आपली हिम-धवल काया कुरवंडून टाकणारे जलौघ पाहून मंत्रमुग्ध होऊन उभं राहावंसं वाटत नसे का ? त्यांना जुन्या काळांतल्या महाराष्ट्रीय रमणीचं तें सलज्ज सोज्ज्वळ मुखकमल पाहून सौंदर्यस्तोत्र गावंसं वाटत नसे का ? त्यांना त्यांच्याच समोर घडत असलेलं शिवप्रभूचं अलौकिक अवतारकृत्य पाहून अठरा पुराणं गुंडाळून ठेवून एक नवंच महाकाव्य लिहावंसं वाटत नसे का ? इतके विविध काव्यविषय समोर असतां, त्यांच्यां-तील पढिकांच्या काव्यांत रूपावलि, समासचक्र पढल्याचं आणि पुराणिकाचा धंदा केल्याचंच तेवढं प्रत्यंतर यावं आणि त्यांच्यांतील 'अपंडितां'च्या काव्यांत ईश्वरभक्ति,

नाहींतर मोक्षपिपासा यासारख्या एखाद्याच वैयक्तिक भावनेचं दर्शन व्हावं हें कशाचं लक्षण ? अर्थात्च काव्याची आणि कवींची सहजवृत्ति साफ मारून टाकण्यांत आली होती या गोष्टीचंच होय ! " तुम्ही संत म्हणून तरी लिहिलं पाहिजे, नाहींतर हरिदास-पुराणिक म्हणून तरी लिहिलं पाहिजे, नाहींतर तुमची गणना अशिक्षित आणि असभ्य शाहिरा–तमासगिरांत करूं ! " अशी त्या वेळच्या कवींना सक्त ताकीद होती !

पण पुढे इंग्रजी अंमल आला ! होय, मला माहीत आहे कीं या इंग्रजी अंमलाच्या उपपत्तीमुळं अनेक टीकाकारांची साफ फसगत झाली आहे. इंग्रजी अंमलाबरोबरच लौकिक (प्रापंचिक व समकालीन) विषयावरची बंदी उठली हें खरं; पण लगेच कृष्णशास्त्री आणि कुंटे हे केशवसुतांसारखं लिहूं लागले असं मात्र नाहीं ! केवळ ऐहिकपर कविता लिहिणं म्हणजे आधुनिक केशवसुती कविता नव्हे; फार काय, इंग्रजी कवितेचं अध्ययन करून कुंटयांच्याप्रमाणं महाकाव्याची योजना आखणं म्हणजेहि आधुनिक कवितेचा आरंभ नव्हे. पण कांहीं पंडितांनीं विष्णु मोरेश्वर महाजनी आणि कुंटे यांना केशवसुतांचे पितर ठरविले आहेत ! पण हें मत पंडितांपुरतंच राहिलं ! सर्वसामान्य काव्यभक्त आणि टिळक-गडकरी यांच्यासारखे प्रांजल आधुनिक कवी यांनीं केशवसुतांचं कविकुलगुरुत्व ओळखलंहि आणि निरहंकारपणें मान्य केलंहि !

कुंटे-महाजनी आणि केशवसुत यांच्यांत फरक कोणता ? पहिले दोघे मराठी भाषेंत प्रयोग करणारे प्रौढवृत्तीचे पंडित होते; तर केशवसुत हे स्वतःच्या पोटांत न मावणारे हर्ष-खेद, त्वेष-उत्साह पद्यमय व गेय भाषेंत आविष्कृत करणारे शिशुवृत्तीचे कवि होते. सहजप्रवृत्तींना जपणं, भावनांना पवित्र मानणं, दुसऱ्यांनीं आणून दिलेले काव्यविषय न पत्करणं, सौंदर्यानं पुलकित होणं आणि तसं झाल्याचं सांगण्यांत अभिमान मानणं, अन्यायानं संतप्त होणं आणि तो संताप व्यक्त करणं, हें एकशेआठ रामायणं लिहिण्यापेक्षां पुण्यप्रद मानणं, निसर्गाशीं गुजगोष्टी करणं, हा या नव्या शैशवपूजक कवींचा संप्रदाय होता. यालाच इंग्रजींत Romantic School असं म्हणतात. आणि यालाच मराठींत 'सौंदर्यवाद' म्हटलं पाहिजे. मनुष्य इंग्रजी वाङ्मय वाचून सौंदर्यवादी होत असता, तर कुंटे-महाजनीहि होऊं शकते आणि आजचे डझनभर नवकवीहि सौंदर्य-द्वेष्टे कां झाले असते ? सौंदर्यवाद हा पिंडांत असावा लागतो. तो इंग्रजी शिक्षणानं, अथवा इंग्लंडच्या बोटीनं ' इम्पोर्ट ' करतां येतो असं नाहीं.

पण रोमँटिसिझम् म्हणजे काव्यांतील केवळ एखादा रीतिभेद (mere style) आहे असं समजणारांचा पुन्हां कसा गोंधळ होतो हें पाहण्यासारखं आहे. आधीं मराठी कवितेच्या आकलनास या पाश्चात्य संज्ञेच्या आकलनाची गरज आहे याचीच फारशी कल्पना आमच्या टीकाकारांना नव्हती. पुढें ती कल्पना देण्यांत आल्यावरहि त्या संज्ञेचा व्याप केवढा आहे हें समजून घेण्याची त्यांची तयारी नव्हती. उदाहरणार्थ, रोमँटिसिझम् उर्फ सौंदर्यवाद या विषयावर मीं एका वाङ्मयीन वादविषयक व्याख्यानमालेंत व्याख्यान दिल्यावर एका शहाण्यासुर्त्या टीकाकारांनीं मला म्हटलं, " काय हो ! केशवसुतहि

रोमँटिक संप्रदायी आणि रेव्ह. टिळकहि रोमँटिक संप्रदायी हें तुमचं कांहीं पटत नाहीं आपल्याला ! " तसंच तांबे आणि केशवसुत यांना परस्परविरोधी संप्रदायाचे समजणारे लोक आहेतच. मुंबई-साहित्य-संमेलनांत हा वादाकरतां विषयच निवडला होता. व त्या दोघांचा संप्रदाय एकच म्हणजे 'सौंदर्यवादी उर्फ Romantic' हें मी त्या वादाच्या उपन्यासादाखल वाचलेल्या निबंधांत स्पष्ट केलं होतं. पण हेच गैरसमज Romanticism या शब्दाचं भाषान्तर करतांनाहि दिसून येतात. उदा० 'स्वैर संप्रदाय' अथवा 'स्वच्छंद संप्रदाय' असं भाषान्तर करणारे लोक, या संप्रदायांतलं काव्यपरंपरा-विरुद्धत्वच तेवढं लक्षांत घेतात. वस्तुतः ती त्यांची केवळ प्रतिक्रियात्मक अथवा Negative बाजू होय. या संप्रदायाची 'क्रियात्मक' अथवा Positive बाजू म्हणजे सौदर्यपूजन आणि भावनापूजन. या दोहोंतील एखादा शब्दच या संज्ञेला मराठी प्रतिशब्द होऊं शकेल. प्रख्यात अमेरिकन मानसशास्त्रज्ञ विल्यम् जेम्स् यानं " Valuing experience for its own sake " हें या संप्रदायाचं लक्षण (Pragmatism वर लिहितांना जातां जातां) केलं आहे, तेंहि अर्थपूर्ण आहे.

पण केशवसुतसंप्रदायाच्या आकलनाला मुख्य अडचण त्यांच्या प्रेषित भूमिकेंतील तात्त्विक कवितांची होते असं दिसतं. 'तुतारी', 'गोफण' यासारख्या कवितांतील सामाजिक तत्त्वज्ञानानं केशवसुतांच्या भक्तांची आणि अभक्तांची सारखीच फसगत केली आहे ! भक्तांना वाटूं लागलं कीं, सामाजिक पुरोगामित्वाचं चऱ्हाट वळलं, कीं केशवसुती कविता झाली. आमचे सर्व द्वेष्टे आणि दांभिक नवकवी, केशवसुतांशीं सोयरीक करायला जातात ते अशाच सामाजिक संतापाच्या कवितांच्या वशिल्यानं ! पण ज्याला कांहीं पूज्य आणि प्रिय आहे त्याचा राग आणि ज्याला सर्व तुच्छ आणि उपहास्य वाटत आहे अशा Cynicचा राग, यांतील फरक खरे काव्यभक्त ओळखतात ! पण केशवसुतांचे हे खरेखोटे सगेसोयरे सोडून, त्यांच्या प्रामाणिक विरोधकांकडे वळलं तर कै. तांब्यांचं नांव त्यांत डोळ्यांपुढं उभं रहातं आणि टीकाकाराला एक धर्मसंकटच पडतं ! केशवसुतांच्या सामाजिक कवितांसंबंधीं सात्त्विक संतापानं बोलतांना मी स्वतः तांब्यांना पाहिल्याचं मला चांगलं आठवतं ! हे काव्यविषय त्यांना Negative ऊर्फ केवळ प्रतिक्रियात्मक वाटत. तर कांहींना ते विचारप्रधान ऊर्फ Didactic म्हणून दुय्यम दर्जाचे वाटतात! पण या विचारप्रधान कवितांसंबंधींहि अखेरची कसोटी भावनात्मकच आहे. निसर्गाच्या अथवा व्यक्तीच्या आकर्षणानं कवीची भावना आणि कल्पना प्रज्वलित होते, तशीच ती एखाद्या ध्येयानं अथवा उदात्त विचारांनंहि होऊं शकेल. मुख्य प्रश्न हा आहे कीं कुठल्या तरी मूर्त सौंदर्याच्या अगर अमूर्त आदर्शाच्या आकर्षणानं कवीचं रक्त अधिक वेगानं वाहूं लागलं आहे, कीं 'नवकवींप्रमाणं' तो एक थंड Cold-blooded प्राणी आहे ! आणि या कसोटीवरून

पाहतां अमूर्त आदर्शासंबंधींहि मूर्त सौंदर्याइतक्याच बेहोषीनं लिहिणारे कवि मराठींत केशवसुत हेच होऊन गेले हें पाहून त्यांचं अधिकच कौतुक करावंसं वाटतं !

किंबहुना प्रेषिताच्या भूमिकेमुळेंच ते एक युगप्रवर्तक संप्रदायाचे कुलगुरु बनले. एक नवा प्रांत, एक नवी जाणीव, आणि एक नवा आदर्श आपल्याला सांपडला आहे याची उन्मादकारी जाणीव केशवसुतांच्या शब्दाशब्दांतून दिसून येते. या संप्रदायाचे ते पहिलेच कवि असल्यामुळं असो कीं, माधवराव पटवर्धनांप्रमाणं कांहींशी 'कष्टप्रसू' प्रतिभा असल्यामुळं असो, त्यांच्या कल्पनांच्या आणि विचारांच्या वादळाला पुर पडेल असं वाहन त्यांच्या वाणींत आढळत नाहीं. पण जेव्हां त्यांच्या प्रतिभेची भट्टी भरपूर तापते, तेव्हां तिजमधून बाहेर पडणाऱ्या तप्तसुवर्णाच्या शारदामूर्ति मराठी काव्यांत केव्हांहि पहिल्या पंक्तींत बसविण्याच्या योग्यतेच्याच ठरतील !

'सतारीचे बोल', 'थकलेल्या भटकणाराचें गाणें', 'तुतारी', 'सिंहावलोकन', 'वातचक्र' या कवितांसारख्या कविता केशवसुतांखेरीज कोणता कवि लिहूं शकला असता ? 'आम्ही कोण ?', 'कवितेचें प्रयोजन', आणि 'स्फूर्ति' या कवितांत दिसून येणारी कवींच्या जीवितकार्याविषयींची श्रद्धा दुसऱ्या कोणत्या कवीनं व्यक्त केली आहे ? "साध्याहि विषयांतली" अर्थपूर्णता केशवसुतांपूर्वी कोणाला दिसली होती ?–आणि त्यांच्यानंतर तरी त्यांच्या इतकी किती कवींना प्रतीत झाली ?

केशवसुतांच्या संप्रदायाचं मनन आणि आकलन, ते गेल्याला अर्धशतक झालं तरी अजून पुरतं व्हायचंच आहे !

—

(केशवसुत–स्मृति–ग्रंथ; पृ. क्र. ४२–५२.)

३०

हरपलें श्रेय

लेखक : रा. श्री. जोग, एम्. ए.

केशवसुतांना दिवंगत झाल्याला आतां पन्नास वर्षें होऊन गेलीं आहेत. त्यांच्या कवितेच्या पुनर्मूल्यमापनाची भाषाहि आज एकूं येऊं लागली आहे. तिच्या पहिल्या मूल्यमापनाच्या बाबतच अनेक चढउतार किंवा आंदोलनें होऊन गेलीं. एकदां ते एका टीकाकारास महाकवीच्या पदावर आरूढ झालेले दिसले, तर पुढें पंधरा वर्षांनीं त्याच टीकाकाराला ते प्रणयपीडित, गलितोत्साह आणि कृशप्रतिभ वाटले. कोणी त्यांना काव्यांतील क्रान्तीचे कारक म्हटलें, तर कोणास ते क्रान्तीच्या प्रवाहांत नकळत सापडले असें वाटलें. कोणी त्यांना दुर्दम्य, आशावादी झुंजार म्हटलें, तर कोणास ते निराशाग्रस्त, कांहींसे रोगट मनोवृत्तीचे वाटले. कोणास त्यांचा मळचा पिंड कवीचा नव्हताच असें वाटलें, तर कोणास त्यांचा चेलाहि व्हावेसें वाटलें. आज केशवसुतांचें युग संपलें असून नवकाव्याला प्रारंभ झाला असल्याचेंहि कोणीं उद्घोषित केलें आहे. म्हणजे खरोखर आतां त्यांच्या कवितेचें खरें मूल्यमापन व्हावयास हरकत नाहीं असें दिसतें. गेल्या अर्धशतकांतील अनुकूल गौरवाच्या अतिरेकाचा किंवा प्रतिकूल आक्षेपांचा धुरळा आतां खालीं बसला असून केशवसुतांच्या कवितेकडे वस्तुनिष्ठ दृष्टीनें पाहणें शक्य झालें आहे असें तत्त्वतः तरी मान्य करावयास हवें.

अर्वाचीन मराठी कवींत केशवसुतांइतका वादग्रस्त कवि कोणी झाला नाहीं. म्हणून त्यांच्या कवितेचा निरपेक्ष विचार करणें कठिण होऊन बसलें आहे. त्यांच्या-

संबंधीं जीं मतें प्रकट झालीं आहेत, किंवा वाद माजले आहेत, त्यांचा परामर्श घेतल्याविना पुढें जाणें कोणत्याहि विमर्शकास अशक्य झालें आहे. मराठी कवितेंत त्यांच्या कालीं क्रान्ति झाली कीं ती उत्क्रान्तीच होती, क्रान्ति झाली असें मानल्यास ती त्यांच्यामुळें झाली कीं इतर कारणांनीं झाली, म्हणजेच ती त्यांनीं केली काय, कीं ते केवळ प्रवाहपतित होते, त्यांनीं केलेल्या क्रान्तीचा अर्थ काय होता, म्हणजेच ते कोणत्या अर्थानें क्रान्तिकारक होते–सामाजिक अर्थानें कीं काव्यविषयक अर्थानें, त्यांचें काव्य पृथगात्म होतें कीं नाहीं–म्हणजेच तें स्वतंत्र होतें की इंग्रजी कवितेचें अनुकरण होतें, तें क्लृप्तिप्रधान होतें कीं रसभावसंपन्न होतें, त्यांचा संप्रदाय असा कांहीं होता व आहे काय, आणि त्याचा अर्थ काय, त्यांचें काव्य तात्कालिक महत्त्वाचें आहे कीं अक्षर आहे, त्यांची काव्यविषयक वृत्ति रोगट होती कीं निकोप होती, त्यांना रोमँटिक म्हणावयाचें तर तें कोणत्या अर्थानें म्हणतां येईल, असे एक कीं दोन, अनेक विचार आजवर पुढें आले. प्रस्तुत परामर्शांत या विचारांच्या अनुरोधानेंच केशवसुतांच्या कवितेचा विचार करण्याचें योजिलें आहे. उपरिनिर्दिष्ट विचारांत तथ्य काय आणि अतथ्य काय याचा विचार केला कीं सत्य वस्तु काय आहे, तिचें स्वरूपदर्शन आपोआपच होईल अशी अपेक्षा केल्यास तें चूक होऊं नये.

केशवसुतविषयक चर्चेंत असें फार झालें आहे की जें त्यांच्या कांही कविता-संबंधीं खरें आहे, तें त्यांच्या सर्वच कवितेविषयी खरें आहे असें समजून त्या कवितेविषयीं सरसकट विधानें केलीं गेलीं. त्यांची कांहीं कविता अनुवादात्मक आहे; तीवरून त्यांची सर्व कविता अनुवादात्मक वाटली. त्यांच्या बऱ्याच कविता प्रेमविषयक आहेत; त्यांवरून त्यांच्या कवितेंत प्रणयच आहे असें कोणीं मानलें. त्यांनीं काव्य या विषयावर कांहीं कविता लिहिल्या; परंतु ते याच विषयावर काव्यें लिहीत बसले असें त्यांच्याविषयीं म्हटलें गेलें. त्यांच्या कांहीं कविता अर्थचमत्कृतिप्रधान आहेत; त्यांची कविता रसाळ उतरली नाहीं असा शेरा तिच्यावर बसला. त्यांची कांहीं कविता बोधपर व प्रचारात्मक आहे; त्यांची सारी कविता प्रचारात्मक व तात्कालिक असल्याचा भास झाला. या अंधगजन्यायानें केशवसुतांना मात्र बराच अन्याय झाला आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत असा प्रकार क्वचितच आढळेल.

केशवसुतांचा मूळचा पिंडच कवीचा होता कीं नाहीं याविषयी निदान एका टीकाकाराला तरी शंका आली होती, व तो तसा नसल्याचें सिद्ध करण्याचा त्यानें बराच खटाटोप केला. केशवसुतांचे गुरु टिळक आणि आगरकर हे गद्यलेखकच होते, तेव्हा त्यांनीही गद्यलेखकच व्हावयाला हवें होतें असा त्याचा ग्रह; परंतु केशवसुतांच्या दुसऱ्या कोणा गुरुजींनीं त्यांना 'दुर्मुखलेला' म्हा संबोधल्यामुळें केशवसुतांनीं त्यांना आव्हान दिलें व 'आपल्या मुखांतून सत्राड्निष्यन्द चालावयाचा आहे' असें म्हणून पुढें जन्मभर ते काव्यरचनाच करीत राहिले, अशी मीमांसा त्यानें

केली आहे. ह्याला आधार म्हणून त्यांनीं लिहिलेल्या एका गद्य नाटकास बक्षिस मिळालें नाहीं, म्हणून गद्यावर रागावून ते पद्याकडे वळले असाहि शोध त्यानें लावला. यामुळें केशवसुतांची सारी कविता हठाकृष्ट झाली असून तींत काव्य असें फारसें नाहीं असा त्याचा सिद्धान्त आहे.

केशवसुतविषयक हें मत एका टोकाचें आहे. त्याचा उल्लेख येथें करण्याचें कारण एवढेंच की पूर्वग्रहदूषित दृष्टि असली कीं वस्तुस्थितीचा विपर्यास कोठवर होऊं शकतो तें लक्षांत यावें. टिळक आणि आगरकर हे गद्यलेखक गुरुजी असले म्हणजे त्यांनीं शाळेंत ज्यांना शिकविलें, त्यांनीं कविता लिहूं नये किंवा कवि होऊं नये हा कोणत्या साहित्यशास्त्रांतला न्याय ? केशवसुतांनीं केलेलें गद्यलेखन म्हणजे एक नाटक होतें. तें बक्षिसाकरिता लावलेल्या स्पर्धेच्या प्रसंगाने लिहिलें गेलें असलें, तरी तें केशवसुतांनीं अखेरीस पाठविलेंच नव्हतें. त्याला बक्षीस मिळालें नाहीं म्हणून गद्यावर राग काढण्याचें काय कारण ? गुरुजींना प्रतिक्रियात्मक भावनेच्या भरांत दिलेल्या व स्वतःलाच माहीत असलेल्या आव्हानाला चिकटून मरेपर्यंत आपल्यास न जुळणाऱ्या काव्यरचनेचा खटाटोप करीत राहण्याचें तरी काय प्रयोजन होतें त्याचें आकलन होणें कठिण आहे. शिवाय, वस्तुस्थिति वेगळीच होती. वरील विचारमालिकेंत निर्दिष्ट असलेल्या घटना होण्याच्या आधींपासूनच केशवसुत कविता लिहीत असत. पुण्यास टिळक-आगरकर यांचे विद्यार्थी होण्याच्या अगोदर, तसेंच कवि ना. वा. टिळक यांचा परिचय होण्याच्या आधींच, केशवसुतांनीं काव्यरचना करावयास प्रारंभ केला होता. केशवसुतांचे थोरले बंधु श्रीधरपंत हे वडोदें येथील कॉलेजमध्यें प्राध्यापक होते. त्यांच्याकडे इंग्रजी शिक्षणाकरिता केशवसुत १८८२ सालीं श्रीधरपंतांच्या मृत्यूच्या आधीं कांहीं काळ राहिले होते. श्रीधरपंतांच्या वाचनांत एखादी गचाळ कविता आली किंवा कोणीं त्यांना आणून दाखविली की ते 'यापेक्षां आमचा कुशा कितीतरी उत्तम कविता करितो' असे उद्गार काढीत असल्याचें नमूद आहे. 'त्यांना कविता करण्याचा नाद फारच अल्प वयापासून लागला होता. वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षापासून त्यांना चांगले श्लोक व आर्या रचितां येत असत' असें केशवसुतांचे दुसरे बंधु सीतारामपंत दामले हेहि लिहितात. केशवसुतांना 'हठाकृष्ट' कवि ठरविण्याच्या नादांत टीकाकाराच्या मात्र या गोष्टी लक्षांत आल्या नाहींत, किंवा येऊनहि त्यानें तिकडे डोळेझाक केली. मूळचा पिंड कवीचा नसेल, तर जन्मभर म्हणजे मरेपर्यंत, मनुष्य काव्यरचनेचा खटाटोप करीत राहील हेंहि असंभाव्य आहे हें वेगळें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

केशवसुतांची पहिली काव्यरचना आणि तीमागील काव्यदृष्टि अर्थात् त्या कालीं प्रचलित असलेल्या पंडिती वळणाची असावी असें सहजच अनुमान करितां येतें. श्लोक व आर्या चांगल्या रचितां येत असल्याचा त्यांच्या बंधूंनीं केलेला उल्लेख

या अनुमानाशीं सुसंगत होता. रघु-किरातादि संस्कृत काव्यांतील कांहीं भागाचें भाषांतर करण्याचा प्रयत्नहि याचीच साक्ष देतो. एवढेंच नव्हे, तर इंग्रजी पद्धतीच्या पहिल्या प्रेमकवितांमधील शृंगाराची उत्तानता संस्कृताचीच छाप दर्शविते. परंतु कविता-लेखनाच्या या प्राथमिक अवस्थेंतच इंग्रची कवितेचा अप्रत्यक्ष परिचय त्यांना होऊं लागलेला असावा. 'विस्तारां'तून क्रमशः येणारीं इंग्रजी भावकवितेचीं वि. मो. महाजनीनीं केलेलीं भाषांतरें त्यांच्या वाचनांत येत असलीं पाहिजेत व त्यांचा विशेष परिणाम त्यांच्या मनावर झालेला असावा. 'दुर्मुखलेला' या कवितेंतील 'नवीं काव्यें' हे शब्द उगाच आलेले नाहींत. गुरुजींनी केलेल्या टीकेला 'नवीं काव्यें' लिहिण्याचें आव्हान देणाराच्या मनांत आधीं याविषयीं कांहीं विचार येऊन गेले असले पाहिजेत. किंबहुना तसे त्यांचे प्रयत्नहि सुरू झालेले असले पाहिजेत. केशवसुतांची पहिली 'श्लोक व आर्या' यांची रचना आज उपलब्ध नाहीं. जी उपलब्ध आहे, तीवरून नवीन कवितेचीं दोन लक्षणें दृग्गोचर होतात. एक म्हणजे स्फुट रचनेचें व दुसरें म्हणजे आत्मलेखनाचें. त्यांच्या पहिल्या दहा कवितांत, विशेषतः 'दुर्मुखलेला' या कवितेच्या आधींच्या कवितांत, दोनतीन सृष्टिवर्णनात्मक, एक काव्यविषयक, तीन प्रेमविषयक, एक इंग्रजी कवितेचें भाषांतर अशा कविता आहेत. या कवितांमधून कवि आपले विचारच प्रकट करीत आहे (भाषांतराचा अपवाद) असें त्यांचें रूप आहे. एवढेंच नव्हे, तर प्रेमगीतांमधून आपण पुण्यास शिक्षणाकरितां दूर आल्याचा अगदीं वैयक्तिक उल्लेख त्यांनीं केला आहे. या कवितांतील शृंगारावर संस्कृत शृंगाराची दाट छाया असली, तरी या रचनेंत नवीन काव्याचीं स्फुटत्व व आत्मलेखनात्मकत्व हीं लक्षणें आपल्या सहज लक्षांत येतात. त्यांपैकीं स्फुटत्व हें कांहीं काल आधीं मराठी कवितेंत येऊं लागलें असलें, तरी आत्मलेखन मात्र नव्यानेंच आलें असें म्हणावें लागतें. 'अशी असावी कविता, फिरून । तशी नसावी कविता, म्हणून । सांगावया कोण तुम्ही कवीला । आहांत मोठे' असा सवालहि केशवसुतांनीं याच कालांत केला आहे. काव्यविषयक नव्या विचारांना प्रारंभ यावेळीं कवीच्या मनांत झाला असल्याची ही साक्ष आहे. आणि म्हणूनच 'नवीं काव्यें' लिहिण्याचें आव्हान हें केवळ क्षणिक प्रतिक्रियात्मक रागांतून आलेलें नसून स्वाभाविकपणें व विचारपूर्वक आलेलें आहे असें म्हणावें लागतें. 'दुर्मुखलेला' या कवितेच्या चतुःश्लोकी रूपावरून इंग्रजी सुनीतरचनेची कविमनावर असलेली अस्पष्ट छायाहि प्रतीत होण्यासारखी आहे.

आपलें काव्य इंग्रजी वळणाचें व्हावें ही कल्पना इंग्रजी कवितेच्या अभ्यासानें केशवसुतांच्या मनांत अधिकच दृढ व्हावी हें स्वाभाविक होतें. त्या वेळच्या त्यांच्या शालेय अभ्यासक्रमांत कोणती कविता अभ्यासाकरिता होती हें निश्चित सांगतां न आलें, तरी शेली, कीट्स, वर्डस्वर्थ या इंग्रजी रोमँटिक कवींची कविताच बरीचशी

असावी. पोप, गोल्ड्स्मिथ या कवींच्या दीर्घ रचनेपेक्षां शेली-वर्डस्वर्थ यांची स्फुट रचनाच निदान केशवसुतांना आकृष्ट करिती झाली हें उघड आहे. ही कविता बहुतेक सारी पालग्रेव्हच्या 'गोल्डन ट्रेझरी 'मध्यें समाविष्ट झाल्यामुळें माडखोलकरांनीं केशवसुतांचें इंग्रजी कवितेचें वाचन गोल्डन ट्रेझरीपलीकडे गेलें नसल्याचें विधान केलें आहे. तें खरें नसलें, तरी केशवसुतांचा मनःपिंड या रोमँटिक कवितेवर पोसला गेला हें स्पष्ट आहे व मराठी कवितेला तें वळण लावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केशवसुतांनीं त्यामुळें केला असें म्हणावयास कांहीच हरकत नाहीं.

हें सांगण्याचें कारण असें की, मराठी काव्याबाबत केशवसुतांनीं केलेल्या या महत्त्वाच्या कामगिरीचें श्रेय त्यांना न देण्याचे प्रयत्न पूर्वी झाले आहेत. केशवसुतांच्या कालांत मराठी कवितेंत झालेल्या परिवर्तनाचें रूप क्रान्तीचें नसून उत्क्रान्तीचें आहे, म्हणजे मूळ मराठी कवितेंत बीजभूत असलेल्या प्रवृत्तींच्या क्रमविकासाचें आहे, त्यांत केशवसुतांसारख्या एका व्यक्तीच्या कार्यास विशेष महत्त्व नाहीं; ही पहिली भूमिका होती. हा उत्क्रान्तिपक्ष आतां मागें पडला असून क्रान्तिपक्ष मान्य झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि ही क्रान्ति कालकृत होती, व्यक्तिकृत नव्हती असें माधवराव पटवर्धनांचें म्हणणें होतें.केशवसुतांनीं ही क्रान्ति घडवून आणली असें म्हणण्यापेक्षां ते क्रान्तीच्या प्रवाहांत सापडले होते असें त्यांचें मत होतें. खरोखर काव्यांत व्हावयाची क्रान्ति ही निसर्गकृत ऋतुमानांतील फेरबदलाप्रमाणें मनुष्यकृत प्रयत्नाभावीं होणें ही गोष्ट अशक्य आहे. इंग्रजी कवितेच्या वाढत्या अभ्यासामुळें ती होणें अपरिहार्य झालें असेल. पण नवीन पद्धतीचें काव्य कोणीं रचिल्याखेरीज तर ती पद्धति इकडे रूढ झाली नाहीं. त्याबाबतं केशवसुतांची नसली तरी इतर कोणा तरी कवीची कामगिरी कारण झाली असली पाहिजे. पण कोणाच व्यक्तीला हें श्रेय न देतां केवळ कालकृत अशी ही क्रान्ति आहे असें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें केशवसुतांनीं काव्याचें जें नवीनत्व पत्करलें होतें तें जाणीवपूर्वक होतें, अजाणतां नव्हतें. आपल्या 'फुकट दवडलेला तास' या कवितेमध्येंहि 'बा कांहितरी गा नवीन' अशी आज्ञा कवितेनें आपल्यास केल्याचा उल्लेख केशवसुत करितात. 'नवीं काव्यें गाईल,' आणि 'कांहींतरी नवीन गा' या दोनहि उल्लेखांवरून हें नवीन पूर्वी आलेलें नव्हतें असें निदान कवीला वाटत होतें हें उघड आहे. तें नवीन 'यावयाचें' आहे, 'आणावयाचें' आहे अशीच त्यांची भावना होती. केशवसुतांच्या पूर्वी स्फुट रचना कांहीं प्रमाणांत सुरू असली, तरी भावगीताचा आत्मा असलेलें आत्मलेखन मात्र अद्यापि आलेलें नव्हतें. महाजनींचीं भाषांतरें म्हणजे अर्थातच त्यांचें आत्मलेखन होऊं शकत नव्हतें व त्यांनीं स्वतंत्र आत्मलेखनात्मक कविता लिहिली असें दिसत नाहीं. तशी कविता इंग्रजींत लिहिली जाते एवढेंच त्यांनीं दाखविलें. ती मराठींत लिहितां येतें हें दाखविण्याचें काम केशवसुतांनीं केलें. या आत्मलेखनांत

अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. निसर्गविषयक आपल्या भावना व्यक्त करितां येतात, प्रेमविषयक आपल्या स्वतःच्या अनुभूति प्रकट करितां येतात, समकालीन सामाजिक जीवनावर टीका करितां येते, जीवनविषयक खोल अनुभूतींना अभिव्यक्ति देतां येते. सारांश, आपलें अंतर्गत भाव-विश्वच शब्दांनीं साकार करितां येतें हें केशवसुतांनीं दाखविलें. कवि टिळक म्हणतात त्याप्रमाणें 'कृष्णानें' (केशवसुतांनीं) शिकवलेली कविता ही होती. टिळकांसारख्या केशवसुतांपेक्षां ज्येष्ठ अशा कवीनेंच दिलेला हा कौल मान्य न करितां, केशवसुत हे क्रान्तीच्या प्रवाहांत नुसते अजाणतां, अभावितपणें सापडले असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून आहे हें निराळें सांगावयास नकोच.

केशवसुतांनीं मराठी कवितेकरितां हें नवीन वळण स्वीकारलें याचा अर्थ काव्य-विषयक नवीन दृष्टीच स्वीकारली असा होतो; केवळ कांहीं रचनाप्रकार, वृत्तविशेष, अलंकार वा लकबी आणल्या असा त्याचा अर्थ नाहीं. सुनीतासारखा काव्यप्रकार 'झपूर्झा' मध्यें आणला त्याप्रमाणें कांहीं वृत्तविशेष, शैलीनें योजलेल्यासारख्या कांहीं अमूर्तोपमा इत्यादि गोष्टी केशवसुतांनींहि करून दाखविल्या आहेत; परंतु त्यामुळें मराठी कवितेंत क्रान्ति झाली असें नव्हे. ती झाली ती कवीची बहिर्मुख दृष्टि अंतर्मुख करण्यामुळें झाली. केशवसुतपूर्वकालांत लिहिली जाणारी कविता कथनपर, कथात्मक, वर्णनपर, वस्तुनिष्ठ अशीच होती. त्यामुळें ती अनेक वेळां पद्यरूप गद्यच होई. तिच्यामध्यें स्वतःच्या अनुभूतींचा जिव्हाळा कमीच असे. काव्य आत्मनिष्ठ झाल्यानें हा जिव्हाळा साहजिकच वाढतो व वस्तुनिष्ठ कवितेंत रसाविष्कारास जेवढा अवकाश लागतो, त्या मानानें अल्प अशा अवकाशामध्येंहि भावनेची उत्कटता येऊन कविता अधिक रसपूर्ण होते. आजच्या पाश्चात्य कवितेंत काव्याकरिता हें एवढेंच क्षेत्र योग्य आहे असें मानलें जातें व आपल्याकडेहि सर्वसाधारण आचार असाच झालेला आहे. काव्याचें रूपच काव्यविषयक दृष्टिकोणामुळे बदलून जात असल्यानें केशवसुतांनीं मराठी कवितेचें रूप बदलून टाकलें असें मानण्यास हरकत नाहीं.

केशवसुतांनीं हें पाश्चात्य वळण स्वीकारल्यामुळें त्यांची कविता अनुकरणात्मक व अनुवादात्मक झाली आहे असा कित्येकांचा समज झाला. ती केवळ अनुवादात्मक नाहीं. भाषांतर, रूपांतर किंवा अनुवाद म्हणतां येतील अशा सुमारें पंचवीस एक-कविता त्यांनीं लिहिल्या आहेत हें खरें आहे. कांहीं रूपांतरें स्वतंत्र कविता म्हण्या-इतकीं पृथगात्म उतरलीं आहेत हा विचार बाजूस ठेवूनहि असें म्हणतां येतें कीं, सुमारें शंभरावर कविता स्वतंत्र म्हणावयास हव्यात. त्यांनीं लिहिलेल्या तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई, गोफण, अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न, रूढिविधी प्रतिपादनात्मक कविता या पाश्चात्य कवितेवरून घेतल्या अशी शंकाहि तो येणार नाही. त्यांच्या कवितेचा हा भाग त्यांचा एक महत्त्वाचा विशेष मानाऱ्यांना तरी त्यांची कविता अनुवादात्मक म्हणतां येणार नाहीं. 'म्हातारी किंवा 'नैर्ऋत्येकडील वारा'

यांसारख्या कांहीं थोड्या कविता अनुकरणात्मक म्हणतां आल्या, तरी बहुसंख्य कविता तशा नाहींत. इंग्रजी पद्धति स्वीकारली आहे; पण तिचें अंतरंगहि इंग्रजी आहे असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. पद्धतिसाम्यामुळें केशवसुतांच्या कवितेंत 'जोरदार पृथगात्मता' नाहीं असें पटवर्धनांनाहि वाटलें. मात्र इतर समकालीन (अर्थात् मराठी) कवींच्या मानानें ती पृथगात्म आहे अशी मान्यताहि ते देऊन टाकतात. मराठी कवितेला इंग्रजी वळण लावण्याच्या आपल्या प्रयत्नांत ज्याला पटवर्धन 'मौलिक स्वातंत्र्य' असें म्हणतात, तें केशवसुत गमावून बसले. तथापि केशवसुतांनीं इंग्रजी कवितेची गुलामगिरी पत्करली होती असें नाहीं. प्रा. लागू म्हणतात, त्याप्रमाणें मराठी कवितेवर त्यांनीं इंग्रजी कवितेचें कलम केलें. त्याचीं गोड फळें मराठी रसिकांसच नव्हे, तर पटवर्धनांसारख्या कवींसहि चाखावयास मिळालीं.

केशवसुतांनीं आत्मलेखन केलें याचा अर्थहि कांहींसा तारतम्यानेंच घ्यावयास हवा; विशेषतः त्यांच्या प्रेमकवितेबाबत हवा. तो तसा न घेतल्यानें त्यांच्यावर प्रणयपीडितत्वाचा (माडखोलकर) व म्हणून गलितोत्साहत्वाचा आक्षेप आला आहे. त्यांच्या बऱ्याच कविता प्रेमविषयक आहेत, अर्थात् त्यांचें काव्य प्रणयप्रधान आहे, या कवितांतून त्यांनीं आत्मलेखन केलें आहे, तस्मात् ते स्वतः प्रणयपीडित असले पाहिजेत; आणि ज्याअर्थीं त्यांच्या कवितांतून नैराश्याचे सूर निघत आहेत, त्याअर्थीं ते गलितोत्साह असले पाहिजेत अशी ही विचारसरणी आहे. परंतु त्यांच्या प्रेमकवितेचें विशेष अवलोकन केलें असतां ही विचारसरणी चुकीची आहे असें समजून येण्यासारखें आहे.

प्रेमासंबंधींची केशवसुतांची दृष्टि पूर्वकालीन कवींपेक्षा भिन्न होती. कवीनें स्वतःच्या प्रेमासंबंधीं ओशाळगत बाळगण्याचें कारण नाहीं असें त्यांचें मत असावें. त्याचा सरळ आविष्कार करण्यांत कांहीं चूक त्यांना दिसत नव्हती. ही दृष्टि इंग्रजी कवितेमधूनहि त्यांनीं घेतलेली असावी, पण ती काव्यरचनेच्या प्रारंभींच त्यांनी स्वीकारली व वाचकांस त्या कालांत चमत्कारिक वाटण्याजोगें असतांहि आपल्या प्रेमविषयक कवितांतून तसे वैयक्तिक उल्लेखहि त्यांनीं केले. परंतु याचा अर्थ ते प्रणयार्त आणि . . . . . सा घेतां येणार नाहीं. त्यांनीं इतर कोणत्याहि एका विषयापेक्षा प्रेमासंबंधींच्या ठरते अस. धिक लिहिल्या आहेत. तरीहि त्यांची संख्या त्यांच्या एकंदर कवितांच्या विकृति नव्हे, ... रांहि कमी भरते. म्हणजे केवळ प्रेम हा त्यांच्या विचाराचा विषय नाहीं असें त्याच म . . . त्यापि प्रेमविषयक कविता बऱ्याच आहेत हें मान्य करून त्यांत माधवराव पटवर्धनांत होती याविषयीं शंकाच आहे. ह्या कवितांत बहुसंख्य ती म्हणजे आत्मकवित्वाच्या . . . . . कांत केशवसुतांच्या वैयक्तिक प्रेमाचा संबंधच येत नाहीं. . . . . वा रूपांतर या स्वरूपाच्या आहेत. त्यांतील प्रेम केशव-

सुतांचें नाहीं. त्यांचीं सात सुनीतें प्रेमविषयक असलीं, तरी सुनीतरचनेच्या प्रयोगाकरितां शेक्सपियरप्रमाणेंच रचनानुकूल विषय एवढ्याच दृष्टीनें त्यांतील विषयाची निवड झाली आहे असें दिसतें. प्रेमाचें तत्त्वज्ञान सांगणाऱ्या प्रीति, समृद्धि आणि प्रीति, कर्तव्य आणि प्रीति, प्रीतीची भाषा, प्रणयकथन इत्यादि ५।७ कविता वैयक्तिक अनुभवापेक्षां प्रेमाचें तत्त्वज्ञानच सांगत आहेत. दोन कवितांत पौराणिक प्रेमकथा आहेत. 'स्वप्न'सारख्या एकदोन कवितांत प्रेम हा विनोदाचा विषय झाला आहे. एक कविता गमतीचें प्रत्युत्तर या दृष्टीनेंच लिहिली आहे. 'माझा अंत' ही अर्थचमत्कृतीला प्राधान्य देऊनच लिहिली आहे. हीच चमत्कृति त्यांच्या पहिल्या दोनतीन वैयक्तिक प्रेमकवितांतहि प्रविष्ट झाली आहे. सारांश, बऱ्याच प्रेमकवितांतून प्रेमाचें अवैयक्तिक प्रकटन झालेलें आहे. त्यांतील प्रेम हें केशवसुतांना चिकटविण्यांत अर्थ नाहीं. त्यांतील पद्धति आत्मलेखनाची आहे; त्यांमधील भावना आत्मीय नाहीं.

याचें कारण असें कीं, केशवसुतांचें प्रेमविषयाचें आकलन हें प्राधान्यानें बौद्धिक वा कल्पनामूलक आहे, अनुभवमूलक नाहीं. अर्थात् कोणत्याच कवितेंत त्यांचा अनुभव नसेल असें नाहीं. 'फार दिवसांनीं भेट' यासारख्या कवितांत तो असावासें वाटतें. एकदोन इतर विषयांवरील कवितांत आपल्या पत्नीविषयीं त्यांनीं काढलेले उद्गारहि वैयक्तिक प्रेमानुभवाच्या स्वरूपाचे असतील. पण यांतून प्रणय-पीडितता दिसत नाहीं. उलट ते समाहित मनःस्थितींतूनच निघाले असावे असें वाटतें. केशवसुतांचा विवाह लौकर झाला होता, व त्यांची पत्नी कुरूप असल्याचें त्यांच्या बंधूंनीं आवर्जून सांगितलें असलें, तरी त्यामुळें त्यांचें लक्ष दुसरीकडे एखाद्या अगम्य वा अप्राप्य स्थलाकडे लागलें असल्याचें त्यांच्या कवितेवरून वा चरित्रावरून कळत नाहीं. त्यामुळें गडकऱ्यांच्याप्रमाणें त्यांच्या प्रेमकवितांत वैयक्तिक प्रेमाची वा निराशेची आर्तता येऊं शकली नाहीं. केशवसुतांच्या प्रेमकविता या त्यांचें वैशिष्ट्य व्यक्त करीत नसून इतर कविताच त्यांचें प्रतिनिधित्व अधिक करितात. त्यांच्या लोकपरिचित कवितांत प्रेमविषयक कविता एखादीच असेल. त्यांच्या परंपरेंत मागाहून आलेल्या कित्येक कवींत प्रणयपीडितत्व किंवा प्रेमव्यथा तीव्र स्वरूपांत व्यक्त झालेली असेल, पण त्याचा आरोप केशवसुतांवर करण्यांत 'शिष्यापराधे गुरोर्दण्डः' असा प्रकारच होत आहे असें म्हणावयास पाहिजे. आपलें वैयक्तिक प्रेम धिटाईनें आपल्या काव्यांत प्रकट करण्याची प्रथा मात्र केशवसुतांनीं लोकमतास न भितां घालून दिली व तिचा फायदा लगेचच नंतरच्या कविपरंपरेस मिळाला. असें म्हणतां

या विचाराचा हा एवढा विस्तार करण्याचें कारण केशवसुतांमधून त्यांनीं अपसमजाचें निराकरण एवढेंच आहे. एका प्रणयपीडित कवीच्या नसून एकंदर कवि दृष्ट्या काय महत्त्व असणार असा आभास उत्पन्न करून त्यांत काव्यनिर्मितीच्या महत्त्वाच्या ठरलेल्या कवितेकडेहि दुर्लक्ष व्हावें याकरितां स्वतःचा संबंध आला, तेथें

प्रणयपीडित माणूस 'गलितोत्साह' असतोच असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा व्यक्तीकडून समाजदृष्ट्या महत्त्वाचे व क्रांतिकारक विचार प्रकट होणें कठिणच अशी कल्पना साहजिकच होते. परंतु केशवसुतांच्याबाबत याउलट वस्तुस्थिति आहे. केशवसुतांनीं लिहिलेल्या 'तुतारी', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई', 'गोफण', 'मूर्ति-भंजन', 'निशाण', 'उत्तेजनाचे शब्द' इत्यादि कवितांतून जे ओजस्वी विचार प्रकट झाले, ते मराठी कवितेंत अजूनहि ओजःसंपन्न ठरून राहिले आहेत. केशवसुतांच्या कवितेचें मोठेपण कित्येकांच्या मतानें या कवितांवर अवलंबून आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून, त्यांच्या प्रेमविषयक कवितांचा नसता बागुलबोवा उभारून, अशा या 'कृशप्रतिभ' कवीकडून मराठी कवितेंत क्रांति कशी झाली याचा 'अचंबा' करीत बसण्याची पाळी अखेर माडखोलकरांवर आली. पण स्पष्ट असणाऱ्या गोष्टी पाहावयाच्या नाहीत असें ठरविल्यावर असें न झालें तरच नवल.

याचें आणखी प्रत्यंतर पुढें पाहावें. केशवसुतांच्या कांहीं थोड्या, तीन-चार, कविता कित्येकांच्या मतानें प्रेमविषयक दिसल्या तरी कवितादेवीस उद्देशून लिहिलेल्या आहेत. 'रुष्ट सुंदरीस', 'फिर्याद', 'थकलेल्या भटकणाराचें गाणें', 'वियोगामुळें' या त्या कविता होत. यांतील शेवटच्या दोन खरोखर प्रेमगीतें समजण्यास कांहींच हरकत नाहीं, उत्कट भावाविष्काराचीं तीं चांगलीं उदाहरणें आहेत. 'रुष्ट सुंदरी'-मधील सुंदरी ही मानवी व्यक्ति नसून काव्यदेवता असावी असें वाटण्याजोगी तिची रचना आहे. 'फिर्याद' ही तर लक्षणेनेंच घ्यावयास हवी, व बहुधा ती काव्यदेवतेवरील फिर्याद आहे. या एक-दोन कविता काव्यदेवतेस अनुलक्षून आहेत हें कबूल केलें, तरी त्यांत अनैसर्गिक प्रेमाचा भाग आहे असा अर्थ कसा निघूं शकतो? पण माडखोलकरांचें म्हणणें पाहावें. ते म्हणतातः—'कवितेवर चेतनागुणाचा आरोप करून एखाद्या कामार्तास्त्रीप्रमाणें तिचें प्रणयाराधन करीत सुटणें हा तरी एक मानसिक **विकलतेचा** किंवा **विकृतीचा** प्रकारच म्हणावा लागेल!' ध्येयभूत कल्पनेवर प्रेयसीचें रूपक करून तिजविषयीं कविता लिहिणें ही गोष्ट केशवसुतांच्या वेळीं तरी शिष्टसंमत असावी. कीर्ति किंवा परमेश्वरकल्पना यासंबंधीं हीं रूपकें होऊन गेलेलीं होतीं. केशवसुतांनीं त्याच प्रथेचा अवलंब केल्याबरोबर तो मानसिक विकृतीचा प्रकार होतो हें अजब नाहीं काय? या कविता प्रणयविषयक असल्या तर प्रणयपीडितत्व लागू पडतें आहेच, होते अ[illegible] त्या तशा नसल्या, व काव्यदेवतेविषयीं असल्या, तर ती मानसिक विकृति कविता अ[illegible]ड्या खोडा आहे. या खोडाच्याला त्या प्रणयविषयक असल्या तर ती मानसिक एकतृतीयांशापे[illegible]णि काव्यदेवताविषयक असल्या, तर त्यांत प्रणयपीडितत्व येऊं शकत होता असें नाहीं. [illegible]सल्याचें उत्तर देणें अशक्य नाहीं.

वैयक्तिकता किती प्र[illegible]

कविता अशा आहेत कीं [illegible]नांनी एक वेगळीच विकृति केशवसुतांना चिकटविली आहे. त्यांतील सात कविता भाषांतर[illegible]ा जाणीवेची होय. ते म्हणतातः—"कवीस सृष्टींतील

विविध विषयांनीं स्फूर्ति होऊन त्यानें काव्यें रचावींत हें स्वाभाविक आहे; त्यानें कविता आणि कवि **याच** विषयावर पद्यें रचीत बसावें हें चमत्कारिक वाटतें. आपल्या कवित्वाची मधून मधून अशी सारखी जाणीव होत राहणें हें एक **रोगटपणाचें** लक्षण आहे." या विचाराचें सविस्तर उपपादन पटवर्धनांनीं केलें आहे. तें सर्व येथें उतरण्याचें कारण नाहीं. पण या आक्षेपाचा अर्थ काय व त्यांत कितपत तथ्य आहे तें पाहणें आवश्यकच आहे.

केशवसुतांनीं कवि आणि काव्य यांविषयीच्या बऱ्याच कविता लिहिल्या आहेत हें खरें आहे. कवीने काव्यचर्चा करण्यापेक्षा काव्यलेखन करावें हें एकंदरींत इष्ट आहे. परंतु केशवसुत **याच** विषयावर पद्यें रचीत बसले होते असें अत्युक्तिपूर्ण विधान पटवर्धन कोणत्या आधारावर करितात तें कळत नाहीं. केशवसुतांच्या काव्यविषयक कविता १५–२० पेक्षां अधिक नाहींत. ही संख्यासुद्धा लक्षांत घेण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. परंतु यावरून त्यांची वृत्ति रोगट झाली होती असें कसें म्हणतां येतें? केशवसुतांना एकंदरींत काव्यविषयक जाणीव चांगली होती एवढें अनुमान त्यावरून निघतें. कवीनें काव्यविषयक चर्चा करूंच नये असें कोणी म्ह[illegible]णार नाहीं. कित्येक (पटवर्धनांसारखे) ती गद्यांत करितात, केशवसुतांनी ती [illegible] केली आहे इतकेंच. कवीला आत्मकवित्वाची जाणीव नसावी असें म्हणणें म्[illegible] ग्रेट्नेस् इज् अन्कॉन्शस्' या कार्लाइलप्रणीत वचनाचा दुरुपयोगच होय. केशवसुतांनीं काव्यविषयक चर्चा करावी यास एक विशेष कारण होतें हेंहि विसरतां येत नाहीं. त्यांच्या काव्यकल्पना निराळ्या, पाश्चात्य पद्धतीच्या होत्या. त्यांना धरून ते 'नवीन काव्यें' लिहीत होते. नवकाव्याचें स्वागत जेव्हां नीट होत नाहीं, तेव्हां तें तें काव्य लिहिणारे कवि आपल्या काव्यकल्पना स्पष्ट करीत असतात. मुक्तच्छंदाची तरफदारी अनिल कवींना करावी लागली. शेली–वर्डस्वर्थ यांनींहि आपआपल्या काव्यकल्पनांचें समर्थन केल्याचें प्रसिद्ध आहे. मराठीमधून काव्यरचना करण्याचें समर्थनहि ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतां-पर्यंतच्या कवींना करावें लागलें. आपल्या कलेविषयीं जाणीवपूर्वक विचार करून त्या विचारांचा आविष्कार करणारा कलावंत सुजाण कलावंत समजला जावा. हें अनिष्ट तेव्हांच होईल कीं जेव्हां कवि आपल्या स्वतःच्या कवित्वाची प्रौढी सांगत राहील; व तिचें सतत प्रदर्शन करील; इतरांच्याबद्दल मत्सराची आणि तुच्छतेची भावना यांचा सतत आविष्कार करील; त्यांत स्वतःच्या न्यूनत्वाची टोचणी होऊन स्वतः [illegible] त्याचा ऱ्हास होत राहील. असा कांहीं प्रकार केशवसुतांबाबत खरा होता येणार नाहीं. आपल्या 'कवि', 'आम्ही कोण', 'प्रतिभा' या कवितांविषयक एका कविमाहात्म्य वर्णन केलें आहे हें खरें, परंतु तें स्वतःच्याबद्दलचें काव्याचें सामाजिक-या जातीबद्दलचें होतें. त्यांनीं काव्यविषयक कविता लिहिल्याच्या सामाजिकदृष्ट्या प्रक्रियेची चर्चा आहे; तिचा स्वतःशीं संबंध नव्हता. जेथें ही एक शक्कल होती.

आपल्याकडे विनीतत्वाची भूमिका घेऊन ते स्वतःचा उल्लेख करितात. त्यांत न्यूनगंडापेक्षां विनयाचा भागच अधिक असतो. सारांश, आत्मकवित्वाची रोगट म्हणण्याइतकी तीव्र व मत्सर वा न्यूनगंड यांनीं युक्त अशी जाणीव ते बाळगून होते असें म्हणतां येत नाहीं. आपल्याकडून अधिक आणि चांगली काव्यनिर्मिति व्हावी असें त्यांना वाटत असल्यास व त्याचें असमाधान वाटत असल्यास त्यांत अश्लाघ्य असें कांहीं होतें असें कसें म्हणतां येईल ?

पण केशवसुतांच्या कवितेवरील यापेक्षांहि महत्त्वाचा आक्षेप दुसराच आहे. तो म्हणजे केशवसुतांची कविता क्लृप्तिप्रधान आहे हा होय. 'क्लृप्ति' हा शब्द केशवसुतांनींहि अनेक ठिकाणीं योजिला आहे. परंतु त्यांचा आणि पटवर्धनांचा अर्थ हे कांहींसे वेगळे आहेत. केशवसुत 'क्लृप्ति' हा शब्द कल्पना या साध्या अर्थानें योजतात. भावना (भाव) आणि शब्द (मूर्ति) यांच्या संगमांतून 'सरस क्लृप्ति आणि विचार' हीं बालकें जन्मास येतात, असें 'चिन्हीकरण' या आपल्या कवितेंत ते म्हणतात. 'काव्य कोणाचें' या कवितेंतहि 'क्लृप्ति आढळली सरस एक त्याला' असे शब्द त्यांनीं घातले आहेत. येथेंहि तोच अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. 'सृष्टि आणि कवि' या कवितेंतहि 'सत्क्लृप्तिपूरित असें सदनास येतें' या चरणांत 'चांगल्या कल्पना' असाच अर्थ आहे. 'ज्या मत्क्लृप्ति तुझ्याविशीं' या वचनांतहि तोच अर्थ आहे. या अर्थानें काव्य क्लृप्तिप्रधान असल्यानें कांहींच बिघडत नाहीं. परंतु पटवर्धन त्याचा अर्थ वेगळा घेतात. क्लृप्ति म्हणजे युक्ति, वक्रता, चमत्कृति असा अर्थ ते घेतात व ही चमत्कृतीहि क्लिष्ट व कष्टसिद्ध असते असें त्यांना म्हणावयाचें आहे. 'चमत्कृतिजनक कष्टसिद्ध क्लृप्ति', 'क्लृप्तिप्रसू मनोराज्य', 'चमत्कृतिजनक बुद्धिविलास', 'कल्पनेचा चमत्कृतिजनक विलास', 'चमत्कृतिजनक आहे, परंतु हृदयस्पर्शी नाहीं', इत्यादि शब्दप्रयोगांवरून त्यांना काय म्हणावयाचें आहे याचें अनुमान करितां येतें. तें असें:— केशवसुतांच्या कवितेंत कल्पनानिष्ठ चमत्कृतीच अधिक आहे, भावनानिष्ठ रसनिर्मिति नाहीं. ते म्हणतातच :—"ज्यांत क्लिष्ट चमत्कृतिजनक क्लृप्ति नाहीं, तर भावनेची रसाळ, हृदयंगम अभिव्यक्ति आहे अशीं स्थळें केशवसुतांच्या कवितेंत फार सापडत नाहींत. काव्यांत भावनेला म्हणजे रसाला प्राधान्य हवें; अर्थचमत्कृति म्हणजे बुद्धिविलास होय; व त्यांत भावनेला अडथळाच होतो." या विधानांतील उत्तरार्धामधील भागाबद्दल कोणाचीच हरकत येणार नाहीं. पण पूर्वार्धांतील विधान म्हणजे केशवसुतांच्या कवित्वावरच प्रहार आहे.

परंतु याबाबतहि अंधगजन्यायच प्रभावी ठरला आहे. ज्यांत क्लृप्ति प्रधान
ण भावनेलाच प्राधान्य आहे अशाहि कित्येक कविता केशवसुतकाव्यांत
कारणन. 'आईकरितां शोक', 'सिंहावलोकन', 'फार दिवसांनी भेट',
आज्ञार्थामुळें गाणें', 'मूर्तिभंजन', 'दोन बाजी', 'संध्याकाळ',

'पुष्पाप्रत', 'फुलांची पखरण', 'भृंग', 'आई! आई!', 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', 'गोष्टी घराकडिल', 'एक खेडें', 'तुतारी', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई', या कवितांत कल्पनाचमत्कृति शून्य तरी, नाहींतर फार अल्प अशी असून भावनेचा भागच त्यांत प्रधान आहे. यावद्दल पटवर्धनांनाहि मान्यता द्यावी लागली असती. आणखीहि कित्येक कवितांचा उल्लेख करितां येईल. कवितांची ही एवढी लांबलचक यादी देण्याचें कारण पटवर्धनांच्या 'फार स्थळें सापडत नाहींत' या विधानानें वाचकाचा गैरसमज होऊं नये. कित्येक कवितांतून चमत्कृति आहे, पण भावना अधिक हृद्य आहे असें आपणांस म्हणतां येईल हेंहि लक्षांत घ्यावें. 'हरपलें श्रेय', 'घुबड', 'वातचक्र' या कविता अशा आहेत. हीं उल्लेखिलेलीं स्थळें 'फार सापडत नाहींत' या शब्दप्रयोगांत बसूं शकतील काय? 'फार' हा शब्द शपथेंतून निसटायला चांगला आहे, परंतु विधानामध्यें असायला वाईट असतो.

आतां हेंहि खरें कीं केशवसुतांच्या कांहीं कवितांतून त्यांना भावनांपेक्षा विचारच अभिप्रेत असतो. विचार सरळ सांगितला, तर तो गद्यप्राय होतो. म्हणून केशवसुत तो रूपकाच्या द्वारें सांगत. म्हणजे त्याला कांहींतरी वेधकत्व प्राप्त होई. 'कल्पकता', 'दिवा आणि तारा', 'शब्दांनो! मागुते या', 'चिन्हीकरण', 'रूढि–सृष्टि–कलि', 'दिव्य ठिणगी', 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य', 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि', इत्यादि उदाहरणें हीं अशीं आहेत. सुनीतांमधूनहि ही अर्थचमत्कृति येते. कारण सुनीत हा काव्यप्रकारच विचारप्रधान आहे. यांतील अर्थचमत्कृति, अथवा पटवर्धनांच्या शब्दांत 'क्लृप्ति' कोणालाहि मान्य करावी लागेल. परंतु या कवितांच्या बरोबरीनें दुसऱ्या बाजूस संख्येनें तितक्याच, किंबहुना अधिक असणाऱ्या भावना-प्रधान सरस कवितांकडे डोळेझाक करून, केवळ बोलून चालून क्लृप्तिप्रधान कवितांकडे बोट दाखविण्यांत वस्तुस्थितीचा विपर्यास होत नाहीं काय? काव्यसौंदर्य हें अनेक–घटक-घटित असतें. त्यांत उत्कट भावनांबरोबर विचार आणि कल्पना यांचेंहि सौंदर्य येतें. कोठें हें आणि कोठें तें प्रधान असतें. काव्याच्या व्यापक कल्पनेमध्यें सर्वच प्रकारचें सौंदर्य बसूं शकतें. आपल्या विचारांना वेधकत्व देण्यासाठीं केशवसुतांनीं चमत्कृतीचा आश्रय केला. सामान्य वाचकांनीं त्या विचारांतील महत्त्व जाणलें व चमत्कृति सोडून दिली, आणि केशवसुतांची भावप्रधान कविताच उचलून धरली. केशवसुतांची कविता म्हटल्यावर त्यांची क्लिष्ट, कष्टसिद्ध कविता डोळ्यांपुढें येत नाहीं, भावप्रधान कविताच येते.

केशवसुतांच्या काव्यदृष्टीवर पटवर्धनांनीं आणखी एक आक्षेप घेतलाआहे तो असा कीं केशवसुत शब्दांना फारच महत्त्व देत. या आक्षेपास सामाजिकदृष्ट्या महत्त्व द्यावयाचें आहे तें स्पष्ट नाहीं. परंतु तो तसाच राहूं देणें एक शक्कल होती.

असा होतो कीं केशवसुत हे काव्याच्या अप्रधान अशा शब्दांगावद्दलच आस्था बाळगणारे व प्रधान अशा अर्थाच्या अंगाकडे दुर्लक्ष करणारे असे कवि होते. अर्थाकडे दुर्लक्ष करून शब्दाला महत्त्व देणाराची काव्यदृष्टि सदोषच समजावयास पाहिजे, व त्याबद्दल कोणी हरकत घेणार नाहीं. पण केशवसुतांबाबत वस्तुस्थिति काय होती हा विचार महत्त्वाचा आहे. त्यांचें शब्दप्रभुत्व त्यांच्या आशयाच्या मानानें तोटकें पडे ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तेव्हा त्यांना शब्दांचें महत्त्व वाटे हें साहजिकच झालें. परंतु शब्दाचें हें महत्त्व तो अर्थाचा वाहक आहे म्हणूनच आहे ही गोष्ट केशवसुतांनीं दृष्टीआड केलेली नव्हती. शब्दाकरिता शब्द घातले असें त्यांच्या कवितेंत झालें नाहीं. उलट अर्थाला पर्याप्त असे शब्द पडले नाहींत असेंच अनेक वेळां होई. 'शब्दांनो, मागुते या' असें ते म्हणतात तें याकरितां. 'वातचक्र' या कवितेंत शब्दांचें नष्ट झालेलें सामर्थ्य त्यांना पुनः मिळवून देण्याकरिता त्यांना स्वर्गांत पाठविण्याची कल्पना ते मनांत आणतात. विद्यार्थ्याला उपदेश करितांना एकेक शब्दाचें सामर्थ्य ओळखण्यास ते त्याला सांगतात. याचा अर्थ शब्दांची खरी शक्ति लक्षांत घेण्याची त्यांना आवश्यकता वाटते, एवढाच आहे; अर्थाकडे दुर्लक्ष केलें तर चालेल असा नाहीं. स्वतः केशवसुतांनीं योजिलेले शब्द अनेक वेळां खडबडीत, श्रुतिकटु, रूपदुष्ट असे असत. त्यांनीं शब्दांची खरोखरीच फिकीर केली असती, तर त्यांची रचना सुश्लिष्ट, अधिक ललित, अधिक माधुर्यपूर्ण झाली असती. पण केशवसुतांनीं तेवढी फिकीर केली नाहीं असेंच म्हणावें लागतें. त्यांचे शब्द अर्थाला अपुरे पडत, परंतु अर्थशून्य शब्दांची आतषबाजी त्यांनीं केली नाही. त्यांचा दोष असेल, तर शब्दांवरील अप्रभुत्वाचा होता, अर्थापेक्षां शब्द अधिक मानण्याचा नव्हता.

केशवसुतांची कविता उपदेशपर आहे, ती तात्कालिक महत्त्वाच्या सामाजिक आशयावर लिहिली गेली असल्यानें तिचें अक्षरमूल्य कमी होतें अशा अर्थाचे आक्षेपहि घेतले गेले आहेत. येथेंहि 'जें एकदेशत्वानें खरें, तें सर्वांशानें खरें' असें मानण्याची चूक होते व प्रत्यक्ष कवितांचें संख्यादार अवलोकन केलें असतां ते असिद्धच राहतात. केशवसुतांच्या प्रत्यक्षोपदेशाच्या कविता फार थोड्या आहेत. 'विद्यार्थ्याप्रत', 'उत्तेजनाचे शब्द' अशा त्या आहेत. हें मात्र खरें की 'साध्या विषयांतहि मोठा आशय पाहण्याचा' केशवसुतांचा स्वभाव होता. असा आशय कवि स्वतःपुरता पाहात असला, तरी तो आशय लोकांच्यापुढें तो ठेवूं लागला कीं त्याला उपदेशाचें रूप प्राप्त होणें फार सुकर असतें. रांगोळीविषयींची त्यांची कविता अशी आहे. 'तुतारी' सारख्या त्यांच्या सामाजिक आशयाच्या कविताहि या कारणानें बोधपर वाटणें अशक्य नाहीं. तथापि कवीनें तत्त्वविचार प्रकट केला कीं ती कविता बोधपर झाली असें म्हणण्याचें कारण नाहीं. तसेंच 'नाचत गुंगत म्हणा म्हणा । झपूर्झा गडे झपूर्झा ।' या ओळींतील आज्ञार्थामुळें ती कविता बोधपर झाली असें होत नाहीं.

समकालीन सामाजिक आशयावरील कविता आणि प्रासंगिक कविता यांत फरक करावयाला हवा. अगदीं प्रासंगिक म्हणतां येतील अशा १–२ च कविता केशवसुतांनीं लिहिल्या. एक मध्यभारतांतील दोन संस्थानिकांच्या मृत्यूविषयींची व दुसरी अप्पाजी बळवंत दाते यांस उद्देशून लिहिलेली. सामाजिक परिस्थितीला प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेली कविता प्रासंगिक म्हणून त्याज्य ठरवूं लागलों तर बरेंच वाङ्मय विचाराच्या कक्षेबाहेर ठेवावें लागेल. अशी कविता प्रासंगिक नसते; कालनिघ्न असते. कालनिघ्न असूनहि तिचें मूल्य ती किती उत्कटत्वानें वाहेर पडलेली असते यावर अवलंबून आहे, त्या विशिष्ट प्रश्नाच्या तात्कालिक महत्त्वावर नाहीं. 'तुतारी'सारख्या कवितेला तांब्यांसारख्या कवीने नाक मुरडल्याचें प्रसिद्ध आहे. पण तिचें काव्यमूल्य तीमधील आशयापेक्षां तो ज्या उत्कटत्वानें व जिव्हाळ्यानें व्यक्त झाला आहे, त्या जिव्हाळ्याला आहे. हा जिव्हाळा आणि भावनोत्कटता प्रामाणिक नसून दिखाऊ आहे असें ठरल्यास मात्र तिचें काव्यमूल्य कमी ठरेल. परंतु केशवसुतांची या कवितेमधील भावोत्कटता दिखाऊ आहे किंवा अप्रामाणिक आहे असें आजवर कोणीं म्हटलेलें नाहीं.

केशवसुतांवर आणि त्यांच्या कवितेवर घेण्यांत येणाऱ्या या अनेक आक्षेपांच विचार करण्याचें कारण असें कीं, त्या आक्षेपांमधील तथ्यातथ्य किती हें कळल्यानें त्यांच्या कवितेचें निवळ स्वरूपहि लक्षांत यावें. केशवसुतांच्यासंबंधीं आणखी कांहीं प्रश्नांचा ऊहापोह चालतो. त्यांपैकी एक महत्त्वाचा प्रश्न असा कीं, केशवसुतांचा संप्रदाय असा कांहीं आहे किंवा होता काय, आणि असल्यास त्याचा अर्थ काय? केशवसुतांचा संप्रदाय या वाक्प्रयोगाचा द्विविध अर्थ होतो. एक–केशवसुत ज्या संप्रदायाचे अनुयायी असतील तो, व दुसरा––त्यांच्यापासून एखादा संप्रदाय सुरू. झाला किंवा त्यांनीं सुरू केला, हा. त्यांपैकी पहिल्या अर्थानें केशवसुतांचा संप्रदाय मराठीमध्यें त्यांच्याआधीं अस्तित्वांत नव्हता हें उघड आहे. जो कवि 'नवीं काव्यें' लिहावयास प्रवृत्त झाला होता, तो आधीच्या संप्रदायाचा अनुयायी होता असें अर्थातच म्हणतां येत नाहीं. परंतु मराठी कवितेंत तो नसला तरी इंग्रजी कवितेमध्यें तो होता, तो म्हणजे भावगीत–संप्रदाय होय. कवि आपल्या स्वतःच्या भावना एकैकशः स्फुटा पण स्वतंत्र अशा कवितांच्या द्वारें उत्कटपणें व्यक्त करितो, तो भावगीतांचा संप्रदाय म्हणजे केशवसुतांचा पहिल्या अर्थानें संप्रदाय होय. परंतु तो मराठी कवितेंत नसून इंग्रजी कवितेंत होता. हें भावगीत–कवितेचें रूप मराठी कवितेला द्यावयाचें अशी केशवसुतांची इच्छा होती यांत शंका नाहीं. या घटनेस संप्रदायस्थापनेचें रूप द्यावें अशी त्यांची इच्छा होती असें मात्र म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं जें केलें, तें एकट्यानें केलें; शिष्यवर्ग किंवा शिष्यपरंपरा जोडून किंवा जमवून केलें असें नाहीं. तेव्हां त्यांनीं संप्रदाय स्थापिला असें म्हणतां येणार नाहीं. परंतु त्यांनीं स्वतः होऊन तो स्थापिला नसला,

तरी त्यांच्यामागून तो निर्माण झाला नाहीं असें होत नाहीं. त्यांच्या कवितेमधील नवीनता अनेक कवींना पटली होती. कवि टिळक 'कृष्णानें' शिकविलेली कविता गाऊं इच्छीत होते, गडकऱ्यांनीं स्वतःस त्यांचा चेला म्हणविलें, रेंदाळकर व नागेश या जुन्या पद्धतीनें शिक्षण झालेल्या कवींनींहि त्यांची 'साथ' करावयाचें धोरण पत्करलें होतें. त्यांच्या 'तुतारी' कवितेचा एक संप्रदायच बनला, व तीवरून स्थापिल्या गेलेल्या एका अल्पजीवि मंडळाच्या नांवानें आपल्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात असें बालकवींनाहि वाटत असे. अशा प्रकारें केशवसुतांचा एक संप्रदाय तयार झाला. त्याला केशवसुत स्वतः जबाबदार नसतील, तरीहि संप्रदाय निर्माण झाला हें खरेंच म्हणावयास पाहिजे.

या संप्रदायाच्या अर्थासंबंधींहि मतभेद किंवा गोंधळ आहे असें दिसतें. वस्तुतः आत्मलेखनात्मक भावगीतस्वरूप काव्याची रचना हा त्याचा अर्थ आहे. या मूळ अर्थानें अर्वाचीन कवितेंतील बहुसंख्य भावगीत–कविता ही केशवसुतसंप्रदायाचीच कविता म्हणावी लागेल. परंतु या व्यापक अर्थामध्यें कांहीं तपशील घालून त्याचें स्वरूप मर्यादित वा विशिष्ट करण्याचा प्रयत्न केव्हां केव्हां होतो. केशवसुतांनीं समकालीन सामाजिक परिस्थितीस प्रतिक्रियात्मक अशी जी कविता लिहिली व तीमधून रूढिविरुद्ध प्रतिपादन केलें, आणि सामाजिक सुधारणेस अनुकूल असे विचार प्रकट केले, तेंच त्यांच्या कवितेचें वैशिष्ट्य असून हें करणारे तेवढे केशवसुतसंप्रदायी अशीहि कित्येकांची समजूत असल्याचें दिसतें. खरोखर पाहतां सामाजिक आशयाची कविता हें केशवसुतांच्या कवितेच्या आशयदृष्टचा पडणाऱ्या अनेक अंगांपैकी एक अंग आहे. अखेरच्या चारपांच वर्षांत या विषयावर त्यांनीं लिहिलेल्या कविता एक-दोनच निघतील. या वेळीं ते अधिक चिन्तनशील झाले व समकालीन सामाजिक जीवनापेक्षां अधिक व्यापक अशा मानव-जीवनाविषयींच्या विचाराकडे ते वळले असावे. 'हरपलें श्रेय' ही त्यांची कविता याची द्योतक आहे. कित्येकांच्या मतानें जीवनविषयक खोल विचाराबद्दलची ही ओढ हाच त्यांच्या कवितेमधील महत्त्वाचा भाग होय व त्यांचा संप्रदाय त्यावरून ओळखला जावा. पण हा विचारहि निर्णायक म्हणतां येत नाहीं. कारण त्यांच्या अखेरच्या कवितांत 'प्रतिभे'सारखी काव्यविषयक कविता, 'गोफण'सारखी तुतारी–संप्रदायांत बसणारी कविता, 'आईकरिता शोक' ही वैयक्तिक भावनाविष्काराची कविता, 'कचाप्रत देवयानी' किंवा 'राजा शंतनु' यांसारख्या प्रेमकथात्मक कविता, कांहीं प्रेमविषयक सुनीतें, 'घुबड'सारखें उत्कृष्ट रूपांतर, अशी विविध स्वरूपाची कविता आहे. तेव्हां अमुकच एक विशिष्ट आशय हा केशवसुतांच्या कवितेचा आत्मा आहे असें म्हणतां येत नाहीं. या सर्वांना व्यापून असणारें आत्मलेखनात्मक भावगीतत्व हें मात्र कायम असें तिचें वैशिष्ट्य होतें. हें ज्यांच्या कवितेमध्यें आहे, ते सारे त्यांच्या परंपरेमध्ये वसतात असें म्हणावयास हरकत नाही.

समकालीन सामाजिक आशयावरील कविता आणि प्रासंगिक कविता यांत फरक करावयाला हवा. अगदीं प्रासंगिक म्हणतां येतील अशा १–२ च कविता केशवसुतांनीं लिहिल्या. एक मध्यभारतांतील दोन संस्थानिकांच्या मृत्यूविषयींची व दुसरी अप्पाजी बळवंत दाते यांस उद्देशून लिहिलेली. सामाजिक परिस्थितीला प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेली कविता प्रासंगिक म्हणून त्याज्य ठरवूं लागलों तर बरेंच वाङ्मय विचाराच्या कक्षेबाहेर ठेवावें लागेल. अशी कविता प्रासंगिक नसते; कालनिघ्न असते. कालनिघ्न असूनहि तिचें मूल्य ती किती उत्कटत्वानें बाहेर पडलेली असते यावर अवलंबून आहे, त्या विशिष्ट प्रश्नाच्या तात्कालिक महत्त्वावर नाहीं. 'तुतारी'सारख्या कवितेला तांब्यांसारख्या कवीने नाक मुरडल्याचें प्रसिद्ध आहे. पण तिचें काव्यमूल्य तीमधील आशयापेक्षां तो ज्या उत्कटत्वानें व जिव्हाळ्यानें व्यक्त झाला आहे, त्या जिव्हाळ्याला आहे. हा जिव्हाळा आणि भावनोत्कटता प्रामाणिक नसून दिखाऊ आहे असें ठरल्यास मात्र तिचें काव्यमूल्य कमी ठरेल. परंतु केशवसुतांची या कवितेमधील भावोत्कटता दिखाऊ आहे किंवा अप्रामाणिक आहे असें आजवर कोणीं म्हटलेलें नाहीं.

केशवसुतांवर आणि त्यांच्या कवितेवर घेण्यांत येणाऱ्या या अनेक आक्षेपांच विचार करण्याचें कारण असें कीं, त्या आक्षेपांमधील तथ्यातथ्य किती हें कळल्यानें त्यांच्या कवितेचें निवळ स्वरूपहि लक्षांत यावें. केशवसुतांच्यासंबंधीं आणखी कांहीं प्रश्नांचा ऊहापोह चालतो. त्यांपैकी एक महत्त्वाचा प्रश्न असा कीं, केशवसुतांचा संप्रदाय असा कांहीं आहे किंवा होता काय, आणि असल्यास त्याचा अर्थ काय? केशवसुतांचा संप्रदाय या वाक्प्रयोगाचा द्विविध अर्थ होतो. एक–केशवसुत ज्या संप्रदायाचे अनुयायी असतील तो, व दुसरा––त्यांच्यापासून एखादा संप्रदाय सुरू झाला किंवा त्यांनीं सुरू केला, हा. त्यांपैकी पहिल्या अर्थानें केशवसुतांचा संप्रदाय मराठीमध्यें त्यांच्याआधीं अस्तित्वांत नव्हता हें उघड आहे. जो कवि 'नवीं काव्यें' लिहावयास प्रवृत्त झाला होता, तो आधीच्या संप्रदायाचा अनुयायी होता असें अर्थातच म्हणतां येत नाहीं. परंतु मराठी कवितेंत तो नसला तरी इंग्रजी कवितेमध्यें तो होता, तो म्हणजे भावगीत–संप्रदाय होय. कवि आपल्या स्वतःच्या भावना एकैकशः स्फुटा पण स्वतंत्र अशा कवितांच्या द्वारें उत्कटपणें व्यक्त करितो, तो भावगीतांचा संप्रदाय म्हणजे केशवसुतांचा पहिल्या अर्थानें संप्रदाय होय. परंतु तो मराठी कवितेंत नसून इंग्रजी कवितेंत होता. हें भावगीत–कवितेचें रूप मराठी कवितेला द्यावयाचें अशी केशवसुतांची इच्छा होती यांत शंका नाहीं. या घटनेस संप्रदायस्थापनेचें रूप द्यावें अशी त्यांची इच्छा होती असें मात्र म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं जें केलें, तें एकट्यानें केलें; शिष्यवर्ग किंवा शिष्यपरंपरा जोडून किंवा जमवून केलें असें नाहीं. तेव्हां त्यांनीं संप्रदाय स्थापिला असें म्हणतां येणार नाहीं. परंतु त्यांनीं स्वतः होऊन तो स्थापिला नसला

तरी त्यांच्यामागून तो निर्माण झाला नाहीं असें होत नाहीं. त्यांच्या कवितेमधील नवीनता अनेक कवींना पटली होती. कवि टिळक 'कृष्णानें' शिकविलेली कविता गाऊं इच्छीत होते, गडकऱ्यांनीं स्वतःस त्यांचा चेला म्हणविलें, रेंदाळकर व नागेश या जुन्या पद्धतीनें शिक्षण झालेल्या कवींनींहि त्यांची 'साथ' करावयाचें धोरण पत्करलें होतें. त्यांच्या 'तुतारी' कवितेचा एक संप्रदायच बनला, व तीवरून स्थापिल्या गेलेल्या एका अल्पजीवि मंडळाच्या नांवानें आपल्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात असें बालकवींनाहि वाटत असे. अशा प्रकारें केशवसुतांचा एक संप्रदाय तयार झाला. त्याला केशवसुत स्वतः जबाबदार नसतील, तरीहि संप्रदाय निर्माण झाला हें खरेंच म्हणावयास पाहिजे.

या संप्रदायाच्या अर्थासंबंधींहि मतभेद किंवा गोंधळ आहे असें दिसतें. वस्तुतः आत्मलेखनात्मक भावगीतस्वरूप काव्याची रचना हा त्याचा अर्थ आहे. या मूळ अर्थानें अर्वाचीन कवितेंतील बहुसंख्य भावगीत–कविता ही केशवसुतसंप्रदायाचीच कविता म्हणावी लागेल. परंतु या व्यापक अर्थामध्यें कांहीं तपशील घालून त्याचें स्वरूप मर्यादित वा विशिष्ट करण्याचा प्रयत्न केव्हां केव्हां होतो. केशवसुतांनीं समकालीन सामाजिक परिस्थितीस प्रतिक्रियात्मक अशी जी कविता लिहिली व तीमधून रूढिविरुद्ध प्रतिपादन केलें, आणि सामाजिक सुधारणेस अनुकूल असे विचार प्रकट केले, तेंच त्यांच्या कवितेचें वैशिष्ट्य असून हें करणारे तेवढे केशवसुतसंप्रदायी अशीहि कित्येकांची समजूत असल्याचें दिसतें. खरोखर पाहतां सामाजिक आशयाची कविता हें केशवसुतांच्या कवितेच्या आशयदृष्टया पडणाऱ्या अनेक अंगांपैकी एक अंग आहे. अखेरच्या चारपांच वर्षांत या विषयावर त्यांनीं लिहिलेल्या कविता एक-दोनच निघतील. या वेळीं ते अधिक चिन्तनशील झाले व समकालीन सामाजिक जीवनापेक्षां अधिक व्यापक अशा मानव-जीवनाविषयींच्या विचाराकडे ते वळले असावे. 'हरपलें श्रेय' ही त्यांची कविता याची द्योतक आहे. कित्येकांच्या मतानें जीवनविषयक खोल विचाराबद्दलची ही ओढ हाच त्यांच्या कवितेमधील महत्त्वाचा भाग होय व त्यांचा संप्रदाय त्यावरून ओळखला जावा. पण हा विचारहि निर्णायक म्हणतां येत नाहीं. कारण त्यांच्या अखेरच्या कवितांत 'प्रतिभे'सारखी काव्यविषयक कविता, 'गोफण'सारखी तुतारी–संप्रदायांत बसणारी कविता, 'आईकरिता शोक' ही वैयक्तिक भावनाविष्काराची कविता, 'कचाप्रत देवयानी' किंवा 'राजा शंतनु' यांसारख्या प्रेमकथात्मक कविता, कांहीं प्रेमविषयक सुनीतें, 'घुवड'सारखें उत्कृष्ट रूपांतर, अशी विविध स्वरूपाची कविता आहे. तेव्हां अमुकच एक विशिष्ट आशय हा केशवसुतांच्या कवितेचा आत्मा आहे असें म्हणतां येत नाहीं. या सर्वांना व्यापून असणारें आत्मलेखनात्मक भावगीतत्व हें मात्र कायम असें तिचें वैशिष्ट्य होतें. हें ज्यांच्या कवितेमध्यें आहे, ते सारे त्यांच्या परंपरेमध्ये बसतात असें म्हणावयास हरकत नाही.

ज्या इंग्रजी काव्याची परंपरा केशवसुतांनीं स्वीकारली होती, त्या परंपरेंत खरें पाहतां व्यक्तिस्वातंत्र्यावरच अधिक भर होता. केशवसुतांच्या सामाजिक कवितांमधूनहि सामाजिक रूढींपासून व्यक्तीस हव्या असणाऱ्या स्वातंत्र्याचा भाग अधिक होता. 'दुर्मद रूढि' (तुतारी), 'रूढीचे दास' (स्फूर्ति), रूढिकाराक्षसी (हरिभाऊ आपटे यांस), 'दितीची कन्या' (रूढि–सृष्टि–कलि) इत्यादि शब्दप्रयोगांवरून तें दिसून येतें. या स्वातंत्र्याशीं सुसंगत अशा समता (तुतारी) आणि विश्वबंधुत्व (नवा शिपाई) या तत्त्वांचाहि स्वीकार केल्यानें केवळ वैयक्तिकापेक्षां व्यापक असा अर्थ त्याला प्राप्त होऊन अस्पृश्य व मजूर यांविषयींहि त्यांनीं लिहिलें. हें खरें असलें तरी त्यांची काव्यविषयक कविता प्राधान्यानें वैयक्तिक आत्माविष्काराचीच होती हें विसरतां येत नाहीं. काव्याकडे पाहण्याची ही नवीन दृष्टि म्हणजेच केशवसुतांची व अर्वाचीन कवितेची परंपरा होय.

या विचारास जवळ असणारा आणि पुनः पुनः चचस निघणारा प्रश्न म्हणजे केशवसुतांचें क्रान्तिकारकत्व कशामध्यें होतें हा होय. मराठी काव्यांत क्रांति न होतां उत्क्रांति झाली असें म्हणणारांपुढे हा प्रश्न अर्थात् येतच नाहीं. तसेंच केशवसुत हे क्रांतीच्या प्रवाहांत सापडले होते, असें म्हणणाऱ्या पटवर्धनांच्या पुढेंहि हा प्रश्न नाही. कारण ते केशवसुतांना क्रांतिकारक समजत नाहींत. तेव्हां केशवसुतांना क्रांतिकारक समजणाऱ्यांच्या बाबतच हा प्रश्न उपस्थित होतो. क्रांति दोन प्रकारची : (१) सामाजिक क्षेत्रांतील, आणि (२) काव्याच्या क्षेत्रांतील. केशवसुतांच्या कवितेमध्यें सामाजिक क्रांतीला अनुकूल असे विचार आले आहेत. आपल्या 'स्फूर्ति' या कवितेंत बंडाचा झेंडा उभारून जग उलथून देण्याची भाषाहि त्यांनीं केली आहे. परंतु या कवितेला क्रांतीचें कारकत्व देणें म्हणजे कार्य आणि कारण यांच्या संबंधाची अत्युक्ति आहे. महाराष्ट्रांत जें सामाजिक परिवर्तन झालें, तें क्रांति म्हणण्याइतकें जलद अथवा परिपूर्ण झालें असें आपण म्हटलें तरी, तें घडवून आणण्यास इतर अनेक कारणें ज्या प्रमाणांत कारक ठरलीं, त्या मानानें केशवसुतांच्या कवितेचा किंवा अर्वाचीन कवितेचाहि उपयोग अत्यंत अल्पच म्हणावयास हवा. या सामाजिक क्रांतींत केवळ वाङ्मयाचाच भाग विचारांत घेतला, तरी आगरकरादि सुधारकांचें लेखन, हरिभाऊआदि कादंबरीकारांचें लेखन, किंवा देवल, कोल्हटकर, गडकरी आदि नाटककारांचें वाङ्मय हें एकैकशःसुद्धा जेवढें कार्यकारी झालें, तेवढें केशवसुतांचें, अथवा अर्वाचीन, काव्य ठरणार नाहीं असेंच कोणाहि निरभिनिविष्ट वाचकास म्हणावें लागेल. मराठी कविता आणि केशवसुतांची कविता या इतर वाङ्मयप्रकारांइतकी लोकांनीं वाचली असें वाटत नाहीं, आणि तशी वाचली गेल्याविना ती मतपरिवर्तन करूं शकत नाहीं. शिवाय वाङ्मयाचा भाग मतपरिवर्तनांत कितीहि असला, तरी तें प्रत्यक्ष व्यवहारांत येण्यास आर्थिक आणि राजकीय व्यवहारांतील दडपण व व्यक्तींनीं धडाडीनें घालून दिलेलीं

उदाहरणेंच अधिक कार्यकारी ठरतात असा अनुभव आहे. सामाजिक क्रांतीच्या अर्थानें केशवसुतांना क्रांतिकारक म्हणणें अत्युक्तीचें ठरेल.

परंतु मराठी कवितेला निराळें वळण देण्याचें कारकत्व मात्र केशवसुतांना द्यावयास हवें. वाङ्मयाच्या इतिहासांत १५–२० वर्षें हा काल फार अल्प आहे. परंतु १८८५ ते १९०५ या कालांत मराठी कवितेस मिळालेली कलाटणी ही फार मोठी होती यांत शंका नाहीं, व तीमध्यें फार मोठा भाग केशवसुतांचा होता यांतहि शंका नाहीं. प्रथमतः हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, 'नवीं काव्यें' लिहिण्याची कल्पना व दृष्टि त्यांच्याखेरीज त्यांच्या इतर समकालीनांत होती असें दिसत नाहीं. आजच्या कवितारचनेवरचीं बंधनें आपल्यास अमान्य असल्याचें त्यांनीं प्रारंभींच जाहीर केलें होतें व कविता अशी असावी आणि तशी नसावी हें आम्हांला सांगणारे तुम्ही कोण असा सवालहि त्यांनीं टाकला होता. अक्षरवृत्तें अधिक बंधनकारक असतात म्हणून मात्रावृत्ताकडे मराठी कविता नेण्याचा प्रयत्न त्यांनीं केला हें 'जलधरमाला', 'मणिबंध' या वृत्तांच्या चालीवरचीं मात्रावृत्तें त्यांनीं घातलीं यावरून व्यक्त होतें. यांतहि जुनीं साकी, दिंडी, आर्या हीं रूढ मात्रावृत्तें किंवा संगीत नाटकांतील लोकप्रिय चाली एवढ्यावरच त्यांनीं भागवलें नाही. पादाकुलक आणि बालानंद इत्यादि मात्रावलींचे नवीन आकृति-विशेष निर्माण करून रचनेचें रूपहि बऱ्याच अंशीं वेगळें घडविलें. 'मराठी छंदोरचनाकार' पटवर्धन यांना हे आकृतिविशेष उन्मनी, झपूर्झा, श्यामाराणी, महती, सृष्टिलता इत्यादि नवीन नांवें देऊन मान्य करावे लागले. 'तुतारी'चा चरण पादाकुलकाचा खरा, परंतु असे पांच चरण घेऊन त्यांतील पहिल्या व अखेरच्या चरणांचें एक यमक आणि मधल्या तीन चरणांचें एक यमक साधून कांहीं एक वेगळाच आकृतिविशेष त्यांनी निर्माण केला. तीच गोष्ट 'झपूर्झा' या कवितेची. या नवीन मात्रारचना किंवा आकृतिविशेष यांचें अनुकरण गडकरी, बालकवि, रेंदाळकर, नागेश इत्यादि पुढील पिढींतील कवींनीं किती प्रमाणांत केलें हें पाहिलें म्हणजे अर्वाचीन मराठी कवितेचें बाह्यरूप पालटण्यांत केशवसुतांचा भाग किती होता याची कल्पना सहज येते. सुनीतासारखा काव्य-प्रकार बऱ्याच प्रयत्नांनीं त्यांनीं मराठींत आणला. त्यांत आलेल्या नेहमीपेक्षा वेगळ्या यमकरचनेचा प्रयोग तुतारी, झपूर्झा, श्यामाराणी, वातचक्र इत्यादि कवितांमध्यें करून यमकरचनेमध्यें विविधता आणली, आणि यमकबंधन तोडलें नसलें तरी शिथिल करण्यास हातभार लावला. एकदोन कवितांत (फुलांची पखरण व फुलपाखरूं) हें वृत्तबंधन आणखी शिथिल करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला असें दिसून येतें. या प्रयोगांचा प्रसार मराठी कवितेंत झपाट्यानें झाला आणि तिचें नवीनत्व बाह्य रूपावरूनहि लक्षांत येऊं लागलें.

परंतु बाह्य रूपामधील या परिवर्तनापेक्षां अंतरंगामधील परिवर्तन हें अधिक महत्त्वाचें होतें. केशवसुतपूर्वकालांतील कविता बहुतांशीं कथात्मक, वर्णनपर, वस्तुनिष्ठ

अशी होती. तीमध्यें कवीचा आत्माविष्कार क्वचितच होई. वैयक्तिक अनुभव व विचार हे काव्याचा विषय होतात ही गोष्टच मुळीं नवीन होती. असा आत्माविष्कार केशवसुतांच्या कवितेंत प्रथमच प्रामुख्यानें झाला. याला आपण आत्मलेखन असें एकच नांव दिलें तरी त्यांत विषयदृष्ट्या रूढिभंजन, स्वातंत्र्यप्रीति, प्रेमभावनेचें वैयक्तिकत्व, गूढ अनुभवांची हुरहूर, सृष्टीबद्दलचें प्रेम अशा विविध गोष्टी समाविष्ट झालेल्या होत्या. त्यामुळें नवीन कवितेच्या अंतरंगांतहि अभूतपूर्व असें परिवर्तन झाल्यासारखें वाटूं लागलें. समकालीन सामाजिक आचार काव्यविषय होऊं लागले. पूर्वीच्या कवितेंत स्वतःच्या जीवनाशीं निगडित असणाऱ्या गोष्टींचा उल्लेख सहसा होत नसे. स्वतःच्या प्रेमाविषयीं मोकळेपणानें बोलणें हेंहि कवीला शक्य होत नसे. विषय कोणताहि असला, प्रेम, निसर्ग, काव्य, सामाजिक आचार किंवा जीवनविषयक तात्त्विक विचारहि असला, तरी त्याकडे आपल्या दृष्टिकोणांतून पाहून स्वतःचीं मतें, अनुभव, भावना कवि व्यक्त करूं लागला कीं त्याला कांहीं वेगळेपण चढतें व त्यांतील आशय अधिक प्रत्ययकारी होऊं लागतो हें केशवसुतांच्या कवितेनें दाखवून दिलें, व त्यामुळेंच त्यांच्यामागून येणाऱ्या नवीन कवींना या नवीन काव्यरचनेचा आश्रय करावासा वाटला. रेंदाळकर व नागेश या जुन्या पद्धतीच्या शिक्षणक्रमांतून गेलेल्या लोकांनाहि तिनें आकृष्ट केलें, आणि केशवसुतांच्या मृत्यूनंतरच्या पंधरा वर्षांतच नवीन कविता विरोधाला न जुमानतां दृढमूल झाली. याचें श्रेय कोणाला द्यावयाचें याबद्दल टीकाकारांचा अभिप्राय कांहींहि असो; कविजनांचा अभिप्राय मात्र एकच होता. आणि तो म्हणजे तें श्रेय केशवसुतांकडेच जातें हा होय.

मराठीमधील या नवीन काव्यसंप्रदायास रोमँटिक संप्रदाय म्हणण्याची प्रथा आहे. ज्या इंग्रजी कवितेवरून ही मराठी कविता अवतरली, तीहि रोमँटिक कविताच होती. त्यामुळें त्या संप्रदायाचीं प्रमुख लक्षणें केशवसुतांच्या कवितेंत आढळलीं तर तें स्वाभाविकच आहे. ठराविकाविरुद्ध बंड किंवा मूर्तिभंजन हें त्यांचें पहिलें लक्षण आहे. काव्यांतील आणि काव्याबाहेरील ठराविक आचारांविरुद्ध हें बंड आहे. रूढिविरोध असेंहि नांव त्यास देतां येईल. व्यक्तिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह हें त्याचें दुसरें लक्षण म्हणतां येईल. याचें पर्यवसान आत्मलेखनामध्यें आणि स्वतःच्या प्रेमाच्या स्पष्ट आविष्कारामध्यें होणें अपरिहार्य होतें. स्वतःच्या गूढ, अस्पष्ट अशा अनुभूतीं-विषयींची आस्था व तन्मूलक हुरहूर हें त्याचें आणखी एक लक्षण म्हणतां येईल. 'झपूर्झा' आणि 'हरपलें श्रेय' या कवितांमध्यें हें आपल्यास दिसून येतें. स्त्रीविषयक आणि इतर दलित-वर्गविषयक सहानुभूति आणि त्यास अनुरूप अशी उदारमतवादी वृत्ति हेंहि त्याचेंच लक्षण होय. सृष्टीचें चेतनत्व आणि तिचें सौंदर्य यांविषयीचा जिव्हाळा हाहि या पंथाचा एक विशेष मानतां येईल. हे सर्व विशेष केशवसुतांच्या कवितेमध्यें आपल्यास दिसून येतात. म्हणूनच कीं काय, या संप्रदायाचा आणखी एक

विशेष म्हणून वृत्तीचा रोगटपणा किंवा विकृति हीहि कांहीं टीकाकारांना केशवसुतांमध्यें आढळली. रोमँटिक वृत्तीचे विशेष केशवसुतांच्या आचारांत किती होते तें आज सांगतां येत नाहीं, परंतु त्यांच्या कवितेंत, तीमधील चांगला भागच मोठ्या प्रमाणांत आला आहे.

तथापि त्या संप्रदायाचा एक मुख्य विशेष—सौंदर्याबाबत होणारी कवीची तरल प्रतिक्रिया—ही मात्र केशवसुतांच्या कवितेंत विशेष दिसून येत नाहीं. केशवसुतांना सौंदर्याचें वर्णन तरी निदान चांगलें करितां येत नसे; मग तें व्यक्तिसौंदर्य असो कीं सृष्टिसौंदर्य असो. त्यांची गुलाबाची कळी केवळ बहारदार आहे; त्यांचें फुलपाखरूं सुंदर वागडतें इतकेंच; त्यांचें बांधावरील फूल नुसतें 'सुरेख' आहे. व्यक्तिसौंदर्यवर्णनाचें एकच उदाहरण त्यांच्या कवितेंत आढळतें. तें म्हणजे 'मनोहारिणी'चें; पण त्यांतहि स्तन–जघन–कटि या जुन्या ठराविक अवयवांचा उल्लेख होतो. सौंदर्याबद्दलची त्यांची प्रतिक्रिया बरीचशी बौद्धिक आणि नैतिक स्वरूपाची असते, ऐंद्रिय नाहीं. म्हणून फुलामधील रंग, गंध, आकृति यांमधील सौंदर्याचा उल्लेख करण्याऐवजी त्यांत प्रीति आहे, मार्दव आहे, सद्गुण आहेत आणि गाणेंहि आहे असें त्यांना वाटतें. सुंदर गोष्टी त्यांना दिसतात, परंतु त्यांचें सौंदर्य कशांत आहे हें त्यांना उमगत नाहीं. म्हणून आपल्या नैतिक कल्पनांचा आरोप ते त्यांच्यावर करितात. सौंदर्यदर्शनाबाबत त्यांची स्थिति अशी असल्यानें शुद्ध सौंदर्यदर्शन त्यांच्या कवितेंत क्वचित् घडतें. होतें तें विचार-कक्षेंतील नैतिक सौदर्याचें. त्यांच्या आशयशोधक वृत्तीला नैतिक सौंदर्याचेंच महत्त्व वाटे, आणि साधें इंद्रियग्राह्य सौंदर्य हें निर्विकल्प असेंच दिसे. यामुळें शब्दयोजना आणि विचार-रचना यांमधील लालित्यहि त्यांना आत्मसात् करितां आलें नाहीं. त्यांच्या कवित्वाच्या पदवीला यामुळें मोठीच खोट बसली आहे, व गडकरी आणि बालकवि यांच्या माधुर्य-लालित्याला मोहित झालेल्या अनेक रसिकांना केशवसुतांच्या कवितेमधील विचार-गुरुत्वाचें आकलन होणें कठिण होऊन बसलें.

याच संदर्भात केशवसुतांविषयीच्या आणखी एका वादविषय झालेल्या विचाराचा परामर्श घेणें योग्य होईल.तो विचार म्हणजे त्यांच्या कवितेंत व्यक्त झालेल्या नैराश्याचा होय. नैराश्य, अतिरिक्त नैराश्य हाहि रोमँटिक संप्रदायाचा एक विशेष मानला गेला आहे. कित्येकांना त्यांत विकृति किंवा रोगटपणा दिसतो; कित्येकांना त्यांतहि कांहीं गौरवास्पद वाटतें. आपल्या भोवतालची परिस्थिति असमाधानकारक आहे याची तीव्रतेनें जाणीव होण्याला व्यक्तीचें मनहि सूक्ष्म संवेदनशील असावें लागतें. सामान्य माणसाला ज्या परिस्थितींत कुरकुर करण्याजोगें कांहीं दिसत नाहीं, त्यांतहि तसें कांहीं आहे याचें आकलन होण्यास व त्याबद्दल विषाद, दुःख, नैराश्य अनुभवास येण्यास त्याचें मन सामान्यापेक्षा निराळ्या अपेक्षांच्या भंगानें व्यथित व्हावें लागतें.

रोमँटिक मन अशा अपेक्षाभंगांनीं दुःखित झालेलें असतें व हें आपलें दुःख तें कवितेच्या द्वारें व्यक्त करीत असतें. कित्येक वेळां त्याचें त्यालाच त्या दुःखाचें कारण कळत नाहीं, किंवा त्याचें पृथक्करण करितां येत नाहीं. 'कोठुनि येते उदासीनता' हें बाल-कवींना कळत नसे. Tears, idle tears, I know not whence they come असें टेनिसनला होई. रोमँटिक संप्रदायाचा विशेष म्हणून नव्हे, पण केशवसुतांनाहि 'हरपलें श्रेया'ची तळमळ लागली होती असें मानण्यांत येतें. हें दुःख कसलें आहे? इतरांना 'तुतारी'चे उत्तेजक साद घालणारा, 'स्फूर्ती'च्या नशेंत जग उलथून द्यावयास निघालेला, नव्या दमाचा, सर्वांना आव्हान देणारा शूर शिपाई, 'गोफणी'नें हाणाहाण करण्याची तयारी असलेला, 'संसाराला समर' मानणारा व इतरांना प्राण देण्याचें आवाहन करणारा हा कवि 'तिमिरीं आम्ही नित्य रखडणें– विवंचनांतचि जिणें कंठणें।', 'अस्मदीय हृदयीं ठरलें–कीं जग हें दुःखें भरलें', 'अमुचा पेला दुःखाचा–डोळे मिटुनी प्यायाचा', 'मृत आशांच्या चितांवरुनिया–पिशाच माझें भटकत आहे' असें कां म्हणतो असा प्रश्न वाचकांस साहजिकच पडतो. यांतलें खरें कोणतें–दुःख–नैराश्य कीं उत्साह–आशा?

केशवसुतांच्या कांहीं कवितांमधील नैराश्य त्यांचें स्वतःचें होतें कीं नाहीं याबद्दल शंका घेणें शक्य आहे. वयाच्या सव्विसाव्या वर्षींच 'काळोखाच्या जगामधें या–मृत आशांच्या चितांवरुनिया–पिशाच माझें भटकत आहे' असें म्हणण्याइतकें नैराश्य त्यांना कां आलें होतें याचा उलगडा होणें त्यांच्या चरित्रावरून शक्य नाहीं. एकंदरींत आर्थिक स्थितीचें प्रतिकूलत्व आणि त्यामुळें वाटणारी अडचण या गोष्टींमुळें निरुत्साहाची मनःस्थिति असणें वेगळें व मृत आशांच्या चितांवरून 'पिशाच माझें भटकत आहे' यांतील निराशेची तीव्रता वेगळी. यानंतर दहा वर्षांनीं, म्हणजे वयाच्या पस्तिशींत लिहिलेल्या 'वातचक्र' या कवितेंत ते स्वतःला 'जगद्द्रुमाचें पिकलें पर्ण' असें म्हणवून घेतात, तेंहि पटण्यासारखें नाहीं. 'पिकलें' म्हणण्याइतकें त्यांचें वय झालें नव्हतें. कित्येक भाषांतरित किंवा रूपांतरित कवितांतील नैराश्य हें अर्थात् केशवसुतांचें नव्हे. 'घुबड' आणि 'स्वप्नांतील स्वप्न' या कवितांतील नैराश्य 'पो' कवीचें आहे; केशवसुतांचें नाहीं. आपलें शिक्षण चालू असतांना व काव्य-रचनेच्या प्रारंभींच आपल्या जीवनाचें ध्येय 'नवीं काव्यें' लिहिण्याचें आहे हें त्यांनीं व्यक्त केलेंच आहे. तेव्हा आर्थिक प्रतिकूलतेमुळें सोसाव्या लागणाऱ्या अपेष्टांची त्यांना विशेष तमा असावी असें वाटत नाहीं. गडकऱ्यांप्रमाणें जीवनांतील प्रेम-नैराश्याचें कारण त्यांच्या गुरूंच्याबाबत आपल्यास सांगतां येणार नाहीं. मग केशवसुतांच्या नैराश्यचें कारण काय?

केशवसुतांच्या जीवनांत एकंदरींत उत्साह व आशा वाटण्याजोग्या गोष्टी घिडल्या नाहींत हें सांगायला पाहिजे असें नाहीं. शिक्षणांत आलेल्या अडचणी, अधिक शक्षण मिळविण्याची अशक्यता, नोकरीमधील अस्थायित्व आणि असमाधानकारकता,

तीमधून होणारी तुटपुंजी प्राप्ति, त्यामुळें विशेष सुखकारक नसलेलें जीवनमान, या सर्वांमुळें इतर अनेक लोकांप्रमाणें केशवसुतांचाहि जीवनविषयक दृष्टिकोण नैराश्याचा व्हावा हें अगदी स्वाभाविक होतें. बहुसंख्य लोकांबाबत आज अथवा भविष्यांतहि जीवनाचा हाच न्याय खरा असण्याचा संभवच अधिक असतो. अशा लोकांनीं 'अमुचा पेला दुःखाचा' असें म्हणावें हें स्वाभाविकच आहे, 'उद्याची चिंता' त्यांना सुटलेली नसते, 'इच्छित न मिळे कांहीं' असा त्यांचा नेहमीचा अनुभव असतो. म्हणून जगाला 'भिकार' म्हणण्याची प्रवृत्ति होते. तसे उद्‌गार त्यांनीं काढल्यास त्यांमागील आर्तता कळण्यासारखी असते. तिला वैक्लव्य किंवा रोगटपणा समजण्याचें कारण नाहीं. या नैराश्याइतकीच या जीवनास होणारी त्यांची प्रतिक्रिया कणखरपणाची मात्र असली पाहिजे. केशवसुतांची प्रतिक्रिया तशी नव्हती काय ? 'अमुचा पेला दुःखाचा' असला, 'तरी आसवें न आणूं नयनीं । मरून जाऊं एक दिनीं ।' अशी त्यांची वृत्ति असे. संसाराला समर गणून त्याच्याशीं भिडण्याची भाषा ते बोलतात. वैयक्तिक जीवनांत नैराश्याचा अनुभव तर नित्याचाच होता. तरी सामाजिक अन्यायाचा प्रतिकार व्हावा, समतेची स्थापना व्हावी, बंधुभाव वाढावा, रूढीचें बंड मोडावें अशीच प्रतिक्रिया त्यांच्या मनाची होती. त्याला आशावाद म्हणतां येत नाहीं, पण प्रतिकारवाद म्हणणें शक्य आहे. अशा तऱ्हेची प्रतिक्रिया होणें ही वैक्लव्याची खूण नव्हे, ती कणखर मनाची द्योतक आहे. त्यांच्या 'हरपलें श्रेय' या कवितेंत व्यक्त होणाऱ्या आर्ततेबरोबर त्या कवितेच्या आधीच्या 'गोफण' या कवितेमधील कठिण शब्दांच्या धोंडचांनीं हाणाहाण करण्याची तयारीहि लक्षांत घ्यावयास हवी. सामाजिक अन्यायाच्या प्रतिकाराची उसळी आली कीं गोफणीचा उपयोग करावयाचा, जग उलथून देण्याची भाषा करावी; आणि ही उसळी संपली कीं वैयक्तिक जीवनामध्यें 'तिमिरीं आम्ही नित्य रखडणें' अशी तक्रार करावी असा हा चक्रनेमिक्रम होता.

याचबरोबर हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं केशवसुतांच्या कवितेमधील कांहीं नैराश्य हें पाश्चात्य कवितेचा वारसा म्हणूनहि त्यांच्याकडे आलें असावें. रोमँटिक कवितेचा एक विशेष म्हणून उत्कट निराशा आणि तन्मूलक औदासीन्य यांचा उल्लेख केला जातो. अशा तऱ्हेची निराशा आणि औदासीन्य हीं शेली व कीटस् यांच्या कवितांमधून प्रत्ययास येत व त्याचें काव्यानुकरण करण्यांत या विशेषांचाहि स्वीकार होई. या दोन कवींप्रमाणेच निसर्गविषयक काव्यांत ज्या वर्डस्‌वर्थचा परिणाम केशवसुतांवर झाला होता, त्याचाहि उल्लेख करावयास पाहिजे. मानवापेक्षा निसर्ग हा अधिक चांगला आहे, सरळ, उदार व शांत आहे, म्हणून सुखीहि आहे, अशी त्याची कल्पना. त्या निसर्गाशीं समरस होऊन वर्डस्‌वर्थ समाधान मिळवूं शकला; केशवसुतांना तें साधलें नाहीं. मानव व निसर्ग यांतील विरोधच त्यांना अधिक जाणवला. केशवसुतांचें 'हरपलें श्रेय' हें आहे.

कवि या दृष्टीनें केशवसुतांचें महत्त्व कशांत आहे याविषयीहि मतभिन्नता दिसते. केशवसुतांची कविता विपुल नाहीं, आणि कलेची आदर्शभूत कारागिरी त्यांच्या कवितेंत दिसून येत नाहीं असें माधवराव पटवर्धन म्हणतात तें खरें आहे. केवळ विपुल रचनेने कवि मोठा होत नाहीं, तथापि मोठेपण लाभण्यास विपुलत्वाचा उपयोग होतो यांतहि शंका नाहीं. तसेंच कलेची कारागिरी असल्यानेंच केवळ काव्य मोठें ठरत नाहीं, तरी तिचाहि उपयोग आहेच. काव्याचें आणि कवीचें मोठेपण अथवा मूल्य अनेक घटकांनीं ठरतें; त्यांपैकी हे दोन घटक आहेत, एवढेंच. गडकऱ्यांच्याप्रमाणें कल्पना-विलास आणि भाषा-विलास हाहि केशवसुतांच्या कवितेचा विशेष नाहीं. बालकवीच्या कवितेचें सौकुमार्य, लालित्य आणि सृष्टिसौंदर्याबद्दलची तरल संवेदनशीलता याहि गोष्टी केशवसुतांच्या कवितेंत आढळत नाहींत. टिळक–विनायकांची प्रसादपूर्णताहि नाहीं. अशा तऱ्हेची अनेक प्रकारची प्रतिकूलता असूनहि केशवसुतांना आजचें स्थान कसें मिळालें असावें याचें उत्तर तिच्यामध्यें सर्व महान् वाङ्मयामध्यें लागणारें विचार-गुरुत्व, भावनेचें उत्कटत्व, यांनीं प्राप्त होणारे ओज, आणि जिव्हाळा आहे यामध्यें आहे. या जिव्हाळ्यामुळें आणि ओजामुळें ह्यांच्या कवितेस एक प्रकारचें सामर्थ्य लाभलें आहे. त्यांचा आपल्या माध्यमावर म्हणजे काव्यावर विश्वास आहे. त्यांच्या पंधरावीस कविता तरी मराठी काव्यास भूषणभूत होऊन बसल्या आहेत. काव्यदृष्ट्या त्या कवितांचें मूल्य पहिल्या दर्जाचें आहे. आपल्या माध्यमावरील विश्वासाच्या जोरावर आणि प्रामाणिक प्रयत्नाच्या शक्तीवर त्यांनीं मराठी कवितेस आपल्या मनाशीं ठरविल्या प्रमाणें निराळें वळण लावलें हा त्यांच्या मोठेपणाचा उत्तरभाग आहे. केवळ प्रामाणिक इच्छेनें त्यांना तें साधलें असतें असें नाहीं. उपरिनिर्दिष्ट गुणांमुळें त्यांच्या कवितेस जें सामर्थ्य लाभलें त्यामुळेंच त्यांची मनीषा सिद्ध होऊं शकली. त्यांनीं सामाजिक आशयाची, क्रांतीला अनुकूल अशा विचारांची कविता लिहिली हा काव्यमूल्याच्या दृष्टीनें गौण असाच भाग समजला पाहिजे. पण नवीन काव्य लिहिण्याच्या प्रामाणिक प्रयत्नामुळें ती तत्कालीन मराठी काव्यांत पृथगात्म ठरली आणि अर्वाचीन मराठी काव्याचें आरंभस्थान होऊन बसली.

आज केशवसुतांचें युग संपलें आहे असे उद्गार कित्येकांनीं काढिले आहेत. त्यांत तथ्य आहे असें सकृद्दर्शनीं वाटलें, तरी वस्तुतः तें खरें दिसत नाहीं. काव्य म्हणजे कवीचें आत्मलेखन किंवा त्याची जीवनविषयक शब्दरूप प्रतिक्रिया, हें केशवसुतांच्या कवितेचें रूपच आजच्या कवितेंत दृष्टीस पडतें. कवि अंतर्मुख होऊन आपल्या भाव-विश्वाचें चित्र शब्दांनीं काढीत आहेत, तोंपर्यंत काव्यविषयक केशवसुतांची परंपराच ते चालवीत आहेत असें म्हटलें पाहिजे. रचनेवरील बंधनें दूर करून ती आत्माविष्कारास सुकर करण्याचें त्यांचें धोरण आजच्या मुक्तच्छंदांत पर्यवसित झालें असलें, तरी केशव-सुतांच्या प्रयत्नाशीं तें सुसंगतच आहे. समकालीन रूढ परिस्थितीविरुद्ध आक्रोश वा

प्रतिक्रिया करण्याचें धोरण आजचे कवि जोंपर्यंत सांभाळत आहेत, तोंपर्यंत रूढीविरुद्ध वंड करून जग उलथून देण्याची भाषा बोलणाऱ्या केशवसुतांची परंपरा धरूनच ते वागत आहेत असें म्हणावें लागेल. समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व हे विचार जोंपर्यंत आजच्या काव्यांतून प्रकट होत आहेत, तोंपर्यंत 'तुतारी' फुंकणाऱ्या नवा शिपायाचें आणि आजच्या कवींचें घराणें एकच आहे असें म्हणणें प्राप्त आहे. केशवसुतांनीं जें जें सुरू केलें, त्याचें क्रमप्राप्तच पर्यवसान म्हणून आजची कविता निर्माण होत आहे. त्यांत कांहीं गोष्टींचा अतिरेक होत असेल, कांहीं गोष्टींस अवास्तव महत्त्व मिळालें असेल; परंतु त्यामुळें त्यांतील मूलभूत एकत्व दृष्टीआड करून चालणार नाहीं. जी 'दिव्य ठिणगी' आपण आणली, पण जिच्याकडे आपल्या हयातींत लोकांचें दुर्लक्ष होत आहे असें त्यांना वाटे, त्या ठिणगीचें कार्य अनेक प्रकारांनीं, अनेक रूपांनीं आजच्या मराठी कवितेंतहि चालू आहे हें पाहून केशवसुतांच्या आत्म्यास तरी दुःख होण्याचें कारण नाहीं. आजच्या कवितेवर हल्ला चढविणाऱ्यांना तो केशवसुतांचें नांव घेऊन चढवितां येणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाधीन.
अनुक्रम....७४६३ - विः निबंध.....
क्रमांक .....२०८१..... वोः विः .....

(हरपलें श्रेय १९५६; पृ. क्र. ३–२८.
कांटिनेन्टल प्रकाशन.)